टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास
विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी
सादर करण्यात आलेला संशोधन प्रबंध

***Educational Thoughts Of Social Reformers In Nineteenth Century Maharashtra : A Critical Study***

# एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार: एक चिकित्सकअभ्यास


संशोधक

प्रा. गोविंद दगडू कदम

भाग्योदय कनिष्ठ महाविद्यालय, केडगांव (देवी),

अहमदनगर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. किसन अंबाडे

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,

न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर.


जुलै २०१३

# प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर केलेला 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार: एक चिकित्सक अभ्यास' हा शोध प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. हा शोध प्रबंध मी इतर कुठल्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी किंवा अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : अहमदनगर

प्रा. गोविंद दगडू कदम

दिनांक : २४/०७/२०१३

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे इतिहास विषयांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर केलेला 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास' हा शोध प्रबंध श्री गोविंद दगडू कदम यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली लिहिलेले मूलभूत संशोधन कार्य आहे. माझ्या माहितीप्रमाणे तसेच देण्यात आलेल्या खात्रीने असे घोषित करतो की, सदर शोध प्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठास किंवा परीक्षण मंडळास सादर केलेला नाही.

ठिकाण : अहमदनगर

दिनांक : २४/०७/२०१३

प्रा.डॉ.किसन अंबाडे

सहयोगी प्राध्यापक

इतिहास विभाग,

न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,

अहमदनगर

# ऋणनिर्देश

'शिक्षण' हे मानवी जीवनाचे एक महत्त्वाचे अंग आहे. शिक्षणानेच माणूस सुसंस्कृत होतो. माणसाचा सर्वांगीन विकास हा त्याला मिळणाऱ्या शिक्षणावरच अवलंबून असतो. ज्ञानाशिवाय व्यक्ती म्हणजे पशूच होय. एकोणिसाव्या शतकात जगात प्रबोधनाची वाटचाल सुरू होऊन सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रात सुधारणांचे वारे वाहू लागले. प्रबोधनाचा हा प्रभाव भारतासारख्या देशातही सुरू झाला. या प्रबोधनाच्या चळवळीत सहभागी झालेल्या सुधारकांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले व त्यातूनच संपूर्ण भारतभर सुधारकांनी शैक्षणिक चळवळ सुरू केली. महाराष्ट्रापुरता विचार करता एकोणिसाव्या शतकात अनेक समाजसुधारकांनी महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळ जोपासली. त्यांच्या शैक्षणिक चळवळीमागे एक महत्त्वाची शैक्षणिक भूमिका होती. या शैक्षणिक विचारांचा प्रभाव तत्कालीन शिक्षण पद्धतीबरोबरच आजच्या शिक्षण पद्धतीवरही पडल्याचे दिसून येते. निश्‍चितच एकोणिसाव्या शतकात सुधारकांनी जी शैक्षणिक चळवळ राबविली त्या सुधारकांचे शैक्षणिक विचार अभ्यासणे महत्त्वाचे वाटले. या जाणीवेतूनच **'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास'** हा विषय सूचला व या विषयावरील संशोधन कार्य माझ्या हातून पूर्णत्त्वास आले. अर्थात हे कार्य पूर्णत्त्वास येत असताना अनेकांचे मार्गदर्शन, आशीर्वाद, प्रेरणा, सहकार्य, व शुभेच्छा मिळाल्या. या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक निर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत शोध प्रबंध पूर्णत्त्वास नेण्यासाठी न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगरचे इतिहास विभागाचे सहयोगी प्राध्यापक व माझे संशोधन मार्गदर्शक प्रा.डॉ. के.एम.अंबाडे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यात येणारी प्रत्येक अडचण त्यांनी अगदी कळकळीने सोडविण्याचा प्रयत्न केला. संशोधन करीत असताना आवश्यक असणारी तत्त्वे, पायऱ्या, संदर्भ साधने, प्रबंध मांडणी याविषयी त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन

केले. त्यांनी केलेल्या या मार्गदर्शनामुळेच हे संशोधन कार्य पूर्णत्त्वास जाऊ शकले. त्यांच्या या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विभागाचे अधिष्ठाता प्रा. श्री विजय कारेकर, इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.श्रद्धा कुंभोजकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून माझ्या संशोधन कार्यास दिशा दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील पीएच.डी. दूरशिक्षा विभागातील सर्व कर्मचारी यांनी वेळोवेळी प्रबंध सादर करणेबाबतची माहिती दिली, त्यांचाही मी आभारी आहे.

मी सेवेत असलेल्या 'भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, केडगांव, अहमदनगर या संस्थेचे आदरणीय अध्यक्ष श्री भानुदास एकनाथ कोतकरसाहेब व सचिव श्री रघुनाथ भाऊराव लोंढे सर यांच्या शुभ अशीर्वादामुळेच मी हे संशोधन कार्य पूर्ण करू शकलो. त्यांचा मी शतशः ऋणी आहे. त्याचबरोबर संस्था सदस्य व अहमदनगर महानगर पालिकेचे मा.महापौर श्री संदीपदादा कोतकर यांचेही मौलिक सहकार्य लाभले. या संस्थेंतर्गत चालविले जाणारे भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केडगावचे प्राचार्य श्री बेरड डी.ए., भाग्योदय विद्यालय, भोयरे पठारचे मुख्याध्यापक श्री कार्ले एम.ए., जगदंबा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री लगड बी.व्ही., तसेच संस्थेचे रजिस्ट्रार श्री दिघे के.एन. या सर्वांचे शुभाशिर्वाद पाठीशी होते. त्यांचा मी आभारी आहे.

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी ज्यांच्याकडून मला प्रेरणा मिळाली असे माझे मित्र न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून सेवेत असलेले प्रा.डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे व सोन्याबापू तळोले, अबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शेवगाव येथे प्रभारी प्राचार्य म्हणून सेवेत असलेले प्रा.आदिनाथ अन्नदाते, जगदंबा विद्यालयातील शिक्षक श्री तोडमल सर, रेसिडेन्शीअल ज्युनिअर कॉलेज, अहमदनगरचे प्रा.नितीन भूसाळ, श्री रंगनाथ भापकर सर, भाग्योदय विद्यालय, केडगावचे श्री कोतकर सर, श्री दरेकर सर, महाराष्ट्र

अध्यापक विद्यालयाचे प्रा.उत्तम पाटोळे, बोल्ली सर तसेच डॉ.संजय उदमले या सर्वांची प्रेरणा व सहकार्य विशेष मोलाचे ठरले.

कोणत्याही संशोधन कार्याचा आत्मा संशोधनासाठी वापरली जाणारी संदर्भ साधने हा असतो. प्रस्तुत संशोधनासाठी जी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधने आवश्यक होती ती साधने टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, अहमदनगर जिल्हा वाचनालय, न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे ग्रंथालय, अहमदनगर महाविद्यालयाचे ग्रंथालय, विद्याप्रतिष्ठान शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे ग्रंथालय या ग्रंथालयातून विनाविलंब उपलब्ध होऊ शकली. तेथील कर्मचाऱ्यांच्या सहकार्याशिवाय संशोधन कार्य पूर्णत्त्वास जाणे कठीण होते.

महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार अभ्यासताना 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था', कर्वेनगर, पुणे या संस्थेचे सहकार्यही बहुमोल ठरले.

ज्या संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात मी सेवेत आहे त्या संस्थेतील माझे सहकारी मित्र प्रा.कांडेकर जी.बी., प्रा.पांडूळे डी.एम., प्रा.होले ई.के., श्री येवले पी.डी., श्री शेख एच.सी., श्री दरेकर जे.एस., श्री कांबळे एम.के., श्री कोतकर बी.झेड., श्री हराळ ए.व्ही., श्री मुसळे एस.बी., श्री गोसावी एस.व्ही., श्री धस एस.टी., श्री मंडलीक एस.एम., श्री नरवडे बी.एस., श्री बारगळ डी.जी., श्री काकडे एस.आर., श्री कार्ले एस.एम., श्री रंगनाथ सातपुते, श्री गायकवाड मधुकर, श्री भवर संदीप, श्री कावरे बाळासाहेब, श्री उरमुडे अरूण, श्री कुलट आदिनाथ, श्री गायकवाड गणेश, श्री गायकवाड सुधाकर या सर्वांच्या शुभेच्छा पाठीशी होत्या.

याशिवाय संशोधन कार्यात वेळोवेळी मदत करणारे माझे मित्र मिलींद जामदार, काशीनाथ पवार, पांडूरंग एळवंडे, जिजाबापू दहातोंडे, बद्रिनाथ गुंजाळ, श्री मोटे सर, श्री दरवडे सर, पंडित पाटील, प्रताप पाटील, रवी फुले, निवास चोपडे, रवी शिंदे, सतीष मिश्रा, दत्तात्रय पवार या सर्वांचे सहकार्य विशेष महत्त्वाचे ठरले.

या सर्वांबरोबरच संशोधन कार्यात माझे कुटुंबीय नातेवाईक यांची प्रेरणाही तितकीच मोलाची होती. माझी आई यशोदाबाई कदम, तसेच श्री रघुनाथ मरकड, श्री कानिफनाथ ताठे, श्री मच्छिंद्र काळे यांचे आशीर्वाद पाठीशी होते तर भाऊ बाबासाहेब कदम, त्याच बरोबर रवींद्र मरकड, दत्तात्रय मरकड, दत्तात्रय थोरात, सतीष थोरात, वैभव ताठे यांचे वेळोवेळी सहकार्य महत्त्वाचे होते. विशेष म्हणजे प्रबंध लिखाणाच्या वेळी माझी पत्नी सौ.सविता, मुली अनुष्का व देविका यांचे प्रेम व जिव्हाळा यामुळे माझ्या संशोधन कार्यात मला मानसिक बळ मिळत गेले व त्यामुळेच हे संशोधन कार्य पूर्णत्त्वास जाऊ शकले. या सर्वांच्या ऋणातच राहणे मला आवडेल.

याशिवाय अनेक गुरूवर्य, सहकारी मित्र यांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्य लाभले आहे. ज्यांचा नामोल्लेख नजर चुकीने राहून गेला त्या सर्वांचेच मनःपूर्वक आभार!

**प्रा. गोविंद कदम**

संशोधक

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | ऋणनिर्देश | I - IV |
| प्रकरण १ ले | संशोधन पद्धती | १ - १२ |
| प्रकरण २ रे | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा आढावा | १३ - ५४ |
| प्रकरण ३ रे | आचार्य बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर व लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांचे शैक्षणिक विचार | ५५ - १३० |
| प्रकरण ४ थे | महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार | १३१ - १८५ |
| प्रकरण ५ वे | न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे शैक्षणिक विचार | १८६ - २४६ |
| प्रकरण ६ वे | गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शैक्षणिक विचार | २४७ - ३३१ |
| प्रकरण ७ वे | महर्षी धोंडो केशव कर्वे व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार | ३३२ - ४१७ |
| प्रकरण ८ वे | सारांश व निष्कर्ष | ४१८ - ४४१ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ४४२ - ४५० |

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | ऋणनिर्देश | I - IV |
| प्रकरण १ ले | संशोधन पद्धती | १ - १२ |
| प्रकरण २ रे | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा आढावा | १३ - ५४ |
| प्रकरण ३ रे | आचार्य बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर व लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांचे शैक्षणिक विचार | ५५ - १३० |
| प्रकरण ४ थे | महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार | १३१ - १८५ |
| प्रकरण ५ वे | न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे शैक्षणिक विचार | १८६ - २४६ |
| प्रकरण ६ वे | गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शैक्षणिक विचार | २४७ - ३३१ |
| प्रकरण ७ वे | महर्षी धोंडो केशव कर्वे व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार | ३३२ - ४१७ |
| प्रकरण ८ वे | सारांश व निष्कर्ष | ४१८ - ४४१ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ४४२ - ४५० |

## प्रकरण पहिले

# संशोधन पद्धती

१.१ प्रस्तावना

१.२ विषय निवड

१.३ संशोधनाची उद्दिष्टे

१.४ संशोधनाची व्याप्ती

१.५ संशोधनाच्या मर्यादा

१.६ संशोधनाची परिकल्पना (गृहीतके)

१.७ संशोधनाची सैद्धांतिक संकल्पना

१.८ संशोधनाची पद्धती

१.९ संदर्भ साधने

१.१० संशोधनाचे महत्त्व

१.११ प्रस्तुत शोध प्रबंधाचे प्रकरणानुसार स्वरूप

## प्रकरण पहिले

# संशोधन पद्धती

### १.१ प्रस्तावना

एकोणिसावे शतक जागतिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, संस्कृती, धर्म, राजकारण, तत्त्वज्ञान, शिक्षणविषयक तत्त्वज्ञान इत्यादी विषयात प्रचंड वैचारिक जागृती घडून आली. हे शतक जगाच्या बाबतीत प्रबोधनाचे शतक ठरले. वास्तविक प्रबोधनाची चळवळ ही पाश्‍चिमात्य देशात सुरू झालेली असली तरीही भारतासारख्या देशावर या चळवळीचा प्रभाव पडणे स्वाभाविक होते कारण एकोणिसाव्या शतकात भारतात ब्रिटिशांची राजवट होती. ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीला संपूर्ण भारताचा राज्यकारभार चालविणे कठीण होते म्हणून त्यांनी भारतीय कर्मचारी वर्ग तयार करण्यासाठी भारतात शिक्षणाची उपाययोजना करण्याचे ठरविले. त्यांच्या या धोरणानुसार मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे विद्यापीठांची स्थापना होऊन शिक्षण खात्याची निर्मिती करण्यात आली.

एकोणिसाव्या शतकाचा विचार केला तर भारतीय समाजात कमालीचे अज्ञान होते व त्याचाच फायदा समाजातील काही उच्चभ्रू व इंग्रज घेत होते. अंधश्रद्धा, जातीभेद, गुलामगिरी व विषमता यांनी भारतीय समाज ग्रासलेला होता. अर्थात काही भारतीय पाश्‍चात्य विद्याविभूषितही होते. त्यांच्या मनात समाजातील अज्ञानाविषयी विलक्षण चीड होती. त्यामुळे समाजाच्या सुधारणेसाठी नव शिक्षणाने प्रभावीत झालेला हा सुधारक वर्ग पुढे आला. उच्चभ्रूंची गुलामगिरी झुगारून द्यायची असेल व समाजातील दोष नाहिसे करायचे असतील तर सर्वप्रथम शैक्षणिक व वैचारिक जागृती होणे आवश्यक आहे. ही जाणीव समाज सुधारकांमध्ये निर्माण झाली होती.

भारतात विविध प्रांतामध्ये समाज सुधारकांची एक फळी निर्माण झालेली होती. तशीच ती महाराष्ट्रातही होती. महाराष्ट्रात प्रामुख्याने जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर,

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, दादोबा पांडुरंग तर्खडकर, आत्माराम पांडुरंग तर्खडकर, डॉ.भाऊ दाजी लाड, महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजर्षी शाहू महाराज यासारख्या समाज सुधारकांनी आपआपल्यापरीने समाज सुधारणेची चळवळ हाती घेतलेली होती. समाज सुधारकांना जो पर्यंत समाजास शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारतीयांची अज्ञान व वाईट चालिरितीतून सुटका होणार नाही याची जाणीव होती. त्यामुळे सर्वच समाज सुधारकांनी शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केलेला होता. यातूनच समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांना एक निश्चित भूमिका प्राप्त झालेली होती. या शैक्षणिक विचारांवरच महाराष्ट्रातील शिक्षण विकासाची पुढील दिशा निश्चित झाली. या अनुषंगाने समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांची भूमिका **"एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास"** या शोध प्रबंधातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १.२ विषय निवड

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत समाज सुधारकांचे खूप मोठे योगदान आहे त्यांच्या शिक्षणविषयक विचारांनी महाराष्ट्र आधुनिकतेच्या उंबरठयावर आलेला आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांनी एक महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. आज जो महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास घडून आलेला आहे त्या पाठीमागे या समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार निश्चितपणे कारणीभूत आहेत. प्रामुख्याने एकोणिसाव्या शतकातील अनेक समाज सुधारकांनी शैक्षणिक कार्य केलेले आहे. त्यांच्या कार्याची जाणीव जरी आज असली तरीही त्यांच्या शैक्षणिक विचारांची नेमकी भूमिका काय होती याची जाणीवही महत्त्वाची वाटते. आजच्या काळातील महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेवर समाज सुधारकांच्या शिक्षण विचारांचा निश्चित असा प्रभाव आहे याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून **'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास'** या विषयाची निवड करण्यात आलेली आहे. समाज सुधारकांचे हे शिक्षण विचार शिक्षण क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांना प्रेरणा देणारे आहे.

## १.३ संशोधनाची उद्दिष्टे

१. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. एकोणिसाव्या शतकातील शैक्षणिक चळवळींचा अभ्यास करणे.

३. एकोणिसाव्या शतकातील शैक्षणिक चळवळीत प्रेरणादायी ठरलेल्या घटकांचा अभ्यास करणे.

४. एकोणिसाव्या शतकातील विविध समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार व योगदान यांचा अभ्यास करणे.

५. शेतकरी, कामगार, दलित, बहुजन समाज व स्त्रियांच्या शिक्षणासंबंधी समाज सुधारकांनी मांडलेल्या शिक्षण विचारांचा अभ्यास करणे.

६. एकोणिसाव्या शतकातील शैक्षणिक विचारांची विसाव्या शतकातील उपयोगिता तपासून पहाणे.

## १.४ संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या अभ्यासासाठी एकोणिसाव्या शतकातील परिस्थितीचा विचार केलेला आहे. या शोध प्रबंधात शिक्षण संकल्पना, अर्थ व उद्दिष्टे तसेच एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार व योगदान यांचा अभ्यास केलेला आहे. याचबरोबर एकोणिसाव्या शतकातील सुधारक व विसाव्या शतकातील आरंभीचे सुधारक यांनी ज्या समाजात राहून शैक्षणिक चळवळ उभारलेली होती तो समाज व तत्कालीन समाजाची परिस्थिती तसेच या शैक्षणिक चळवळीचा आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासावर पडलेला प्रभाव याचाही प्रस्तुत शोध प्रबंधात विचार केलेला आहे.

## १.५ संशोधनाच्या मर्यादा

प्रस्तुत अभ्यासाला काही मर्यादा आहेत. या शोध प्रबंधात एकोणिसाव्या शतकातील निवडक समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती

महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजर्षी शाहू महाराज इत्यादी समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांपुरताच हा अभ्यास विषय मर्यादित आहे. संशोधन अभ्यासाचा मुख्य उद्देश हा सुधारकांचे शैक्षणिक विचार अभ्यासणे हा असल्यामुळे समाज सुधारकांचे शैक्षणिक कार्य अगदी मर्यादित स्वरूपात मांडण्यात आलेले आहे.

## १.६ संशोधनाची परिकल्पना (गृहीतके)

१. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती ही विषमतेवर अधारित होती व शिक्षणास अनुकूल नव्हती.

२. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातील शिक्षणाचा पाया घालण्यात समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचे विशेष योगदान आहे.

३. एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण शिक्षण विकासासाठी उपयुक्त ठरलेले असले तरीही त्यात अनेक दोष होते.

४. आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजर्षी शाहू महाराज या समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांमध्ये एक समाज परिवर्तनाची ठाम वैचारिक भूमिका होती.

५. आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत शैक्षणिक चळवळींचा प्रभाव पडलेला आहे.

## १.७ संशोधनाची सैद्धांतिक संकल्पना

एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांनी तत्कालीन समाजाचे सखोल परीक्षण करून समाजातील जे विविध दोष होते त्यातून समाजाची मुक्तता करण्याचा प्रयत्न केलेला होता. अर्थात समाजातील हे दोष त्यांना शिक्षण मिळून त्यांच्यातील अज्ञान नाहिसे होईपर्यंत दूर होणे कदापि शक्य नाही याबाबत समाज सुधारकांची खात्री होती. या अनुषंगाने समाज सुधारकांनी समाजाच्या विकासासाठी निश्चित अशा शैक्षणिक विचारांचा पुरस्कार केलेला होता. शिक्षण ही केवळ उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या लोकांचीच मक्तेदारी नाही तर आर्थिकदृष्ट्या मागास,

अस्पृश्य, बहुजन, दुर्बल व स्त्रिया या सर्वांचाच तो हक्क आहे असे विचार समाज सुधारकांनी मांडले व त्यातून सार्वत्रिक शिक्षणाची संकल्पना पुढे आली. जो समाज शिक्षणापासून पूर्णपणे वंचित होता त्या समाजास शिक्षण प्रवाहात सामील करून घेणे हा समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचा केंद्रबिंदू होता. सुधारकांच्या शैक्षणिक विचारांवर शिक्षण विकासाची इमारत उभी आहे. याबाबत संशोधन व्हावे या अनुषंगाने संशोधन कार्य सुरू केले.

प्रस्तुत संशोधनामध्ये काही सैद्धांतिक संकल्पना आहेत. इतिहासकार इ.एच.कार यांनी सांगितल्या प्रमाणे "History is the unending dialogue between present and past." 'इतिहास हा वर्तमानकाळ व भूतकाळ यांच्यातील न संपणारा संवाद आहे.' या सिद्धांतानुसार जरी एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास संशोधनात असला तरीही वर्तमानाच्या दृष्टीने त्याचे संभवनीय असे उपयुक्तता मूल्य आहे. कार्लाईल या इतिहासकाराने जी इतिहासाची व्याख्या सांगितलेली आहे, 'इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तींची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय.' याचीही प्रचिती संशोधन प्रबंधातून येईल. या सिद्धांताव्यतिरिक्त सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सिद्धांत प्रवाहांचा समावेश तसेच संकल्पना या ठिकाणी संशोधन विषयात नमूद करण्यात आलेल्या आहेत.

## १.८ संशोधन पद्धती

इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने प्रचलित सर्व संशोधन पद्धती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. **'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास'** या संशोधनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतींचा वापर करण्यात आलेला आहे.

## १.९ संदर्भ साधने

**'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास'** या विषयावर संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता समाज सुधारकांनी लिहिलेले लेख, निबंध,

त्याकाळी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेले लेख, बातम्या, सुधारकांची भाषणे, आत्मवृत्त, हस्तलिखिते या सारख्या प्राथमिक साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच दुय्यम साधनांमध्ये संदर्भ ग्रंथ, चरित्रे, मासिके, स्मरणिका, वृत्तपत्रातील लेख इत्यादी संदर्भ साधनांचा उपयोग संशोधनासाठी केलेला आहे.

### १.१० संशोधनाचे महत्त्व

'शिक्षण' हे मानवी जीवनाचे एक आवश्यक अंग आहे. जन्माला आल्यानंतर शिक्षण ही पक्रिया पावलोपावली सुरू असते. प्रत्येक व्यक्तीत काही उपजत सुप्तशक्ती असतात त्या विकसीत करण्याचे काम शिक्षण करते. व्यक्तीला सुसंस्कारित करण्याचे काम शिक्षण करते. एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांनी महाराष्ट्रीयन समाजाच्या उन्नतीसाठी निश्चित भूमिका असणाऱ्या शिक्षणाची योजना सांगितलेली होती. कोणत्याही समाजाचा विकास हा त्या समाजातील महनीय व्यक्तींच्या विचारांवर अवलंबून असतो. इतिहासकार **ई.एच. कार** यांनी म्हटल्या प्रमाणे 'समाज आणि व्यक्ती दोन्हीही अविभाज्य आहेत. दोन्ही परस्परविरोधी नव्हे तर परस्परपूरक आहेत.' म्हणजेच व्यक्तीचे कार्य व विचार हे समाजास अनुकूल असायला हवेत. समाज सुधारकांचे शैक्षणिक विचारही समाजाच्या दृष्टीने अनुकूल असेच होते. त्यांच्या शैक्षणिक विचारांमुळेच आज शिक्षणाच्या क्षेत्रात एवढी प्रगती झालेली दिसते. बदलत्या काळानुसार समाजात नवीन काही समस्या उद्भवतात. शिक्षणात प्रगती झालेली असली तरीही अनेक अपेक्षा व आव्हाने आजच्या शिक्षणासमोर आहेत. शिक्षण विकास साधत असताना नेमक्या कोणत्या बाबींना विशेषत्त्वाने महत्त्व द्यावे, तसेच समाज सुधारकांची तत्कालीन परिस्थिती व आजची परिस्थिती यातील तफावत लक्षात घेता कोणता बदल या शिक्षण पद्धतीत करता येईल हे समजून घेण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे ठरेल. तसेच शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींसाठीही हे संशोधन प्रेरणादायी ठरेल.

## १.११ प्रस्तुत शोध प्रबंधाचे प्रकरणानुसार स्वरूप

**'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास'** या विषयावरील संशोधन प्रबंधाची विभागणी आठ प्रकरणात पुढील प्रमाणे केलेली आहे.

**प्रकरण पहिले**

**संशोधन पद्धती**

या प्रकरणात संशोधन पद्धतीची मांडणी केलेली आहे.

**प्रकरण दुसरे**

**एकोणिसाव्या शतकातील शैक्षणिक परिस्थितीचा आढावा**

या प्रकरणात शिक्षण संकल्पना व शिक्षणाची उद्दिष्टे, एकोणिसाव्या शतकातील सामाजिक परिस्थिती, शैक्षणिक परिस्थिती, ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण व शैक्षणिक चळवळी निर्माण होण्यास प्रेरणादायी ठरलेले घटक या बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण तिसरे**

**आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर व लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांचे शैक्षणिक विचार**

प्रस्तुत प्रकरणात या दोन समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अगदी सुरूवातीलाच म्हणजे बाळशास्त्री जांभेकरांच्या आगोदर जगन्नाथ शंकरशेठ यांनी महाराष्ट्रात समाज सुधारणेची सर्वप्रथम सुरूवात केलेली होती. त्यामुळे सुरूवातीस त्यांचे अल्पप्रमाणात शिक्षण विचार अभ्यासण्यात आलेले आहेत. त्यानंतर बाळशास्त्री जांभेकर व लोकहितवादी यांचा अल्प जीवन परिचय, त्यांचे थोडक्यात शैक्षणिक कार्य व सविस्तर शैक्षणिक विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. बाळशास्त्री

जांभेकर यांनी पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार महाराष्ट्रासाठी केला. त्यांच्या दृष्टिकोनातून समाजाला शिक्षणाची आवश्यकता काय? शिक्षणाअभावी समाजाची आवस्था, त्यांचे इंग्रजी शिक्षण व मातृभाषेतून शिक्षणविषयक विचार, स्त्री शिक्षण विषयक विचार, शिक्षक विषयक विचार व ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणा विषयीचे त्यांचे विचार इत्यादींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

लोकहितवादींनी शतपत्रे व निबंधांच्या माध्यमातून आपले विचार मांडलेले आहेत. त्यांचे इंग्रजी शिक्षण व भौतिक विद्येचे महत्त्व, स्त्रियांना शिक्षणाची आवश्यकता, समाजास व्यवसाय शिक्षणाची आवश्यकता, तसेच संगीतविद्या, शिक्षक, विद्वान, ग्रंथ व ग्रंथालयविषयक विचार अभ्यासलेले आहेत.

**प्रकरण चौथे**

**महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार**

या प्रकरणात महात्मा जोतीराव फुले यांच्या शिक्षण विचारांचा सविस्तरपणे अभ्यास करण्यात आलेला आहे. समाजासाठी शिक्षणाची आवश्यकता, ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर टीका, अस्पृश्य व स्त्री शिक्षणाची आवश्यकता, सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता, माध्यमिक व उच्च शिक्षण, शिक्षकविषयक व अभ्यासक्रमविषयक विचार त्याचबरोबर व्यवसाय शिक्षणाची आवश्यकता या त्यांच्या विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण पाचवे**

**न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे शैक्षणिक विचार**

या प्रकरणात न्या.रानडे यांचा अल्पपरिचय व शैक्षणिक कार्य थोडक्यात मांडलेले आहे व शैक्षणिक विचार सविस्तर अभ्यासण्यात आलेले आहेत. त्यांनी प्राथमिक, माध्यमिक व

उच्च शिक्षण, अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती, पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण, स्त्री शिक्षण याबाबतीत विचार मांडलेले होते. या विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण सहावे**

## गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शैक्षणिक विचार

प्रस्तुत प्रकरणात गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा अल्प जीवन परिचय, त्यांचे थोडक्यात शैक्षणिक कार्य व सविस्तर शैक्षणिक विचार मांडण्यात आलेले आहेत. आगरकरांना समाजाच्या अज्ञानाविषयी चीड होती. त्यांनी सांगितलेली शिक्षणाची उद्दिष्टे, पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार, स्त्रियांच्या प्राथमिक व उच्च तसेच सहयोगी शिक्षणाची आवश्यकता, तसेच ब्रिटिशांच्या कारकून बनविणाऱ्या शिक्षणावर टीका याबाबतच्या त्यांच्या विचारांचा अभ्यास केलेला आहे.

लोकमान्य टिळकांनी स्वराज्य प्राप्तीसाठी उपयुक्त ठरेल अशी राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना मांडलेली होती. राष्ट्रीय शिक्षणातून धर्म शिक्षण, उदिम धंद्याचे शिक्षण, राजकीय शिक्षण स्थानिक भाषेतून दिले जावे असे मत त्यांनी मांडले होते. याशिवाय लोकमान्य टिळकांचे ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणाविषयी विचार, स्त्री शिक्षण, विद्यापीठीय शिक्षण, व्यवसाय शिक्षण, अभ्यासक्रम व शिक्षक विषयक विचार अभ्यासण्यात आलेले आहेत.

**प्रकरण सातवे**

## महर्षी धोंडो केशव कर्वे व राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार

प्रस्तुत प्रकरणात महर्षी कर्वे व शाहू महाराज यांचा अल्प जीवन परिचय, थोडक्यात शैक्षणिक कार्य व सविस्तर शैक्षणिक विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. महर्षी कर्वेंची स्त्री शिक्षणविषयक भूमिका अभ्यासण्यात आलेली आहे. त्यांनी सांगितलेल्या स्त्री शिक्षणाची उद्दिष्टे, महिलांच्या उच्च शिक्षणाची आवश्यकता, महिलांना स्वतंत्र शिक्षणक्रमाची

आवश्यकता, अभ्यासक्रम, स्त्रियांच्या शिक्षणात सुधारणा करण्यासंबंधी उपाय तसेच ब्रिटिश सरकारच्या शैक्षणिक धोरणाविषयीचे विचार अभ्यासण्यात आलेले आहेत.

महात्मा फुलेंच्या शैक्षणिक विचारांचा वारसा शाहूंनी पुढे विसाव्या शतकात चालविलेला होता. ज्ञानप्राप्ती, समाजविकास व राष्ट्रीय उन्नती असे शिक्षणाची उद्दिष्टे त्यांनी सांगितलेली होती. वसतिगृहांच्या माध्यमातून शिक्षण चळवळ, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण, माध्यमिक व उच्च शिक्षण, स्त्री शिक्षण, शैक्षणिक प्रशासन, शिक्षकांचे प्रशिक्षण, शिक्षणात आर्थिक नियोजन या त्यांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**प्रकरण आठवे**

**सारांश व निष्कर्ष**

प्रस्तुत प्रकरणात **'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास'** या शोध प्रबंधाच्या अभ्यासाचे काही निष्कर्ष नोंदविलेले आहेत. प्रामुख्याने समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांविषयी निष्कर्ष, विसाव्या शतकात महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीवर समाजसुधारकांचा पडलेला प्रभाव व एकविसाव्या शतकातील शिक्षणाकडून अपेक्षा या तीन प्रमुख मुद्यात हे निष्कर्ष मांडलेले आहेत.

प्रत्येक व्यक्तीवर तो ज्या समाजात राहतो त्या समाजाचा प्रभाव पडत असतो. प्रस्तुत प्रबंधात अभ्यासण्यात आलेल्या सर्वच समाजसुधारकांच्या विचारांवर तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा प्रभाव होता असे दिसून येते. त्यातूनच समाज सुधारकांना शिक्षण चळवळ जोपासण्याची जाणीव झाली. समाजसुधारकांनी शिक्षणाची काही उद्दिष्टे सांगितलेली होती. प्रामुख्याने व्यक्तीचा सर्वांगीन विकास साधने, कौटुंबिक विकास साधने, सामाजिक विकास घडवणे, देशाचा विकास घडवणे, मानसिक सुखाची प्राप्ती करणे, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणे, बुद्धिमत्ता व ज्ञानप्राप्ती करणे, देशभक्ती निर्माण करणे, विविध पातळीवरील विषमता दूर करणे, ही सर्व उद्दीष्टे समाज सुधारकांनी आपल्या शिक्षण विचारांतून मांडलेली होती. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी शिक्षणाची आवश्यकता त्यांना वाटत होती.

आपल्या विचारातून त्यांनी ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर टीका केलेली होती. मात्र ब्रिटिशांच्या पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा सर्वांनीच स्वीकार केलेला होता. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे व परीक्षांचा हेतू ज्ञानप्राप्तीचे मूल्यमापन करणे हा असावा. एकूणच आनंददायी शिक्षण पद्धती असावी असे सुधारकांचे मत होते.

सर्वांना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे व हे शिक्षण मिळविण्याचा सर्वांना हक्क आहे. प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या चांगल्या सोयी असाव्यात. परूषांबरोबरच स्त्रियांनाही उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण घेण्याचा हक्क असावा असेही समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांतून निष्पन्न होते. ज्याच्यावर ज्ञान देण्याची जबाबदारी असते तो शिक्षक प्रशिक्षित असावा, शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय यंत्रणा असावी तसेच ग्रंथालयास विशेष महत्त्व दिले जावे हे सुधारकांच्या विचारातून दिसून यते. समाजसुधारकांनी मांडलेल्या या शैक्षणिक विचारातून महाराष्ट्रात एक प्रकारची शैक्षणिक चळवळ निर्माण झाली.

एकोणिसाव्या शतकातील विविध समाजसुधारकांनी मांडलेल्या शैक्षणिक विचारांचे संभवनीय उपयुक्तता मूल्य तपासून पहाणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्टे प्रस्तुत शोध प्रबंधाचे आहे. समाजसुधारकांनी मांडलेले शैक्षणिक विचार हे केवळ एकोणिसाव्या शतकापुरतेच मर्यादित होते असे नाही तर विसाव्या शतकातही त्यांच्या विचारांचा प्रभाव विशेषत्त्वाने जाणवतो. सुधारकांनी मांडलेल्या शैक्षणिक विचारातून महाराष्ट्रात एक शैक्षणिक चळवळ उभी राहिली व त्यातून महाराष्ट्राची शैक्षणिक प्रगती घडून आली.

आज एकविसाव्या शतकाचे एक दशक लोटलेले असताना व शिक्षणासारख्या बाबीवर आज प्रचंड खल झालेला असताना; एवढे शैक्षणिक आयोग, समित्या, शैक्षणिक धोरणे या सर्वांची कार्यवाही झालेली असतानाही काही आव्हाने व अपेक्षा आजच्या काळातही दिसून येतात. त्यांची पूर्तता करण्यासाठी आजही याच समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार आपल्याला संयुक्तिक वाटताना दिसतात.

## प्रकरण दुसरे

# एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा आढावा

**२.१ शिक्षण संकल्पना, व्याख्या व शिक्षणाची उद्दिष्टे**

१) शिक्षण : अर्थ व स्वरूप

२) शिक्षणाच्या विविध तत्त्ववेत्त्यांनी केलेल्या व्याख्या

३) शिक्षणाची उद्दिष्टे

**२.२ एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती**

१) वर्ण व्यवस्था

२) महाराष्ट्रीयन समाजातील सामाजिक वर्गवारी

३) सामाजिक शोषण

४) समाजातील अनिष्ट चालिरिती

५) स्त्रियांची सामाजिक स्थिती

**२.३ एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थिती**

शैक्षणिक वाटचाल

**२.४ एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण**

१) मिशनरी शाळा

२) कंपनी सरकारने शिक्षणासाठी केलेले प्रयत्न

३) लॉर्ड मेकॉलेचे शैक्षणिक धोरण

४) चार्ल्स वुडचा खालिता

५) हंटर कमिशन

**२.५ महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळी निर्माण होण्यास प्रेरणादायी ठरलेले घटक**

१) एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन : ब्रिटिश आगमनाचा प्रभाव

२) वृत्तपत्रांची कामगिरी

३) साहित्य निर्मितीचा प्रभाव

**२.६ संदर्भ**

# प्रकरण दुसरे

# एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा आढावा

## २.१ शिक्षण संकल्पना, व्याख्या व शिक्षणाची उद्दिष्टे

### १. शिक्षण: अर्थ व स्वरूप

मानव हा इतर प्राण्यांप्रमाणेच एक सजीव प्राणी आहे. ज्याप्रमाणे इतर प्राण्यांचे अस्तित्त्व आहे त्याप्रमाणेच माणसाचेही अस्तित्त्व आहे. परंतु मानवाला इतर प्राण्यांपेक्षा एक सर्वात मोठी देणगी मिळालेली आहे, ती म्हणजे बुद्धी होय. बुद्धीच्या जोरावर मानवाने स्वतःची प्रचंड प्रगती केली. मानवाने आपल्या प्रतिभा शक्तीच्या व कौशल्याच्या जोरावर आपले अस्तित्त्व इतर प्राण्यांपेक्षा वेगळे असे दाखविले. मानवाच्या उत्क्रांतीचे टप्पे पाहिले तर उत्तरोत्तर मानवाची बुद्धी अधिक विकसित होत गेलेली दिसेल. उत्क्रांतीच्या टप्प्यातील मानव, प्राचीन काळचा मानव आणि अर्वाचीन काळचा मानव यांच्यामध्ये देखील प्रचंड तफावत दिसते. याचे सर्व श्रेय शिक्षणालाच जाते. मानवाची बुद्धी प्रत्येक युगात वाढत गेलेली दिसते याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मानवाकडे शिक्षण आहे. शिक्षण हे मानवी जीवनाचे एक आवश्यक आणि महत्त्वाचे अंग आहे. जन्माला आल्यानंतर शिक्षण प्रक्रिया पावलोपावली सुरू असते. प्रत्येक व्यक्तीत काही सुप्त शक्ती असतात त्या विकसित करण्याचे काम शिक्षण करते. शिक्षण ही संकल्पना व्यक्तीपरत्त्वे बदलणारी आहे. त्यामुळे अनेक शिक्षण तज्ज्ञांनी शिक्षण संकल्पनेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'शिक्षण' हा शब्द 'शिक्ष्' ह्या संस्कृत धातू पासून निर्माण झालेला असून त्याचा अर्थ शिकणे, ज्ञान मिळविणे, किंवा उपदेश करून बदल घडवून आणणे असा होतो. इंग्रजीत 'शिक्षण' ह्या शब्दाला Education हा शब्द वापरतात. हा शब्द लॅटिन भाषेनुसार Educare किंवा Educere या शब्दांपासून तयार झाला असे मानले जाते. Educare म्हणजेच to rear,

to nourish, to bring up याचा अर्थ पालन पोषण करणे, वाढविणे किंवा संवर्धन करणे असा होतो व Educere म्हणजेच to lead out, to draw out याचा अर्थ व्यक्तीतील गुणांना जागृत करून त्यांचा अविष्कार घडविणे असाही घेतला जातो.[१] म्हणजेच अज्ञानी व्यक्तीने सुसंस्कारित व्यक्तीकडून ज्ञान मिळविणे म्हणजे शिक्षण होय. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी काही सुप्त शक्ती असतात त्या बाहेर काढून व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध करते त्यास शिक्षण म्हणता येते.

व्यापक दृष्टिकोनातून विचार केला तर शिक्षण ही एक आजन्म चालणारी प्रक्रिया आहे. माणूस जन्मापासून मृत्यूपर्यंत शिक्षण घेत असतो. प्रत्येक क्षण हा नवीन अनुभव देणारा असतो व त्या प्रत्येक क्षणातून माणूस स्वतःत अनुकूल असे वर्तन बदल करीत असतो. मूल जन्माला आले की त्याचे शिक्षण पावलोपावली सुरू राहते. प्रत्येक व्यक्ती अगदी जीवनाच्या अखेर पर्यंत विविध अनुभवांच्या माध्यमातून शिक्षण घेत असते. प्रत्येकावर तो ज्या घरात राहतो त्या घरातील इतर सदस्यांचे, शाळेचे, व समाजाचे एकसारखे संस्कार होत असतात. अगदी व्यक्तीचे औपचारिक शिक्षण संपले तरीही ही प्रक्रिया अखंड चालूच असते. व्यक्ती ज्याच्या संपर्कात येईल त्याच्याकडून काहीना काही शिकत असतो मग तो घटक सजीव असो वा निर्जीव असो शिकणे मात्र चालूच असते. सृष्टीतील प्रत्येक घटकातून माणूस शिक्षण घेत असतो. आचार्य विनोबा भावे यांनीही शिक्षण ही आजन्म चालणारी प्रक्रिया आहे असेच सांगितलेले होते. आपले शिक्षण विचार मांडतांना विनोबा म्हणतात की, "शिक्षण हे अनंत विश्वातील प्रत्येक पदार्थाकडून एकसारखे मनुष्याला मिळतच आहे. त्यात केंव्हाही खंड नाही. शेक्सपियरने म्हटल्याप्रमाणे वाहत्या झऱ्यांमध्ये प्रासादिक ग्रंथ साठविलेले आहेत, दगडांमध्ये दर्शने लपलेली आहेत, आणि यच्चयावत् पदार्थात शिक्षणांची सर्व तत्त्वे भरलेली आहेत. वृक्ष वनस्पती, फुलें, नद्या, डोंगर, आकाश, तारे सर्वच मनुष्याला आपआपल्यापरी शिक्षण देत आहेत. नैय्यायिकांच्या अणूपासून सांख्यांच्या महतत्त्वापर्यंत, भूमितीतल्या बिंदूपासून भूगोलातीलसिंधू पर्यंत, किंवा लहानपणच्या भाषेत बोलावयाचें तर रामाच्या शेंडीपासून तुळशीच्या मुळापर्यंत, सर्व लहानमोठे पदार्थ मनुष्याचे गुरू आहेत. विचक्षण विज्ञानवेत्त्यांच्या दूरचक्षूमध्ये (दुर्बीण), व्यवहार विशारदांच्या चर्मचक्षूमध्ये, कल्पना कुशल कवींच्या

दिव्यचक्षूमध्ये किंवा तार्किक तत्त्ववेत्त्यांच्या ज्ञानचक्षूमध्ये जे जे पदार्थ असतील, किंवा नसतीलहि, त्या त्या सर्व पदार्थांकडून आम्हाला नित्य पाठ मिळत आहे. सृष्टि हा परमेश्वराने आमच्या अभ्यासासाठी आमच्यापुढे उघडून ठेवलेला एक शाश्वत, दिव्य, आश्चर्यमय, परम पवित्र ग्रंथ आहे. त्याच्यापुढे वेद व्यर्थ आहेत, कुराण रद्द आहे, बायबल निर्बल आहे."[२] एकूणच विचार करता सृष्टीतील प्रत्येक घटकापासून माणसाला शिक्षण हे सातत्याने मिळत असते असे विनोबा भावें यांच्या शिक्षण विचारातून दिसून येते. त्यांच्या विचारातून निसर्ग हा मानवाचा गुरू आहे याचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही. त्यांच्या या विचारातून केवळ शालेय शिक्षणालाच शिक्षण मानणाऱ्यांचा समज खोटा ठरतो. निसर्गातील प्रत्येक गोष्टीतून कोणत्याही वेळी जे अनुभव व त्यातून मिळणारे ज्ञान ही जी अखंड पक्रिया चालू असते तिलाच शिक्षण असे म्हणता येईल.

शिक्षणाचा अर्थ पाहताना शिक्षण म्हणजे उपदेश करणे व बदल घडवून आणणे असा अर्थ आपण पाहिलेला आहे. यावरून असे म्हणता येईल की शिक्षणाने व्यक्तीत वर्तन बदल होतो. हा बदल कोणत्या पद्धतीने होणे आवश्यक आहे याचा विचारही शिक्षण करते. व्यक्तीचा सर्वांगीण विकास करून व्यक्तीत सामंजस्य निर्माण करण्याचे काम शिक्षण करते. व्यक्तीचे जोपर्यंत औपचारिक शिक्षण चालू आहे तोपर्यंत व्यक्ती शाळा महाविद्यालयाच्या माध्यमातून विविध विषयातील ज्ञान प्राप्त करून घेत असते व या ज्ञानानुरूप तिच्यात विकास घडत असतो. या शिवाय औपचारिक शिक्षण संपल्यानंतर व्यक्तीला पावलोपावली जे जीवनात अनुभव येतात त्या अनुभवांनुसार व्यक्तीत वर्तन बदल होत असतो. आज माणसाने एवढी प्रचंड क्रांती केलेली आहे ती केवळ त्याच्या अनुभवाच्या जोरावरच आहे. येणाऱ्या अनुभवातून माणूस शिकतो, ज्ञान प्राप्ती करतो, त्या ज्ञानाचा वापर भविष्य उज्ज्वल करण्यासाठी करतो. वास्तविक शालेय जीवनात शिक्षणातील प्रगती ही दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमधून दर्शविली जाते. परंतु त्या परीक्षांच्या माध्यमातून केलेले मूल्यमापन हे सर्वार्थाने त्या व्यक्तीवरील सुसंस्कार दाखवितेच असे नाही. प्रत्यक्ष जीवनात व्यक्ती कशी वागते यावरून त्यास किती शिक्षण मिळाले याचे ज्ञान होते. या अनुषंगाने विनोबा म्हणतात

की, "जे दिले जात नाही ते शिक्षण. जे घेतले जाते, ज्याचा हिशोब ठेवला जाऊ शकतो किंवा ज्याची काही नोंद ठेवली जाऊ शकते, ते शिक्षण नाही. शिक्षणाची मोजदाद करता येत नाही. जीवनच शिक्षण आहे. कॅलरीचा खरा हिशोब कागदावर नव्हे, शरीरावर दिसून येतो. जे अनुभवले, खाल्ले, पचले, रक्तात मुरले तेच शिक्षण"[३] म्हणजेच परीक्षांमधून जे मूल्यमापन केले जाते ते केवळ विद्यार्थ्याची वर्गातील इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत नेमकी स्थिती दर्शविण्यासाठी केले जाते आणि शिक्षण हे परीक्षा, मूल्यांकन, पास-नापास याच्या पलीकडची अवस्था आहे. ते व्यक्तीच्या नसानसात भिनलेले असते व त्यानुसार व्यक्तीचे वर्तन ठरलेले असते. शिक्षणातील होणाऱ्या वर्तन बदलातून व्यक्तीचा विकास होणे आवश्यक मानले जाते. शिक्षण ही एक सर्वव्यापी प्रक्रिया आहे. व्यक्तीतील सर्व गुणांच्या विकासाची पक्रिया आहे. व्यक्तीच्या शारीरिक मानसिक, बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक व भावनिक इ. गुणांचा विकास शिक्षणामुळे होतो. व्यक्तीची इर्षा, संकुचित वृत्ती, द्वेष भावना या सारख्या मनोविकृतींपासून मुक्त करण्याचेही काम शिक्षण करते. स्वामी विवेकानंद म्हणतात ज्या प्रशिक्षणामुळे व्यक्तीच्या अनावश्यक इच्छा नियंत्रणात येतात व उपयुक्ततेत बदलतात तेच खरे शिक्षण असते. "The training by which the current and expression of will are brought under control and become fruitful is called education."[४] त्यांच्या मते शिक्षण म्हणजे केवळ विविध प्रकारची माहिती डोक्यामध्ये कोंबणे असे ही नाही. तर ती अशी पक्रिया आहे की ज्या द्वारे मानवाला पूर्णत्त्वाची अभिव्यक्ती होते. अविकसित बालकास सर्वांगीन दृष्टीने विकसित करणे हे शिक्षणात अभिप्रेत आहेच या शिवाय विकसितांचा आणखी जास्तीत जास्त विकास करणे हे ही शिक्षणात अभिप्रेत आहे. व्यक्तीतील अतिउच्च गुणांना बाहेर काढून त्यांचे प्रकटीकरण करणे ही बाब शिक्षणातून घडणे महत्त्वाचे असते. एकूणच शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांग असा विकास अभिप्रेत असतो. हा विकास साधत असताना काही उद्दिष्टे निश्चित केली जातात व शालेय शिक्षणाच्या माध्यमातून ही उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो.

## २. शिक्षणाच्या विविध तत्त्ववेत्त्यांनी केलेल्या व्याख्या

शिक्षणशास्त्रात अनेक तत्त्ववेत्यांनी संशोधन केलेले आहे. त्यांच्या या संशोधनामुळेच शिक्षण या विद्याशाखेला शास्त्राचा दर्जा मिळालेला आहे. त्यात काही भारतीय शिक्षण तज्ज्ञ आहेत तर काही पाश्चात्य शिक्षण तज्ज्ञ आहेत. या शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाच्या उद्दिष्टांचा विचार करून शिक्षणाच्या व्याख्या सांगितलेल्या आहेत. 'शिक्षण' संकल्पनेचा व्यापक दृष्टिकोनातून विचार करण्यासाठी काही निवडक तज्ज्ञांच्या व्याख्या अभ्यासणे संयुक्तिक वाटते.

१. **ऋग्वेद :** "Which makes a man self reliant and selfless. मानवाला जी स्वावलंबी बनविते व ज्यामुळे निःस्वार्थी मनोवृत्ती निर्माण होते ती विद्या म्हणजे शिक्षण होय."[५]

२. **उपनिषद :** "Education in that whose end product is salvation. 'सा विद्या या विमुक्तये' जी विद्या माणसाला मोक्ष देते व मुक्त करते ती विद्या म्हणजे शिक्षण."[६]

३. **गुरूदेव रविंद्रनाथ टागोर :** "The highest education is that which does not merely give us information¸ but makes our life in harmony with all existence." "श्रेष्ठ शिक्षण तेच की जे केवळ माहिती देत नाही, तर आपल्या जीवनाचा संपूर्ण विश्वाशी मेळ घालते."[७]

४. **स्वामी विवेकानंद :** "Education is the manifestation of the perfection already in man"[८] शिक्षण म्हणजे मानवातील पूर्णत्त्वाचा साक्षात्कार.

५. **महात्मा गांधी :** "By education I mean an all round drawing out of the best in child and man-body, mind and spirit. व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या शारीरिक, मानसिक व आत्मिक शक्तीचे उन्नयन म्हणजे शिक्षण"[९]

६. **स्वामी अरविंद घोष :** "Education is the building of the power of the human mind and spirit. It is the evoking of knowledge, character and

culture. शिक्षण म्हणजे मन व आत्मा यांच्या शक्तींचा विकास होय. शिक्षणाद्वारे ज्ञान, चारित्र्य व संस्कृती यांचे योग्य संवर्धन होत असते."[१०]

७. **आचार्य विनोबा भावे** : " शिक्षण म्हणजे कर्तव्य कर्मांचे आनुषंगिक फळ आहे."[११]

८. **प्लेटो** : "Education is giving the body and soul, all the perfection of which they are susceptible." "शरीर व आत्मा यांना त्यांच्या जन्मजात योग्यतेनुसार पूर्णत्त्वाप्रत नेणे म्हणजे शिक्षण."[१२]

९. **पेस्टॉलॉझी** : "Education is the natural, systematic, progressive and harmonious development of all powers in man." "सर्व शक्तींचा स्वाभाविक, पद्धतशीर, विकासशील व सुसंवादी विकास म्हणजे शिक्षण."[१३]

१०. **जॉन डयुई** : "What nutrition and reproduction are to physiological life education is to social life" "पौष्टिकता जशी शारीरिक वाढीसाठी तसे शिक्षण सामाजिक जीवनासाठी"[१४]

## ३. शिक्षणाची ध्येय व उद्दिष्टे

एकोणिसाव्या शतकातील काही समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे हा प्रस्तुत शोध प्रबंधाचा मूळ विषय आहे. तथापि समाजसुधारकांना शैक्षणिक चळवळ जोपासण्यामागे काय उद्दिष्टे साध्य करावयाची होती याचा अभ्यास करता यावा यासाठी शिक्षणाची सर्वसामान्य अशी ध्येय व उद्दिष्टे कोणती आहेत याचा विचार करणे या ठिकाणी योग्य वाटते. त्यायोगे सुधारकांना अपेक्षित असलेली उद्दिष्टे व्यवस्थित अभ्यासता येतील.

आज आधुनिक कालखंडात शिक्षणाला प्रचंड महत्त्व प्राप्त झालेले आहे. प्रत्येक व्यक्ती आज आपल्या मुलाला चांगले शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्नशील आहे. एवढेच काय पण स्वतः निरक्षर असलेल्या व्यक्तीला देखील आपला मुलगा शाळेत शिकावा असे वाटते. शिक्षणाच्या नावाखाली आज प्रचंड पैसा खर्च केला जात आहे. औपचारिक शिक्षणात आणखी परिणामकारकता यावी यासाठी वेळोवेळी अभ्यासक्रमांची पुनर्रचना केली जाते. दर दहा वर्षांनी अभ्यासक्रम गरजेनुसार बदलला जातो. विविध समित्या, आयोग, परिणामकारक

शिक्षणासाठी नेमले जातात. शिक्षणात दिवसेंदिवस नवे संशोधन केले जाते, नवे अध्यापन तंत्रे आणली जातात, नवोपक्रम व नवीन विचार प्रवाह स्वीकारले जातात, हे सगळे कशासाठी? एवढा सगळा उपद्व्याप का करायचा? माणसाने केलेली कोणतीही गोष्ट निर्हेतूक असू शकत नाही. निश्चितच शिक्षणाची ही जी एकंदरीत प्रक्रिया चालू आहे तिची काही ध्येय व उद्दिष्टे आहेत. वर नमूद केलेल्या व्याख्यांचा व शिक्षण संकल्पनेचा अभ्यास करता ती पुढील मुद्यात मांडता येतील.

१. शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान संपादन करणे.
२. व्यक्तीचे उत्तम चारित्र्य घडविणे.
३. माणसामध्ये मानवतेचा साक्षात्कार घडविणे.
४. स्वावलंबन निर्माण करणे.
५. व्यक्तीस आत्मसाक्षात्कार घडविणे.
६. व्यक्तीच्या कल्पनाशक्तीचा विकास करणे.
७. व्यक्तीला स्वतःच्या चरितार्थ व व्यवसायाची संधी निर्माण करून देणे.
८. व्यक्तीचा अध्यात्मिक विकास घडविणे.
९. उत्तम आरोग्य राखण्यासाठी शिक्षणाचा उपयोग करणे.
१०. भारताचा सांस्कृतिक वारसा जतन करून संस्कृती संवर्धन करणे.
११. समाजामध्ये अंतर्गत सामंजस्य निर्माण करण्यासाठी सामाजिकीकरण घडविणे.
१२. नागरिकांमध्ये देशभक्ती व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे.
१३. समाजामध्ये आधुनिक व शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण करणे.
१४. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा आर्थिक स्तर उंचावणे.
१५. समाजामध्ये आंतरराष्ट्रीय सामंजस्याची जाणीव निर्माण करणे.

## २.२ एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती

एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांनी ज्या परिस्थितीत राहून आपल्या शिक्षण विचारांच्या आधारे समाजात शैक्षणिक व सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला त्या परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. प्रामुख्याने व्यक्ती ज्या परिस्थितीत जीवन जगत असते त्या परिस्थितीचा त्याच्यावर प्रभाव पडल्याशिवाय राहत नाही. मुळात कोणत्याही समाजात सुधारणा होतात त्याअर्थी त्या समाजात त्रुटी असतात यात शंका नाही. महाराष्ट्रात अनेक सुधारकांनी शिक्षणाचा पुरस्कार केला याचाच अर्थ महाराष्ट्रीयन समाजात शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता हे निश्चित आहे. समाज म्हणजे काय? या प्रश्नाचा विचार केला तर तो अनेक व्यक्तींचा बनलेला असला तरी एकटया व्यक्तीचा विचार मात्र त्यात होत नाही.

'समाज' या शब्दाचा अर्थ पु.ग. सहस्त्रबुद्धे यांनी पुढील प्रमाणे सांगितलेला आहे. "समाज अनेक घटक मिळून झालेला असतो. शरीरात ज्याप्रमाणे प्रथम पेशी, मग त्यांचे बनलेले स्नायू, अस्थी, मज्जा, त्वचा इ. घटक असतात अणि शरीराचे जीवन या घटकांच्या परस्पर संबधांवर अवलंबून असते त्याच प्रमाणे समाजाचे आहे. प्रथम त्यात व्यक्ती असतात, त्यांचे कुटुंब बनलेले असते. अनेक कुटुंबे मिळून जाती होतात, अनेक जाती मिळून वर्ण किंवा त्यासारखे इतर संघ होतात आणि या सर्व घटकांचा मिळून समाज होतो."[१५] म्हणजेच प्रत्येक व्यक्तींचा काही समान तत्त्वावर अधारित जो गट तयार होतो त्यास समाज म्हटले जाते. समाजात अनेक घटक कार्यरत असतात. या विविध समाज घटकात सातत्याने आंतरक्रिया चालत असते. समाजाने स्वतःसाठी किंवा समाजाच्या अस्तित्त्वासाठी काही नीती-नियम, आचार विचार, बंधने काळाच्या ओघात निर्माण केलेले असतात त्यांनाच आपण परंपरा असे म्हणतो. अर्थात या परंपरांमध्ये काही चांगली तत्त्वे असतात तर काही अनावश्यक तत्त्वेही असतात. मुळात काही तत्त्वे बदलत्या काळानुसार कालबाह्य होत जातात परंतु परंपरानिष्ठ समाज ती बदलण्यास सहजासहजी तयार होत नाही. समाजाच्या अज्ञानामुळे काही अनावश्यक व कालबाह्य तत्त्वांचा फैलाव समाजात होतो व त्यातून समाजात काही विकृत स्वरूपाच्या रूढी

परंपरांचे प्राबल्य निर्माण होते. समाजाच्या हितासाठी अशा रूढी परंपरांचे प्राबल्य कमी होणे आवश्यक असते. अशा समाजामध्ये समाजसुधारकांची भूमिका ही अशाच स्वरूपाची असते. समाजसुधारणेमध्ये शिक्षण ही बाब अत्यावश्यक असते. त्यामुळेच सर्वच समाजसुधारक समाजासाठी शिक्षणाचा पुरस्कार करताना दिसतात. एकोणिसाव्या शतकात खऱ्या अर्थाने प्रबोधनाची चळवळ सुरू झाली. या चळवळीचा पाया हा शिक्षणावर अधारित होता. महाराष्ट्राचा विचार करता तत्कालीन सर्वच समाजसुधारकांनी शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता याचे कारण त्याकाळातील समाजिक परिस्थिती हेच होते. समाजाचा उत्कर्ष घडविण्यासाठी शिक्षण ही अत्यावश्यक बाब आहे. तत्कालीन समाजाचा विचार करता पुढील प्रकारची सामाजिक परिस्थिती दिसून येते.

## १) वर्णव्यवस्था

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राचा राजकीय व सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला तर बरीच तफावत असल्याचे लक्षात येते. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला तर अगदी प्राचीन काळापासून महाराष्ट्राने विविध स्थित्यंतरे अनुभवलेली दिसतात. महाराष्ट्रात सातवाहन, यादव, बहामनी, मराठेशाही आणि एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांचा अंमल अशा अनेक राजसत्ता आल्या. तरीही महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेत प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत विशेष बदल झालेला नव्हता. चातुर्वर्ण्य पद्धती, जातिप्रथा, सामाजिक वर्गवारी, अनिष्ट चालिरिती, रूढी, परंपरा या जशाच्या तशा एकोणिसाव्या शतकातही अस्तित्त्वात होत्या. विशेष बाब म्हणजे विसाव्या शतकात एवढी शिक्षणात प्रगती झालेली असतानाही यापैकी अनेक परंपरा आजही समाजात आढळून येत असल्याचे दिसून येते.

भारतातील जवळपास सर्वच प्रदेशात चातुर्वर्ण्य पद्धती होती त्यामुळे महाराष्ट्रही या व्यवस्थेला अपवाद नव्हता. वैदिक कालखंडापासूनच महाराष्ट्रात ही पद्धत अस्तित्त्वात असल्याचे दिसते. वैदिक कालखंडात प्रामुख्याने ब्राह्मण व क्षत्रिय हे दोनच वर्ण होते.[१६] परंतु उत्तरवेद काळात गुणकर्म भेदाने पुढे चार वर्ण निर्माण झाले. हे वर्ण म्हणजेच ब्राह्मण, क्षत्रिय,

वैश्य व शूद्र होत. या वर्ण व्यवस्थेनुसार यज्ञ करणे, अध्ययन-अध्यापन करणे, पौराहित्य करणे, धर्मतत्त्वांची जपणूक करणे, राजाच्या मंत्रीमंडळात न्यायाधीश किंवा इतर महत्त्वाचे मंत्री म्हणून काम करणे इ. कामे ब्राह्मणांच्या हाती तर राज्य संरक्षण करणे राज्याचा विस्तार करण्यासाठी किंवा समाज संरक्षणासाठी लढाया करणे हे क्षत्रियांचे काम होते. वैश्य वर्णात शेती करणारे व इतर उद्योग, व्यापार उदिम करणारे यांचा समावेश होता. वरील तीन वर्णांव्यतिरिक्त जी समाजातील हलकीसलकी तळागाळातील कामे शिल्लक राहतील ती प्रामुख्याने शूद्र वर्णातील लोकांनी करावीत असा प्रघात होता. सुरूवातीला वर्णव्यवस्था ही गुणाधिष्ठित होती, परंतु नंतर मात्र ती व्यवसायाधिष्ठित बनली. प्रत्येकाला त्याचा वडिलोपार्जित जो व्यवसाय आहे तोच करणे भाग पडले त्यामुळे अधिक शोषितांचा वर्ग हा शूद्र वर्ण ठरला.

## २) महाराष्ट्रीयन समाजातील वर्गवारी

चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा परिणाम म्हणून महाराष्ट्रात वतनदारी पद्धत सुरू झाली. या वतनदारी पद्धतीमंध्ये समाजातील विविध वर्गांचा समावेश होतो. प्रत्येक वर्णातील लोक आपल्याला मिळणारा वडिलोपार्जित व्यवसायच करीत असत त्यामुळे तो व्यवसाय आपल्याला वतनानेच मिळाला असे मानले जाई. याच वतनदारी प्रथेनुसार एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रीयन समाज हा विविध सामाजिक वर्गामध्ये विभागलेला होता. त्यात प्रामुख्याने दोन वर्ग मानता येतील. पहिला वर्ग म्हणजे समाजात स्वतःला उच्चभ्रू मानणाऱ्या सावकार, जमीनदार, देशमुख, भट, भिक्षुक व ब्राह्मण यांचा एक वर्ग होता. तर दुसरा वर्ग सर्वसामान्य कष्टकरी, कामगार, शेतकरी, अंधश्रद्धाळू व अज्ञानी शोषितांचा वर्ग होता. हे दोन्हीही वर्ग एकाच समाजातील असले तरीही त्यांच्यातील तफावत अगदी सहजतेने लक्षात येईल अशी पद्धतशीर मांडणी समाजाची होती. पहिला गट अभिजनांचा मानता येईल व दुसरा गट बहुजनांचा मनता येईल. समाजव्यवस्थेची सर्व सुत्रे पहिल्या वर्गाच्या म्हणजेच ब्राह्मण वर्गाच्या हाती होती. समाजातील सर्व मानाची पदे ही ब्राह्मण समाजानेच व्यापलेली होती. सर्व सामान्यांना अशा पदांचा अजिबात अधिकार नव्हता. या अनुषंगाने श्री भास्कर भोळे म्हणतात

“पेशवे, योद्धे, कुलकर्णी, खोत, सावकार, पुरोहित, धर्मग्रंथाचे भाष्यकार, वकिल, कारकून, शिरस्तेदार, अधिकारी, अशा विविध भूमिकांच्या द्वारे समाजाची ऐहिक व अध्यात्मिक सत्ता ब्राह्मणांच्या हाती, त्यांच्या अगदी व्यस्त प्रमाणात संक्रमित झाली.”[१७] म्हणजेच हा सर्व गट वरिष्ठ म्हणूनच प्रचलित झालेला होता. पाटील व कुलकर्णी यांचे विशेष स्थान समाजामध्ये होते. गावच्या पाटलास मुलकी तसेच फौजदारी अधिकार असत तर कुलकर्ण्यांकडे संपूर्ण गावच्या मुलकी, जमीन-जुमला, वहिवाट, बागायती-जिरायती शेती, याबाबतचे दफ्तर सांभाळण्याची जबाबदारी होती. दुसऱ्या गटातील बहुजन समाज हा विविध जाती व उपजातीत विभागलेला होता. शेतकरी समाज हा बहुजन समाजाचा प्रमुख घटक होता. तो बहुधा हिंदु कुणबी समाजाचा असे.

समाजात कुणब्यांशिवाय इतर शूद्र, दीन, दुबळया, दलित, समजल्या जाणाऱ्या जाती असलेले काही वर्ग होते ते म्हणजे बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार होत. ‘साधारणतः पाटील, कुलकर्णी सोडून चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परिट, गुरव, कोळी ह्यांना बारा कारू किंवा बलुतेदार म्हणतात’[१८] या बलुतेदारांना ‘कारू’ म्हटले जाई कारण ते शेतकऱ्यांच्या विविध कामात उपयोगात येत असत. दुसरा जो वर्ग आहे तो आलुतेदार लोकांचा अर्थात आलुतेदारांशिवाय शेतकऱ्यांचे काहीही नडत नसे म्हणून त्यांना ‘नारू’ असे म्हणतात. ‘तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डौऱ्या, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाना, वाजंत्री, घडसी, कलावंत, तराल किंवा कोरबू, भोई वगैरेंना आठरा नारू किंवा आलुतेदार म्हणतात.’[१९] बलुतेदार शेतकऱ्यांना उपयुक्त अशा वस्तू बनवित असत व त्याबदल्यात वर्षाच्या वर्षाला सुगीच्या दिवसात शेतकऱ्यांकडून धान्य गोळा करीत असत. या प्रमुख वर्गाशिवाय तत्कालीन महाराष्ट्रीयन समाजात जी वर्गवारी प्रचलित होती त्यामध्ये पुढील प्रकारच्या वर्गाचाही समावेश होतो. ‘सर्व प्रकारचे व दर्जाचे निरनिराळे तीर्थोपाध्याय, मंदिरवाले, दरगेवाले, फिरस्ते, हुन्नरी व मनोरंजनाचा धंदा करणारे, भिकार, चोरटे,... उपलाणी, गोसावी, बैरागी, फकीर, जंगम, मानभाव, आंधळे पांगळे वगैरे भिक्षुक, गोपाळ, कोल्हाटी, गारोडी ह्यासारखे तमासगीर’[२०] या सर्वांचा समाजातील वर्गवारीमध्ये समावेश

होत होता. अशा प्रकारे विविध वर्ग तत्कालीन समाजामध्ये अस्तित्त्वात होते. या वर्गातील उच्चभ्रू सोडले तर उर्वरित बहुजनवर्गाला शिक्षणाचा अजिबात गंधही नव्हता.

### ३) सामाजिक शोषण

तत्कालीन समाजात जे प्रमुख दोन गट होते त्यातील उच्चभ्रू गट सर्वसामान्यांचे प्रचंड प्रमाणात व पद्धतशीरपणे शोषण करीत होता. कनिष्ठ वर्गाचे शोषण करण्यामध्ये अग्रणी होता तो म्हणजे सनातनी ब्राह्मण वर्ग हा होय. प्रामुख्याने हा वर्ग केवळ स्वतःचाच स्वार्थ साधण्यात धन्यता मानणार होता. या वर्गाकडे ज्ञानी म्हणून पाहिले जायचे परंतु आपल्याकडील ज्ञानाचा उपयोग ते केवळ स्वतःचेच पोट भरण्यासाठी करीत होते. त्यामुळे अज्ञानी लोकांचा फायदा हे लोक घेत असायचे.[२१] केवळ जुन्याच धर्मग्रंथांचा आपआपल्या परीने अन्वयार्थ लावायचा व त्यांचाच आधार घेत सर्वसामान्यांचे अधिकाधिक शोषण करायचे असाच एकंदरीत त्यांचा दिनक्रम होता. विद्या ही आपली मक्तेदारी आहे असे ते समजत असत, परंतु ज्याद्वारे समाजात नवविचार प्रवाह येऊ लागतील असे भौतिक विषयावर लिखाण मात्र ते जाणीवपूर्वक टाळीत.

सर्वसामान्य कुणबी व कष्टकरी समाज हा मुळातच अडाणी, अज्ञानात खितपत पडलेला व अंधश्रद्धाळू वृत्तीचा होता. त्यांच्या अज्ञान व अंधश्रद्धेचा फायदा उच्चभ्रू लोक घेत होते. कुणबी समाज शेतीत काबाडकष्ट करून रात्रंदिवस राबायचा तरीही तो उपासमारीचा बळी ठरायचा. त्यांची अवस्था ही 'एक बळी हजार छळी' अशी बनलेली होती. या वर्गाचे शोषण केवळ उच्चभ्रूच करीत होते असे नाही तर कनिष्ठ जातीही कुणब्यांचे खूप शोषण करीत होत्या. स्वतः शेतीत कष्ट करून सर्व समाजासाठी धान्य पिकविणाऱ्या या वर्गाचे शोषण कसे होते याचे यथार्थ वर्णन गावगाडा या ग्रंथात त्रिंबक आत्रे यांनी केलेले आहे. त्यात ते लिहितात की, "कुणबी व कारूनारू ह्यांच्याजवळ तपास करता असे समजते की बलुते आणि आलुते मिळून राशीचा शेकडा २२ ते २५ मुख्य धान्य जाते. याखेरीज किरकोळ धान्य, भाजीपाला, गवत काडी, सणवार, शिधा, वाढणी, पंक्तीचा ठाव वगैरे कुणब्याचा हात नेहमी वर असतो असे म्हणतात."[२२] कुणब्यांचे हे कनिष्ठ वर्गाकडून केले जाणारे शोषण म्हणता येईल. याशिवाय वरिष्ठ वर्गाकडूनही मोठया प्रमाणात शेतकरी व सर्वसामान्यांचे शोषण केले जायचे. असे शोषण करणारा वर्ग प्रामुख्याने सावकार व जमीनदार हा होता. शेतीत काबाड कष्ट करून शेती पिकविणाऱ्या या समाजाच्या पोशिंद्याला पोटभर जेवण मिळणेही दुरापास्त

होते. सावकरांकडून कर्जे घेतली जात व शेवटी शेतकरी त्या कर्जाच्या ओझ्याखालीच मृत्यूमुखी पडत असे. शेट, सावकार, देशमुख, कुलकर्णी, आदी सर्वजण शेतकऱ्यांच्या प्राणप्रिय जमिनी आणि चीजवस्तू लुबाडून त्यांना देशोधडीला लावीत असत.[२३] गुलामगिरी, वेठबिगारी, व पिळवणुकीच्या अंधःकारात सर्वसामान्य समाज खितपत पडलेला होता. शेतकऱ्यांकडून माल विकत घेतांना तो अतिशय कमी किंमतीत घेतला जाई व तोच माल शेतकऱ्यांना विकताना मात्र प्रचंड किंमत त्यांच्याकडून वसूल केली जाई. असे दुहेरी शोषण शेतकऱ्यांचे होत असे. एकूणच महाराष्ट्रीयन समाजाचे त्या काळी सर्वच थरातून सामाजिक व आर्थिक शोषण चालू होते. या कालखंडात शिक्षणाचा प्रसार झालेला असता तर निश्चितच समाजाची परिस्थिती एवढी हालाखीची झाली नसती.

## ४) समाजातील अनिष्ट चालिरिती

एकोणिसाव्या शतकातील समाज हा रूढी परंपराप्रिय समाज होता. समाजाची परिस्थिती अतिशय मागासलेल्या अवस्थेतील होती. गतिशीलता हे कोणत्याही सामाजिक समुहाचे वैशिष्टय असते, परंतु एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रीयन समाजात गतिशीलता नव्हती असे म्हटले तरी वावगे ठरू नये. एक वैशिष्टय असतेच असे मानले तर केवळ सुधारकांनी ज्या पद्धतीने आपल्या पातळीवर वैचारिक जागृती करून समाज सुधारण्याचा प्रयत्न केला तेवढीच काय ती गतिशीलता तत्कालीन समाजात होती असे म्हणता येईल. या समाजात विविध अनिष्ट प्रथांचे प्राबल्य असल्याने समाजाला एक प्रकारची शीलावस्था प्राप्त झालेली होती. कडक जाती बंधने, अस्पृश्यता, स्त्रियांविषयक अनिष्ट चालिरीती तत्कालीन समाजात होत्या.

वर्ण व्यवस्थेतून विविध जाती-उपजातींची निर्मिती झाली व या जाती मधील आचार, विचार, नियम हे इतके कडक होते की, त्यातून समाजाची प्रगती खुंटत गेलेली होती. महाराष्ट्रात शिक्षण, आधुनिकीकरण, विद्या, कला, व्यापार, साहित्य या दृष्टीने प्रगती का झाली नाही याचे कारण कडक जातिबंधने हेच होते. या जातिबंधनावर अधारित ज्या रूढी समाजात खोलवर रूजल्या होत्या त्याचे वर्णन करतांना डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी लिहिले होते की, "कपडे कसे पेहरावे, बांगडया कसल्या घालाव्या, भांडी कसली वापरावी, लग्नात मिरवणुकी कशा

काढाव्या, असल्या बाबतीत सुद्धा जातिबंधने कडक असत आणि याविषयी कज्जा झाला तर भागवत पुराण, विष्णू पुराण, चरणव्यूह, शूद्रकमलाकर, यातिनिर्णय यांसारखे ग्रंथ पाहून किंवा पूर्वापार वहिवाट काय आहे ते पाहून निर्णय होत असे. म्हणजे ग्रंथ आणि रूढी यांच्या शृंखलात हा समाज इतका जखडलेला होता की स्वतंत्र आचार तर राहोच पण स्वतंत्र विचार करण्याची सुद्धा येथे सोय नव्हती."[२४] यावरून ही जातिबंधने किती कठोर होती हे स्पष्ट लक्षात येते. प्रत्येक जातितील एखाद्या देखील व्यक्तीने जातिबंधनाविरोधात काम केले तर त्या कुटुंबाला वाळीत टाकले जायचे. रोटी-बेटी व्यवहार हा केवळ त्याच जातीत चाले व या बाबतीत यत्किंचितही बदल या समाजाला मान्य नव्हता. कोणत्याही परिस्थितीत वर्णसंकर किंवा जाती संकर समाजास मान्य नव्हता. समाजावर धर्माचा विशेष पगडा असल्याने धर्मसंकर व जातिसंकर निशिद्ध मानले जात होते. एखादा व्यक्ती अगदी मुंबईला जरी जाऊन आला तरी तो बाटला असा संशय घेऊन त्यास वाळीत टाकले जात असे. अशा प्रकारे ज्या कुटुंबाला वाळीत टाकले जात किंवा ज्यांच्यावर बहिष्कार पडे त्यांच्यासाठी ही खूप मोठी शिक्षा होती.

अस्पृश्यता हा तत्कालीन समाजाला लागलेला एक कलंक होता. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना अगदी नरकासमान जीवन जगावे लागत होते. आज शिक्षणाच्या क्षेत्रात एवढी प्रगती झालेली व समाज प्रचंड सुधारलेला असतानाही अस्पृश्यता पूर्णतः समाजातून जाऊ शकलेली नाही यावरून त्याकाळची परिस्थिती किती बिकट असू शकते याचा अंदाज येतो. उच्चभ्रू लोकांच्या घराची पायरी चढायची नाही, त्यांच्या रस्त्याने जायचे नाही, गावच्या सामुदायिक पाणवठयात पाणी भरायचे नाही, एवढेच काय पण रस्त्याने थुंकायचीही बंदी अस्पृश्य समाजावर होती. अस्पृश्यांना थुंकण्यासाठी गळयात गाडगे बांधले जाई व त्यांची पावले रस्त्यावर उमटू नयेत म्हणून त्यांच्या कमरेला पाठीमागे झाडू बांधला जाई यावरून त्याकाळातील जाचक बंधनांचे स्वरूप लक्षात येते. अस्पृश्य लोकांची केवळ सावली अंगावर पडली तरी विटाळ मानला जाई.

जातिप्रथा व अस्पृष्यता याशिवाय सामाजात आणखीही अनिष्ट रूढीपरंपरा धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा म्हणून फोफावल्या होत्या. मूल देवाला वाहणे, देवाला नवस बोलणे, ते फेडण्यासाठी कर्जे काढणे, विविध देवतांना खूष करण्यासाठी त्यांना पशू बळी देणे, एवढेच नाही तर मनुष्य बळी देणे या सारख्या अनेक अनिष्ट रूढी परंपरा या समाजात होत्या. या सर्व प्रथांवरून हा समाज किती अडाणी व अज्ञानी होता याची स्पष्ट कल्पना येते.

## ५) स्त्रियांची सामाजिक स्थिती

वैदिक कालखंडाचा विचार करता असे लक्षात येते की, या कालखंडात स्त्रीला समाजात मानाचे स्थान होते. उत्तर वैदिक कालखंडापासून स्त्रीच्या जीवनाला समाजात जी उतरती कळा लागली ती एकोणिसाव्या शतकापर्यंत कायम होती. एवढेच नाही तर त्यात आणखी भर पडली ती अनिष्ट चालिरितींची. एकीकडे स्त्रीला दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती मानणारा समाज दुसरीकडे स्त्रियांचे विविध रूढींच्या नावाखाली किंवा धर्माच्या नावाखाली शोषण करीत होता. मनुने जो 'मनुस्मृती' हा स्मृतिग्रंथ लिहिला त्यात स्त्रियांना हीन लेखले गेले. एवढेच नाही तर स्त्री ही नेहमीच परावलंबी असते असेही सांगितले गेले. लहानपणी स्त्रीने पित्याच्या आज्ञेत वागावे, विवाहानंतर आपल्या पतीच्या व वृद्धापकाळात आपल्या मुलांच्या आज्ञेत वागावे असा दंडक घालून दिला गेला त्यामुळे पूर्ण आयुष्यभर स्त्री पुरूषप्रधान संस्कृतीचा बळी ठरत गेली. मनुने स्त्रियांना शिक्षणही नाकारलेले होते.

"वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः |

पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्नि परिक्रिया ‖ २.६७"[२५]

स्त्रियांच्या जीवनात वैदिक विधी एकच आहे तो म्हणजे लग्नविधी होय. स्त्रियांना ज्ञानासाठी गरूगृही राहण्याची आवश्यकता नाही. पतीची सेवा हाच स्त्रीचा गुरूकुल निवास व घरकाम हेच तिचे यज्ञकर्म आहे. असा विचार मनुस्मृतीत वरील श्लोकात सांगितलेला होता. स्त्रियांना उपनयन, वेदाध्ययन, विद्याध्ययन वा यज्ञकर्म करायला शास्त्राने मनाई केलेली होती.

यावरून असे लक्षात येते की, हिंदु धर्मशास्त्रानेच स्त्रीला समाजात दुय्यम लेखले आहे व याच धर्मशास्त्र आणि रूढी परंपरांचा फायदा घेऊन स्त्री विषयी अनेक वाईट अनिष्ट चालिरिती समाजात फोफावल्या. एकूणच एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्रियांची सामाजिक परिस्थिती अभ्यासली तर त्यांच्या संबंधी काही अनिष्ट प्रथा विशेषत्त्वाने जाणवतात त्या म्हणजे शिक्षण बंदी, बालविवाह, बालिका-जरठ विवाह, विधवा विवाह बंदी, बहुपत्नीकत्त्व, सती प्रथा, केशवपन या होत. जन्मापासूनच स्त्रीच्या अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण व्हायचा कारण तत्कालीन समाजाने स्त्रीजन्माचे स्वागत कधी केलेच नव्हते. मुलगा हा घराच्या वंशाचा दिवा असतो, घराण्याचा कुलदीपक असतो, त्यामुळे मुलाच्याच जन्माला महत्त्व दिले जायचे. मुलगी जन्माला आली तर आपल्या कुटुंबाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल म्हणून या समाजात बालिकांना मारण्याची चाल प्रचलित होती. मुलगी जन्माला आली की, हौदात पुरले जायचे किंवा वेगळया पद्धतीने तिला मारले जायचे. काही प्रसंगी तिला देवाला सोडून दिले जायचे. या परिस्थितीत आजही विशेष फरक पडलेला नाही. बालविवाह ही सर्व प्रथांमध्ये खूप भयानक प्रथा होती. या काळात मुलींचे विवाह पाच ते सहा या वयोगटातच उरकले जायचे. या वयोगटात लग्न म्हणजे काय हे देखील वधुला कळत नसे.

बाल विवाहापेक्षाही अधिक गंभीर प्रथा ही 'बालिका-जरठ विवाह' ही होती. या प्रथेनुसार बालिकेचे जरठ म्हाताऱ्याबरोबर लग्न लावून दिले जायचे व त्यामुळे वधुला अकाली वैधव्य यायचे. यातूनच तिला केशवपन किंवा सतीप्रथांसारख्या अनिष्ट चालींना बळी पडावे लागत होते. विधवा झालेल्या स्त्रियांना विधवा पुनर्विवाहाचा अधिकार दिला जात नव्हता त्यामुळे अशा स्त्रियांना प्रचंड अपमानास्पद वागणूक सहन करावी लागत होती. या सारख्या अनिष्ट चालिरिती समाजातून दूर करताना समाज सुधारकांना खूप हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या. ज्या कालखंडात युरोप खंडात आधुनिक क्रांती झाली, विविध क्षेत्रात नवनवीन शोध लागले, विज्ञान व तंत्रज्ञानाचे चमत्कार जगाने अनुभवले, फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला स्वातंज्य, समता व बंधुता यासारखी मौल्यवान तत्त्वे बहाल केली, त्याच कालखंडातील भारतीय स्त्री विषयी तथाकथित पुरूष समाजाचे मत काय होते याचा विचार केला तर असे लक्षात येते

की, "स्त्री ही चंचल आहे, ती नित्य विकाराधीन असते, स्वातंत्र्याला ती नालायक आहे, तिला बंधनातच ठेविली पाहिजे, ती मोक्षमार्गातील धोंड आहे, शहाण्याने स्त्रीच्या नादाला लागू नये, तिला विद्येचा, वेदमंत्राचा, धनाचा कसलाही हक्क नाही"[२६] एकूणच विविध अनिष्ट प्रथांनी स्त्रियांचे जीवन जखडून टाकलेले होते.

तत्कालीन स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारला गेलेला असल्याने त्यांची स्थिती अधिकच हालखीची बनलेली होती. स्त्रीला शिक्षण मिळाले तर ती आपल्याला वरचढ होईल व समाजातील आपली प्रतिष्ठा ढासळेल अशी भीती पुरूष वर्गाला असल्यामुळे जाणीवपूर्वक स्त्रीशिक्षण टाळले जायचे. मुळात सुधारकांना सर्वात अधिक त्रास हा स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करतानाच झालेला होता. स्त्रीशिक्षण टाळण्यासाठी काही अफवाही या समाजात खोडसाळ लोकांकडून पसरविल्या जायच्या. सुशिक्षित स्त्रीचा नवरा लवकर मरतो, तिला मुलबाळ होत नाही अशा अफवा समाजात होत्या. महात्मा जोतिबा फुले व सावित्री बाई फुले यांनी स्त्रीशूद्रांना शिक्षण देण्यास सुरूवात केली तेंव्हा स्त्रीला शिक्षण नाकारणाऱ्यांनी जोतिबांच्या कार्यात खंड पडावा यासाठी त्यांच्या वडिलांची भेट घेऊन सांगितले होते की, "शिकलेल्या स्त्रीचा नवरा लौकर मरतो आणि तिला मूल होत नाही. हे माहीत आहे ना तुम्हाला? ... म्हणूनच तिची कुस उजवली नाहीये ... आम्हीच कशाला? तुमचे जातिबांधवही तुम्हाला वाळीत टाकणार आहेत. तुमचा रोटी बेटी व्यवहार तर बंद होईलच; पण उद्या तुमच्या घरातलं कोणी मेलं तर प्रेताला खांदा द्यायला सुद्धा भाऊबंद येणार नाहीत."[२७] यावरून स्त्री शिक्षणाला किती विरोध समाजातून होत होता हे समजते. केवळ उच्चभ्रू समाजातील काही स्त्रियांना घरगुती लिहिता वाचता येण्याजोगे शिक्षण दिले जायचे याशिवाय मात्र स्त्री शिक्षणाचा अभावच होता.

## २.३ एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थिती/शैक्षणिक वाटचाल

एकोणिसाव्या शतकात समाजसुधारकांनी ज्या समाजात राहून सामाजिक व शैक्षणिक सुधारणा केल्या त्या काळची सामाजिक परिस्थिती कशी होती हे अभ्यासल्यानंतर तत्कालीन महाराष्ट्रीयन समाजातील शैक्षणिक परिस्थिती कशी होती याचा आढावा घेणे इष्ट ठरेल.

प्राचीन कालखंडातील महाराष्ट्राची शिक्षणाच्या बाबतीत प्रगती पाहिली तर महाराष्ट्रामध्ये विविध नावाजलेली विद्यापीठे होती व तेथे आध्यात्मिक व भौतिक अशा दोन्ही विद्या शिकविल्या जायच्या. या विद्यापीठांमध्ये नालंदा, तक्षशिला, वल्लभी, विक्रमशीला, पैठण इत्यादी विद्या केंद्रांचा समावेश होतो. मात्र मुस्लिमांच्या आक्रमणानंतर या विद्याकेंद्रांचा ऱ्हास झाला व पुन्हा मात्र शिक्षणासाठी विशेष प्रयत्न झाले नाहीत. या अनुषंगाने पु.ग.सहस्त्रबुद्धे लिहितात "मुसलमानांच्या स्वाऱ्यांनंतर तक्षशिला, नालंदा, वल्लभी, विक्रमशीला ही विद्यापीठे नष्ट झाली आणि येथे सर्वत्र अंधार झाला. मराठयांच्या कारकीर्दीत येथील शास्त्रीपंडितांनी महाराष्ट्रात एकही विद्यापीठ स्थापन केले नाही. या विद्येकडे त्यांनी लक्षच दिले नाही."[२८] म्हणजेच जो पर्यंत महाराष्ट्रात राजकीय स्थैर्याचा कालखंड होता तो पर्यंत शिक्षणासाठी विशेष प्रयत्न झाल्याचे दिसतात परंतु जेंव्हा पासून राजकीय स्थित्यंतरे होत गेली तेंव्हा पासून मात्र शिक्षणाची वाताहात होत गेलेली दिसते. एकोणिसाव्या शतकात जी थोडया फार प्रमाणात शिक्षण व्यवस्था होती ती दोन भागांत विभागलेली होती. एक म्हणजे स्थानिक महाराष्ट्रातील राष्ट्रीय शाळा आणि ब्रिटिशांनी भारतात व महाराष्ट्रात केलेली शिक्षणाची व्यवस्था.

**१) नेटिव्ह शाळा :** ब्रिटिशपूर्व कालखंडात महाराष्ट्रात तसेच भारतामध्ये अशा प्रकारच्या शाळा कार्यरत होत्या. या शाळा हिंदु आणि मुस्लिम समाजास त्यांच्या गरजेनुसार धर्म, संस्कृती आणि साहित्याचे शिक्षण देण्याचे कार्य करत होत्या.[२९] या शाळा असंघटीत स्वरूपात कार्यरत होत्या. महाराष्ट्राच्या बाबतीत याच शाळांना संस्कृत पाठशाळा असेही म्हटले जात असे. या शाळांचे स्वरूप आज कार्यरत असलेल्या शाळांसारखे नव्हते. आजच्या शाळांप्रमाणे शालेय प्रशासनामध्ये कुठल्याही प्रकारची औपचारिकता नव्हती. अशा शाळांना निश्चित असा अभ्यासक्रम ठरवलेला नसायचा. अशा शाळांमधून हिंदु धर्माच्या बाबतीत वेद व उपवेद, पोथ्या-पुराणे, स्मृतिग्रंथ इत्यादींचे शिक्षण दिले जायचे. सहाजिकच या ज्ञानाचा उपयोग ब्राह्मणांनाच होत होता. कारण अशा शाळांमधील शिक्षणक्रम हा सर्वसामान्यांना कोणत्याही पद्धतीने फायदेशीर नव्हता. त्यामुळे ब्राह्मणेतर मुले अशा शाळांमध्ये शिकण्यासाठी येत नव्हते. अशा शाळांना नावच संस्कृत पाठशाळा पडल्याने या शाळांतून संस्कृतमधील ग्रंथांचे

अध्यापन केले जायचे. संस्कृत ही भाषा सर्वसामान्यांना न समजणारी भाषा होती त्याचबरोबर या अभ्यासक्रमामुळे सर्वसामान्यांच्या आर्थिक परिस्थितीला कोणताही हातभार लागणार नव्हता याकारणाने अशा शाळेत सर्व सामान्यांची मुले पाठविली जात नव्हती. याचे दुसरेही कारण सांगता येईल ते म्हणजे अशा शाळाच मुळात ब्राह्मण पंडितांनी सुरू केलेल्या होत्या. त्यामुळे या शाळा केवळ ब्राह्मणांपुरत्याच मर्यादित होत्या.

**२) एतद्देशीय शाळा किंवा राष्ट्रीय शाळा (पंतोजींच्या शाळा) :** ब्रिटिशांचे भारतात आगमन झाल्यानंतर त्यांनी मिशनरी शाळा भारतात त्याच बरोबर महाराष्ट्रात स्थापन केल्या होत्या. तथापि या दरम्यानच्या काळात ब्रिटिशांनी मिशनरी शाळा सुरू केल्यानंतर भारतीय लोकांना आपल्या स्थानिक शाळा टिकवणे महत्त्वाचे वाटू लागले कारण ब्रिटिश संस्कृतीचा आपल्यावर प्रभाव पडेल आणि आपला धर्म बाटेल अशी भीती तत्कालीन समाजात निर्माण झालेली होती. मिशनरी व सरकारी शाळांना ब्रिटिशांनी चालना दिली होती याबाबतीत भारतीयांच्या मनात एक संशयाची भावना निर्माण झालेली होती. याविषयी दादोबा पांडुरंग यांनी आपल्या आत्मचरित्रात ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणाविषयी साशंकता व्यक्त केलेली होती. त्यांनी लिहिले होते की, "...आमच्या मुलास शिकविण्याचे सरकारला इतके काय अगत्य आहे, तेंव्हा या धूर्त इंग्रज सरकारचा यात काही तरी मतलब असावा तो म्हणजे आमच्या मुलास हुशार करून त्यास पुढे बाटवावे, असा तर्क धावत जातो."[३०] त्यामुळे नेटिव्ह शाळांचेच थोडेसे स्वरूप बदलून ज्या देशीय शाळा सुरू करण्यात आल्या त्यांनाच एतद्देशीय शाळा किंवा राष्ट्रीय शाळा असे म्हटले जाऊ लागले. या शाळेत जे शिक्षक अध्यापनाचे काम करीत त्यांना पंतोजी असे म्हटले जाई त्यामुळे या शाळांना पंतोजींच्या शाळा असेही म्हटले जाई. या शाळा एक शिक्षकी होत्या.

मिशनऱ्यांनी निर्माण केलेल्या स्पर्धेतून जरी या शाळा निर्माण झालेल्या असल्या तरी या शाळा चालविताना महाराष्ट्रीयनांकडे असलेला ज्ञानाचा अभाव मात्र या शाळांमध्येही दिसून येत होता. एकूणच सुरूवातीच्या काळात या शाळांमध्ये फारशी औपचारिकता पाळली जात

नव्हती. या शाळांमधील अध्यापन हे बहुतांशी शिक्षकाच्या मर्जीनुसार चालत असे. या शाळांमध्ये ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना शक्यतो टाळले जात असे. तरीही सरकारने ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांनाही प्रवेश द्यावा अशी तरतूद केली होती. चरितार्थ संपादणुकीच्या कामामुळे बहुतांश लोक या शिक्षणाकडे वळत नव्हते. अर्थात ब्रिटिशांनी भारतीयांसाठी शिक्षण देणाऱ्या सरकारी शाळा सुरू केलेल्या असल्यामुळे राष्ट्रीय शाळांचा फारसा विकास होऊ शकला नाही. ब्रिटिशांच्या विरोधात जेंव्हा भारतीयांचा स्वातंत्र्य संग्राम सुरू झाला त्या दरम्यान ब्रिटिशांच्या विरोधात एक प्रतिक्रिया म्हणून सरकारी शाळांऐवजी राष्ट्रीय शाळांमध्ये पूर्वीपेक्षा अधिक नावे दाखल होऊ लागली.

**३) खेडयातील शाळा :** महाराष्ट्रीयन बहुसंख्य जनता खेडयात रहात असल्यामुळे अशा खेडयातील बहुसंख्य जनता शिक्षणापासून वंचित होती. तरीही मोठया खेडयांत लिहिणे, वाचणे अंकगणित इत्यादींचे शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळा होत्या. शिक्षण हे तोंडी पाठाद्वारे दिले जात असे. त्यामुळे पाठांतरावर अधिक भर होता. नीती, धर्म इ. बाबतचे शिक्षण प्रामुख्याने दिले जात असे. काही प्रमाणात गुरूकुल पद्धतीही अस्तित्त्वात होती. तथापि या शाळांचे खूप विकसित असे स्वरूप नव्हते. बहुजन समाजातील लोकांमध्ये शिक्षणाविषयी अनास्था असल्याने या शाळाही केवळ उच्चभ्रू वर्गापुरत्याच मर्यादित झालेल्या होत्या.

**४) उच्च शिक्षण :** प्राथमिक शिक्षणाशिवाय विविध सुधारकांनी केलेल्या प्रयत्नांच्या आधारे व ब्रिटिश सत्तेने शिक्षणात केलेल्या सोयींच्या आधारे विद्यापीठीय शिक्षण सुरू झाले होते. एलफिस्टन कॉलेज, डेक्कन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज या सारख्या महाविद्यालयांच्या माध्यमातून हे विद्यापीठीय शिक्षण दिले जात होते व प्रामुख्याने एम.ए., बी.ए., बी.एस्सी, एम.डी., एल.एम.एस., एम.सी.ई., एल.सी.ई. व एल.एल.बी. यासारख्या पदव्यांचे अभ्यासक्रम चालू होते. खूप हुशार व जिज्ञासू तरूणच हे वरिष्ठ शिक्षण घेत असत. वरिष्ठ शिक्षण घेणाऱ्यांची संख्या खूप कमी होती. तत्कालीन समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आकडेवारी लोकमान्य टिळकांनी आपल्या एका अग्रलेखात प्रसिद्ध केली होती.

त्यात त्यांनी लिहिले होते "सन १८९३ अखेर एकंदर ग्रॅज्युएटांची संख्या २१९८ असून, पैकी १०५ एम्.ए., १३२८ बी.ए., ३२ बी.एस्सी., ५ एम.डी., ४२४ एल्.एम्.एस्.,१ एम्.सी.ई व ३०३ एल्.सी.ई.आहेत; आणि बी.ए. व एम्.ए. मिळून एकंदर १४३३ पैकीं ३५६ एल्. एल्.बी. झाले आहेत. या सर्वांचे जातवार प्रमाण पाहूं गेले असतां असे आढळून येतें की, यापैकी शेंकडा ४७ दक्षिणी, शेंकडा २५ पारशी, १७ गुजराथी, ६ ख्रिश्चन, २ सिंधी आणि मुसलमान शेकडा २ पेक्षांहि कमी आहेत."[३१] यावरून स्पष्ट लक्षात येते की, विद्यापीठीय शिक्षणाबाबत कमालीची अनास्था समाजामध्ये होती. वास्तविक तसे होणेही क्रमप्राप्त होते कारण ज्या समाजात प्राथमिक शिक्षणासच टाळले जायचे त्या समाजात विद्यापीठीय शिक्षणाचे प्रमाण कमीच असणे सहाजिक होते.

## २.४ एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण

इ.स. १६०० साली ब्रिटिशांनी भारतात व्यापार करण्यासाठी 'ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीची' स्थापना केली. इ.स.१७५७ साली बंगालचा नबाब सिराज उद्दौला याच्या बरोबर प्लासीची लढाई करून आपल्या राजकीय सत्तेची पायाभरणी भारतातील बंगाल प्रांतात केली व त्यानंतर संपूर्ण भारतात ब्रिटिशांनी आपला एकछत्री अंमल प्रस्थापित केला. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर इ.स.१८१८ साली दुसऱ्या बाजीरावाचा पराभव करून मराठेशाही संपुष्टात आणली व महाराष्ट्रावरही आपले वर्चस्व प्रस्थापित केले. ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वीच ब्रिटिशांचा व ब्रिटिश मिशनऱ्यांचा भारतावर प्रभाव पडण्यास सुरूवात झाली होती. वस्तुतः ब्रिटिशांना भारतीयांच्या शिक्षणाबाबत कुठलेही देणे घेणे नव्हते. कारण त्यांच्या दृष्टीने केवळ त्यांचा व्यापार एवढीच गोष्ट महत्त्वाची होती. भारतीयांना जर पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण देण्यास सुरूवात केली तर हे लोक शहाणे होऊन आपल्या विरोधात बंड करतील याची जाणीव ब्रिटिशांना होती तरीही भारतीय सुशिक्षित कामगारांच्या गरजेतून आणि किमान राज्यकर्ते म्हणून भारतीयांना सुशिक्षित करणे आपली जबाबदारी आहे या जाणीवेतून ब्रिटिशांनी भारतीयांसाठी शिक्षण सुरू केले.[३२] थोडक्यात आपला स्वार्थ साधण्यासाठी आपल्याला सुशिक्षित कामगारांची गरज आहे व त्या दृष्टिकोनातून त्यांनी भारतीयांसाठी शिक्षण

देण्याचा प्रयत्न केला. याशिवाय हिंदुस्थानात सनदी नोकर भरतीसाठी आयोगाची स्थापना करून सिव्हिल सर्व्हिस परीक्षांची सुरूवात केली.

**१) मिशनरी शाळा :** ज्या प्रमाणे युरोपियन लोक हे व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले तसेच अनेक युरोपियन मिशनरी धार्मिक प्रचारासाठी भारतात आलेले होते. वस्तुतः भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना होण्यापूर्वीच मिशनरी भारतात आलेले होते. त्यांनी धार्मिक प्रचाराच्या हेतूने भारतात शाळा सुरू केल्या होत्या. या शाळांनाच मिशनरी शाळा असे म्हणतात. महाराष्ट्रात सर्वसामान्य शूद्रातिशूद्र व सर्वसामान्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आलेला होता व उच्च वर्णीयांकडून त्यांची पिळवणूक होत होती. ब्रिटिशांच्या आगमनाबरोबर या परिस्थितीचा फायदा मिशनऱ्यांनी घेण्याचा प्रयत्न केला. विशेषतः तळागाळातील हीन वर्णीयांच्यासाठी मिशनऱ्यांनी अनेक शाळा स्थापन केल्या होत्या. या वर्गातील लोकांना आपलेसे करून धर्मांतराचे कार्य आपणास सोपे जाईल अशी समजूत ख्रिश्चन मिशनऱ्यांची होती आणि ती सत्य देखील होती. म्हणून त्यांनी भारतात आल्यावर ठिकठिकाणी मिशनरी शाळांची स्थापना केली, त्याचबरोबर मुंबई प्रांतातही अशा शाळांची स्थापना केली. शूद्र समाजातील लोकांना ब्राह्मणांच्या शाळेत जाण्याचा अधिकार नव्हता म्हणून असे लोक या शाळांकडे आकर्षित होत असत. अशा शाळांमधून मिशनरी जाणीवपूर्वक ख्रिश्चन धर्माची शिकवण देत असत. 'ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे हेच मिशनऱ्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते आणि या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठीच ठिकठिकाणी शाळा घालणे, बायबल वर मराठीत प्रवचन करणे, आणि ख्रिस्ती धर्माचे विवेचन करणारी मराठी पुस्तके फुकट वाटणे इत्यादी गोष्टी ते करीत.'[३३] या मिशनऱ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत होते. तथापि त्यांच्यात चिकाटी होती. कष्ट करण्याची तयारी होती त्यामुळे आलेल्या प्रत्येक अडचणींवर मात करीत त्यांनी भारतात व महाराष्ट्रात शैक्षणिक कार्य चालू ठेवले होते.

मिशनऱ्यांनी भारतात व महाराष्ट्रात शाळा सुरू केलेल्या असल्या तरी त्यांच्या शैक्षणिक चळवळीला खूप यश आले असे म्हणता येणार नाही कारण धर्मांतर हा त्यातील महत्त्वाचा

अडसर होता. या मिशनरी शाळेत शिक्षक म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांनाही समाजाने ते बाटले असे समजून त्यांना वाळीत टाकल्याच्याही घटना घडत असत. असे असले तरीही महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक चळवळीत काहीच ठसा उमटविला नाही असे मात्र म्हणता येणार नाही. मिशनऱ्यांचे खरे कार्य इ.सन १८१५ ते १८४० या दरम्यानच्या कालखंडात झाले. "इ.सन १८१३ ते १८१८ या काळात मिशनऱ्यांनी आपल्या शाळा मुंबईत खेतवाडी व गिरगांव या भागात मुख्यतः मराठी लोकांसाठी सुरू केल्या. इ.सन १८२४ साली मुलींची एक शाळा काढली. इ.स. १९२९ मध्ये मिशनऱ्यांनी चालविलेल्या मुलींच्या शाळांची संख्या नऊ असून त्यात सुमारे ४०० मुली शिकत होत्या. ... कोकणात बाणकोट व हर्णे या दोन तालुक्यात या मिशनच्या ६५ शाळा असून त्यात २७०० मुले शिकत होती."[३४] यावरून लक्षात येते की, महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेत त्याकाळी मिशनरी शाळांचेही योगदान होते.

**२) कंपनी सरकारने शिक्षणासाठी केलेले प्रयत्न :** मिशनरी शाळांच्या माध्यमातून महाराष्ट्रात शैक्षणिक प्रगती झाली, परंतु मिशनऱ्यांनी चालवलेल्या धर्मप्रसाराच्या कार्यामुळे मिशनरी शाळांना काही मर्यादा आलेल्या होत्या हे निश्चितच. याशिवाय ब्राह्मण मंडळींना अशा प्रकारच्या शाळा म्हणजे धर्म बाटविणाऱ्या आहेत असे वाटत होते. त्यामुळे अशा शाळांना ब्राह्मणांचा प्रथम पासूनच विरोध होता. ब्रिटिशांच्या बाबतीत विचार केला तर सुरूवातीला व्यापारी म्हणून आलेल्या ब्रिटिशांनी मिशनरी शाळांना प्रोत्साहन दिले असले तरीही त्यांची धर्मांतराची बाब आपल्या राज्यकारभारात अडसर ठरू शकते अशी भीतीही ब्रिटिशांना वाटत होती. त्यामुळे कंपनी प्रशासनाच्या माध्यमातून काही शैक्षणिक प्रयत्न करणे गरजेचे आहेत असा विचार कंपनी प्रशासनाने करण्यास सुरूवात केली.

प्रत्यक्ष भारतीयांना शिक्षण देण्याच्या दृष्टीने प्रयत्न इ.स. १७८४ पासून पुढे सुरू झाले. सर विल्यम जोन्स याने इ.स.१७८४ मध्ये कलकत्ता येथे 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना केली व तो स्वतः या सोसायटीचा अध्यक्ष बनला. भारताचा

इतिहास, प्राचीन अवशेष, कला, शास्त्र आणि वाङःम्य इत्यादींचा अभ्यास करणे हे या संस्थेचे सर्वात प्रमुख उद्दिष्ट होते. इ.स.१७७३ साली कंपनी सरकारवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी नियामक कायदा (Regulating Act) ब्रिटिश पार्लमेंटने कंपनीवर लादला व या कायद्यानुसार कंपनी कारभाराची दर २० वर्षांनी तपासणी होऊन काही कायदे करण्याचे ब्रिटिश पार्लमेंटने प्रशासकीय सुधारणेसाठी लागू केले. या नुसार इ.स. १७९३ साली पहिला चार्टर ॲक्ट व इ.स. १८१३ साली दुसरा चार्टर ॲक्ट पास करण्यात आले होते. राजकीय दृष्टिकोनातून या चार्टर ॲक्ट मध्ये कोणत्या बाबींचा समावेश करण्यात आला हे या ठिकाणी महत्त्वाचे नाही परंतु शैक्षणिक दृष्टिकोनातून इ.स.१८१३ च्या चार्टर ॲक्टनुसार एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला होता. या कायद्यानुसार ब्रिटिश सरकारने सर्वप्रथम स्वतः भारतीयांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली दिसून येते. त्यांनी भारतीयांच्या शिक्षणावर एकूण जमा महसुलाच्या रकमेतून दरवर्षी एक लाख रूपये खर्च केले जातील असे जाहीर केले होते. ही रक्कम हिंदुस्थानातील वाङःमयाला, थोर शास्त्री पंडितांना, आणि समाजात शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीला उत्तेजन मिळावे यासाठी खर्च केली जावी असे या कायद्यात नमूद करण्यात आलेले होते.[३५] थोडक्यात भारतीय शिक्षणासाठी दरवर्षी एक लाख रूपये खर्च केले जातील अशी सनद भारतातील ब्रिटिश सत्तेला प्राप्त झाली होती. तत्कालीन भारतीय लोकसंख्येचा विचार करता ही रक्कम अगदीच कमी होती, तथापि ब्रिटिशांना किमान भारतीयांना शिक्षण देण्याच्या जबाबदारीची जाणीव झालेली होती.

महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर जोनॅथन डंकन हा मुंबई प्रांताचा गव्हर्नर असतांना मॅकिंटोश या रेकॉर्डरने दि.२६ नोव्हेंबर १८०४ रोजी "एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे" ची स्थापना केली व तो स्वतः या सोसायटीचा अध्यक्ष झाला. त्याने शिक्षणासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे हे ओळखले व त्यानुसार कार्य करण्यास सुरूवात केली होती. परंतु इ.स.१८२१ मध्ये तो पुन्हा इंग्लंडला गेला. त्याच्यानंतर त्याचे शैक्षणिक कार्य एलफिस्टनने पुढे चालू ठेवले.

मुंबई प्रांताचा गव्हर्नर म्हणून एल्फिस्टन आल्यानंतर त्याने मिशनरी शाळांवर अवलंबून राहून चालणार नाही हे ओळखले होते. मिशनऱ्यांनी चांगल्या प्रकारे शैक्षणिक कार्य चालविले असतांनाही त्यांची मदत एलफिस्टनला घ्यावीशी वाटली नाही. कारण ब्राह्मणी राज्य जिंकून इंग्रजांनी सत्ता प्राप्त करून घेतलेली होती. अशा स्थितीत मिशनऱ्यांना उत्तेजन देणे व त्यांची मदत घेणे फार धोक्याचे ठरेल असे एलफिस्टनचे स्पष्ट मत होते. तसेच जनतेच्या शिक्षणाच्या कामी सरकारने पुढाकार घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे असे तो मानत होता. लोक शिक्षणाबाबतीत त्याची एक स्पष्ट भूमिका होती. "प्रत्येक देशामध्ये गरीब लोकांचे सुख बव्हंशी त्यांच्या शिक्षणावर अवलंबून असते. विचारीपणा आणि स्वाभिमान या गुणांपासून इतर साऱ्या चांगल्या गुणांची उत्पत्ती होत असते आणि हे गुण प्राप्त होण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण... सर्व हीन गोष्टींवर शिक्षण हाच एक तोडगा आहे. असा विश्वास एलफिस्टनचा होता."[३६] थोडक्यात धर्मांतर ही बाब इंग्रजांची राजसत्ता महाराष्ट्रात टिकविण्यासाठी अडसर वाटत होती त्यामुळे त्याने मिशनरी शिक्षणास विरोध करून इंग्रजांकडून शिक्षणासाठी स्वतंत्र प्रयत्न झाले पाहिजेत असा विचार केला. शिक्षण सुरू करण्यामागेही एलफिस्टनचा स्वार्थी दृष्टिकोन होता कारण ब्राह्मणांचे राज्य जिंकून ब्राह्मणांच्याच शिक्षणावर खर्च केला तर निश्चितच त्यांच्याकडून आपल्या राज्यास विरोध होणार नाही. त्याचबरोबर सर्वसामान्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केल्यामुळे त्यांच्यातील अनिष्ट प्रथा निश्चित कमी होतील अशा त्याचा विश्वास होता.

ब्रिटिशांच्यामार्फत इ.स. १८१५ साली 'दि बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' ही संस्था केवळ युरोपियन मुलांच्या शिक्षणासाठी स्थापन करण्यात आली होती. याच संस्थेमार्फत इ.स.१८२० मध्ये भारतीय मुलांच्या शिक्षणासाठी 'नेटिव्ह स्कूल ॲण्ड स्कूल बुक कमिटी'ची स्थापना करण्यात आलेली होती व भारतीयांसाठी ब्रिटिशांमार्फत चालविली जाणारी पहिली नेटिव्ह शाळा सुरू केली गेली. दि. २१ ऑगस्ट १८२२ रोजी 'दि बॉम्बे नेटिव्ह स्कूल ॲण्ड स्कूल सोसायटी' नावाची संस्था स्थापन करण्यात आली होती. सदर संस्थेच्या स्थापनेविषयी दि. ५ एप्रिल १८२३ रोजी सरकारकडे माहिती पाठविण्यात आली व त्यास अनुसरून गव्हर्नर

इन काऊन्सिलने त्या संस्थेस दि.६ मे १८२३ रोजी मान्यता दिली होती. दि.१० मे १८२३ रोजी संस्थेची मासिक सभा संपन्न झाली होती व त्या सभेत कॅ.जर्व्हिस साहेब हे ब्रिटिश अधिकारी संस्थेचे सेक्रेटरी म्हणून नियुक्त करण्यात आले तर नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून सदाशिव काशिनाथ उर्फ बापू छत्रे यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. "In 1824 an English School was set up by the Bombay Native Education Society for Indian students. … In the year 1827 a resolution was passed that an institution for promotion of education should be established under Bombay Native Education Society and be designated as 'Elfistone College'."[३७] म्हणजेच या संस्थेमार्फत इ.स.१८२४ मध्ये भारतीयांसाठी 'इंग्लिश स्कूल'ची स्थापना करण्यात आली व इ.स.१८२७ मध्ये एलफिस्टन कॉलेजची स्थापना करण्यात आली.

थोडक्यात शिक्षण ही कंपनी सरकारची जबाबदारी आहे असे एलफिस्टन मानीत होता. त्याच्या प्रयत्नातून महाराष्ट्रामध्ये शिक्षण चळवळ मूळ धरू लागली होती. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून महाराष्ट्रात सरकारी शाळा स्थापन होण्यास सुरूवात झालेली होती. महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीमुळे तळागाळातील लोक फारसे शिक्षणाविषयी जागरूक नव्हते. यात आणखी एक समस्या म्हणजे ज्या उमेदीने ब्रिटिशांनी महाराष्ट्रात शिक्षण सुरु केले होते ते धोरण नंतरच्या काळात तसेच ठेवले नाही. ब्रिटिशांनी नंतरच्या काळात एकूणच शैक्षणिक धोरणात बदल केला त्यामुळे त्याचा तोटा महाराष्ट्रीयन जनतेलाही झाला. त्याचाच एक पारिपाक म्हणजे एकोणिसाव्या शतकातील विविध समाजसुधारकांनी ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणांवर टीका केल्याचेही दिसून येते.

**३) लॉर्ड मेकॉलेचे शैक्षणिक धोरण :** इ.स.१८१३च्या चार्टर ॲक्ट नुसार भारतीय शिक्षणासाठी ब्रिटिशांकडून फंडाची उभारणी करण्यात आली. त्या कायद्यातील शब्दांचा अर्थ संदिग्ध होता. त्यात स्पष्टपणा नव्हता. साहित्य म्हणजे भारतीय साहित्य की पाश्चिमात्य साहित्य आणि विद्वान म्हणजे संस्कृत भाषा जाणणारे की ब्रिटिश विद्वान, तसेच शाळा नेमक्या कोणत्या? देशी शाळा की ब्रिटिश शाळा या बाबतीत कोणताच खुलासा नव्हता. त्यामुळे त्यातून पौर्वात्य व पाश्चिमात्य असे वैचारिक मतभेद निर्माण झाले. "The funds placed at the

disposal of the General Committee of Public Instruciton were limited, and the question turned on how the money was to be spent; should Western knowledge be diffused through English or the classical languages?"[३८] हे मतभेद दूर करण्याचा प्रयत्न लॉर्ड मेकॉलेने केला होता.

दि.१० जून १८३४ रोजी लॉर्ड मेकॉले हा गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचा कायदा मंत्री म्हणून भारतात आला. इ.स. १८३३ च्या चार्टर ॲक्टनुसार पास झालेल्या शिक्षणविषयक सनदेचा अर्थ लावण्याची जबाबदारी गव्हर्नर जनरल बेंटिकने मेकॉलेवर सोपवली व त्याने विविध बाबींचा अभ्यास करून आपला जो अहवाल बनविला त्यास 'मेकॉलेचा जाहीरनामा' असे म्हणतात. हा जाहीरनामा दि. ७ मार्च १८३५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. आपल्या जाहीरनाम्यात इ.स.१८१३ च्या चार्टर ॲक्ट नुसार उभारलेला फंड कोणत्या पद्धतीने खर्च करावा याबाबतीत त्याने आपले मत मांडले "His thesis merely confirmed Bentinck's opinions, who issued his Resolution of the 7$^{th}$ March, 1835, which stated – The great object of the British Government ought to be the promotion of European literature and science among the natives of India; and that all the funds appropriated for the purpose of education would be best employed on English education alone."[३९] या कायद्यातील साहित्य या शब्दाचा अर्थ केवळ संस्कृत आणि आरबी साहित्य इतकाच नसून त्यामध्ये इंग्रजी साहित्याचाही समावेश करण्यात आला. तसेच विद्वान म्हणजे केवळ संस्कृत पंडित नसून किंवा मुस्लिम, मौलवी नसून इंग्रजी साहित्याचा अभ्यास करणारे विद्यार्थीही विद्वान समजावेत. या जाहीरनाम्यानुसार त्याने पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीवर भर दिला होता. त्याच्या मते भारतीय शिक्षणासाठी हा जाहीरनामा खूप उपयुक्त ठरेल कारण केवळ पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीमुळेच भारतातील अंधश्रद्धा दूर होऊ शकतील असा त्याचा विश्वास होता. मॅकॉलेस भारतीयांसाठी सुशोभनीय काय आहे या पेक्षा ते उपयुक्त किती असू शकते याचा विचार महत्त्वाचा वाटत होता

मेकॉलेला इंग्रजी भाषेचा खूप अभिमान होता, त्यामुळे त्याने शिक्षणाचे माध्यमही इंग्रजीच असावे असे सुचविले होते. मेकॉलेला पाश्चिमात्य शिक्षणाने असा वर्ग तयार करावयाचा होता की, जो रंगाने व रक्ताने भारतीय असतील, परंतु सवय, विचार, मत,

नीतिमत्ता आणि बौद्धिकदृष्टया पाश्चिमात्य असतील. "His object was to 'form a class of persons Indian in blood and in colour, but English in tastes, in opinions, and in morals and in intellect."[४०] त्याच्या मते इंग्रजी ही सर्व अधिकारी व राज्यकर्त्यांची भाषा आहे. जे इंग्रजी साहित्याचे अध्ययन करतील त्यांना भविष्यामध्ये ब्रिटिश कंपनी आणि सरकार मध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व तशी जबाबदारी ब्रिटिश सरकारने स्वीकारावी तसेच इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण शुल्क भरणारा व शिक्षण घेणारा वर्ग निर्माण होईल म्हणजे शिक्षणावर खर्च व तरतूद करण्याची गरज कंपनी सरकारला उरणार नाही. अर्थात त्याने स्वीकारलेल्या या पद्धतीला पूर्ण यश मिळू शकले नाही. या पद्धतीमुळे अगदी थोडया संख्येचा इंग्रजी शिक्षण घेतलेला गट इतर रूढी परंपराप्रिय समाजापासून वेगळा वाटला यामुळे सहाजिकच इंग्रजी शिक्षण घेतलेल्या तरूणांना उच्च पदस्थ नोकऱ्या मिळाल्या, परंतु त्यांच्यात आणि उर्वरित भारतीयात दोन स्वतंत्र गट निर्माण झाल्याशिवाय राहिले नाहीत. त्यामुळे मेकॉलेने सुचविलेल्या पाश्चात्य शिक्षण पद्धतीचे अपेक्षित फायदे मात्र मिळू शकले नाहीत.

सर्व सामान्य बहुजन समाजाच्या दृष्टीने मात्र इंग्रजी माध्यमातील हे शिक्षण कोणत्याही बाबतीत उपयुक्त नव्हते. महात्मा गांधी यांनीही मेकॉलेच्या या शैक्षणिक धोरणाचा दोष दाखविला होता. त्यांनी आपल्या शिक्षण विचारांमध्ये म्हटले होते की, "लक्षावधि लोकांना इंग्रजी शिकविणें म्हणजे त्यांना गुलाम बनविणें होय. मेकॉलेनें शिक्षणाचा जो पाया घालून दिला, त्यानें आम्हांला गुलाम बनविलें, तसें करण्याचा त्याचा हेतु होता, असें मी म्हणत नाहीं; पण परिणाम मात्र तसा झाला आहे."[४१] यावरून लक्षात येते की, मेकॉलेने सुचविलेले इंग्रजी भाषेतील शिक्षणाचे माध्यम तत्कालीन परिस्थितीचा विचार करता भारतीयांना सोईस्कर ठरणारे नव्हते. त्याकाळी शिक्षणात विकास होणे अगत्याचे होते परंतु इंग्रजी भाषेमुळे शिक्षणाला खीळ पडणार होती.

**शिक्षणाचा पाझर सिद्धांत :** लॉर्ड मेकॉले हा भारतीयांचा पाश्चिमात्य विचारसरणीचा वर्ग निर्माण करण्याच्या प्रयत्नात होता. त्याच्या विचारांच्या अंमलबजावणीसाठी व ब्रिटिश प्रशासनाच्या सोयीसाठी त्याने लॉर्ड ऑकलंडने सुचविलेल्या 'शिक्षणाच्या पाझर सिद्धांताची' अंमलबजावणी

केली. "शिक्षण हे समाजातील वरच्या घटकापुरतेच मर्यादित ठेवावे आणि त्यांच्या माध्यमातून शिक्षण पाझरत जाऊन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल, हा विचार म्हणजे शिक्षणाचा पाझर सिद्धांत होय."[४२] थोडक्यात या सिद्धांतानुसार लॉर्ड मेकॉलेने शिक्षण हे सर्वांसाठी ठेवले नाही. ते ठराविक वर्गासाठी मर्यादित केले. या प्रकारच्या शिक्षण पद्धतीमुळे ब्रिटिशांना शिक्षण ही बाब सोपी व सोईस्कर होणारी होती.

ब्रिटिशांनी नेहमीच मूठभर लोकांना आपल्या बाजूने वळवून संपूर्ण हिंदुस्थानवर आपले वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न केला होता. भारतात विविध महसूल पद्धती राबवित असतांना त्यांनी जमीनदार, संस्थानिक, अमीर, उमराव यांना जवळ केले. तोच प्रयत्न शिक्षणाच्या माध्यमातूनही त्यांनी केला. लॉर्ड मेकॉलेने जो वर्ग शिक्षणासाठी निवडला होतो तो वर्ग नेमका कोणता होता? तर निश्चितच आर्थिक निकषाच्या जोरावर वरिष्ठ वर्ग ठरविला जात होता. आर्थिक निकषांनुसार वरिष्ठ वर्ग कोणता याचा विचार केला तर लक्षात येईल की हा वर्ग खरोखरच ब्रिटिशांशीच एकनिष्ठ होता. म्हणजेच मेकॉलेच्या 'झिरपण्याच्या सिद्धांतातून' शिक्षण मिळणार होते ते केवळ ब्रिटिशांच्याच मर्जीतील गटाला सर्वसामान्य जनतेला मात्र नाही. याही पुढे जाऊन विचार केला तर ज्या वर्गाला शिक्षण मिळणार होते तो वर्ग तळागाळातील जनतेला साक्षर करील काय? व जरी काही प्रमाणात असे घडतही असेल तर त्यासाठी किती काळ लागणार हा ही एक गंभीर प्रश्न होता. प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी होती की, ज्या वर्गाला शिक्षणासारखे बाळकडू मिळाले त्याचा उपयोग तो स्वतःच्याच फायद्यासाठी करणार होता व तळागाळातील वर्ग निरक्षर राहण्यामध्येच त्यांचा स्वार्थ साधला जाणार होता.

या सिद्धांतामुळे भारतीय शिक्षणावर अनेक बाबतीत मर्यादा येणार होत्या. या पद्धतीमुळे मुलांमुलींसाठीच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणार होता. भारतात काही शैक्षणिक संस्था शिक्षण देण्याच्या हेतूने भारतीयांनी सुरू केलेल्या होत्या, त्यावर मर्यादा येणार होत्या, कारण शिक्षण हे ठराविक वर्गापुरतेच बनलेले होते. थोडक्यात लॉर्ड मेकॉलेने झिरपण्याच्या सिद्धांताच्या नावाखाली शिक्षणासारखी महत्त्वाची व क्लिष्ट बाब सोपी करून आपली

जबाबदारी झटकून टाकली. सहाजिकच त्यामुळे अनेक समाजसुधारकांनी या सिद्धांतास विरोध केला. या समाजसुधारकांमध्ये महाराष्ट्रातील महात्मा जोतीराव फुले हेही होते. महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे शिक्षण विचार ठराविक प्रकारचे बनण्यास ब्रिटिशांचे अशा प्रकारचे शैक्षणिक धोरण निश्चितच कारणीभूत होते.

## ४) चार्ल्स वुडचा खलिता

इ.स.१८१३च्या चार्टर ॲक्ट नुसार दर २० वर्षांनी शैक्षणिक धोरणात आवश्यकतेनुसार वदल करण्यासाठी शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला जात असे. या अनुषंगाने इ.स.१८१३ ते १८३३ व इ.स.१८३३ ते १८५३ असे दोन टप्पे पार पडले होते तो कालखंड विचारात घेऊन इ.स. १८५४ मध्ये बोर्ड ऑफ कंट्रोलचे अध्यक्ष सर चार्ल्स् वुड यांची नियुक्ती या कालखंडातील आढावा घेण्यासाठी करण्यात आली. त्याने दि. १९ जुलै १८५४ मध्ये स्वतःचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहिरनाम्यालाच “magna carta of Education” भारतीय शिक्षणाची सनद असे म्हणतात. या खलित्याच्या माध्यमातून भारतातील अगदी प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंतचे नियोजन करण्यात आले होते. शिक्षणासाठी स्वतंत्र प्रशासकीय खाते, राजकीय प्रभागामध्ये विद्यापीठांची स्थापना, शिक्षक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन, आवश्यक तेथे शाळा वाढवणे, नवीन माध्यमिक शाळा स्थापन करणे, अनुदान देणे, उच्च शिक्षणासाठी इंग्रजी तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी स्थानिक भाषा, उच्च शिक्षणासाठी विद्यापीठांची स्थापना या सारख्या तरतुदींचा समावेश यात करण्यात आलेला होता. “This Despatch, commended to the special attention of the Government of India “the improvement and far wider extention of education, both English and vernacular”, and recommended the following measures for the attainment of these objects:- 1.the constitution of a separate department of the administration for education; 2. The institution of universities at the Presidency towns; 3. The establishment of institutions for training teachers for all classes of schools; 4. The maintenance of the existing Government Colleges and High Schools and the increase of their number when necessary; 5. The establishment of new Middle schools; 6. Increased attention to vernacular schools, indigenous or others, for elementary education; and 7. The introduction of a system of

grants-in- aid. The attention of the Government was "specially directed to the importance of placing the means of acquiring useful and practical knowledge withing reacdhy of the great mass of the people. The English language is to be the medium of instruction in the higher branches, and the vernacular in the lower. English is to be taught wherever there is demand for it, but it is not to be substituted for the vernacular languages of the country."[४३]

सदर तरतुदींनुसार स्वतंत्र शिक्षण खात्याची निर्मिती करण्यात येऊन प्रादेशिक विभागातही प्रशासकीय मंडळांची स्थापना करण्यात आली होती. प्रत्येक प्रभागात संचालक, तपासनीस, उपतपासनीस यांची नियुक्ती करण्यात आली होती. इ.स.१८५७ मध्ये कलकत्ता, मुंबई, व मद्रास येथे उच्च शिक्षणासाठी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली होती. विद्यापीठांचा कारभार कुलगुरू, उपकुलगुरू व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केला होता. थोडक्यात वुडच्या खलित्याने लॉर्ड मेकॉलेचे शिक्षणातील 'पाझर सिद्धांत' कागदोपत्री कालबाह्य झाला होता. प्रत्यक्षात मात्र हा पाझर सिद्धांत बंद झाला नाही.

**५) हंटर कमिशन :** इ.स. १८५४ च्या चार्ल्स वुडच्या शैक्षणिक धोरणास आलेले यशापयश लक्षात घेऊन जनरल कौन्सिल ऑफ एज्युकेशन ऑफ इंडियाची भूमिका, भारतातील ख्रिश्चन मिशनऱ्यांचे विचार आणि शैक्षणिक धोरणाविरूद्ध आंदोलन करणाऱ्यांचे विचार तसेच शैक्षणिक धोरणावर पुनर्विचार करण्यासाठी हंटर आयोगाची निर्मिती करण्यात आलेली होती. या कमिशनलाच भारतातील पहिला शिक्षण आयोग असेही म्हणतात. या आयोगाचे अध्यक्ष गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळातील सभासद सर विल्यम हंटर हे होते म्हणून यास हंटर कमिशन असे म्हटले जाते. हंटर आयोगाविषयी येथे सविस्तर माहिती अभ्यासणे अभिप्रेत नाही. केवळ बिटिशांनी भारतात जे शैक्षणिक धोरण राबविले त्यानुसार त्याचा महाराष्ट्रातील शिक्षणावर काय प्रभाव पडला या दृष्टिकोनातूनच येथे विचार केलेला आहे. या आयोगाने प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, स्त्री शिक्षण, अल्पसंख्यांक शिक्षण व मागास जाती जमातींसाठींचे शिक्षण या बाबतीत धोरणात्मक बदल केल्याचे दिसते. या आयोगानुसार प्राथमिक शिक्षण वगळता माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या जबाबदारीतून सरकार बाहेर पडले व ती जबाबदारी सरकारने खाजगी संस्थांवर सोपवून त्यांना अनुदान देण्याची शिफारस केली.

याशिवाय सांस्कृतिक विविधता जोपासण्यासाठी, विविध विषयांवर पुस्तके तयार करून अभ्यासक्रमाची रचना करण्यासाठी प्रयत्न केले जावेत, मानव व नागरिकांची कर्तव्ये यासाठी स्वतंत्र प्राध्यापकांची नियुक्ती, तसेच कॉलेजच्या फी संबधी व हजेरी संबधी नियम व शिष्यवृत्तींसाठी अनुदानासंबधी नियम इत्यादी महत्त्वाच्या बाबींचा समावेश त्यात होता. "Some of its important recommendations were: 1. Withdrawal of State from direct management and support of institutions for higher education should be by slow and cautious steps; 2. Provision to be made for ordinary financial aid and special grants to Colleges; 3. "in order to encourage diversity of culture, both on the literary and on the physical side", there should be provision in all the larger colleges, Government and aided, "for more than one of the alternative courses laid down by the Universities"; 4. "an attempt to be made to prepare a moral text-book, based upon the fundamental principles of natural religion, such as may be taught in all Government and non-Government Colleges"; 5. "the principal or one of the Professors in each Government and aided college to deliver to each of the college classes in every session in all government and non-Government colleges a series of lectures on the duties of a man and a citizen". 6. Observance of certain general principles for college fees and exemption from these and attendance; 7. Framing new regulations for grant of scholarships."[४४] एकूणच विचार करता हंटर शिक्षण आयोगाच्या माध्यमातून ब्रिटिशांनी भारतीय शिक्षणासाठी एक कार्यक्रम आखण्याचा प्रयत्न केलेला होता. वास्तविक ब्रिटिशांनी ज्या महत्त्वाच्या उपाययोजना या कायद्याअंतर्गत केलेल्या होत्या त्या प्रामुख्याने भारतातील समाजसुधारकांनी शिक्षणाविषयी ज्या आपल्या प्रतिक्रिया दिलेल्या होत्या व सुधारणा सुचविलेल्या होत्या त्यावर अधारित होत्या. तथापि हंटर शिक्षण आयोगाने देखील शिक्षणातील विषमता दूर झाली नव्हती. विविध आयोगांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी भारतीयांसाठी शिक्षण सुरू केले होते असे दिसून येते. अर्थात या आयोगांनी केलेल्या शिफारशींमध्ये काही बाबी चांगल्या असल्या तरी काही दोषही त्यात होते.

ब्रिटिशांच्या महाराष्ट्रातील शैक्षणिक धोरणाविषयी विचार करता असे लक्षात येते की, समाजामध्ये शैक्षणिक जागृती होण्यास सुरूवात झालेली होती. अर्थात याचे कारण हे सुधारकांनी शिक्षणासाठी केलेले प्रयत्न हेच होते. महाराष्ट्रामध्ये व्हर्नाक्युलर शाळांच्या बाबतीत

अधिकाधिक प्रगती झाली. मुंबई प्रशासनाने देशीय शिक्षण पद्धतीची अंमलबजावणी केली. उच्च शिक्षणाच्या बाबतीत विचार करता मेडिकल इंजिनिअरिंग विज्ञान व कला या विद्याशाखांमध्ये महाविद्यालये स्थापन झाली होती. इ.स.१८४५ मध्ये ग्रँट मेडिकल कॉलेजची स्थापना करण्यात आली होती. इ.स.१८२४ मध्येच मुंबईत इंजिनिअरींग कॉलेजची स्थापना करण्यात आलेली होती, परंतु विद्यार्थी उपलब्ध होऊ शकले नाहीत म्हणून पुणा येथे इंजिनिअरिंगची स्कूलची स्थापना करण्यात आली. त्यातूनच पुढे इ.स. १८५४ मध्ये पुणा कॉलेज ऑफ सायन्सची स्थापना झाली. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करण्यासाठीही महाराष्ट्रात शाळा स्थापन झाल्या होत्या. ही शिक्षणातील वाढलेली आकडेवारी असली तरीही महाराष्ट्रातील लोकसंख्येचा विचार करता मात्र ही आकडेवारी समाधानकारक होती असे म्हणता येणार नाही. कारण इ.स.१९०१ च्या जनगणनेनुसार विचार केला तर भारतातील लिहिता वाचता येणाऱ्या पुरूषांचे प्रमाण दर हजारी ९८ होते तर स्त्रियांचे दर हजारी ७ एवढेच होते. एवढे मात्र नक्की पुरेशी शिक्षणाची व्यवस्था ब्रिटिशांनी निर्माण केली नसली तरीही भारतीय व महाराष्ट्रीयन शिक्षणास एक वेगळी प्रेरणा त्यातून मिळाली होती.

## २.५ महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळी निर्माण होण्यास प्रेरणादायी ठरलेले घटक

कोणत्याच समाजाची उन्नती किंवा परिवर्तन हे अचानक घडलेले नसते. कोणताही बदल, कोणतीही चळवळ टप्याटप्प्यांनीच होत असते. त्याला शिक्षणही अपवाद नाही. कालपर्यंत अगदीच अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेला समाज आज लगेच शिक्षणाच्या गोष्टी करून शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास अशी भाषा बोलणे कदापि शक्य नाही. महाराष्ट्रीयन समाज शैक्षणिक बाबतीत उन्नत झाला पाहिजे म्हणून त्याची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन लगेच समाजात शैक्षणिक विचार रूजविण्यास सुधारकांनी सुरूवात केली असे अचानक घडलेले नाही. कोणतीही चळवळ निर्माण होण्यास काही पोषक घटक कार्यरत असतात त्या घटकांच्या प्रेरणेतूनच एखाद्या चळवळीचा जन्म होत असतो. जेंव्हा हे प्रेरणादायी घटक इष्ट परिणाम घडवतील इतपत प्रभावी होतात तेंव्हापासून आपोआपच परिवर्तनास सुरूवात होते. निश्चितच शैक्षणिक चळवळ निर्माण होण्यासाठीही काही प्रेरणादायी घटक

कारणीभूत ठरलेले आहेत. समाजसुधारकांच्या शैक्षणिक विचारप्रवाहांचा अभ्यास करण्यापूर्वी शिक्षण प्रक्रियेत कोणकोणते घटक प्रेरणादायी ठरले त्यांचा अभ्यास करणेही आवश्यक ठरेल.

**१) एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन – ब्रिटिश आगमनाचा प्रभाव :** वैचारिक प्रबोधनाच्या बाबतीत एकोणिसावे शतक हे केवळ महाराष्ट्राच्याच बाबतीत नाही तर जगाच्या बाबतीत एक नव्या युगाची सुरूवात होती. या शतकात इंग्रजी साम्राज्याचा पाया पूर्ण भारतभर भक्कम झाला परंतु या ब्रिटिश सत्तेच्या पायाभरणीबरोबरच त्यांचे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, संस्कृती, धर्म, राजकारण, तत्त्वज्ञान, इतिहास, शास्त्रे, शिक्षण आणि कायदे इत्यादी अनेक बाबी भारतात आल्या. भारतीय लोक स्वतःची तुलना इंग्रजांशी करू लागले. इंग्रजांकडे असलेले ज्ञान व विज्ञान बघून ते भारावून गेले. आपल्याकडे असलेल्या मागसलेपणाची जाणीव त्यांना होऊ लागली. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात वैचारिक जागृती झाली. लोकांच्यात जागरूकता निर्माण झाली. इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीने प्रचंड असा पाश्चात्य ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाचा विस्फोट घडून आला व ब्रिटिशांच्या साम्राज्यामुळे सहाजिकच या विचार संस्कृतीचा प्रभाव भारतीयांवरही पडला.

ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण कारकून तयार करण्यासाठी होते हे जरी ठिक असले तरी त्यातून निश्चितच वैचारिक प्रबोधन घडून आले ज्यामुळे भारतात व महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांती घडून आली होती. धर्मप्रसार करणे, प्रशासनातील कारकून तयार करणे, पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव वाढविणे आणि पाश्चात्य वस्तूला गिऱ्हाईक तयार करणे या कुटनीतिने भारतात ब्रिटिश सरकारने पाश्चात्य शिक्षण सुरू केले. लॉर्ड मकॉले आणि चार्लस् वुड यांनी सुचविलेल्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी कंपनी सरकारने केल्यामुळे शिक्षण क्षेत्रात परिवर्तन झाले. त्यातून वैचारिक जागृती घडून आली. शिक्षण सर्व जातींसाठी खुले केले. यातून काही सुधारकांना आपल्या अधोगतीची कल्पना आली. ब्रिटिशांनी सुरू केलेले इंग्रजी शिक्षण भारतीयांसाठी जास्तीत जास्त प्रेरणादायी ठरले व भारतीयांत व महाराष्ट्रात जास्तीत जास्त बदल घडविणारी गोष्टही इंग्रजी शिक्षण हीच ठरली. “If we have to choose one single factor

which helped more than others in bringing about the great transformation in India in the nineteenth century, we can, without any hesitation, point to the introduction of English Education"[४५] याच इंग्रजी शिक्षणाने एकोणिसाव्या शतकात भारतात दर्शनीय बदल घडवून आणलेला होता.

भारतीयांसाठी इंग्रजी ही एक परकीय भाषा होती व ती शिकणे तितकेच त्रासदायक काम होते. तरीही इंग्रजी शिक्षणाचे प्रयोजन ब्रिटिशांनी भारतात केल्यामुळे पाश्चात्य ज्ञान घेऊन येणारे एक माध्यम भारतीयांसाठी खुले झाले होते. भारतात व महाराष्ट्रात जेवढे सुधारक होऊन गेले ते सर्वच पाश्चात्य ज्ञानाने भारावलेले होते. हे सुधारक जेवढे शिक्षित ब्रिटिशांच्या सानिध्यात गेले तेवढे त्यांना इंग्रजी व पाश्चात्य ज्ञानाचे महत्त्व कळाले. पाश्चात्य अभ्यासक्रमांच्या आधारे जागतिक इतिहास भारतीयांनी अभ्यासला. फ्रेंच राज्यक्रांतीची स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तीन तत्त्वेही भारतीयांपर्यंत येऊन पोहचली. प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिगत स्वातंत्र्य उपभोगण्याचा पुरेपूर अधिकार आहे व अशा व्यक्तिस्वातंत्र्यावर कोणी गदा आणत असेल तर त्या विरोधात संघर्ष करण्याचाही आपणास हक्क आहे असा विचार शिक्षणापासून वंचित असलेल्या भारतीयांच्या मनात निर्माण झाला. याचे सर्व श्रेय पाश्चात्य शिक्षणाला जाते. भारतीयांमध्ये उदारमतवाद पोहचविण्याचे कार्य पाश्चात्य शिक्षण व प्रबोधनाने केले. एकूणच पाश्चात्य ज्ञानाच्या प्रभावाने सुधारक मंडळींनी शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न केलेला होता.

**२) वृत्तपत्रांची कामगिरी:**वैचारिक प्रबोधन जितके महत्त्वाचे आहे तेवढेच महत्त्वाचे कार्य वृत्तपत्रांचे होते किंबहुना प्रबोधनाची पूर्ण वाटचालच वृत्तपत्रांच्या कामगिरीवर आधारभूत होती. संपूर्ण भारताच्या बाबतीत विचार केला तर अठराव्या शतकातच भारतात वृत्तपत्रांचा विकास सुरू झाला ही सर्व वृत्तपत्रे इंग्रजी भाषेत व इंग्रजांकडून काढली जात असत. तत्कालीन भारतीय समाजात वृत्तपत्रांचे कोणतेही महत्त्व नव्हते. कारण एक तर जी वृत्तपत्रे निघत ती इंग्रजी भाषेत निघत जी भारतीयांसाठी परकीय व कठीण भाषा होती व दुसरे म्हणजे ही वृत्तपत्रे अतिशय गुप्तपणे इंग्रजांच्या वसाहतीमधून केवळ इंग्रजांच्याच फायद्यासाठी

चालविले जात असत. कंपनीच्या खाजगी व्यापारातील दोष दूर करणे या हेतूने ईस्ट इंडिया कंपनीने येथे वर्तमानपत्रे सुरू केली. तथापि सतराव्या व अठराव्या शतकात वृत्तपत्रकारितेवर अनेक कारणांनी निर्बंध घालण्यात आलेले होते.

जेम्स ऑगस्टस हिकी याने 'बंगाल गॅझेट' हे पहिले वृत्तपत्र इ.स. १७८० मध्ये भारतात सुरू केले. त्यास हिकीज गॅझेट असेही म्हणतात. यानंतर संपूर्ण भारतात वेगवेगळया प्रांतात विविध वृत्तपत्रे सुरू झाली होती. विशेषतः चार्ल्स मटकाफ या गव्हर्नर जनरलच्या काळात वृत्तपत्रांचा विकास अधिक झालेला होता. सन १८३५ मध्ये सर चार्ल्स मेटकाफ याने आपल्या गव्हर्नर जनरलपदाच्या हंगामी कारकीर्दीत वृत्तपत्रांना स्वातंत्र्य बहाल करून त्यांच्या प्रसाराचा आणि विकासाचा मार्ग मोकळा करून दिला.[४६] त्यामुळे प्रचंड प्रमाणात वृत्तपत्रांचा विकास आणि प्रसार भारतात सुरू झाला. इंग्रजी भाषेबरोबरच देशीय भाषेतही वृत्तपत्रे निर्माण होण्यास सुरूवात झाली. सदर वृत्तपत्रांमधून तत्कालीन भारतीयांची परिस्थिती, त्यांची होत असलेली पिळवणूक, त्यांच्यातील मागसलेपणा, मागासलेले असण्या पाठीमागची कारणे, शिक्षणाची भारतात झालेली अनास्था, त्यासाठी आवश्यक प्रयत्न या सर्व बाबींचे सद्यचित्रण देशीय वृत्तपत्रांतून करण्यास सुरूवात झाली. जे लोक हे वृत्तपत्र वाचत त्यांना शिक्षणाची अधिकाधिक आवश्यकता वाटू लागली. सुरूवातीच्या काळात वाचक वर्ग कमी होता परंतु हळूहळू वाचक वर्ग प्रचंड प्रमाणात वाढत गेला. प्रबोधनाचे शतक हे एकोणिसावेच का ठरले त्याचे महत्त्वाचे कारण वृत्तपत्रांचा झालेला विकास हेही सांगता येईल.

वृत्तपत्र प्रचार आणि प्रसार बंगाल पाठोपाठ महाराष्ट्रातही मोठया प्रमाणात घडून आला. महाराष्ट्रातही विविध भाषांमधून वृत्तपत्रे निघू लागली. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी "दर्पण" हे मराठी भाषेतील पहिले पाक्षिक वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राचा हेतूच मुळात शिक्षणाचा प्रसार करणे हा होता. या अनुषंगाने दर्पण या वृत्तपत्राविषयी मराठी वृत्तपत्रांचा इतिहास या ग्रंथात लिहिलेले आढळते की, "नव्या ज्ञानाचा, पाश्चात्य विद्यांचा लोकांना परिचय व्हावा. त्यांचा अभ्यास व्हावा व त्या द्वारा देशाची समृद्धी व लोकांचे कल्याण

साधावे अशा हेतूने या वृत्तपत्रांचा प्रपंच मांडण्यात आला होता."[४७] दर्पण पाठोपाठ आचार्य जांभेकरांनी १८४० मध्ये "दिग्दर्शन" हे मासिक सुरू केले होते. तद्नंतर अनेक वर्तमानपत्रे महाराष्ट्रात सुरू झाली यामध्ये मुंबई अखबार, प्रभाकर, ज्ञानसिंधू, ज्ञानप्रकाश, विचारलहरी, वर्तमानदीपिका, धुमकेतू, इंदूप्रकाश, दीनबंधू, केसरी व मराठा, या वृत्तपत्रांचा समावेश होता. या वृत्तपत्रांच्या माध्यमातून केवळ चालू घडामोडीच लोकांच्या पुढे आल्या नाहीत तर त्यातून शिक्षणाची गरज महाराष्ट्रीयन जनतेच्या लक्षात आली.

**३) साहित्य निर्मितीचा प्रभाव :** ब्रिटिशांच्या भारतातील आगमनानंतर भारतात मुद्रण कलेचा विकास अधिकाधिक होत गेला. लोकजागृती व लोकशिक्षणाच्या साधनात साहित्य निर्मिती हे एक महत्त्वाचे साधन आहे. ग्रंथनिर्मितीची कला भारतात व महाराष्ट्रात ब्रिटिशांनीच विकसित केली. खिश्चन धर्माचा प्रसार करण्याच्या हेतूने भारतात आलेल्या खिश्चन मिशनऱ्यांनी सर्व मार्गांनी धर्म प्रसार करण्याचा प्रयत्न केला. ख्रिश्चन धर्माचे तत्त्वज्ञान बायबल हे इंग्रजी भाषेत होते व ते सर्वसामान्य भारतीय जनतेला आकलनापलीकडचे होते यासाठी मिशनऱ्यांनी स्थानिक भारतीय भाषांतून बायबलचे भाषांतर करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात मराठी भाषेत बायबलचे प्रकाशन करण्यात आले. धर्मप्रसार करण्याच्या दृष्टीने त्यांनी छापखाने सुरू केलेले होते. यातून स्थानिक साहित्यिकांना विविध ग्रंथ लिखाणाची प्रेरणा मिळालेली होती.

साहित्याच्या बाबतीत एकोणिसावे शतक हे महाराष्ट्राला मध्ययुगातून आधुनिक युगात नेणारे ठरले. एकोणिसाव्या शतकात जे साहित्य निर्माण झाले त्या साहित्याने माणसांच्या समस्या दुःख यांचे प्रदर्शन केलेले दिसते. महाराष्ट्राला संत मंडळीची थोर अशी परंपरा आहे. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांपासून संत मंडळींचे पचंड व प्रगल्भ असे वाङमय अभ्यासासाठी उपलब्ध आहे. एकोणिसाव्या शतकानंतर सर्वसामान्य 'माणूस' डोळयामोर ठेवून साहित्य लिखाणास सुरूवात झाली. येथे साहित्य हा शब्द केवळ कथा, कादंबरी, कविता, नाटके एवढयाच पुरता मर्यादित राहिला नाही तर या कालखंडात ज्या ज्या प्रकारचे लिखाण झाले व त्याचे प्रकाशन झाले या सर्वांचा समावेश यामध्ये आहे. या काळात कथा कादंबऱ्यांमधील

अद्‌भुतरम्यता जाऊन त्यात वास्तवाचे दर्शन होण्यास सुरूवात झाली. साहित्यातील निबंध प्रकार एकोणिसाव्या शतकात विशेष प्रसिद्ध ठरला. विविध विचारवंतांनी समाजाशी निगडित असा विषय निवडून निबंधाच्या माध्यमातून आपले समाज सुधारणेचे विचार स्पष्ट करण्यास सुरूवात केली होती.[४८] भाऊ महाजन यांच्या प्रभाकर या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली लोकहितवादींची शतपत्रे अशाच प्रकारच्या निबंधाचे उदाहरण आहे. लोकहितवादींशिवाय गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक यांनी निबंध व अग्रलेखांच्या माध्यमातून समाजात जागृती घडवण्याचा प्रयत्न केला होता. निबंध लिखाणाच्या माध्यमातून समाजाच्या दुर्गुणांवर टीका करणे लेखकांसाठी सोपे जात होते. निबंधाशिवाय कथा, कादंबरी नाटके व कवितांच्या माध्यमातून देखील शिक्षण चळवळीस उद्‌बोधक ठरेल असे लिखाण घडून येत होते. बाबा पद्‌मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीतून स्त्री जीवनाच्या हालाखीचे वास्तव चित्रण दाखविले गेले.[४९] त्याचबरोबर महात्मा फुले यांच्या विविध ग्रंथांतूनही समाजाचे वास्तव समाजासमोर मांडण्यात आलेले होते. त्यामुळे या लिखाणाच्या माध्यमातून समाजात आपली शिक्षणा अभावी काय अवस्था झाली याविषयी जागृती निर्माण होत होती. थोडक्यात एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारकांमध्ये समाज सुधारणेमधील महत्त्वाचे साधन हे 'साहित्य' होते. त्यातून महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळी निर्माण होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले.

एकूणच या सर्व मुद्यांमधून एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती कशी होती याचा बोध होतो. त्याचबरोबर ब्रिटिशांनी महाराष्ट्रात राबविलेले शैक्षणिक धोरण कशा स्वरूपाचे होते हे समजते. या सर्व परिस्थितीच्या अभ्यासावरून या काळातील विविध समाज सुधारकांनी जे शैक्षणिक कार्य केले व आपले शैक्षणिक विचार मांडले ते किती समर्पक व व्यापक स्वरूपाचे होते हे समजते. आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा जोतिबा फुले, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, लोकमान्य टिळक, छत्रपती राजर्षी शाहू महाराज व महर्षी धोंडो केशव कर्वे या सर्व सुधारकांच्या शैक्षणिक विचारांतून तत्कालीन समाजात शिक्षणात किती अधोगती होती व शिक्षण विकासासाठी काय करायला हवे या बाबी स्पष्टपणे दिसून येतात.

## २.६ संदर्भ


१. कुंडले म.बा.: 'शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, दहावी आवृत्ती २००३, पृ.क्र.७, ८.

२. शेवाळकर राम (संपा): 'विनोबा शिक्षण विचार', परंधाम प्रकाशन, पवनार, पहिली आवृत्ती १९७७, पृ.क्र. ३६.

३. कित्ता, पृ.क्र. १७,१८.

४. Swami Vivekananda: 'My India, The India Eternal', published by The Ramkrishna Mission Institute of Culture, Kolkata, third reprint – 1997, P.N.- 54.

५. डॉ.कायंदेपाटील गंगाधर :'भारतीय शिक्षण इतिहास आणि समस्या', चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, प्र.आ. २००८ पृ.क्र. १.४.

६. कित्ता, पृ.क्र. १.४.

७. कुंडले म.बा.: 'शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, दहावी आवृत्ती २००३, पृ.क्र.५८०.

८. Swami Vivekananda: 'My India, The India Eternal', published by The Ramkrishna Mission Institute of Culture, Kolkata, third reprint – 1997, P.N.- 54

९. प्रा.पवार ना.ग.:'शिक्षण क्षेत्रातील विचारवंत', नित्य नुतन प्रकाशन, दु.आ.२००७, पृ.क्र. १५७.

१०. कित्ता, पृ.क्र. ९७.

११. कित्ता, पृ.क्र. ५३.

१२. कुंडले म.बा.: 'शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, दहावी आवृत्ती २००३, पृ.क्र.५००.

१३. कित्ता, पृ.क्र.५२६.

१४. WWW.Wikipedia.org.in , the free encyclopedia/Dewey John, Democracy and Education – An introduction to the philosophy of education Chapt. I

१५. डॉ.सहस्त्रबुद्धे पु.ग.:'महाराष्ट्र संस्कृती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ.आ. २००३ पृ.क्र.१८१.

१६. कित्ता, पृ.क्र.१८४.

१७. भोळे भास्कर लक्ष्मण: ‘महात्मा जोतीराव फुले- वारसा आणि वसा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, ति.आ. २००७ पृ.क्र. १५.

१८. आत्रे त्रिंबक नारायण : ‘गाव- गाडा’, वरदा प्रकाशन, पुणे, दु.आ.१९६१, पृ.क्र.१५

१९. कित्ता, पृ.क्र. १५.

२०. कित्ता, पृ.क्र. १५,१६.

२१. डॉ. खांदवे भाऊसाहेब : ‘दीनबंधू कृष्णराव भालेकर’, गाज प्रकाशन, अहमदनगर, प्र.आ. मार्च २०००, पृ.क्र. ३.

२२. आत्रे त्रिंबक नारायण:‘गाव- गाडा’, वरदा प्रकाशन, पुणे, दु.आ.१९६१, पृ.क्र. १८३

२३. डॉ. खांदवे भाऊसाहेब : ‘दीनबंधू कृष्णराव भालेकर’, गाज प्रकाशन, अहमदनगर, प्र.आ. मार्च २०००, पृ.क्र. ५.

२४. डॉ.सहस्त्रबुद्धे पु.ग.:‘महाराष्ट्र संस्कृती’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ.आ.२००३ पृ.क्र.६३०.

२५. बापट विष्णुशास्त्री वामन, (अनुवादक) : ‘सार्थ श्रीमनुस्मृति’, राजेश प्रकाशन, पुणे, पृ.क्र.२४, २५.

२६. डॉ.सहस्त्रबुद्धे पु.ग.:‘महाराष्ट्र संस्कृती’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ.आ.२००३ पृ.क्र.१९९.

२७. डॉ.पांढरे नीला : ‘महाराष्ट्रातील स्त्री सुधारक’, उन्मेष प्रकाशन पुणे, प्र.आ. २००९, पृ.क्र. ३४.

२८. डॉ.सहस्त्रबुद्धे पु.ग.:‘महाराष्ट्र संस्कृती’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ.आ.२००३ पृ.क्र.६३७.

२९. डॉ.कांयदेपाटील गंगाधर : भारतीय शिक्षण इतिहास आणि समस्या, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, प्र.आ.२००८, पृ.क्र. ७.१.

३०. लेले रा.के. : ‘मराठी वृत्तपत्रांचा इतिहास’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, दु.आ. २००४, पृ.क्र ५२.

३१. टिळक ज.श्री.(प्रका.) : 'समग्र लोकमान्य टिळक- समाज व संस्कृती खंड ३', केसरी प्रकाशन पुणे, प्र.आ. १९७६, पृ.क्र. १२८, १२९.
३२. डॉ.शेलार सुधाकर : 'एकोणिसावे शतक:सुधारणावाद व मराठी साहित्य', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.जुलै २००८, पृ.क्र. ९२.
३३. वाळिंबे रामचंद्र शंकर : 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना भाग १', प्रतिभा प्रकाशन व मुद्रणालय पुणे, प्र. आ. १९६२, पृ.क्र. १४४.
३४. कित्ता, पृ.क्र. १४२,१४३.
३५. कित्ता, पृ.क्र. ३.
३६. कित्ता, पृ.क्र. ९७.
३७. WWW.Wikipedia.org.in , the free encyclopedia
३८. Majumdar R.C.(Editor): 'British paramountacy and Indian Renaissance', Part- II, Bhartiya Vidya Bhavan, Bombay, First Published in 1965, page No 44,45.
३९. कित्ता, पृ.क्र. ४७.
४०. कित्ता, पृ.क्र. ४६.
४१. अकोलकर ग.वि.(अनुवादक): 'गांधी विचार दर्शन, खंड ११: शिक्षण विचार', महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे, प्र. आ.१९६२, पृ.क्र. ७.
४२. डॉ.कायंदे पाटील गंगाधर: 'भारतीय शिक्षण इतिहास आणि समस्या', चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, प्र.आ. २००८ पृ.क्र. ७.१२.
४३. Majumdar R.C.(Editor): 'British paramountacy and Indian Renaissance', Part- II, Bhartiya Vidya Bhavan, Bombay, First Published in 1965, page No 50.
४४. कित्ता, पृ.क्र. ५४.
४५. कित्ता, पृ.क्र. ३१.
४६. लेले रा.के.:'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, दु.आ. २००४, पृ.क्र ३८.
४७. कित्ता, पृ.क्र. ६१.
४८. डॉ.शेलार सुधाकर : 'एकोणिसावे शतक-सुधारणावाद व मराठी साहित्य', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.जुलै २००८, पृ.क्र. १३३.
४९. कित्ता, पृ.क्र. १३४.

**प्रकरण तिसरे**

# आचार्य बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर व लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांचे शैक्षणिक विचार

## ३.१ आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे शैक्षणिक विचार

३.१.१ एकोणिसाव्या शतकातील प्रारंभीचे सुधारक जगन्नाथ शंकरशेठ यांचे शैक्षणिक विचार

३.१.२ बाळशास्त्री जांभेकरांचा अल्पपरिचय

३.१.३ बाळशास्त्री जांभेकरांचे शैक्षणिक कार्य

३.१.४ बाळशास्त्री जांभेकर यांचे शैक्षणिक विचार

१) वृत्तपत्रांच्या माध्यमातून शिक्षणविषयक विचारांचा प्रसार

२) बाळशास्त्री जांभेकर यांचा विद्या किंवा ज्ञानविषयक दृष्टिकोन

३) भारतीय शिक्षणद्धती व पाश्चात्य शिक्षणपद्धतीविषयक विचार

४) शिक्षणातील उदासीनता व त्यामुळे समाजाची झालेली अधोगती

५) शिक्षणामध्ये इंग्रजी भाषा व मातृभाषेचे महत्त्व

६) बाळशास्त्री जांभेकरांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

७) बाळशास्त्रींचे गुरू किंवा शिक्षकविषयक विचार

८) ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणाविषयी बाळशास्त्री जांभेकरांचे विचार

## ३.२ लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचे शैक्षणिक विचार

३.२.१ लोकहितवादी यांचा अल्पपरिचय

३.२.२ लोकहितवादींचे शैक्षाणिक कार्य

३.२.३ लोकहितवादींचे शैक्षणिक विचार

१) शिक्षणाअभावी समाजाची अवस्था

२) वृत्तपत्रांच्या माध्यमातून शैक्षणिक विचारांचा प्रसार

३) लोकहितवादींच्या दृष्टिकोनातून इंग्रजी शिक्षण व भौतिक विद्येचे महत्त्व

४) लोकहितवादींचे स्त्री शिक्षणविषयक विचार

५) लोकहितवादींचा व्यवसाय शिक्षणविषयक दृष्टिकोन

६) तत्कालीन पंतोजी व शिक्षकविषयक लोकहितवादींचा दृष्टिकोन

७) लोकहितवादींचा विद्वानविषयक दृष्टिकोन

८) नाद विद्या किंवा संगीत विद्येविषयी लोकहितवादींचा दृष्टिकोन

९) लोकहितवादींचा ग्रंथ व ग्रंथालयविषयक दृष्टिकोन

## ३.३ संदर्भ

## प्रकरण तिसरे

# आचार्य बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर व लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांचे शैक्षणिक विचार

## ३.१ आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे शैक्षणिक विचार

### ३.१.१ एकोणिसाव्या शतकातील प्रारंभीचे सुधारक जगन्नाथ शंकरशेठ यांचे शैक्षणिक विचार

प्रस्तुत शोध प्रबंधात आचार्य बाळशास्त्री जांभेकरांपासूनच्या निवडक समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार अभ्यासण्याचा उद्देश आहे. तथापि एकोणिसाव्या शतकातील अगदीच प्रारंभीच्या काळातील समाजसुधारक जगन्नाथ शंकरशेठ उर्फ नाना शंकरशेठ यांच्या शिक्षणविषयक विचारांचा अल्प परिचय करून घेणे याठिकाणी महत्त्वाचे आहे कारण बाळशास्त्री जांभेकरांनी ज्या कालखंडात आपली शैक्षणिक कामगिरी केली त्याच दरम्यानच्या काळात नाना शंकरशेठ यांचे शिक्षण क्षेत्रात मोलाचे कार्य चालू होते. एकोणिसाव्या शतकाच्या अगदीच सुरूवातीला म्हणजेच दि.१० फेब्रुवारी १८०३ रोजी नाना शंकरशेठ यांचा जन्म झाला होता. या अनुषंगाने विचार करता समाज सुधारकांच्या यादीमध्ये त्यांचा प्रथम क्रमांक लागतो हे निःसंशय आहे. स्वतः ते एक व्यापारी व श्रीमंत कुटुंबातील असूनही त्यांनी आपल्या श्रीमंतीचा उपयोग स्वार्थ साधण्यासाठी न करता समाज उद्धारासाठी केलेला होता. नाना शंकरशेठ यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेचा पाया रोवला गेला. अशा परिस्थितीत महाराष्ट्रीयन जनतेला काय आवश्यक होते याचा विचार करून नाना शंकरशेठ यांनी इंग्रज सरकार व महाराष्ट्रीयन समाज यांच्या दरम्यान एक मध्यस्थाची भूमिका पार पाडल्याचे दिसून येते.

नाना शंकरशेठ यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखलेले होते. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्रात नव्याने स्थापन झालेल्या ब्रिटिश सरकारकडून शैक्षणिक विकासाच्या सोयी मुंबई प्रांतात करून

घेण्याचा कसोशीने प्रयत्न केला होता. मुंबई प्रांताचा पहिला गव्हर्नर म्हणून माऊंट स्टुअर्ट एलफिस्टन याच्या माध्यमातून त्यांनी शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यावेळी ब्रिटिशांची सत्ता नुकतीच प्रस्थापित झालेली असल्याने ब्रिटिशांनाही एतद्देशीय कारकूनांची आवश्यकता होती. त्याचबरोबर स्थानिक जनतेसाठी शिक्षणासारख्या सोयी देणे ब्रिटिशांना आवश्यक वाटत होते. या अनुषांगाने स्थानिक जनतेचा विचार करून एलफिस्टनने 'दि नेटीव्ह स्कूल ॲण्ड स्कूल बुक कमिटी' या संस्थेची स्थापना केली होती. नाना शंकरशेठ व त्यांच्या समकालीन इतर पुढाऱ्यांच्या पुढाकाराने एलफिस्टनने नेटिव्हांसाठी शाळा स्थापण्यास सुरूवात केली होती.

नाना शंकरशेठ यांनी एलफिस्टनकडे महाराष्ट्रीयन जनतेला कोणत्या प्रकारची शिक्षण व्यवस्था असावी याविषयी माहिती दिलेली होती. सन १८२१ मध्ये गव्हर्नर एल्फिन्स्टनतर्फे मुंबईतील शेट-सावकारांची सभा बोलावली गेली. त्यात नाना शंकरशेठ यांनाही बोलविण्यात आलेले होते. इंग्रजी विद्येचे व भाषेचे, युरोपखंडातील आधुनिक विद्यांचे ज्ञान देणारे, निधर्मी, संस्कृत, मराठी, गुजराती, उर्दू इत्यादी एतद्देशीय भाषातून वरील ज्ञान देणारे विद्यालय, सरकार नात्याने मुंबईत स्थापावे हा विचार मांडून त्यासाठी सरकारला मदत करण्याचे अवाहन केले.[१] त्यांच्या या मागणीनुसार इ.सन १८२२ मध्ये 'दि बाम्बे नेटिव्ह स्कूल ॲण्ड स्कूल सोसायटी'ची स्थापना करण्यात आली होती. या संस्थांच्या स्थापनेपासून खऱ्या अर्थाने महाराष्ट्रीयन जनतेच्या शिक्षणाची प्रवेशद्वारे खुली झाली. नाना शंकरशेठ यांच्या पुढाकारानेच पुढे इ.सन १८२७ मध्ये सोसायटीमार्फत 'एलफिस्टन कॉलेज'ची स्थापना करण्यात आलेली होती. याच कॉलेजमध्ये पुढे बाळशास्त्री जांभेकरांनी प्रोफेसर म्हणून कार्य केलेले होते. इ.सन १८४१ मध्ये 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' हे स्वतंत्र मंडळ शिक्षण चालविण्यासाठी स्थापन करण्यात आले होते. या मंडळाचे नाना शंकरशेठ स्वतः सभासद होते. याशिवाय त्यांनी स्वतः शास्त्रीय ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार व्हावा या दृष्टिकोनातून 'स्टुडंट्स लिटररी ॲण्ड सायंटीफिक सोसायटी'ची स्थापना केलेली होती. नाना शंकरशेठ यांनी उच्च शिक्षणाच्या प्रसाराकडेही विशेष लक्ष पुरविलेले होते. त्यांनी मुंबई विद्यापीठ, वैद्यकीय ज्ञानाचा विकास होण्यासाठी ग्रँट मेडिकल

कॉलेज, एलफिस्टन कॉलेजमध्ये कायदे शिक्षण देणारे वर्ग, कला महाविद्यालय यासारख्या उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या स्थापनेत पुढाकार घेतलेला होता. त्यांनी विविध संस्थांना मोठया प्रमाणात आर्थिक मदत दिली त्याच बरोबर खासगी शाळा स्थापन करण्यासही त्यांनी प्रेरणा दिलेली होती.

नाना शंकरशेठ यांनी शैक्षणिक सुधारणांविषयी जे अवाहन ब्रिटिश सरकारला केले होते. त्यावरून त्यांच्या शिक्षण विचारांची प्रगल्भता व त्यांची शिक्षणाविषयी असलेली दूरदृष्टी दिसून येते. त्यांनी मांडलेल्या या शिक्षण विचारांचा बाळशास्त्री जांभेकरांच्या शिक्षणविचारांवर प्रभाव पडलेला दिसून येतो. नाना शंकरशेठ यांना ब्रिटिशांनी भारतीयांसाठी आधुनिक पद्धतीच्या शिक्षणाचा स्वीकार करावा असे वाटत होते. भारतीयांची जी परंपरावादी पोथ्या-पुराणांवर अधारित शिक्षण पद्धती होती ती आधुनिक काळात उपयुक्त ठरणारी नाही हे त्यांनी ओळखलेले होते. आधुनिक काळात ज्ञानाच्या कक्षा रूंदावलेल्या होत्या. त्यांनी शास्त्रीय स्वरूपाचे ज्ञान, जे शाश्वत, चिरंतन व विकासाभिमुख असते अशा ज्ञानाचा पुरस्कार केलेला होता असे त्यांच्या शिक्षण विचारांवरून दिसून येते. अर्थात भारतीयांना शिक्षण देतांना आधुनिक ज्ञानाच्या काही मर्यादाही त्यांनी ओळखल्या होत्या. त्यांच्या मते युरोपियनांचे पाश्चात्य किंवा आधुनिक ज्ञान हे इंग्रजी भाषेत होते. इंग्रजी भाषा ही सर्वसामान्यांची भाषा असू शकत नाही. त्यामुळे हे शिक्षण केवळ ठराविक लोकांपुरतेच मर्यादित असणार होते. याच दृष्टिकोनातून त्यांनी इंग्रजीमधील पुस्तकांचे भाषांतरे करण्याचा आग्रह धरलेला होता. याशिवाय इंग्रजी भाषेबरोबरच स्थानिक भाषेतून शिक्षणाची सुविधा असावी असाही विचार नाना शंकरशेठ यांनी मांडलेला होता. त्यांनी 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' समोर जे निवेदन सादर केले होते त्यातही यासंबधी आपले विचार मांडले होते. आपल्या निवेदनात त्यांनी लिहिले होते की, "पश्चिम हिंदुस्थानातील जनतेत उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने मातृभाषेचे माध्यम हे इंग्रजी भाषेच्या माध्यमापेक्षा केंव्हाही श्रेष्ठ असे आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. त्या बाबतीत माझ्या मनात यत्किंचितही संशयास जागा नाही."[२] एकूणच असे लक्षात येते की,

मातृभाषेतूनच खरी शिक्षणाची गोडी मुलांना लागू शकते. त्यामुळे मातृभाषा हे शिक्षणाचे योग्य माध्यम आहे असे त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते.

नाना शंकरशेठ यांनी स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केलेला होता. एकोणिसाव्या शतकाचा विचार करता स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे ते पहिले सुधारक म्हणावे लागतील. पुण्यामध्ये महात्मा फुले यांनी जी स्त्री शिक्षणाची चळवळ उभारली होती तशाच प्रकारची स्त्री शिक्षणाची चळवळ नाना शंकरशेठ यांनी 'स्टुडंट लिटररी सोसायटी'च्या माध्यमातून मुंबईमध्ये उभारली होती. तत्कालीन समाजाने स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे बंद केलेले होते ते खुले करण्याचा प्रयत्न नाना शंकरशेठ यांनी केलेला होता. तत्कालीन समाजाचा विचार करता स्त्रियांना लिहिणे, वाचन करणे, शिवण काम करणे, कशिदाकाम करणे त्याच बरोबर विविध विषयांचे ज्ञान देणे आवश्यक होते असे त्यांच्या विचारांतून दिसून येते. स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी स्त्रियांच्या शाळा स्थापण्यास प्रोत्साहन दिलेले होते. त्याच बरोबर स्वतःच्या वाडया जवळील जागा मुलींच्या शाळेसाठी दिलेली होती. त्यांच्या या औदार्यामुळे या शाळेचे नाव 'ना.जगन्नाथ शंकरशेठ मुलींची मराठी शाळा' असे ठेवण्यात आलेले होते.

तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास नाना शंकरशेठ यांनी केलेला होता. त्यामुळे या समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असा ठाम विश्वास त्यांचा होता. ब्रिटिशांनी स्वार्थापोटी का होईना स्थानिक जनतेसाठी शिक्षण सुरू केले होते परंतु त्यांच्या शिक्षणातील 'धर्मप्रसार' हा खूप मोठा अडसर होता. मिशनरी शाळांचे धर्मप्रसारावर अधारित शैक्षणिक धोरण त्यांना मान्य नव्हते. त्यांच्या मते मिशनरी शाळा या शैक्षणिक विकासाच्या नावाखाली जे धार्मिक शिक्षण देतात त्यामुळे शिक्षण विकासास कदापि प्रोत्साहन मिळू शकत नाही. मुळात शिक्षण ही धर्माधिष्ठित प्रक्रिया असू शकत नाही असे त्यांच्या विचारातून दिसून येते. त्या दरम्यानच्या काळात काही सरकारी शाळांच्या अभ्यासक्रमांमधूनही धार्मिक शिक्षणाचा प्रसार केला जात होता. या अनुषंगाने ब्रिटिश सरकारकडे एक निवेदन पाठविण्यात आलेले होते. या निवेदनावर नाना शंकरशेठ व त्याचे सहकारी अशा एक हजारांच्यावर नागरिकांच्या सह्या घेण्यात आलेल्या होत्या. या निवेदनात शिक्षण हे निधर्मी असावे असे मत मांडण्यात

आलेले होते. त्यात लिहिले होते की, "१८२३-३४ मध्ये 'नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची (हिंद शाळा व पाठय पुस्तक मंडळीची) स्थापना झाली, तेंव्हापासून या प्रांतामध्ये शिक्षणप्रसार करत असताना स्थानिकांबाबत धार्मिक बाबतीमध्ये तटस्थतेचे धोरण स्वीकारण्याच्या तत्त्वाला सरकार बांधील आहे. तसेच आपल्या अधिकाराखालच्या शिक्षणसंस्थांमधून धर्मासंबधी पुस्तके वापरायची नाहीत आणि धार्मिक शिक्षण द्यायचे नाही, हे सरकारचे आजवरचे धोरण आहे. 'नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या घटनेत एतद्देशीयांच्या धार्मिक भावनांना जरूर तो मान देण्यासंबधी एक कलम असून त्याला सरकारकडून मान्यता देण्यात आली आहे. सरकार धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करणार नाही, या उद्दिष्टांचा समावेश असल्यामुळे 'एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन' ही शिक्षणसंस्था 'नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'ला १८४० मध्ये जोडली गेली. तिचे आरंभापासून धार्मिक अलिप्तता हेच मूलभूत तत्त्व आहे. इतर सरकारी शिक्षण संस्थांनाही हेच नियम बंधनकारक करण्यात आले आहेत; परंतु अलीकडे या नियमाचे उल्लंघन होत आहे, ही गोष्ट आम्ही सरकारच्या नजरेस आणू इच्छितो."[३] यावरून स्पष्ट लक्षात येते की, त्यांच्या दृष्टिकोनातून शिक्षण हे निधर्मी पद्धतीचे असावे. तत्कालीन कालखंडात अनेक पालक धर्म शिक्षणाच्या नावाखाली आपली मुले शाळातून काढून घ्यायची. असे होऊ नये यासाठी त्यांनी निधर्मी शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येतो.

एकूणच या सर्व परिस्थितीचा विचार करता नाना शंकरशेठ हे एक दूरदृष्टी असलेले सुधारक होते ज्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखलेले होते. आपल्या शिक्षण विचारांच्या माध्यमातून आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार करून समाजातील अज्ञान, अपप्रवृत्ती, रूढीपरंपरा, अंधश्रद्धा समाजातून कशा जातील यांचा विचार नाना शंकरशेठ यांनी केल्याचे दिसून येते. जांभेकरांना नाना शंकरशेठ यांच्या समकालात आपले जीवन शिक्षणकार्यासाठी वाहून घेता आले. नाना शंकरशेठ यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' व 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'च्या माध्यमातून बाळशास्त्रींनी आपले शैक्षणिक कार्य अखेर पर्यंत चालू ठेवलेले होते.

## ३.१.२ बाळशास्त्री जांभेकरांचा अल्पपरिचय

बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म इ.स. १८१२ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील पोंबुर्ले या गावी झालेला होता. त्यांनी स्वतःच्या गावी संकृत मध्ये प्राथमिक शिक्षण पूर्ण केले व इ.सन १८२५ मध्ये ते पुढील विद्याभ्यासासाठी सदाशिव काशिनाथ उर्फ बापू छत्रे यांच्या घरी मुंबईला आले होते. बाळशास्त्री हे संस्कृतमध्ये प्रख्यात असल्याने त्यांना मुंबईत बापू छत्रेंच्या घरी पुढील शिक्षणासाठी आश्रय मिळाला होता. बापू छत्रे यांनी आपल्या मुलांबरोबरच बाळशास्त्रींची शिक्षणासाठी उत्तम सोय केली. त्यांनी संस्कृत बरोबरच इंग्रजी, गणित व इतर शास्त्रांमध्ये प्रचंड प्रगती केली.[४]

शिक्षण संपल्याबरोबर त्यांच्या शैक्षणिक कार्यास सुरूवात झाली. आपल्या चौतीस वर्षाच्या छोटयाशा आयुष्यामध्ये त्यांनी ब्रिटिश प्रशासनात विविध पदांवर नोकरी केली होती. हैंद शाळा पुस्तक मंडळीचे नेटिव्ह सेक्रेटरी, बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीत नेटिव्ह सेक्रेटरी, शिक्षक, प्राध्यापक, शाळा तपासनीस, ट्रेनिंग स्कूलचे संचालक अशा विविध पदांवर त्यांनी नोकरी केली होती. त्यांनी मोडी व बालबोध या लिप्यांचाही अभ्यास केलेला होता. तसेच अनेक ग्रंथांचे लेखन केलेले होते. एज्युकेशन सोसायटीमार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध शाळांतील अभ्यासक्रम तयार करण्याचे तसेच काही पुस्तकांचे मराठीत भाषांतर करण्याचे काम बाळशास्त्री जांभेकर यांनी केलेले होते. मुळात ते स्वतः एक बहुभाषिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलगू, फारशी, फ्रेंच, लॅटिन, व ग्रीक या भाषांचे ज्ञान संपादित केलेले होते. त्यांनी 'दर्पण' व 'दिग्दर्शन' ही दोन मराठी वृत्तपत्रे सुरू केली होती. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना मराठी वृत्तपत्राचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांनी धर्मशुद्धीकरणासही चालना दिलेली होती. शिक्षण खात्यात विविध भूमिका सांभाळणाऱ्या बाळशास्त्रींना आयुष्य मात्र खूप कमी लाभले. इ.सन १८४६ मध्ये तापाच्या आजाराने त्यांचे निधन झाले होते.

वास्तविक बाळशास्त्री यांना केवळ ३४ वर्षांचेच आयुष्य लाभले परंतु त्यांचे आयुष्य व त्यांनी केलेले कार्य यांचा विचार करता प्रचंड मोठे कार्य त्यांनी आपल्या मृत्यू पश्चात समाजासाठी उभे केलेले होते. "इंग्रजी राजवटीच्या प्रारंभीच्या काळात अनेक अडचणींवर मात करून त्यांनी समाज सुधारणेची चौफेर कामगिरी केली. एका बाजूने शासनाला व दुसऱ्या बाजूने समाजाला जागृत करण्याचे कार्य त्यांनी अखंडपणे केले. त्यामुळे जांभेकरांना सरकारदरबारी व जनमानसात मोठा सन्मान मिळाला. महाराष्ट्राच्या समाजाला आधुनिक वळण लावण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले."[५] ब्रिटिशांनीही त्यांच्यातील गुण ओळखून त्यांची विविध पदांवर नियुक्ती केलेले होती. 'जस्टिस ऑफ दि पीस' हा किताब ब्रिटिशांकडून खूप थोडया श्रीमंत व प्रतिष्ठित भारतीयांनाच दिला जाई. जांभेकर या किताबाचेही मानकरी ठरलेले होते.

### ३.१.३ बाळशास्त्री जांभेकर यांचे शैक्षणिक कार्य

बाळशास्त्री जांभेकर हे स्वतः विद्वान असल्याने त्यांनी स्वतःचे शिक्षण अत्यंत प्रभावीपणे पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्याबरोबर लगेच आपल्या शैक्षणिक कार्याला त्यांनी सुरूवात केली होती. त्यांनी विविध ठिकाणी अध्यापक म्हणून काम पाहिले. बाळशास्त्री जांभेकर यांची इ.सन १८३२ मध्ये 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'चे नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून नियुक्ती झालेली होती. याच दरम्यान त्यांनी अक्कलकोट येथील युवराजाचे शिक्षक म्हणून कार्य केलेले होते. इ.सन १८३४ मध्ये 'एलफिस्टन कॉलेज'च्या स्थापनेनंतर बाळशास्त्री जांभेकर यांनी एलफिस्टन कॉलेजमध्ये गणित व विज्ञान या विषयांचे अध्यापक म्हणून कार्यभार सांभाळलेला होता. या अनुषंगाने पहिले एतद्देशीय लेक्चरर होण्याचा मानही आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनाच मिळाला होता. मि.ए.बी.ऑर्लेबर सारख्या युरोपियन प्राध्यापकाचे मार्गदर्शन जांभेकरांना लाभले होते. एवढया मोठया पदापर्यंत पोहचणे एका एतद्देशीय व्यक्तीसाठी केवळ कठीणच नाही तर अशक्यप्राय गोष्ट होती परंतु आपल्या असामान्य प्रतिभेच्या जोरावर व विद्वत्तेच्या अधारे कुठल्याही वशिल्याशिवाय त्यांना हे पद मिळू शकले होते. दि.२० मे १८४६ रोजी 'The Bombay Times' या वृत्तपत्रात त्यांच्या मृत्यूविषयी

मृत्यूलेख प्रकाशित झाला होता. यात त्यांच्याविषयी पुढील मजकूर आढळतो. "The usual rule of promotion was, in consequence of his eminence as a man of talent and acquirements, and rare success as a teacher, in his case departed from, and his advancement, like the merits which led to it, was without precedent or example at the establishment to which he belonged."[६] थोडक्यात ब्रिटिश प्रशासनात एका भारतीय व्यक्तीला पदोन्नती मिळणे अतिशय अवघड काम होते तरीही केवळ बाळशास्त्रींच्या असामान्य बुद्धिमत्तेमुळे त्यांना प्राध्यापक पदी नियुक्ती मिळाली होती. दिनांक १ एप्रिल १९३८ मध्ये कॉलेज स्कूल नावाची एक संस्था स्थापन करण्यात आलेली होती. या कॉलेज स्कूलचे प्रमुख म्हणून बाळशास्त्री जांभेकर यांची नियुक्ती झालेली होती. त्यांनी या कॉलेज स्कूलची अतिशय उत्तम व्यवस्था लावलेली होती. याशिवाय बाळशास्त्रींनी एलफिस्टन कॉलेजमध्ये ॲक्टिंग प्रोफेसर म्हणून कार्यभार सांभाळला होता.

बाळशास्त्री जांभेकरांनी प्रोफेसर पदाशिवाय ट्रेनिंग स्कूलचे संचालक म्हणूनही काम केले होते. प्राथमिक शाळेत उत्कृष्ट पद्धतीने अध्यापन करता यावे यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणारी ती अध्यापन शाळा होती. या अध्यापन शाळेची व्यवस्थाही जांभेकरांनी अगदी व्यवस्थितपणे सांभाळलेली होती. या वर्गात प्रवेश घेतलेल्या एकूण २२ विद्यार्थ्यांपैकीच एक केशव शिवराम भवाळकर होते. त्यांनी आपले आत्मचरित्र लिहून त्यात त्यांचे शिक्षक बाळशास्त्री जांभेकर यांच्याविषयी विस्तृत अशी माहिती नमूद केलेली होती. बाळशास्त्रींच्या शिकविण्याच्या पद्धती विषयी भवाळकरांनी लिहिले होते की, "शब्दज्ञान अर्थज्ञान शास्त्रिबावांची शिकविण्याची अप्रतिम पत्धति होती यामुळें विद्याज्ञान हाळू हाळू वाढत चाललें. गणित विषयांत शास्त्रिबावांचा मोठा लौकिक होता आणि तो खरा होता. त्यांनीं भूमिती व सरळरेघ त्रिकोणमिती यांत शिक्षण एक दिवसांत २ तासांत समजून दिलें त्यावेळीं व त्यांनी गणितश्रेढी, भुमितिश्रेढी, क्षेत्रफळ, घनफळ, लागरथमांची उपपत्ती २ तासांत एकेक दिवशीं फळयावर समजून दिली तें इतकें उत्तम कीं अद्यापि ते विषय मी विसरलों नाहीं."[७] यावरून बाळशास्त्री एक आदर्श शिक्षक कसे होते हे लक्षात येते. प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्यांना शिकविताना अतिशय तळमळीनेच शिकवावे असे त्यांना वाटत होते.

इ.सन १८२७ मध्ये 'बॉम्बे नोटिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना झालेली होती. बाळशास्त्रींची प्रगल्भ बुद्धिमत्ता लक्षात घेऊन त्यांची 'डेप्युटि नेटिव्ह सेक्रेटरी' म्हणून मार्च १८३० पासून नियुक्ती करण्यात आलेली होती व पुढील काळात इ.सन १८३२ मध्ये त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे त्यांची 'नेटिव्ह सेक्रेटरी' म्हणून नियुक्ती झालेली होती. बाळशास्त्री जांभेकर हे एलफिस्टन महाविद्यालयात साहाय्यक प्राध्यापक असतानाच्या काळात दरवर्षी हिवाळयात तीन-चार महिने द.कोकण व दक्षिण महाराष्ट्र या शिक्षण विभागातील सरकारी शाळांचे तपासनीस म्हणून कार्य करीत होते. त्यानंतर पुन्हा इ.सन १८४२ मध्ये त्यांची शाळा तपासणी अधिकारी या नात्याने 'सुपरिटेंडंट' म्हणून नियुक्ती झालेली होती. बाळशास्त्री जांभेकरांनी आपले आयुष्यच शिक्षण कार्याला वाहून घेतल्याचे दिसून येते.

## ३.१.४ बाळशास्त्री जांभेकर यांचे शैक्षणिक विचार

एकोणिसावे शतक हे जागतिक स्थित्यंतराच्या बाबतीत महत्त्वाचे ठरलेले शतक होते. सहाजिकच महाराष्ट्रही या स्थित्यंतराच्या बाबतीत अपवाद नव्हता. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रीयन समाजासाठी महत्त्वाची ठरलेली गोष्ट म्हणजे 'शिक्षण' होय. पूर्वीच्या महाराष्ट्राची परिस्थिती विचारात घेतली तर तेथे केवळ रूढीप्रामाण्यवाद होता. नंतर मात्र यात बदल होत जाऊन बुद्धिप्रामाण्यवादास सुरूवात झाली. जुने बुरसटलेले विचार समाजातून लगेच नाहिसे झाले असे जरी नसले तरी त्यात बदल होण्यास निश्चितच सुरूवात झालेली होती. बाळशास्त्री जांभेकरांच्या जन्मानंतरचा जो सहा वर्षाचा कालखंड होतो तो राजकीय स्थित्यंतराचा होता. या राजकीय स्थित्यंतरामुळेच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्थित्यंतर होणे अगदी सहाजिकच होते. भारताच्या बाबतीत विचार करता आद्य सुधारकाचा मान बंगाल प्रांतातील राजाराम मोहन रॉय यांच्याकडे जातो तर हाच मान महाराष्ट्राच्या बाबतीत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्याकडे जातो. राजाराम मोहन रॉय यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा करताना शिक्षणाला अग्रक्रम देऊन शैक्षणिक कार्य हाती घेतले होते. अगदी तशाच पद्धतीने बाळशास्त्री जांभेकरांनीही शैक्षणिक कार्य हाती घेतलेले होते. यावरून राजाराम मोहन रॉय यांनी सुरू

केलेले प्रबोधनाचे कार्य व चळवळी, तसेच तेथील वृत्तपत्रे यांची माहिती, बंगाली भाषा अवगत असलेल्या बाळशास्त्र्यांना असावी, असे अनुमान केल्यास चूक ठरू नये.[८] राजाराम मोहन रॉय यांच्यात व बाळशास्त्री जांभेकर यांच्यात बऱ्याच बाबतीत साम्य होते. निश्चितच राजाराम मोहन रॉय यांचे कार्य बाळशास्त्रींना प्रेरणादायी ठरलेले होते.

बाळशास्त्री जांभेकरांचे आयुष्य तसे अल्पच होते, परंतु ते सर्व त्यांनी शिक्षण कार्यासाठीच खर्च केले होते. हे शैक्षणिक कार्य करत असताना त्यांची शिक्षणाविषयी एक स्वतंत्र भूमिका बनत गेलेली होती. त्यांच्या विचारांना एक शैक्षणिक बैठक होती. त्यांच्या या विचारांमुळेच एज्युकेशन सोसायटीत त्यांना विविध पदे उपभोगता आलेली होती. त्यांचे शैक्षणिक विचार त्यांनी लिहिलेल्या विविध लेखातून तसेच त्यांच्या कार्यातून स्पष्ट दिसून येतात.

## १) वृत्तपत्रांच्या माध्यमातून शिक्षणविषयक विचारांचा प्रसार

बाळशास्त्री जांभेकर यांना 'मराठी वृत्तपत्राचे जनक' म्हणून ओळखले जाते. त्यांच्या मते वृत्तपत्र हे ज्ञान प्रसाराचे एक प्रभावी माध्यम ठरू शकते. आपल्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणेचे विचार तसेच ज्ञान प्रसार करण्याच्या हेतूने बाळशास्त्रींनी 'दर्पण' हे साप्ताहिक मुंबईत सुरू केले होते. त्यांच्या 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू करण्याच्या भूमिके विषयी रा.के.लेले म्हणतात की, "शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना त्यांनी ज्ञान दिले, त्याचा, व्यापक वापर करून लोकसमाजाचे उद्‌बोधन करण्याची त्यांना निकड वाटली. लोकांत ज्ञान प्रसार करण्याचे साधन जे वृत्तपत्र ते काढण्याचा खटाटोप म्हणूनच त्यांनी केला."[९] म्हणजेच समाज प्रबोधन करून समाजात शैक्षणिक जागृती करण्यासाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी वृत्तपत्र सुरू केले. एकीकडे स्वतः अध्यापक व शाळा तपासनीस म्हणून औपचारिक शिक्षणाची जबाबदारी सांभाळत असतानाच दुसरीकडे समाजातील अज्ञानी लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन अनौपचारिक शिक्षणाची धुराही त्यांनी सांभाळली होती.

'दर्पण' या पत्राचा पहिला अंक दिनांक ६ जानेवारी १८३२ रोजी निघाला होता. तत्पूर्वीच त्यांनी दि. १२ नोव्हेंबर १८३१ रोजी एक प्रसिद्धी पत्रक देऊन या वृत्तपत्राचा प्रस्ताव वाचकांसमोर मांडला होता. त्यात त्यांनी 'दर्पण' सुरू करण्याचा हेतू सांगितलेला होता. त्या प्रस्तावातूनच त्यांचे शिक्षणविषयक विचार सहज लक्षात येतात. या प्रस्तावात नेमके 'दर्पण' कसे असेल याचा स्पष्ट उल्लेख त्यांनी केलेला होता. "स्वदेशीय लोकांमध्यें विलायतेंतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा, आणि या देशची समृद्धि व एथील लोकांचें कल्याण यांविषयीं स्वतंत्रतेनें व उघड रीतीनें विचार करायास स्थल व्हावें, या इछेनें कित्येक मुंबईत राहाणारे लोकांचे मनांत आहे की दर्पण या नावाचें एक न्यूसपेपर म्हणजे वर्तमान पत्र छापून प्रसिद्ध करावें. त्याचा पहिला नंबर तारीख ६ शुक्रवार माहे जान्युअरी सन १८३२ ते दिवशीं छांपला जाईल. या देशचे लोकांत विलायती विद्यांचा अभ्यास वाढावा आणि तेथील ज्ञान प्रसिद्ध व्हावें अशे नात्यानें या वर्तमान पत्राचा उद्योग मुख्यत्वें आरंभिला आहे... तसेच विलायतेंतील विद्या, कळा, कौशल्यें यांविषयींचे, व त्यांतील जा भागांचा उपयोग या देशांत झाल्यास फार हित आहे त्यांविषयींचे लहान लहान ग्रंथ लिहिले जातील. अशे गोष्टीं पासून जिज्ञासु पुरूषांस शोध करायास, आणि विद्येंत परिश्रम करणारांस विचार करायास विषय मिळतील."[१०] यावरून बाळशास्त्री जांभेकरांचा 'दर्पण' सुरू करण्यामागचा हेतू स्पष्ट लक्षात येतो.

एकोणिसाव्या शतकातील वृत्तपत्र हे समाज प्रबोधनाचे एक महत्त्वाचे साधन बनलेले होते. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातच काही वृत्तपत्रे भारतात सुरू झाली होती. त्यापासून प्रेरणा घेऊन बाळशास्त्रींनी वृत्तपत्र निर्मितीचे कार्य सुरू केले होते. या वृत्तपत्राचा हेतू केवळ बातम्या छापणे एवढयापुरताच मर्यादित न ठेवता पाश्चात्य ज्ञान, त्यांच्या कला तसेच त्यांची शिक्षणामुळे झालेली प्रगती, विविध लेखकांनी विविध विषयांवर लिहिलेले लेख हे सर्व या वृत्तपत्रात छापण्याचे त्यांनी ठरविले होते. या वृत्तपत्राची विशेष बाब म्हणजे ते इंग्रजी भाषेबरोबरच मराठी भाषेतही प्रकाशित होणार होते व यामुळे ज्यांना इंग्रजी वाचता येत नाही ते मराठी वाचून त्यातील ज्ञान आत्मसात करू शकणार होते.

उपरोक्त प्रस्तावानुसार ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या पत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला. या अंकात बाळशास्त्रींनी विद्या प्रसाराच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे लेख लिहिले होते. 'नियतकालिक लेखांपासून जे स्वार्थ होतात त्यांविषयी', 'इंग्लंड देशांतील राज्यरीतींत बदल करण्यासंबधी यत्न', 'राजाराम मोहन रॉय' यासारख्या महत्त्वाच्या लेखांचा समावेश त्यात होता. विशेषतः नियतकालिक व वृत्तपत्र यातून आलेल्या लेखांच्या माध्यमातून विद्याप्रसार होण्यास कसा हातभार लागतो त्यादृष्टीने तो लेख महत्त्वाचा होता. तत्कालीन समाजाचा विचार करता लेखन कला व वाचन संस्कृती त्याकाळात फारशी प्रसारित झालेली नव्हती. त्यामुळे सहाजिकच अगोदर या दोन्ही गोष्टींचे महत्त्व काय हे सांगणे जांभेकरांना महत्त्वाचे वाटत होते. बाळशास्त्रींच्या मते सगळया जगाचा विचार करता युरोपियन देशांमध्ये वृत्तपत्रे व नियतकालिकांचे महत्त्व अधिक पटलेले होते त्यामुळे त्यांचा अधिकाधिक विकास होत गेला व युरोपियन देशांच्या तुलनेने भारतासारख्या देशात मात्र या गोष्टीकडे विशेष लक्ष दिले गेले नाही. त्यामुळे विविध विषयांवर अधारित लोकांचे प्रबोधन करणारे ग्रंथ छापावेत असे बाळशास्त्रींचे मत होते. एवढेच नाही तर समाजातील हुशार मंडळींनी तसेच सुशिक्षितांनी समाजातील समस्या ओळखून त्याची कारणे व उपाय यावर लेख लिहावेत व ते वृत्तपत्रातून प्रकाशित करावेत असेही त्यांना वाटत होते. यामुळे निश्चितच समाज शैक्षणिकदृष्टया जागरूक होईल अशी त्यांची खात्री होती. अशा पद्धतीचे लेख लिहिल्यामुळे बुद्धिमान लोकांना प्रतिष्ठा तर प्राप्त होतेच परंतु सर्वसामान्य लोकही त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर त्या लेखातून इतर देशात काय चालते ते समजते व त्यातून आपली प्रगती साधता येऊ शकते असेही त्यांना वाटत होते.

वर्तमानपत्राकडे बघण्याचा जांभेकरांचा दृष्टिकोन विद्यादान करणे हाच होता. ते वर्तमान पत्रास एक प्रकारची शाळाच समजत होते. त्यांच्या मते समाजात दोन प्रकारच्या विद्यादान करणाऱ्या शाळा आहेत. त्या म्हणजे एक प्रत्यक्ष शाळा जेथे विद्यार्थी अध्ययन करतात व शिक्षक अध्यापन करतात यालाच आपण औपचारिक शाळा म्हणतो व त्यांच्या मते दुसरी शाळा म्हणजे वर्तमानपत्र होय. या अनुषंगाने बाळशास्त्री 'दर्पण'मध्ये लिहितात की,

"विद्या वाढण्यास आणि सरळबुद्धि होण्यास कारणें मुख्यत्वें करून दोन; एक सर्व विद्यालय म्हणजे सर्व विद्यांची शाळा, आणि दुसरे तेथे जी बहुत तद्देशीय वर्तमान पत्रें छापून प्रसिद्ध होतात तीं... आतां विद्या व्यवहाराचें द्वार असें एक वर्तमान पत्र पहिजे कीं, जांत मुख्यत्वें करून एतद्देशीय लोकांचा स्वार्थ होईल."[११] एकूणच समाजाला ज्ञानी बनविण्यासाठी व आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी त्यांना वृत्तपत्राचे साधन महत्त्वाचे वाटत होते व याचसाठी त्यांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले होते. 'दर्पण' हे पत्र सुरूवातीस पाक्षिक म्हणून दर १५ दिवसांनी छापावयाचे ठरले होते परंतु त्या वृत्तपत्राची प्रसिद्धी व दोन अंकातील कालावधी अधिक असल्याने जांभेकरांनी त्यात फेरफार केला होता. नंतर हेच वृत्तपत्र त्यांनी दर आठवडयाला छापण्यास सुरूवात केली होती.

'दर्पण' वृत्तपत्राशिवाय बाळशास्त्रींनी 'दिग्दर्शन' नावाचे मराठी भाषेतील मासिक दिनांक १ मे १८४० पासून प्रकाशित केले. त्या दरम्यानच्या काळात बरीचशी वृत्तपत्रे इंग्रजी भाषेत होती व इंग्रजी भाषेच्या अज्ञानामुळे व ही वृत्तपत्रे महाग असल्यामुळे बहुसंख्य लोकांना अशा वृत्तपत्रांचा उपयोग होत नव्हता म्हणून सर्वसामान्य लोकांना वाचता येईल व त्यातील ज्ञान संपादित करता येईल असे मराठी भाषेत आणखी एखादे वृत्तपत्र सुरू करावे या हेतूने बाळशास्त्री जांभेकरांनी 'दिग्दर्शन' हे वृत्तपत्र सुरू केले होते. यावरून दिग्दर्शनचाही हेतू विद्याप्रसार करणे हाच होता हे उघड दिसते. 'दिग्दर्शन' मासिकात कशाचा समावेश करायचा याविषयी बाळशास्त्रींनी नियोजन केलेले होते. यात विविध विषयावर अधारित लेख त्यामध्ये भूगोल, इतिहास, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र व इतर माहितीपर लेख इत्यादींचा समावेश होता. त्याचबरोबर विविध माहिती नकाशे व चित्रांच्या स्वरूपात छापली जात होती. यावरून हे मासिक देखील शैक्षणिकदृष्टया किती महत्त्वाचे होते हे लक्षात येते. थोडक्यात आपल्या शैक्षणिक विचारांच्या प्रचारार्थ बाळशास्त्री जांभेकरांनी वृत्तपत्रांचा विशेष वापर केल्याचे दिसून येते हे या ठिकाणी नमूद केले पाहिजे. मुळात बाळशास्त्री यांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून शब्दांना एक नवा अन्वयार्थ आपल्या विचारांतून आणि कृतीतून दिला होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## २) बाळशास्त्री जांभेकर यांचा विद्या किंवा ज्ञानविषयक दृष्टिकोन

बाळशास्त्री जांभेकर यांच्या दृष्टिकोनातून विद्या किंवा ज्ञान मिळविणे हे प्रत्येक व्यक्तीचे आद्य कर्तव्य आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेले ज्ञान हे केवळ शिक्षणामुळेच मिळू शकते असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षण घेतल्यामुळे व्यक्तीला अनेक फायदे मिळतात विशेषतः त्यापासून कीर्ती व संपत्ती यांचा लाभ होतो. त्यांच्या मते विद्या ही अशी गोष्ट आहे की, ती दिल्याने कमी होत नाही तर ती अधिक वाढते. शिक्षक वर्षानुवर्षे अधिक ज्ञानसंपन्न होत जातात याचे कारण ते ज्ञानदान करतात हेच असते. त्यामुळे आपल्याकडे असलेले ज्ञान आपण इतरांना द्यावे असे बाळशास्त्रींना वाटत होते. त्यांच्या मते ज्ञान ही खूप मोठी संपत्ती आहे कारण ज्ञानाच्या अधारे आपल्याला कोणतीही गोष्ट मिळविता येणे शक्य होते. ज्ञानाविषयी विशेष बाब म्हणजे ते कोणी व्यक्ती पासून चोरून नेऊ शकत नाही. एखाद्याकडे असलेली संपत्ती काढून घेता येईल परंतु त्याच्याकडील ज्ञान मात्र काढून घेता येणे शक्य नाही. ते कायमस्वरूपी चिरकाल टिकणारे असते. म्हणून बाळशास्त्री जांभेकरांनी प्रत्येकाने ज्ञानसंपन्न होणे आवश्यक आहे असे सांगितले होते.

समाजात ज्ञानाविषयी असा एक समज आहे की, ज्ञान हे केवळ शाळेत गेल्यानेच मिळू शकते आणि मोठया माणसांना ज्ञान संपादण्याची आवश्यकता नाही, परंतु बाळशास्त्रींच्या दृष्टिकोनातून हा समज पूर्णतः चुकीचा आहे. त्यांच्या मते ज्ञान ही अशी गोष्ट आहे की ती कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला उपयुक्त ठरते. त्यामुळे शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षण संपले म्हणजे ज्ञान संपादण्याचे कार्य संपले असे नाही. उलट शिक्षण ही आजन्म चालणारी प्रक्रिया असल्याने जन्मभर व्यक्तीने ज्ञानार्जन करावे असे त्यांना वाटत होते. सर्वच वयोगटातील व्यक्तींना ज्ञान मिळविणे कसे उपयुक्त असते हे सांगताना बाळशास्त्री लिहितात की, “विद्या कोणास उपयोगीं नाहीं असें नाहीं. श्रीमंतास भूषण, गरीबास पोटाचें साधन, तरूणास उत्तम उद्योग, वृद्धास विश्रांति आणि सर्वांस मोक्ष प्राप्तीचा उपाय होय.”[१२] त्यांच्या मते जे लोक श्रीमंत आहेत त्यांनी जर ज्ञान संपादित केले तर त्यांच्यासाठी ती भूषणावह बाब

ठरते. दुर्दैवाने बहुतांश श्रीमंतांच्या घरी अती संपत्ती असल्याने ज्ञानार्जनाकडे दुर्लक्ष केले जाते व संपत्तीचा अपव्यय त्या कुटुंबांकडून होतो. गरिबांसाठी ज्ञान हे स्वाभिमानी मार्गाने चरितार्थ मिळविण्याचे साधन ठरते. कारण ज्याच्याकडे ज्ञान नाही त्याच्या श्रमाचा फायदा इतर लोक उठविताना दिसतात. म्हणून गरिबांनी स्वतःचा आर्थिक विकास करण्यासाठी ज्ञानार्जन करावे असे बाळशास्त्रींना वाटत होते. तरूणाच्या कल्पकतेला योग्य वाव देण्यासाठी विद्या किंवा ज्ञान महत्त्वाचे असते. बऱ्याचदा तरूणांना योग्य शिक्षण न मिळाल्याने ते वाम मार्गाला लागल्याचे दिसतात. मुळात तरूण ही देशाची खरी संपत्ती असते व त्यांच्याच सामर्थ्यावर देशाची प्रगती होत असते. एकविसाव्या शतकाचा विचार करता भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी भारत इ.सन २०२० मध्ये महासत्ता बनेल असा जो विश्वास व्यक्त केला तो केवळ तरूणांच्या जोरावरच केलेला आहे. त्यामुळे अशा तरूणांना योग्य शिक्षण मिळाले तर त्याचा निश्चितच देशाच्या विकासासाठी फायदा होईल. त्यामुळे ज्ञान मिळविणे हा एक तरूणांचा मुख्य उद्योग असायला हवा असे त्यांच्या विचारांतून दिसून येते. ज्या तरूणाने उच्च ज्ञान संपादित केले त्या तरूणांना आपल्या विकासासाठी काय करावे असा प्रश्न पडत नाही. याशिवाय वृद्ध लोकांना आत्मशांती प्राप्त करून घेण्यासाठी विद्यार्जन महत्त्वाचे असते असे बाळशास्त्रीच्या विचारांतून दिसून येते.

मोक्षप्राप्ती हे शिक्षणाचे एक उद्दिष्ट असते. व्यक्तीला जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका करून घेण्यासाठी योग्य अशा शिक्षणाची आश्यकता असते असे बाळशांस्त्रींचे मत होते. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही सुप्त शक्ती असतात. त्यांचा अविष्कार करण्याचे कामही शिक्षणाचे आहे. बऱ्याचदा व्यक्तीला स्वतःलाच आपल्यात काय गुण आहेत हेच माहीत नसते. त्या गुणांविषयी तो पूर्णपणे अनभिज्ञ असतो. त्यांचे प्रकटीकरण करण्याचे उद्दिष्ट हे शिक्षणाचे असते. शिक्षणाच्या माध्यमातून जे ज्ञान मिळते त्या आधारे व्यक्तीला आत्मसाक्षात्कार होतो असे बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारातून स्पष्ट होते. एकंदरीत शिक्षण हे सकल मानवजातीसाठी उपयुक्त ठरते असेच त्यांना सांगावयाचे होते व त्याच अनुषंगाने त्यांनी स्वतःचे कार्यही शैक्षणिक क्षेत्रातच ठेवले होते.

तत्कालीन समाजात प्राचीन परंपरेनुसार चार वेद, न्याय मीमांसा, वेदांत, धर्मशास्त्र, सांख्य, योग ही सहा शास्त्रे; व्याकरण, ज्योतिष, वैद्यक, गायन, ही चार अशा एकूण चौदा विद्या प्रसिद्ध होत्या. जी व्यक्ती या विद्या संपादित करील ती बुद्धिमान समजली जात असे. परंतु बाळशास्त्रींच्या मते हा शिक्षणाचा अतिशय संकुचित अर्थ झाला. त्यांच्या मते विद्यार्जनाला एक व्यापक अर्थ होता या बाबतीत त्यांनी म्हटले होते की, "विद्या या शब्दाचा व्यापक अर्थ पाहातां साधारण ज्ञान म्हणजे जाणणें असा आहे. तेव्हां कांहीं विशेष गोष्ट जाणणें तिचें नाव विद्या. परमार्थाविषयीं जाणणें हा तर मनुष्याचा मुख्य धर्म खरा; परंतु आपण सर्व संसारांत वागतों तेव्हां इहलोकोपयोगी ज्या गोष्टी त्यांचें ज्ञान ही विद्या होय. जसें पांचानीं चार गुणिलें असतां वीस होतात हें जाणणें ही विद्या, त्याप्रमाणेंच तांबडया जांभ्या दगडांत लोखंड असतें हें जाणणें हीही विद्या आहे."[१३] थोडक्यात प्राचीन कालखंडापासून जे अध्यात्मिक ज्ञान मिळणे म्हणजे शिक्षण मानले जायचे तेवढा मर्यादित अर्थ बाळशास्त्रींना निश्चितच अभिप्रेत नव्हता. सर्वसामान्य माणसाला जीवन जगत असताना अनेक गोष्टींची आवश्यकता असते त्यासंबंधी ज्ञान मिळविणे हाही शिक्षणाचाच एक भाग आहे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मते प्रत्येकाने विविध शास्त्रे, गणित, भाषा, भूगोल, इतिहास याविषयांचे ज्ञान मिळविणे आवश्यक होते.

### ३) भारतीय शिक्षणपद्धती व पाश्चात्य शिक्षणपद्धतीविषयक विचार

बाळशास्त्री जांभेकर भारतीय शिक्षणाच्या मर्यादाही ओळखून होते. त्यामुळे त्यांनी पाश्चात्य किंवा भौतिक विद्येचाही पुरस्कार केल्याचे दिसते. इंग्रज भारतात आले व भारत पारतंत्र्यात गेला हे जेवढे खरे होते तेवढेच इंग्रज आल्यानेच भारतीयात भौतिक शिक्षणाची एक नवी प्रेरणा निर्माण झाली होती हेही खरेच होते. ज्या प्रमाणे भारताचे आद्यसुधारक राजाराम मोहनरॉय यांनी भारतासाठी पाश्चात्य पद्धतीच्या ज्ञानाचा पुरस्कार केलेला होता त्याप्रमाणेच बाळशास्त्रींचेही विचार होते. या अनुषंगाने डॉ. पु.ग.सहस्त्रबुद्धे लिहितात की, "बेकन, डेकार्ट, यांच्या ज्या ज्ञानामुळे युरोपीय समाज सुधारला ते ज्ञान, ती भौतिक विद्या

आम्हांला द्या असा आग्रह त्यांनी धरिला... महाराष्ट्रात असा पहिला प्रयत्न बाळशास्त्री जांभेकर यांनी इ.सन १८३२ साली 'दर्पण' हे साप्ताहिक काढून केला."[१४] 'दर्पण' साप्ताहिकात त्यांनी पाश्चात्य विद्यांचे महत्त्व व्यक्त करणारे अनेक लेख समाविष्ट केले होते. भारतीय समाज हा रूढी परंपरावादी समाज होता. त्यामुळे येथील शिक्षणही परंपरावादावरच अधारभूत होते. नवविचारांपेक्षा रूढी व अंधश्रद्धांच्या बंधनांना चिकटून राहणारा हा समाज होता. शिक्षणामुळे होणारा बदल म्हणजे आपल्या समाजावर व संस्कृतीवर घाला आहे असे मानणारा हा समाज होता व त्यामुळे या समाजाला पाश्चात्य शिक्षण किंवा भौतिक विद्याच बदलू शकते यावर बाळशास्त्री ठाम होते. बंगाल प्रांतात ब्रिटिशांचा संबंध भारतीयांशी अगोदर आला त्यामुळे तेथे नवविचारांचे वारे वाहण्यास लवकर सुरूवात झाली होती. बाळशास्त्री जांभेकरांच्या मते भारत जरी ब्रिटिशांच्या जोखडाखाली होता तरी त्यांच्या येण्याने शैक्षणिक क्षेत्रात मोठी जागृती झालेली होती. बंगाल प्रांताचा विचार करता केवळ साठ सत्तर वर्षाच्या काळात प्रचंड बदल झालेला होता. ब्रिटिशांनी जी युरोपखंडातील विद्या व कला यांचा प्रसार भारतात करण्यास सुरूवात केलेली होती ती भारतीयांसाठी निश्चितच उपयुक्त वाटत होती. महाराष्ट्राचा विचार करता ब्रिटिशांची सत्ता येथे उशिरा प्रस्थापित झाली त्यामुळे बंगालच्या तुलनेत हा प्रभाव उशिराच होणार होता तरीही तो अधिकाधिक व्हावा यासाठीच पाश्चात्य शिक्षणाची आवश्यकता बाळशास्त्रींना वाटत होती.

पाश्चात्य शिक्षण हे भारतीय शिक्षणापेक्षा कोणत्या बाबतीत भिन्न होते याचा विचार करता हे लक्षात येते की, ते शास्त्रीय दृष्टिकोनावर अधारभूत होते. विविध विषयात संशोधन करून नवनिर्मिती करणे हे त्या शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट होते. औद्योगिक क्रांती झाल्याने विविध यंत्रे निर्माण करता आली की, ज्यामुळे कमी वेळात, कमी खर्चात, कमी मनुष्यबळाच्या आधारे प्रचंड काम होऊ लागले. याचे श्रेय पाश्चात्य शिक्षण पद्धतीलाच जाते. पाश्चात्य शिक्षण पद्धतीने भारावलेली व्यक्ती ज्ञानकेंद्री असते. आपले ज्ञान वाढविण्यास सदैव तत्पर असते. युरोपियन व्यक्तीमध्ये अशा प्रकारची ज्ञानलालसा अधिक असायची. बाळशास्त्रींनी 'दर्पण' पत्रांत 'ह्युजेल हा व्यक्ती मुंबईत आला' अशी बातमी प्रकाशित केली होती. त्यात त्यांनी

युरोपियन लोकांच्या ज्ञानलालसेचे वर्णन केले होते. "युरोपियन लोक असे विद्या व मनुष्याचें ज्ञान वाढविण्यासाठीं आपलीं घरें सोडतात, समुद्रांतून हजारों कोश जातात, परदेशचा जमिनी शोधितात, स्वेछेनें वियोग सोसितात, व आपण संकटात पडतात, असे जेव्हां आमचे दृष्टीस पडतें, तेव्हां ज्ञानासाठींच त्यांस जी ईर्ष्या येते, आणि जा आस्थेनें ते त्याचा उद्योग करितात, तें कळून जर अतिशय आश्चर्य झालें नाही, तर अम्हास कांहीं समजत नाहीं असें होईल. तसेंच हे लोक इतके तोटे सोसतात, आणि या कामाकरितां केलेल्या मंडळया, त्यांचे परोपकारार्थ विद्या वाढविण्याचे उद्योग, आणि नवे नवे शोध, व युक्ति काढून मनुष्याचें सामर्थ्य वाढविण्याचे, किंवा इतर मनुष्यांस उपयोगी पडण्याचे, उद्योग चालतील असें करतात."[१५] थोडक्यात अनेक युरोपियन बुद्धिमान लोक भारतात येऊन पाश्चात्य पद्धतीच्या ज्ञानाचा प्रसार करीत होते.

बाळशास्त्री जांभेकर प्राचीन काळचा उल्लेख करून सांगतात की, मुळात शिक्षणाचा खरा उगम हा आगोदर पौर्वात्य देशात झालेला होता व नंतर पाश्चिमात्य देशात झाला. तथापि, पाश्चिमात्यांनी सातत्य ठेवून या शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. पौर्वात्य देशात मात्र तसे न घडता काळाच्या ओघात शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. त्यातून आणखी रूढी परंपरा व अंधश्रद्धांचे प्राबल्य वाढून समाजाची अधोगती झाली. या देशातील लोकांना त्यांचीच स्वतःची विद्या पाश्चिमात्य देशाकडून शिकावी लागली. मुळात जांभेकरांच्या दृष्टिकोनातून ब्रिटिश लोक भारतावर वर्चस्व का निर्माण करू शकले याचे कारणच ब्रिटिशांकडे उच्च्य शिक्षण होते व भारतीयांकडे त्याचा अभाव होता हे होते. भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी बाळशास्त्री जांभेकरांना हेच पाश्चात्य ज्ञान भारतीयांना मिळावे असे वाटत होते. विशेषतः वैद्यक शास्त्रातील व तंत्रज्ञान क्षेत्रातील पाश्चात्य ज्ञान भारतीयांना मिळावे असे त्यांना वाटत होते.

वैद्यक शास्त्रात प्रगती ही पाश्चात्य शिक्षणाची विशेष बाब होती. भारतीय वैद्यकशास्त्रापेक्षा पाश्चात्य पद्धतीचे वैद्यकशास्त्र अतिशय प्रभावी होते. वस्तुतः भारतीय

आयुर्वेदाचाही प्रचंड विकास झालेला होता, परंतु भारतातील शिक्षणाच्या अनास्थेमुळे आयुर्वेदाचे ज्ञान संपादन करणारे संख्येने खूप कमी होते त्यातही बहुतेक जण सखोल ज्ञान संपादित न करता केवळ पैसा मिळेल, या हेतूने वैद्य बनलेले होते. त्यामुळे जांभेकरांना युरोपियन वैद्यक शास्त्राची एतद्देशीयांसाठी आवश्यकता वाटत होती. महाराष्ट्रांमध्ये विविध साथीचे आजार सुरू झालेले होते ज्यामुळे काही प्रसंगी अगदी गावेच्या गावे या आजारांच्या भक्ष्यस्थानी पडत होते. अशा साथीच्या आजारांपासून वाचण्यासाठी लोकांना वैद्य किंवा हकीम यांच्याकडे जाण्याशिवाय पर्याय नव्हता कारण ब्रिटिश डॉक्टरांची फी त्यांना परवडणारी नव्हती. या अनुषंगाने बाळशास्त्री 'दर्पण' मधील एका लेखात लिहितात की, "In noticing this subject it is far from our intention to insinuate, that the European Doctor's charges are exorbitant – we are aware that they cannot afford to attend patients for a smaller rate of remuneration. Our object, however, is to suggest to some of our countrymen, to study medicine according to the European system, and by that means while securing a livelihood for themselves, contribute to the saving of the lives of numbers, who for want of regularly brought up medical men, are obliged to entrust their lives to inexperienced Practitioners."[१६] यावरून एकंदरीत असे दिसते की, कित्येक प्रसंगी युरोपिय वैद्यांची गरज विविध आजारांमध्ये भारतीयांना होती. किमान युरोपियनांचे वैद्यकशास्त्र अभ्यासलेले भारतीय डॉक्टर तरी असणे आवश्यक होते. कमी खर्चात युरोपियन डॉक्टर भारतीयांना औषोधोपचार करणे शक्य नव्हते म्हणून भारतीयांनीच हे ज्ञान संपादावे असे बाळशास्त्री जांभेकर यांना वाटत होते. हे ज्ञान मिळविणे खूप अवघड आहे असे समजून भारतीय हे ज्ञान मिळविण्याचे टाळायचे यासाठीच बाळशास्त्रींनी पाश्चात्य ज्ञानाचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. पाश्चात्य पद्धतीचे वैद्यकज्ञान भारतीयांनी मिळविले तर अनेक लोकांचे प्राण ते वाचवू शकतील याशिवाय त्यांना चरितार्थाचे साधनही उपलब्ध होईल असे जांभेकरांना वाटत होते.

वैद्यकशास्त्राप्रमाणेच तंत्रशिक्षणही भौतिक विद्येचाच एक भाग आहे म्हणून त्यांनी तंत्रशिक्षणाचाही पुरस्कार केला होता. भारतामध्ये तंत्रशिक्षणाच्या बाबतीत अतिशय उदासीनता

होती. 'दर्पण' वृत्तपत्र सुरू करताना बाळशास्त्रींनी युरोपियन विद्या व कला याविषयी माहिती वृत्तपत्रात छापली जाईल असे नमूद केले होते त्यास अनुसरून एका वाचक गृहस्थाने बाळशास्त्रींना पत्र लिहून वाफेच्या साहाय्याने चालणाऱ्या जहाजाच्या तंत्रज्ञानाविषयी माहिती देणारा एक लेख लिहावा अशा प्रकारची एक विनंती केली होती. त्यात त्यांनी लिहिले होते की, "मी मुंबईस गेलों तेव्हां नवी टांकसाळ व शिडावांचून मोठें आगीचें गलबत म्हणतात तें वारा व पाणी हीं जेव्हां उलटीं असतात, आणि जेव्हां दुसरीं शिडांची गलबतें तसूभरही चालत नाहींत, तेव्हां वाफेनें फार त्वरेनें चालतें असें पाहिलें, तेव्हांपासून मला या विषयाचें काहीं जाणायाची इच्छा झाली आहे. दुसरेही जे बहुत लोक मुंबईस गेले आहेत त्यांसही वाफेचा काहीं गोष्टी समजल्या असतां हर्ष होईल."[१७] यावरून ब्रिटिशांनी आपल्या तंत्रज्ञानाच्या आधारे जे शोध लावले त्याविषयी भारतीयात प्रचंड प्रमाणात कुतूहल होते असे स्पष्ट दिसून येते. सूर्याच्या शक्तीचा वापर करून प्रचंड जहाज अगदी प्रतिकूल हवामानात सुद्धा समुद्रातून चालविता येऊ शकते याविषयी भारतीयांना नवल वाटत होते कारण त्यांच्याकडे यापाठीमागे असलेले पाश्चात्य तंत्रज्ञान नव्हते. त्यामुळे भारतीयांना यापाठीमागचे रहस्य समजू शकत नव्हते. ते या प्रकाराला एक चमत्कार मानत होते. यातील मुख्य कार्यकारणभाव भारतीयांना समजावा यासाठी भारतीयांना तंत्र शिक्षणाची आवश्यकता होती असे बाळशास्त्रींना वाटत होते.

भारतीयांची अशा प्रकारच्या ज्ञानाअभावी कशी अवस्था होती याचे वर्णन त्यांनी केले होते. त्यांनी लिहीले होते की, "The native community can never do too much for the education of their countrymen; and though they have already done a great deal in the way of affording a purely scientific education to the rising generation, scarcely has a single institution been as yet established to instruct the Indian youth in practical branches of mechanics, and the arts of making different manufactures, whithout which the knowledge of science can hardly raise the mass of the people in the scale of social happiness or political advancement."[१८] थोडक्यात भारतात तंत्रज्ञानाचे व विविध उत्पादने यंत्रांच्या आधारे काढण्याचे प्रायोगिक ज्ञान देणारी एकही संस्था महाराष्ट्रात नव्हती हे

भारताचे दुर्दैव म्हणावे लागेल. पाश्चात्य पद्धतीच्या तंत्रशिक्षणाविषयी एकूणच समाजात प्रचंड अनास्था होती. भारतात शिक्षणाचा प्रसार सुरू झाला होता ही गोष्ट खरी होती, परंतु जेवढे पर्याय शिक्षणासाठी खुले असावेत तेवढे मात्र त्यांच्या मते निश्चितच नव्हते. महत्त्वाचे म्हणजे ज्या शिक्षणातून देशातील तरूणांच्या बद्धिमत्तेला चांगले वळण लागेल अशा प्रकारचे शिक्षण भारतात नव्हते. "If the Educational establishments of our Island go on for a few more years progressing as at present, we will have a great number of our Countrymen conversant with every part of History, Science, and Literature; but what can the generality do in their present impoverished state, if means be not provided for directing their youthful talents to some useful channel?"[११] म्हणजेच जरी शिक्षणाचा प्रसार होऊन भारतीय विद्यार्थी विज्ञान, इतिहास, साहित्य या विद्येमध्ये पारंगत झाले तरीही तरूणांच्या विद्वत्तेला उपयोगिताप्रधान प्रायोगिक शिक्षण मिळाले नाही तर या विद्या मिळवूनही विशेष उपयोग होणार नाही असे बाळशास्त्रींना वाटत होते. म्हणजेच शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार ज्या मार्गाने व माध्यमातून व्हायला हवा होता त्यानुसार तो निश्चितच नव्हता. याच अनुषंगाने त्यांनी पाश्चात्य पद्धतीच्या तंत्रशिक्षणाचा पुरस्कार केलेला होता.

एकूणच विचार करता बाळशास्त्रींच्या विचारातून एक गोष्ट स्पष्ट होते की, भारताचा विकास करण्यासाठी भारतीय शिक्षण पद्धती परिपूर्ण नाही. यासाठी भौतिक ज्ञानावर अधारित पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा स्वीकार भारताने केल्याशिवाय पर्याय नाही.

## ४) शिक्षणातील उदासीनता व त्यामुळे समाजाची झालेली अधोगती

शिक्षणात समाज परिवर्तनाची प्रभावी ताकद असते. महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र हे परिवर्तन सहजासहजी झाले असे दिसत नाही. पाश्चात्य शिक्षणाने भौतिक विद्येचा प्रसार देशात सर्वत्र होत होता त्याच काळात महाराष्ट्रात मात्र ज्ञानाच्या बाबतीत अंधःकार होता. ब्रिटिश प्रशासनातही उच्च पदस्थ नोकऱ्या मिळविणाऱ्यांमध्ये मराठी माणसे अगदीच नगण्य होते. थोडक्यात विद्या व शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र नेहमीच मागासलेला असल्याने महाराष्ट्राची प्रगती होऊ शकली नव्हती. मुळात शैक्षणिक कार्याचा प्रचार आणि प्रसार

होण्यासाठी शिक्षणाने भारावलेल्या सुशिक्षित तरूणांची जी आवश्यकता असते तीच महाराष्ट्रात सुरूवातीच्या कालखंडात नव्हती. शिक्षणाच्या बाबतीत समाजामध्ये प्रचंड उदासीनता होती. महाराष्ट्राच्या मागासलेपणाचे कारण सांगताना डॉ.पु.ग.सहश्रबुद्धे यांनी लिहिले होते की, "विद्यार्थिवर्गात शिक्षणाविषयी हवी ती आस्था नाही आणि शिक्षकवर्गही हव्या तशा उंचीचा मिळत नाही. त्यामुळे कर्तबगार पुरूष जे सर्व समाजातून निर्माण व्हावयास हवे तसे होत नाहीत. राष्ट्राचा उत्कर्ष होण्यास कर्तबगार पुरूषांची किमान संख्या आवश्यक असते. तितकेही महाराष्ट्रात होत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र हा मागासलेलाच राहिला आहे."[२०] एकंदरीत महाराष्ट्राच्या मागासलेपणाचे कारण हे शिक्षणात होते ही गोष्ट सर्वमान्य होती. याबाबतीत उघडपणे आपले विचार मांडण्याचा प्रयत्न बाळशास्त्री जांभेकरांनी आपल्या विविध लेखांतून केलेला होता.

बाळशास्त्रींच्या मते युरोप व आशिया खंडातील लोकांची अधिक प्रगती होऊ शकली कारण तेथील लोकांनी विद्या व शिक्षण यांचे महत्त्व समजून घेतले होते. परंतु भारतीयांना हे विद्येचे महत्त्व समजले नसल्यामुळे त्यांची प्रगती होऊ शकली नाही. त्यांच्या मते भारतीय लोक हे पुराणमतवादी होते. आधुनिकतेचा स्वीकार करून आपली प्रगती करावी असे त्यांना वाटत नव्हते कारण न्याय आणि वेदांत याहून वेगळे कोणते शास्त्र नाही असा त्यांचा समज होता. बाळशास्त्रींच्या मते ही पुराणशास्त्रे जी भारतात होती ती आजच्या कालखंडातही उपयोगी होती तथापि या शास्त्रांशिवाय ज्ञानाचा विस्फोट होऊन जी इतर शास्त्रे व विषय आधुनिक युगात अवतरली आहेत ती आत्मसात केल्याशिवाय खरी प्रगती होणार नाही. भारतीय समाज केवळ धर्माशी संबंधित ज्ञानामध्ये गुरफटला गेलेला असल्या कारणाने इतिहास, भूगोल व इतर शास्त्रे तसेच शिल्पकला, चित्रकला यासारख्या कलांमध्ये तो प्रगती करू शकला नाही. बाळशास्त्रींच्या मते येथील काही लोक श्रीमंत होते परंतु ते शिक्षणाकडे दुर्लक्ष करणारे होते. वस्तुतः त्यांनी विद्येच्या कामी पैसा खर्च करणे आवश्यक होते परंतु ते तसे न करता त्यांच्याच चैन विलासात व्यस्त होते. अगदी अनावश्यक विविध खेळात हे लोक पैसा खर्च करायला तयार होते परंतु शिक्षणासारख्या पवित्र कार्याला मात्र हेच श्रीमंत लोक आपले दारिद्रय दाखवायलाही कमी करत

नव्हते. समाजात बहुसंख्य लोक दरिद्री होते आणि दुःख भोगत होते. त्यांनाही खूप वाटत होते की आपण श्रीमंत व्हावे व या दुःखातून आपली मुक्ती व्हावी परंतु शिक्षणाचा अभाव असल्याने हे शक्य होत नव्हते. म्हणजेच योग्य शिक्षण नसल्यामुळे समाजात मूठभर श्रीमंत व बहुसंख्य दरिद्री व अन्याय सहन करणारे असे दोन गट निर्माण झालेले होते. समाजातील हे चित्र शिक्षणाशिवाय बदलू शकणार नाही असे बाळशास्त्रींना वाटत होते. आपले विचार स्पष्ट करण्यासाठी बाळशास्त्रींणी 'दर्पण' या वृत्तपत्रात 'विद्या हे बळ' या शीर्षकाचा लेख लिहिला होता त्यात त्यांनी 'रिफॉर्मर' या वृत्तपत्रातील संदर्भ दिलेला होता. त्यात त्यांनी लिहिले होते की, "आतां समय असा आला आहे कीं, सर्व राज्यांतील लोकांनी सज्ञान दशेस चढावें, किंवा तिरस्कार आणि दुःख यांत पडावें. या काळांत संपत्ति म्हणजे सज्ञानपणा आणि विद्या व कळा यांचा अभ्यास; म्हणजे ती यापासूनच प्राप्त होत्ये, असें झालें आहे."[२१] म्हणजेच भारतीय लोकांनी आपला अडाणी म्हणून होणारा तिरस्कार व दुःख रोखण्यासाठी शिक्षणाची कास धरावी असे त्यांच्या विचारांतून दिसून येते.

खरी संपत्ती ही पैसा नसून आपल्याकडे असलेले ज्ञान व कला हीच असते. याच ज्ञानाच्या आधारे आपण पाहिजे तेवढी संपत्ती चांगल्या मार्गाने कमवू शकतो. शिक्षणामुळे आपली झालेली अवनती स्पष्ट करताना बाळशास्त्रींनी पाश्चिमात्य देशाचेही उदाहरण दिलेले होते. मुळात पाश्चिमात्य देशांची एवढी प्रगती झाली याचे कारण केवळ त्यांच्याकडील शिक्षणच होते. भारतासारख्या देशावर ब्रिटिश आपले साम्राज्य प्रस्थापित करू शकले याचे सर्व श्रेय त्यांच्या शैक्षणिक विकासाला जाते. त्यांनी शोधलेल्या विविध तंत्रज्ञानाने व विविध कारखान्यांमुळे त्यांना भारतासारख्या वसाहतीची गरज निर्माण झाली. जे लोक केवळ भारतात व्यापारी म्हणून आले ते अल्पावधीतच सत्ताधीश झाले याचे कारण म्हणजेच सुशिक्षितांना अशिक्षित लोक अंकित करणे अगदी सहज सोपे जाते. म्हणजेच भारताला एवढे वर्षे पारतंत्र्यात रहावे लागले याचे कारण वैचारिक जागृती त्यांच्यात नव्हती. बाळशास्त्रींच्या मते शिक्षणाच्या अभावाने समाजात दुःख, दारिद्रय यासारख्या समस्या निर्माण तर झालेल्या होत्याच त्याचबरोबर समाजात सुसंस्कृतपणाही राहिलेला नव्हता. विविध प्रथा, चालिरिती, अंधश्रद्धा,

खोटे रीतीरिवाज यामध्ये समाज गुरफटला गेला होता. लोक या वाईट चालिरितींच्या गुलामगिरीमध्ये अडकलेले होते. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी लोक किती लाजिरवाणी कृत्ये करायची याचेही वर्णन त्यांनी 'दर्पण'मध्ये केलेले होते. त्यात ते म्हणतात की, "कसबिणीच्या मंडळया लहान मुली विकत घेऊन चालतात. आणि त्या विकत घेणारे पुरूषांचा उद्योग हाच असतो कीं, दरिद्री आणि दुःखी यांची घरें शोधावीं; आणि कोणी गरीब बिचारा माणुस किंवा कोणी निर्धन विधवा असेल तिला कांहीं द्यायाचें करून मुलांवरची माया दूर होई असें करावें; आणि आपल्या अभद्र युक्ति आणि यत्न हीं सिद्धीस गेलीं, ह्मणजे त्या पोरास काठे दूरचे शहरांत घेऊन जावें. तेथे तें लागलेंच विकायास कठीण पडत नाहीं, आणि जर तें पोर सुंदर बायको व्हायाजोगें असलें तर अगदीं कठीण पडत नाहीं. वर लिहिलेले माणुस कधीं कधीं लोकांची मुलें चोरून नेतात हेंही असेंच प्रसिद्ध आहे."[२२] म्हणजेच समाजात असे काही लोक होते की ते गरीब कुटुंबे किंवा विधवांच्या मुली अथवा मुले विकत घेत व मोठया शहरात जाऊन त्या मुलास किंवा मुलीस विकत असत. काही प्रसंगी तर मुले चोरून विकण्याचेही प्रकार घडत होते. एकूणच मुलांचा व्यापार तत्कालीन समाजात होत होता. नाच, तमाशे, व्यसनाधीनता, बाटविण्याचे प्रकार अशा कितीतरी वाईट चालिरितींनी समाज अधोगतीस गेलेला होता.

ब्रिटिशांच्या प्रयत्नांनी भारतात व पर्यायाने महाराष्ट्रात शाळाही स्थापिल्या गेल्या परंतु या शाळा आपल्या फायद्यासाठी आहेत हे समजण्यासाठी भारतीयांना कित्येक वर्षाचा काळ जावा लागला. झोपलेल्याला जागे करता येत परंतु जे झोपचे सोंग करतात त्यांना जागे कोण करणार? अशी काही एकूणच समाजाची परिस्थिती होती. ब्रिटिशांनी ज्या गावांत शाळा सुरू केल्या त्या गावची लोकसंख्या किमान दोन हजार असणे बंधनकारक होते. कारण अनेक ठिकाणी शालेय गटातील मुलांची संख्या अधिक असली तरीही प्रत्यक्ष शाळेत जाणारे केवळ तीन ते चार जण असायचे. त्यातही ब्राह्मणच अधिक असायचे. एवढया मोठया प्रमाणात शिक्षणाविषयी उदासीनता एकोणिसाव्या शतकात होती.

## ५) शिक्षणामध्ये इंग्रजी भाषा व मातृभाषेचे महत्त्व

इंग्रजी भाषेला जगातिक ज्ञानाचे प्रवेशद्वार मानले जाते. लॉर्ड मेकॉलेने भारतीय शिक्षणासाठी मिनिट तयार केले होते त्यातही त्याने इंग्रजी भाषेला विशेष महत्त्व देऊन शिक्षणाचे माध्यमच इंग्रजी असावे असे सूचित केले होते. बाळशास्त्री जांभेकरांनीही इंग्रजी भाषेला महत्त्व दिलेले होते. त्यांनी स्वतःच इंग्रजी भाषेवर प्रभुत्त्व संपादित केलेले होते. याशिवाय दर्पण वृत्तपत्रातील इंग्रजी अनुवाद ते स्वतः करायचे. मरे यांच्या व्याकरणाचा संक्षेप या ग्रंथाचे भाषांतर राघोबा जनार्दन वसईकर यांनी केलेले होते, त्यास शुद्ध करण्याचे काम बाळशास्त्रींनी केले होते. या भाषांतराच्या प्रस्तावनेत बाळशास्त्रींनी इंग्रजी भाषेचे महत्त्व सांगितलेले होते. त्यात त्यांनी लिहिले होते की, "या देशचें राज्य सांप्रत इंग्लिश लोकांच्या हातीं गेलें आहे, ह्मणोन त्यांची भाषा, स्थिति, व रीति जाणण्याचा मोठा उपयोग आहे. इंग्लिश भाषा शेंकडों वर्षांपासून सुधारत आली आहे; व त्या भाषे मध्यें शास्त्रें, कळा, इत्यादि सर्व विषयांवर सहस्त्रशः ग्रंथ आहेत, त्यांचें यथार्थ ज्ञान ती शिकल्याविना होणें अशक्य आहे. प्रस्तुत इंग्लिश भाषेचें ज्ञान, बहुतांस, उत्तम रीतीची उपजीविका संपादन करण्याचें साधनही होत आहे. या कारणांस्तव, सांप्रत आमच्या देशच्या लोकांतून इंग्लिश भाषा शिकण्याचा उद्योगास लागले असे थोडे नाहींत; व या पुढें आणखीही बहुतांस तिचा अभ्यास करण्याचा प्रसंग येईल."[२३] बाळशास्त्रींच्या मते इंग्रजी भाषेमध्ये अगाध ज्ञान समाविष्ट आहे कारण सर्वात अधिक संख्येने ग्रंथ लिखाण हे इंग्रजी भाषेशिवाय इतर कोणत्याही भाषेत झालेले नाही. इंग्रजी भाषेचा पर्याय आज खुला असल्याने कोणत्याही विषयाचे ज्ञान मिळविण्याच्या आज मर्यादा राहिलेल्या नाहीत. त्यामुळे इंग्रजी भाषा शिकणे ही बाब अगत्याची आहे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मते इंग्रजी भाषेच्या अभ्यासामुळे सर्वांचे जीवन सुखी व समृद्ध झाल्याशिवाय राहणार नाही.

बाळशास्त्रींनी इंग्रजी भाषेचे महत्त्व सांगितले याचा अर्थ ते मातृभाषेला विरोध करतात असे नव्हते. त्यांच्या मते इंग्रजी भाषेबरोबरच स्थानिक किंवा मातृभाषेचा अभ्यास होणेही

तितकेच महत्त्वाचे होते. किंबहुना इंग्रजी भाषेतील ज्ञान जे संपादित करावयाचे असते ते स्थानिक भाषेचा अभ्यास पूर्ण झाल्याशिवाय होणे कठीण असते असे विचार त्यांनी मांडलेले दिसून येतात. बाळशास्त्री जांभेकरांनी Qualifications necessary for Superior offices या लेखांत एज्युकेशन सोसायटी समोरील अडचणी स्पष्ट केल्या होत्या. "We stated on another occasion that the Native Education Society finds it extremely difficult to induce boys to learn reading and writing their own language previous to the commencement of their English studies. The anxiety of the parents to have their children early instructed in the English language is so great, that they do not see the necessity of their children being taught to read and write their own; and the Institution alluded to has to encounter a great opposition in enforcing its rule of admitting no boy into the English School who does not possess that qualification."[२४] यावरून स्पष्ट लक्षात येते की केवळ इंग्रजी भाषेचाच विचार करून काही विद्यार्थी विशेषत्त्वाने त्यांचे पालक मराठी भाषेकडे दुर्लक्ष करतात. आज २१ व्या शतकात आपल्या पाल्याला केवळ इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळावा म्हणून पालक अगदी लहान वयातच त्याच्यावर इंग्रजी भाषेचे ओझे टाकतात व त्याची इंग्रजी भाषेचीच तयार करून घेतात. यामुळे त्या विद्यार्थ्याचे मूळ मातृभाषेकडे दुर्लक्ष होते. कोणतीही परकीय भाषा ही मातृभाषेच्या आधारानेच शिकता येते त्यामुळे भारतीयांसाठी इंग्रजी भाषाही त्याला अपवाद नाही. शेवटी त्या विद्यार्थ्यास त्याची मातृभाषाही चांगली येत नाही व इंग्रजी भाषाही चांगली येत नाही. अशी स्थिती निर्माण झाली की, त्यामुळे शिक्षणाविषयी अनास्था निर्माण होते. शिक्षण हे आपल्याच्याने शक्य नाही असा गैरसमज निर्माण होतो. थोडक्यात बाळशास्त्रींच्या मते इंग्रजीचे ज्ञान अत्यावश्यक आहे, तथापि काही वर्षे स्वतःच्या मातृभाषेचे ज्ञान पुरेसे अवगत झाल्यानंतरच इंग्रजी भाषेचा अभ्यासक्रम शाळेत ठेवला जावा.

बाळशास्त्रींनी यापुढे जाऊन विचार केला होता की, स्थानिक भाषा व इंग्रजी भाषा यांचे वाचन व लेखन करता आले म्हणजे आपण ज्ञानी झालो असे म्हणता येत नाही. बहुतांश लोकांचा असा गैरसमज असतो की, आपल्याला ठराविक भाषेत लिहिता वाचता येते म्हणजे आपण खूप ज्ञानी आहोत. याविषयी बाळशास्त्रींना वाटत होते की, भाषा या केवळ ज्ञान

प्राप्त करण्याचे माध्यम असतात. लिहिणे वाचणे आले म्हणजे माध्यम कळले खरे ज्ञान प्राप्त करणे हे त्या पुढील पायरी असते. या अनुषंगाने बाळशास्त्री म्हणतात की, "We are of opinion that unless a native has a thorough knowledge of his own tongue and one or more of the classical languages of his country, combined with liberal acquisitions in English, his services can be of no very great benefit to the Government or the country. We would, therefore, hail with joy the establishment of some plan by which the oriental and the western literature and science can be imparted together to the native mind. Then and then alone will all the 'benefits expected from education develop themselves; and it will prove a real blessing to the country, by improving its political and moral condition."[२५] बाळशास्त्रींच्या मते जोपर्यंत भारतीय विद्यार्थ्याला स्वतःच्या मातृभाषेचे पूर्ण ज्ञान होत नाही व त्यानंतर तो भारतातीलच एखादी इतर सर्वमान्य व शास्त्रीय भाषा तसेच इंग्रजी भाषेच ज्ञान संपादित करीत नाही, तोपर्यंत त्याला विशेष ज्ञान संपादित करता येत नाही. त्याचबरोबर त्याच्या अल्पज्ञानाचा देशहितासाठीही काहीच उपयोग होत नाही. यासाठी बाळशास्त्रींनी भारतीय विद्यार्थ्याला पौर्वात्य साहित्याबरोबरच पाश्चिमात्य साहित्य व शास्त्रे यांचा अभ्यासक्रमात समावेश असावा असे सुचविले होते. भारतात जर राजकीय व सामाजिक सुधारणा करायची असेल तर अशा ज्ञानाशिवाय पर्याय नाही असे मत त्यांनी मांडलेले होते. थोडक्यात विचार करता आज महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणमंडळाच्या अभ्यासक्रमात त्रिभाषा सुत्र राबविले जाते विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांचा अभ्यास करावा लागतो. हे त्रिभाषा सुत्र बाळशास्त्रींनी एकोणिसाव्या शतकातच आपल्या शिक्षण विचारांमध्ये मांडलेले होते असे दिसून येते.

## ६) बाळशास्त्री जांभेकरांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात शिक्षणाविषयी प्रचंड अनास्था होती. इंग्रजांच्या प्रयत्नाने व महाराष्ट्रातील काही सुधारकांच्या मदतीने शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण होत होती. ही जागरूकता पुरूष शिक्षणाविषयीच होत होती. स्त्री शिक्षणाच्या बाबतीत मात्र समाज पुढे येण्यास तयार नव्हता. हिंदुस्थानमध्ये स्त्रियांसंबंधी अनेक अनिष्ट

प्रथा होत्या ज्यामुळे समाजाची अधिकाधिक अवनती होत चाललेली होती. स्त्रियांवर लादल्या जाणाऱ्या अवास्तव बंधनांमुळे आणखी वाईट चालिरिती वाढत चालल्या होत्या. बाळशास्त्रींनी 'पुनर्विवाह प्रकरण' हा पोथीवजा ग्रंथ लिहिला होता. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी या अडचणी सांगितल्या होत्या. त्यात त्यांनी लिहिले होते की, "या हिंदुस्थानामध्यें ज्या जातींत पुनर्विवाह नाहीं, त्या जातींत बालविधवा ज्या होतात, त्या व्याभिचार, गर्भपात, बालहत्या, वर्णसंकर, असें पापकर्म करितात; कोणी तर भलत्याचेच घरीं जाऊन शिरतात; त्याला घेऊन पळूनही जातात. तरीं ह्या बऱ्या, कांकीं, आपणच जातिभ्रष्ट होतात; परंतु वर्णसंकर करीत नाहींत. ज्या कांही गुप्त पाप करितात, त्या तर कुलासच भ्रष्ट करितात."[२६] बाळशास्त्रींच्या मते जर बालविवाह व विधवा पुनर्विवाहबंदी यासारख्या प्रथा समाजात नसत्या तर वरील दोष समाजात उत्पन्न झालेच नसते. म्हणजेच समाजातील अनिष्ट प्रथांमुळेच स्त्रिया व्याभिचारास प्रवृत्त होतात परंतु हा दोष केवळ स्त्रीचाच आहे असे मानून तिचे जीवन आणखी बंदिस्त करण्याचा प्रयत्न पुरूष वर्गाकडून केला जातो.

बाळशास्त्रींच्या मते पुरूषांना जर पुनर्विवाहाचा हक्क होता तर तो स्त्रियास का असू नये. मुळात स्त्रियांच्या या समस्यांविषयी कोणी बोलण्यास तयार नव्हते कारण समाजात स्त्री शिक्षणाचा अभाव होता. पुरूष वर्गालाच स्त्रीने शिक्षण घेऊ नये असे वाटत होते कारण शिक्षणामुळे स्त्रिया बिघडतात असा समज लोकांचा होता. स्त्रियांनी केवळ घरात बसून पोथ्यापुराणात जे ज्ञान सांगितले तेवढेच आत्मसात करावे. असे केल्यामुळे स्त्रिया बिघडत नाहीत असे मानले जायचे परंतु बाळशास्त्री युरोपियन स्त्रियांचे उदाहारण देऊन स्पष्ट करतात की, "युरोपियन लोकांमध्यें सर्व स्त्रियांस विद्याभ्यास पुरूषांप्रमाणेंच असतो. त्या कोणत्या बिघडल्या? हिंदुस्थानच्या कोणत्या परिशुद्ध आहेत? बरें, वाईट, सर्वत्र राहतें; परंतु त्यांमध्ये वाईट थोडें, येथें बरें थोडें, हें प्रत्यक्ष सिद्धच आहे."[२७] म्हणजेच जर युरोपातील स्त्रियांचा शिक्षणक्रम हा पुरूषांप्रमाणेच एकत्रित सहयोगी शिक्षणाच्या पद्धतीने चालत असतानाही जर तेथील स्त्रिया बिघडत नाहीत तर भारतातही अशा प्रकारचे शिक्षण सुरू केले तर स्त्रिया निश्चितच बिघडणार नाहीत. म्हणजेच स्त्रियांना नेहमीच अज्ञानी ठेवले जावे यासाठी भारतीय

पुरूषांनी काढलेली ती एक पळवाट होती असेच म्हणावे लागेल. एकूणच स्त्री व पुरूष अशा दोन्ही घटकांना उच्च प्रतीचे व सारखेच शिक्षण मिळावे असे बाळशास्त्रींच्या विचारांतून दिसून येते. अशा प्रकारच्या शिक्षणामुळे कुटुंबातील दोन्ही घटक सुशिक्षित व सुसंस्कारित होतील व त्यामुळे कुटुंबाचा विकास होण्यास मदत होईल याशिवाय स्त्रियांसंबंधी असलेल्या वाईट चालिरिती त्यातून बंद होतील व निकोप समाजाची निर्मिती होऊ शकेल असे बाळशास्त्रींच्या विचारांतून दिसून येते.

## ७) बाळशास्त्री जांभेकरांचे गुरू किंवा शिक्षकविषयक विचार

बाळशास्त्रींनी आपले जे चौतिस वर्षांचे आयुष्य होते ते सर्व शिक्षणकार्यासाठीच वाहिलेले होते. स्वतः एक आदर्श शिक्षक असल्यामुळे त्यांची एक आदर्श शिक्षक कसा असावा? याविषयी ठाम मनोभूमिका निर्माण झालेली होती. नॉर्मल क्लासमध्ये त्यांच्या हाताखाली शिक्षण घेणारे त्यांचे शिष्य केशव शिवराम भवाळकर यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रातून बाळशास्त्रींची शिक्षकाविषयीची मनोभूमिका लक्षात येते. त्यांच्या दृष्टिकोनातून उत्तम चारित्र्य हे आदर्श शिक्षकाचे खरे आभूषण असते. भवाळकर नॉर्मल क्लासमध्ये शिक्षक प्रशिक्षण घेत असताना बाळशास्त्री त्यांचे शिक्षक होते त्यावेळी भवाळकरांच्या कानात दोन मोत्यांच्या बाळया होत्या त्यावेळी बाळशास्त्रींनी त्यांना उपदेश केला होता की, "आलंकारभूषणाची योग्यता सद्गुणांचे आलंकारभूषणांपुढें यःकःश्चित होय. मनुष्यमात्र सद्गुणालंकारानें मढला तरच त्याची योग्यता."[२८] यावरून असे दिसून येते की, शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व हे बाह्यालंकारांनी खुलून दिसत नाही तर ते त्याच्या चारित्र्यात असणाऱ्या सद्गुणांनी खुलून दिसते. ज्या शिक्षकाकडे ज्ञान व सद्गुण आहेत त्याला इतर कोणतीही आभूषणे घालण्याची आवश्यकता नाही असे त्यांना वाटत होते.

बाळशास्त्रींच्या मते शिक्षक हा प्राचीनकाळी गुरूकुलात जसा गुरू असतो त्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. गुरूकुलातील गुरू पूर्वी स्वतः खूप अध्ययन करायचे, घोर तपश्चर्या करायचे व मिळालेले ज्ञान आपल्या शिष्यांना शिकवायचे. त्याप्रमाणेच आजच्या शिक्षकांनीही

अधिकाधिक अभ्यास करून स्वतः ज्ञानी होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. स्वतः शिक्षक ज्ञानी असेल तरच तो आपल्या विद्यार्थ्यांना चांगले ज्ञान देऊ शकेल. कोणताही शिक्षक आपण मिळविलेले संपूर्ण ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांना देऊ शकत नाही कारण ज्ञानदानालाही काही मर्यादा असतात असे त्यांना वाटत होते. एखादा खूप ज्ञानी असला तरी ते ज्ञान त्याला विद्यार्थ्यांसमोर जसेच्या तसे मांडता येईलच असे नाही. याशिवाय अध्ययनकर्ता जो विद्यार्थी असतो त्याची बुद्धिमत्ता, वय, मानसशास्त्र यागोष्टीही यात महत्त्वाच्या असतात. या अनुषंगाने बाळशास्त्री म्हणतात की, "गुरूस जर १० पट ज्ञान असेल तर तो शिष्यास १ पट देऊं शकेल, गरूस १०० पट तर तो शिष्यास १० पट देईल."[२९] म्हणजेच आपल्या विद्यार्थ्यांना अधिकाधिक ज्ञान दिलेच पाहिजे हे जर शिक्षकाचे कर्तव्य मानले तर शिक्षकाने अगोदर आपण स्वतः अधिकाधिक ज्ञान संपादित केले पाहिजे. एवढेच नाही तर बदलत्या काळानुसार त्याने आपले ज्ञान अद्ययावतही ठेवले पाहिजे.

एकोणिसाव्या शतकाचा विचार करता त्याकाळी शिक्षकी पेशा हा चांगला समजला जात नव्हता. उलट शिक्षण घेऊन कारकून होण्यात हा समाज धन्यता मानीत होता. परंतु ही परिस्थिती बदलून अधिकाधिक लोकांनी कारकून होण्यापेक्षा शिक्षक व्हावे यासाठी बाळशास्त्री नॉर्मल क्लासमधील विद्यार्थ्यांना उपदेश करीत होते. त्यांच्या मते समाज परिवर्तनाची ताकद ही केवळ शिक्षकातच असते. शिक्षकच आपल्या ज्ञानाचा प्रभाव समाजावर पाडू शकतो व त्यास विद्याभ्यास करण्यास प्रवृत्त करून स्वदेशाभिमान निर्माण करू शकतो. त्यांच्या मते शिक्षकात आणखी एक गुण असावा तो म्हणजे शिस्तप्रियता हा होय. त्यांनी शिक्षकाचा हा गुण स्वतःच्या उदाहरणावरून सांगितलेला होता. ते स्वतः अध्यापन करीत असताना अगदी प्रसन्न मुद्रेने व आनंदाने शिकवायचे परंतु विद्यार्थ्यांचे गैरवर्तन मात्र ते खपवून घेत नसायचे. विद्यार्थीदशेत व्यक्तीला स्वतःच्या जबाबदारीची फारशी जाणीव नसते व त्यामुळे अशा परिस्थितीत बऱ्याचशा विद्यार्थ्यांचा कल हा अभ्यास टाळण्याकडे वाढत जातो. तसे होऊ न देण्याची जबाबदारी शिक्षकावर असते. वर्गात अध्यापन करीत असताना शिक्षकाचे विद्यार्थ्यांवर लक्ष असतेच परंतु वर्गात नसतांनाही विद्यार्थ्यांकडे लक्ष ठेवून शिक्षकाने आपल्या

वर्गाची शिस्त राखायला हवी. बाळशास्त्री जांभेकर स्वतः विद्यार्थ्यांत शिस्त कसे टिकवायचे याविषयी केशव शिवराम भवाळकर आपल्या आत्मचरित्रात लिहितात की, "गैरवर्तणूक व विद्याभ्यासाकडे अलक्ष हें त्यांस अगदीं पसंत नसे. ते सुटींत दूरवरून एकादें पुस्तक वाचित असतांही मधून मधून विद्यार्थ्यांकडे अवलोकन करित असत व जाची गैरवर्तणूक जा रोजीं दृष्टोत्पत्तीस सुटींत किंवा अभ्यास चालतांना आली किं त्यांनी हाजरी बुकांत फुली करून खालीं तें वर्तन लिहून ठेंवावें. त्यामुळें अधिक भय वाटत असे. वेळेस हजर झाला नाहीं किंवा लबाडीने आजारीपणाचें सोंग करून राहिला किंवा विषय लिहून आणले नाहींत तर तेव्हां त्याचे नावावर फुली करून हाजरीपटावर लिहून ठेवित असत."[३०] यावरून शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांविषयी अगदी इत्यंभूत माहिती ठेवणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे असे त्यांना वाटत होते. आज महाराष्ट्राच्या प्राथमिक शिक्षणामध्ये 'अकारिक मूल्यमापन' ही नवीन संकल्पना विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी वापरली जात आहे. या पद्धतीत विद्यार्थ्यांच्या दैनंदिन नोंदी ठेवणे आवश्यक आहे. वास्तविक विद्यार्थी निरीक्षण ही पद्धत नवीन नसून बाळशास्त्री जांभेकर स्वतःच्या विद्यार्थ्यांच्या निरीक्षणाच्या ज्या दैनंदिन नोंदी ठेवत असत त्याच पद्धतीवर अधारभूत आहे. या पद्धतीत शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून त्यांच्या आवडी निवडी, त्यांच्या सवयी, त्यांचा स्वभाव, त्यांच्या आवडीचा विषय, त्यांचे मित्र याविषयी नोंद करून त्याला योग्य ते मार्गदर्शन वेळच्यावेळी करणे अभिप्रेत आहे.

शिक्षकी पेशाचा संबंध बऱ्याचदा त्याला किती पगार मिळतो याच्याशी लावला जातो. चांगला पगार मिळाला तर शिक्षक बनायचे व अधिक पगार मिळत नसेल तर हा पेशा स्वीकारायचा नाही असेही प्रकार त्याकाळी घडायचे. अर्थात याला आजचा कालखंडही अपवाद नाही. आज केवळ पगारी नोकरी मिळेल या हेतूने डी.एड व बी.एड करणाऱ्यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. बाळशास्त्रींच्या दृष्टिकोनातून शिक्षकाने आपल्या कामाचा संबंध पगाराशी जोडू नये. विद्यादान करणाऱ्या शिक्षकास त्याचा व त्याच्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी ठराविक एवढे वेतन निश्चितच मिळणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे बाळशास्त्री शिक्षकांविषयी हितावह विचार करणारे होते. शाळा

तपासनीस या नात्याने जर एखाद्या शिक्षकावर शिक्षामंडळीकडून अन्याय होत असेल तर ते स्वतः याबाबतीत लक्ष घालायचे. 'दर्पण' मध्ये दि.९ नोव्हेंबर १८३२ रोजी त्यांनी 'शिक्षा मंडळीस सरकारांतून मिळणारा पैका कमी केला' या नावाचा लेख प्रकाशित केला होता. त्यात मंडळीकडून एका युरोपियन शिक्षकावर जो अन्याय झाला होता त्याविषयी त्यांनी लिहिले होते. "मुंबई मध्यें शिक्षा मंडळीचा शाळेंतील युरापीयन मुख्य पंतोजीनें त्यांची चाकरी सोडली, किंवा त्या साहेबाचा पगाराविषई सभेमध्यें कांही बनून न आलें यास्तव त्यास काढून टाकले हें ऐकून आम्हांस वाईट वाटतें... मूख्य पंतोजीस जी एक गोष्ट घडून आली, ती इतकी अयोग्य आहे कीं तीज विषई काहीं सुचना केल्या वांचून राहवत नाहीं, परंतु तीज विषई आम्हीं इतकेंच म्हणतों कीं शिक्षा मंडळीचे चाकरींत राहावयास जे कोणी जातात त्यांचा हितावह अथवा दयेकरितां विचार ती मंडळी करते असें तेणें करून कोणाचा मनांत येणार नाहीं."[३१] यावरून बाळशास्त्री जरी शिक्षामंडळी सोबत स्वतः शिक्षण कार्यात सहभागी होते तरी शिक्षामंडळीच्या चुका असतील तर त्यांच्या चुकीच्या निर्णयाबरोबर ते कधीच नसत. त्यांच्या मते शिक्षक स्वतः आपले संपूर्ण जीवन शिक्षण कार्याला वाहून घेतो त्यामुळे त्याच्या आर्थिक हिताचाही विचार व्हायला हवा.

## ८) ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणाविषयी बाळशास्त्री जांभेकरांचे विचार

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांनी भारतीयांसाठी शिक्षणाचा पाया घतलेला होता. मुंबई प्रांताचा विचार करता एलफिस्टन या गव्हर्नरने शैक्षणिक कार्य हाती घेतले होते. सुरूवातीच्या काळात हे शैक्षणिक कार्य अगदी मनापासून राबविण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केलेला होता. त्यामुळे महाराष्ट्रात शैक्षणिक जागृती होण्यास सुरूवात झाली होती. ब्रिटिशांनी केलेल्या या कार्याचा बाळशास्त्रींनी 'दर्पण' या पत्रातून गौरव केलेला होता. 'विद्या हे बळ आहे' या लेखात शिक्षामंडळीने चालविलेल्या मुंबईतील शिक्षण कार्याविषयी त्यांनी समर्थन केले होते. या अनुषंगाने ब्रिटिशांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन किती चांगला होता हे सांगतांना बाळशास्त्री लिहितात की, "ही मंडळी सुमार दाहा वर्षांचे पूर्वी नामदार एल्फिन्स्तन साहेबांचे अमलाखालीं

उत्पन्न झाली. तिचें लक्ष्य हें आहे कीं, चांगली विद्याचीं मूळपुस्तकें या देशचे भाषांत करून, आणि शाळा घालून एथील लोकांस उपयोगी विद्या शिकवावी."[३२] म्हणजेच सुरूवातीला ब्रिटिशांनी भारतीय शिक्षणासाठी चांगले प्रयत्न केले होते असे निदर्शनास येते. शिक्षामंडळीच्या माध्यमातून मुंबई प्रांतात अनेक शाळा स्थापिल्या होत्या व त्यातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत चाललेली होती त्यामुळे उलट एतद्देशीय लोकांनी ब्रिटिशांना या कामी विरोध न करता त्यांना सहकार्य करावे असे बाळशास्त्रींना वाटत होते. तथापि ब्रिटिशांनी नंतरच्या काळात मात्र भारतीय शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले नाही असे त्यांना वाटते त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर नंतर टीकाही केलेली होती.

शैक्षणिक कार्य चालवित असताना ब्रिटिश सरकारकडून शिक्षा मंडळीस विविध ग्रंथ भाषांतरासाठी, अभ्यासक्रमासाठी, व शिक्षणासाठी चाळीस हजार ते पन्नास हजार रूपये मिळायचे परंतु ब्रिटिशांनी ही रक्कम कमी करून वीस हजार रूपयांपर्यंत आणली होती त्यामुळे निश्चितच शिक्षण कार्यात अडथळा निर्माण होणार होता. नेटिव्ह लोकांकरिता शिक्षणावर होणारा खर्च फार आहे तसेच प्रशासन चालविण्यासाठी येणारा खर्च खूप आहे म्हणून शिक्षणावरील खर्च ब्रिटिशांनी कमी केलेला होता. बाळशास्त्रींच्या मते जे लोक स्वतःस राज्यकर्ते समजून इतर देशांवर अंमल गाजवितात त्या लोकांनी तेथील जनतेत ज्ञानवृद्धी होण्यासाठी झटले पाहिजे. एवढेच नाही तर ज्यावर आपला अंमल आहे तेथील जनतेस शिक्षणाच्या माध्यमातून शहाणे करणे ही एक राज्यकर्त्यांची नैतिक जबाबदारी असते. यासाठी शिक्षणाच्याकामी पुरेसा खर्च करणे आवश्यक असते. ब्रिटिशांनी सुरूवातीला असा खर्च सुरू केला परंतु भारतीय लोकसंख्येचा विचार करता त्यात वाढ होणे अपेक्षित होते परंतु त्यांनी ही रक्कम न वाढवता उलट तिच्यात कपात केली होती. या अनुषंगाने बाळशास्त्रींनी 'दर्पण' मधून ब्रिटिशांच्या धोरणावर टीका करणारा लेख लिहिला होता. त्यात त्यांनी लिहिले होते की, "जेव्हां सामान्य मनुष्यें नेटिव लोकांची मनें बरी व्हावीं म्हणोन सर्व यत्न करतात; आणि अशा यत्नाचे चांगलें फळाचा दाखला, कलकत्याकडे पाहिले असतां चमत्कारीक आणि आश्चर्य द्यायास योग्य दिसून येतोः अशा समई, या देशांत जे त्याच कारणास्तव श्रम करतात, त्यांस

सरकारानें आजदीन पर्यंत जें साहित्य केलें होतें, त्यांतील एक मोटा अंश कमी केल्यानें, त्यांस इतके अश्रय हीण करावें आणि त्यांचा श्रमाचें फळ प्राप्त व्हाया करितां जे उपाय होते ते इतके कमी करावे, हा विचार केल्यानें आम्हांस फार दुःख होतें यांत संशय नाहीं."[३३] एकंदरीत बाळशास्त्रींना वाटत होते की, ब्रिटिशांनी केलेल्या चांगल्या कार्याचे फलित दिसण्यास सुरूवात झाली आणि लगेच त्यांनी या कार्यासाठी लागणारा निधी कमी केला होता. यात ब्रिटिशांचा स्वार्थी दृष्टिकोन दिसून येत होता. शिक्षणाने जनता शहाणी होऊन कदाचीत स्वातंत्र्याची मागणी करेल अशी भीती ब्रिटिशांना वाटत होती.

एकंदरीत वरील सर्वच मुद्यांचा विचार केला तर लक्षात येते की, निश्चितच बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांना एक तात्त्विक बैठक होती. आपल्या शैक्षणिक विचारांप्रमाणे त्यांनी स्वतः शिक्षणाचे कार्य संपूर्ण आयुष्यभर चालू ठेवले होते. त्यांच्या एकंदरीत कार्यपद्धतीवर 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'तील युरोपियन तज्ज्ञ प्राध्यापक, अधिकारी खूष होते. ज्याप्रमाणे वासुदेव बळवंत फडके हे क्रांतिकार्यात अग्रणी ठरलेले होते त्याप्रमाणेच बाळशास्त्री जांभेकर हे समाज सुधारणेत व शिक्षण कार्यात अग्रणी ठरलेले होते. शिक्षण कार्याच्या बाबतीत त्यांनी समाज व शासन यातील मध्यस्थाची भूमिका बजावून शैक्षणिक विकास कसा वाढेल यासाठी तळमळीने प्रयत्न केले होते. त्यांच्या अल्पायुषी जीवनामुळे निश्चितच महाराष्ट्राची प्रचंड हानी झाली होती. त्यांच्या मृत्यूच्यावेळी विविध वृत्तपत्रांनी त्यांना श्रद्धांजली वाहिलेली होती. त्यांनी सर्वांनी बाळशास्त्री जांभेकरांच्या कार्याचाच गुणगौरव केलेला होता. दि.१ जून १८४६ च्या अंकात ज्ञानोदय वृत्तपत्रात त्यांचे गुणगौरव पुढील शब्दात केलेले होते. "बाळगंगाधर शास्त्री मोठा विद्वान् होता आणि त्यास साहेब लोक व नेटिव लोकहि मानीत होते. महाराष्ट्रांतील सर्व नेटिव लोकांपेक्षां तो शिकलेला होता व आपल्या लोकांमध्यें विद्या वाढवावी असी त्याची इच्छा होती. त्याने आपल्या चांगल्या वर्तणूकीच्या योगाने व प्रोफेसरचें काम चांगले चालविल्याने कित्येक विद्यार्थी बरे सुधारले. त्यांतील कित्येकांनी विद्येची मोठी आवड धरून त्यासारिखेच विद्या वाढविण्याविषयी उत्कंठित व्हावें असी आमची इच्छा आहे."[३४] म्हणजेच युरोपियन प्रोफेसरदेखील त्यांना मान देत होते. ज्या व्यक्तीच्या

विचारांमध्ये शैक्षणिक बाबतीत परिपक्वता आलेली असते तीच व्यक्ती या कार्यात स्वतःला झोकून देऊ शकते. बाळशास्त्रींकडे समाजाला विधायक वळण देणारे शिक्षणविचार होते त्यामुळेच ते महाराष्ट्रातील आद्यसुधारक ठरले आहेत.

## ३.२ गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांचे शैक्षणिक विचार

### ३.२.१ लोकहितवादी यांचा अल्पपरिचय

गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८२३ मध्ये पुणे येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण पुणे येथील सरकारी मराठी शाळेतून झाले होते. त्यानंतर त्यांनी पुण्याच्या सरकारी इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला. लोकहितवादींनी सलग तीन वर्षे याच इंग्रजी शाळेत आपले शिक्षण घेतलेले होते. विशेष म्हणजे एक हुशार विद्यार्थी म्हणून आपली छाप त्यांनी या परकीय शाळेत देखील निर्माण केलेली होती. त्यांची हुशारी लक्षात घेऊन याच शाळेने त्यांची कारकूनाच्या नोकरीसाठीही शिफारस केली होती म्हणून त्यांनी ती नोकरी स्वीकारली होती.

त्यांच्याकडे असलेल्या इंग्रजी भाषेच्या उत्तम ज्ञानामुळेच त्यांना दक्षिणेतील सरदारांच्या एजंटच्या ऑफिसात ट्रान्सलेटरची नोकरी मिळाली आणि येथून पुढेच त्यांच्या खऱ्या सरकारी नोकरीची सुरूवात झाली. त्यांच्या नोकरीतील तत्परतेमुळे व कर्तव्यनिष्ठेमुळे त्यांचे उच्च पदावर प्रमोशन होत गेले. याशिवाय ते मुन्सिफसारख्या नेटिव्हांसाठी असलेल्या मानाच्या पदाच्या परीक्षाही देत होते. इ.सन १८४६ मध्ये लोकहितवादी मुन्सिफची परीक्षा पास झाले. इ.सन १८५२ मध्ये वाई या तालुक्याच्या ठिकाणी प्रथम वर्गाचे मुन्सिफ म्हणून त्यांची नेमणूक झाली. याशिवाय उत्तर विभागाचे सबअसिस्टंट इनाम कमिशनर, असिस्टंट कमिशनर, ॲक्टिंग असिस्टंट जज्ज, सेशन्स जज्ज, प्रिन्सिपल सदर अमीन, ॲक्टिंग जज्ज कोर्ट ऑफ स्मॉल कॉजेस, जॉईट जज्ज, डिस्ट्रिक्ट जज्ज मदतनीस अशा विविध पदांवर त्यांनी प्रामुख्याने

सातारा, वाई, पुणे, अहमदाबाद, अहमदनगर, सुरत, ठाणे, मुंबई, नाशिक अशा विविध ठिकाणी नोकरी केलेली होती.

त्यांनी भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' या वृत्तपत्रात 'लोकहितवादी' या टोपण नावाने केलेल्या लिखाणावरून ते लोकहितवादी म्हणूनच अधिक ओळखले जाऊ लागले. त्यांनी सरकारी नोकरी सांभाळून शतपत्रांचे व विविध सामाजिक विषयांवरील निबंधांचे लेखन करून समाजातील अपप्रवृत्तींचा समाचार घेतला. पोथ्या पुराणातील ज्ञान हे समाजाच्या प्रगतीस मारक असून समाजाने आधुनिक ज्ञानाचा स्वीकार करावा हा विचार त्यांनी आपल्या विविध लेखातून मांडला होता. समाजाच्या पाखंडीपणावर स्पष्टपणे व सडेतोड शब्दात मते मांडणे हे त्यांच्या मनाला नेहमीच पटलेले होते.[३५] समाजातील वैगुण्यावर लिखाण करीत असतानाच गरीब, अनाथ, रोगी, व रंजले गांजले यांची सेवा सुश्रृषा करण्यात त्यांना विशेष आनंद मिळत असे. समाजसुधारणेच्या कामी आपले आयुष्य वेचणारे लोकहितवादी यांचा शेवटचा काळ अतिशय दुःखात गेलेला होता. त्यांच्या मृत्यूपूर्वीच त्यांची तीन मुले व दोन मुलींचा मृत्यू झाला होता व या पुत्र शोकाच्या दुःखाने दि. ९ ऑक्टोबर १८९२ रोजी लोकहितवादींचा मृत्यू झाला.

## ३.२.२ लोकहितवादींचे शैक्षणिक कार्य

बाळशास्त्री जांभेकरांप्रमाणे लोकहितवादी यांनी प्रत्यक्ष शिक्षक, प्राध्यापक किंवा स्कूल इन्स्पेक्टर म्हणून योगदान दिलेले नव्हते तरीदेखील शिक्षण कार्याशी त्यांचा चांगला संबंध होता. सरकारी नोकरीत असताना लोकहितवादींना वाई, सातारा, पुणे, अहमदनगर, अहमदाबाद, मुंबई, ठाणे अशा अनेक ठिकाणी वास्तव्य करावे लागले होते. या सर्व ठिकाणी आपली नोकरी सांभाळून समाज सुधारणा करता यावी या दृष्टिकोनातून लोकहितवादींनी शैक्षणिक कार्यालाही हातभार लावला होता.

लोकहितवादींनी ब्रिटिश सरकार व दक्षिणा प्राईज कमिटीच्या माध्यमातून विविध ग्रंथ लिखाणासाठी विद्वानांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे प्रयत्न केले होते. पेशव्यांच्या कालखंडात विद्वान व ब्राह्मण मंडळींना श्रावण महिन्यात दक्षिणा देण्याची प्रथा सुरू झालेली

होती. जेंव्हा ही प्रथा सुरू झाली त्यावेळी विद्वानांनाच ती दक्षिणा मिळेल याची खबरदारी घेतली जाई. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात दक्षिणेमध्ये वाढ करण्यात आली होती व अनेक स्वतः विद्वान नसतानाच त्याचबरोबर मृत विद्वानांच्या नावावर दक्षिणा जमा करीत होते. हा सगळा संपत्तीचा अपव्यय असून दक्षिणा खऱ्या विद्वानांनाच मिळावी तसेच विविध ग्रंथ निर्मितीसाठी संपत्तीचा उपयोग व्हावा असे मत लोकहितवादींचे होते. लोकहितवादींनी ही दक्षिणा योग्य कामी खर्च करण्यासंबंधी सरकारला सुचविले होते. वैदर्भ (वऱ्हाड) वृत्तपत्रात लोकहितवादींच्या मृत्यूलेखात असे सांगण्यात आले होते की, "पेशवाईंतील 'दक्षिणा' चालू ठेवावी किंवा नाहीं याविषयीं अव्वल इंग्रजींत विचार चालू असतां यांनीं सरकारकडे असा अर्ज केला कीं, दक्षिणा मिळत असलेल्या ब्राह्मणापैकी बहुतेक ब्राह्मण, नांवाचे वैदिक व शास्त्री आहेत. फार थोडयांनीं वास्तविक वेद अथवा शास्त्रपठण केलें आहे. तरी देणें असेलच तर खऱ्या विद्वानांसच दक्षिणा द्यावी."[३६] यावरून लक्षात येते की लोकहितवादींनी इतर ब्राह्मण समाजाचा विरोध सहन करून ब्रिटिशांकडे अशी विनंती केली की, ही दक्षिणा खऱ्या विद्वानांनाच मिळावी. यातूनच पुढे दक्षिणा प्राईज कमिटीची स्थापना करण्यात आली व यातून विविध प्रकारच्या साहित्य लिखाणासाठी पारितोषिके देण्यास सुरूवात झाली. पुणे येथे पाठशाळा व इंग्रजीशाळा एकत्र करून डेक्कन कॉलेजची स्थापना करण्यात आली. त्यातूनच शिष्यवृत्त्याही देण्यात आल्या. वस्तुतः पेशव्यांच्या संपत्तीचा इतका विधायक पद्धतीने वापर याहून वेगळा होणे शक्य नव्हते.

लोकहितवादींनी गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून वेगवेगळया पद्धतीने त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यांनी विविध ठिकाणच्या ग्रंथालयांना सढळ हातांनी मदत केली. याचे मुख्य कारण गरीब विद्यार्थी हे होते. अनेक विद्यार्थ्यांना ज्ञान ग्रहणाची लालसा असते परंतु पुस्तके उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना शिक्षण घेता येणे शक्य होत नाही. त्याकाळी विशेषतः गरिबांना तर हे शक्यच नसायचे त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालये अशांसाठी महत्त्वाची ठरायची. याशिवाय लोकहितवादींनी अनेक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता. तसेच इतर जी मदत देता येईल ती देण्याचा ते

नेहमीच प्रयत्न करत होते. त्यांना एखादा विद्यार्थी हुशार आहे असे वाटले तर त्यास सर्वतोपरी मदत करून त्याच्या शिक्षणक्रमात खंड पडणार नाही याविषयी ते काळजी घ्यायचे. याबाबतीत श्यामजी कृष्ण वर्मा यांचे उदाहरण सर्वश्रूत आहे. त्यांनी श्यामजींची संस्कृतातून व्याख्याने घडवून आणली होती. याशिवाय शामजींना उत्तम शिफारस पत्रे देणे, त्यांच्या ऑक्सफर्डला जाण्यासाठी पैसे जमा करणे यासारखी मदत लोकहितवादींनी श्यामजी कृष्ण वर्मा यांना केलेली होती.[३७] एकूणच लोकहितवादींनी श्यामजींच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारीच पार पाडली होती.

लोकहितवादी नाशिक येथे नोकरी निमित्ताने असताना त्यांचा तेथे न्यायमूर्ती रानडेंशी संबंध आलेला होता व या दोघांच्या विचारातूनच त्यांनी 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी' या समितीची स्थापना झालेली होती. यावरून लोकहितवादींबाबत एक गोष्ट निश्चितच सांगता येऊ शकते की प्रत्यक्ष शिक्षणक्षेत्राशी त्यांचा संबंध नसतानाही त्यांनी शैक्षणिक कार्य आपल्या पद्धतीने सामाजिक बांधिलकी म्हणून चालू ठेवले होते. विशेषतः ग्रंथालये स्थापन करणे, व्याख्यानमालांचे आयोजन करणे, वक्तृत्व सभा स्थापन करणे, निबंध स्पर्धा घेणे, विविध विषयांवर ग्रंथ लिखाण करणे अशा विविध मार्गांनी आपले शैक्षणिक कार्य चालू ठेवले होते.

### ३.२.३ लोकहितवादींचे शैक्षणिक विचार

लोकहितवादींनी शतपत्रे व इतर जे निबंध लिहिले त्यातून त्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. शतपत्रांमध्ये व इतर निबंधांमध्ये समाजाची तत्कालीन स्थिती किती हालाखीची होती हे सांगतानाच अशी अवस्था समाजाची का निर्माण झाली याचेही विवेचन लोकहितवादींनी केले होते. त्यांच्या मते शिक्षण ही मानवी समाजास अत्यावश्यक अशी बाब होती. शिक्षणामुळेच समाजातील अनिष्ट प्रथा जाऊन समाज सुधारला जाऊ शकतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता. अज्ञान हे भारतीय जनतेच्या दुःखाचे मुळ कारण आहे हे त्यांनी ओळखले होते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रात विकास साधायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे विचार त्यांनी मांडलेले होते.

## १) शिक्षणाअभावी समाजाची अवस्था

लोकहितवादींच्या लिखाणातून समाजाच्या अज्ञानाविषयी त्यांच्या मनात विलक्षण चीड होती हे सहज लक्षात येते. त्यांच्या मते समाज हा डोळे असून अंध असल्यासारखाच होता. वस्तुतः शिक्षणाअभावीच तत्कालीन समाजाची एवढी प्रचंड दुर्दशा झालेली होती. लोकहितवादींचा कालखंड तसा महाराष्ट्राच्या बाबतीत राजकीय स्थित्यंतराचा कालखंड होता. कारण इ.सन १८१८ मध्ये ब्रिटिशांनी मराठेशाहीचा अस्त केलेला होता. लोकहितवादींच्या मते मराठयांचे राज्य गेले याला कारणही शिक्षणाचा अभाव हेच होते.

पेशव्यांच्या कालखंडामध्ये त्यांच्या उधळपट्टीच्या व चैनी स्वभावामुळे त्यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. पेशव्यांनी जनतेतील अज्ञान दूर करण्याच्या दृष्टिकोनातून कोणतीच उपाययोजना केली नाही. पेशव्यांच्या व प्राचीन हिंदू व मुस्लिम राजवटींच्या दरम्यान नाही म्हटले तरी काही प्रमाणात शास्त्री, पंडित, वैदिक, गवई इ. विद्वानांचा समुच्चय असायचा परंतु त्यांच्या विद्येचा उपयोग मात्र सर्वसामान्य समाजाला होत नव्हता. मुळात अशा विद्वानांची नेमणूक पेशव्यांकडून झालेली असल्याने त्यांना समाजाचे कुठल्याही बाबतीत घेणे देणे नव्हते. ते केवळ पेशवे कसे खुश राहतील असाच विचार करायचे. अशा या मूठभर विद्वानांबद्दल लोकहितवादींनी ‘स्वराज्यातील विद्वान’ या पत्रात लिहिले होते. त्यात ते म्हणतात की, “शास्त्री चार शास्त्रपारंगत विद्वान असला म्हणजे राजानें त्यास गांव व वर्षासनें द्यावीं, आणि मग शास्त्रीबाबाची गांठदेखील पडावयाची मुष्कील. सर्व दिवस घरांत बसून असावयाचे आणि सरकारचें वेतन खाऊन स्नानसंध्या, देवपूजा करावयाची. तींत सकाळपासून दोनप्रहरपावेतों सोवळे व दुपारून निद्रा आणि संध्याकाळीं क्षणभर बाहेर पडले तर पडले. वर्षासहामासीं जेव्हां कचेरीचें बोलावणें येईल, तेव्हां मात्र त्यांची विद्या बाहेर पडावयाची; पण तीही नेमलेले लोकांतच. तेथें भलत्यांचा प्रवेश व्हावयाचा नाहीं.”[३८] यावरून लक्षात येते की केवळ वेद पठण येते तेवढयावरच हे लोक स्वतःस ज्ञानी व विद्वान समजत होते. लोकहितवादींच्या मते खऱ्या विद्वानांचे काम हे समाजास ज्ञानी करणे हे असते परंतु हे शास्त्री केवळ पेशव्यापुरताच

आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्यास तयार असायचे. वास्तविक विचार करता पेशव्यांनीच या परिस्थितीत बदल करण्यासाठी प्रयत्न करायला हवे होते परंतु त्यांनी तसे केले नाही. पेशव्यांच्या काळात अशा पंडितांना लागलेली सवय पेशवाई संपली तरीही कायम राहिलेली होती. त्यामुळे ते केवळ आपल्या वतनांचा विचार करायचे समाजाचा त्यांना काडीमात्रही विचार सुचत नव्हता असे लोकहितवादींना वाटते.

लोकहितवादींच्या मते जी अवस्था शास्त्री पंडितांची होती तीच अवस्था वैद्य व गवयांचीही होती. वैद्य व गवयी आपली विद्या व कला केवळ राजाच्या उपयोगासाठीच आहे असे मानीत त्यामुळे गरीब व सामान्य जनतेला त्याच्या विद्येचा कुठलाही उपयोग नव्हता. गरीब व्यक्ती आजारी पडत असेल तर त्याला औषेधोपचार करताना भरपूर पैसा मिळाल्याशिवाय हे वैद्य जात नव्हते. लोकहितवादींना वाटत होते की, शास्त्री पंडितांनी आपल्याकडे असलेले ज्ञान मुक्तपणे सर्व सामान्य जनतेला द्यावे तसेच वैद्याने सर्वसामान्यांचा औषोधोपचार तर करावाच त्याचबरोबर आपल्या विद्येत इतरांनाही पारंगत करावे. हे त्यांचे समाजाच्या प्रती असलेले उत्तरदायित्त्व होते. मात्र हे लोक केवळ स्वतःचा स्वार्थ साधण्यातच व्यस्त असायचे. अशा प्रकारे हा वर्ग केवळ राजाच्याच दिमतीला असायचा. एकूणच विचार करता मराठयांचे राज्य गेले यास केवळ पेशवे जाबाबदार होते असे नाही. जर या समाजातील स्वतःस ज्ञानी समजणाऱ्या लोकांनी सर्वसामान्य जनतेलाही ज्ञानी बनविण्यासाठी प्रयत्न केले असते तर मराठयांच्या राज्यावर ब्रिटिशांचे वर्चस्व कदापि निर्माण झाले नसते.

लोकहितवादींच्या मते अज्ञानामुळे महाराष्ट्रीयन लोक अक्षरशः एखादा मृतदेह कुजतो तसे कुजून गेले होते. येथील राज्यकर्ते केवळ एकमेकांवर कुरघोडया करण्यात व्यस्त होते. याचाच फायदा ब्रिटिशांनी घेतलेला होता. महाराष्ट्रीयन लोकांची अशी अवस्था का झाली? या विषयी लोकहितवादी लिहितात की, "या लोकांत विद्या नाहीं. मोठे लोक आहेत, त्यांस तर विद्येविषयीं त्यांच्या बापाची शपथ आहे. त्यांचे हातास कधीं ग्रंथाचा स्पर्श झाला नाहीं व वडिलांपासून तो संस्कारच नाहीं. कोणी भीष्माचार्य वृध्ध असतील ते गीताबीता वाचतात. परंतु फळ काय? त्याचा अर्थ समजेल तर शपथ. हे विद्येचे व ज्ञानाचे वैरी लोक आहेत.

म्हणून यांची अशी दशा आहे."[३९] यावरून असे लक्षात येते की, लोकहितवादी तीन प्रकारच्या लोकांविषयी सांगतात. जे श्रीमंत लोक होते त्यांना आपल्या श्रीमंतीचा गर्व होता व विद्या ही बाब आपण संपादित करण्याची गरज नाही कारण आपल्या हातात सत्ता आहे असा त्यांचा समज होता. समाजात काही वृद्ध लोक धार्मिक ग्रंथांचे वाचन करायचे त्यातील ज्ञान त्यांच्या आकलनापलीकडे होते. ते वाचन केवळ पोपटपंची होते. सहाजिकच उर्वरित गट हा बहुसंख्य लोकांचा होता की ज्याला शिक्षण घेण्याची कुठलीही संधी उपलब्ध नव्हती. शिक्षण कशासाठी असते याचा जरासाही गंध या लोकांना नव्हता.

लोकहितवादींनी ही तत्कालीन महाराष्ट्राची व्यथा सांगितली परंतु संपूर्ण भारताची स्थिती ही याहून वेगळी नव्हती. त्यांच्या मते प्राचीन काळापासून भारतावर इराणी, तुर्की, आरबी व युरोपियन परकीयांनी आक्रमणे केली व येथे येऊन आपल्या सत्ता प्रस्थापित केल्या. आपल्याच मुलुखात येऊन या सर्वांनी आपल्या मानेवर जोखड ठेवून राज्य केले पण भारताला मात्र इतर कुठे आपले वर्चस्व प्रस्थापित करता आले नाही. भारतीयांकडे शौर्यत्त्व किंवा सामर्थ्य नव्हते असे नाही, मात्र त्यांच्या कडे आवश्यक शहाणपण नव्हते व यामुळेच आपले राज्य गेले. थोडक्यात राजकीय दृष्टिकोनातून विचार करता शिक्षणाअभावी खूप मोठे नूकसान भारतीयांचे झाले असे लोकहितवादींना वाटत होते.

सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला तर मात्र याही पेक्षा भयानक परिस्थिती दिसत होती. शिक्षणाअभावी समाजामध्ये अनेक अनिष्ट चालिरितींचे प्राबल्य वाढलेले होते. यामध्ये बालविवाह, सतिप्रथा, विधवांचा प्रश्न, अस्पृश्यता, जातीभेद अशा अनेक अनिष्ट प्रथांचे प्राबल्य वाढलेले होते. बालविवाहासारख्या प्रथेमुळे शिक्षणाचा जो कालखंड आहे तोच वाया जात होता. तत्कालीन समाजात लग्ने कमी वयात उरकण्याचा प्रघातच पडलेला होता. त्यापाठीमागे वधूपक्ष व वरपक्ष या दोन्ही गटांचा स्वार्थ असायचा. मुलगा पाच-सहा वर्षाचा झाला म्हणजे मुलाच्या पित्याला पुष्कळ हुंडा कसा मिळेल असा प्रश्न पडायचा व मुलीचा पिताही आपल्या मुलीस दगडाची धोंड मानून लवकारात लवकर घराबाहेर कशी काढता येईल

असा विचार करायचा. अशा परिस्थितीत मोठाली कर्जे घेऊन विवाह लावून दिले जायचे. हे सर्व समाजातील अज्ञानाअभावीच घडायचे असे लोकहितवादींचे मत होते. या पद्धतीचा तोटा सांगताना लोकहितवादी लिहितात की, "जो विद्या करण्याचा काळ व ज्या वयांत शरीर बळकट व्हावयाचें त्या समयीं पुत्र संसारी व मुलाबाळांचा धनी होतो. मग त्याची विद्या तरी कशी संपूर्ण होईल? आणि शरीरांत जोम कसा येईल?"[४०] म्हणजेच ज्या वयोगटात शिक्षण घेऊन सुसंस्कारित होणे अपेक्षित असायचे त्याच वयात व्यक्तीच्या शिरावर संसाराचे ओझे टाकले जायचे. या पद्धतीमुळे शिक्षण अधुरे राहते हा एक तोटा जरी बाजूला ठेवला तरी त्यातून इतर किती अडचणी निर्माण व्हायच्या हेही लक्षात घेण्याजोगे होते.

लोकहितवादींनी आपल्या शतपत्रांमध्ये पत्र क्रमांक आठ व पत्र क्रमांक तेरा मध्ये शिक्षणाअभावी समाजात विविध अंधसमजुती निर्माण झालेल्या होत्या त्या समाजासमोर मांडल्या होत्या. त्यामध्ये एकूण चाळीस प्रकारच्या वाईट समजुती व चालिरिती त्यांनी मांडल्या होत्या. त्यामध्ये 'ब्राह्मणांशिवाय अन्यवर्णाने विद्या अभ्यासू नये, ज्ञान व विद्या वाढवू नये कारण शहाणे व वेडे एका दराने विकतील असे भय स्वतःस शहाणे समजणारे लोक बाळगतात, जरी कोणी अपराध करूनही ब्राह्मणांची घरे भरली तरी त्यास पुण्यवान् असे जाणतात, देवब्राह्मणांकरिता कशीही कर्मे केली तरी चिंता नाही, विद्या पोट भरावयाकरितां शिकावी, व ती श्रीमंतांस शिकणे जरूर नाही, सर्व गोष्टी नशिबाने घडतात शहाणपण व उद्योग यांचा उपयोग नाही, सर्व सुख द्रव्यापासून आहे व त्यापलीकडे सुख नाही, मुले, नातवंडे झाली म्हणजे जन्माचे सार्थक झालें, उद्योग न करावा हें थोरपणाचें चिन्ह, संस्कृत विद्येखेरीज बाकीच्या विद्या व भाषा नरकाचे साधन आहेत, स्त्रियांनी विद्या शिकू नये कारण त्यामुळे व्याभिचार वाढेल, स्त्रियांचा पुनर्विवाह करू नये अन्यथा धर्म बुडेल, स्वार्थ पहावा, पुष्कळ पैसा उधळला म्हणजे लोकांत कीर्ती होते, स्त्रियांनी केला तो व्याभिचार व पुरूषांनी केला तो पुरूषधर्म'[४१] यासारख्या वाईट चालिरिती लोकहितवादींनी सांगितल्या होत्या.

तत्कालीन समाज इतका स्थितप्रज्ञ होता की, सहजासहजी या समजूती बदलण्यास तो तयार नव्हता. या सर्व गोष्टींविषयी लोकहितवादींच्या मनात विलक्षण चीड होती. कोणी एखादा सुधारक पुढे येऊन सुधारणावादी विचार मांडू लागला तरी समाजाला ते नकोसे वाटत होते. अशा लोकांचे सुधारकांच्या अगदी विरूद्ध विचार असायचे. याबाबतीत लोकहितवादी आपल्या लेखात लिहितात की, "आपले लोक ज्ञान संपादन करणें हे लहान मुलांचें काम असें समजतात, आणि शिकत नाहींत. आतां जे असें म्हणणारे आहेत, ते कांहीं जाणतात असें असतें, तर मी क्षमा केली असती; परंतु ते केवळ अडणीवरचे किंवा सांबापुढचे असून विद्येस असें तुच्छ मानितात व थोडें खावयास मिळूं लागलें म्हणजे आपली अप्रतिष्ठा होईल असें समजून वाचणें व अभ्यास करणें सोडून देतात याबद्दल वाईट वाटून त्यांचा फार राग येतो. दुसरें ज्यांजवळ द्रव्य आहे ते मदांध, त्यांस असे वाटतें कीं, आम्हांसारखे कोणीच नाहींत. विद्या काय आहे? विद्येचें सार जें द्रव्य तें अम्हांजवळ आहे, असें त्यांस वाटतें. व ते आपल्यास सूर्यचंद्राइतके उंच समजतात."[४२] यावरून तत्कालीन समाजाची स्पष्ट कल्पना येते की, शिक्षण हा शब्द केवळ शालेय शिक्षण यापुरताच मर्यादित मानला जायचा. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे असे मानणारा हा समाज नव्हता. केवळ थोडी संपत्ती आपल्याकडे आहे असे वाटले की त्यांना शिक्षणाची गरज आपणास नाही असे वाटायचे. लोकहितवादींच्या मते या समाजाची सर्वात मोठी शोकांतिका ही होती की, आपण अज्ञानी आहोत हेही त्यास समजत नव्हते.

शिक्षणाअभावी जशी सामाजिक अधोगती झालेली होती तशीच धार्मिक बाबतीतही खूप विकट अवस्था शिक्षणाच्या अभावाने झालेली होती असे लोकहितवादींना वाटत होते. धर्माच्या नावाखाली अनेक प्रथा समाजात वाढलेल्या होत्या. विशेषतः या अंधश्रद्धा चलाख भट-भिक्षुकांनी आपल्या स्वार्थासाठी सामान्य समाजावर लादलेल्या होत्या. एवढेच नाही तर मुळात उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण समाजातच अनेक अशा अंधश्रद्धा होत्या. ब्राह्मणांमध्ये समुद्र पर्यटन बंदी असल्यामुळे हे लोक परदेशात जात नव्हते. त्यामुळे खऱ्या ज्ञानाचा मार्ग त्यांना सापडत नव्हता. लोकहितवादींच्या मते "जर या लोकांत परदेशात

जाण्याचा अटकाव नसता तर आजपर्यंत याणीं कितीएक देश व कितिएक ठिकाणें पाहून तेथील ज्ञान, शहाणपण, रीती, कला, कौशल्य इत्यादी हिकडे आणलें असतें. परंतु लिहिणारे वाचणारे जे ब्राह्मण त्यांची नजर उत्साव, समाराधना, जेवणावळी यांजवर; कारण 'ब्राह्मणो भोजनप्रिय:' तेव्हां घरांत आळस, बाहेर मनाई."[४३] अशी एकंदरीत अवस्था त्यांची होती. परदेशगमन केले तर आपला धर्म बाटेल अशी भीती ते व्यक्त करीत असत. एकूणच परदेशगमनास बंदी घालून त्यांनी ज्ञानाचा जो खरा मार्ग होता तोच बंद केलेला होता. खरी ज्ञान लालसा सोडून कर्मकांडात गुरफटलेली अवस्था या लोकांची होती. आधुनिक ज्ञानाचा ते पुरस्कार करीत नव्हते. ईश्वरभक्तीच्या नावाखाली ही मंडळी लवकर उठून विविध धार्मिक विधी करायची व नंतर सर्वसामान्यांच्या फसवणूकीचे उद्योग करायची. त्यांच्या कार्यात कुठल्याही प्रकारचे समाजकल्याण व ईश्वर भक्ती नव्हती. लोकहितवादींच्या मते खरी ईश्वरभक्ती ही मानवसेवा असते. यासंबंधी ते एका पत्रात एका फारशी गोष्टीचा संदर्भ देतात. "एका अन्यायी राजानें एका पुण्यपुरूषास विचारलें कीं, मी ईश्वराचें भजन कोणत्या रीतीनें करावें? तेव्हां त्या साधूस त्याची वर्तणूक ठाऊक होती, म्हणून त्यानें उत्तर केलें कीं, ईश्वराचें भजन तुला उत्तम हेंच आहे कीं, तूं सर्व दिवस व रात्रीं निजत जा. तेव्हां राजनें पुसलें असें कां? तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, याचें कारण ईश्वराचें मुख्य भजन करणें म्हणजे जे जीव उत्पन्न केले त्यांतील ज्ञानी जीव जो मनुष्य त्याचें कल्याण करावें. आणि ही गोष्ट तुला निद्रा लागल्याखेरीज होणार नाहीं. कारण तुझ्या जागृतीनें कितीएक मेले जातील."[४४] या गोष्टीचा संदर्भ विचारात घेतला तर लक्षात येते की, राजा अन्यायी असल्याने त्याच्या जागेपणी प्रजेचे कधीही कल्याण साधणार नाही त्यामुळे तो झोपेतच असणे उचित होते.

एकंदरीत कोणताही धर्म मानवजातीचे कल्याण करा अशीच शिकवण देतो. थोडक्यात हे धार्मिक अंधश्रद्धेचे विचार शिक्षणाअभावी या समाजात निर्माण झालेले होते. याच धार्मिक अज्ञानाच्या समस्येतून लोक कर्जे काढून आणखी दरिद्री होत होते. विविध देवतेला वेगवेगळया प्रकारचे नवस बोलले जायचे व लोक त्यासाठी शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास

सहन करण्यास तयार असायचे. लोकहितवादींच्या मते एकूणच हा समाज असा होता की "अधर्म म्हणजे काय याचे त्यांस ज्ञान नाही. व धर्म याचा अर्थही कळत नाही."[४५] जर या समाजासाठी शिक्षण सुरू झालेले असते तर निश्चितच समाजाची दिशा आणि दशा याहून काहीशी वेगळी असती असे लोकहितवादींना वाटत होते.

लोकहितवादींच्या मते भारतात व महाराष्ट्रात शिक्षण नव्हतेच असे नाही. मुळात प्राचीन कालखंडाचा विचार केला तर इतर देशांपेक्षा भारताकडे शिक्षण अधिक होते. या अनुषंगाने लोकहितवादी पांडव काळातील विद्वत्तेविषयी समाजाला आठवण करून देतात. ते म्हणतात की, "पांडवांचे वेळेस हिंदू लोक मोठे ऐश्वर्यास आले आणि विद्या वगैरे त्यांणीं फार चित्त लाऊन शोधून काढिल्या. मोठे मोठे विद्वान व बुद्धिमान म्हणजे व्यास, वाल्मिक हे कवी, नारदासारिखे गायनशास्त्री, कपिलासारखे शास्त्रज्ञ, अर्जुनासारिखे युध्धकर्ते, धर्मासारिखे सत्यवक्ते इत्यादि प्रकारचे उत्तम लोक त्या काळीं होऊन गेले, आणि असे विद्वान, विचारशील लोक ज्या देशांत असतील त्या देशात काहीं न्यून पडेल हेंही अशक्य आहे."[४६] म्हणजेच प्राचीन काळातील सर्व विद्वान विविध शास्त्रे व कला यांच्यात पारंगत होते. त्यांच्यात खडतर परिश्रम करण्याची चिकाटी होती. विशेष म्हणजे एवढे परिश्रम करून जी विद्या त्यांना प्राप्त होत होती, ती विद्या ते समाजाच्या कामी उपयोगात आणत असत. अशाच प्रकारचे प्रयत्न एकोणिसाव्या शतकातील समाजाने करावेत अशी अपेक्षा लोकहितवादींची होती. नंतरच्या काळात भारतीयांमध्ये आळस निर्माण होत गेला. आपला जन्म उच्चकुलात झालेला असल्याने आपणास कुठलीही वेगळी विद्या संपादण्याची गरज राहिली नाही असे शास्त्री व पंडित मानू लागले होते. प्राचीन भारतात असलेल्या ज्ञान व विद्येचा आदर्श घेऊन इतर देशांनी ज्ञानाच्या बाबतीत प्रचंड प्रगती केली परंतु भारतीयांची मात्र अधोगती होत गेली. किमान भारतीयांनी आता इतर देशांच्या प्रगतीचा विचार करून तरी आपल्यात काही बदल करावेत असे लोकहितवादींना वाटत होते.

एकोणिसाव्या शतकात अनेक प्राकृत बोली भाषा निर्माण झालेल्या होत्या. त्यामुळे विद्येची भाषा संस्कृत झाली. सर्वसामान्यांसाठी संस्कृत भाषेतून शिक्षण घेणे कठीण झालेले होते. नंतरच्या काळात तर संस्कृत ही भाषा ही केवळ ब्राह्मण पंडिताची भाषा असे समीकरणच झाले होते त्यामुळे शिक्षण केवळ ब्राह्मणांसाठीच असते असे सर्वसामान्यांचे मत बनले होते. अशा वृत्तीतून शिक्षणाप्रती आस्था कमी होत गेली. काळाच्या ओघात निर्माण झालेल्या अडचणींना प्रारब्धाचा भाग मानण्यास सुरूवात झाली होती. या सर्व परिस्थिती बद्दल लोकहितवादींना खंत वाटत होती आणि त्यामुळे त्यांची शतपत्रातील भाषाशैली जर पाहिली तर त्यांचे प्रत्येक वाक्य हृदयापासून अगदी कळकळीने निघत होते. हेच शब्द तत्कालीन अज्ञानी लोकांना कठोर वाटत होते. आपल्या मनातील शिक्षणाविषयीची खंत व्यक्त करताना लोकहितवादी लिहितात "आमचे लोकांची अद्यापि अशी खात्री झाली नाहीं कीं, आम्हीं मूर्ख आहों. आम्हांस विद्या नाहीं, आम्हांस ज्ञान नाहीं, आम्हांस कांहीं कळत नाहीं, आम्ही गुणानें रिकामे झालों, आपल्या समजुती फार वांकडया आहेत; आम्हांस स्वदेशाची, पृथ्वीची, व्यापाराची व कलाकौशल्यांची माहितगारी नाहीं, आम्हांस सावधपणा नाहीं, आमच्या समजुती प्राचीन काळचे ग्रंथाचे अधारानें त्या पडल्या आहेत, त्या उपयोगी नाहींत. पुराणें वगैरे पोथ्यांत वेड लागावयाच्या गोष्टी पुष्कळ आहेत, त्यांपासून भलतींच मतें उत्पन्न झालीं."[४७] थोडक्यात भारतीय लोकांनी आपले अज्ञान ओळखावे अशी अपेक्षा लोकहितवादींची होती. भौतिकवादावर अधारित एवढया मोठया प्रमाणात ज्ञानाचा विस्फोट झालेला असताना भारतीय मात्र त्याच जुनाट पद्धतीच्या पोथी पुराणांवर अवलंबून राहून आपले जीवन अज्ञानात घालवित होते. एकूणच अशा प्रकारची परिस्थिती शिक्षणाअभावी एकोणिसाव्या शतकातील समाजाची होती.

## २) वृत्तपत्राच्या माध्यमातून शैक्षणिक विचारांचा प्रसार

लोकहितवादी ज्या ठिकाणी नोकरी निमित्त जात असत त्या ठिकाणी ते वृत्तपत्र निर्मितीला प्रोत्साहन देत होते. मुळात लाकहितवादींनी विविध विषयांवर विचार मांडणारे

समाजप्रबोधनपर 'शतपत्रे' भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' या वृत्तपत्रातून प्रकाशित केली होती. त्यात एकूण १०८ पत्रे त्यांनी प्रसिद्ध केली होती. त्या पत्रांतून त्यांचा सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, इंग्रजी राजवटीविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. लोकहितवादी हे पाश्चात्य भौतिक विद्येचे मोठे पुरस्कर्ते होते व या विद्येच्या प्रसारासंबधी जनतेत जागृती व्हावी या दृष्टिकोनातून लोकहितवादींनी स्वतः विविध वृत्तपत्र स्थापनेत पुढाकार घेतलेला होता. यामध्ये पुणे येथे ज्ञानप्रकाशच्या स्थापनेतही त्यांनी पुढाकार घेतलेला होता. शैक्षणिक दृष्टिकोनातून या वृत्तपत्रात शास्त्रीय संशोधन, गणित, इतिहास, भूगोल इत्यादी विषयी माहिती देण्यात येईल असे ठरविण्यात आलेले होते.

लोकहितवादी मुंबईला गेल्यानंतर त्यांच्या प्रयत्नाने २ जानेवारी १८६२ रोजी 'इंदुप्रकाश' हे वृत्तपत्र सुरू झाले. वास्तविक हे वृत्तपत्र सुरू करण्यामध्ये न्या.महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, विष्णूशास्त्री पंडित यासारखी मंडळी होती. खरेतर इंदुप्रकाश सुरू करण्यामागे विशेष प्रेरणा ही लोकहितवादी यांचीच होती. या वृत्तपत्रातून विविध विषयावरील विचार स्पष्ट केले जायचे. विधवा विवाह, शिक्षण, स्त्रीशिक्षण, अनिष्ट रूढीपरंपरा याविषयीचे लेख त्यात छापले जायचे.

याशिवाय लोकहितवादींनी ऑक्टोबर १८८२ पासून लोकहितवादी नावाचे मासिक सुरू केले व एप्रिल १८८३ पासून त्यांनी याच नावाचे एक त्रैमासिकही सुरू केले. याचा उद्देशही ज्ञान प्रसार करणे असाच होता. हे मासिक सुरू करण्यामागचा हेतूही लोकहितवादींनी स्पष्ट केलेला होता. त्या अनुषंगाने ते लिहितात की, "उपयुक्त ज्ञान चोहोंकडे प्रसिद्ध करण्याकरितां जीं राज्ये आज पुढें आहेत, त्यांच्या तोडीचे ग्रंथ आपल्या लोकांत प्रसिद्ध झाले पाहिजेत, या उद्देशानेंच प्रस्तुतचें मासिक प्रसिद्ध करण्याचा हेतु धारण केला आहे... पृथक् पृथक् पुस्तकें बांधण्याच्या सोयीसाठीं त्यांची पानें निरनिराळी छापण्याची व्यवस्था ठेवली आहे."[४८] यावरून स्पष्ट लक्षात येते की, ज्ञानाच्या बाबतीत ज्या देशांनी प्रगती केलेली होती ती केवळ विविध ग्रंथांच्या अधारेच केलेली होती. त्याप्रमाणेच भारतीयांत अशा ग्रंथाविषयी जागरूकता निर्माण

करणे लोकहितवादींना अगत्याचे वाटत होते व याच दृष्टिकोनातून हे मासिक व त्रैमासिक त्यांनी सुरू केलेले होते. याशिवाय लोकहितवादींनी सूर्योदय, सुबोधपत्रिका, अहमदनगर येथील वृत्तवैभव या वृत्तपत्रांना देखील प्रोत्साहन दिलेले होते. वृत्तवैभवमध्ये त्यांचे लोकहितवादी या नावाने लेख येत होते. अशा प्रकारे आपले शैक्षणिक विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी वृत्तपत्र हे महत्त्वाचे साधन लोकहितवादींच्या दृष्टिकोनातून होते.

### ३) लोकहितवादींच्या दृष्टिकोनातून इंग्रजी शिक्षण व भौतिक विद्येचे महत्त्व

लोकहितवादींना भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक दोष आहेत असे वाटत होते. त्यामुळे त्यांनी पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. लोकहितवादींच्या मते प्राचीन काळी उत्तम शिक्षण पद्धती होती. परंतु सांप्रतच्या काळात लोकांनी या जुन्या शिक्षणपद्धतीतील ग्रंथांवर भाष्य करणारे ग्रंथ लिहिले नाहीत कारण हे सर्व देव ऋषींनी केले सर्वसामान्यांचे व आपले हे काम नाही हा विचार सांप्रत काळी लोकांनी केला व त्यामुळे नवीन ज्ञान, नवीन पुस्तके, संशोधन, ज्ञानशाखा यांचा विकास खुंटला. जे ज्ञान समाज विकासासाठी मिळायला हवे होते तेच नेमके मिळू शकले नाही. त्या काळची प्रचलित शिक्षण पद्धती ही संस्कृत मधून होती. त्यामुळे जेवढे ग्रंथ होते ते बहुधा संस्कृत मध्येच होते व ही भाषा सर्वसामान्यांची नसल्याने केवळ मूठभर लोकांनाच संस्कृत मधील ज्ञान मिळत होते. बहुसंख्य लोकांना कुठल्याही प्रकारचे ज्ञान मिळत नव्हते. त्याकाळी ज्ञान या शब्दाची व्याख्या केवळ पाठांतर एवढीच केली जायची. लोकहितवादींनी ज्ञानाची अगदी साधी, सोपी व सरळ व्याख्या सांगितलेली होती. त्यांच्या मते “ज्ञान म्हणजे जितकें मिथ्या आहे तितक्यावरील मत काढून जें खरें आहे त्याजवर लक्ष ठेवणें.”[४९] थोडक्यात जेवढया वाईट व अनावश्यक बाबी आहेत त्या करण्याचे टाळून जे योग्य व मानवजातीच्या कल्याणासाठी आहे त्या गोष्टी केल्या म्हणजे ज्ञानाच्या दिशेने मार्गाक्रमण सुरू झाले असे त्यांना वाटत होते. ज्ञानाच्या या व्याख्येकडे मात्र तत्कालीन समाजाकडून दुर्लक्ष केले जात होते.

लोकहितवादींच्या मते वेद, पोथी, पुराणे यांचे पाठांतर असणे म्हणजे ज्ञानी मानले जायचे. त्याचा अर्थ कळला नाही तरी चालत असे कारण वेद पाठांतरास महत्त्व दिले जायचे. मुळात तत्कालीन समाजात ज्ञानदानाची जबाबदारी ही शास्त्री व पंडितांवर होती. लोकहितवादींच्या मते यांनीच वस्तुनिष्ठ व समाजोपयोगी ज्ञान समाजाला देणे आवश्यक होते. या शास्त्री पंडितांचे ज्ञानच पाश्चात्य पद्धतीचे नव्हते. केवळ अध्यात्मिक ज्ञानाचे अवडंबर करून स्वतः खूप ज्ञानी असल्याचे त्याकाळी भासविले जायचे. ही ज्ञानदानाची पद्धती कशी चुकीची होती याविषयी लोकहितवादींनी आपले विचार स्पष्ट केलेले होते. त्यांच्या मते "पुराणिक एक पोथी सोडून बसला म्हणजे सर्व आनंदाने डोलतात व रावणास दहा डोकी, सहस्त्रार्जुनास हजार हात, दुधाचा समुद्र, दह्याचा समुद्र इत्यादी गोष्टी ऐकल्या की बायका फार खूष होतात व पुरूष म्हणतात, आम्ही आज फार मोठे ज्ञान संपादन केले."[५०] एकूणच अशा प्रकारचे ज्ञान शास्त्री पंडित त्याकाळी द्यायचे. अध्यात्मिक दृष्टिकोनातून हे ज्ञान चांगले आहे परंतु केवळ एवढयाच ज्ञानावर अवलंबून राहून चालणार नव्हते. याशिवाय या ज्ञानाचा नेमका अर्थ काय होतो हे समजनेही दुरापास्त होते. या सर्व गोष्टी खरच असायच्या काय? असे विचारण्याची सोयही त्याकाळी नसायची व कुणी तसे विचारण्याचे धाडस दाखविलेच तर देवाचा मोठा प्रकोप त्याच्यावर होईल अशी भीती दाखविली जायची. एक गोष्ट मान्य करण्यासारखी आहे की, पोथ्या पुराणांच्या ज्ञानातून नैतिकतेचे शिक्षण मिळते परंतु तत्कालीन समाजाने ही नैतिकता तरी किती प्रमाणात आत्मसात केलेली होती? जर हा समाज नैतिकता शिकलेला असताच तर त्यात एवढे अनिष्ट प्रथांचे प्राबल्यच नसते. हा एक महत्त्वाचा दोष त्या शिक्षणपद्धतीचा होता.

आणखी सखोल विचार करता शिक्षणाच्या माध्यमातून देश विदेशात काय चालले आहे याचे ज्ञान आवश्यक होते परंतु तत्कालीन शिक्षणात लोकांना स्वदेशाचा इतिहास काय आहे हेच माहीत नव्हते. लोकांना मोगलाई शिवाय इतिहास माहीत नव्हता. म्हणजेच देशात राहणाऱ्या लोकांना स्वदेशाचा इतिहासही माहीत असू नये ही खूप मोठी शोकांतिका समाजाची होती. एकंदरीत हे सर्व भारतीय शिक्षण पद्धतीचेच दोष होते असे लोकहितवादींच्या

विचारांतून दिसून येते. त्यामुळे लोकहितवादी पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार करत होते. लोकहितवादी इंग्रजी विद्या समुद्रासारखी आहे असे म्हणायचे कारण इंग्रजीमध्ये प्रचंड ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. अगदी एका विषयावर किंवा एका शाखेवर आधारभूत हजारो ग्रंथ लिहिले गेलेले आहेत. म्हणजेच इंग्रजीशी तुलना करता संस्कृतमधील ग्रंथ अत्यल्प आहेत. लोकहितवादींच्या मते भारतात चौदा विद्या आणि चौसष्ट कला आहेत अशी गणना केली गेली परंतु ही गणना व्यास, वाल्मिक यासारख्यांच्या कालखंडातील होती.[५१] समाज अगदी एकोणिसाव्या शतकात येऊन ठेपला तरीही या संख्येत काहीच वाढ झाली नव्हती. समाजातील विद्वानांनी व शास्त्री पंडितांनी पाश्चात्यांप्रमाणे आणखी विद्या व कला यांचे संशोधन करायला हवे होते असे लोकहितवादींच्या विचारांवरून दिसून येते. भारतीय विद्या व कलांवर अधारित संस्कृत मधून पूर्वजांकडून ग्रंथ लिखाण झाले परंतु त्यावर अधारित इतर ग्रंथांची निर्मिती करावी असे समाजातील हुशार समजणाऱ्या मंडळींना वाटले नाही. पूर्वजांनी लिहिलेल्या ग्रंथातील काही ग्रंथ एवढे दुर्मिळ आहेत की त्यातील कित्येक ग्रंथ आज मिळू शकत नाहीत. परंतु इंग्रजी भाषेत मात्र सगळयाच विषयांवर ग्रंथ वाचण्यासाठी मिळू शकतात.

भारतीयांनी अशा पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा स्वीकार करावा असे लोकहितवादींना अगदी मनापासून वाटत होते. त्यांनी केवळ या पद्धतीचा स्वीकार करा असेच सांगितले नव्हते तर या पद्धतीचे भारतीयांना काय फायदे होतील याविषयीही आपले विचार स्पष्ट केलेले होते. या पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणातून लोकांना विविध देशांचा इतिहास समजू शकेल. पृथ्वीतलावर सर्व देशांची माहिती त्याला मिळू शकेल. त्याचबरोबर विविध शास्त्रांची माहिती त्यांना होईल. निसर्गात घडणाऱ्या सर्व घटनांकडे माणूस शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल व त्यामुळे निसर्गातील घडणाऱ्या घटनांकडे तो चमत्कार किंवा अंधश्रद्धा म्हणून न पाहता केवळ शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या विद्येचा वापर माणूस स्वदेशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी करील. याचसाठी लोकहितवादींनी पाश्चात्य विद्येचा पुरस्कार केला होता. पाश्चात्य शिक्षणाचा स्वीकार झाला की भारतीय लोक युरोपियन लोकांप्रमाणेच विविध वस्तूंचे स्वतः उत्पन्न करतील व त्यातून त्यांना स्वतःचा रोजगार उपलब्ध

होईल. आजच्या काळाप्रमाणेच त्याकाळीही चांगल्या नोकऱ्यांची मारामार असायची. त्यामुळे पाश्चात्य शिक्षणामुळे ही अडचण सुटणार होती. अशा प्रकारचे ज्ञान हे समाजाच्या समस्या सोडवू शकणारे होते. यासाठी लोकहितवादी सांगतात की, जेवढे लोक इंग्रजी विद्येत पारंगत होतील, विद्वान होतील तेवढी त्यांची प्रतिष्ठा तर वाढेलच त्याच बरोबर त्यांना नोकरी व पैशाची अडचण भासणार नाही. अर्थात हे ज्ञान केवळ इंग्रजी भाषेतूनच मिळाले पाहिजे असेही नाही ज्यांस इंग्रजी येते त्यांनी हे ज्ञान इंग्रजीत संपादित करावे व ज्यास येत नाही त्यांनी आपल्या मातृभाषेचा वापर करावा केवळ गरज एवढीच होती की, इंग्रजीतील पुस्तकांचे स्थानिक भाषेत भाषांतर होणे गरजेचे होते व त्यासाठी तज्ज्ञांनी पुढाकार घ्यावा असेही त्यांना वाटत होते.

लोकहितवादींनी या इंग्रजी पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला म्हणून त्याकाळी त्यांच्यावर ब्रिटिश धार्जिणे म्हणून टीकाही होत होती. परंतु लोकहितवादींना या पद्धतीच्या शिक्षणातून मात्र समाज सुधारलेला पाहायचा होता किंबहुना याहीपुढे जाऊन याच शिक्षणाने लोक आपले गेलेले राज्य पुन्हा मिळवितील असा सकारात्मक विश्वासही त्यांना होता. लोकहितवादींनी पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचे खरे सामर्थ्य ओळखून त्या शिक्षणाने भारतात काय बदल होऊ शकणार होता याचाही विचार केलेला होता. पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचे फायदे मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला होता. या बाबतीत ते म्हणतात की, पाश्चात्य शिक्षणामुळे "या लोकांच्या पायांतील शंखळा सुटतील. हे चहों देशांत जाऊन व्यापार करूं लागतील, विद्वान होतील, व आपले देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील, तेव्हां सुखी होतील. लोक शहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील कीं, आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लिमेंट द्या. नंतर आपले लोक ह्यामध्यें बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील कीं, तुम्हांसारखेच आम्ही शाहाणे आहों. मग आम्हांस अधिकार कां नसावे? मग हिंदु लोकांचे बहुमत असें पडलें म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे."[५२] म्हणजेच देशाचा सर्वांगीन विकास करण्यासाठी याच शिक्षणाची आवश्यकता त्यांना वाटत होती. या शिक्षणामुळे भारतात सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात इष्ट बदल घडेल. भारताची पारतंज्याच्या

जोखडातून सुटका होऊन स्वातंत्र्य मिळेल त्याच बरोबर भारताला प्रतिष्ठा प्राप्त होईल असा विश्वास लोकहितवादींना होता. त्यांना भारतीयाला स्वातंत्र्य मिळावे असेच वाटत होते, परंतु भारतीयांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची तेवढी पात्रता निर्माण करणे त्यांना अगत्याचे वाटत होते.

## ४) लोकहितवादींचे स्त्री शिक्षणविषयक विचार

लोकहितवादींनी आपल्या विविध लेखांतून आपले स्त्री शिक्षणविषयक विचार स्पष्ट केलेले होते. त्यांनी स्त्रियांची समाजातील परिस्थिती व स्त्री शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करण्यासाठी 'स्त्रियांची स्थिती' हा निबंध लिहिला होता. याशिवाय पुनर्विवाह या नावाखाली त्यांनी आठ निबंध प्रकाशित केले होते. या सर्वातून त्यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार स्पष्ट होतात. समाजात स्त्रियांवर बंधने आणणाऱ्या अनेक वाईट चालिरिती होत्या व त्यामुळे स्त्रियांचा विकास खुंटलेला होता असे त्यांना वाटत होते. त्यांनी स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचारांना आपल्या लेखांतून प्रथम वाचा फोडली होती. बालविवाहासारख्या प्रथांमुळे अनेक स्त्रियांवर विधवा होण्याचे प्रसंग यायचे अशा वेळी त्यांना पुनर्विवाहाचा अधिकारही नाकारला जायचा. लोकहितवादींच्या मते ईश्वराने स्त्री व पुरूष दोघेही माणूस म्हणून निर्माण केलेले आहेत त्यामुळे दोघांचे अधिकारही सारखेच असायला हवेत. पुरूषास पुनर्विवाहाचा अधिकार द्यायचा व स्त्रियांना नाकारायचा हा त्यांच्यावर मोठा जुलूम होत होता.[५३]

लोकहितवादींच्या मते स्त्रियांवर अन्याय केला जायचा त्याचे कारणच स्त्रीचे अज्ञान हे होते. या अनुषंगाने त्यांनी लिहिले होते "जर त्यांस थोडेसें ज्ञान असतें तर त्यांनी त्याचा विचार काढून जे पुनर्विवाह करूं नये म्हणतात त्यांचे श्रीमुखांत दिली असती, यांत संशय नाही. परंतु अज्ञान आणि भोळसरपणामुळें सर्वत्र जुलूम चालतो, असा नेम आहे. त्याप्रमाणें हे झाले आहेत. जर आपले देशांत दाहा स्त्रिया विद्वान असत्या आणि त्या जर विधवा झाल्या असत्या तर त्यांनी आपला पुनर्विवाह करण्याचे ठरविले असते."[५४] म्हणजेच शिक्षण जर तिला मिळाले असते तर पुनर्विवाह हा आपला हक्क आहे हे तिला समजू शकले असते. विशेष म्हणजे अशा

समस्या बंद करण्यासाठी सुशिक्षित स्त्रियांनीच पुढाकार घेणे अपेक्षित होते. बालविवाह व पुनर्विवाहबंदी या प्रथांपेक्षाही भयानक सतीसारखी प्रथा समाजात होती. एखाद्या स्त्रीचा पती मरण पावला असताना त्याच्या चीतेत आत्मत्याग करताना सर्व नातेवाईक पाहत असत व हे सर्व कुकर्म करताना त्यालाच हे लोक धर्म समजत असत.

एकंदरीत स्त्रियांच्या हालाखीच्या स्थितीला पारावार नव्हता. अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी पुरूष प्रधान संस्कृतीने तिला अज्ञानात ठेवून तिच्याभोवती विविध रूढी परंपरा उभ्या करून ठेवलेल्या होत्या. जर स्त्रीला वाटलेच या परंपरा झुगारून द्याव्यात तर त्यालाही ग्रंथांचा आधार दिलेला होता. म्हणून या परिस्थितीत बदल घडविण्यासाठी लोकहितवादींनी महाराष्ट्रात सर्वप्रथम स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला व त्या अनुषंगाने ते एक स्त्री शिक्षणाचे आद्य पुरस्कर्ते ठरले होते. एवढया प्रभावीपणे स्त्रियांची व्यथा सर्वप्रथम जी मांडली ती लोकहितवादींनींच. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करताना हे शिक्षण कोणत्या स्वरूपाचे असावे हे जरी त्यांनी सांगितले नसले तरी त्यातून स्त्रियांवर होणारा अन्याय तरी किमान दूर व्हावा असे त्यांना मनापासून वाटत होते. “स्त्रियांचे हाल, विपत्ती, जनावरांप्रमाणें अवस्था, ज्ञानशून्यता व पुरूषांची क्रूरता, प्राचीन शास्त्राधारें बहुत दिवस चालली, पण आतां तरी हा ईश्वरी क्षोभ जावो आणि जसे पुरूष तशा स्त्रिया आहेत, असें अंधळया हिंदु लोकांस समजो. ही माझी अतिशय इच्छा आहे; तर जे सुधारक हिंदु असतील त्यांहीं या कामास निर्भयपणानें आरंभ करावा हीच विनंती आहे.”[५५] यावरून लक्षात येते की स्त्री शिक्षणाचा खरा उद्देश त्यांच्यावरील होणारा अन्याय नष्ट करणे हाच लोकहितवादींना वाटत होता. याकामी सुशिक्षितांनी पुढे यावे असे आवाहन ही त्यांनी केलेले होते. यासारख्या विचारांतून त्यांची स्त्री शिक्षणाविषयीची तळमळ व त्यांची संवेदनशीलता लक्षात येते.

लोकहितवादींच्या दृष्टिकोनातून पुरूषांना शिक्षणाची आवश्यकता होतीच परंतु अधिक आवश्यकता ही स्त्री शिक्षणाची होती कारण एक पुरूष शिकला तर त्या शिक्षणाचा उपयोग

त्याला एकटयालाच होतो परंतु एक स्त्री जर शिकली तर संपूर्ण कुटुंबाला तिच्या शिक्षणाचा उपयोग होतो. किमान भावी पिढीच्या सुधारणेसाठीतरी स्त्री शिक्षण असणे गरजेचे होते.

## ५) लोकहितवादींचा व्यवसाय शिक्षणविषयक दृष्टिकोन

लोकहितवादींना भारतीयांनी व्यवसाय उद्योग धंद्यांचे शिक्षण द्यावे असे मनापासून वाटत होते. तत्कालीन समाजात स्वतःचा चरितार्थ चालविण्याचे केवळ दोनच मार्ग होते ते म्हणजे शिक्षण घेऊन ब्रिटिश प्रशासनात कारकूनाची नोकरी करणे किंवा नोकरी मिळाली नाहीच तर आपला वडिलोपार्जित व्यवसाय करणे. अनेकजण नोकरी मिळविण्याच्याच प्रयत्नात असायचे कारण त्यांचा जो वडिलोपार्जित व्यवसाय चांगल्या आवस्थेत चालणारा नव्हता. मुळात हा व्यवसाय जुनाट पद्धतीने चालविला जायचा. त्यात कोणतेही नाविन्य नव्हते, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर त्यात नसायचा. त्यामुळे या व्यवसायात कष्ट अधिक असायचे व मिळणारे उत्पन्न अतिशय कमी निघायचे. त्यामुळे लोकहितवादी उद्योगधंद्याच्या शिक्षणाचा पुरस्कार करत होते. समाजामध्ये एखादा व्यवसाय ब्रिटिशांचे आधुनिक तंत्रज्ञान वापरून करण्याचे ज्ञान नव्हते. लोकहितवादींच्या मते विविध उद्योगधंद्यांसाठी लागणारा कच्चा माल भारतातच होता. केवळ त्यापासून नवीन वस्तू कशा बनवायच्या याचे फारसे ज्ञान भारतीयांकडे नव्हते. ब्रिटिश लोक मात्र आपल्याकडे असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करीत असत. त्यातून उच्च दर्जाचे अधिकाधिक उत्पादन घेत असत आणि त्यामुळेच भारतीयांच्याच बाजारपेठेत ब्रिटिशांच्या मालाला विशेष मागणी असायची. याचे सर्व श्रेय ब्रिटिशांच्या व्यवसाय व उद्योगधंद्यासंबंधित आधुनिक शिक्षणाला जाते. या आधारे ब्रिटिश मात्र प्रचंड पैसा कमावत होते व भारतीयांच्या उद्योगधंद्यांची अवस्था अतिशय बिकट होत चालली होती. म्हणून भारतीयांचे जे बुडणारे उद्योगधंदे होते त्यांना सावरण्यासाठी भारतीयांना व्यवसाय शिक्षणाची आवश्यकता आहे असे लोकहितवादींचे मत होते. वास्तविक ही गरज केवळ एकोणिसाव्या शतकातीलच होती असे नाही तर आज एकविसाव्या शतकातही अशा प्रकारच्या ज्ञानाची आवश्यकता भासते याचे कारण सर्वांनाच नोकऱ्या मिळणे मुश्किल असल्याने चरितार्थ

चालविण्यासाठी विविध व्यवसायांवरच अवलंबून रहावे लागते. याच अनुषंगाने लोकहितवादींनी व्यवसाय शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता.

लोकहितवादींनी प्राचीन काळाची तुलना सांप्रत काळाशी केलेली होती. त्यांच्या मते प्राचीन काळी लोकसंख्या कमी होती व लोक स्वतः शेती करायचे त्यामुळे त्याकाळी उत्पन्न अधिक निघत असायचे. सांप्रत काळी मात्र लोकसंख्या अधिक वाढली. त्यातच आळशी लोकांचा भरणा अधिक झाला त्यामुळे खाणारे अधिक व प्रत्यक्ष काम करणारे कमी अशी अवस्था एकूणच झाली व त्यामुळे आर्थिक अधःपतन सुरू झाले होते. ज्या एकोणिसाव्या शतकाच्या मध्य काळात गणित, विज्ञान व शास्त्रे इत्यादींच्या शिक्षणाची वाताहात झालेली होती त्या काळी लोकहितवादींनी आपल्या देशात प्रत्यक्ष कमावणारे किती व त्यावर गुजराण करणारे किती, तसेच प्रत्यक्ष पिकणारी जमीन किती व नापिक जमीन किती याची आकडेवारी तयार केलेली होती. संपूर्ण भारतीय समाजाची अधोगती कशाने होते याचे स्पष्ट चित्र त्यांनी शतपत्रातील 'हिंदु लोकांनी उद्योग करण्याची आवश्यकता' या पत्रात मांडले होते. त्यात ते लिहितात की, "सरासरी हिंदुस्थानात एकंदर पांच लक्ष कोस औरसचौरस आहेत. त्यांपैकीं अडीच लक्ष कोस रानें, डोंगरे, नद्या, झाडें, घरें, शहरें इत्यादिकांमुळें नापीक आहेत. ते वजा देऊन बाकी अडीच लक्ष कोस चांगले पिकांचे आहेत, आणि एकंदर या देशांत माणसें दहा कोट आहेत. तितक्यांना अन्न पाहिजे. तेव्हां याची वाटणी बसविली तर दरएक कोसास चारशें माणसें पडलीं. त्यांत चारशें माणसांपैकी निंमे स्त्रिया, बाकी दोनशांपैकीं शंभर माणसें उद्योगावांचून म्हणजे आजारी, वृद्ध, बाळें, आंधळे वगैरे व्यंग व व्यापारी, अंमलदार, तमासगीर, श्रीमंत हे सरासरी शंभर. बाकीं शंभर राहिले ते काम करणारे. इतक्यांनीं मेहनत करून चारशें लोकांचा निर्वाह करावा. तेव्हां शंभर माणसें एक कोस जमिनींत खपलीं तर चारशांचें पोट भरण्याइतकें उत्पन्न करतील, किंबहुना जास्ती करतील. परंतु काळेंकरून लोकांमध्ये श्रीमंती वाढत चालली तों आळशी लोक वाढत चालले. म्हणजे जो एकटा श्रीमंत आहे तो आपणच काम केल्याशिवाय खातो असें नाहीं. त्यास चाकर पाहिजेत, घोडे पाहिजेत, परीट धुवावयास पाहिजेत, शिंपी शिवावयास पाहिजेत, ऊन लागेल म्हणून अब्दागिरी पाहिजे.

रस्ता दिसत नाहीं म्हणून मशालजी, चोपदार इत्यादि मिळून तो एकटा पंचवीस माणसें घेऊन बसला. आणखी जों जों श्रीमंती वाढली तों तों गाणारे पाहिजेत, वाद्यें वाजविणारे पाहिजेत. देवपूजा करावयास भट पाहिजे, व पंक्तीस दाहा पानें पाहिजेत हे अनर्थ झाले. तत्रापि सर्वांचा भार शंभर माणसांनी सोसला आणि सुखेंकरून राहिले, परंतु आतां काय झालें कीं, या लोकांच्या ताटांत इंग्रज लोक, मुसलमान लोक आले ते कांहीं बरोबर घेऊन आले नाहींत. आमच्यापैकीं खावयास आले आणि तेही एकटे खाणारे नव्हत. एक एक असा श्रीमंत कीं, त्याचे मागें पन्नास रिकामे माणूस, कोणी घोडा खाजविणारा, कोणी रथ हांकणारा, कोणी हिशेब लिहिणारा, कोणी कारकून, कोणी कपडे नेसविणारा, कोणी शिजविणारा, कोणी पोराला दूध पाजणारा, असे होते. कारण ते स्वतां कांहीं काम करावयाचे नाहींत. याजमुळें हा समुदाय चारशांमध्यें येऊन पोंचला."[५६] यावरून भारताच्या विपन्नावस्थेची स्पष्ट कल्पना येते. प्रत्यक्ष वहिवाटीखालील जमीन कमी व त्यावर गुजराण करणाऱ्यांची संख्या अधिक, तसेच लोकसंख्या अधिक असूनही प्रत्यक्ष काम करणारे अधिक कमी यामुळे शेतीची प्रचंड अधोगती झालेली होती. एवढया सर्वांचा चरितार्थ हा केवळ शेतीवरच अवलंबून होता. यासाठीच शेतीला पर्याय म्हणून इतर उद्योगधंदे भारतीयांनी शिकावेत अशी लोकहितवादींची इच्छा होती. विविध वस्तू तयार करण्याची कला ब्रिटिशांकडून शिकावी असे त्यांना वाटत होते. यामुळे भारतीय समाज स्वयंपूर्ण होईल असाही त्यांचा विश्वास होता. लोकहितवादींना एकत्र कुटुंबपद्धीतही दोष वाटत होता. त्यांच्या मते एका कुटुंबात शंभर ते दिडशे लोक राहत होते परंतु प्रत्यक्ष काम करणारे अगदी थोडेच असायचे. अशा पद्धतीमुळे आळस वाढतो व कुटुंबांची आर्थिक परिस्थिती ढासळली जाते. या अनुषंगाने या सर्वांस व्यवसाय शिक्षणाची गरज होती.

लोकहितवादींनी केवळ पुरूषांनाच उद्देशून व्यवसाय शिक्षण असावे असे सांगितले नाही तर ते स्त्रियांसाठीही देणे आवश्यक आहे असेही त्यांना वाटत होते. त्याकाळी स्त्रियांचा वेळ जावा म्हणून धर्माच्या नावाखाली त्यांच्याकडून अनावश्यक कामे करून घेतली जायची. "पुराणांत असें आहे कीं, एक एक तांदूळ निवडावा आणि लक्ष तांदूळ मोजून देवावर घालावे.

माजे पहाण्यांत कित्येक धर्मशील अशा स्त्रिया आल्या आहेत कीं, त्यांनी च्यातुर्मासांस चार महिने आपले डोळयांत रक्त उतरून घेऊन पांच लाख तांदूळ आणि गहूं मोजले व त्यांचा पुडया बांधून मोठया प्रयत्नानें त्या देवास वाहिल्या. कितीएक स्त्रिया अशा आहेत कीं, पांच वर्षेपर्यंत वाती करितात, रूद्रवाती, दगडवाती, धोंडेवाती, अशा प्रकारच्या कापसाच्या वाती सगळा दिवस त्यांत घालून तयार करितात. आणि एका दिवशीं त्याजवर दाहा रूपयांचे तूप घालून देवळांत जाऊन त्या जाळीतात या पलीकडे कांहीं मूर्खपणा राहिला नाही. त्यांस पुसले तर म्हणतांत कीं उपाध्येबावांनी असे करावयास सांगितलें आहे व यामध्यें फार पुण्य आहें."[५७] यावरून लक्षात येते की, तत्कालीन स्त्रिया अनावश्यक गोष्टींकरिता आपला वेळ खर्च करायच्या. मुळात पाच लक्ष गहू किंवा तांदूळ मोजणे हेच खूप वेळ व्यर्थ घालवणारे काम होते. लोकहितवादींच्या मते तो तत्कालीन समाजाचा मूर्खपणा होता. अशा कंटाळवाण्या कामात वेळ घालण्याऐवजी एखादी उपयोगी विद्या मिळविण्यात या स्त्रियांनी वेळ खर्च केला तर त्यापासून चार पैसे मिळून कुटुंबाची आर्थिक स्थिती निश्चितच सुधरू शकली असती.

एकूणच तत्कालीन परिस्थितीचा विचार करता व्यवसाय शिक्षण हे अत्यावश्यक होते असे लोकहितवादींना वाटत होते व ते आत्मसात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जावेत अशीही त्यांची मनोमन इच्छा होती. केवळ काबाड कष्ट करत न राहता आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून कमी श्रमात अधिक उत्पादन घेण्याची कला भारतीयांनी शिकणे त्यांना आवश्यक वाटत होते.

### ६) तत्कालीन पंतोजी व शिक्षकविषयक लोकहितवादींचा दृष्टिकोन

लोकहितवादींनी भारतीय शिक्षण पद्धतीतील दोष दाखवून ते दूर करण्यासाठी पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केलेला होता परंतु हे शिक्षण देताना शिक्षक, ज्याला पंतोजी म्हटले जायचे तोही तेवढाच पाश्चात्य ज्ञानाने भारावलेला असणे अगत्याचे होते. लोकहितवादींच्या मते मात्र तत्कालीन शिक्षक एवढे ज्ञानसंपन्न नव्हते. मुळात समाज सुधारण्याची खरी नैतिक जबाबदारी ही शिक्षकांवरच आज आहे तशी त्याकाळीही होती.

त्यामुळे शिक्षकी पेशा निवडतांना खूप विचारपूर्वक निवडला पाहिजे. लोकहितवादींच्या मते तत्कालीन समाज अज्ञानी होता. तो आपल्या मुलांना ज्ञान देण्यास असमर्थ होता त्यामुळे मुलांना ज्ञान देण्याची सर्वस्वी जबाबदारी ही पंतोजींचीच असायची. ब्रिटिशांनी 'बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या' माध्यमातून महाराष्ट्रातील लोकांसाठी नवीन शाळा सुरू केल्या असल्या तरी त्या शाळेत शिकविणारे शिक्षक मात्र जुनेच होते. लोकहितवादींच्या मते या पंतोजींमध्ये व भटांमध्ये काहीच फरक नव्हता. अशा पंतोजींपासून काहीच फायदा होऊ शकणार नव्हता कारण ते सर्व अज्ञानी होते. विशेषतः इतर काही कामधंदा मिळत नाही किंवा करता येत नाही म्हणून त्यांनी शिक्षकाचा पेशा पत्करलेला होता त्यामुळे ज्यांच्या स्वतःकडेच ज्ञानाचा लवलेश नाही ते इतरांना काय ज्ञान देणार? असा प्रश्न होता. मुळात पुस्तकात दिलेले ज्ञान हे शिक्षकांच्याच आकलनापलीकडचे होते कारण बहुसंख्य पंतोजी हे अज्ञानी होते. लोकहितवादींच्या मते असे पंतोजी अक्षरशः विद्यार्थ्यांकडून परीक्षेपुरती उत्तरे पाठ करून घ्यायची. ज्या विद्यार्थ्यांनी उत्तरे पाठ करून लिहिली ते पास तर व्हायचे, परंतु जो अभ्यास ते शिकले त्यातील अनन्यभाव, कार्यकारणभाव, त्याचा सिद्धांत, अनुमान यासर्व बाबींविषयी ते अनभिज्ञ असायचे.

वास्तविक आजच्या एकविसाव्या शतकातही यामध्ये खूप बदल झाला असे म्हणता येणार नाही. तथापि ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्यामुळे शिक्षणाकडे आज वेगळया दृष्टिकोनातून पाहिले जाते. लोकहितवादींनी ब्रिटिशांच्या शाळा चांगल्या चालवायच्या असतील तर त्यांनी नवीन उच्च विद्याविभूषित शिक्षक वर्ग नेमावा असा उपाय सुचविला होता. एवढेच नाही तर अध्ययन-अध्यापन हे एक शास्त्र आहे त्यामुळे हे शास्त्र शिक्षकाला चांगल्या प्रकारे समजलेले असावे यासाठी बोर्ड ऑफ एज्युकेशनने एक शिक्षक शाळा शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी सुरू करावी व मराठी शिक्षकांना अगोदर या शाळेत प्रशिक्षण द्यावे असे मत त्यांनी मांडले होते. बाळशास्त्रींनी ज्याप्रमाणे 'नॉर्मल स्कूल'ची सुरूवात केली होती अशाच पद्धतीची प्रशिक्षण शाळा असावी असे लोकहितवादींना वाटत होते. प्रशिक्षणामुळे शिक्षकास या भौतिक विद्येचे महत्त्व कळेल व ते त्यानुसार आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतील.

लोकहितवादींच्या विचारांतून एक गोष्ट विशेषत्त्वाने लक्षात येते ती म्हणजे तत्कालीन एतद्देशीय शिक्षक हे केवळ संस्कृतमधील पुस्तके वाचून त्यांची बुद्धी खूप संकुचित झालेली होती. त्यामुळे अशा शिक्षकांना प्रथम इंग्रजीतील ज्ञान दिले जाणे अगत्याचे आहे असे त्यांना वाटत होते. मात्र इंग्रजी भाषेतील ज्ञान ते लगेच प्राप्त करू शकतील असेही नव्हते याचे कारण सांगताना लोकहितवादी म्हणतात की, "एकदां संस्कृताच्या झऱ्याचें पाणी जो प्याला त्याची भ्रांती जावयास नवद वर्षे शिकविलें तरी उपयोग नाहीं हें निश्चित आहे. याविषयीं कोणी भ्रांतीच धरूं नये. सुधारलेल्या संस्कृत भाषेचा मात्र उपयोग पडावा. इतकें करावें. अधीक नको."[५८] एकूणच संस्कृत शिकलेल्या शिक्षकास इंग्रजीचे ज्ञान संपादित करणे कठीण जाणार होते म्हणून यासाठी लोकहितवादींनी दोन उपाय सुचविले होते ते म्हणजे इंग्रजी भाषेतील ग्रंथांचे भाषांतर करून त्यातील ज्ञान विद्यार्थ्यांना शिकवावे किंवा इंग्रजी विद्या शिकविण्यासाठी इंग्रजी भाषा किंवा ते ज्ञान शिकलेला माणूस ठेवून त्याच्या हातून विद्यार्थ्यांना इंग्रजी ग्रंथांतील ज्ञान दिले जावे. त्यांच्या विचारातून असे दिसून येते की, त्यांनी केवळ पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण असावे एवढाच विचार मांडला नाही तर ती विद्या शिकविणारा शिक्षकही तेवढाच प्रभावी असावा असेही मत मांडले म्हणजे तो हे ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचू शकेल. यातूनच त्यांच्या शैक्षणिक विचारांची प्रगल्भता लक्षात येते.

## ७) लोकहितवादींचा विद्वान विषयक दृष्टिकोन

जे लोक शिक्षण घेतलेले आहेत त्यांच्यात विद्वत्तेचा न्यूनगंड निर्माण होतो. त्यामुळे विद्वान नेमके कुणाला म्हणावे असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. लोकहितवादी सांगतात की, जो तो स्वतःकडे असलेल्या तुटपुंज्या ज्ञानावरच स्वतःस विद्वान समजत जातो. त्याकाळचा विचार करता लक्षात येईल की, वैदिक ग्रंथांची घोकंपट्टी वैदिक ब्राह्मण करीत होते म्हणून ते स्वतःला विद्वान समजत तर पुराणिक संस्कृत भाषेतील पुराणाचा अर्थ सर्वसामान्यांना समजावून सांगतात म्हणून ते स्वतःस विद्वान समजत होते. याप्रमाणेच व्याकरणशास्त्री, न्यायशास्त्री, वेदांतशास्त्री, धर्मशास्त्री, कायद्याचे शिक्षण घेणारे, मंत्र पठण

करणारे, वैद्यक क्षेत्रात निष्णात असणारे हे सर्व स्वतःस विद्वान समजतात. एवढेच नाहीतर इंग्रजी विद्या जे शिकले तेही स्वतःस विद्वान समजतात. या सर्व उदाहरणांवरून लक्षात येते की, जो तो स्वतःच्या क्षेत्रात जे किरकोळ ज्ञान संपादिले आहे त्यावरच स्वतःस विद्वान समजतो. लोकहितवादींच्या मते हे खरे विद्वान नव्हेतच.

वर उल्लेखलेल्या सर्व व्यक्तींनी संस्कृत किंवा इंग्रजी या दोन भाषेत प्रामुख्याने ज्ञान संपादिलेले होते. संस्कृतचा विचार करता त्याने केवळ स्वतःचा चरितार्थ चालावा यापुरताच तो अभ्यास केलेला होता असे म्हणता येईल व त्या भाषा ज्ञानावरच तो आपल्या विद्वात्तेचा टेंभा मिरवायचा. इंग्रजी भाषेत ज्ञान संपादिणाऱ्यांचीही गत याहून वेगळी नव्हती असे लोकहितवादींना वाटते. इंग्रजीचे तुटपुंजे ज्ञान मिळवून ते लोक कसे विद्वत्तेचा आव आणतात याचे वर्णन लोकहितवादींनी केलेले होते. त्या अनुषंगाने ते लिहितात की, "इंग्रजी शाळेंत वगैरे जे लोक अभ्यास करितात, त्यांत इंग्रजी लिहिणार असें नांव मिरवणारे पुष्कळ असतात. घरांत खुर्ची, मेज, पिसें, व बुकें आलीं म्हणजे आई-बाप व शेजारीपाजारी सर्व त्यास इंग्रजी लिहिणार व शाहाणा, असें समजतात. परंतु वास्तविक पाहिलें तर त्यास वाचल्याचा अर्थही कळत नाहीं; आणि ग्रंथावलोकन केलेलें नसतें; इतिहास, विद्या, शास्त्रें यांचा अभ्यास नसतो. इंग्रजी विद्या समुद्रासारखी आहे. परंतु दोन बुकें वाचतां आलीं व चार बिरखुडया ओढतां आल्या, म्हणजे कानावर पागोटें, खिशांत रूमाल आणि हातांत सोटा असे वेश पुष्कळ घेतात."[५९] यावरून लक्षात येते की, इंग्रजीचे अगदी किरकोळ ज्ञान मिळविलेले असते परंतु त्यालाच हे लोक खरे ज्ञान समजण्यास सुरूवात करतात. आपण इतरांपेक्षा खूप वेगळे आहोत असा आव आणतात. अर्थात ही एकोणिसाव्या शतकातील परिस्थिती लोकहितवादींनी वर्णन केली होती परंतु आजची परिस्थितीही याहून वेगळी नाही असे म्हणावे लागेल. विशेषतः इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या बऱ्याच विद्यार्थ्यांची अवस्था अशीच आहे. त्यांना केवळ इंग्रजी भाषेतून लिहिता वाचता व बोलता चांगले येते परंतु कुठल्या एखाद्या विषयाची माहिती त्यांना विचारली तर सांगता येणे कठीण आहे. खऱ्या अर्थाने ज्ञान मिळवायचे असेल तर ते मातृभाषेतून घेतले जावे याचा अर्थ इंग्रजी ज्ञान संपादन करू नये असा नाही.

लोकहितवादींनी खरा विद्वान कुणाला म्हणावे याविषयी आपले मत मांडलेले होते. त्यांच्या मते ज्याचे मन कल्पना सामावून घेण्यासाठी खूप विस्तीर्ण आहे त्याला विद्वान म्हणावे. कारण ज्याचे मन असे असते तो नहमीच निसर्गातील नव नवीन गोष्टींकडे कुतूहलाने पाहू शकतो, व यातूनच त्याची ज्ञानवृद्धी अधिकाधिक होऊ शकते. असा व्यक्तीच विविध ग्रंथांचे ज्ञान अवलोकन करून त्याचा आपल्या जीवनामध्ये उपयोग करू शकतो. जो इंग्रजी शाळेत जातो त्यास केवळ लिहिता वाचताच येऊ नये तर त्याने इंग्रजीतील विविध ग्रंथ कोणते, त्या ग्रंथात काय ज्ञान भरलेले आहे याचा विचार करणे आवश्यक आहे व तेच संस्कृतच्या बाबतीतही होते. त्याकाळचे लोक लिहिणे वाचणे यालाच मुळ विद्या समजत होते. परंतु या दोन गोष्टी केवळ विद्या संपादित करण्याची माध्यमे आहेत. त्यांच्या मते "विद्या म्हणजे जेणेंकरून मन मोठें होतें, वाईट गुण जातात; शांती, निर्लोभ साधुता, इत्यादि गुण प्राप्त होतात; बारीकसारीक द्वेष, दुर्बुध्धी, लोभ व क्रोध हे जातात; जगाचा विस्तीर्ण व्यवहार व कारभार ज्यांस समजतो, तेच विद्वानांत गणले पाहिजेत... याजकरितां साधारण इंग्रजी शिकलेले किंवा साधारण संस्कृत शिकलेले या उभयंतासही आम्ही विद्वान म्हणत नाहीं. ज्यांचे मन फार कल्पनांनी भरलें असेंल, त्यांस मात्र विद्वान म्हणूं."[६०] एकंदरीत विचार करता लोकहितवादींच्या मते ज्याच्यातील सर्व वाईट गुणांचा लोप होऊन सर्व चांगल्या गुणांचा समुच्चय झालेला आहे, जो आपल्या सद्सदविवेकबुद्धिचा वापर करून चांगले काय व वाईट काय यांचा विचार करू शकतो तसेच ज्याला सृष्टीचे चक्र समजून ज्याचे मन विस्तीर्ण झालेले असते त्यास विद्वान समजण्यास हरकत नाही.

लोकहितवादींच्या मते विद्वत्ता प्राप्त होण्यासाठी मनाला चांगली शिक्षा मिळणे आवश्यक आहे. यासाठी विविध देशांत भ्रमंती करून तेथील आचारविचारांविषयी अवलोकन करणे, विविध हुशार व विद्वानांच्या सांनिध्यात राहणे, विविध विषयांवर अधारित असलेल्या ग्रंथांचे वाचन करून त्यातील वस्तूनिष्ठ ज्ञान आत्मसात करणे असे विविध मार्ग लोकहितवादी खरा विद्वान होण्याचे सांगतात. आजच्या परिस्थितीचा विचार करता शिक्षण घेतलेले सर्वच विद्वान आहेत असे नाही. आज खऱ्या गुणवत्तेपेक्षा मार्कांना अधिक महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे

सगळी फसगत होत चालली आहे. मुले परिपूर्ण ज्ञानापेक्षा परीक्षेच्या दृष्टीने सहज गुण मिळतील अशा ज्ञानालाच महत्त्व देताना दिसत आहेत. असे शिक्षण एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांना अभिप्रेत नव्हते.

शिक्षणाच्या माध्यमातून खरे विद्वान निर्माण होणे आवश्यक होते असे त्यांना वाटायचे. मुळात आपण स्वतः खूप ज्ञानी आहोत असा जो स्वतःविषयी गैरसमज असतो तोच खरा विद्वान होण्यापासून आपणास रोखणारा असतो. या गैरसमजापासून परावृत्त होण्यासाठी लोकहितवादी एक पर्यायही सुचवितात. ते सांगतात की, "हल्ली जे थोडे ज्ञानांत आपणांस विद्वान म्हणविणारे आहेत, त्यांणीं असे मनांत आणावें कीं, आपल्याला ठाऊक नाहींत अशीं पुस्तकें अद्यापि किती आहेत; आपणांस मिळाल्या नाहीत अशा कल्पना अद्याप किती आहेत; आपल्यास ठाऊक नाहींत, असे व्यवहार जगांत किती आहेत? यापेक्षां आपण जें जाणतों हें अगदीं अल्प आहे, ही गोष्ट ते स्मरतील तर त्यांचा लहानपणा त्यांसच दिसून येईल."[६१] मुळात प्रत्येक व्यक्ती मला काय येते किंवा माझ्याकडे काय ज्ञान आहे हेच सांगण्याचा प्रयत्न करीत असते. जगात आत्मसात करण्याजोग्या अनंत गोष्टी असतात. त्यामुळे प्रत्येकाने काय आहे यापेक्षा काय नाही असा विचार केला की आपोआप त्याच्या समोरील संकुचित ज्ञानाची मर्यादा रेषा नाहीशी होईल व सृष्टीतील अनंत असलेल्या ज्ञानासमोर स्वतःचे ज्ञान त्यास खुजे वाटायला लागेल व आपोआपच अधिक ज्ञान मिळविण्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू होतील. त्यांच्या मते सांप्रत काळचे खरे ज्ञानाचे भांडार हे वर्तमानपत्र होते. त्यातून विविध देशाची माहिती मिळू शकेल त्याचबरोबर विविध विषयांचे ज्ञानही समजाला मिळू शकेल असा विश्वास त्यांना होता.

## ८) नादविद्या / संगीत विद्याविषयक लोकहितवादींचा दृष्टिकोन

लोकहितवादींनी शतपत्रांतील छप्पन्न क्रमांकाचे पत्र नादविद्या हे लिहिलेले होते त्यात त्यांनी या विद्येविषयीची सद्यस्थिती काय होती याविषयी आपले विचार स्पष्ट केले होते. लोकहितवादींच्या मते नादविद्या म्हणजे गायन, वाद्य व नृत्य या सर्वांचा समुच्चय होय. त्यांच्या मते ही विद्या विकसित होणे आवश्यक होते. एकोणिसाव्या शतकात या विद्येचे खूप मोठया

प्रमाणात अधःपतन झालेले होते. प्राचीन काळचा विचार करता या विद्येचा अंगिकार सर्व देवादिकांनी केलेला होता. एवढेच नाही तर वेदांतातही संगीत विद्येचा संदर्भ सापडतो. मुळात संगीताच्या सात स्वरांची रचना ही सामवेदात होती व ही भारतीयांकडून संपूर्ण जगासाठी एक मोठी देणगी होती. प्राचीन कालखंडातील व मध्ययुगीन कालखंडातील राजेरजवाडयांनी या विद्येला राजाश्रय देऊन तिचा विकास कसा होईल याचा कसोशीने प्रयत्न केलेला होता. संगीत विद्येचे प्राचीन काळचे महत्त्व सांगताना लोकहितवादी लिहितात की, या विद्येमुळे "जे क्रोधी असतात त्यांचा क्रोध जातो. निर्दय दयाळू होतात व भांडखोर शांत होतात, हें खरें आहे. व याचा अनुभव मनुष्यांस आहे असेंच नाहीं, परंतु इतर जनावरांसही आहे. मोर, हरणें, सर्प इत्यादि गायन ऐकतात. येविषयीं गोष्टी या देशांत पुष्कळ आहेत. व तानसेन गवई गाऊन दिवे लावीत, असें म्हणतात. अशा गोष्टी चमत्कारीक या विद्येच्या आहेत. व प्राचीन काळीं रावणादीक राक्षसांनी गायनेंकरून शिवाची प्रसन्नता केली, असेंही आहे."[६२] यावरून संगीत विद्येचे महत्त्व किती मोठे होते याविषयी माहिती कळते. संगीतामध्ये अनेक चमत्कारिक गोष्टी करण्याचे सामर्थ्य आहे असे सांगितले जाते. लोकहितवादी तानसेन यांच्या गायकीचे चमत्कार सांगतात. वस्तुतः आजच्या आधुनिक काळात या गोष्टींवर विश्वास बसणे कठीण आहे तथापि असे प्रत्यक्ष चमत्कार आजच्या काळात होत नसले तरीही माणसाचा स्वभाव शांत, प्रसन्न व उल्हासित करण्यासाठी ही विद्या निश्चितच उपयुक्त आहे असे लोकहितवादींना वाटते. आजच्या काळात तर विविध आजारांवर औषधासारखा उपयोग संगीत विद्येचा केला जात असल्याचे दिसते. यावरून या विद्येचे महत्त्व लक्षात येते.

लोकहितवादींच्या मते सांप्रत काळी मात्र या विद्येकडे प्रचंड दुर्लक्ष झाले. या कालखंडात भारतातच उगम पावलेल्या या संगीत विद्येची एवढी उपेक्षा होणे ही खरोखरच खेदाची बाब होती. समाजातील अज्ञानामुळे व कमी माहिती असल्यामुळे त्याकाळी या विद्येवर अनेक मार्गांनी टीका केली जायची. ही विद्या मुसलमानांची आहे अशीही टीका केली जाऊ लागली होती, परंतु मुळात ही विद्या जात किंवा धर्म यांत आडकणारी नाही. त्या कालखंडात या विद्येचे दोन दोष सांगितले जायचे असे लोकहितवादी सांगतात. "एक जे गाणार व

नादविद्येंत प्रविण असतात, ते मूर्ख, व्यसनी व भांगे असतात. लोकांस शिकवीत नाहींत, ग्रंथ पाहात नाहीत व मदोन्मत्त होऊन थोडकेंसें आलें म्हणजे स्वच्छंद होतात. आणि दुसरे दुर्जनांनीं या विद्येचा अंगीकार केला आहे व व्यभिचारिणी बहुधा या विद्येस लोकांस लुब्ध करून नादीं लावण्याकरितां अंगीकारितात. याजमुळें या विद्येचा हलकेपणा लोकांत झाला आहे."[६३] यावरून नादविद्येविषयी तत्कालीन लोकांचे किती संकुचित विचार होते याविषयी स्पष्ट कल्पना येते. मुळात हिंदूधर्मातील सर्वच देवादिकांनी या विद्येचा अंगीकार केला त्यामुळे ही विद्या वाईट कशी असू शकते असा प्रश्न लोकहितवादींना पडत होता. काहींनी स्वतःच्या स्वार्थासाठी या विद्येचा चुकीच्या पद्धतीने वापर केलेला असू शकतो परंतु त्यामुळे ती विद्याच वाईट आहे असे म्हणणे संयुक्तिक ठरणारे नाही व असेच जर मानले तर गणित, विज्ञान यासारख्या सर्वच विद्या वाईट म्हणाव्या लागतील असे लोकहितवादींना वाटते. मुळात कोणतीही विद्या वाईट असू शकत नाही तर तिचा तसा वापर कोण व कशासाठी करतो यावरून ती वाईट किंवा चांगली ठरू शकते. त्यामुळे ही विद्या समाज विकासासाठी निश्चितच उपयुक्त आहे असे लोकहितवादींना वाटत होते.

लोकहितवादींनी या संगीत विद्येचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करावा असेही विचार मांडलेले होते. त्यांच्या मते जसे इतर विषय शाळेत शिकविले जातात तसाच हा विषयही शिकविला जावा. आपले विचार स्पष्ट करण्यासाठी त्यांनी इतर देशांचाही दाखला आपल्या पत्रात दिलेला होता. ते म्हणतात की, "जर्मन देशांत नादविद्या सरकारी शाळेंत शिकवितात. फ्रेंच व इंग्रज म्हणतात कीं, संभावित गृहस्थ यांणी ही विद्या शिकल्याशिवाय त्यांची विद्या परिपूर्ण होत नाहीं. जसें देशाटण हें विद्याभ्यासाचा भाग आहे, तद्वत ही विद्या आहे. व बायकांस अवश्य शिकवितात. संभावित गृहस्थांच्या स्त्रिया नादविद्येंत प्रविणता नाहीं, असे आढळत नाहीं."[६४] यावरून लक्षात येते की, भारतातील या कलेस परकीय देशांनी एवढे महत्त्व दिलेले आहे तर आपण आपल्या देशात असे का करू शकत नाही. याच अनुषंगाने त्यांनी संगीत विद्येचा विचार केलेला होता. आजच्या काळाचा विचार केला तर संगीत कलेस खूप महत्त्व दिले जाते. आज ठिकठिकाणी संगीत विद्यालये चालविली जात

असल्याचे दिसते. संगितामध्ये विविध अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. एवढेच नाही तर विद्यापीठीय शिक्षणातही संगीत विद्येचा समावेश करून पदवी अभ्यासक्रम सुरू केल्याचे दिसते. निश्चितच लोकहितवादींच्या शैक्षणिक विचारांचे हे फळ समजावे लागेल.

## ९) लोकहितवादींचा ग्रंथ व ग्रंथालयविषयक दृष्टिकोन

शिक्षणप्रक्रियेमध्ये ग्रंथांना अनन्यसाधारण असे महत्त्व असते. किंबहुना अध्ययनकर्ता व अध्यापक या दोहोंमधील ज्ञानदान व ज्ञानार्जनाची माध्यमे ही ग्रंथे असतात. त्यामुळे सहाजिकच जेवढे ग्रंथ मर्यादित तेवढया ज्ञानास मर्यादा येतात व ग्रंथांची संख्या वाढली की आपोआपच ज्ञानाच्या कक्षा रूंदावत जातात. त्यामुळे लोकहितवादी ग्रंथ व ग्रंथालयांना विशेष महत्त्व द्यायचे. मुळात ग्रंथ हे ज्ञानाचे मूळ श्रोत व भांडार असतात असे त्यांना वाटायचे. एकोणिसाव्या शतकाचा कालखंड जर पाहिला तर त्यात धार्मिकतेला अवास्तव महत्त्व होते. ज्या ठिकाणी खेडेगाव असेल तेथे शाळा नसायची पण मंदिरे मात्र निश्चित असायची. लोकहितवादींना समाजाचे हे चित्र अपेक्षित नव्हते. यावरून ते धर्माचा व मंदिरांचा तीरस्कार करणारे होते असे नाही तर मंदिरांवर खर्च करण्यापेक्षा ग्रंथालयरूपी मंदिरे उभारली तर सर्व समाज ज्ञानी होऊ शकेल असे त्यांचे मत होते. त्यामुळे लोकहितवादी देवळे नको पुस्तके छापा असे समाजास निक्षून सांगत होते.

लोकहितवादींनी शतपत्रांमध्ये एक पत्र 'नवीन ग्रंथाची आवश्यकता' अशा आशयाचे लिहिले होते. त्यात त्यांनी नवीन ग्रंथा अभावी समाजाची काय अवस्था होती याचे वर्णन केलेले होते. लोकहितवादी सांगतात की, या लोकांना ग्रंथ व वर्तमान पत्र न वाचल्यामुळे आपला देश कोठे आहे?, इतर देश काठे आहेत?, तेथे कोण आहेत? देशात कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत याविषयी काहीच समजत नाही. ग्रंथांच्या अभ्यासाअभावी भारतीयांना समुद्रात जहाजे चालविण्याचे ज्ञान नव्हते, रसायनशास्त्र, यंत्रज्ञान यांचा काय उपयोग होता हे समजत नव्हते. एवढेच नाहीतर चांगले काय व वाईट काय यात फरकही ओळखता येत नव्हता. त्यामुळे हे सर्व अज्ञान नाहीसे होण्यासाठी समाजास नवनवीन ग्रंथांची आवश्यकता

आहे असे लोकहितवादींना वाटत होते. इंग्रजी भाषेत विविध विषयांवर प्रचंड ग्रंथ सामग्री उपलब्ध आहे. त्या धर्तीवर भारतीय भाषांमध्ये ग्रंथनिर्मिती होणे त्यांना आवश्यक वाटत होते. हे काम जेंव्हा लोकांना ग्रंथाचे महत्त्व पटेल तेंव्हाच होऊ शकणार होते. मुळात भारतीय समाजात वाईट चालिरिती फार होत्या व या चलिरितींमधून वेळ काढून ग्रंथ निर्मिती करणे म्हणजे एक त्रासदायक काम त्यांना वाटायचे एवढेच नाही तर हे आपले कामच नाही असे त्यांचे विचार असायचे. या अनुषंगाने लोकहितवादी लिहितात की, "सोन्याच्या प्रतिमा करून ऊस मडकें यांत पूजा करून द्याव्या, त्यापेक्षां ग्रंथ दिले तर मुलें जन्मपर्यंत वाचतील, शहाणीं होतील, आंणि उपयोग फार पडेल. तसेच लोक मरतेसमई तुला करितात. त्यांत पांचचार हजार रूपये भरतात. मग मनास येईल तसे उडवितात. त्यास कांहीं अनुक्रम नसतो. त्या पांच हजारांचें कांहींतरी चिरकाल राहण्याजोगें काम केलें तर किती लोक शहाणे होतील. लोक असें म्हणतात कीं, पुष्कळ ग्रंथ लिहितात, परंतु पैसा कोणापाशीं आहे? विकत घ्यावे कोणी? आणि इकडे तर असा अनिर्वाच्य खर्च करितात. आणि जें उपयोगी तें करीत नाहींत."[६५] एकूणच समाजात आपल्या वाईट चालिरितींची हौस पुरविण्यासाठी पैसा होता परंतु ज्ञान वाढविण्यासाठी ग्रंथाची सोय करावी म्हटले की आपल्या दारिद्रयाची चर्चा करू लागतात.

आजच्या काळाचा विचार करताही एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे तरूण विविध शॉपिंग मॉल, चित्रपट गृहे, हॉटेल्स इत्यादी ठिकाणी जाणे पसंत करतात परंतु एखाद्या ठिकाणी पुस्तकांचे प्रदर्शन भरले असेल तर तेथे जाऊन नवीन पुस्तकांची ओळख करून घ्यावी असे त्यांना वाटत नाही. जी त्याकाळची परिस्थिती होती तीच थोडयाफार फरकाने आजही बघायला मिळते. या सर्व गोष्टी थांबण्यासाठी समाजाचे प्रबोधन होणे अतिशय महत्त्वाचे आहे असे लोकहितवादी म्हणतात.

लोकहितवादींच्या मते शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात जे ग्रंथ नेमले जातात ते खूप काळजीपूर्वक नेमावेत कारण या पुस्तकांमध्ये समाविष्ट असणाऱ्या ज्ञानावरच मुलांवर होणारे

चांगले संस्कार अवलंबून असतात. ज्याप्रमाणे चांगले शिक्षक ज्ञानदानासाठी आवश्यक असतात तसेच काळाच्या गरजेनुसार ज्ञान देणारे ग्रंथही अभ्यासक्रमासाठी नेमणे अगत्याचे असते असे त्यांना वाटत होते. विद्वान आणि ज्ञानी पुरूषांच्या बुद्धिंची जी प्रतिबिंबे आहेत ती ग्रंथात उमटत असतात.[६६] जे लोक ग्रंथ लिखाण करतात त्यांना समाजाचा त्यांच्या ज्ञानापासून काहीतरी फायदाच व्हावा असे वाटत असते. त्यामुळे समाजानेच ग्रंथ लिखाण करणाऱ्यास प्रोत्साहन द्यावे असेही त्यांना वाटत होते. एवढेच नाही तर त्यांच्या मते प्रत्येक व्यक्ती काहीतरी लिखाण करू शकत होता. प्रत्येकांनी जे त्यांच्या काळादरम्यान घडामोडी घडतात त्याची किमान टिपणे काढावीत हीच टिपणे भावी पिढींना भूतकालीन माहिती समजून घेण्यासाठी उपयुक्त साधन ठरतात. त्याच बरोबर या टिपणांवरूनच एकमेकांची परिस्थिती कशी आहे हे समजू शकते. त्यामुळे प्रत्येकाने काहीतरी लिखाण करावे असे त्यांना वाटत होते.

लोकहितवादींच्या दृष्टिकोनातून जे सरकारकडे महसुली अधिकारी म्हणून प्रशासकीय नोकऱ्या करतात त्यांचे ग्रंथलिखाणकामी विशेष योगदान असायला हवे. याचे कारण सांगतांना ते आपल्या पत्रात लिहितात की, "डिपुटी, मामलेदार, दप्तरदार, मुनसफ यांस आपले प्रांताचा इतिहास लिहिण्याची सवय झाली, म्हणजे आपलेकडे गांव किती आहेत, त्यांत परगणे किती आहेत, जमीनदारास काय पावतें, काजीस काय पावतें, पीक कोणते होतें, पिकाची वृध्धी करण्यास काय केलें पाहिजे, रयतेची स्थिती कशी आहे, शाळा किती आहेत, लिहिणारे किती आहेत, विद्वान् व पंडित म्हणविणारे किती, क्षेत्रें किती, देवस्थानें कोणतीं, पाऊस केव्हां पडतो, रबीचे गांव कोणते, खरीपाचे कोणते, गांवांत मोठे मोठे सावकार कोण, कोणते आडनांवाचे पाटील वगैरे जमीदार आहेत, इत्यादि माहितीचे झाडे जर त्यांनीं लिहून प्रसिध्ध केले तर ज्या देशाचा झाडा त्या देशांतील लोकांस तो विशेष उपयोगीं न पडला तरी नगरचा साताऱ्यास व बडोद्याचा बेळगांवास याप्रमाणें ते दुसरे ठिकाणीं फार उपयोगीं पडतील."[६७] यावरून लक्षात येते की, लोकहितवादींनी ज्ञानाचे भांडार तयार करण्याचे अगदी सोपे पर्याय

सांगितलेले होते. ब्रिटिश प्रशासनात काम करणाऱ्या या विविध अधिकाऱ्यांना विविध गावे, तेथील जमीन, व त्याअनुषंगाने माहिती ठेवावीच लागत होती. केवळ त्यांनी ती माहिती ग्रंथ रूपाने संग्रहित करायला हवी म्हणजे भविष्यात इतर लोकांना त्या माहितीचा उपयोग हाऊ शकेल असे लोकहितवादींना वाटत होते.

लोकहितवादींनी भारतात ग्रंथ लिखाणास उत्तेजन दिले जावे हे सांगताना पाश्चिमात्य देशांचाही विचार केलेला होता. त्यांच्या मते युरोपात विविध ज्ञान शाखांचा जसा शोध लागत चाललेला होता तसाच त्या ज्ञान शाखेवर अधारित लगेच ग्रंथ लिखाण केले जायचे. तेथील लोक ध्येयवादी असतात व ते ज्ञानालाच आपल्या आयुष्याचे खरे सार मानतात त्यामुळे त्यांचे विविध विषयावरील संशोधन कायम चालू असते आणि त्याच संशोधनावर ते ग्रंथ निर्मिती करत असतात. परंतु भारतात मात्र ग्रंथ लिखाणास पोषक वातावरण नव्हते. लोकहितवादी पेशव्यांच्या काळाचा दाखला देऊन ही बाब स्पष्ट करतात. त्यांच्या मते पेशव्यांच्या दरबारात एवढे हुशार लोक होते परंतु त्यातील एकानेही पेशव्यांच्या जीवनावर माहिती लिहिण्याचे धारिष्टय दाखविले नाही. एकूणच त्यांना ग्रंथ लिखाणास महाराष्ट्रात उत्तेजन दिले जावे असे वाटत होते.

लोकहितवादींनी केवळ ग्रंथलिखाण करा एवढाच संदेश दिलेला नव्हता. त्यांच्या मते ग्रंथ निर्मितीबरोबरच जिथे मुबलक प्रमाणात ग्रंथे वाचण्यास उपलब्ध होऊ शकतील अशी मोठाली ग्रंथालये स्थापन होणेही अगत्याचे होते. मुळात वाचन संस्कृतीतील ग्रंथनिर्मिती ही पहिली पायरी व ग्रंथालये ही दुसरी पायरी असते. आपल्या विविध ठिकाणच्या वास्तव्यात लोकहितवादींनी ग्रंथालये स्थापन करण्यास खूप प्रोत्साहन दिले होते. दि.७ फेब्रुवारी १८४८ रोजी सर जॉर्ज रसल क्लार्क या मुंबई गव्हर्नरच्या आदेशावरून हेनरी ब्रौनसाहेब जज्ज यांनी पुणे येथे 'नेटिव्ह जनरल लायब्ररी'ची स्थापना केलेली होती. या कामी गोपाळराव हरी देशमुख यांची विशेष मदत झालेली होती. या अनुषंगाने लोकहितवादी यांनी 'पुण्यांत लायब्ररीची स्थापना' अशा शीर्षकाचे शतपत्रातील तिसऱ्या क्रमांकाचे पत्र प्रभाकरमधून २६ मार्च १८४८ रोजी प्रकाशित केले होते. त्यात लोकहितवादींनी समाजास लायब्ररीची किती नितांत

आवश्यकता आहे तसेच लायब्ररी स्थापनेत किती अडचणी आल्या याविषयी माहिती लिहीली होती. याअनुषंगाने लोकहितवादींनी लिहिले होते की, "पुण्यांतील किती एक आळशी लोकांस लायब्ररी काय हे माहित नाहीं, याच कारणामुळें सरदार लोकांनीं व कामदार लोकांनीं उदारपणानें पैसा दिला नाही... पुण्यांतील बहुत गृहस्थांस सांप्रतकाळीं विद्या आणि ज्ञान काय आहे याविषयीं समजूत नाहीं. व ते आज बहुत वर्षे स्वस्थ घरीं बसून इंग्रज सरकारची देणगी खात आहेत. याजमुळे अशा कामांत ते झटून पडत नाहींत. व त्यांस कितीही समजून सांगितले तरी, त्यांच्या ज्या जुन्याच पोकळ समजुती आहेत, त्याच ते खऱ्या धरतात."[६८] यावरून लक्षात येते की, तत्कालीन समाजातील श्रीमंत लोकांना ग्रंथालयांचे महत्त्व समजलेले नसल्याने ते कोणत्याही बाबतीत ग्रंथालये स्थापनेत आपला पुढाकार घेत नव्हते. अर्थात सुरूवातीच्या काळात अशी अवस्था असणे लोकहितवादींच्या दृष्टिने सहाजिकच होते. परंतु कालांतराने या ग्रंथालयाचा उपयोग शिक्षणाच्या कामी निश्चित होईल असा विश्वास त्यांना होता त्यामुळेच या ग्रंथालयास लोकहितवादींनी सर्वतोपरी साहाय्य केले. लोकहितवादींनी स्वतः वाई येथील व अहमदनगर येथील ग्रंथालय स्थापनेसही हातभार लावलेला होता.

लोकहितवादी स्वतः एक ग्रंथकार होते. त्यांनी स्वतः विविध भाषांमध्ये विपुल अशी ग्रंथ निर्मिती केलेली होती. त्यातील अनेक ग्रंथातून त्यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार स्पष्ट होतात. ग्रंथ लिखाण करतानाच त्यांनी धार्मिक, इतिहास संशोधनात्मक, चरित्रात्मक, राजकीय, अर्थशास्त्रीय विवेचन करणारे, समाजचिंतनात्मक लेख व इतर अशा विविध विषयांवर अधारित ग्रंथांचे प्रकाशन केलेले होते. त्यांनी राजस्थानचा इतिहास, उदेपूरचा इतिहास, हिंदुस्थानचा इतिहास, ऐतिहासिक गोष्टी भाग १ ते ३, निबंध संग्रह, हिंदुस्थानास दारिद्र्य येण्याची कारणे, गुजराती भाषेंत निगमप्रकाश व आगमप्रकाश अशी अनेक ग्रंथे त्यांनी लिहिली होती. तत्कालीन कालखंडाचा विचार करण्याच्या दृष्टिकोनातून ही ग्रंथसंपदा अनेक अंगाने उपयुक्त ठरलेली होती.

एकूणच या सर्व मुद्यांमधून लोकहितवादींचे शैक्षणिक विचार स्पष्ट होतात. वस्तुतः त्यांची नोकरी ही शिक्षणक्षेत्रापेक्षा पूर्ण वेगळी असतांनादेखील त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन एवढा प्रगल्भ होता हे त्यांच्या शतपत्रांतील व इतर निबंधांच्या लिखाणातील वर्णणांवरून सहज लक्षात येते. समाज सुधारणेसाठी शिक्षणाची आवश्यकता किती आहे हे सांगतानाच त्यांनी समाजातील अज्ञानी व जुनाट पद्धतीच्या विचारसरणीवर अतिशय कडक व कठोर शब्दात हल्ले चढविले होते. त्यांनी मांडलेले शिक्षणविचार हे एकोणिसाव्या शतकातच नाही तर आजच्या काळाचा विचार करताही महत्त्वाचे असल्याचे दिसून येतात.

थोडक्यात बाळशास्त्री जांभेकर व लोकहितवादी हे दोन्ही समाज सुधारक एकोणिसाव्या शतकातील शैक्षणिक विचारांचे अग्रणी म्हणतात येतील. या दोघांनीही आपआपल्या परीने शैक्षणिक विचार समाजात रूजवून समाजास ज्ञानी करण्याचा प्रयत्न केला. दोघांच्याही शैक्षणिक विचारांमध्ये काही बाबतीत साम्य असल्याचे स्पष्ट दिसून येते. प्रामुख्याने भारतीय समाजाला शिक्षणाची आवश्यकता असण्याची कारणे, देशाच्या उन्नतीसाठी पाश्चात्य शिक्षणपद्धतीची आवश्यकता, स्त्रियांच्या शिक्षणाची आवश्यकता या बाबतीत त्यांच्या विचारांमध्ये साम्य होते. या दोन्ही समाजसुधारकांनी मांडलेले शैक्षणिक विचार हे केवळ एकोणिसाव्या शतकातच उपयुक्त ठरले होते असे नाही तर त्यांची सत्यता आजच्या काळात देखील दिसून येते. विशेषतः या दोन्ही सुधारकांनी आपआपल्यापरीने व्यक्त केलेली शिक्षणाची आवश्यकता, पाश्चात्य ज्ञानाचा पुरस्कार, शिक्षणात स्थानिक भाषा व इंग्रजी भाषेचे महत्त्व, विविध कला कौशल्ये शिक्षणाची आवश्यकता, आधुनिक तंत्र शिक्षणाची आवश्यकता, ग्रंथांचे महत्त्व या सर्व बाबी जेवढया एकोणिसाव्या शतकात आवश्यक होत्या तेवढयाच त्या एकविसाव्या शतकातही महत्त्वाच्या वाटतात. किंबहुना आजची शिक्षण पद्धतीही या विचारांवर अवलंबून असल्याची दिसून येते.

## ३.३ संदर्भ


१. नेवाळकर अमला : 'समाजपुरूष जगन्नाथ शंकरशेठ', श्री गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१० पृ.क्र. ५२.

२. कित्ता, पृ.क्र. ६६.

३. कित्ता, पृ.क्र. ६८.

४. जांभेकर गणेश गंगाधर (संपादक) : 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर ः जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड ३', लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०,परिशिष्ट ३, पृ.क्र.१५, १६.

५. प्राचार्य गरूड अण्णासाहेब व प्राचार्य सावंत बी.बी.:'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९५, पृ.क्र.५७.

६. जांभेकर गणेश गंगाधर (संपादक) : 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर ः जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड ३', लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०, परिशिष्ट १, पृ.क्र.३१०.

७. कित्ता, परिशिष्ट ३, कै.केशव शिवराम भवाळकरकृत 'आत्मचरित्रां'तील प्रोफेसर बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचे वृत्त व गुणवर्णन, पृ.क्र. ६.

८. लेले रा.के. : 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे : द्वितीय आवृत्ती २००४, पृ.क्र. ५७.

९. कित्ता, पृ.क्र. ५७.

१०.जांभेकर गणेश गंगाधर (संपादक) : 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड २', लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०, पृ.क्र. १, २.

११. कित्ता, पृ.क्र. ४.

१२. कित्ता, पृ.क्र. १९१.

१३. कित्ता, पृ.क्र. १९१.

१४. डॉ.सहस्त्रबुद्धे पु.ग.:'महाराष्ट्र संस्कृती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ.आ.२००३ पृ.क्र. ६४७.

१५. जांभेकर गणेश गंगाधर (संपादक):'आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड २', लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०, पृ.क्र. ४९.

१६. कित्ता, पृ.क्र. ११९.

१७. कित्ता, पृ.क्र. २१.

१८. कित्ता, पृ.क्र. १३९.

१९. कित्ता, पृ.क्र. १३९.

२०. डॉ. सहस्त्रबुद्धे पु.ग.:'महाराष्ट्र संस्कृती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती २००३, पृ.क्र. ७३४.

२१. जांभेकर गणेश गंगाधर (संपादक) : 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर ः जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड २', लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०, पृ.क्र. ५५.

२२. कित्ता, पृ.क्र. ५९.

२३. कित्ता, पृ.क्र. २७९.

२४. कित्ता, पृ.क्र. १३७.

२५. कित्ता, पृ.क्र. १३७.

२६. कित्ता, पृ.क्र. २९३.

२७. कित्ता, पृ.क्र. २९४.

२८. जांभेकर गणेश गंगाधर (संपादक) : 'आचार्य बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर'ः जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड ३', लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०, परिशिष्ट ३, कै.केशव शिवराम भवाळकरकृत 'आत्मचरित्रां'तील प्रोफेसर बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचे वृत्त व गुणवर्णन, पृ.क्र. ३.

२९. कित्ता, परिशिष्ट ३, पृ.क्र. १३.

३०. कित्ता, परिशिष्ट ३, पृ.क्र. ७.

३१. जांभेकर गणेश गंगाधर (संपादक):'आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर', जीवनवृत्त व लेखसंग्रह-खंड २', लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०,पृ.क्र.७५, ७७.

३२. कित्ता, पृ.क्र. ५५.

३३. कित्ता, पृ.क्र. ७५.

३४. जांभेकर गणेश गंगाधर (संपादक) : 'आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड ३', लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०, परिशिष्ट १, पृ.क्र. २९.

३५. डॉ.फडकुले निर्मलकुमार : 'महाराष्ट्राचे शिल्पकार लोकहितवादी', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००४, पृ.क्र. २७.

३६. प्रियोळकर अनंत काकबा (संपादक) : 'लोकहितवादीकृत निबंध संग्रह : व्यक्ति वाङःमय व विचार', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९६७, पृ.क्र.१०, ११.

३७. वैद्य सरोजिनी : 'गोपाळराव हरी (लोकहितवादी)', सुपर्ण प्रकाशन, पुणे, परिशिष्ट ४ पृ.क्र. १३१.

३८. प्रियोळकर अनंत काकबा (संपादक) : 'लोकहितवादीकृत निबंध संग्रह', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९६७, पत्र क्र ५०, पृ.क्र. १२७.

३९. कित्ता, पत्र क्र. ५२, पृ.क्र. १३३.

४०. कित्ता, पत्र क्र. २, पृ.क्र. ४.

४१. कित्ता, पत्र क्र. ८, १३, पृ.क्र. १६, १७, २७.

४२. कित्ता, पत्र क्र. ३, पृ.क्र. ७.

४३. कित्ता, पत्र क्र. ३८, पृ.क्र. ९६.

४४. कित्ता, पत्र क्र. ३६, पृ.क्र. ९१.

४५. कित्ता, पत्र क्र. ४२, पृ.क्र. १०५.

४६. कित्ता, पत्र क्र. ४५, पृ.क्र. ११४.

४७. कित्ता, पत्र क्र. ४७, पृ.क्र. ११९.

४८. प्रियोळकर अनंत काकबा (संपादक) : 'लोकहितवादीकृत निबंध संग्रह', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९६७, पत्र क्र. १६, पृ.क्र. ३४.

४९. कित्ता, पृ.क्र. ४३७.

५०. डॉ.फडकुले निर्मलकुमार : 'महाराष्ट्राचे शिल्पकार लोकहितवादी', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००४, पृ.क्र. ३५.

५१. प्रियोळकर अनंत काकबा (संपादक) : 'लोकहितवादीकृत निबंध संग्रह', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९६७, पत्र क्र.३१, पृ.क्र. ७९.

५२. कित्ता, पत्र क्र.५४, पृ.क्र.१३७.

५३. कित्ता, पत्र क्र. १०, पृ.क्र. २०.

५४. कित्ता, पत्र क्र. १०, पृ.क्र. २१.

५५. कित्ता, पत्र क्र. १६, पृ.क्र. ३६.

५६. कित्ता, पत्र क्र. ४४, पृ.क्र. १११, ११२.

५७. कित्ता, पत्र क्र. ४३, पृ.क्र. १०८.

५८. कित्ता, पत्र क्र. ९७, पृ.क्र. २४५.

५९. कित्ता, पत्र क्र. ९, पृ.क्र. १८, १९.

६०. कित्ता, पृ.क्र. ३९५, ३९६.

६१. कित्ता, पृ.क्र. ३९६.

६२. कित्ता, पत्र क्र. ५६, पृ.क्र. १४१.

६३. कित्ता, पत्र क्र. ५६, पृ.क्र. १४२.

६४. कित्ता, पत्र क्र. ५६, पृ.क्र. १४२.

६५. कित्ता, पत्र क्र. ९३, पृ.क्र. २३६.

६६. कित्ता, पृ.क्र. ३८६.

६७. कित्ता, पृ.क्र. ३८६, ३८७.

६८. कित्ता, पत्र क्र. ३, पृ.क्र. ६.

**प्रकरण चौथे**

# महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार

**४.१ महात्मा जोतीराव फुले यांचा अल्पपरिचय**

**४.२ महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक कार्य**

**४.३ महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार**

१) शिक्षणाअभावी बहुजन समाजाची अवस्था

२) ब्रिटिश सरकारच्या शिक्षणविषयक भूमिकेविषयी महात्मा फुले यांचे विचार

३) महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

४) महात्मा फुले यांचे अस्पृश्य शिक्षणविषयक विचार

५) महात्मा जोतिबा फुले यांचे प्राथमिक शिक्षणविषयक विचार

६) महात्मा जोतिबा फुले यांचे माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण विषयक विचार

७) जोतिबांचे शिक्षकविषयक विचार

८) जोतिबांचे अभ्यासक्रमविषयक विचार

९) जोतिबांच्या मते अभ्यासपुरक उपक्रमांची आवश्यकता

१०) जोतिबांचे शेतकी व व्यवसायशिक्षणविषयक विचार

११) शालेय व्यवस्थापन विषयक जोतिबांचे विचार

**४.४ संदर्भ**

## प्रकरण चौथे

# महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार

### ४.१ महात्मा जोतीराव फुले यांचा अल्पपरिचय

महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म इ.सन १८२७ साली पुणे येथे झाला. महात्मा फुलेंच्या पुर्वजांचे मूळ आडनाव 'गोऱ्हे' असे होते परंतु त्यांचे घराणे क्षत्रिय माळी जातीचे असल्यामुळे त्यांचे वंशज फुलांची शेती करण्याचा व्यवसाय करीत. त्यामुळे त्यांना 'फुले' हेच नाव रूढ झाले.[१] जोतीरावांच्या घरात शिक्षणाचा वारसा नसतानाही त्यांच्या वडिलांनी प्रथम त्यांना पंतोजीच्या शाळेत घातले व तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. जोतीराव हे हुशार विद्यार्थी असले तरीही तत्कालीन समाजात शिक्षण ही बाब केवळ उच्चभ्रूंची मक्तेदारी होती म्हणून जोतिबांचे शिक्षण बंद करण्यात आले होते, परंतु त्यांना शिक्षणाची प्रचंड तळमळ होती हे लक्षात आल्यानंतर त्यांच्या वडिलांनी दोन विद्वानांच्या सांगण्यावरून जोतिबांचे नाव स्कॉटिश मिशनच्या इंग्रजी शाळेत दाखल केले व त्यांचे शिक्षण पुन्हा सुरू होऊ शकले. एक हुशार व बुद्धिमान विद्यार्थी म्हणून जोतिबा विद्यार्थी व शिक्षक वर्गात प्रसिद्ध होते.

शाळेतील शिक्षण चालू असतानाच तत्कालीन परिस्थितीची जाणीव त्यांना होती. भारतीय समाजातील उच्चभ्रूंची मक्तेदारी, त्यामुळे शुद्रातिशुद्रांना सहन कराव्या लागणाऱ्या हाल अपेष्टा, अविद्येमुळे समाजात असलेल्या अंधश्रद्धा, स्त्री शिक्षणाचा अभाव या सर्व बाबतीत आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने बारीकसारीक गोष्टींचे चिंतन त्यांनी केलेले होते. समाजाची घडी चांगली बसविण्यासाठी क्रांतिकारी विचार रूजविण्याशिवाय पर्याय नाही अशी त्यांची खात्री झाली होती. समाजाची उन्नती होण्यासाठीसाठी बहुजनांना शिक्षण मिळणे आवश्यक आहे हे त्यांनी ओळखलेले होते. म्हणून त्यांनी आपल्या काही सहकाऱ्यांसोबत सर्वसामान्यांच्या शिक्षणाचे कार्य हाती घेतले.

तत्कालीन समाजातील बहुजन समाजाची उच्चभ्रू समाजाच्या जोखडातून मुक्तता करण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. स्त्री शिक्षण, अस्पृश्यांसाठी शिक्षण, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, अस्पृश्यांसाठी स्वतःच्या घरचा पाण्याचा हौद खुला करणे, सत्यशोधक समाज, विधवा पुनर्विवाहास उत्तेजन, दारूबंदी या विविध मार्गांनी त्यांनी समाजातील गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याशिवाय त्यांनी आपले सामाजिक व शैक्षणिक सुधारणावादी क्रांतिकारी विचार आपल्या 'गुलामगिरी, शेतकऱ्यांचे आसूड, ब्राह्मणांचे कसब, विद्या खात्यातील ब्राह्मण पंतोजी, सार्वजनिक सत्यधर्म, अखंडादि काव्यरचना, इशारा, सत्सार अंक १ व २' यासारख्या विविध ग्रंथांच्या माध्यमातून स्पष्ट केले. त्यांच्या या कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी खूप मोलाचे सहकार्य केले. फुले दांपत्याला सनातनी व कर्मठ लोकांकडून प्रचंड त्रास झाला परंतु त्यांनी आपले समाजसेवेचे व्रत अखंड चालू ठेवले होते.

समाजामध्ये निर्माण झालेले गट व समाजाची अवनती याचे मूळ कारण धार्मिक आचार विचारात होते हे त्यांनी ओळखलेले होते. त्यांना अंधश्रद्धा, कर्मकांड व स्वार्थी वृत्तींनी बरबटलेला धर्म नको होता. आपल्या विचाराच्या प्रचारार्थ त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केलेली होती. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार करून परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी भक्तीचा मार्ग सांगितलेला होता. एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांच्या यादीमध्ये जोतिबांचे नाव एक अग्रणी सुधारक म्हणून घ्यावे लागते कारण लोकहितवादींसारखे सुधारक बहुजन समाजाच्या सुधारणेसाठी प्रयत्न करीत होते, त्याचवेळी बहुजन समाजातून त्यांच्या सुधारणेसाठी सर्व प्रथम पुढे आलेले समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले हे होते.

## ४.२ महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक कार्य

महात्मा जोतिबा फुले यांनी समाजाचे वस्तूनिष्ठ परीक्षण केलेले होते व त्यातून त्यांना समाजाचे अनेक असे दोष दिसून आलेले होते. समाजात त्यांना अनेक बाबतीत विषमता

जाणवलेली होती. स्त्री-पुरूष, गरीब-श्रीमंत, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य अशा विविध बाबतीत समाजामध्ये विषमता दिसून येत होती. ही सर्व विषमता दूर करून समानतेवर आधारित एक निकोप समाज निर्माण व्हावा अशी जोतिबांची इच्छा होती. समाजातील सर्व दोषांचे मूळ त्यांना बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या अभावात दिसत होते. एखाद्या शोषित वर्गाला आपल्यावर अन्याय होतो हेच जोपर्यंत कळत नाही तोपर्यंत त्याला जगण्याचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार आहे हेही कळू शकत नाही. ही बाब त्यास समजण्यासाठीच शिक्षण महत्त्वाचे होते असे त्यांचे स्पष्ट मत होते. महात्मा फुले यांना जे समाज परिवर्तन अपेक्षित होते त्याचा मुलाधार बहुजनांचे शिक्षण हे होते. त्यामुळे त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात ही स्त्री शिक्षणाच्या कार्यानेच केलेली होती.

स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी पुण्यामध्ये एकूण तीन शाळा सुरू केल्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत इ.सन १८४८ मध्ये त्यांनी बुधवार पेठेतील भिडे वाडयात आपल्या काही निवडक मित्रांच्या मदतीने पहिली मुलींची शाळा स्थापन केली.[२] सुरूवातीला महात्मा जोतिबा फुले हे स्वतः या शाळेत शिक्षकाचे काम करीत होते परंतु त्यांच्या कामाचा व्याप वाढल्याने त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या शाळेत शिक्षिकेचे कार्य करू लागल्या. अर्थात या कार्यात त्यांना अनंत अडचणी आलेल्या होत्या. त्यांना स्वतःचे घर सोडावे लागले. त्यामुळे ही शाळा काही काळ बंद करावी लागली. तद्नंतर सदाशीव गोवंडे यांनी दिलेल्या जागेत ही शाळा पुन्हा सुरू झाली. महात्मा जोतीराव फुले यांनी मुलींच्या शाळा चालविण्यामध्ये अडचणी येऊ नयेत म्हणून एक कार्यकारी मंडळ नेमले होते. या कार्यकारी मंडळात स्वतः महात्मा जोतिबा फुले, केशव शिवराम जोशी, बापू रावजी मांडे, अण्णा सहस्त्रबुद्धे, विष्णु मोरेश्वर भिडे, जगन्नाथ सदाशिवजी इत्यादी मंडळी होती.[३] याच कार्यकारी मंडळाच्या माध्यमातून जोतिबांनी १७ सप्टेंबर १८५१ रोजी रस्ता पेठेत मुलींची दुसरी शाळा व १५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत मुलींची तिसरी शाळा सुरू केली होती.

जोतिबांना सार्वत्रिक शिक्षणाची अत्यंत आवश्यकता वाटत होती कारण शिक्षण हे मूठभर उच्चभ्रू समाजाकडे एकवटलेले होते. स्त्रियांना जेवढी शिक्षणाची गरज होती तेवढीच गरज अस्पृश्य व दलित वर्गालाही होती. या दृष्टिकोनातून जोतिबांनी स्त्रियांसाठी जशा शाळा सुरू केल्या तशाच त्या अस्पृश्य समाजासाठीही सुरू केल्या. जोतिबांनी इ.सन १८५१ मध्ये पुण्यातील नाना पेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरू केली होती. हिच शाळा पुढे इ.सन १८५२ मध्ये वेताळ पेठेत सुरू केली. अस्पृश्यांसाठी दुसरी शाळा सदाशीवराव गोवंडे यांच्या वाडयात इ.सन १८५३ साली सुरू झाली. जोतिबांनी मुलींच्या शाळेसाठी जशी समिती नेमली होती तशीच अस्पृश्यांच्यासाठी सुरू केलेल्या शाळा चालविण्यासाठी १० सप्टेंबर १८५३ रोजी एक सभा घेऊन समिती नेमली होती. या सभेचा वृत्तांत १५ सप्टेंबर १८५३ च्या 'ज्ञानोदय' या वृत्तपत्रात छापून आलेला होता. त्यात लिहिण्यात आले होते की, "म्हार, मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्यासारखे या देशाचे दुसरे कोणतेही हित नाही असे जोतीराव फुले व त्यांचे जिवलग मित्र यांच्या मनात येऊन त्यातूंन जोतीराव यांनी या कामाविषयी बहुत दिवसांपासून उद्योग चालविला आहे. परंतु एक चांगला विचार करण्याहून दुसरा विचार करणाऱ्या अधिक लोकांनी तेच काम मन घालून केल्यास फार चांगले होईल. म्हणून त्यांचे व स्नेही यांच्या मनात असे आले की, या कामाकरिता मंडळी असावी यास्तव सर्वत्रांनी जमून सभा स्थापन केली ती येणेप्रमाणे, सदाशिव बल्लाळ गोवंडे : मुख्यस्थानी, मोरो विठ्ठल वाळवेकर : चिटणीस, सखाराम यशवंत परांजपे : खजिनदार, जोतीराव गोविंद फुले, बाबाजी मनाजी डेंगळे : सभासद."[४] याच समितीच्या माध्यमातून अस्पृश्यांसाठी इ.सन १८५८ मध्ये तिसरी शाळा सुरू करण्यात आली. या तीनही शाळा चांगल्या प्रकारे चालविण्याचा प्रयत्न जोतिबा व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेला होता. या शाळा चालविताना खूप अडचणी जोतिबांना आलेल्या होत्या तरीही त्यांनी शाळांची व्यवस्था चांगली ठेवण्याचा प्रयत्न केलेला होता.

## ४.३ महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार

प्रत्येक समाजसुधारकामध्ये एक असामान्य अशी विद्वत्ता असते. ते वर्तमानात जगतात हे खरे असले तरीही भविष्याचा वेध घेण्याचे सामर्थ्य त्यांच्याकडे असते आणि त्यामुळेच ते

परंपरानिष्ठ समाजात आपले अद्वितीय असे कार्य करू शकतात. महात्मा फुले या विचारांना अपवाद नव्हते. महात्मा जोतिबा फुले यांनी समाज सुधारणेसाठी शिक्षण हे माध्यम अतिशय महत्त्वाचे मानलेले होते. शिक्षणाच्या माध्यमातून जे ज्ञान मनुष्यास प्राप्त होते त्यावरच त्याच्या विचारांची प्रगल्भता अवलंबून असते असे त्यांना वाटत होते. व्यक्तीला जे शिक्षणातून ज्ञान प्राप्त होते ते माणसाच्या दृष्टिकोनातून अतिशय आवश्यक असते. त्यांच्या मते शिक्षणाअभावी व्यक्ती हा पशुसमान असतो. ज्ञानाशिवाय केलेली सर्व कर्मे ही निरर्थक असतात व माणूस हा एक प्रकारे पाषाणच असतो. उच्चभ्रू समाजाने शिक्षण व ज्ञानाचे दरवाजे शूद्र व अतिशूद्रांसाठी बंद केलेली असल्याने त्यांची अवस्था अतिशय विकट बनलेली होती. या समाजाच्या उद्धाराच्या दृष्टिकोनातून शिक्षणाचे स्वरूप कसे असावे याविषयी त्यांची एक ठाम भूमिका बनलेली होती. अस्पृश्यांसाठी जोतिबांच्या मनात कणव होती. त्या अनुषंगाने त्यांनी जे वाङ्‌मय रचलेले होते त्यातून व इ.सन १८८२ साली हंटर शिक्षण आयोगासमोर मांडलेल्या साक्षीतून त्यांचे शिक्षण विषयक विचार स्पष्ट होतात.

## १) शिक्षणाअभावी बहुजन समाजाची अवस्था

शूद्रातिशूद्रांसाठी शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणारे महात्मा जोतिबा फुले हे बहुजन समाजातील पहिले कर्ते सुधारक होते. समाजातील विविध बाबींमधील विषमता निर्माण होण्याचे कारण जोतिबांना शिक्षणातच दिसत होते. बहुजन समाजाला शिक्षणाचा अधिकार नाकारला गेल्याने तसेच शिक्षण आपल्यासही मिळावे एवढी त्यांच्यात जागरूकता नसल्याने अनेक समस्या बहुजन समाजाला भेडसावत होत्या. जोतिबांच्या मते हा समाज आर्थिक विषमता, स्पृश्य-अस्पृश्यता, स्त्री-पुरूष विषमता, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, अज्ञान अशा अनेक समस्यांना बळी पडलेला होता. या समाजाला योग्यवेळी दर्जेदार शिक्षण मिळाले असते तर निश्चितच त्यांची अवस्था एवढी वाईट झाली नसती. आपल्या विविध ग्रंथातून जोतिबांनी शिक्षणाअभावी तत्कालीन बहुजन समाजाची अवस्था कशी झालेली होती याचे यथार्थ वर्णन केलेले होते.

तत्कालीन समाजाच्या अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती करणारा कुणबी वर्ग होता. जोतिबा या वर्गाला समाजाचा पोशिंदा म्हणत असत. स्वतः शेतीमध्ये प्रचंड काबाडकष्ट करून समाजाची भूक भागविणारा हा कुणबी वर्ग मात्र उपासमारीचा भक्ष बनलेला होता. शिक्षण नसल्यामुळे कुणबी वर्ग कुठल्याही प्रकारचा हिशोब ठेवू शकत नव्हता, त्याला लिहिता वाचता येत नसल्याने जमीनदार, सावकार यांनी विविध कागदपत्रांमध्ये कोणत्या नोंदी केल्या हे त्याला समजत नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी लुबाडल्या जात असत. विविध प्रकारचे कर भरून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडून जात होते.

शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा केवळ जमीनदार सावकार एवढेच घेत होते असे नाही तर सनातनी भट ब्राह्मणही त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्याकडून प्रचंड दक्षिणा उपटत होते. विशेषतः शेतकऱ्याच्या घरी एखादे मूल जन्माला आले असेल त्याप्रसंगी, लग्नप्रसंगी, घरभरणी प्रसंगी, याशिवाय विविध धार्मिक विधी पार पाडण्याच्या नावाखाली या भट ब्राह्मणांकडून प्रचंड लूट कुणबी शेतकऱ्यांची होत असे. या अनुषंगाने जोतिबा आपल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात लिहितात की, "शेतकऱ्यांचे स्त्रियांस पुत्र झाले कीं, भटब्राह्मणांची धनरेषा उपटते. ती अशीं कीं, प्रथम मुख्य उपाध्ये शेतकऱ्यांचे घरीं जातात व त्यांचे घरांतील वाव व कासऱ्यांनीं वेळ मोजणाऱ्या अज्ञानी स्त्रियांस मुलांचे जन्मकाळ विचारून, ज्या ज्या राशीस जास्त अनिष्ट ग्रह जुळत असतील, तसल्या राशी मुकरर करून त्यांच्या अर्भकांच्या जन्मपत्रिका अशा रीतीनें तयार करितात कीं, अज्ञानी शेतकऱ्यांचे पुत्रजन्मानें जहालेल्या सर्व आनंदांत माती कालवून त्यास घाबरे करितात व दुसरे दिवशीं त्याजकडून पिंडींतील लिंगापुढें आपले भाऊबंद, सोयरे-धायरे व इष्टमित्रांपैकी भटब्राह्मणास मोलानें जपानुष्ठानास बसवितात व त्यांपैकीं कोणांस शेतकऱ्यांपासून उपोषणाचे निमित्तानें फलहारापुरते पैसे देववितात. उन्हाळा असल्यास पंखे देववितात, पावसाळा असल्यास छत्र्या आणि हिवाळा असल्यास पांढऱ्या धाबळया देववितात. खेरीज उपाध्याचा हात चालल्यास तो शेतकऱ्यापासून पुजेच्या निमित्तानें तेल, तांदूळ, नारळ, खारका, सुपाऱ्या, तूप, साखर, फळफळावळ वगैरे पदार्थ उपटावयास कमी करीत नाहींत."[५] यावरून स्पष्ट कल्पना येते की, भोळया व अज्ञानी

समाजाचा फायदा हे सनातनी भट ब्राह्मण स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी करून घ्यायचे व विविध वस्तुंची मागणी शूद्र कुणब्यांकडे करायचे. भट ब्राह्मण हे विद्वान असतात, ब्रह्म जानणारे असतात असे मानून शेवटी त्यांच्या सांगण्याला हे बळी पडायचे व स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन भट ब्राह्मणांची घरे भरायचे. जोतिबांच्या मते हा समाज जर ज्ञानी असता तर त्यांनी या सर्व बाबींचा विचारपूर्वक निर्णय घेतला असता.

समाजातील आर्थिक विषमतेचे कारणही शिक्षणाच्या अभावातच होते असे जोतिबांच्या शिक्षण विचारांतून स्पष्टपणे दिसून येते. तत्कालीन समाजात शिक्षण हे मूठभर उच्चभ्रू समाजाच्या हाती केंद्रित झालेले असल्याने बहुजन समाज मात्र अज्ञानाच्या अंधःकारात खितपत पडलेला होता असे चित्र दिसून येते. जोतिबांच्या मते कुणबी शेतकऱ्यांनी जर शेती करता करता विद्या संपादित केली असती तर निश्चितच त्यांचे असे आर्थिक शोषण झाले नसते. तत्कालीन समाजात कामगारांची स्थितीही अतिशय बिकट होती. एक तर काम उपलब्ध न झाल्यामुळे उपासमारीची वेळ यायची अशा परिस्थितीत मिळेल ते काम मिळेल त्या रोजंदारीवर करावे लागायचे. याहुनही वाईट अवस्था म्हणजे कित्येकदा कारकुनांकडून कामगारांची खोटी हजेरी लावून त्यांचा पैसा बळकाविण्याचा प्रयत्न केला जायचा. प्रत्यक्ष रोजंदारी आली किती आणि आपल्याला किती मिळाली हेही कामगारास निरक्षरतेमुळे समजत नव्हते.

शिक्षणाअभावी कुणबी समाजाची जेवढी हालाखीची स्थिती होती तशीच किंबहुना त्याहुनही हालाखीची स्थिती स्त्रियांची होती. मुळात ज्या समाजात पुरूष शिक्षणाची एवढया मोठया प्रमाणात वाताहात झालेली असताना स्त्री शिक्षणाचा विचार होणे कदापि शक्य नव्हते. तत्कालीन समाजात बालविवाहासारखी प्रथा असल्यामुळे स्त्रियांना शिक्षण देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. केवळ शिक्षणाच्या अभावानेच अनिष्ट प्रथांचे प्राबाल्य समाजात वाढत चालले होते. बालविवाह ही एक प्रथा विचारात घेतली तर त्यातून विधवांचा प्रश्न निर्माण होत होता. बहुतांश वेळी बालिका जरठ विवाह असल्याने अकाली वैधव्य येणे या गोष्टी समाजात नित्याच्याच होत्या व एखाद्या स्त्रीला वैधव्य आले की, तिला सोवळे करण्याचा प्रघात होता. या गोष्टीला पर्याय म्हणून विधवा पुनर्विवाहाचा विचार मात्र केला जात नव्हता. असा कोणी

प्रयत्न केला तरी त्यास समाजातून कडाडून विरोध व्हायचा. जोतिबांना वाटत होते की, जर पुरूषांना पत्नी जिवंत असतानाही पुनर्विवाहाचा अधिकार होता तर मग तो विधवा स्त्रियांना का नको? या अनुषंगाने जोतिबांनी सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात लिहिले होते की, "एखाद्या स्त्रीचा नवरा ज्या वेळेस मृत होतो, त्यावेळेस ती फार दुःखसागरांत बुडून तिला फार संकटें सोसावीं लागतात. मरेतोंपर्यंत सारा काळ वैधव्यांत काढावा लागतो; इतकेच नव्हे तर पूर्वी कित्येक सतीदेखील जात असत, परंतु पुरूषाला तिच्याविषयीं दुःख होऊन तो कधीं "सता" गेलेला ऐकिला आहे काय? तो लागेल तितकीं लग्नें करूं शकतो तशी स्त्रियांची स्थिती नाहीं."[६] त्यांच्यामते इश्वराने सर्व प्राणिमात्रांमध्ये माणसास सर्वश्रेष्ठ बनविले. मनुष्यप्राण्यामध्ये स्त्री आणि पुरूष असे दोन भेद ठेवले. या दोघांमध्ये स्त्रीच अधिक श्रेष्ठ आहे असे त्यांच्या विचारांतून दिसते कारण स्त्रीमध्ये नवीन पिढी निर्माण करण्याची क्षमता असते. एकंदरीत विचार करता निसर्गतःच स्त्रीला पुरूषांपेक्षा श्रेष्ठ बनविले गेले. परंतु भारतीय समाजाचा विचार करता उत्तर वैदिक कालखंडापासून मात्र पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रियांचे हे श्रेष्ठत्त्व कधीच मान्य केले नाही. उलट अधिकाधिक बंधने व रूढीपरंपरा यामध्ये स्त्रीला करकचून जखडून ठेवण्याचे काम समाजाने केले. एकूणच स्त्रीची एवढया मोठया प्रमाणात जी दुर्दशा झाली त्याला कारण तत्कालीन समाजाने स्त्री शिक्षण नाकारलेले होते हेच दिसून येते. शिक्षणाचा प्रचार व प्रसार झालेला असता तर स्त्रियांची स्थिती वेगळी पहावयास मिळाली असती.

एकोणिसाव्या शतकातील स्त्री व आजच्या काळातील स्त्री यांच्यामध्ये तुलना केली तर त्यामध्ये प्रचंड तफावत जाणवते. आजच्या काळातील स्त्रीला शिक्षणाचे दरवाजे उघडे आहेत त्यामुळे आज ती सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने काम करताना दिसत आहेत. मोठमोठी अधिकारपदे आज स्त्री उपभोगत आहेत. हे केवळ शिक्षण प्रसारानेच होऊ शकलेले दिसते. अर्थात हे सर्व एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांच्या शैक्षणिक विचारांचेच फलित म्हणावे लागेल. त्याकाळी मात्र या सर्व बाबींचा अभाव होता व याला जबाबदार केवळ तत्कालीन समाज व्यवस्थाच होती.

एकोणिसाव्या शतकातील समाजात शूद्र व अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार, मांग, चांभार, कुंभार, माळी, कुणबी अशा समाजाची अवस्थाही प्रचंड वाईट होती. समाजात शिक्षण नसल्यामुळे अस्पृश्यांना आपणास इतर मानवांप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार आहे याची जाणीवच नव्हती. त्याकाळी समाजाची विभागणी स्पृश्य आणि अस्पृश्य अशी दोन गटात झालेली होती. परंतु जोतिबांना ही विभागणी मान्य नव्हती. त्यांच्यामते मानवजातच सर्व सजीव प्राण्यांमध्ये श्रेष्ठ आहे व या मानव समाजात श्रेष्ठ कनिष्ठ असा कुठलाही भेद निर्माण होऊ शकत नाही. तथापि अस्पृशांच्या अज्ञानाचा फायदा मात्र उच्चभ्रू समाज घेत होता. अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांना गावच्या बाहेर वस्ती करून रहावे लागत होते.

शिक्षण न मिळू शकल्याने अस्पृश्यांचे काय हाल होत होते याचे विवेचन महात्मा फुलेंनी आपल्या गुलामगिरी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केलेले होते. त्यात ते लिहितात की, "भटराज्यांत त्यांस व्यापाराच्या अथवा दुसऱ्या गोष्टींच्या संबधानें फिरणें झाल्यास मोठी मारामार पडत असे. त्यांतून प्रातःकाळी तर फारच अडचण पडें, कारण त्या वेळेंस सर्व वस्तूंची छाया लांब पडते आणि अशा प्रसंगीं जर कदाचित् कोणी शूद्र रस्त्यानें जात असतां समोरचे रस्त्याने भटसाहेबांची स्वारी येत आहे हें पाहून त्यांच्या अंगावर आपली छाया न पडावी या भीतीस्तव घडी दोन घडी आपला खोळंबा करून रस्त्याचे एके बाजूस होऊन त्यास बसावें लागत असे. भटजी गेल्यानंतर तो आपले कामास जाई, एखादे वेळेस याची छाया भटाचे अंगावर चुकून पडली तर तो भट लागलीच त्यास मरेमरेतोंपर्यंत मारी आणि ताबडतोब नदीवर जाऊन स्नान करी, त्यांपैकीं कित्येक लोकांस रस्त्यांत थुंकण्याची देखील पंचाईत; याजकरितां त्यांस भट वस्तींतून जाणें झाल्यास आपल्याबरोंबर थुंकण्याकरितां एखादें भांडें ठेवावें लागत असे. जर त्यांचा थुंका जमिनीवर पडून भटसाहेबानें पाहिलें म्हणजे त्या मनुष्यानें असें समजावें कीं, आतां आपलें आयुष्य पुरें भरलें."[७] एकूणच अस्पृश्यांची हालाखीची परिस्थिती यातून लक्षात येते. त्यांची अवस्था पशूंपेक्षाही वाईट झालेली होती. गावातील रस्त्याने जायचे नाही, आपली सावली भट ब्राह्मणांवर पडू द्यायची नाही, अशा अनेक अडचणी या समाजात होत्या. जोतिबांच्या मते या

समाजास शिक्षण मिळाले असते तर निश्चितच त्यांना त्यांच्या मानवी हक्काची जाणीव झाली असती.

समाजातील उच्चभ्रू गटाचा विचार करता लक्षात येईल की, ते स्वतःच्या शिक्षणाचा व शहाणपणाचा दिखावा करायचे परंतु त्यांना केवळ साक्षर असे म्हणता येईल, सुशिक्षित म्हणता येणार नाही कारण मानवतावादी दृष्टिकोन निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असते व या उच्चभ्रू समाजास परिपूर्ण शिक्षण मिळालेलेच नव्हते की, ज्यामुळे अस्पृश्यांवरील अन्याय थांबविण्यास ते तयार होतील. मुळात ब्रिटिशांनी जी झिरपण्याच्या सिद्धांतावर अधारित शिक्षण योजना भारतीयांसाठी आखलेली होती त्यानुसार त्यांनी जी अपेक्षा व्यक्त केली होती ती पुढील प्रमाणे होती. "शिक्षणात अशा सुधारणा पाहिजेत की ज्याने वरिष्ठ वर्गातील नीती व बुद्धिमत्ता यांची पातळी उंच होईल. ज्यांना फुरसत आहे आणि ज्यांचे स्वतःच्या समाजावर वजन आहे अशाच लोकांच्या शिक्षणाची आपण काळजी वाहिली पाहिजे. अशा दर्जाच्या शिक्षणाचा प्रसार या वर्गामुळे त्या जातींच्या कल्पनांत मोठा हितावह बदल घडून येईल. तसा फरक खालच्या बहुसंख्य जातींमध्ये जलद गतीने घडून येणार नाही. तसेच सवयीने आणि ज्ञानाने लायक झालेल्या एतद्देशीय लोकांच्या गटाने हिंदी शासन संस्थेत पूर्वीपेक्षा अधिक वाटा उचलावा आणि वरच्या जागा व्यापाव्यात, अशी आमची उत्कट इच्छा आहे."[८] या विचारांतून ब्रिटिश सरकारचा आशावाद दिसत होता परंतु हा उच्चभ्रूंचा गट नीतिमानतेचा विचार करून व स्वतःचा स्वार्थ सोडून सहजासहजी बहुजनांना शिक्षण देण्यास तयार नव्हता. अर्थात उच्चभ्रूपैकीही सर्व समाज अगदीच उच्च शिक्षित होता असे नव्हते. जोतिबांच्या मते या उच्चभ्रू समाजापैकी अनेकांचे शिक्षण हे कामापुरतेही नव्हते. त्यांच्यापैकी कित्येकास मॅट्रिक्युलेशन कशाला म्हणतात हेही माहीत नव्हते. ते केवळ मोठ्या घराण्यातील असल्याने संपत्तीच्या जोरावर ब्रिटिश सरकारकडून विविध हुद्दे मिळवायचे. जे लोक स्वतःच एवढे अडाणी आहेत ते शूद्र व अस्पृश्यांना काय शिकवतील असाही प्रश्न जोतिबांना पडत होता. समाजाच्या आजच्या परिस्थितीचा विचार करता आजही हेच चित्र आपणास काही अंशी समाजात दिसेल.

एकूणच असे दिसून येते की, उच्चभ्रूंना मिळणारे शिक्षण सर्वसामान्यांसाठी कुचकामी ठरणारे होते.

शिक्षणाच्या अभावानेच समाजामध्ये अंधश्रद्धा, व्यसनाधीनता यासारखी कीड समाजास लागलेली होती. आजारी असलेल्या रूग्णांना वैद्याकडे न्यायचे सोडून अंगारे धुपारे करणाऱ्या भोंदू बाबांकडे नेले जायचे. आजच्या काळाचा विचार करता शिक्षण क्षेत्रात एवढी प्रगती झालेली असतानाही मांत्रिक-तांत्रिक, जादूटोणा, अंगारे-धुपारे यापासून आजही काही लोक परावृत्त होऊ शकलेले नाहीत किंबहुना सुशिक्षित लोकांमध्येही अशा अंधश्रद्धा बाळगल्या जाताना दिसतात. याच अनुषंगाने विचार करता ज्या एकोणिसाव्या शतकात बहुजन व शूद्र समाजात शिक्षणाचा मागमूसही नव्हता त्यांची अवस्था किती भयानक असेल याचा अंदाज येतो.

जोतिबांना समाज हा वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणारा असावा असे वाटत होते. निसर्गातील प्रत्येक घटनेकडे समाजाने वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहावे अशी त्यांची अपेक्षा होती, तथापि शिक्षणाअभावी सृष्टीतील कार्यकारणभाव समजून घेण्याची कुवत या समाजाकडे नव्हती. त्यामुळे या त्यांच्या अज्ञानाचा फायदा समाजातील भोंदू घेत होते. एकूणच या बहुजन समाजाची अतिशय गंभीर अवस्था होती. अंधश्रद्धांप्रमाणेच याच बहुजन समाजात दारूसारखे व्यसन प्रचंड प्रमाणात वाढलेले होते. या व्यसनाधीनतेने गोरगरिबांची कुटुंबे उध्वस्त होत होती. पुण्यासारख्या शहरात ब्रिटिश सरकारने मोठया प्रमाणात दारूच्या दुकांनांना परवानगी दिली होती. या अनुषंगाने जोतिबांनी पुणे नगरपालिकेला पत्र पाठवून आपली खंत व्यक्त केली होती. आपल्या पत्रात त्यांनी लिहिले होते की, "दारूचे व्यसन हे नागरिकांच्या नैतिक आचरणाला बाधक आहे; एवढेच नव्हे तर, त्यांच्या आरोग्यालाही अतिशय अपायकारक आहे. हे माझे म्हणणे बहुतेक लोक आपखुषीने मान्य करतील. दारूचे गुत्ते शहरात उघडल्यापासून दारूबाजी इतक्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे की, त्यामुळे अनेक कुटुंबांचा संपूर्ण नाश झाला आहे. आणि ह्या दुर्गुणाला आता शहरात सराईतपणा आला आहे."[९]

एकूणच दारूच्या व्यसनाबातचे गांभीर्य जोतिबांच्या विचारातून दिसून येते. या व्यसनाधीनतेला महत्त्वाचे कारण शिक्षणाचा अभाव आणि दारिद्रय व बेरोजगारी हेच होते.

वरील सर्व बाबींचा विचार करता शिक्षणाच्या अभावी समाजातील गतीशीलताच नाहीशी झालेली होती असे चित्र दिसून येते. सदरच्या परिस्थितीचे वर्णन जोतिबांनी अतिशय मार्मिक शब्दात केलेले होते. आपल्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाच्या उपोद्घातात त्यांनी लिहिले होते की, "विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली, नीतीविना गती गेली! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."[१०] एकूणच जोतिबांनी स्पष्ट शब्दात सांगितले होते की गरीब शूद्रातिशूद्रांच्या हालाखीच्या परिस्थितीचे मूळ कारण त्यांच्या अज्ञानातच होते. जर त्यांना शिक्षण मिळाले असते तर निश्चित त्यांची अवस्था व समाजाचे चित्र याहून वेगळे पहायला मिळाले असते. म्हणूनच त्यांनी शिक्षणाचे कार्य आपल्या हाती घेतले.

## २) ब्रिटिश सरकारच्या शिक्षणविषयक भूमिकेविषयी महात्मा फुले यांचे विचार

इ.सन १८१८ साली पेशव्यांच्या महाराष्ट्रातील सत्तेला पराभूत करून इंग्रजांचा अंमल महाराष्ट्रात सुरू झालेला होता. माऊंट स्टुअर्ट एलफिस्टन हा ब्रिटिश अधिकारी मुंबई प्रंताचा गव्हर्नर म्हणून नियुक्त झाला होता. प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रात शिक्षणाविषयी पूर्ण अनास्था होती. एलफिस्टनने सुरूवातीस साम्राज्यवादी दृष्टिकोन ठेवून महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेची पाळेमुळे रोवण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता. तथापि महाराष्ट्रीयनांसाठी केवळ स्वार्थी दृष्टिकोनातून का होईना शिक्षण प्रसार करण्याचा प्रयत्न त्याने केला. जगन्नाथ शंकरशेठ यासारख्या प्रारंभीच्या समाजसुधारकांच्या प्रयत्नाने ब्रिटिशांनी 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना इ.सन १८२३ मध्ये महाराष्ट्रीयन लोकांच्या शिक्षण प्रसारासाठी केली आणि शिक्षण महाराष्ट्रीयन जनतेसाठी खुले केले होते. मुळात ब्रिटिश सरकारने सुरूवातीच्या काळात महाराष्ट्रात शिक्षण सर्वांसाठी सुरू केले यामुळे येथील अस्पृश्य व बहुजन समाजाच्या दृष्टिकोनातून चांगले दिवस येतील व त्यांना सन्मानाने जगता येईल असा अशावाद दिसत

होता. परंतु ब्रिटिशांनी समाजातील सर्वच घटकांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात की नाही याची शहानिशा केली नाही. त्यामुळे जोतिबा इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणावर टिका करत होते. या अनुषंगाने जोतिबा फुले लिहितात की, "या देशांत इंग्रज सरकार आल्यामुळें शूद्रादिअतिशूद्र, भटाच्या कायिक दास्यत्त्वापासून मुक्त झाले खरे, परंतु अम्हांस सांगण्यास मोठें दुःख वाटते कीं, अद्यापि आमचे दयाळू सरकारचे शूद्रादि अतिशूद्रांस विद्या देण्याविषयीं दुर्लक्ष असल्यामुळें ते अज्ञानी राहून भट लोकांचे बनावट ग्रंथांच्या संबधानें त्यांचे मानसिक दास झालेले आहेत व त्यांस सरकारजवळ दाद मागण्याचें त्राण राहिलें नाही."[११] जोतिबांच्या या विचारांवरून लक्षात येते की, ब्रिटिशांच्या आगमनामुळे जरी समतेवर अधारित समाज रचना निर्माण होईल असे चित्र दिसत होते तरीही अस्पृश्यांच्या शिक्षणाकडे मात्र त्यांनी लक्ष दिले नाही. सनातनी लोकांनी जी धर्मग्रंथे रचली त्यांच्या दास्यातून मुक्तता होण्यासाठी प्रयत्न झालेलेच नव्हते. वस्तुतः सुरूवातीच्या काळात ज्या पंतोजींच्या शाळा होत्या तेथील ब्राह्मण शिक्षक अस्पृश्यांना आपल्या शाळेत प्रवेश देण्याचे नाकारीत होते. अगदी ब्रिटिशांनी सरकारी शाळा सुरू केल्यातरी तेथील ब्राह्मण शिक्षक अशा अस्पृश्यांना प्रवेश देण्याचे टाळीत होते. आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या भीतीमुळे प्रवेश दिलाच तर त्या विद्यार्थ्याला अतिशय हीन दर्जाची वागणूक दिली जात होती. त्याला वर्गात वेगळेच बसविले जात असे. त्याच्या प्रगतीकडे अजिबात लक्ष दिले जात नसे. अशा शाळांमधील शिक्षक शाळा खात्याकडे चुकीचे अहवाल पाठवायचे. कुणबी, माळी, महार, मांग या जातीतील विद्यार्थ्यांचा केवळ संख्येसाठी विचार व्हायचा. या संख्येवर शाळांना अनुदान मिळायचे परंतु प्रत्यक्ष शिक्षण मात्र भलत्यांनाच दिले जायचे. एकूणच जोतिबांच्या मते हा ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शिक्षण पद्धतीचा खूप मोठा दोष होता. जर ब्रिटिशांनी सर्वांसाठी शिक्षण सुरू केलेले होते तर त्यांनी ते खरच सर्वांना मिळते का? याची तपासणी करणे अत्यावश्यक होते.

ब्रिटिशांनी सुरू केलेले शिक्षण हे केवळ उच्चभू समाजापुरतेच सीमित झालेले होते असे एकूण परिस्थितीचे अवलोकन केल्यानंतर दिसून येते. कारण ब्रिटिश प्रशासनामध्ये विविध पदावर काम करणारे सर्व लोक हे उच्चभू समाजातूनच असायचे. जोतिबांनी याचेही परीक्षण

केलेले होते. ते म्हणतात की, "आजपावेतों लक्षावधी रूपये विद्याखात्याकडे जरी खर्ची पडले, तथापि त्यांपासून शूद्रांच्या समाजाच्या मानाप्रमाणे त्यांच्यांत विद्वान लोकांचा भरणा वाढला नाहीं. इतकेच नव्हें तर, महार, मांग आणि चांभार यापैकी कोणई एक एक शिकलेला कामगार आढळत नाही. मग तेथें एम.ए.अथवा बी.ए.औषधास मिळण्याची मारामार."[१२] यावरून एक गोष्ट निश्चित स्पष्ट होते की, ब्रिटिश भारतीयांच्या शिक्षणावर लाखो रूपये खर्च करतात हे सांगायचे परंतु प्रत्यक्षात ही रक्कम समस्त लोकशिक्षणावर खर्च होत नव्हती तर केवळ ब्रिटिशांना चिटकून राहणाऱ्या उच्चभ्रू समाजावर होत होती. या लक्षावधी रकमेपैकी काही रक्कम शूद्रांसाठी खर्च झाली असती तर निश्चितच या शूद्र समाजातही शिक्षणाच्या माध्यमातून विद्वान निर्माण होऊ शकले असते.

थोडक्यात जोतिबांच्या दृष्टिकोनातून ब्रिटिश स्पष्टपणे जरी या गोष्टीचा उल्लेख करत नसले तरीही अस्पृश्यांसाठी चांगले शिक्षण सुरू करण्यास ते घाबरत होते. त्यांना समाजातील उच्चभ्रूंचे नेतृत्व करून आपली सत्ता दीर्घकाळ टिकवायची होती. यासाठी त्यांना उच्चभ्रू वर्गाचाच विचार अगोदर करावा लागणार होता. यासंदर्भात एलफिस्टन यांनी सांगितलेल्या बाबीचा उल्लेख एज्युकेशन बोर्डाच्या अहवालातही करण्यात आलेला होता. "मिशनऱ्यांच्या मते खालच्या वर्गातील मुले उत्कृष्ट विद्यार्थी असतात. परंतु त्या वर्गातील लोकांना आपण विशेष उत्तेजन देण्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगली पाहिजे. कारण त्यांचा समाजात अति द्वेष केला जातो; एवढेच नव्हे तर समाजात जे अनेक गट आहेत त्यांतला हा बहुसंख्य असलेला गट आहे. जर आपल्या शिक्षण पद्धतीने त्यांच्यातच मूळ धरले, तर शिक्षणाचा प्रसार होणार नाही. आणि आपणांस पुढे असे आढळून येईल की, जे शिक्षणाने पुढारलेले आहेत, परंतु इतर जाती ज्यांचा द्वेष करतात अशा एका नवीन वर्गाचे आपण पुढारी आहोत. मग आपल्याला त्यांनाच पसंत करावे लागेल."[१३] एकंदरीत विचार करता असे दिसते की, ब्रिटिशांचे शिक्षणाविषयीचे धोरण पक्षपातीपणाचे होते. त्यांना कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणापेक्षा वरिष्ठ वर्गाचेच शिक्षण अधिक महत्त्वाचे वाटत होते. याच कारणाने महात्मा फुले ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर टीका करत होते.

ब्रिटिशांनी सुरूवातीला जरी शिक्षण सर्वांसाठीच खुले असेल असे सुचविलेले असले तरी नंतर मात्र या धोरणात त्यांनी बदल करून शिक्षण केवळ वरिष्ठांसाठीच देणे योग्य राहील अशी भूमिका घेतली होती. ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण एका विशिष्ट तत्त्वावर अधारभूत होते ते म्हणजे शिक्षण हे कनिष्ठ वर्गाकडून वरिष्ठ वर्गाकडे कधीच प्रसारित होणार नाही. ते केवळ वरिष्ठ वर्गाकडून कनिष्ठ वर्गाकडेच प्रसारित होते. त्यामुळे त्यांनी केवळ वरिष्ठ वर्गापुरतेच शिक्षण मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांनी अवलंबिलेल्या या तत्त्वालाच 'झिरपण्याचा सिद्धांत' असे म्हणतात. या तत्त्वानुसार शिक्षण केवळ वरिष्ठ वर्गालाच द्यायचे व हे शिक्षण आपोआप गरीब शूद्रातिशूद्रांकडे झिरपत जाईल. मुळात या तत्त्वानुसार ब्रिटिशांनी अशा वर्गाकरिता शिक्षण चालू केले होते की, जो वर्ग स्वतःचे शिक्षण घेण्यासाठी समर्थ होता. जोतिबांच्या मते ब्रिटिशांनी खरे तर अशा वर्गाकरिता शिक्षण सुरू करायला हवे होते ज्यांना खरोखरच शिक्षणाची गरज होती. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे एकोणिसाव्या शतकातील जी परिस्थिती होती ती आजही काही अंशी पाहायला मिळते. आजही समाजातील काही घटक शालेय शिक्षणापासून वंचित आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र शिक्षण खात्याने सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून केलेली दिसून येते.

ब्रिटिशांनी इ.सन १८८२ साली सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली या तत्त्वानुसार दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी हंटर कमिशन नेमले होते. या कमिशनच्या माध्यमातून या शिक्षणपद्धतीविषयी अनेक भारतीयांच्या साक्षी घेतल्या होत्या. महात्मा जोतिबा फुले यांनी दि.१९ ऑक्टोबर १८८२ रोजी आपली साक्ष लिखित स्वरूपात पाठविलेली होती. आपल्या साक्षीत जोतिबांनी ब्रिटिशांच्या या 'झिरपण्याच्या सिद्धांताला' अगदी कडाडून विरोध केलेला होता. ब्रिटिशांचे धोरण असे होते की, शिक्षणाच्या प्रभावाने एक सुसंस्कारित उच्च वर्ग निर्माण होईल. हा वर्ग उदारमतवादाने भारावलेला असेल व यामुळे तो आपल्या समाजात राहणाऱ्या कनिष्ठ वर्गाला शिक्षित करण्याचा प्रयत्न करेल. मुळात एखाद्या शिक्षित व्यक्तीचा संबंध एखाद्या खेडूत किंवा अशिक्षित व्यक्तिवरोबर अधिककाळपर्यंत आला तर नकळतच शिक्षित व्यक्तीचा प्रभाव अशिक्षितावर पडल्याशिवाय राहत नाही हे जरी खरे असले तरीही

नकळत प्रभाव पडणे आणि प्रत्यक्ष शिक्षणासाठी प्रयत्न करणे या दोन्ही बाबींमध्ये प्रचंड तफावत होती. तत्कालीन समाजातील उच्चवर्णीय कनिष्ठ वर्णीयांना आपल्या सोबत घेऊन पुढे जाणारे नव्हते. उलट ते या शिक्षणाचा उपयोग स्वतःचाच स्वार्थ साधण्यासाठी करत होते. जोतिबांना ब्रिटिशांची जी सर्वात मोठी चूक वाटत होती ती म्हणजे विविध करापोटी बहुजन लोक ब्रिटिश सरकारकडे पैसे भरत होते परंतु या पैशाची उधळपट्टी केवळ वरिष्ठ वर्गावरच चाललेली होती. या अनुषंगाने जोतिबा गुलामगिरी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत लिहितात की, "Perhaps a part of the blame in bringing matters to this crisis may be justly laid to the credit of the Government. Whatever may have been their maotives in providing ampler funds and greater facilities for higher education and neglecting that of the masses, it will be acknowledged by all that in justice to the latter this is not as it should be. It is an admitted fact that the greater portions of the revenues of the Indian Empire are derived from the Ryot's labor-from the sweat of his brow. The higher and richer classess contribute little or nothing to the State exchequer."[१४] या विवेचनावरून समजून येते की, अस्पृश्य व बहुजन समाजाच्या शिक्षणाची जी परवड झालेली होती यात निश्चितच ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा दोष होता. जोतिबांच्या मते ब्रिटिश सरकारला मिळणारा अधिकाधिक महसूल हा या बहुजन समाजाच्या करातूनच येत होता. जर हा वर्गही कर भरत होता तर त्यांच्यासाठी शिक्षणाची तरतूद का करू नये असा प्रश्न जोतिबांचा होता. त्यांच्या विचारांतून एक गोष्ट स्पष्ट लक्षात येते ती म्हणजे एक नागरिक म्हणून सरकारकडे आपण कर भरत आहोत तर आपणास शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारीच आहे. याच कारणास्तव जोतिबांना ब्रिटिशांनी चालविलेली 'झिरपण्याच्या सिद्धांतावरील शिक्षणपद्धती' चुकीची वाटत होती.

हंटर शिक्षण आयोगासमोर साक्ष देतांना जोतिबांनी या उच्च वर्णीयांनी कनिष्ठ वर्णीयांच्या उद्धारासंबधी काय योगदान दिले होते याविषयीचे प्रश्न उपस्थित केले होते. "What contribution have these made to great work of regenerating their fellowmen? How have they begun to act upon the masses? Have any of them formed classes at their own homes or elsewhere, for the instruction of their less fortunate or less wise

countrymen? Or have they kept their knowledge to themselves, as a personal gift, not to be soiled by contact with the ignorant vulgar? Have they in any way shown themselves anxious to advance the general interests and repay the philanthropy with patriotism? Upon what grounds is it asserted that the best way to advance the moral and intellectual welfare of the people is to raise the standard of instruction among the higher classes?"[१५] या सर्व प्रश्नांच्या माध्यमातून वरिष्ठ वर्गाने बहुजन समाजासाठी काहीच उपाययोजना केलेली नव्हती हे स्पष्ट होते. सर्वसामान्यांसाठी कुठेही एखादा शिक्षणवर्ग उच्च वर्णीयांनी चालविलेला नव्हता किंवा त्यांना स्वतः शिक्षणातून मिळालेले ज्ञान कोणत्याही पद्धतीने सर्वसामान्यांपर्यंत झिरपत जाईल अशी कोणतीही उपाययोजना केलेली नव्हती. याबाबतीत उच्च वर्णीयांनी थोडा जरी प्रयत्न केला असता तरी एवढया वर्षापासून ब्रिटिशांनी राबविलेल्या शैक्षणिक धोरणाला यश आले असे म्हणता आले असते. अशी कुठलीही गोष्ट या शिक्षण पद्धतीने साध्य झाली नव्हती. हा खूप मोठा दोष ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा जोतिबांना वाटत होता.

जोतिबांच्या या शिक्षण विचारांचा अभ्यास केला तर ब्रिटिश सरकारकडून शिक्षणासंबंधी त्यांच्या काही निश्चित अपेक्षा होत्या हे स्पष्ट लक्षात येते. त्यांनी झिरपण्याच्या सिद्धांताला विरोध केला यावरून त्यांना 'सार्वत्रिक शिक्षणाची संकल्पना' आवश्यक वाटत होती. ही एक सर्वसामावेशक आणि सर्व थरातील समाजासाठी संयुक्तिक ठरू शकणारी संकल्पना होती. "शिक्षणाचे सार्वत्रीकरण म्हणजे जात, धर्म, पंथ, लिंग, व शारीरिक अपंगता याचा अडसर न ठेवता समाजातील सर्व घटकांना समतेच्या तत्त्वावर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे होय."[१६] म्हणजेच सार्वत्रिक शिक्षणात समाजातील कोणताच गट हा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानला जात नाही. सर्व गट समान आहेत असे समजून सारखेच शिक्षण त्या सर्वांसाठी खुले करून दिले जाते. यात धर्म, जात, वंश किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या समाजिक वर्गवारीचा विचार केला जात नाही. मुळात शिक्षण ही बाब कोणत्याही वर्गाची मक्तेदारी राहू नये. ते सर्वांसाठी उपलब्ध असावे. प्रत्येकाला त्याच्या बुद्धिमत्तेनुसार हवे तेवढे शिक्षण घेता यावे असे जोतिबांच्या विचारांवरून स्पष्ट होते. विशेषतः तत्कालीन समाजातील आर्थिक व

शैक्षणिक विषमता दूर करण्यासाठी सार्वत्रिक शिक्षणाशिवाय तरणोपाय नव्हता. त्याकाळी ब्रिटिश प्रशासनात सुशिक्षतांना सहजतेने नोकऱ्या उपलब्ध व्हायच्या परंतु शिक्षणाच्या अभावाने या नोकऱ्या सर्वसामान्यांसाठी उपलब्धच होत नव्हत्या. एकूणच जेंव्हा महार, मांग, समाजातील लोक शिक्षण घेऊन पुढे येतील तेंव्हाच त्यांची उच्चभूंच्या गुलामगिरीतून आणि आर्थिक परावलंबित्त्वातून मुक्तता होऊ शकणार होती. यासाठी सार्वत्रिक शिक्षणाची आवश्यकता जोतिबांना वाटत होती.

महात्मा जोतिबा फुले यांनी त्यांना अपेक्षित असलेले 'सार्वत्रिक शिक्षण' कशा प्रकारे राबविले जावे याविषयी निश्चित असा विचार केलेला होता. अशा प्रकारचे शिक्षण राबवित असताना सरकारने अगोदर शिक्षणाचे महत्त्व काय हे सर्वसामान्य बहुजन समाजाला समजावून सांगणे आवश्यक होते. एकोणिसाव्या शतकातील बहुजन समाज एवढा मागासलेला होता की, शिक्षण हे आपल्या करिता असू शकते याचा विचारही त्यांच्या मनाला शिवू शकत नव्हता. त्यामुळे अगोदर शिक्षणासाठी सरकारने या समाजाचे प्रबोधन करणे अगत्याचे होते. या अनुषंगाने ब्रिटिश प्रशासनातील कलेक्टर सारख्या युरोपियन अधिकाऱ्याने यात पुढाकार घ्यावा असे जोतिबांना वाटत होते. याचे कारण म्हणजे युरोपियन व्यक्तीने सांगितलेले सर्वसामान्यांना तत्काळ पटेल व ते मुले शाळेत पाठवतील.

शूद्र व अस्पृश्यांसाठी शिक्षण सुरू करण्यासाठी निधीचा प्रश्न ब्रिटिश सरकारकडून उपस्थित केला जाईल याची जाणीवही जोतिबांना होती. याविषयी त्यांनी स्वतः उपाययोजना सांगितलेली होती. त्यांच्या मते ब्रिटिश प्रशासनामध्ये विविध प्रकारची अधिकाराची पदे होती की, ज्यात प्रत्यक्ष काम कमी व पगार अधिक होता. या अधिकाऱ्यांना भरमसाठ पेन्शन्स सरकारकडून दिल्या जायच्या. ब्रिटिश सरकारने या अनावश्यक खर्चात जर कपात केली तर हा प्रश्न सुटणार होता. एकूणच जोतिबांनी ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर टीका करून सरकारने शिक्षणासंबधी नेमकी कोणती उपाययोजना राबवायला हवी याविषयी आपले विचार मांडले होते.

## ३) महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार

जोतिबा फुले यांनी आपल्या शैक्षणिक कार्याची सुरूवात स्त्री शिक्षणापासून केलेली होती. त्यांच्या मनात स्त्रियांच्या शिक्षणाविषयी एक वैचारिक भूमिका बनलेली होती. तत्कालीन समाजात स्त्री शिक्षणाची प्रचंड वाताहात झालेली होती. वरिष्ठ वर्गाकडे शिक्षण एकवटलेले असतानाही या वर्गातील स्त्रियांना शिक्षण नाकारले जात होते त्यामुळे सर्वसामान्य वर्गातील स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्नच विचारात घेणे दुरापास्त झालेले होते. त्याकाळी जे ख्रिश्चन मिशनरी धर्म प्रसारासाठी येत होते त्यांनी धर्म प्रसाराच्या हेतुने काही मिशनरी शाळा सुरू केलेल्या होत्या परंतु हिंदुनी मात्र स्त्रियांच्या शिक्षणाची कुठलीही उपाययोजना केलेली नव्हती. त्या काळात स्त्री शिक्षणाची केवढी वाताहत होती याविषयी धनंजय कीर यांनी महात्मा फुले यांच्या चरित्रात माहिती दिलेली होती. त्यात कीर यांनी लिहिले होते की, "एकोणिसाव्या शतकातील हिंदू मुलींकरता पहिली शाळा कलकत्त्यात १८१९ साली तेथील अमेरिकन मिशनने सुरू केली. त्याकाळी मुली शाळेत आणण्याकरिता शिक्षकाला प्रत्येक दिवशी घरोघर जावे लागे. मुलींनी शाळेत शिकावयास यावे म्हणून त्यांना काही विद्यावेतन द्यावे लागे. शिक्षक ज्या प्रमाणात मुली आणील त्या प्रमाणात त्याला वेतन मिळत असे. अमेरिकन मिशनने १८४०त पुण्याच्या आसमंतात मुलींच्या शाळा उघडल्या होत्या. स्कॉटिश ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी चालविलेली एक मुलींची शाळा पुण्यात होती. सुमारे दहा मुली तीत शिकत असत. ती ख्रिश्चनांची शाळा असल्यामुळे चालू शकली नाही."[१७] यावरून स्त्रियांच्या शिक्षणाची अवस्था खूपच विकट असल्याचे दिसून येते. या सर्व शाळा ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या माध्यमातून चालविल्या जात असताना धर्मांतराच्या कारणाने किंवा या शाळेत मुली गेल्या तर आपण बाटले जाऊन आपल्या बिरादरीतील समाज आपणास जातीबाहेर टाकतील अशा भीतीपोटी या शाळेत अगदी नगण्य मुली होत्या. भारतीयांच्या शाळाही त्याकाळी स्त्रियांसाठी नव्हत्या. एकूणच विचार करता स्त्री शिक्षणाची त्याकाळी प्रचंड वाताहात झालेली होती.

जोतिबांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला कारण स्त्रियांची समाजातील अवस्था अतिशय विकट होती. स्त्रियांना सर्वार्थाने गुलामगिरीचे व परावलंबित्त्वाचे जीवन जगावे लागत होते.

समाजाने तिला कुठल्याही प्रकारचे स्वातंज्य दिलेले नव्हते. पुरूष प्रधान संस्कृतीने विविध कारणास्तव स्त्रीला शिक्षण देण्याचे नाकारलेले होते. "स्त्री ही विश्वासास अपात्र, त्याचप्रमाणे दुष्ट, चंचल, अविचारी आणि स्त्रैण म्हणून मानण्यात यई. स्त्रीला शिक्षण दिले तर ती कुमार्गास लागेल आणि घरच्या सुखाचे वाटोळे करील असे मानण्यात येई. स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या दृष्टिने भ्रष्टाचार करणे होय. मुलीने शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येते, अशी समजूत होती."[१८] अशा विविध वाईट समजुतींच्या नावाखाली समाजाने स्त्रियांना शिक्षण देण्याचे टाळले होते. अर्थात हे सर्व करण्यापाठीमागे एक महत्त्वाचे कारण पाहिले तर शिक्षणाने स्त्रिया आपल्यापेक्षा वरचढ होतील अशी भिती पुरूषांना होती म्हणून अशा विविध सबबीखाली स्त्रियांना शिक्षण टाळले गेलेले होते. महात्मा जोतिबा फुले यांच्या मते जोपर्यंत स्त्रियांना शिक्षण मिळत नाही तोपर्यंत त्यांचा उद्धार होणे कदापि शक्य नव्हते. यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. जोतिबांच्या पूर्वीही अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे असे आपले सुधारणात्मक विचार मांडलेले होते. जोतिबा या सर्व समाजसुधारकांहून भिन्न होते कारण त्यांनी केवळ स्त्री शिक्षणाचा पुरस्कारच केला नाही तर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्त्रियांसाठी शाळा सुरू केल्या होत्या.

जोतिबांची स्त्री शिक्षणाविषयीची एक स्वतंत्र भूमिका होती. त्यांनी 'दि बॉम्बे गार्डियन' या वृत्तपत्रातून १६ डिसेंबर १८५३ रोजी स्त्री शिक्षण विषयक आपली भूमिका मांडलेली होती. त्यात ते म्हणतात "स्त्रियांच्या शाळेनें प्रथम माझें लक्ष वेधलें. पूर्ण विचारांती माझें असें मत झालें कीं पुरूषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजें असतात."[१९] त्यांच्या मते घरातील मुलांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्त्रियांवर असते. मुलेही अधिकाधिक काळ आईकडेच असतात त्यामुळे आई ज्या पद्धतीने आपल्या मुलांवर संस्कार घडवेल त्या पद्धतीनेच मुले वागतात. जर आईलाच अगोदर शिक्षण मिळालेले असेल तर ती आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी निश्चितच जागृत राहते. कुटुंबातील एक पुरूष शिकला तर त्याचे शिक्षण शक्यतो त्याच्यापुरतेच सीमित राहते परंतु कुटुंबातील स्त्री शिकली

तर मात्र तिच्या शिक्षणाचा प्रभाव तिच्या मुलांवर पडून एकूणच कुटुंबाचा त्यातून फायदाच होतो. यासाठी स्त्रियांना शिक्षण मिळणे जोतिबांना आवश्यक वाटत होते.

स्त्री शिक्षणाच्या शाळांना सरकारने प्रोत्साहन द्यावे असेही जोतिबांना वाटत होते. ती सरकारची नैतिक जबाबदारीच होती. आपल्या तीनही शाळांचे बस्तान चांगले बसले असे वाटल्यानंतर त्यांनी दक्षिणा प्राईज कमिटीच्या फंडातून काही अनुदान मिळावे यासाठी अर्ज केला होता. सरकारला लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपल्या शाळांविषयी व त्या अनुषंगाने अधिक प्रयत्न केले जावेत यादृष्टीने आपले विचार मांडले होते. "The demand for more schools is beginning to be felt and an anxiety to see those already established, placed on a permanent footing is very strongly entertained. Under these circumstances Your Lordship's petitioners can not but appeal to Your Lordship's sympathy, benevolence and enlightened judgement. They respectfully beg to put Your Lordship in mind that the Dakshina Fund has very lately been declared by Government solely available for the purpose of education. They therefore respectfully entreat Your Lordship in Council will be pleased to direct the Dakshina Committee to grant form the fund at their disposal, Rupees One Hundred a month for the support of the schools and for this act of grace. Your memorialist as in duty bound shall ever pray…."[२०] महात्मा फुले यांनी केलेल्या या मागणीस ब्रिटिश सरकारने योग्य प्रतिसाद दिलेला होता. मेजर कॅण्डी या इंग्रज अधिकाऱ्याने दक्षिणा प्राईज कमिटीच्या फंडातून ७५ रू.दरमहा अनुदान मंजूर केले होते. यावरून ब्रिटिश सरकारनेही जोतिबांच्या स्त्रीशिक्षण कार्याची दखल घेतली होती हे स्पष्ट लक्षात येते.

जोतिबांच्या मते बालविवाहासारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी स्त्रीशिक्षण आवश्यक होते. एक तर शिक्षणाने जागृती होऊन बालविवाह चुकीचा आहे असे पालकांना समजते आणि जर हे समजले नाहीच तर किमान मुलगी शिकते आहे या नावाखाली बालविवाह टाळला जाऊ शकतो. एवढे झाले तरी समाजाच्या दृष्टीने ते खूप मोठे फलित समजावे. एकूणच विचार करता बालविवाह व त्यापासून पुढे निर्माण होणाऱ्या अनेक समस्या रोखण्याचा पर्याय स्त्री शिक्षणाच्या पुरस्कारातून उपलब्ध होऊ शकतो. जोतिबांनी सुरू केलेल्या शाळांचे हे

एक मोठे यश म्हणावे लागेल कारण त्यांच्या शाळेतील विद्यार्थिनींची संख्या उत्तरोत्तर वाढत गेलेली होती. या शाळांच्या परीक्षेनिमित्त आयोजित समारंभाप्रसंगी वाचण्यात आलेल्या अहवालात ही संख्याही नमूद करण्यात आलेली होती. "The total number of girls whose names are now on the School catalogues is 237; and the average attendance in the three Schools is little less than 200"[२१] शिक्षणाविषयी एवढी प्रतिकूल परिस्थिती असताना या तीनही शाळांमध्ये एवढया मोठया प्रमाणात मुली शिक्षण घेत होत्या. निश्चितच त्या बालविवाह पद्धतीचे भक्ष ठरू शकल्या नव्हत्या. स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी जोतिबांनी आणखीही काही महत्त्वाच्या गोष्टींचा पुरस्कार केलेला होता. मुलींना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी त्यांना शिष्यवृत्त्या, बक्षिसे देण्यात यावीत. त्याच बरोबर त्यांच्यासाठी वसतिगृहांची, पुस्तकांची, कपडयांची व इतर आवश्यक गोष्टींची व्यवस्था केली जावी असे जोतिबांना वाटत होते. अशा सोयी सुविधा पुरविल्यामुळे पालक वर्ग आपल्या मुलींना शाळेत पाठवतील असे जोतिबांना वाटत होते. या मार्गाने मुलींमध्ये शाळेविषयी गोडी निर्माण करता येऊ शकते असे त्यांचे मत होते. एकदा शाळेविषयी आवड निर्माण झाली म्हणजे या वरील सर्व गोष्टींचे महत्त्व कमी होत जाऊन शिक्षणाचे महत्त्व अधिक वाढेल असा जोतिबांना विश्वास होता. जोतिबांनी स्वतःच्या शाळांच्या अनुभवावरून ही गोष्ट नमूद केलेली होती.

जोतिबांनी सुरू केलेल्या तीनही शाळांची दुसरी वार्षिक परीक्षा संपल्या नंतर मुलींना मान्यवरांच्या हस्ते साडया व पुस्तकांची बक्षिसे देण्यात आलेली होती. त्यावेळी काही मुलींनी आम्हास बक्षिसे देण्याऐवजी आमच्या शाळांसाठी ग्रंथालये सुरू करण्यात यावीत, अशी मागणी मान्यवरांकडे केलेली होती. यावरून स्पष्ट होते की, एकदा शिक्षणाची आवड निर्माण झाली की बाकीच्या गोष्टींपेक्षा शिक्षण महत्त्वाचे वाटते. अर्थात असे असले तरीही गोरगरिबांच्या मुलींच्या शिक्षणाच्या संबंधाने वरील सर्व सोयी समाजास मिळणे आवश्यक आहे. या अनुषंगाने दररोज शाळेत येणाऱ्या विद्यार्थिनींना शिष्यवृत्त्या सक्तीने दिल्या जाव्यात असे मत त्यांचे होते.

जोतिबांनी बेहरामजी मलबारीशेठ यांनी जे सरकारकडे दोन टिपणे पाठविली होती त्यास सकारात्मक प्रतिसाद देऊन सरकारला त्या अनुषंगाने आणखी काय करता येईल याविषयी उपाय सुचविलेले होते. यातूनही त्यांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. बेहेरामजी मलबारी यांनी हिंदूमधील बालविवाहाची समस्या रोखण्यासाठी विद्यापीठातील पदवीचे शिक्षण घेणाऱ्यांना बालविवाहाच्या समस्या काय ते सांगण्यात यावे म्हणजे त्यांच्यात जागृती होईल असे प्रयत्न चालविलेले होते. मात्र जोतिबांच्या मते एवढे प्रयत्न पुरेसे नव्हते कारण शूद्रातिशूद्रांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक होते आणि या वर्गामध्ये खूप थोडे विद्यापीठीय शिक्षण घेऊ शकणारे होते. अतिशूद्रात तर विद्यापीठीय शिक्षण घेणारे नव्हतेच. यामुळे त्यांच्यासाठी या गोष्टीचा उपयोग होणार नव्हता. या अनुषंगाने जोतिबांनी एक उत्तम उपाय सुचविला होता. सदरच्या टिपणांची उपयोगिता सुचविताना त्यांनी सांगितले होते की, सरकारने बालविवाह रोखण्यासाठी संमती वयाचा कायदा करून ठराविक वयोमर्यादेच्या आत विवाह रोखण्यासाठी कायदा करावा. "I therefore suggest that Government should rule that boys under nineteen years of age and girls under eleven, should not be allowed to marry. In case thay do, some reasonable tax may be levied on the parents of the parties married. And the money thus obtained should be used in the education of the middle and lower classes of Hindus."[२२] या उदाहरणातून जोतिबांच्या विचारांची व्यापकता लक्षात येते. त्यांच्या या विचारामुळे दोन गोष्टी साधल्या जाऊ शकणार होत्या. एक म्हणजे कायद्याने बंधन आणल्यामुळे, मुलींचे विवाह अकरा वर्षांपूर्वी करता येऊ शकणार नव्हते. त्यामुळे बरेच पालक मुलींना शाळेत पाठविणे शक्य होते आणि दुसरे म्हणजे कायदा करूनही तो मोडून बालविवाह झालाच तर संमतीवयाच्या कायद्यानुसार त्यांच्यावर आर्थिक कर लादला जाणार होता व त्या कराच्या पैशाचा वापर शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणावरच खर्च होणार होता.

एकूणच विचार करता जोतिबांनी स्त्रीला समाजात सन्मानाची वागणूक मिळावी, कुटुंबावर चांगले संस्कार व्हावेत, बालविवाह पद्धती बंद व्हावी, स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी जीवन जगता यावे अशा विविध कारणास्तव स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता असे त्यांच्या विचारांवरून दिसून येते.

## ४) महात्मा फुले यांचे अस्पृश्य शिक्षणविषयक विचार

जोतिबा फुले स्त्री शिक्षणा बरोबरच शूद्र व अतिशूद्र यांच्या शिक्षणाचा पुरस्कार करणारे होते. त्यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाचा पुरस्कारच केला नाही तर स्वतः त्यांच्या शिक्षणासाठी तीन शाळा सुरू केल्या होत्या. अस्पृश्य नेमके कोण? याचा विचार केला तर "ढोर, चांभार, महार, होलार, मांग, हलालखोर, मांगगारोडी वगैरे जाती प्रमुखत्वे अस्पृश्य गणल्या आहेत."[२३] या जातींशिवाय शूद्र म्हणून गणल्या गेलेल्या कुणबी, माळी, साळी अशा अनेक जमातींच्या शिक्षणाअभावी अवस्था अतिशय शोचनीय होती. उच्चभ्रू समाजाने या वर्गास शिक्षण सर्वार्थाने नाकारलेले होते त्यामुळे त्यांचा उद्धार होण्यासंबंधी दुसरी कुठलीही उपाययोजना नव्हती. सनातनी लोकांकडून त्यांना प्रचंड विरोध झालेला होता तरीही जोतिबांनी आपले अस्पृश्य शिक्षणप्रसाराचे कार्य अविरतपणे चालविलेले होते.

जोतिबांनी अस्पृश्यांच्या शाळा चालविण्यासाठी एक समिती नेमली होती. ज्या समाजात अस्पृश्य शिक्षणासाठी कोणीही प्रयत्न करीत नव्हते त्या अस्पृश्यांसाठी या समितीच्या माध्यमातून शिक्षण सुरू करण्याचा पहिलाच प्रयत्न त्यांनी केला होता. मुळात अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले तर कदाचित आपणास समाजाकडून वाळीत टाकले जाईल या भीतीने कोणीच या चांगल्या कामी धजावत नव्हते. महात्मा फुलेंना मात्र या कामी लोकांनी स्वतः पुढे यावे असे वाटत होते.

जोतिबांनी अस्पृश्यांच्या शाळा चालविताना कोणत्या अडचणी येतात याचे बारीक निरीक्षण केलेले होते. एक महत्त्वाची अडचण म्हणजे उच्चभ्रूंच्या शाळेत अस्पृश्य विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नव्हता. काही शाळांमध्ये केवळ विद्यार्थी संख्येची अट पूर्ण करून सरकारी अनुदान लाटण्यासाठीच प्रवेश दिला जायचा परंतु त्या शाळेत मात्र या अस्पृश्य विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष केले जायचे. त्यामुळे जोतिबांची सरकारकडून अपेक्षा होती की, त्यांनी ज्याठिकाणी अस्पृश्यांची संख्या अधिक आहेत त्या ठिकाणी केवळ अस्पृश्यांसाठीच स्वतंत्र शाळा सुरू कराव्यात. अस्पृश्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रमाणही अतिशय कमी असायचे यासाठी सरकारने खबरदारीचे उपाय योजणे जोतिबांना आवश्यक वाटत होते. अस्पृश्य मुले शाळेत

अनेक कारणांसाठी गैरहजर रहायची. याविषयीची कारण मिमांसा जोतिबांच्या महार व मांग मुलांच्या शाळेची वार्षिक परीक्षा घेण्यात आली त्यावेळी मांडलेल्या अहवालात दिलेली होती. त्यात लिहिले होते की, "महारमांग इत्यादि लोक जत्रा करतां व जातींतील पंचायतींकरतां मुलांमाणसांसुद्धां जातात त्याजमुळें कितीएक दिवस मुलें शाळेंत येत नाहींत. पावसाळयांत व हिवाळयांत थंडी न लागण्याजोगीं चिरगुटें मुलांजवळ नसतात म्हणून त्या ऋतूंत तीं तूरळूक येतात. इतर लोक विद्याभ्यासाचे लाभ ओळखून मुलांकरवीं धडे घरीं पाठ करवितात. तसे हे महारमांग इत्यादि लोक आपल्या मुलांकडून करवीत नाहींत कारणकीं त्यांस विद्याभ्यासापासून लाभ व सुखें काय आहेत तीं कळत नाहींत म्हणून मुलांस नेमून दिल्हेले धडे शाळेंतील वेळेंत पाठ करावे लागतात... यामुळे मुलांचा अभ्यास कमी होतो."[२४] एकूणच विचार करता या वर्गामध्ये शिक्षणाविषयी अज्ञान, दारिद्रय अशा विविध कारणाने शाळेविषयी फारशी आस्था दिसून येत नाही. जोतिबांनी सांगितलेली ही कारणे आजही थोडया फार फरकाने समाजात दिसून येतात. आज शिक्षणाविषयी एवढी जागरूकता असतानाही कष्टकरी व मजुरी करणाऱ्या समाजात शिक्षणाविषयी फारशी जागरूकता दिसत नाही. आजच्या या परिस्थितीवरून एकोणिसाव्या शतकातील परिस्थिती किती गंभीर असेल याचा अंदाज येतो. अर्थात अशी परिस्थिती असली तरीही अस्पृश्यांचे शिक्षण टाळून चालणार नाही असे जोतिबांना वाटत होते. या दृष्टिकोनातून निश्चित अशी उपाययोजना सरकारकडून केली जावी असे जोतिबांना वाटत होते. यासाठी त्यांनी स्वतःही काही उपाय सरकारला उद्देशून सुचविले होते. विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी विद्यावेतन ठेवण्यात यावे. अनेक विद्यार्थ्यांना घरच्या कामामुळे पालक शाळेत पाठवित नव्हते. त्यामुळे जर त्यांना विद्यावेतन मिळाले तर त्या अपेक्षेने मुलांना शाळेत पाठविले जाईल व शिक्षणाचा हेतू साध्य होईल असे त्यांचे मत होते. याशिवाय हे वेतन व अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जागा आणखी वाढविण्यात याव्यात असाही उपाय जोतिबांनी सांगितला होता.

अस्पृश्यांसाठी जे शिक्षण सुरू केले जाईल त्यामध्ये अभ्यासक्रम चांगल्या दर्जाचा असणे आवश्यक आहे. वस्तूतः चरितार्थ साधणे हे एक शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. शिक्षण घेऊनही

जर उपासमारीची वेळ येत असेल तर ते शिक्षणाचे अपयश समजावे. जोतिबांच्या मते शिक्षणाने जर अस्पृश्यांच्या चरितार्थाचा प्रश्न सुटू शकला तरच ते शाळेत येतील म्हणून त्यांनी भौतिकशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादी शास्त्रांचा अभ्यास शाळेत ठेवावा असे सुचविले होते. त्यामुळे आपल्या मुलांना पुढे नोकरी मिळेल व त्यातून अर्थार्जन चालू होईल असा विश्वास निर्माण होईल. याशिवाय शाळेत विविध व्यवसायांचे जसे सुतारकाम, लोहारकाम यासारख्या लोकांच्या व्यवसायांची कला शिकविली जावी. असे केल्यामुळे जरी नोकरी मिळाली नाही तरी विद्यार्थी केवळ बेरोजगार म्हणून सरकारवर अवलंबून राहणार नाहीत. ते स्वतः एखादा व्यवसाय चालू करतील व त्यातून स्वतःचा चरितार्थ भागवतील. एकूणच अस्पृश्यांना दिले जाणारे शिक्षण असे असावे की, ज्याद्वारे त्यांचे जीवन स्वावलंबी होईल.

जोतिबांच्या मते समाजातील उदार गृहस्थांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेणे आवश्यक होते. वास्तविक विचार करता उच्चभू एतद्देशीय समाजास अस्पृश्य समाजाच्या शिक्षणाविषयी कुठलीही आपुलकी नव्हती. कारण सुरूवातीस अनेकांनी जोतिबांच्या शाळांना विरोधच केलेला होता. काही भारतीय व युरोपियन व्यक्तींनी स्वतःच्या प्रतिष्ठेपोटी जोतिबांच्या शाळांना सुरूवातीला देणग्या दिल्या परंतु नंतर मात्र देणग्या देणे बंद केले. त्यामुळे जोतिबांना तीन पैकी किमान एक तरी शाळा बंद करणे भाग पडणार होते. ही बाब मुंबई एज्युकेशनच्या अहवालातही नमूद केलेली होती. "ज्या वेळी महार आणि मांग ह्यांना शिक्षणाची उपयुक्तता कळू लागली आहे आणि ते अधिक चांगल्या शिक्षकांची मागणी करीत आहेत, त्याच वेळी निरूपायाने संस्थेला तीनपैकी एक शाळा बंद करावी लागणार आहे. जर उदार गृहस्थांनी सढळ हातांनी या शाळांना साह्य केले नाही, तर एक शाळा बंद करण्याचे दुःखद कार्य अटळ ठरेल."[२५] यासाठी जोतिबांनी उदार गृहस्थांना आर्थिक मदतीबाबत अवाहन केले होते. त्यांच्या मते काही उदार गृहस्थांनी शिक्षणासारख्या पवित्र कामी संघटित होऊन अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या कामी मदत करणे आवश्यक होते.

जोतिबांना कोणत्याही परिस्थितीत अस्पृश्यांना शिक्षण मिळावे असे वाटत होते यासाठी त्यांनी अस्पृश्यांनाही अवाहन केले होते. वरिष्ठ वर्गाने कनिष्ठ वर्गास शिक्षण देण्याचे टाळले म्हणून कनिष्ठांनी शिक्षणापासून वंचित राहणे जोतिबांना पसंत नव्हते. त्यांच्या मते अस्पृश्यही आपल्या स्वतःच्या शिक्षणासाठी खूप काही करू शकतात. मुळात शिक्षण मिळविणे हा प्रत्येक घटकाचा हक्क आहे. त्यामुळे स्वतः अस्पृश्य त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करू शकतात. आपल्या 'अखंडादि काव्यरचनेत' जोतिबांनी शूद्रांनीच याकामी पुढाकार घ्यावा असे सुचविले होते. त्यात ते म्हणतात की,

"तरूण शुद्रांनीं विद्या संपादावी || चाकरी धरावी || शाळाखातीं ||१||

शाळेमधीं कधीं निवड नसावी || मानवा शिकवी || एकसहा ||२ ||" [२६]

यातून स्पष्ट लक्षात येते की, शूद्रांनी स्वतः विद्याखात्यात प्रवेश करावा. अस्पृश्यांनी स्वतः शिक्षकी पेशा स्वीकारला म्हणजे उच्चभ्रूंकडून जो भेदभाव केला जातो तो हे नवीन शिक्षक करणार नाहीत. ते शिक्षणाचे कार्य प्रामाणिकपणे चालवतील असा विश्वास त्यांना वाटत होता.

अस्पृश्यवर्गातील विद्यार्थी हे विद्या संपादण्याच्या कामी लायक नसतात. त्यांच्यात प्रगल्भ बुद्धिमत्ता नसते त्यामुळे त्यांचे शाळेत लक्ष केंद्रित होत नाही. त्यामुळे त्यांना शिक्षण देण्यात येऊ नये असेही युक्तिवाद त्याकाळी केला जायचा. जोतिबांच्या मते मात्र जर या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली तर ते उच्चभ्रूंच्या विद्यार्थ्यांएवढी प्रगती शिक्षणात साधू शकतात. वास्तविक विचार करता बुद्धिची पातळीही प्रत्येकामध्ये भिन्न असते. बुद्धीचे वर्गीकरण हे उच्चभ्रू म्हणून त्यांना अधिक बुद्धी व अस्पृश्य म्हणून त्यांना कमी बुद्धी असे झालेले नसते. त्यामुळे निश्चितच अस्पृश्यांची मुलेही शाळेत चांगली प्रगती करू शकतात असे जोतिबांना वाटत होते. जोतिबांनी स्वतः स्थापन केलेल्या शाळांचे उदाहरण घेतले तर लक्षात येते की, अनेक अडचणींचा सामना करूनही या शाळांमधील विद्यार्थ्यांची प्रगती चांगली होती. मुलांच्या प्रगतीबाबत अहवालात नमूद करण्यात आले होते की, "तरबेज झालेलीं मुलें मोडी व बाळबोध चांगलें वाचतात जें वाचतात त्याचा अर्थ बरा समजतात. व्याकरण चांगलें समजतात

शुद्ध लिहितात व ग्रंथावरून व्याकरण बरें करतात त्यांचे मोडी व बाळबोध अक्षरास वळण चांगले लागलें आहे त्यांस महाराष्ट्र देशाची बखर मध्यम येत्ये भूगोल चांगला येतो व एशिया युरोप व हिंदुस्थान या देशांचे नकाशांवर शहरें इत्यादि चांगली दाखवितां येतात व त्यांस गणितांतील उदाहरणें लवकर करतां येतात."[२७] यावरून लक्षात येते की जर अस्पृश्य मुलांची बुद्धी शाळेत चालत नाही असे असते तर या अस्पृश्य विद्यार्थ्यांनी शाळेत एवढी प्रगती केलीच नसती. उच्चभ्रूंच्या शाळांप्रमाणे या शाळेतही काही नियमित अभ्यास पूर्ण करूण आणखी प्रतिभा दाखविणारे विद्यार्थी होते. अशा विद्यार्थ्यांची निवड फ्रिचर्च मिशन मार्फत चालविल्या जाणाऱ्या ब्रिटिश शाळांमध्ये झालेली होती. एकंदरीत असे लक्षात येते की जर या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी मिळाल्या तर ते ही आपली बुद्धिमत्ता सिद्ध करू शकतात. काही विद्यार्थी शाळेत टिकून राहू शकत नाहीत कारण त्या विद्यार्थ्यांचे घरचे वातावरणही त्यास कारणीभूत असू शकते.

## ५) महात्मा जोतिबा फुले यांचे प्राथमिक शिक्षणविषयक विचार

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात प्राथमिक शिक्षणाचे अनन्यसाधारण असे महत्त्व असते. प्राथमिक शिक्षण हे समाजाला दिले जाणारे अगदी पायाभूत शिक्षण असते. या शिक्षणास प्रामुख्याने दोन अर्थाने महत्त्व असते. ते म्हणजे उच्च शिक्षणाचा पाया म्हणून प्राथमिक शिक्षणाकडे पाहिले जाते. यावरोबरच समाजाचा घटक म्हणून प्रत्येक व्यक्तीला एक सुसंस्कृत जीवन जगता येईल एवढा स्तर उंचावला जाणे व तद्‌अनुषंगाने त्यांचा विकास होणे हेही प्राथमिक शिक्षणात अभिप्रेत असते. मुळात प्रत्येक व्यक्तीला उच्च शिक्षण घेता येणे शक्य नसते तथापि देशाच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून किमान प्राथमिक शिक्षण मिळणे आवश्यक असते. प्राथमिक शिक्षण घेणे हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क व कर्तव्य तर आहेच परंतु ते शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करून देणे हे सरकारचे खूप महत्त्वाचे कर्तव्य आहे असे ते मानीत होते. इ.सन १८८२ साली हंटर शिक्षण आयोगाला जोतिबांनी जे निवेदन सादर केलेले होते त्यात त्यांनी प्राथमिक शिक्षणास आग्रक्रमाने प्राधान्य दिलेले होते. प्राथमिक शिक्षणासंबधी विचार मांडताना जोतिबांनी तत्कालीन समाजातील प्राथमिक शिक्षणाची अवस्था कशी होती? ही

अवस्था सुधारण्यासाठी सरकारची काय भूमिका असू शकते? जनतेत शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण होऊन विद्यार्थी संख्या वाढविण्यासंबंधी काय उपाययोजना करायला हवी? अभ्यासक्रम कोणता असायला हवा? या प्राथमिक शाळांमध्ये शिकविणारे शिक्षक कसे असावेत? अशा शिक्षणाची जबाबदारी सरकारने कोणाकडे सोपवावी? अशा विविध प्रश्नांवर त्यांनी आपल्या निवेदनात प्रकाश टाकलेला होता. एकोणिसाव्या शतकात एवढया व्यापक स्वरूपात प्राथमिक शिक्षणाचा विचार केवळ महात्मा जोतिबा फुले यांनीच केलेला दिसून येतो. यावरून खरोखरच ते एक शिक्षणतज्ज्ञ होते हे स्पष्ट होते. आजच्या महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्यामार्फत जी उपाययोजना प्राथमिक शिक्षणासाठी केलेली आहे त्यातील सर्वच बाबी जोतिबांच्या विचारांशी समरूप आहेत.

तत्कालीन समाजातील प्राथमिक शिक्षणाची अवस्था खूपच वाईट होती असे जोतिबांच्या शिक्षण विचारांवरून दिसून येते. त्यांच्या मते मुंबई इलाख्यात जेवढया प्राथमिक शाळा होत्या त्या सर्व लोकसंख्येचा विचार करता पुरेशा प्रमाणात नव्हत्या. त्यामुळे सरकारकडून प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष होत होते हे स्पष्ट होते. जोतिबांनी या परिस्थितीचे अतिशय वस्तूनिष्ठ परीक्षण करून वर्णन केलेले होते. आपल्या निवेदनात त्यांनी लिहिले होते की, "Government collect a special cess for educational purposes, and it is tobe regreatted that this fund is not spent for the purposes for which it is collected. Nearly nine-tenths of the villages in this Presidency, or nearly 10 lakhs of children, it is said, are without any provision, whatever, for primary instruction. A good deal of their poverty, their want of self-reliance, their entire dependence upon the learned and intelligent classes, is attributable to this deplorable state of education among the peasantry."[२८] जोतिबांच्या मते सरकार सर्वसामान्य जनतेकडून कररूपाने जो निधी गोळा करत होते त्यातील अधिकाधिक निधी प्राथमिक शिक्षणावर आणि गोरगरिबांच्या शिक्षणावर खर्च करावा. मुळात ब्रिटिश सरकार केवळ स्वार्थी दृष्टिकोन ठेवून उच्च वर्णीयांच्याच शिक्षणाचा विचार करीत होते व बहुसंख्य जनतेच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून आपली जबाबदारी झटकत होते.

एकोणिसाव्या शतकातील समाजातील बहुजन लोक हे उच्चवर्णीयांवर सर्वस्वी अवलंबून राहतात; त्यांनाच खरी शिक्षणाची गोडी नाही, ते स्वतः स्वावलंबी नाहीत, अशी त्यांच्यावर टीका केली जायची परंतु जोतिबांच्या मते ही टीका सर्वार्थाने अयोग्य होती कारण ज्या समाजास शिक्षण म्हणजे काय हेच माहीत नव्हते तो समाज आपल्या मुलांना शाळेत कसा पाठवेल? वस्तुतः शिक्षणाविषयी सर्वसामान्य जनतेत जागरूकता निर्माण करणे ही सरकारची जबाबदारी असते व सरकारनेच ती पार पाडावी असे जोतिबांचे मत होते. प्राथमिक शिक्षणाने मनुष्य साक्षर तर होतोच त्याचबरोबर आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचे ज्ञान त्याला चांगल्याप्रकारे मिळते. यामुळे जरी मोठी नोकरी या शिक्षणावर मिळत नसली तरी किमान स्वतःची दारिद्रयातून सुटका करून आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविता येईल एवढे कोणते काम करता येऊ शकेल एवढी त्याच्या बुद्धीस चालना मिळते. असे त्यांच्या विचारांतून दिसून येते. उच्चभूंच्या गुलामगिरीतून सुटका करून घेण्याविषयी स्वाभिमान तसेच आपली जी परिस्थिती निर्माण झाली ती नशिबाने नाही तर आपल्या अज्ञानाने निर्माण झालेली आहे याविषयी जाणीव या शिक्षणातून समाजाला मिळते. त्यामुळे निकोप व समतेवर अधारित समाज निर्मितीसाठी किमान प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळावे असे त्यांना वाटत होते.

तत्कालीन बहुजन समाजातील प्राथमिक शिक्षणातील गळतीविषयीही जोतिबांनी आपले विचार मांडलेले होते. त्यांच्या मते समाजातील बहुजन वर्ग हा दरिद्री असल्याने चरितार्थ चालविण्यासाठी त्यांना नेहमीच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकंती करावी लागते. विशेषतः वेठबिगारी करणारे व मजुरी करणाऱ्या कामगारांची स्थिती अतिशय शोचनीय होती. अशा वर्गात एकतर शिक्षणाविषयी अनास्था होती व थोडे फार जे शिक्षण घेण्यासाठी शाळेत दाखल होत होते त्यांना कुटुंब स्थलांतरीत होण्यामुळे मधेच शाळा सोडून द्यावी लागत असे. आजच्या परिस्थितीचा विचार करता खेडयातील गरीब मुलांची आजही अशीच अवस्था आहे. आज शिक्षणाचा एवढा प्रसार झालेला असतानाही खेडयातून अशी उदाहरणे पहावयास मिळतात. यावरून एकोणिसाव्या शतकातील समाजाची कशी आवस्था असेल हे लक्षात येते. जोतिबांच्या मते सरकारने जी मुले शिक्षणापासून विविध कारणाने वंचित राहतात त्यांच्यासाठी

शिक्षण सुरू करणे आगत्याचे होते. त्या अनुषंगाने प्राथमिक शाळांची संख्या वाढविणेही आवश्यक होते.

त्यांच्या मते सरकारने अशा प्रकारे शिक्षणाला जे मुकणारे विद्यार्थी आहेत त्यांच्याकरिता सक्तिच्या शिक्षणाचा कायदा करून किमान १२ वर्षे वयापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. बहुजन समाजातील विद्यार्थी सहजासहजी शाळेत येत नाहीत कारण त्यांना घरगुती व शेतीची कामे करावी लागतात. यासाठी त्यांना शाळेची गोडी लागावी म्हणून काही प्रलोभने वापरली जावीत असाही विचार त्यांनी मांडला होता. या अनुषंगाने जोतिबांनी आपल्या निवेदनात लिहिले होते की, "Beside an increase in the number of schools, special inducements in the shape of scholarships and half-yearly or annual prizes, to encourage them to send their children to school and thus create in them a taste for learning, is most essential. I think Primary education of the masses should be made compulsory up to a certain age, say at least 12 years."[२९] जोतिबांच्या मते ब्रिटिश सरकारच्या काळात शिष्यवृत्त्या खूप कमी प्रमाणात दिल्या जात होत्या. त्याचबरोबर शिष्यवृत्त्या देण्याची जी पद्धत ब्रिटिश राबवत होते ती चुकीच्या तत्त्वावर आधारभूत होती. सरकारच्या शिष्यवृत्तीच्या पद्धतीमुळे ज्या वर्गात अगोदरच शिक्षणाची गोडी आहे त्यांनाच त्यातून उत्तेजन मिळत होते. या शिष्यवृत्त्या केवळ शहरी मुलांनाच मिळायच्या कारण आजच्या काळाप्रमाणेच शहरी मुलांबरोबर ग्रामीण व खेडयातील मुलांची स्पर्धा होऊच शकत नव्हती. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांसाठी वेगळी कार्यपद्धती शिष्यवृत्त्यांच्या बाबतीत राबविली जाणे आवश्यक होते असे त्यांना वाटत होते. असे केल्यामुळे अस्पृश्यांनादेखील शाळेत मुले घालण्यास प्रोत्साहन मिळू शकणार होते. याच अनुषंगाने अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू कराव्यात असा विचार मांडलेला होता. शाळांची वाढ करण्यासाठी सरकारने अनुदान द्यावे त्याच बरोबर जमा होणाऱ्या एकूण कराच्या अर्धा निधी शिक्षणावर खर्च करावा असेही मत जोतिबांचे होते. एकूणच जोतिबांचे प्राथमिक शिक्षणविषयक विचार हे केवळ ठराविक अशा एका वर्गापुरतेच मर्यादित नव्हते तर ते सर्वसामावेशक असे होते. याच कारणामुळे आजच्या शिक्षण पद्धतीवर जोतिबांच्या शिक्षण विचारांचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

## ६) महात्मा जोतिबा फुले यांचे माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणविषयक विचार

प्राथमिक शिक्षणाच्या पुढील टप्पा हा माध्यमिक व उच्च शिक्षणाचा असतो. महात्मा जोतिबा फुलेंनी प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाविषयीही आपले विचार हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेल्या निवेदनात मांडले होते. जोतिबांच्या मते प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच उच्च शिक्षणाच्या बाबतीतही सरकार पाहिजे तेवढे सतर्क दिसत नव्हते. त्या कालखंडात माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण देण्यासाठी जनतेने स्वतः पुढाकार घेऊन खासगी शिक्षण संस्था स्थापन कराव्यात व या संस्थांच्या माध्यमातून अशा प्रकारचे शिक्षण दिले जावे असा एकूणच सरकारचा सूर होता. तथापि जोतिबांच्या मते अशा शिक्षणासाठी जरी खासगी संस्थांनी पुढाकार घेतला तरीही सरकारनेही या प्रकारच्या शिक्षणातून अंग काढून घेऊ नये. दर्जेदार शिक्षण दिले जावे यासाठी सरकारने अनुदान मात्र अशा संस्थाना चालू ठेवणे अगत्याचे होते. सरकारने जर माध्यमिक व उच्च शिक्षणाचे अनुदान बंद करून त्या केवळ संस्थाचालकांवर सोपविल्या तर त्यापासून अनेक अडचणी निर्माण होतील असे त्यांना वाटत होते. सरकारी अनुदान मिळाले नाही तर शिक्षकांचा पगार कसा द्यायचा हा प्रश्न निर्माण होईल व त्यामुळे शिक्षकांना कमी वेतनावर नोकरी करावी लागेल. यामुळे सहाजिकच हे शिक्षक आर्थिक अडचणीमुळे चांगल्या प्रकारे अध्यापन करू शकणार नाहीत. याशिवाय संस्था चालक इतर खर्च भागविण्यासाठी विद्यार्थ्यांकडून अधिक फी आकारतील व हे सर्वसामान्य गरीब विद्यार्थ्यांना परवडणारे नव्हते. आजच्या शिक्षण पद्धतीचा विचार केला तर शासनाने कायम विनाअनुदानीत शाळा सुरू केल्या त्यांची समस्या ही खूप गंभीर बनलेली आहे.

जोतिबांच्या मते त्याकाळी मध्यम आणि कनिष्ठ वर्गामध्ये शिक्षणात कुठलीही प्रगती नव्हती. ज्या समाजात प्राथमिक शिक्षणाचीच एवढी मारामार होती त्या समाजात उच्च शिक्षणाची गोडी लागणे व या समाजाला तसे शिक्षण घेता येणे सहजासहजी शक्य होणारी गोष्ट नव्हती. उच्च शिक्षणासाठी जरी काही खासगी संस्था लोकहित साधण्याच्या हेतूने पुढे आल्या तरीही कनिष्ठ वर्गाकरिता कोण शाळा चालविणार हाही प्रश्न होता. एकूणच विचार करता सरकारने केवळ खासगी संस्थांना अनुदान देणे व शिक्षणाची जबाबदारी भारतीयांच्या

माथी मारणे हे जे धोरण ब्रिटिश सरकारने अवलंबिलेले होते ते भारतीयांच्या अजिबात हिताचे नव्हते असे जोतिबांना वाटत होते. त्यांच्या मते सरकार उच्च शिक्षणाच्या बाबतीतही तेवढेच सक्रिय असणे आवश्यक होते. खासगी संस्थांच्या माध्यमातून खरोखरच शिक्षणाचा विकास साधला जाईल याविषयी महात्मा फुलेंच्या मनात संशय होता. या अनुषंगाने त्यांनी आपल्या निवेदनात लिहिले होते की, "खाजगी प्रयत्न टिकाऊ आणि चिरस्थायी होतील किंवा काय आणि त्या प्रयत्नांतून अर्धेमुर्धे तरी फळ पदरात पडेल किंवा नाही, याविषयी शंकाच वाटते. श्री. विष्णूशास्त्री चिपळूणकर आणि श्री. भावे यांनी अशा प्रकारच्या खासगी शाळा पुण्यात चालविलेल्या आहेत. त्यांच्या शाळांना पुरेसे अनुदान मिळाल्यास त्यांच्याकडून भरीव कामगिरी होईलही. परंतु सरकारी माध्यमिक शाळांची गरज त्यांनी भरून निघणे कधीही शक्य होणार नाही."[३०] यावरून स्पष्ट लक्षात येते की, खासगी संस्थांच्या माध्यमातून केले जाणारे कार्य हे ठराविक समाजापुरते किंवा ठिकाणापुरते उपयुक्त ठरू शकते. त्यात सार्वत्रिक शिक्षणाचा विचार होऊ शकत नाही. यासाठी सर्वांचाच उच्च शिक्षणाचा प्रश्न मिटविण्यासाठी सरकारने स्वतः प्रयत्न करावा असे जोतिबांना वाटत होते. एवढेच नाही तर अशा शिक्षणाची सोय केवळ शहरी भागाकरिताच न करता ग्रामीण भागासाठीही करावी.

जोतिबांच्या मते खासगी संस्थाना आर्थिक मर्यादा असते. सरकारी शाळा व महाविद्यालयांमध्ये जे शिक्षक व प्राध्यापक असतात त्यांना अधिक वेतन दिले जाते व तेवढेच वेतन खासगी शाळा चालकांना देणे परवडणारे नसते. त्यामुळे अशा शाळांचा दर्जा चांगला ठेवता येत नाही. याशिवाय खासगी शाळा उभी करताना जागा, इमारत व इतर भौतिक सुविधा अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे या कामी सरकारनेच लक्ष घालणे गरजेचे असते असे त्यांना वाटत होते. जोतिबांचे हे शिक्षणविषयक विचार सर्वार्थाने स्वानुभवावर अधारित होते. त्यांनी स्वतः ज्या मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या तेंव्हा त्यांनाही या अडचणींचा सामना करावा लागला होता. काही प्रसंगी तर जागेअभावी शाळा बंद कराव्या लागल्या होत्या. त्यांना जशी जागेची अडचण होती तशी आर्थिक अडचणही मोठया प्रमाणात आलेली होती. उदारमतवादी लोकांनी जरी सुरूवातीला देणग्या

देऊ केल्या तरी हा देणग्यांचा ओघ कायम स्वरूपी राहत नाही त्यामुळे सरकारनेच शिक्षणाच्या कामी लक्ष घालणे आवश्यक असते असे त्यांना वाटते.

माध्यमिक शाळा व महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या स्वरूपातही बदल होणे जोतिबांना महत्त्वाचे वाटत होते. शिक्षणाने समाजाच्या विविध प्रकारच्या गरजा भागविल्या जाव्यात हे शिक्षणाचे उद्दिष्ट असते. प्रत्येक व्यक्तीच्या सुप्त कला गुणांना, इच्छा आकांक्षांना, कल्पनाशक्तीला वाव मिळाला पाहिजे व प्रत्येकाला किमान चरितार्थ चालविता येईल इतपत ज्ञान मिळाले पाहिजे, अशी शिक्षणाची अपेक्षा असते. तथापि जोतिबांच्या मते सरकारतर्फे दिले जाणारे शिक्षण हे एकांगी होते कारण यात केवळ पदव्या व परीक्षांनाच महत्त्व दिले जात होते. या बाबतीत जोतिबांनी आपल्या निवेदनात लिहिले होते की, "शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचेही सारे लक्ष वाजवीहून फाजील प्रमाणात मॅट्रिकच्या परीक्षेवर केंद्रित झालेले असते. विद्यार्थ्याला त्याच्या भावी आयुष्यक्रमात स्वतंत्र जीवन आक्रमिण्यास लायक बनविण्यास उपयोगी पडावे, असे व्यावहारिक अंगच या अभ्यासक्रमाला नसते."[३१] या विचारातून असे निदर्शनास येते की, शिक्षणाला व्यावहारिक दृष्टिकोनातून महत्त्व यायला हवे. कित्येक विद्यार्थी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन मोठाल्या पदव्या मिळवितात, परंतु एवढे शिक्षण होऊनही कोणती नोकरी किंवा व्यवसाय करावा? असा यक्ष प्रश्न त्यांना भेडसावतोच. याचाच अर्थ असा होतो की शिक्षणक्रम पूर्ण करे पर्यंत त्यांनी केवळ परीक्षा द्यायच्या एवढयाच दृष्टिकोनातून अभ्यासक्रम अभ्यासलेला असतो व त्यांच्या शिक्षकांनीही केवळ आपल्या विषयात मुले अधिक पास व्हावीत एवढाच मर्यादित विचार केलेला असतो. जोतिबांच्या मते जर हे शिक्षण व्यवहारिक पातळीवर कार्य करणारे असते तर समाजात बेकारीची समस्याच उद्‌भवली नसती.

तत्कालीन समाजात केवळ शिक्षक व कारकून बनविणारे शिक्षण होते. अर्थात आजचा काळही या बाबीला अपवाद आहे असे म्हणता येणार नाही. आजच्या काळातही ही समस्या तशीच मूळ धरून आहे किंबहुना ती अधिक गंभीर झाल्याची दिसते. आज केवळ डी.एड व बी.एड पदवीधारकांचा विचार केला तर कित्येक जण या पदव्या मिळवूनही बेकार दिसतात.

यासाठी जोतिबांच्या मते शिक्षणाच्या स्वरूपात बदल होणे आवश्यक आहे. अशा पद्धतीने बदल केलेल्या शिक्षणाने काय फायदा होईल याविषयीही जोतिबांनी सांगितले होते. ते म्हणतात की, "काही विशिष्ट उद्योगधंद्यात खरोखरच फाजील गर्दी झालेली आहे. पण त्यावरून या लोकांना करता येण्याजोगे अन्य रोजगार धंदेच उपलब्ध नाहीत, असे सिद्ध होत नाही. सर्व देशाचा विचार केल्यास, शिकून तयार झालेल्या लोकांची सांप्रतची संख्या अत्यल्पच म्हणावी लागेल. ही सुशिक्षितांची संख्या शेकडो पटीने वाढेल व केवळ नोकरीच्या पाठीमागे लागण्याची गरज न पडता, त्या सर्वांना उपयुक्त व्यवसाय आणि रोजगारधंदे पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील, असा काळ फारसा दूर नाही."[३२] एकूणच त्यांच्या या विचारांतून शिक्षणाविषयी एक आशावाद दिसून येतो. अशा प्रकारच्या शिक्षणाचा स्वीकार केल्यामुळे एक समतोल साधणारा समाज निर्माण होईल असा त्यांना विश्वास वाटत होता असेही दिसून येते. जोतिबांनी सांगितलेल्या शिक्षणक्रमाप्रमाणे बदल झाला तर निश्चितच प्रत्येकजण ठराविक प्रकारच्याच नोकरीचा हट्ट धरणार नाही असा एक सकारात्मक विचार स्पष्ट होतो.

महाविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतीत जोतिबांनी आणखी एक महत्त्वपूर्ण विचार मांडलेला होता तो म्हणजे बी.ए., एम.ए. अशा पदवी परीक्षा खासगी रीतीने विद्यार्थ्यांना देता येण्याची सोय करावी. समाजात अनेक विद्यार्थी असतात ज्यांना शिक्षण घेण्याची खूप इच्छा असते परंतु आर्थिक परिस्थिती व कामाच्या अतिव्यापामुळे नियमित महाविद्यालयीन शिक्षण घेता येणे शक्य होत नाही. या अनुषंगाने सरकारने पदवीचा अभ्यासक्रम जाहीररित्या प्रकाशित करून विद्यार्थ्यांना केवळ परीक्षांना बसण्याची अनुमती सरकारने द्यावी. या विचारांतून जोतिबांची सार्वत्रिक शिक्षणाची तळमळ सहज दिसून येते. आज महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांत त्याच बरोबर माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळांतर्गत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना नियमित प्रवेशाबरोबरच बहिस्थ किंवा खासगी पद्धतीने परीक्षा देण्याची सोय आहे. हे यश एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांच्या शिक्षण विचारांचेच म्हणावे लागेल. मुक्त विद्यापीठांची संकल्पनाही याच शिक्षण विचारांतून जन्माला आल्याचे दिसून येते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबई विद्यापीठाने अशा प्रकारे खासगीरित्या

विद्यार्थ्यांना पदवी संपादित करण्याची परवानगी दिलेली होती. अशाच पद्धतीने ब्रिटिश सरकारने उच्च शिक्षणाची उपाययोजना करावी असे जोतिबांना वाटत होते.

## ७) जोतिबांचे शिक्षक विषयक विचार

जोतिबांनी स्वतः स्थापन केलेल्या शाळेत तसेच मिशनऱ्यांच्या शाळेत शिक्षक म्हणून काम केलेले होते. त्यामुळे तत्कालीन समाजात शिक्षक कसे होते? व कसे असायला हवे होते? याविषयी त्यांची एक ठाम भूमिका होती. शिक्षण प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी शिक्षक हा अतिशय महत्त्वाचा घटक असतो असे त्यांचे मत होते. वास्तविक विचार करता शिक्षकासमोरील जो विद्यार्थी वर्ग असतो तो मुळात अज्ञानीच असतो. त्यामुळे शिक्षक जेवढे ज्ञान देईल तेवढेच ज्ञान विद्यार्थ्यांना मिळू शकेल. विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान देण्यासाठी शिक्षकाकडे पुरसे ज्ञान असणे आवश्यक असते. जोतिबांनी तत्कालीन शिक्षण व्यवस्थेतील ब्राह्मण पंतोजी कसे होते? व शिक्षक कसे असायला हवे होते? त्याच बरोबर प्रभावी शिक्षण प्रक्रिया राबविण्यासाठी शिक्षकांच्या बाबतीत काय उपाययोजना करायला हवी याविषयी आपले विचार विविध लिखाणांतून मांडलेले होते.

जोतिबांच्या मते त्या काळात शिक्षकी पेशा हा ब्राह्मणांची मक्तेदारी झालेली होती. आपण स्वतः खूप बुद्धिमान आहोत असा आव आणून केवळ स्वतःच्या चरितार्थासाठी देशी शाळा या ब्राह्मण पंतोजींकडून चालविल्या जात होत्या. अशा शाळांमधून विद्यार्थ्यांचे हीत फारसे जोपासले जात नव्हते. मुळात पंतोजीकडे असलेल्या ज्ञानाचा वापर ते केवळ उच्चभ्रूंच्या हितासाठी करायचे. गरीब व शूद्र समाजासाठी त्यांचा कुठलाही उपयोग नव्हता. त्यांच्या शाळांचा दिनक्रमही अजिबात नियोजित नसायचा. एकूणच त्यांनी शिक्षकी पेशा केवळ चरितार्थासाठीच मिळविलेला असल्याने त्यांना विद्यार्थ्यांना शिकविण्याबाबत कोणतीच आस्था नव्हती. अशा शाळेतील शिक्षक आपला दिवस कसा घालवायचे याचे यथार्थ वर्णन जोतिबांनी 'विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजी' या पोवाडयात केले होते. त्यात ते लिहितात की,

"टेबलावर हळूच पालथें डोकें ठेविती |

चाड काय पोरा दाखविती ||

जेवण वेळ झाला मधींच दचकून उठती |

शाळेला झटकन सोडीती ||"[३३]

या पोवाडयातील ओळींतून सहज लक्षात येते की, त्या काळातील देशी शाळांमधील पंतोजींना विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याचा किती कंटाळा होता. शालेय शिक्षण हे औपचारिक शिक्षण असते. अशा शाळा या ठराविक नियमांवर व वेळापत्रकानुसार चालत असतात. तथापि हे शिक्षक ज्या पद्धतीने शाळा चालवायचे त्यात कोणतीही औपचारिकता नव्हती. केवळ गोरगरिबांना फसवायचे अशी एकूणच त्यावेळच्या शाळांमधील शिक्षक होते.

ब्रिटिश सरकारमार्फत चालविल्या जाणाऱ्या शिक्षकांचीही अवस्था याहून वेगळी होती असे जोतिबांना वाटत नव्हते. सरकारी शाळेतील शिक्षकही केवळ आपल्या वरिष्ठांच्या पुढे पुढे करीत असत व प्रत्यक्ष ज्ञानदानाचे कार्य मात्र बाजूला ठेवीत असत. जो व्यक्ती शिक्षकी पेशा स्वीकारतो त्यांच्यावर शाळेत येणारे सर्वच विद्यार्थी ज्ञानी करण्याची जबाबदारी असते, असे जोतिबांच्या विचारांवरून स्पष्ट होते. मात्र तत्कालीन शिक्षक हे प्रत्यक्ष अध्यापनाचे काम बाजूला सारून केवळ आपल्या ज्ञानाचा व बुद्धीचा देखावा करीत इतर ठिकाणी फिरत असायचे. जोतिबांच्या मते अशा शिक्षकांनी विद्येचे व शिक्षणाचे महत्त्व समाजाला पटवून सांगून जास्तीत जास्त लोकांना शाळेकडे आकर्षित करायला हवे होते. मुळात शिक्षकाचे कार्य हे केवळ शाळेपुरते मर्यादित असू शकत नाही. शिक्षक व समाजाचा एक घनिष्ठ संबध निर्माण होणे आवश्यक असते. समाजातील अपप्रवृत्ती, अडीअडचणी यांची शिक्षकाला जाण असायला हवीच तथापि या अपप्रवृत्तींतून व अडीअडचणींतून समाजाची सुटका कशी करता येईल याचा विचार करणेही शिक्षकाची नैतिक जबाबदारी असते. शिक्षणशास्त्रात शैक्षणिक समाजशास्त्र अशी एक संकल्पना आहे. शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे शिक्षण व समाज यांच्यामधील परस्पर संबधांचा अभ्यास होय.[३४] म्हणजेच शिक्षण व समाज या दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून असतात. असे हे शिक्षणाचे सामाजिकरण घडविण्याची जबाबदारी ही शिक्षकांची असते असे

जोतिबांच्या विचारांवरून स्पष्ट होते. तत्कालीन शिक्षक मात्र समाजाशी मिसळून वागणारे नव्हते. जोतिबांच्या मते या शिक्षकांपेक्षा मिशनरी शाळांमधील उपदेशक हे अधिक चांगले असायचे कारण मिशनरी उपदेशक अतिशय अल्पवेतनात आपले काम अतिशय प्रामाणिकपणे करीत असत. जोतिबांनी असे उपदेशक व सरकारी शाळांतील शिक्षक या दोघांत तुलना केलेली होती. या विषयी ते गुलामगिरी या ग्रंथात लिहितात की, "ज्या शहरांत तो उपदेशक राहतो त्या शहरांतील सर्व अबालवृद्धांस तो उपदेशक आहे म्हणून ठाऊक असतो; परंतु हा नबाब त्याच्या खालच्या मजल्यातील बिऱ्हाडकरूस, हा कोण गोमाजी म्हणून माहीत नसतो. अरे, हा आपल्या वरच्या युरोपियन कामगाराजवळ दररोज इकडच्या तिकडच्या चार गप्पा ठोकून मन मानेल तेव्हां तास दोन तास शाळेंत शिकवून वर्षातून त्यांस दोन-चार लेखी रिपोर्ट करितो, म्हणजे ह्याचें काम झालें. आणि यालाच चार आर्जवी लोक इमानी चाकर व देशाभिमानी म्हणतात."[३५] यावरून स्पष्ट लक्षात येते की, हे सरकारी शाळेतील शिक्षक मिशनऱ्यांएवढे प्रामाणिकपणे, निस्वार्थी व कुठलाही भेदभाव न करता विद्यादानाचे कार्य करीत नव्हते. कदाचित त्यांनी आपले कार्य जबाबदारीने केले असते तर साक्षरतेचे प्रमाण वाढण्यासाठी एवढया वर्षांचा कालखंड लागण्याची गरजच पडली नसती. अर्थात अशा शाळांमधील सर्वच ब्राह्मण पंतोजी हे चांगले नव्हते असे नाही. त्यांच्या मते त्याकाळातील काही शिक्षक हे निश्चितच चांगले होते. जोतिबांनी जे स्त्री शिक्षण व अस्पृश्य शिक्षणाची चळवळ हाती घेतलेली होती त्याकार्यात त्यांना मदत करणारे काही ब्राह्मण शिक्षकही होते. मात्र असा पुरोगामी विचार करणारे अत्यल्प होते.

एकूणच वरील सर्व शिक्षक परिस्थितीचा विचार करता लक्षात येते की, अशा शिक्षकांमुळे गरीब, शूद्र व अस्पृश्य अशा लोकांच्याच शिक्षणाचा प्रश्न अधिक होता. यासाठी महात्मा फुले यांनी काही उपायही सुचविले होते. त्यांच्या मते सरकारने कलेक्टरच्या माध्यमातून शूद्र व अस्पृश्यात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करावा म्हणजे या समाजातील लोकच शिक्षण कार्याकडे वळून स्वतः शिक्षक होण्यास धजावतील. शिक्षकी पेशात केवळ ब्राह्मण वर्गाचीच मक्तेदारी न ठेवता महार, मांग समाजातील लोकांनाही शिक्षक करावे असे केल्यामुळे

अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न तर मिटेलच परंतु शिक्षणाने आपणास नोकऱ्या मिळतात असे समजून हा समाज शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जाणार नाही. असे काम करणे ब्रिटिश सरकारला खूप कठीण पडणारे नव्हते, असे जोतिबांना वाटते कारण त्यांच्या मते एक भट शिक्षकाच्या पगारात सहा शूद्र किंवा नऊ अतिशूद्र शिक्षक मिळू शकतात. म्हणून अस्पृश्य शिक्षक नेमले जावेत असा पर्यायही त्यांनी सांगितलेला होता. याशिवाय शेतकरी वर्गातील शिक्षक प्राथमिक शिक्षणासाठी नेमावेत असेही त्यांनी सुचविलेले होते. या अनुषंगाने जोतिबांनी हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेल्या निवेदनात लिहिले होते की, "I think teachers for primary schools should be trained, as far as possible, out of the cultivating classes, who will be able to mix freely with them and understand their wants and wishes much better than a Brahmin teacher, who generally holds himself aloof under religious prejudices. These would, moreover, exercise a more beneficial influence over the masses than teachers of other classes, and who will not feel ashamed to hold the handle of a plough or the carpenter's adze when required, and who will be able to mix themselves readily with the lower orders of society."[३६] एकूणच जोतिबांच्या विचारांवरून स्पष्ट होते की, शिक्षक हा त्याच बहुजन गटाचा प्रतिनिधी असावा ज्या बहुजन गटास त्यास शिकवायचे आहे. तोच केवळ समाजाची गरज ओळखू शकतो व त्यानुसार ज्ञानदानाचे काम करू शकतो. त्याच समाजातील शिक्षक असल्यामुळे धार्मिकतेसारखी बाब शिक्षणाच्या कार्यात अडसर ठरू शकणार नाही. असा बदल केल्यामुळे शिक्षण हे समाजातील सर्व थरापर्यंत पोहचू शकते.

वरील उपायांशिवाय जोतिबांनी शिक्षकाच्या वेतनाविषयी व प्रशिक्षणाविषयीही आपले विचार मांडले होते. त्यांच्या मते शिक्षकपदी नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीचे 'नॉर्मल क्लास'मध्ये शिक्षक प्रशिक्षण झालेले असावे. त्यामुळे शिक्षक प्रभावीपणे अध्यापनाचे काम करू शकतील. त्यांच्या मते तत्कालीन शाळांमध्ये खूप कमी शिक्षक प्रशिक्षित असत. अशा परिस्थितीत बदल होणे त्यांना गरजेचे वाटत होते. जे शिक्षक प्रशिक्षितही नाहीत व ते शिक्षक कार्यासाठी लायकही नाहीत अशांना या पदावरून काढून टाकावे. चांगले, ज्ञानवंत व प्रामाणिक शिक्षक व्हावेत यासाठी शिक्षकांचे वेतनही चांगले असावे असे जोतिबांना वाटत

होते. वेतन विद्यार्थी संख्येवर असू नये कारण एखाद्या शाळेतील विद्यार्थीसंख्या कमी असेल तर त्या शिक्षकाचे वेतन कमी व्हायचे व त्यामुळे त्यास चरितार्थासाठी दुसरा एखादा व्यवसाय करावा लागायचा. सहाजिकच यामुळे त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे नुकसान व्हायचे. आजच्या कालखंडाचा या अनुषंगाने विचार केला तर आजही एखाद्या शाळेतील शिक्षक संख्याही त्या शाळेतील विद्यार्थी संख्येवर अवलंबून असते. कुठल्याही कारणास्तव एखाद्या शाळेचा पट कमी झाला की, त्या शाळेतील काही शिक्षक हे अतिरिक्त ठरण्याची भीती त्या शिक्षकांना कायम राहते. अशा परिस्थितीमुळे शिक्षक शाळेतील पटसंख्या नियमित कशी टिकून राहील याचाच अधिक विचार करतात. त्यामुळे पटसंख्या टिकविण्याच्या प्रयत्नात दर्जेदार शिक्षणाकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. यासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथिल असावी असे जोतिबांना वाटत होते. जोतिबांच्या मते वेतन व कामाची परिणामकारकता यांचा परस्पर संबध असतो. वेतन वाढले की, कामाची परिणामकारकता वाढते. त्यामुळे शिक्षकांचे वेतन कमी असू नये असे त्यांना वाटत होते. शिक्षकाचे वेतन वाढले की, ते ज्ञानदानाचे काम अधिक कळकळीने करतील असा जोतिबांचा विश्वास होता. "To secure a better class of teachers and to improve their position, better salaries should be given. Their salaries should not be less than Rs. 12 and in larger villages should be at least Rs. 15 or 20."[३७] ग्रामीण भाग व शहरी भाग अशी वेतनाची वर्गवारी असली तरीही किमान वेतन ठरलेले असावे. त्यापेक्षा वेतन कोणत्याही परिस्थितीत कमी होऊ नये असे त्यांचे मत होते. अधिक वेतनाचा फायदा असा असेल की, ते शिक्षक इतर कामधंदा करणार नाहीत व केवळ विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल याचाच विचार करतील.

जोतिबांनी शिक्षकाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी इतरही काही पर्याय सुचविले होते. त्यांच्या मते सर्वच शाळांची तपासणी वस्तुनिष्ठ पद्धतीने व्हावी व ज्या शाळा या तपासणीत अधिक कार्यक्षम दिसतील त्या शाळांमधील शिक्षकांना पगाराखेरीज उत्तेजनार्थ खास भत्ता देण्यात यावा. असे उत्तेजन दिल्याने शिक्षकही संशोधक वृत्ती वाढवून आपल्या विद्यार्थ्यांना विविध साधन तंत्रांच्या आधारे दर्जेदार शिक्षण कसे देऊ

शकतील याचा विचार करतील. याशिवाय तत्कालीन समाजाची परिस्थिती शिक्षकाला चांगल्याप्रकारे ज्ञात व्हावी यासाठी शिक्षकास हिशोबनीस, दस्तऐवज नोंदणी कारकून म्हणून, पोस्टमास्तर, तिकीट विक्रेता यासारखी कामे देण्यात यावीत असेही विचार जोतिबांनी मांडले होते. त्यांच्यामते असे केल्याने शिक्षक या समाजाच्या सुखदुःखाशी चांगल्या प्रकारे समरस होऊ शकेल. आजच्या प्रचलित शिक्षण पद्धतीचा विचार करता जनगणनेचे काम शिक्षकांकडे सोपविले जाते याचा हेतूही समाजाशी संपर्क वाढावा असाच आहे. अलिकडच्या काळात अशी कामे शासनाने टाळावीत म्हणून वेळोवेळी अंदोलने होताना दिसतात.

एकूणच जोतिबांच्या शिक्षक विषयक विचारांचा विचार केला तर त्यांनी शिक्षकाची कार्ये, कर्तव्ये याच बरोबर शिक्षकाची कार्यक्षमता कशी वाढविता येईल याविषयी विचार मांडले. हे त्यांचे विचार एकोणिसाव्या शतकाच्या परिस्थितीनुसार उपयुक्त होतेच त्याच बरोबर आजच्या काळातही हे विचार तेवढेच उपयुक्त असल्याचे दिसून येते.

## ८) जोतिबांचे अभ्यासक्रम विषयक विचार

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये अभ्यासक्रम हा घटक अत्यंत महत्त्वाचा असतो. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता एक पद्धतशीर पाठयपुस्तकांची रचना म्हणजे अभ्यासक्रम म्हणता येईल. हा अभ्यासक्रम जेवढा प्रभावी असतो तेवढी शिक्षणाच्या उद्दिष्टांची अंमलबजावणी परिणामकारक दिसून येते. आजच्या आधुनिक कालखंडाचा विचार करता अभ्यासक्रम कसा असावा, या संकल्पनेवर भरपूर संशोधन झालेले आहे. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करतानाच ज्या विषयाचा अभ्यासक्रम आहे त्याचे ज्ञान, कौशल्य, उपयोजन इत्यादी गोष्टी विद्यार्थ्यांना प्राप्त होणे हे अभिप्रेत आहेच परंतु तो विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणारा असावा, अभ्यासक्रम अतिअवघड किंवा अतिसोपाही नसावा, त्याची रचना विशेषतः सोप्याकडून अवघडाकडे अशी केलेली असावी म्हणजे विद्यार्थ्यांना त्याविषयी आवड निर्माण होऊ शकते, याबाबींचाही विचार झालेला असावा. हा सर्व विचार प्रचलित शिक्षण पद्धतीत

केला जातो. तथापि एकोणिसाव्या शतकातही महात्मा जोतिबा फुलेंनी एवढयाच प्रगल्भतेचे विचार अभ्यासक्रमाविषयी मांडलेले दिसून येतात.

जोतिबांच्या मते ब्रिटिश सरकारमार्फत भारतीयांसाठी चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये जो अभ्यासक्रम शिकविला जातो तो विद्यार्थ्यांना व्यवहारिक जीवनात उपयुक्त ठरणारा नव्हता. या अनुषंगाने हंटर कमिशनला सादर केलेल्या निवेदनात अभ्यासक्रमात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव असावा हे सांगताना जोतिबांनी लिहिले होते की, "The course of instruction should consist of reading, writing modi, and Balbodh and accounts, and a rudimentary knowledge of, general history, general geography, and grammar, also an elementary knowledge of agriculture and a few lessons on moral duties and sanitation."[३८] म्हणजेच त्यांच्या मते अभ्यासक्रमात त्याकाळाचा विचार करता मोडी, बाळबोध, गणित त्याचबरोबर इतिहास, भूगोल, शेतीविषयक माहिती, व्याकरण व आरोग्य या बाबींचा समावेश असावा. जोतिबा हे स्वतः शिक्षक असल्याने विद्यार्थ्यांचे बालमानसशास्त्र त्यांना चांगल्या प्रकारे ठाऊक होते. मुळात जो शिक्षक विद्यार्थ्यांचे बालमानसशास्त्र विचारात घेऊन अध्यापन करीत असतो तो एक आदर्श शिक्षक असतो. अभ्यासक्रमाची रचना करताना या मानसशास्त्राचा विचार करणे अत्यावश्यक असते हे जोतिबांनी एकोणिसाव्या शतकातच ओळखलेले होते. या अनुषंगाने त्यांनी अभ्यासक्रमाची काठिण्य पातळी कशी असावी याविषयीही आपले विचार मांडलेले होते. शहरी भागातील मुले व ग्रामीण भागातील मुले यांच्या शिक्षण विषयक गतीमध्ये फरक पडतो. शहरी मुलेही प्रगत असतात त्यातुलनेने ग्रामीण भागातील मुले अधिक प्रगत असतातच असे नाही. यामुळे शहरी भागातील मुलांच्या अभ्यासक्रमापेक्षा गामीण भागातील मुलांचा अभ्यासक्रम कमी असावा असे त्यांना वाटत होते. मुळात ग्रामीण भागात शिक्षणाविषयी अनास्था असते व अशा परिस्थितीत अभ्यासक्रम अतिशय डोईजड असेल तर मुले शिक्षणापासून आणखी भीतीने दूर जातील व त्यामुळे शिक्षणाचा खरा हेतू साध्य होणार नाही. अर्थात जोतिबांनी अभ्यासक्रम कमी असावा असे जरी सांगितलेले असले तरीही त्यातून शिक्षणाची उद्दिष्टे मात्र सर्व साध्य होणे अपेक्षित होते. प्राथमिक

शिक्षणात शेतीचे प्राथमिक ज्ञान देणेही त्यांना आवश्यक वाटत होते. हे ज्ञान देत असताना ते प्रायोगिक तत्त्वावर दिले जावे असे विचार त्यांनी मांडलेले होते.

वर नमूद केलेल्या प्रमुख विषयाखेरीज विविध भाषांचे ज्ञान विद्यार्थ्यांना असावे असेही मत त्यांनी मांडलेले होते. मुळात प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम हा स्थानिक भाषेत असावा कारण त्यामुळे तो अभ्यासण्यास सोपा जातो. तथापि उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात स्थानिक भाषांशिवाय इतरही भाषांचा समावेश असावा असे त्यांना वाटत होते. जोतिबांनी 'अखंडादि काव्यरचना' या पुस्तकात विविध भाषा का आत्मसात कराव्यात व ज्यांना अनेक भाषा येतात त्यांनी काय करावे याविषयी विचार मांडलेले होते.

"स्वभाषा लिहावी भाषण करावें || सद्गुणी असावें || स्वभावांत ||१||...

इंग्रजी लिहावें भाषण करावें || जगांत त्यागावें || व्यसनास ||१||...

तीन भाषेंमध्यें सध्या जे निपूण|| सद्गुणीं संपन्न|| मानवंत ||१||"[३९]

एकूणच या काव्यरचनेवरून स्पष्ट होते की, जोतिबांना समाजाने बहुभाषिक व्हावे असे वाटत होते. विद्यार्थिदशेचा विचारकरता अभ्यासक्रमात आपली स्वतःची भाषा; पाश्चात्य शिक्षण पद्धतीनुसार अत्यावश्यक असलेली इंग्रजी भाषा व आणखी राष्ट्रीय भाषा हिंदी इत्यादी तीन भाषा तरी किमान आपणास याव्यात. आज महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण खात्याने शालेय शिक्षणात हेच त्रिभाषा सूत्र स्वीकारलेले दिसून येते. विद्यार्थ्यांनी शालेय पातळीवर तीन भाषा शिकाव्यात तथापि शाळांव्यतिरिक्त प्रत्येकाने स्वतःस शक्य होईल तशा इतर भाषांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करावा व आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकोद्धारासाठी करावा असे जोतिबांना वाटत होते.

## ९) जोतिबांच्या मते अभ्यासपुरक उपक्रमांची आवश्यकता

शिक्षण प्रक्रियेत जेवढे महत्त्वाचे स्थान अभ्यासक्रमाला असते तेवढेच महत्त्वाचे स्थान अभ्यासपुरक उपक्रमांनाही असते. शिक्षणामध्ये अभ्यासक्रमाची अनुभूती विद्यार्थ्यांना देऊन

त्यातील ज्ञान ग्रहण करण्याचा प्रयत्न केला जातो, तथापि हे ज्ञान मिळविण्याचे आणखीही काही मार्ग असतात ज्याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जाऊ शकतो. विद्यार्थ्यांना आणखीही अभ्यासपुरक अनुभूती देता येऊ शकतात याचाही सांगोपांग विचार जोतिबांनी आपल्या शिक्षणविषयक विचारात केलेला होता. वास्तविक जो शिक्षक स्वतः शिक्षणप्रक्रियेशी पूर्णतः समरस झालेला असतो त्याला अध्ययन-अध्यापन एवढीच शिक्षणाची प्रचलित पद्धत मान्य नसते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडविणारे अनेक असे सहशालेय उपक्रम घेता येणे शक्य असते, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाच्या कक्षा एकसारख्या वाढत जातात. जोतिबांच्या मते शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण होणे आवश्यक असते. अभ्यासक्रमांवर आधारित परीक्षा घेऊन केवळ विद्यार्थ्यांने त्या त्या विद्यालयातील अभ्यासक्रमात किती प्रगती गाठली ते अभ्यासता येऊ शकते परंतु अभ्यासक्रमाच्या माध्यमातून काही गोष्टी विद्यार्थ्यांला थेट समाजापर्यंत नेऊन पोहचविणाऱ्याही असतात. या गोष्टी परीक्षा, मूल्यमापन, लिहिता वाचता येणे, पाठांतर करणे या गोष्टींच्या खूप पुढे असतात. एखाद्या विद्यार्थ्याला मिळालेले शिक्षण जेंव्हा त्या विद्यार्थ्यांत समाजिक दृष्टिकोन निर्माण करते तेंव्हा शिक्षणाचा खरा हेतू साध्य झाला असे समजावे. असा निकोप समाजिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी विविध उपक्रम शाळेत व समाजात राबविले जाणे आवश्यक असते असे जोतिबांना वाटत होते.

अभ्यासपुरक उपक्रमांमध्ये निबंधलेखन, वक्तृत्त्व व विविध ग्रंथ व साहित्य लिखाण यासारख्या उपक्रमांना चालना दिली जावी असे त्यांचे मत होते. निबंध समाजातील समस्यांचे वस्तुनिष्ठ परीक्षण करून त्या दूर कशा करता येऊ शकतील याबाबत विचार मांडणारे लिखाण होते. एकोणिसाव्या शतकात निबंध लेखन कलेस सुधारकांनी आपले शस्त्र बनविले होते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी 'प्रभाकर' वृत्तपत्रातून प्रकाशित केलेली शतपत्रे, आगरकरांनी प्रकाशित केलेले निबंध, लोकमान्य टिळकांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रातून प्रकाशित केलेले अग्रलेख हे सर्व निबंधलेखन कलेचाच एक भाग होते. निबंधलेखनास जर लहान वयातच विद्यार्थ्यांना उत्तेजन दिले गेले तर निश्चितच ही मुले समाजाचा सांगोपांग

अभ्यास करतील व त्यांना जाणवणाऱ्या समस्यांवर विचारपूर्वक उपाय सुचवतील. यासाठी निबंधलेखनास वाव देणे जोतिबांना गरजेचे वाटत होते.

जोतिबांना स्वभाषेतील ग्रंथलिखाणास अधिक वाव मिळावा असेही मनापासून वाटत होते. यासाठी दक्षिणा प्राईज कमिटीकडून अनुदान मिळावे यासाठी लोकहितवादींप्रमाणेच जोतिबांनीही प्रयत्न केले होते. यासाठी प्रतिगाम्यांचा रोषही त्यांनी ओढवून घेतलेला होता. मराठयांच्या काळापासून ब्राह्मण मंडळींना ग्रंथ निर्मितीसाठी आर्थिक मदत देण्यासाठी दक्षिणा प्राईज कमिटी अस्तित्त्वात आलेली होती. ती ब्रिटिशांच्या काळातही होती. तथापि अनेक लोक लायकी नसतानाही दक्षिणा मिळवित होते. त्याचबरोबर ही दक्षिणा केवळ संस्कृत लिखाणावरच खर्च होत होती. या गोष्टीला जोतिबांनी विरोध करून अनेक सह्यांचे निवेदन ब्रिटिश सरकारला दिले होते. त्यांच्या या कार्याला यशही आलेले असल्याचे दिसून येते. "सरकारने त्यांचा अर्ज मान्य केला आणि असे जाहीर केले की, हिंदुस्थानातील रहिवाश्यांपैकी जे कोणी मराठी भाषेमध्ये उत्तम निबंध लिहितील किंवा इंग्रजी भाषेतील, संस्कृत भाषेतील अथवा दुसऱ्या परकीय भाषेतील उपयुक्त पुस्तकांचे मराठीत भाषांतर करतील त्यांना दक्षिणा वाटण्यात येईल."[४०] यावरून स्पष्ट लक्षात येते की, या दक्षिणा प्राईज कमिटीच्या फंडापैकी निम्मी रक्कम जे मराठी भाषेत निबंध किंवा ग्रंथ रचतील त्याचबरोबर इतर भाषिक ग्रंथांचे मराठीत भाषांतर करतील त्यांच्यावर खर्च करण्याचे ठरले. जोतिबांच्या मते जे अवांतरित लेख, निबंध किंवा पुस्तके आहेत ते वाचण्यासाठी विद्यार्थी व समाजास उपलब्ध होणे जरूरीचे होते. याच माध्यमातून खरे लोकशिक्षण साधले जाऊ शकेल असा त्यांना विश्वास होता.

शिक्षणासाठी ग्रंथ लिखाण होणे जेवढे महत्त्वाचे होते तेवढेच महत्त्वाचे ग्रंथालयांची स्थापना होणे आहे, असे जोतिबांना वाटत होते. मुळात गोरगरिबांपर्यंत शिक्षण का जाऊ शकत नाही? त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे गरिबांना पुस्तके घेण्याचा खर्च परवडणारा नसतो. अशा गरीब जनतेस डोळयासमोर ठेवून त्यांच्यासाठी ग्रंथालयांची सोय व्हावी असे महात्मा फुले यांना वाटत होते. एकूणच विचार करता वाचन संस्कृती जोपासण्यासाठी ग्रंथालयांची समाजास नितांत आवश्यकता असते.

वरील उपक्रमांशिवाय जोतिबांना वक्तृत्त्व स्पर्धा शाळेत तशाच समाजात घेतल्या जाव्यात असे वाटत होते. निबंधाप्रमाणेच वक्तृत्त्व स्पर्धासाठी सामाजिक समस्यांविषयी एखादा चांगला विषय निवडता येऊ शकतो व त्यामुळे लोकशिक्षण साधता येऊ शकते, असे जोतिबांना वाटत होते. या अनुषंगाने जोतिबांनी स्वतः सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून निबंध व वक्तृत्त्व स्पर्धांचे आयोजन केलेले होते. या स्पर्धांमध्ये जोतिबांनी वक्तृत्त्व स्पर्धासाठी 'हिंदुस्थानातील दुष्काळामुळे शूद्र लोक उपासमारीने मरतात याची कारणे व उपाय' हा विषय ठेवलेला होता. एकूणच जोतिबांच्या मते लोकशिक्षणाच्याकामी या सर्व उपक्रमांची विशेष उपयोगीता असते.

## १०) जोतिबांचे शेतकी व व्यवसाय शिक्षणविषयक विचार

शिक्षणामध्ये व्यवसाय शिक्षण व शेतकी शिक्षणास अग्रक्रम देणे ही अतिशय महत्त्वाची बाब बनलेली आहे. ब्रिटिशांनी भारतीयांसाठी शिक्षण सुरू केल्यानंतर बहुतांश लोकांचा कल केवळ प्रशासकीय नोकरी मिळविण्यासाठीच शिक्षण घ्यायचे एवढयापुरताच मर्यादित बनला होता. एवढा दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे बेरोजगारी व बेकारीची समस्या वाढली होती. आजच्या परिस्थितीचा विचार केला तरीही खूप मोठी समस्या आजच्या काळात आहे. ही समस्या सोडविण्यासाठी व्यवसाय शिक्षणाची नितांत आवश्यकता जोतिबांना वाटत होती.

जोतिबांनी प्राथमिक शिक्षणातही शेतकी शिक्षण समाविष्ट करावे असे सुचविलेले होते. या अनुषंगाने जोतिबा म्हणतात की, "विद्यार्थ्यांना शेतकीच्या पाठांच्या जोडीने प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण देता यावे म्हणून एक 'आदर्श' शेतीची छोटीशी योजना आखल्यास ती निश्चितच फायदेशीर होईल. ही योजना खऱ्याखुऱ्या कार्यक्षमतेने अमलात आणल्यास तिच्यामुळे सर्व देशाचेच कोटकल्याण साधेल."[४१] जोतिबा शेतकी शिक्षणाच्या बाबतीत आग्रही भूमिका मांडणारे होते. अशा शिक्षणाचा पुरस्कार करण्याची कारण मिमांसा लक्षात घेतली तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे शिक्षणाच्या प्रसाराने शूद्र शेतकऱ्यांची मुले शाळा

शिकतील, परंतु शेतकीचे शिक्षण त्यांना मिळाले नाही तर ते केवळ नोकरी मिळविण्यासाठीच शिकतील. नोकरी मिळविण्याच्या स्पर्धेत हे शेतकरी विद्यार्थी टिकले नाही तर त्यांचा भ्रमनिराश होईल व त्यांना वैफल्य प्राप्त होईल. शिक्षण घेतलेले असल्याने त्यांना इतर शेतीची व मेहनतीची कामे नकोशी वाटतील व नोकरीही बेकारीमुळे मिळू शकणार नाही. अशा अवस्थेत हे विद्यार्थी वाईट मार्गाला लागण्याचे प्रकार अधिक घडतात. जोतिबांनी एकोणिसाव्या शतकात या परिस्थितीचा विचार केलेला होता यावरून त्यांचे समाजाचे निरीक्षण किती सूक्ष्म होते हे दिसून येते. आजही अनेक विद्यार्थी केवळ नोकरीच्या मागे धावताना दिसतात. अशा परिस्थितीत शेतकीचे व विविध व्यवसायांचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक असते. जोतिबांच्या मते हे शेतकीचे शिक्षण देताना केवळ पुस्तकी ज्ञान सांगितले जाऊ नये. त्यांना प्रत्यक्ष शेतीच्या नैसर्गिक वातावरणाशी समरस होता यावे, कोणत्या ऋतूत कोणते पीक घेतले जावे, जमिनीच्या मृदा प्रकारानुसार कोणते पीक त्या जमिनीत घ्यावे याचे वस्तूनिष्ठ ज्ञान मिळण्यासाठी शाळेजवळच शेती विकसित केली जावी असाही विचार त्यांनी मांडला. आज जी कृषी महाविद्यालये आहेत त्याच धर्तीवर शाळा असाव्यात असे यातून दिसून येते.

जोतिबांनी प्राथमिक शिक्षणाबरोबरच सर्व शेतकऱ्यांना शालाबाह्य प्रशिक्षण देता येणे शक्य होते असेही विचार मांडले होते. त्यांच्या मते या कामी ब्रिटिश सरकारने स्वतः पुढाकार घेणे अपेक्षित होते. "शूद्र शेकऱ्यांचे मुलांस विद्वान करण्याकरितां त्यांच्या जातींतील, स्वतः पाभारी, कोळपी व नांगर हाकून दाखविणारे शिक्षक तयार करून, त्यांच्या शाळेंत शेतकऱ्यांनी आपलीं मुलें पाठविण्याविषयीं कायदा करून, प्रथम कांही वर्षे त्यांच्या परीक्षा घेण्याकरितां हलक्या इयत्ता करून त्यांस ब्राह्मणांच्या मुलांसारख्या पदव्या देण्याची लालूच दाखवून त्यांच्या मुलीमुलांचा लग्नांत लग्नविधी करण्याविषयी परजातीने जूलूम करूं नये, म्हणून बंदोबस्त केल्याशिवाय शूद्र शेतकऱ्यांत विद्या शिकण्याची गोडी उत्पन्न होणे नाही. व पुढे शूद्र गांवकऱ्यांची मुले, जी मराठी सहावे इयत्तेसह नांगर, पाभर व कोळपी हाकण्याची परीक्षा देऊन सद्‌गुणी निवडतील, त्यांस मात्र पाटिलक्या द्याव्यात, म्हणून आमचे दयाळू सरकारनें कायदा

केल्याबरोबर हजारों शेतकरी पाटिलक्या मिळविण्याचे चुरशीने आपली मुलें विद्वान करण्याकरितां मोठया आनंदाने शाळेंत पाठवतील."[४२] एकूणच विचार करता जोतिबांचा शेतकीच्या स्वतंत्र शाळाही स्थापन करता येऊ शकतात यावर विश्वास होता. अशा शाळांमध्ये ज्यांना शेतीमधील सर्व अवजारे चालविण्याचे चांगले ज्ञान अवगत आहे ते प्रशिक्षक म्हणून काम करतील व शेतकऱ्यांनी आपली मुले त्यांच्याकडे शेती अवजारे चालविण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवावेत. अशा प्रशिक्षण केंद्रात केवळ प्रशिक्षणच देऊ नये, तर सरतेशेवटी त्यांच्या परीक्षा घेऊन त्यांना पदव्या द्याव्यात. असे केल्यामुळे त्या मुलांना शेतकी अभ्यासाची गोडी लागेल व परीक्षेत चांगली पदवी मिळविण्यासाठी ते अधिकाधिक चांगले शिक्षण घेण्याचा प्रयत्न करतील असे जोतिबांच्या विचारांतून दिसून येते. एवढेच नाही तर अशा पदवी प्राप्त शेतकऱ्यांना पाटीलक्या द्याव्यात त्यामुळे ते गावच्या शेती विकासात आणखी पुढाकार घेतील व यातून सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत होईल.

जोतिबांच्या दृष्टिकोनातून यांत्रिक पद्धतीने शेती करण्यावर भर दिला जाणे जरूरीचे होते. त्यामुळेच देशातील उत्पादकता वाढणार होती. यासाठी त्यांनी एक उपायही सुचविलेला होता. देशातील शेतकऱ्यांमधील प्रमुख नेतृत्त्व करू शकणाऱ्यांना परदेशात नेऊन तेथील शेतीची माहिती द्यावी म्हणजे त्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे तंत्र समजू शकेल असे त्यांना अभिप्रेत होते. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, भारतीय अर्थव्यवस्थाही शेतीवर अवलंबून आहे व जर ही शेती जुनाट परंपरावादी पद्धतीने केली गेली तर सर्वांचा जो पोशिंदा आहे त्याच्यावर उपासमारीची वेळ येईल. यासाठी शेतीचे शिक्षण मिळणे त्यांना आवश्यक वाटत होते.

आज कृषिविद्यापीठांच्या माध्यमातून शेतीविषयक संशोधने चांगल्या प्रकारे होताना दिसतात. यामध्ये विविध प्रकारचे आधुनिक अवजारे, बी बीयाणे, रासायनिक खते, पिकांच्या संकरीत जाती यावर खूप संशोधन होत आहे. ही आजच्या शिक्षण पद्धतीची चांगली बाब असली तरीही हे शिक्षण पदवी दर्जाचे असल्याने सर्व सामान्य व गरीब कुटुंबातील मुलांना परवडणारे नाही. यासाठी जोतिबांनी जे शालेय स्तरावर शेतकीचे शिक्षण सांगितले ती

संकल्पना निश्चितच उपयुक्त वाटते. केवळ एकोणिसाव्या शतकातच नाही तर अगदी आजच्या काळातही ही संकल्पना उपयुक्त आहे.

जोतिबांनी शेती व्यवसायाच्या शिक्षणाबरोबरच इतर व्यवसायांच्या शिक्षणाचाही पुरस्कार केलेला होता. त्यांच्या मते ग्रामीण भागातील जे कारागीर असतील त्यांना शेतीविषयक विविध अवजारे बनविण्याचे प्रशिक्षण दिले जावे. ही अवजारे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनविलेली असावीत. यामुळे त्यांच्या अवजारांना मागणी वाढेल व त्यांच्या चरितार्थाचा प्रश्न मिटेल. याशिवाय विविध कलांचे शिक्षण समाजाला दिले जावे अशीही जोतिबांची अपेक्षा होती.

## ११) शालेय व्यवस्थापनविषयक जोतिबांचे विचार

जोतिबांनी मांडलेले शिक्षण विषयक विचार हे त्यांच्या समाजाच्या वस्तुनिष्ठ निरीक्षणातून सूचलेले होते. जोतिबांना अपेक्षित जो शिक्षणातील बदल होता त्याचे यश हे सर्वस्वी शालेय व्यवस्थापन कशा स्वरूपाचे आहे यावर अवलंबून होते. लोकशिक्षण प्रभावीपणे राबविण्यामध्ये सरकारची भूमिका अतिशय महत्त्वाची असते असे त्यांना वाटत होते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सरकारने शिक्षणातून व या व्यवस्थापनातून आपले अंग काढून घेऊ नये. शिक्षणाचे व्यवस्थापन कसे असावे याविषयी सांगताना शहरी भाग व ग्रामीण भाग या दोन्हींचाही विचार जोतिबांनी केलेला होता. शहरी पातळीवर शिक्षणाची जबाबदारीही नगरपालिकांवर सोपवावी. नगरपालिकांमध्ये शिक्षण मंडळांची स्थापना करण्यात येऊन त्याद्वारे कार्यक्षम शिक्षणप्रणाली शहरातील लोकांसाठी सुरू करावी असे विचार जोतिबांनी मांडले होते. शहरी भागात जेवढा कर गोळा होतो त्याच्या पन्नास टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करावी. या अनुदानातून शहरी लोकसंख्या लक्षात घेऊन त्याच्या प्रमाणात शाळा वाढविण्याचे काम नगरपालिकांनीच करावे. नगरपालिकांचे हे शिक्षणमंडळ वेळोवेळी सर्वेक्षण करून शाळांची संख्या निश्चित करू शकेल.

ग्रामीण भागात शिक्षणाच्या बाबतीत अतिशय गैरसोई होत्या. जोतिबांच्या मते खऱ्या अर्थाने गरीब शूद्र व अस्पृश्य लोक हे खेडयातच असायचे व त्यांच्याच शिक्षणासाठी कोणतीही उपाययोजना खेडयात नव्हती. या अनुषंगाने त्यांनी जिल्हा लोकल बोर्ड व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून शाळा सुरू केल्या जाव्यात असे सुचविले होते. जिल्हा प्रशासनामध्ये असलेल्या कलेक्टर या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली ग्रामीण भागातले शिक्षण चालविले जावे असे त्यांना वाटत होते. या अनुषंगाने जोतिबांनी गुलामगिरी या ग्रंथात लिहिले होते की, "सरकारनें कृपाळू होऊन हें काम एकंदर सर्व युरोपियन कलेक्टरांच्या हाती दिल्याशिवाय सिद्धीस जाणार नाहीं. कारण या लोकांचा शूद्र व अतिशूद्रांशी निकट संबंध असल्यामुळें त्यांनी भट कामगारांवर भरंवसा न ठेविता दर गांवोगांवी एक एक वेळीं जाऊन, त्यांनी कुळकर्ण्याचा हुजूर न धरितां सर्व गांवातील अबालवृद्धांस विद्येपासून काय काय लाभ होतात हें सांगितल्याबरोबर ते आपली हुशार हुशार मुलें निवडून कलेक्टरसाहेबांच्या स्वाधीन, पंतोजी करण्याकरितां, मोठया आनंदाने करतील, कारण जसें युरोपियन कलेक्टरांच्या बोलानें हे काम तडीस जाईल, तसें असल्या गैरमाहीत कामगारांच्यानें तडीस गेलें नाही व पुढेंही जाईल, किंवा न जाईल याचा संशय वाटतो."[४३] म्हणजेच जोतिबांच्या मते ग्रामीण भागातील शिक्षणासाठी कलेक्टरने स्वतः पुढाकार घेणे गरजेचे होते. कलेक्टरने स्वतः पुढाकार घेतल्याने शूद्र समाजातील लोक स्वतः शिक्षणात पुढे येतील व त्यांचा विकास होऊ शकेल. स्थानिक पातळीवरील शिक्षणात त्याकाळी पाटील, इनामदार, सरदार यासारख्या मंडळीचा दबदबा असायचा. तथापि ही मंडळी शक्यतो निरक्षर असायची त्यामुळे ते शिक्षण प्रभावीपणे राबविण्यात असमर्थ असायचे. ही समस्या सोडविण्यासाठी जोतिबांनी जिल्हा व स्थानिक पातळीवर सुशिक्षित आणि बुद्धिमान नागरिकांच्या समित्या नेमल्या जाव्यात असे सुचविले होते. या समित्या ग्रामीण भागातील शिक्षणाविषयी योग्य त्या उपाय योजना करतील व शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी काही मार्ग सुचवतील. या समित्यांनी कलेक्टर व शिक्षण खात्यांच्या नियंत्रणाखाली काम करावे असेही त्यांनी सुचविले होते.

अर्थात नगरपलिका व जिल्हा लोकल बोर्ड यांच्यावर जरी शिक्षणाची जबाबदारी टाकलेली असली तरीही या शिक्षण कार्यावर शिक्षण खात्याची देखरेख असावी. शिक्षण खात्याच्या संचालकांनी व इतर अधिकाऱ्यांनी वेळोवेळी या शाळांची तपासणी करावी. वर्षातून किमान चार वेळेस म्हणजे दर तीन महिन्याला शाळा तपासणी करावी व यातील एखाद्यावेळी पूर्वसूचना न देताच शाळांची तपासणी करावी. यामुळे शाळांचा दर्जा अधिक चांगला राहू शकेल. माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या शाळा खासगी संस्थांच्या माध्यमातून चालविल्या जात असल्या तरीही अशा शाळांवर सरकारी नियंत्रण असावे व अनुदान दिले जावे असेही त्यांनी सांगितले होते. एकूणच शालेय व्यवस्थापन अशा पद्धतीचे असावे की ज्यामुळे कुठल्याही प्रकारचा खंड शिक्षण कार्यात पडू नये.

वरील सर्व मुद्यांचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते की, बहुजन समाजातून पुढे आलेल्या जोतिबांनी समाजाचे अतिशय व्यापक दृष्टिकोनातून परीक्षण करून आपले सर्वव्यापी असे शिक्षण विचार मांडले. शिक्षणाच्या बाबतीत त्यांची भूमिका ही अतिशय आग्रही स्वरूपाची होती. त्यांच्या क्रांतीकार्याविषयी 'महात्मा जोतीराव फुले : वारसा आणि वसा' या पुस्तकातील एका लेखात लेखक भास्कर भोळे यांनी लिहिले होते की, "जोतीरावांचे क्रांतिकार्य अन्य सुधारकांपेक्षा प्रभावी ठरले आहे याचे एक कारण ज्या शूद्रातिशूद्रांच्या अभ्युदयासाठी ते धडपडत होते त्यांच्या व्यथावेदनांचा साक्षात अनुभव त्यांनी घेतला होता... फुल्यांचे विचार पिळवटणाऱ्या अंतःकरणाच्या हुंकारातून आलेले असल्यामुळे स्वाभाविकच अधिक क्रांतिकारक होते."[४४] म्हणजेच ज्या समाजाचे परिशीलन जोतिबांनी केलेले होते त्या समाजाचे ते स्वतः एक घटक होते त्यामुळे त्यांना कोणत्या प्रकारचे शिक्षण समाजास उपयुक्त ठरू शकते याची पूर्ण कल्पना होती. त्यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव केवळ एकोणिसाव्या शतकापुरताच मर्यादित नव्हता तर आजच्या काळातही त्यांचे हे विचार तेवढेच वस्तुनिष्ठ वाटतात. आजच्या कालखंडात महाराष्ट्र शिक्षण मंडळामार्फत घेतले गेलेले अनेक निर्णय हे जोतिबा फुलें यांच्या शिक्षण विचारांशी मिळते जुळते आहेत यात कुठलीही शंका नाही.

## ४.४ संदर्भ


१) कुलकर्णी अ.रा.: 'महात्मा जोतीराव फुले: सामाजिक व शैक्षणिक कार्य', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती २००८, पृ.क्र. ६.

२) कित्ता, पृ. क्र.२९.

३) कीर धनंजय : 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती १९९२, पृ. क्र. ३६.

४) कीर धनंजय, डॉ. मालशे स.गं., डॉ. फडके य.दि.(संपादक) : 'महात्मा फुले समग्र वाङ्‌मय', 'महात्मा फुल्यांनी पुण्यात सुरू केलेल्या शाळांसंबंधी कागदपत्र', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती २००६, पृ. क्र. ६५८.

५) कित्ता, 'शेतकऱ्याचा असूड', पृ. क्र.२६७, २६८.

६) कित्ता, 'सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक', पृ. क्र. ४६६.

७) कित्ता, 'गुलामगिरी', पृ. क्र . १४४,१४५.

८) कीर धनंजय : 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती १९९२, पृ. क्र. ६१.

९) कित्ता, पृ.क्र. १८६.

१०) कीर धनंजय, डॉ.मालशे स.गं., डॉ. फडके य.दि.(संपादक): 'महात्मा फुले समग्र वाङ्‌मय', 'शेतकऱ्याचा असूड', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती पृ.क्र. २६३.

११) कित्ता, 'गुलामगिरी', पृ. क्र. १४६.

१२) कित्ता, पृ.क्र. १८१.

१३) कीर धनंजय : 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती १९९२, पृ. क्र. ६१.

१४) कीर धनंजय, डॉ.मालशे स.गं., डॉ. फडके य.दि.(संपादक) : 'महात्मा फुले समग्र वाङ्‌मय', 'गुलामगिरी', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती पृ.क्र.१३५.

१५) कित्ता, 'हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन' पृ.क्र. २४५.

१६) प्रा.सरदार गं.बा.: 'महात्मा फुले : व्यक्तीत्त्व आणि विचार' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती १९८२, पृ.क्र. ८४.

१७) कीर धनंजय : 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती १९९२, पृ. क्र.३३.

१८) कित्ता, पृ.क्र. २९.

१९) कित्ता, पृ.क्र. २८.

२०) कीर धनंजय, डॉ. मालशे स.गं., डॉ. फडके य.दि.(संपादक) : 'महात्मा फुले समग्र वाङःमय', 'महात्मा फुल्यांनी पुण्यात सुरू केलेल्या शाळांसंबंधी कागदपत्र', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती पृ. क्र.६५५, ६५६.

२१) कित्ता, पृ. क्र. ६६५.

२२) कित्ता, 'महात्मा फुल्यांचे मलबारींच्या दोन टिपणांविषयीचे मत', पृ. क्र. ३४९.

२३) आत्रे त्रिंबक नारायण : 'गावगाडा', वरदा प्रकाशन, पुणे, प्र.आ., ३ पुनर्मुद्रण २००९, पृ.क्र.२४८.

२४) कीर धनंजय, डॉ. मालशे स.गं., डॉ. फडके य.दि.(संपादक) : 'महात्मा फुले समग्र वाङःमय', 'महात्मा फुल्यांनी पुण्यात सुरू केलेल्या शाळांसंबंधी कागदपत्र', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती पृ. क्र. ६९८, ६९९.

२५) कीर धनंजय : 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती १९९२, पृ. क्र. ९२.

२६) कीर धनंजय, डॉ. मालशे स.गं., डॉ. फडके य.दि.(संपादक) : 'महात्मा फुले समग्र वाङःमय', 'अखंडादि काव्यरचना', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती पृ. क्र. ६०३.

२७) कित्ता, 'महात्मा फुल्यांनी पुण्यात सुरू केलेल्या शाळांसंबंधी कागदपत्र', पृ.क्र. ६९८

२८) कित्ता, 'हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन', पृ.क्र. २४६.

२९) कित्ता, पृ.क्र. २४७.

३०) कित्ता, 'हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन : मराठी भाषांतर', पृ.क्र. ७७३.

३१) कित्ता, पृ.क्र.७७४.

३२) कित्ता, पृ.क्र.७७५.

३३) कित्ता, 'विद्या खात्यातील ब्राह्मण पंतोजी', पृ.क्र.८९.

३४) डॉ.पारसनीस न.रा.: 'शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका', नूतन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८७, पृ.क्र.२०७.

३५) कीर धनंजय, डॉ. मालशे स.गं., डॉ. फडके य.दि.(संपादक) : 'महात्मा फुले समग्र वाङ्ःमय', 'गुलामगिरी', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती पृ.क्र. १८९.

३६) कित्ता, 'हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन', पृ.क्र. २४८.

३७) कित्ता, पृ.क्र.२४८.

३८) कित्ता, पृ.क्र.२४९.

३९) कित्ता, 'अखंडादि काव्यरचना', पृ.क्र. ५६९, ५७०.

४०) कीर धनंजय : 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती १९९२, पृ. क्र. ४२.

४१) कीर धनंजय, डॉ. मालशे स.गं., डॉ.फडके य.दि.(संपादक) : 'महात्मा फुले समग्र वाङ्ःमय', 'हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन : मराठी भाषांतर', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती पृ.क्र. ७६९.

४२) कित्ता, 'शेतकऱ्याचा असूड', पृ.क्र.३३२.

४३) कित्ता, 'गुलामगिरी', पृ.क्र.१९४, १९५.

४४) भोळे भास्कर लक्ष्मण : 'महात्मा जोतीराव फुले : वारसा आणि वसा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, तिसरी आवृत्ती २००७, पृ.क्र. ३८.

**प्रकरण पाचवे**

# न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे शैक्षणिक विचार

## ५.१ न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा अल्पपरिचय

## ५.२ न्यायमूर्ती रानडे यांचे शैक्षणिक कार्य

## ५. ३ न्यायमूर्ती रानडे यांचे शैक्षणिक विचार

१) न्यायमूर्ती रानडेंच्या दृष्टिकोनातून शिक्षणाची आवश्यकता

२) न्यायमूर्ती रानडे यांचे पाश्चात्य शिक्षण पद्धतीविषयक विचार

३) न्यायमूर्ती रानडे यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

४) ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर टीका

५) न्यायमूर्ती रानडे यांचे प्राथमिक शिक्षणविषयक विचार

६) न्यायमूर्ती रानडे यांचे माध्यमिक व उच्च शिक्षणविषयक विचार

७) न्यायमूर्ती रानडे यांचे अभ्यासक्रमविषयक विचार

८) न्यायमूर्ती रानडे यांचे परीक्षापद्धतीविषयक विचार

९) न्यायमूर्ती रानडे यांचा शिक्षकविषयक दृष्टिकोन

१०) शिक्षणात ग्रंथांची आवश्यकता

# प्रकरण पाचवे

# न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे शैक्षणिक विचार

## ५.१ न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा अल्पपरिचय

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात होऊन गेलेल्या कर्तृत्ववान समाज सुधारकांपैकी एक समाज सुधारक होते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यान्हीच्या दशकामध्ये १८ जानेवारी १८४२ रोजी नाशिक जिह्यातील निफाड गावी न्यायमूर्ती रानडेंचा जन्म झाला होता.[१] त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूरला झाले व त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते मुंबईला गेले. इ.सन १८५६ मध्ये त्यांनी मुंबईच्या एलफिस्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व इ.सन १८६२ मध्ये बी.ए.ची पदवी मिळविली. रानडेंनी ब्रिटिश प्रशासनातील विविध पदांची धुरा सांभाळून एल.एल.बी व एम.ए.या पदव्या संपादित केल्या होत्या. एवढया पदव्या त्यांनी संपादित केलेल्या असल्याने त्यांना लोक ‘पदवीधरमुकुटमणि’ असे म्हणत होते.[२]

बी.ए.ची पदवी मिळविल्यानंतर त्यांनी त्याच कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले होते. त्यानंतर ब्रिटिश प्रशासनात मराठी ट्रान्सलेटर म्हणून त्यांनी नोकरी केली. याशिवाय त्यांनी अक्कलकोट येथे कारभारी म्हणून व कोल्हापूर येथे न्यायाधीश म्हणून नोकरी केलेली होती. इ.सन १८७१ मध्ये त्यांनी ॲडव्होकेटची परीक्षा दिल्यानंतर पुन्हा त्यांची न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. ब्रिटिश प्रशासनात त्यांनी पुणे, नाशिक, धुळे अशा विविध शहरात न्यायाधीशपदी नोकरी केलेली होती.

न्यायमूर्ती रानडे यांनी केवळ ब्रिटिश प्रशासनात नोकरीच केली नाही, तर समाजाच्याप्रती प्रत्येकाचे जे एक ऋण असते त्याचा विचार करून तत्कालीन समाजाची विविध मार्गांनी सेवा करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. त्यांच्या कार्यामुळेच रानडे यांना एकोणिसाव्या

शतकातील महत्त्वाच्या समाज सुधारकांच्या यादीत अढळ स्थान मिळू शकले. त्यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून समाज सुधारणेचे कार्य अखेर पर्यंत चालू ठेवले होते. प्रार्थना समाज, पुणे सार्वजनिक सभा, भारतीय राष्ट्रीय सामाजिक परिषद, व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, साहित्य परिषद अशा विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांचे कार्य सुरू होते. शिक्षणातील प्रगती शिवाय समाजात सुधारणा होऊ शकणार नाही यासाठी रानडे यांनी शैक्षणिक कार्यही हाती घेतलेले होते. एकूणच विचार करता न्यायमूर्ती रानडे यांच्या विचारांचा तत्कालीन समाजावर खूप चांगल्या प्रकारचा प्रभाव होता. समाजसेवेच अखंड कार्य करीत असतानाच दि.१६ जानेवारी १९०१ रोजी न्यायमूर्ती रानडे यांचा अजारपणात मृत्यू झाला.

## ५.२ न्यायमूर्ती रानडे यांचे शैक्षणिक कार्य

न्यायमूर्ती रानडे यांना सामाजिक कार्याबरोबरच शैक्षणिक कार्याचीही विशेष आवड होती. त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात अध्यापक म्हणून केलेली होती. बी.ए.ची पदवी मिळविल्यानंतर ते एलफिस्टन कॉलेजमध्ये अध्यापनाचे काम करू लागले होते. ते विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल, गणित, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, निबंध लेखन, इंग्रजी कविता या सारखे विषय शिकवित असत.[३] विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त ज्ञान देण्यासाठी शिक्षकाकडे अगोदर ज्ञानाचे भांडार असणे अतिशय आवश्यक असते व यासाठी शिक्षकाने अगोदर भरपूर अभ्यास करणे गरजेचे असते असे त्यांचे मत होते. त्यामुळे ते स्वतः अनेक ग्रंथांचे वाचन करीत. एक विषय शिकविण्यासाठी त्याला अनुसरून विविध संदर्भ ग्रंथांचे अवलोकन ते करीत असत. ते एक व्यासंगी व हाडाचे शिक्षक होते. ब्रिटिश प्रशासनात ट्रान्सलेटरची नोकरी लागल्यामुळे काही काळ त्यांनी अध्यापनाचे कार्य थांबविले परंतु पुन्हा इ.सन १८६८ मध्ये त्यांची एलफिस्टन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. आपल्या अध्यापन काळात त्यांनी परीक्षक म्हणूनही कामगिरी बजावली होती. ही जबाबदारी ते अतिशय कर्तव्यदक्षपणे पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असत. याविषयी त्यांनी स्वतःच माहिती लिहिलेली होती. "परीक्षक या नात्यानें स्वीकारलेली जबाबदारी सिद्धीस नेण्याकरितां मी ज्ञानेश्वरीचे सहा अध्याय वाचले, नवनीताच्या कित्येक भागांचीं पारायणें केलीं आणि मोरोपंताच्या पुष्कळशा कवितांचे परिशीलन केलें. प्रश्न

काढण्याचें काम मी करावें असें ठरल्यामुळें नेमलेल्या अभ्यासक्रमाची खडान् खडा माहिती करून घेण्याखेरीज गत्यंतर नव्हतें."[४] यावरून न्यायमूर्ती रानडेंच्या जिज्ञासू वृत्तीची कल्पना येते. विद्यार्थ्यांसमोर उभे असताना आपण संपूर्ण तयारीनिशी असणे अगदी आवश्यक असते असे त्यांना वाटत होते म्हणून ते विविध ग्रंथांचा अभ्यास करीत असत. अर्थात या दरम्यानच्या काळात न्यायमूर्ती रानडे यांनी ब्रिटिश प्रशासनातील न्याय खात्यात हंगामी नोकऱ्याही केलेल्या होत्या. ॲडव्होकेटची परीक्षा दिल्या नंतर त्यांची न्याय खात्यात कायम स्वरूपी नियुक्ती झाली व त्यामुळे त्यांचे प्राध्यापक म्हणून ज्ञानदानाचे कार्य थांबले.

न्यायमूर्ती रानडेंचे अध्यापनाचे प्रत्यक्ष कार्य जरी थांबले असले तरीही त्यांचे इतर मार्गाने चालू असलेले शैक्षणिक कार्य मात्र थांबले नव्हते. लोकमान्य टिळक व आगरकर यांनी पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल'ची जी स्थापना केली होती या कार्यात न्यायमूर्ती रानडे यांचेही सहकार्य होते. याशिवाय डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेनंतर सोसायटीच्या मॅनेजिंग कौन्सिलमध्येही त्यांची निवड झालेली होती. 'ग्रंथोत्तेजक मंडळी' या संस्थेची स्थापना करून त्या माध्यमातून देशी भाषेतील साहित्य लिखाणास त्यांनी प्रोत्साहन दिलेले होते. त्यांनी त्यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांना स्वतः शिक्षण देऊन मुलींसाठी हायस्कूल व एक ट्रेनिंग स्कूलची स्थापना करण्यास पुढाकार घेण्यासाठी भाग पाडले होते. एकूणच यावरून असे स्पष्ट होते की, त्यांनी प्रत्यक्ष अध्यापनाचे कार्य जरी थांबविले असले तरीही शिक्षणाविषयी जी त्यांची जागरूकता होती त्यामुळे ते आपल्या शैक्षणिक कार्यापासून परावृत्त मात्र होऊ शकले नव्हते.

## ५.३ न्यायमूर्ती रानडे यांचे शैक्षणिक विचार

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी इतर समाजसुधारकांप्रमाणेच शिक्षणाचे महत्त्व ओळखलेले होते. त्यामुळे त्यांच्या विचारातून त्यांची एक शिक्षणाविषयीची निश्चित भूमिका लक्षात येते. न्यायमूर्ती रानडे यांनी त्यांच्या कालखंडातील परिस्थितीचे अवलोकन करून समाजाला शिक्षणाची किती आवश्यकता आहे हे ओळखलेले होते. तत्कालीन समाजातील शाळा कशा होत्या?, ब्रिटिशांनी ज्या शाळा चालविल्या होत्या त्यात काय त्रूटी होत्या?, ब्रिटिश

सरकारने शिक्षण खात्याच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार कसा करावा?, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण यामध्ये कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक होते? या शाळांचा अभ्यासक्रम कसा असावा? अशा विविध समस्यांविषयी त्यांनी सांगोपांग अभ्यास करून आपले विचार मांडलेले होते. त्यांनी केलेल्या विविध भाषणातून व विविध लेखातून त्यांचे हे शैक्षणिक विचार स्पष्ट होतात.

## १) न्यायमूर्ती रानडेंच्या दृष्टिकोनातून शिक्षणाची आवश्यकता

तत्कालीन समाजात विविध अपप्रवृत्तींचा पगडा होता. या अनुषंगाने शिक्षणाची निश्चित अशी आवश्यकता रानडेंना वाटत होती. त्यांच्या मते शिक्षण हे केवळ लोकांना साक्षर करण्यासाठीच असू नये तर ते त्यांना सुसंस्कृत करण्यासाठी असावे. प्रत्येक व्यक्तीमध्ये समाजाबद्दल विशाल दृष्टिकोन निर्माण करू शकेल तेच खरे शिक्षण त्यांना वाटत होते. त्यासाठीच सर्वार्थाने प्रयत्न होणे त्यांना अगत्याचे वाटत होते. त्यांच्या मते ज्ञान मिळविणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. तथापि या ज्ञानाचा आपल्या स्वार्थासाठी उपयोग न करता त्याचा समाजाच्या भल्यासाठी व उद्धारासाठी अधिक उपयोग कसा होईल हे शिकविणेही शिक्षणाचेच उद्दिष्ट आहे. ज्ञानामुळे व्यक्तीला एक प्रकारचे सामर्थ्य प्राप्त होत असते व सामर्थ्याचा उपयोग सकारात्मक गोष्टींसाठी होणे आवश्यक असते. वैदिक पद्धतीनुसार जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका होणे याला मोक्ष मानले गेले होते परंतु न्यायमूर्ती रानडे यांनी मोक्ष या शब्दाची आपली स्वतःची स्वतंत्र व्याख्या सांगितलेली होती. ते म्हणतात, "सन्मार्गाकडे अश्रृंखल प्रवृत्ती असणे व असद्विचारांची स्फूर्ती मनात कधीही न होणे हाच आम्ही मोक्ष समजतो."[५] यावरून त्यांच्या विचारांची प्रगल्भता लक्षात येते. एखाद्याच्या मृत्यूनंतर त्याला मोक्ष मिळाला किंवा नाही असे इतरांना सांगणे निश्चितच कठीण असते परंतु जर एखाद्याचे मन चांगल्याच गोष्टींकडे नेहमी आकर्षिले जात असेल व अपप्रवृत्तींचा व वाईट विचारांचा एखाद्याच्या मनावर अजिबात प्रभाव पडत नसेल तर त्याला मोक्ष मिळाला असे समजायला हरकत नाही असे त्यांना वाटत होते. निकोप मनाची मानसिक अवस्था केवळ उच्च प्रतीच्या

शिक्षणानेच साध्य करता येणे शक्य आहे. यावरून मोक्ष मिळविण्यासाठी शिक्षण हे शिक्षणाचे उद्दिष्ट मानता येईल.

रानडे यांच्या दृष्टिकोनातून व्यक्तीचे एक संतुलित व उच्चतम व्यक्तिमत्त्व घडवणे हेही शिक्षणाचेच उद्दिष्ट होते. मुळात शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तित्त्वाचा विकास घडविण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजेत. शाळेत जे विविध विषय शिकविले जातात त्यातून केवळ मुलांना माहितीच मिळणे अपेक्षित नाही तर त्या प्रत्येक विषयाचा सारांश रूपाने इष्ट असा प्रभाव शिकणाऱ्यांच्या मनावर पडणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. या शिक्षणाच्या माध्यमातून शिकणाऱ्यात एक पराकोटीचा मानवतावादी व सुसंस्कृतपणाचा दृष्टिकोन निर्माण व्हायला हवा. थोडक्यात शिकणाऱ्याने जे ज्ञान मिळविले त्याची नैतिकतेच्या आधारे तपासणी करून त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या जीवनात करायला हवा असे त्यांचे मत होते. अशा प्रकारचे शिक्षण मिळाले तर निश्चितच तत्कालीन समाजातील दोष नाहीसे होतील असा विश्वास न्यायमूर्ती रानडे यांना वाटत होता.

व्यक्तिगत व समाजाच्या उन्नती बरोबरच देशाचा विकास घडवून आणण्यासाठीही शिक्षणाची आवश्यकता असते. त्यांच्या मते अंधश्रद्धा व अज्ञानात बुडालेल्या लोकांना सुसंस्कृत म्हणता येत नाही. "It is no doubt essential to the progress of the nation as whole, that the education of the masses should go hand in hand with the education of the higher classes. In fact, no nation can be said to be civilized, where the mass of the people are sunk in deep ignorance and superstition."[६] एकूणच त्यांच्या विचारांवरून स्पष्ट लक्षात येते की, देशाची संपूर्णतः प्रगती होणे अपेक्षित असते. जो पर्यंत समाज अज्ञान व अंधश्रद्धा यांच्या जोखडात असतो तो पर्यंत त्या देशाची प्रगती होणे कदापि शक्य नसते. यासाठीच शिक्षणाची आवश्यकता असते असे रानडेंच्या एकंदर विचारांवरून दिसून येते.

## २) न्यायमूर्ती रानडे यांचे पाश्चात्य शिक्षण पद्धतीविषयक विचार

न्यायमूर्ती रानडेंच्या विचारातून पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा स्वीकार केला जावा असे स्पष्ट होते. त्यांच्या मते भारताला युरोपियन देशांच्या बरोबरीने येण्यासाठी पाश्चात्य

शिक्षणपद्धतीचा स्वीकार केल्याशिवाय गत्यंतर नाही. न्यायमूर्ती रानडे यांच्या दृष्टिकोनातून काही निश्चित कारणासाठी पाश्चात्य शिक्षण पद्धतीची आवश्यकता भारतीयांना होती. त्यांना त्यावेळची जी भारतीय शिक्षण पद्धती होती त्यात अनेक दोष जाणवत होते. तत्कालीन समाजात काही संस्कृत पाठशाळा, ब्रिटिशांनी चालविलेल्या शाळा व काही खासगी शाळा कार्यरत होत्या. समाजाची गरज म्हणून या शाळा आवश्यक असल्या तरीही समाज विकासाच्या दृष्टिकोनातून या शाळांमधून दिले जाणारे शिक्षण हे पूर्णतः संयुक्तिक होते असे त्यांना वाटत नव्हते. त्यांच्या मते तत्कालीन समाजात शिक्षणाची जी अनास्था होती त्याचे कारण समाजाचे अज्ञान होते हे जरी खरे असले तरीही समाजाच्या अडचणी सोडवण्याचे सामर्थ्य या शिक्षणात त्यांना वाटत नव्हते हे कारणही तेवढेच महत्त्वाचे होते. त्यांच्या मते "मानवास भूतकालापासून मिळालेला वारसा आणि त्याचें उज्ज्वल भवितव्य याविषयींची एकांगी, सांप्रदायिक अथवा संकुचित कल्पना करून देणारें कोणतेंहि शिक्षण प्रगतीला उपयुक्त होऊं शकत नाहीं. प्रत्येक राष्ट्राला मानवी जीवनामधील आपला भाग कोणता याची नीट कल्पना आल्यासच आपलें कर्तव्य अत्यंत कार्यक्षमतेनें करितां येईल."[७] त्यांच्या या विचारावरून लक्षात येते की, तत्कालीन भारतीय शिक्षण हे मुलांना एकांगी बनविणारे होते. त्याचबरोबर त्यांना सांप्रदायिकतेचे संकुचित विचार शिकविणारे होते.

त्याकाळच्या शाळांमधून धार्मिक शिक्षण अधिकाधिक प्रमाणात दिले जात होते. त्यांच्या मते अनेकदा धर्मबाह्य मुलांना शाळांमध्ये प्रवेश नाकारले जायचे. बहुजन समाजास शिक्षणापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले जायचे. ही गोष्ट न्यायमूर्ती रानडेंच्या सुधारक वृत्तीला नपटणारी होती. मुळात न्यायमूर्ती रानडे हे धार्मिक शिक्षणाच्या विरूद्ध होते असे नाही. त्यांच्या मते व्यक्तीस वैदिक तत्त्वज्ञानाचीही आवश्यकता होती. हे शिक्षण व्यक्तिगत पातळीवर महत्त्वाचे ठरू शकते. सामाजिक दृष्टिकोनातून विचार करता शिक्षण समाजाच्या गरजा व अडचणी दूर करणारे असणे आवश्यक असते. व्यक्तीमध्ये समाजाविषयी उदात्त दृष्टिकोन निर्माण करून मानवतावादी व समाजवादी विचार निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट

असले पाहिजे असे त्यांचे एकूणच मत होते. तत्कालीन शिक्षण पद्धती मात्र या बाबतीत कमकुवत त्यांना वाटत होती.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते शिक्षण हे ज्ञान व बुद्धिनिष्ठ असायला हवे. त्यात केवळ तात्पुरता आर्थिक फायदा एवढाच मर्यादित दृष्टिकोन असू नये. मुळात एखादी छोटी मोठी नोकरी मिळेल एवढीच शिक्षणाची मर्यादा असूच शकत नाही. परंतु त्याकाळी मात्र एवढाच दृष्टिकोन ठेवला जायचा किंबहुना आजचा काळही याला अपवाद नाही असेच म्हणावे लागेल. एकोणिसाव्या शतकाचा विचार करता पालकांना आपल्या मुलांना शाळेत का पाठवायचे याचे कारण माहित नव्हते. त्यांना आपली मुले कोणते विषय शिकतात याचीही माहिती नव्हती. ते आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देऊ शकत नव्हते. तत्कालीन शाळा या योग्य पद्धतीचे ज्ञान देण्यास असमर्थ होत्या असे न्यायमूर्ती रानडे यांना वाटत होते. या अनुषंगाने ते म्हणतात की, "हल्लीच्या आमच्या शाळा म्हणजे खरोखर शाळा नव्हेत, तर निरनिराळे काहीं विषय शिकविण्याचे वर्ग आहेत. घरच्या माणसांना मुलांच्या शिक्षणाकडे पहाण्याला वेळ नाही, म्हणून ती त्यास शाळेंत पाठवितात, तर त्यांची सर्व प्रकारे सुधारणा झाली पाहिजे."[८] एकूणच या त्यांच्या विचारावरून स्पष्ट लक्षात येते की, शाळेमध्ये जे विविध विषय शिकविले जातात त्यातून विद्यार्थ्यांची सुधारणा होत नसेल तर तो शिक्षण पद्धतीचा दोष मानला पाहिजे. थोडक्यात तत्कालीन शिक्षण पद्धतीत जे दोष होते ते नाहीसे करण्यासाठी त्यांनी पाश्चात्य शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येता.

न्यायमूर्ती रानडे यांनी नाशिकमध्ये बदली झाली तेंव्हा 'इंग्रजी भाषेतील विद्या' या विषयावर एक व्याख्यान दिलेले होते. या व्याख्यानातून त्यांनी पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाची आवश्यकता व त्याचे महत्त्व काय आहे या विषयी आपले विचार स्पष्ट केलेले होते. त्यांच्या मते युरोपियन विद्या किंवा पाश्चात्य विद्या ही त्या कालखंडासाठी अत्यावश्यक होती कारण याच विद्येच्या अधारे पाश्चिमात्य राष्ट्रांनी प्रचंड प्रगती केलेली होती. त्यामुळे या विद्येचा स्वीकार करणे आवश्यक होते. त्यांच्या मते मुळची जी भारतातील शिक्षण पद्धती होती ती अगदी भरभराटीच्या काळातही बाल्यावस्थेत होती, परंतु युरोपियन देशातील शिक्षण पद्धती

मात्र तत्कालीन काळात अतिशय भरभराटीस येऊन प्रगतावस्थेत दिसून येत होती. याच कारणाने युरोपियन देश प्रगती करू शकले होते. भारतीय शिक्षण पद्धतीत मात्र एवढी प्रगल्भता नव्हती असे त्यांचे मत होते. पाश्चिमात्य शिक्षण पद्धती संयुक्तिक कशी होती याचे कारणही त्यांनी सांगितले होते. त्यांच्या मते "विद्या शिकून आपण कोण, आपलें कर्तव्य काय, व आपणास या जगांत काय करावयाचें आहे वगैरे गोष्टी मनुष्यमात्रास अवश्य समजल्या पाहिजेत; त्या ज्या विद्येच्या कोटि ग्रंथापासून देखील समजत नाहींत ती विद्या कोठली? व तिचा काय उपयोग? मनुष्यास जी विद्या सदरील गोष्टींचें ज्ञान करून देते, तीच त्यास शिकणें आहे."[९] एकूणच त्यांच्या विचारांवरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे जे शिक्षण आपण घेतो त्या शिक्षणाने आपली ओळख निर्माण होतानाच आपल्या स्वतःतील शक्तींची जाणीव व्हावी. ही स्वत्त्वाची जाणीव होऊ शकत असेल तरच व्यक्ती आत्मनिर्भर बनू शकेल. याशिवाय आपले कर्तव्य काय आहे हे देखील शिक्षणाने समजायला हवे. यावरून त्यांनी पाश्चात्य शिक्षण पद्धतीशिवाय जुनी जी भारतातील प्रचलित वैदिककालीन शिक्षण पद्धती होती तिचाही पुरस्कार केलेला होता. त्यांच्या मते चारित्र्यवान बनविणाऱ्या शिक्षणाची तरूणांना आवश्यकता आहे. अशा शिक्षणामुळेच निकोप समाज निर्माण होऊ शकेल असा त्यांचा विश्वास होता. व्यक्तीने केवळ पुस्तके वाचून उपयोग होणार नाही. एखाद्या व्यक्तीने अनंत पुस्तकांचा अभ्यास केलेला असेल, परंतु त्या व्यक्तीस वरील गोष्टी आत्मसात नसतील तर या शिक्षणाचा कुठलाही उपयोग नाही. यासाठीच ते पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार करीत होते.

तत्कालीन परंपरावादी लोकांकडून या पाश्चात्य पद्धतीला विरोध होत होता. न्यायमूर्ती रानडे यांनी इंग्रजी विद्येचा पुरस्कार केला म्हणून त्यांच्यावर ब्रिटिश धार्जीणे म्हणून टीकाही होत होती. तथापि पाश्चात्य शिक्षणाचा स्वीकार करावा म्हणजे ब्रिटिशांनी भारतीयांना स्वातंत्र्य देऊ नये असा अर्थ त्यांना कदापीही अपेक्षित नव्हता. उलट या प्रतीच्या शिक्षणानेच भारतीयांना आपल्या हक्काची जाणीव होईल व ते ब्रिटिशांकडे स्वातंत्र्याची मागणी करतील असे मत त्यांचे होते. न्यायमूर्ती रानडेंच्या मते ब्रिटिश लोकांचे राज्य भारतात होते म्हणून इंग्रजी विद्येचे शिक्षण

आपण घेतले पाहिजे असे नाही तर मुळात भारतीयांनाच अशा शिक्षणाची गरज होती. ब्रिटिशांच्या राज्यामुळे हे पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण भारतीयांना सहज उपलब्ध होण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली होती. या अनुषंगाने न्यायमूर्ती रानडे म्हणतात की, "नोकरी मिळविण्याकरितां अथवा आपल्या राज्याशीं किंवा त्याच्या कामदाराशी उगीच 'शेकहॅन्ड' करण्याकरितां इंग्रजी शिकणें नसून, ह्या जगांत येऊन आपणांस काय करावयाचें आहे हें ज्यांस समजणें आहे त्यांस ही विद्या शिकणें अवश्य आहे व हा लाभाचा प्रसंग आपणांस फार चांगला व अनायासें प्राप्त झाला असून, चिनी किंवा जपानी लोकांपेक्षा फार सुलभतेनें प्राप्त होणारा आहे, हें प्रत्येकानें लक्षांत वागवून त्याची हयगय बिलकुल न करितां करवेल तितका ज्ञानाचा संग्रह करून जगांतील आपले हक्क ओळखावे, व सांप्रत विद्येनें जें आपल्या राष्ट्रावर आज हजारों वर्षे आभाळ कोसळलें आहे, तें दूर करून आपला पुरूषार्थ गाजवावा व राष्ट्रास तारूण्यदशा आणावी."[१०] म्हणजेच या प्रकारच्या विद्येमुळे आपल्याला स्वत्त्वाची जाणीव होऊ शकते. आशिया खंडातील जपान व चीन या देशांनी याच शिक्षण पद्धतीच्या जोरावर आपली प्रचंड प्रगती करून घेतली होती. विशेष म्हणजे त्यांच्यावर ब्रिटिशांचे राज्यही नव्हते तरीही त्यांनी या पद्धतीच्या शिक्षणाचा स्वीकार केलेला होता. भारताच्या बाबतीत विचार करता एक सकारात्मक बाजू ही होती की, ब्रिटिशांकडून भारतीयांना ही पद्धती स्वीकारणे सहज शक्य होणार होते. म्हणून सर्व भारतीयांनी ही विद्या संपादित करून भारत देशाची उन्नती साधावी असे अवाहन त्यांनी भारतीयांना केलेले होते. या सर्व विचारांवरून त्यांनी पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा स्वीकार केलेला होता असे दिसून येते.

या शिक्षण पद्धतीचा आणखी प्रचार आणि प्रसार व्हावा या दृष्टिकोनातून त्यांनी प्रार्थना समाजाच्या माध्यमातूनही प्रयत्न केलेले होते. प्रार्थना समाजाच्या उपासनेच्यावेळी स्थानिक मराठी भाषेतील संत वाङःमयांचे वाचन व्हायचे त्याचबरोबर काही पाश्चिमात्य ग्रंथातील उतारे वाचनासाठी निवडले जायचे. यावरून स्पष्ट लक्षात येते की, न्यायमूर्ती रानडे यांनी पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केला. तथापि आपल्या देशातील ज्या चांगल्या परंपरा होत्या त्यांना मात्र त्यांनी विरोध केलेला नव्हता.

## ३) न्यायमूर्ती रानडे यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

न्यायमूर्ती रानडे यांनी पाश्चात्य शिक्षण पद्धतीबरोबरच स्त्री शिक्षणाचाही पुरस्कार केलेला होता. तत्कालीन समाजात स्त्रियांना शिक्षणाची दारे बंद होती. स्त्रियांना शिक्षण मिळावे या दृष्टिकोनातून महात्मा जोतीराव फुले यांनी ज्या पद्धतींनी मुलींच्या शाळा स्वतः स्थापन केल्या होत्या त्याच पद्धतीने न्यायमूर्ती रानडे यांनीही पुण्यामध्ये स्त्रियांच्या शाळेच्या स्थापनेत स्वतः पुढाकार घेतलेला होता. न्यायमूर्ती रानडे यांच्या मते या कालखंडात स्त्री शिक्षणाच्या कार्यासाठी काही समाज सुधारकांनी पुढाकार घेतलेला होता. असे असले तरीही स्त्री शिक्षणाचा विकास जेवढया प्रमाणात व्हायला हवा होता तेवढया प्रमाणात झालेला नव्हता. स्त्रिया शिकल्या तर नकळत पुरूष प्रधान संस्कृतीवर घाला येईल असा एक गैरसमज त्याकाळी निर्माण झालेला होता. त्यामुळे सुधारकांच्या प्रयत्नांनाही फारसे यश येत नव्हते. रानडेंच्या पत्नी रमाबाई रानडे यांना न्यायमूर्ती रानडे यांनी स्वतः शिक्षण दिले. त्याच बरोबर त्यांना इंग्रजीही शिकविले असे असताना खुद्द रमाबाईंना त्यांच्याच घरातील स्त्री मंडळींडून प्रचंड विरोध सहन करावा लागलेला होता. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या पुस्तकात त्यांनी घरातील त्यांच्या सासूबाई व इतर स्त्रियांचा इंग्रजी शिक्षणाविषयी काय समज होता याविषयी लिहिले होते. त्या लिहितात की, "बायकांना शिकविले म्हणजे त्या उद्धट होतात, त्यांच्या डोळयात पाणी राहत नाही, ही गोष्ट खोटी आहे काय? शिकवावयाचेच तर व्यंकटेशस्तोत्र, शिवलीलामृत यांसारखे काही वाचता आले म्हणजे पुष्कळ झाले. पुरूषांसारखे इंग्रजी शिकून काय चाकरी करावयाची आहे? कोणतीही गोष्ट मर्यादेच्या बाहेर गेली म्हणजे तिचा परिणाम असाच व्हावयाचा. इंग्रजी शिकविले म्हणून असे झाले. आता तरी ते इंग्रजी सोडून द्या. आताच्या या मुली बोट दिले म्हणजे हात गिळावयास येतात. त्यांना बेताने वागविले नाही तर त्या आळयात राहावयाच्या नाहीत."[११] या उदाहरणावरून एकूणच स्त्रीने कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेऊ नये. जर घेतलेच तर ते केवळ देवी, देवतांच्या बावतीतच असावे. स्त्रीचे जीवन हे चूल आणि मूल एवढयापुरतेच मर्यादित असते त्यामुळे तिने बाहेर पडू

नये. पुरूषांच्या समोरही उभे राहू नये अशी एकूणच बंधने समाजात होती. ही सर्व बंधने नाहिशी होण्यासाठी न्यायमूर्ती रानडे यांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता.

तत्कालीन समाज स्त्री शिक्षणास विरोध का करतो याचीही कारणमिमांसा न्यायमूर्ती रानडे यांनी विचारात घेतली होती. समाजातील काही पुरूषांना स्त्रिया शिकल्या तर कदाचित त्यांच्यावर पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव पडेल व त्या पाश्चिमात्य स्त्रियांचे अनुकरण करू लागतील, त्याचबरोबर त्या स्वतंत्र वृत्तीने वागू लागतील असे वाटत होते. स्त्रियांना नियमित आपल्या धाकात, बंधनात व पारतंत्र्यात ठेवले पाहिजे अशी अलिखित मानसिकता त्या काळच्या पुरूषप्रधान समाजाची झालेली होती. अशा लोकांची नेमकी चूक कोणती होती हे न्यायमूर्ती रानडे यांनी सांगितलेले होते. "स्त्रियांना स्वतंत्रता देणें म्हणजे समुद्रापलीकडच्या परक्यांचें अनुकरण करणें नव्हे, परक्यांचें अनुकरण म्हणणाऱ्या लोकांना आपल्या पूर्वेतिहासाचें स्मरण असत नाहीं. जुन्या उज्ज्वल काळाचा खरा अभिमान त्यांना नाही."[१२] रानडेंच्या मते भारताचा प्राचीन काळ पाहिला तर त्या काळात स्त्रीला मानाचे स्थान होते. मात्र भारतीय लोक आपला पूर्वेतिहास चांगल्या प्रकारे अभ्यासत नव्हते. हा इतिहास जर भारतीयांना चांगला ठाऊक असता तर निश्चितच शिक्षणामुळे स्त्रियांच्या दर्जात होणाऱ्या बदलास हा समाज पाश्चात्यिकरण म्हटला नसता.

न्यायमूर्ती रानडे यांनी स्त्री शिक्षणाची आवश्यकता काय आहे याचाही विचार केलेला होता. तत्कालीन समाजात ज्या स्त्रियांसंबंधी अनिष्ट प्रथा होत्या त्या केवळ शिक्षणाच्याच माध्यमातून दूर होऊ शकणार होत्या. जोपर्यंत शोषिताला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊन आपल्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण होत नाही तोपर्यंत शोषण करणारा शोषितांचे शोषण करीत राहतो. एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांची अवस्थाही अशाच प्रकारची होती. तिच्यावर होणारे अन्याय थांबविण्यासाठी तिला आगोदर स्वतःच्या हक्कांची जाणीव होणे आवश्यक आहे व ती केवळ शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकते असा रानडे यांचा ठाम विश्वास होता. थोडक्यात स्त्रीचा समाजातील दर्जा उंचावण्यासाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता होती.

तत्कालीन समाजातील स्त्रीची बालविवाह, विधवांचे प्रश्न, केशवपन या समस्यांतून सुटका करण्यासाठीही स्त्री शिक्षणाची आवश्यकता होती. या अनुषंगाने बेहरामजी मलबारी यांनी संमती वयाच्या कायद्यासंबधी सरकारला दोन टिपणे सादर केली होती. आपल्या टिपणात त्यांनी विवाहित मुलांना विद्यापीठीय शिक्षणात प्रवेश देण्यात येऊ नये असा नियम करावा अशी एक सूचना केली होती. त्यांच्या मते यामुळे बालविवाह पद्धतीला आळा बसेल. त्याला न्यायमूर्ती रानडे यांनीही सहमती दर्शवून आपला पाठींबा व्यक्त केलेला होता. यासंबंधी त्यांनी सरकारला काही प्रमुख सुधारणाही सुचविलेल्या होत्या. "१) अमुक वयाच्या आत मुलामुलींची लग्ने होऊ नयेत. मुलाच्या लग्नाची वयोमर्यादा कमीतकमी १६ किंवा १८ व मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा १० किंवा १२ असावी. २) लग्नाच्या वेळी वधूवरांचे वय काय होते ते ठरविण्यासाठी कोणाला अधिकार असावे याचा खुलासा आहे. ३) विश्वविद्यापीठांनी अविवाहित राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाच उच्च प्रतीच्या पदव्यांचा मान दिला जाईल. असा नियम जाहीर करावा..."[१३] या मुद्यांमध्ये बालविवाह पद्धतीचा दोष घालविण्यासाठी एक महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे जे अविवाहित राहतील त्यांनाच उच्च शिक्षण व पदव्या मिळाव्यात असा नियम जाहीर करावा. यामुळे बालविवाह पद्धतीला अळा बसेल अशी खात्रीही त्यांची होती. नोकऱ्या मिळविण्यासाठी उच्च शिक्षण घेण्यास जे इच्छुक असतील ते अशा नियमामुळे बालविवाह करणार नाहीत.

न्यायमूर्ती रानडे यांनी केवळ स्त्रीशिक्षणाचा पुरस्कारच केलेला नव्हता तर प्रत्यक्ष स्त्री शिक्षणाच्या कामी स्वतः पुढाकारही घेतलेला होता. 'प्रार्थना समाज' व 'पुणे सार्वजनिक' सभा या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी स्त्रीशिक्षणाच्या कार्यास हातभार लावण्याचा प्रयत्न केलेला होता. स्त्रीशिक्षणासाठी सर्वप्रथम स्त्रियांमध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक होते. यासाठी त्यांनी रमाबाई रानडे यांना साक्षर करून त्यांच्या माध्यमातून शैक्षणिक जागृती करण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांमध्ये जागृती करण्यासाठी हळदी कुंकवासारखे कार्यक्रम आयोजित केले जावेत व स्त्रियांचे संघटन करून त्यांना शैक्षणिक महत्त्व समजून सांगावे असे विचार त्यांनी मांडले होते. या अनुषंगाने रमाबाईंनी आपल्या पुस्तकात लिहिले होते "रा.ब. देशमुख व स्वतः असे

दोघेही स्त्रीशिक्षणाचे अभिमानी असल्यामुळे, आपल्या बायकांनी हळदीकुंकवाच्या निमित्ताने का होईना, पण गावातील बायकांना वारंवार एके ठिकाणी जमवून सीता, सावित्री यांच्यासारख्या प्राचीन साध्वींची चरित्रे त्यांना वाचून दाखवावी व शिक्षणाकडे त्यांचे मन वळवावे; तसेच गावातील मुलींच्या शाळा पाहाव्यात, त्यांना उत्तेजन देण्याकरीता काही अल्पस्वल्प बक्षिसे द्यावीत, वगैरे गोष्टी आवडत असत व याबद्दल आमच्या मागे तगादा असे."[१४] अशा प्रकारे न्यायमूर्ती रानडेंनी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमांना स्त्री शिक्षणाच्या प्रचाराचे स्वरूप दिलेले होते. अशा कार्यक्रमात हुशार स्त्रियांचे चरित्रे सांगितल्यामुळे कार्यक्रमांतील स्त्रियातही तशी जिद्द निर्माण होऊन त्या शिक्षणाच्या कामी पुढे येतील असा विचार रानडेंचा यापाठीमागे होता.

न्यायमूर्ती रानडे यांनी पुणे येथे असताना शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांच्या सभा भरविण्यास सुरूवात केली होती. अशा स्त्रियांना व मुलींना अनुभवी व्यक्तींनी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्याचे ठरविण्यात आले होते. ही सभा दर शनिवारी फिमेल ट्रेनिंग स्कूलच्या दिवाणखान्यात संध्याकाळी भरत असे. यावरून स्पष्ट लक्षात येते की, त्यांनी अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून आपले शैक्षणिक विचार प्रसारित करण्याचा प्रयत्न केलेला होता.

न्यायमूर्ती रानडे यांनी पुणे येथे मुलींच्या हायस्कूलच्या स्थापनेतही पुढाकार घेतलेला होता. ब्रिटिश अधिकारी सर वेडरबर्न हे पुण्याला आलेले असताना त्यांनी १००० रूपये नवीन मुलींच्या शाळेच्या स्थापनेसाठी मदत देण्याचे कबूल केले म्हणून न्यायमूर्ती रानडे यांनी या बाबत एक सभा घेऊन सरकारकडे एका शिष्टमंडळाच्या माध्यमातून शाळा स्थापनेचा एक प्रस्ताव मांडला. यानुसार हुजुरपागा येथे मुलींची शाळा सुरू करण्यात आली. एकूणच विचार करता न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या स्त्री शिक्षणविषयक विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड दिलेली होती. ते केवळ शाळा सुरू करूनच थांबले असे नाही, तर रमाबाईंना त्यांनी याकामी प्रचंड प्रोत्साहन दिले. त्याचेच फलित म्हणजे रमाबाईंनी 'सेवासदन' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत स्त्रियांच्या उद्धाराची व शिक्षणाची चळवळ रमाबाईंनी समाजात कायम स्वरूपी सुरू ठेवली. त्यांच्या विचारात केवळ मुलींच्या शिक्षणाचाच विचार होता असे नाही तर स्त्रियांना परिचारिकांचे प्रशिक्षण देण्याचाही विचार त्यांनी केलेला होता.

## ४) ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर टीका

न्यायमूर्ती रानडे हे ब्रिटिश सत्तेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहत होते. त्यांच्या मते ब्रिटिशांनी भारतामध्ये पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार करून भारताचा विकास साधावा, तथापि ब्रिटिशांनी जे शैक्षणिक धोरण भारतात राबविले ते केवळ स्वार्थी दृष्टिकोनातून राबविले त्यामुळे न्यायमूर्ती रानडे यांनी ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर टीका केलेली होती. न्यायमूर्ती रानडे यांच्या मते ब्रिटिशांचे भारतीयांबाबतचे धोरण हे दुटप्पी होते. ब्रिटिश राज्यकर्ते असल्याने ते भारतीयांना राज्यकर्ते या नात्याने शिक्षण व इतर सोयी पुरविणे आपले कर्तव्य आहे असे सांगत होते. परंतु प्रत्यक्षात मात्र आपली जबाबदारी पद्धतशीरपणे टाळत होते. यासंदर्भात न्यायमूर्ती रानडे यांनी पुणे सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकात प्रकाशित केलेल्या एका लेखात आपले विचार मांडले होते. भारतात कायदामंत्री म्हणून आलेला व भारतीय शिक्षणात एक महत्त्वाची भूमिका बजावणारा ब्रिटिश अधिकारी लॉर्ड मेकॉले याच्या बाबतीत उल्लेख करतांना न्यायमूर्ती रानडे यांनी लिहिले होते की, "Lord Macaulay has in his essay on Warren Hastings satirized the action of the Court of Directors in England who, in their instruction to the Company's Servants in India, recommended them to govern the pople "leniently" but ordered them at the same time to 'send more money' to England."[१५] यावरून स्पष्ट होते की, एकीकडे लॉर्ड मेकॉले कंपनीच्या संचालकांवर टीका करून अधिक कठोर राजवट चालऊ नये असे मत मांडत होता त्याचवेळी संचालकांनी भारतातील अधिकाधिक पैसा इंग्लंडकडे पाठवावा अशीही आज्ञा देत होता. यावरून ब्रिटिशांचे धोरण किती दुटप्पी होते ते लक्षात येण्यासारखे आहे. मुळात ब्रिटिश लोक हे केवळ स्वार्थी दृष्टिकोनातून राज्यकारभार करत होते.

ब्रिटिशांनी सर्वप्रथम इ.सन १८१३च्या चार्टर ॲक्टनुसार भारतीय शिक्षणासाठी अनुदान मंजूर केलेले होते. त्यानंतर इ.सन १८३३ व इ.सन १८५३ च्या चार्टर ॲक्टमध्ये अनुदानाची रक्कम बऱ्याच प्रमाणात वाढविण्यात आलेली होती. परंतु इ.सन १८५८ मध्ये कंपनी सरकारच्या बरखास्तीनंतर ब्रिटिश पार्लमेंटने भारतीय शिक्षणाच्या अनुदानात विशेष वाढ केली

नव्हती. विशेष म्हणजे ब्रिटिशांना गोळा होणाऱ्या करात दुपटीने वाढ करण्यात आलेली होती. न्यायमूर्ती रानडे यांना असे वाटत होते की, ब्रिटिशांकडून जेवढया प्रमाणात कर भारतातून गोळा केला जात होता तेवढया रकमेच्या प्रमाणात तरी भारतीय शिक्षणावर खर्च करायला हवा होता. लोक जे वेगवेगळया प्रकारचे कर सरकारकडे भरतात त्या कराचा अधिकाधिक वापर हा जनतेच्या कल्याणासाठी आणि विशेषत्त्वाने शिक्षणावर करायला हवा असे न्यायमूर्ती रानडे यांच्या विचारातून दिसून येते. त्यांच्या मते ब्रिटिश सरकार केवळ आपली सत्ता भारतात बळकट करण्यावर भर देत होते. भारतीय शिक्षणाचे त्यांना घेणे देणे नव्हते. या अनुषंगाने ते लिहितात की, "A Government which can afford to spend 20 crores on a useless frontier war, and deems it just to maintain a garrison at the cost of half the net revenue, and has to remit for Home Charges the other half, cannot fairly plead its inability to supplement the existing grant for education so as to raise it to its old proportion under the Company's rule."[१६] ब्रिटिशांचे स्वार्थी धोरण कसे होते याविषयी त्यांनी विवेचन केलेले होते. त्यांच्या मते ब्रिटिश सरकार युद्धावर प्रचंड प्रमाणात व्यर्थ खर्च करायला तयार असायचे परंतु शिक्षणासारख्या बाबीसंबंधी मात्र ते आपली असमर्थता दाखवायचे. हा खूप मोठा दोष ब्रिटिश प्रशासनाचा रानडे यांना वाटत होता.

न्यायमूर्ती रानडे यांनी केवळ ब्रिटिशांचे शिक्षणासंबंधी आर्थिक नियोजन योग्य नव्हते याविषयीच विचार मांडले होते असे नाहीतर पूर्ण भारतात शिक्षणावरील प्रशासकीय खर्च किती केला जात होता व प्रत्यक्षात तो किती कमी होता याचेही आकडेवारीसहीत विवेचन आपल्या लेखात केलेले होते. त्यांनी लिहिले होते की, "The funds, private and public, devoted to the actual work of instruction in the ten administrative divisions of British India, may be roughly stated to be one and a quarter crore of rupees. Of this sum, about 11 lacks are spent on University education i.e. the Arts Colleges, European and Oriental; 40 lacks are spent on high and middle class schools; and 73 lacks are spent on Primary education. These figures only represent the actual cost of instruction in the Institutions directly managed by Government or aided by its funds. The charges for direction and inspection, as also the cost of technical schools, and miscellaneous expenditure, do not enter into this total. The charges of management and inspection also vary from 10

to 15 per cent in the different provinces. The total sum disbursed for educational purpose thus exceeds a crore and half of rupees."[१७] त्यांच्या मते ब्रिटिशांनी भारतीय शिक्षणावर सवा कोटी रूपये खर्च करण्याची तरतूद केलेली होती. तथापि ही रक्कम भारतीयांच्या शिक्षणास पुरेशी नव्हती. ही सवा कोटी रक्कम प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणावरच खर्च होत होती. इतर खर्चासाठी विशेषतः तंत्र शिक्षणाच्या शाळेसाठी निधी, संस्थांच्या तपासणीचा खर्च व इतर बाबींबर होणारा खर्च अशी मिळून ही रक्कम दीड कोटी पर्यंत जात होती परंतु या अतिरिक्त खर्चाची कोणतीही तरतूद ब्रिटिशांनी केलेली नव्हती. यामुळे न्यायमूर्ती रानडे ब्रिटिशांच्या शिक्षण धोरणावर टीका करीत होते.

रानडेंनी ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा आणखी एक महत्त्वाचा दोष सांगितला होता तो म्हणजे ब्रिटिशांनी सुरू केलेले शिक्षण हे शहरापुरतेच सिमीत झालेले होते. ब्रिटिश प्रशासनाच्या प्रभावाने आर्थिक, राजकीय व शैक्षणिक बदल प्रकर्षाने जानवत होते तथापि ते शहरातच दिसत होते. भारतातील बहुसंख्य जनता ही खेडयात राहत होती. त्यामुळे हा बदल खेडयातही होणे अगत्याचे होते. यासाठी खेडयातील जनतेपर्यंत ब्रिटिशांनी शिक्षण न्यायला हवे होते असे न्यायमूर्ती रानडे यांना वाटत होते. एकूणच ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण हे श्रीमंत व उच्चभ्रू लोकांपुरतेच मर्यादित झालेले होते. खेडयातील गरीब लोकांची अवस्था प्रचंड हालाखीची होती. पुणे येथे झालेल्या 'इंडस्ट्रियल कॉन्फरन्स'मध्ये रानडेंनी जे भाषण केले होते त्यात त्यांनी भारतीयांची हालाखीची परिस्थिती वर्णन केलेली होती. "The existence of this poverty needs no demonstration. We need only walk through our streets and study the most superficial aspects of our economic situation, and the fact forces itself upon us that we are a people of little resources. Many millions among us scarcely earn a couple of annas a day, many millions more are always underfed and live on the borderland of famine and slow death, into which the failure of a single monsoon precipitates them. Of course, this condition of things is not of yesterday and is not the result solely of foreign conquest and competition. It is an old, a very old inheritance. If we feel it more keenly now, we feel it because we are being roused form the sleep of Ages, and our eyes have learnt to see, and our ears have learnt to hear."[१८] यावरून

खेडयातील जनतेची किती दरिद्री अवस्था होती हे स्पष्ट लक्षात येते. लाखो लोकांना दैनंदिन चरितार्थाचा प्रश्न होता तर कित्येक लोक दुष्काळ व रोगराई यांचे भक्ष्य होत होते. अशा परिस्थितीत या लोकांना स्वतःच्या शिक्षणासाठी काही करता येणे शक्य नव्हते. त्यामुळे रानडे यांच्या मते ब्रिटिशांनीच या वर्गाच्या शिक्षणासाठी अधिक आर्थिक तरतूद करायला हवी होती.

ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शिक्षणाला काही मर्यादा होत्या असे रानडेंनी सांगितले होते. त्यांच्या मते हे शिक्षण भारतीयांना स्वावलंबी बणविणारे नव्हते. शिक्षणातून नोकऱ्या मिळाल्या नाही तरी किमान चरितार्थाचा प्रश्न मिटेल अशी काहीतरी तरतूद होणे अपेक्षित असते. त्याकाळात जे लोक शिक्षण पूर्ण करीत होते त्यातील सर्वांनाच नोकऱ्या मिळत होत्या असे नव्हते. कित्येकांची अशी अवस्था झालेली होती की काहीतरी नोकरी मिळविण्याच्या अपेक्षेने शिक्षण घेतलेले असायचे व नोकरी मात्र मिळत नसायची अशा परिस्थितीत कुठेतरी अतिकष्टाचे काम करण्याशिवाय पर्याय त्यांच्या समोर नसायचा. एकूणच जे शिक्षण विद्यार्थ्यांना भविष्याविषयी आत्मनिर्भर बनवू शकत नाही ते खरे शिक्षण म्हणता येणार नाही.

एकोणिसाव्या शतकात काही मिशनरी शाळाही कार्यरत होत्या. रानडेंना मात्र शिक्षण हे सर्वार्थाने मिशनरी शाळांकडेच असावे असे वाटत नव्हते. त्यांच्या मते धार्मिकता मिशनरी शाळांमधील महत्त्वाचा अडसर ठरते. तत्कालीन ब्रिटिश व्हॉईसरॉय लॉर्ड रिपन यांनी मिशनरी शाळांना विशेष महत्त्व दिलेले होते. लॉर्ड रिपनच्या मते केवळ निधर्मी पद्धतीने दिले जाणारे शिक्षण समाजासाठी चांगले ठरू शकत नाही. म्हणजेच अप्रत्यक्षरित्या मिशनऱ्यांच्या शिक्षणाच्या माध्यमातून चालणाऱ्या धार्मिक प्रचाराला रिपन यांनी प्रोत्साहनच दिलेले होते. ही बाब न्यायमूर्ती रानडेंना योग्य वाटणारी नव्हती. त्यांच्या मते ब्रिटिश सरकारने सार्वजनिक शिक्षणाचा पुरस्कार करून केवळ शैक्षणिक बाबींवरच लक्ष केंद्रित करायला हवे होते. एकूणच अशा विविध बाबतीत ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणांवर न्यायमूर्ती रानडे यांनी टीका केल्याचे दिसून येते.

## ५) न्यायमूर्ती रानडे यांचे प्राथमिक शिक्षणविषयक विचार

इ.सन १८८२ मध्ये भारतीय शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिशांनी 'शिक्षण आयोगाची' स्थापना केलेली होती. या आयोगाला शिक्षण संबंधाने अनेक निवेदने भारतातील व महाराष्ट्रातील व्यक्तींनी पाठविलेली होती. न्यायमूर्ती रानडे यांनी या आयोगाला स्वतंत्र असे निवेदन पाठविलेले नसले तरीही त्यांनी 'पुणे सार्वजनिक सभे'च्या त्रैमासिकात शिक्षणविषयक काही लेख प्रकाशित केलेले होते. या लेखांमधून त्यांनी ब्रिटिशांच्या शिक्षण विषयक धोरणांचा उहापोह करून त्यात काय सुधारणा व्हायला हव्या यासंबंधी आपले विचार स्पष्ट केलेले होते. या लेखांच्या माध्यमातून त्यांनी आपले प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण विषयक विचार स्पष्ट केलेले होते.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते ब्रिटिशांनी भारतीयांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिलेले नव्हते. प्राथमिक शिक्षण ही वास्तविक सरकारची सर्वात महत्त्वाची जबाबदारी असते. प्राथमिक शिक्षण हे साक्षरतेसाठी अत्यावश्यक असून ते सर्वांना मिळण्याच्या दृष्टिकोनातून तेवढया प्रमाणात शाळा स्थापन करणे व त्या शाळा चांगल्या पद्धतीने चालविण्यासाठी खर्च करणे हे सरकारचे कर्तव्य असते. रानडे यांच्या मते ब्रिटिशांनी मात्र भारतीय शिक्षणाच्या विकासासाठी पुरेशा प्रमाणात खर्च केलेला नव्हता. ब्रिटिशांच्या शिक्षण खात्यावरील एकूण खर्चाच्या केवळ ३० टक्के खर्च केवळ प्रांतीय करातून शासकीय अनुदान म्हणून येत होता आणि उर्वरीत ७० टक्के खर्च स्थानिक कर व खासगी स्वयंसहाय्यता निधीमधून केला जात होता. न्यायमूर्ती रानडे यांच्या दृष्टिकोनातून ब्रिटिशांनी अवलंबिलेले हे शिक्षणासंबंधीचे आर्थिक धोरण दोषपूर्ण होते. वास्तविक ब्रिटिश सरकारने स्वतः शिक्षणाची अधिक जबाबदारी उचलून प्रांतिक शासकीय अनुदान जास्त प्रमाणात द्यायला हवे होते. असे केल्यामुळे प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाचा विकास होईल अशी शाश्वती त्यांना वाटत होती. परंतु ब्रिटिशांनी मात्र शासकीय अनुदानात वाढ केलेली नव्हती.

न्यायमूर्ती रानडे यांनी तत्कालीन महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेतलेला होता. त्यांच्या मते मराठी सत्तेच्या ऱ्हासानंतर जवळपास २० वर्षे महाराष्ट्रात शिक्षणाच्या बाबतीत परिवर्तन झाले नव्हते. इ.सन १८४० मध्ये ब्रिटिशांनी महाराष्ट्रात बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना केली होती. तेंव्हापासून खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात शिक्षण सुरू झाले होते. परंतु ते पुरेशा प्रमाणात नव्हते. प्राथमिक शिक्षणाचा विचार करता ब्रिटिशांमार्फत सुरू झालेल्या व मुळच्या राष्ट्रीय प्राथमिक शाळा या इ.सन १८४० साली ९२ होत्या. इ.सन १८५४ मध्ये सर चार्ल्स वुडने भारतीय शिक्षणासंबधी एक कायदा पास केला होता. त्याला भारतीय शिक्षणाची सनद असे म्हणतात. या कायद्याच्या अंमलबजावणीनुसार प्राथमिक शाळांची संख्या ३३२ झालेली होती व विद्यार्थी संख्या २३,००० एवढी वाढलेली होती. न्यायमूर्ती रानडे यांनी इ.सन १८५५-५६ पासून १८८०-८१ पर्यंत शाळांच्या संख्येत व विद्यार्थी संख्येत जशी वाढ झाली तशी अनुदानाच्या बाबतीत मात्र ब्रिटिशांनी वाढ केलेली नव्हती. याविषयी त्यांनी आपले विचार मांडलेले होते. या अनुषंगाने रानडेंनी लिहिले होते की, "In the number of Primary schools and scholars the increase has been tenfold, i.e. from 332 schools to 4225, and from 23,000 scholars to 253,842 scholars. …. In regard to primary schools, the Provincial Funds contribute a little over 2½ lacks, out of a total expenditure of about 11 lacks, and this Provincial contribution and total expenditure show an yearly increse."[१९] या उदाहरणावरून लक्षात येते की, शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढली. त्याचबरोबर प्राथमिक शिक्षणावरील खर्च ब्रिटिशांनी ११ लाखांपर्यंत वाढविला. तथापि या एकूण खर्चापैकी केवळ आडिच लाख रूपये शासकीय अनुदानातून खर्च केले जायचे व उर्वरीत मात्र दक्षिणा फंड, इतर फी, देणगी व नगरपालिका स्थानिक करातून खर्च केली जायची. शासकीय अनुदान प्राथमिक शिक्षणासाठी वाढविले जाणे आवश्यक होते असे रानडेंना वाटत होते.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत प्राथमिक शाळांची संख्या वाढणेही गरजेचे होते. हे कार्य केवळ एकटया सरकारला पेलवणारे नव्हते यासाठी सरकारने खासगी किंवा स्थानिक शाळांना प्रोत्साहन देऊन त्यांना अधिकाधिक अनुदान देणे आवश्यक

वाटत होते. तथापि मुंबई प्रांताच्या बाबतीत ब्रिटिशांनी अशा धोरणाचा मोठया प्रमाणात पुरस्कार केलेला नव्हता. त्यामुळे निश्चितच इतर प्रांताच्या तुलनेने महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाचा विकास होऊ शकलेला नव्हता. त्यांनी महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षण विकासाची आकडेवारी सांगताना इ.सन १८४१ व १८७१ या वर्षाची तुलना केलेली होती. इ.सन १८४१ मध्ये सरकारी प्राथमिक शाळेत ६७८७ विद्यार्थी शिक्षण घेत होते तर स्थानिक भारतीय शाळेत २९६२८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. तथापि इ.सन १८७१ च्या अहवालानुसार मात्र या आकडेवारीत प्रचंड तफावत झालेली होती. या वर्षी सरकारी शाळेत ९९,४७० विद्यार्थी शिक्षण घेत होते तर स्थानिक भारतीय शाळेत २३२३३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. या आकडेवारीवरून स्पष्ट लक्षात येते की भारतीय शाळांतील विद्यार्थी संख्या प्रचंड प्रमाणात कमी झालेली होती. "40 years ago, there were more than four times as many pupils receiving instruction in indigenous schools as in government schools, and that after 30 years' Departmental work the Government schools contain nearly 4½ times more pupils than those in indigenous schools"[२०] त्यांच्या दृष्टिकोनातून भारतीय शाळांनाही प्रोत्साहन मिळणे गरजेचे होते. तेवढया प्रमाणात ब्रिटिशांनी ते दिले नव्हते व याचा तोटा मुंबई प्रांतास झालेला होता. विशेषत्त्वाने विद्यार्थ्यांच्या आकडेवारीत वाढ जरी दिसत होती तरी ती बंगाल व मद्रास प्रांताच्या तुलनेत नव्हती. न्यायमूर्ती रानडेंच्या मते महाराष्ट्रात ७५ टक्के विद्यार्थी संख्येत वाढ झाली. त्याच वेळी बंगाल प्रांतात ६०० टक्के व मद्रास प्रांतात १६०० टक्के वाढ झालेली होती. यावरून महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यास ब्रिटिश सरकारला अपयश आलेले होते हे स्पष्ट होते. महाराष्ट्रातील शिक्षण खात्यात असलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या संशयी वृत्तीमुळे महाराष्ट्रातील शाळांचा विकास होऊ शकलेला नव्हता.

न्यायमूर्ती रानडेंच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रामध्ये शिक्षण देणाऱ्या जेवढया प्राथमिक शाळा होत्या तेवढया शाळा पुरेशा नव्हत्या. मुळात ब्रिटिशांनी जो शैक्षणिक विकास केला असे सांगत होते त्या शाळा केवळ शहरात विकसित झालेल्या होत्या. ग्रामीण भागात शिक्षणाचे

विस्तारीकरण झालेले नव्हते. न्यायमूर्ती रानडे यांनी महाराष्ट्रातील जिल्ह्यात असणाऱ्या एकूण खेडयांची संख्या व त्या पूर्ण जिल्ह्यातील खेडयात असलेल्या एकूण शाळांची सरासरी आकडेवारी काढलेली होती. त्यांच्या मते महाराष्ट्रातील एका जिल्ह्यात सरासरी ११०० खेडी होती व सरासरी प्राथमिक शाळा या १३० होत्या. यावरून खेडी व शाळांचे प्रमाण ९:१ दिसून येते. नऊ खेडयांसाठी केवळ एकच शाळा स्थापन करण्यात आलेली होती. या काळाची तुलना आजच्या कालखंडाशी केली तर प्राथमिक शिक्षणातील त्यावेळी असलेली प्रचंड विषमता दिसून येते. आज केवळ खेडयासाठीच नाही तर खेडयाबरोबरच वस्तीसाठी प्राथमिक शाळांची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यावेळी मात्र ९ खेडयांच्या दरम्यान केवळ १ शाळा होती. निश्चितच ही एक शाळा पुरेशी नव्हती. अशा या अपुऱ्या शिक्षणाच्या सोईमुळे शालेय वयोगटातील अनेक मुले शिक्षणापासून वंचित राहत होते. त्यावेळच्या अनेक समाजसुधारकांनी सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार करून १२ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असे विचार मांडले परंतु रानडे यांच्या मते ब्रिटिशांनी सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले तरी एकूण जेवढया शाळा उपलब्ध होत्या तेवढया शाळांची संख्या सक्तीच्या शिक्षणासाठी पुरेशी नव्हती.

न्यायमूर्ती रानडेंनी ब्रिटिशांचे प्राथमिक शिक्षण विषयक धोरण कसे चुकीचे होते हे स्पष्ट करण्यासाठी इ.सन १८७२ च्या जनगणनेचा रिपोर्ट सादर केला होता. त्यात त्यांनी लिहिले होते की, "From the census returns for 1872, we find that, out of a total of 26,652 towns and villages in this Presidency, about 9,813 villages have a population of less than 200 inhabitants, about 8,913 villages have a population between 200 and 500 souls, and about 4,774 villages have a population between 500 and 1,000 souls, so that out of 26,652, 23500 villages or nearly 85 percent have less than 1,000 inhabitants. The remaining 3,000 with a population exceeding 1,000 souls are under the present system provided with schools."[२१] या उदाहरणावरून न्यायमूर्ती रानडे यांचा शिक्षणाविषयी किती सखोल अभ्यास होता हे लक्षात येते. इ.सन १८७२ सालच्या अहवालानुसार शहरे व गावे मिळून २६,६५२ एवढे होते. ब्रिटिशांच्या शाळा या १००० च्या वर

लोकसंख्या असणाऱ्या गावातच होत्या. या अहवालानुसार १००० च्या वर लोकसंख्या असलेली खेडी व गावे केवळ ३१५० एवढीच होती. म्हणजेच सुमारे ३००० होती. तेवढयासाठीच केवळ ब्रिटिशांचे प्राथमिक शिक्षण मर्यादित झालेले होते. उर्वरित २३५०० खेडयांकरिता ब्रिटिशांनी शिक्षणासाठी कोणतीही सोय केलेली नव्हती असे रानडे सांगत होते. त्यांच्या मते शिक्षणाच्या सोयी या लोकसंख्येच्या प्रमाणात दिल्या जाणे आवश्यक होते. त्याचबरोबर ते समाजातील सर्व थरापर्यंत जाणेही आवश्यक होते. त्यांच्या या विचारातून एक गोष्ट स्पष्ट होते की, १००० लोकसंख्येपेक्षा कमी असणाऱ्या लोकसंख्येच्या गावांकरिता प्राथमिक शाळांचा विस्तार होणे आवश्यक होते. किमान २०० ते १००० लोकसंख्येच्या गावात किमान १४००० शाळा वाढविल्या जाणे त्यांना गरजेचे वाटत होते. तेव्हांच सक्तीचे सार्वत्रिक शिक्षण यशस्वी राबविता येणे शक्य होणार होते. या अनुषंगाने ते म्हणतात की, “Villages with population ranging 200 to 1,000, number about 14000, and it is to this class of villages that the work of extending primary education must at present be confined. In other words we have to provide for about 14,000 maore schools in this Presidency.”[२२] म्हणजेच न्यायमूर्ती रानडे यांनी २०० ते १००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या सुमारे चौदा हजार खेडयांचा विचार केलेला होता. याशिवाय त्यांनी २००च्या आत लोकसंख्या असलेल्या खेडयांचाही विचार केलेला होता. त्यांच्या मते २०० च्या आत लोकसंख्या असणाऱ्या खेडयात शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूप कमी असते. केवळ पंधरापर्यंत मुले शाळेत जाणारे भरतात त्यामुळे तेवढया मुलांसाठी स्थानिक पातळीवर खासगी शिक्षणाच्या सोयी वाढविण्याचा प्रयत्न करावा म्हणजे तेही या शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत. यावरून रानडे यांची सर्व थरातील घटकांना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठीची तळमळ दिसून येते.

## अतिरिक्त प्राथमिक शाळांबाबतची उपाय योजना

न्यायमूर्ती रानडे यांनी १४००० शाळा ब्रिटिशांनी सुरू कराव्यात एवढाच विचार मांडलेला नव्हता, तर सरकार एवढया शाळा कसे सुरू करू शकते? व त्या शाळांचे व्यवस्थापन कसे चालविता येईल? याबाबत जी उपाय योजना करावी याचाही उल्लेख केलेला होता.

एकत्रित चौदाहजार शाळा सरकारला एकाच वेळी सुरू करणे शक्य नसल्यामुळे ब्रिटिश सरकारने खासगी शाळांना प्रोत्साहन द्यावे असा विचार रानडेंनी मांडलेला होता. त्यांच्या मते ही पद्धत बंगाल प्रांतात यशस्वी झालेली होती. सरकारने केवळ चार लाख रूपयांचे अनुदान दिले तरी २००च्या वर लोकसंख्या असलेल्या खेडयासाठी आवश्यक एवढया शाळा सुरू करण्यास ते अनुदान पुरेसे होईल असे त्यांचे मत होते. "By the experience of Bengal, we feel confident that with an expenditure of four lacks of rupees, every village, with a population exceeding 200 soul, can be provided with a school."[२३] राष्ट्रीय शाळेतील नियमित येणाऱ्या विद्यार्थ्यांनाही सरकारने अनुदान मंजूर करावे म्हणजे शाळेतील उपस्थिती वाढेल. या विचारातून न्यायमूर्ती रानडेंची शिक्षणाविषयीची दूरदृष्टी दिसून येते.

या खासगी शाळा कोणी सुरू कराव्यात असाही एक प्रश्न होता कारण शाळा सुरू करणारी व्यक्ती शिक्षण क्षेत्राशी संबंधित असावी. अशी व्यक्ती शाळांचे व्यवस्थापन चांगले पाहू शकेल असा विश्वास न्यायमूर्ती रानडे यांचा होता. त्यांच्या मते जे राष्ट्रीय शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षक आहेत त्यांनी किंवा ज्या शिक्षकांना नवीन शाळा सुरू करण्याचा परवाना आहे त्यांनी या शाळा सुरू कराव्यात. वास्तविक आजच्या काळाप्रमाणेच त्याकाळीही कित्येक शिक्षक व्यवसायाशिवाय होते. त्यांचा उपयोग या शाळा सुरू करण्याकामी होऊ शकतो असे रानडेंचे मत होते. "Hundereds of trainded and certificated young men who now conmplain of a want of occupation will volunteer to devote themselves to the work of instruction on these terms."[२४] रानडेंच्या मते अशा शिक्षकांनी स्वतः स्वयंसेवक बनून शिक्षणाच्या कामी पुढे येणे अगत्याचे होते. असे केल्याने त्यांना व्यवसाय उपलब्ध होऊन शाळांचाही प्रश्न मिटेल असा विश्वास रानडेंना होता.

या पद्धतीने सुरू होणाऱ्या नव्या शाळांना सरकारने शहरी शाळांमधील सर्व नियम लागू करू नयेत असाही उपाय त्यांनी सुचविला होता. या शाळा खेडयातील असणार होत्या त्यामुळे त्यांचा विकास होण्यासाठी नियम थोडे शिथिल असावेत असे त्यांचे मत होते. त्याकाळी शहरी भागात परीक्षा घेण्यासाठी स्वतंत्र परीक्षकाची नियुक्ती केली जात होती. बहुधा ही परीक्षा

उपशिक्षणाधिकारी घेत असत. शहरातील परीक्षा पद्धती खेडयातील मुलांसाठी उपयुक्त ठरणारी नव्हती. अशा पद्धतीतून खेडयातील मुलांच्या मनात परीक्षेविषयी आणखी भीती निर्माण होण्याची शक्यता असते असे त्यांना वाटत होते. त्यामुळे रानडेंच्या मते शहरी शाळांप्रमाणे तपासणी व परीक्षा घेतल्या जाऊ नयेत. या बाबतीत रानडे यांनी आपल्या लेखात लिहिले होते की, “The time spent by the Deputy Inspectors in attaining an impossible accuracy in the fixing of marks for each subject, in the case of each individual boy examinded, is needlessly wasted.”[२५] म्हणजेच या परीक्षा उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या माध्यमातून घेतल्या तर त्यामुळे त्या खूप क्लिष्ट बनतील. म्हणून प्रचलित पद्धतीपेक्षा खेडयातील परीक्षा थोडयाशा वेगळया पद्धतीने होणे रानडेंना योग्य वाटत होते.

### आर्थिक समस्येवरील उपाय

न्यायमूर्ती रानडे यांनी प्राथमिक शिक्षणाचा विस्तार व्हावा असे विचार मांडताना चौदाहजार शाळा महाराष्ट्रातील खेडयांसाठी वाढवाव्यात असे सुचविले त्याचबरोबर त्या वाढविताना कोणत्या उपाययोजना कराव्यात याविषयीही चर्चा केलेली होती. वर जे उपाय रानडेंनी सुचविले होते त्यातील सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे जरी या शाळा खासगी किंवा राष्ट्रीय शाळांच्या विस्तारीकरणातून सुरू केल्या तरी या शाळांच्या अनुदानासाठी फंडाची रक्कम कशी उपलब्ध करावी ही मोठी समस्या होती. मुळात ब्रिटिशांनी जे शिक्षण भारतीयांसाठी सुरू केले होते ते केवळ त्यांच्या फायद्यासाठीच होते. शहरातील शिक्षणव्यवस्थेतून त्यांना हवा असणारा कारकुनांचा वर्ग मिळत होता त्यामुळे त्यांना खेडयातील शिक्षणात फारसे सारस्य नव्हते. एवढेच नाही तर ब्रिटिशांचे भारतातील धोरण हे आर्थिक लुटीचे होते त्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनातून भारतीय शिक्षणावरील खर्च हा अनावश्यक खर्च होता. एकूणच जो चार लाखांचा निधी आवश्यक होता तो ब्रिटिश सरकारकडून अनुदान स्वरूपात सहजासहजी उपलब्ध होणार नाही याची शाश्वती रानडेंना होती. या संबंधी त्यांनी काही उपाययोजना सांगितली होती. न्यायमूर्ती रानडेंनी जे शाळेच्या आर्थिक नियोजना संबंधी विचार मांडले होते त्यावरून ते एक शिक्षणतज्ज्ञ व अर्थतज्ज्ञ होते असे स्पष्ट होते.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते त्याकाळी जनतेवरील स्थानिक करापैकी एक आण्याच्या एक तृतीयांश भाग एवढी रक्कम शैक्षणिक कर म्हणून घेतली जायची. हा कर अर्ध्या अण्यापर्यंत वाढविला तर बरीच मोठी रक्कम उपलब्ध होऊ शकणार होती. या अनुषंगाने न्यायमूर्ती रानडे म्हणतात की, "The most eligible that occurs to us is the allotment of $^1/_2$ in place of the $^1/_3$ of the one ana local cees now made over to Educational Department for Primary School. The proceeds of the $^1/_3$ share amount to about $7^1/_2$ lacks, and if the payment was increased to 50 percent of the local cess, the yield would be 11 lacks, or nearly $3^1/_2$ lacks more than present amount."[२६] त्यांनी मांडलेल्या आकडेवारीनुसार एक अण्याच्या $^१/_३$ एवढा कर घेतला तर ७.५ लाख एवढी रक्कम करापोटी गोळा होत होती. हा कर अर्धा अणा केला तर ही रक्कम ११ लाखांपर्यंत वाढणार होती म्हणजेच ३.५ लाख रूपये अधिक जमा होणार होते. ही अतिरिक्त रक्कम शाळा खर्चासाठी वापरली जावी असे त्यांचे मत होते.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते शहरी भागातील शाळा व खेडयातील शाळा यांची विभागणी लोकसंख्येचा विचार करता विषम प्रमाणात झालेली होती. त्यामुळे शिक्षण मंडळाकडून खेडयापेक्षा शहरी भागाला अधिक अनुदान मिळत होते. "At present it cannot be denied that the town populations derive a larger advantage from the expenditure of the Educational Department than the rural villages; 179 towns with a population of 28 lacks have at present 756 schools attended by 81,000 scholars, while 26,473 villages, with a population of 135 lacks, have 2970 school attended by 145,000 scholars."[२७] मोठाली गावे व शहरांची संख्या १७९ होती. या गावातील विद्यार्थ्यांसाठी ७५६ शाळा होत्या तर खेडयांची संख्या २६,४७३ एवढी होती या खेडयांसाठी केवळ २९७० शाळा होत्या म्हणजेच खेडयातील बहुसंख्य लोकांसाठी कमी शाळा होत्या. या आकडेवारीवरून मोठया गावातील शाळांवर अधिक खर्च होत होता. यातील खर्च प्रमाणित करून खेडयातील शाळांकडे पाठविला जावा असाही विचार न्यायमूर्ती रानडे यांनी मांडला होता. नगरपालिका हद्दीतील

स्थानिक करातील शैक्षणिक कर थोडा वाढविला तरीही अतिरीक्त रक्कम खेडयातील शाळांवर जमा करता येऊ शकेल असे त्यांना वाटत होते.

न्यायमूर्ती रानडे यांनी सूचित केलेल्या या दोन्हींही उपायांसाठी ब्रिटिश सरकार तयार होणार नव्हते याची खात्री न्यायमूर्ती रानडे यांना होती. यासाठी त्यांनी खेडयातील शाळांसाठी निधी गोळा करण्याचे काही इतर उपायही सुचविले होते.

त्यांच्या मते दरवर्षी शासनाच्या शाळा खात्याकडे शिल्लक निधी तसाच पडून राहतो. ही रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी. याशिवाय शाळा खात्याच्या आर्थिक ताळेबंदातील बचतीतून जी रक्कम शिल्लक राहील तिचीही सुरक्षा ठेव ठेवावी. या शिल्लक रकमांच्या व्याजातून जवळपास एक लाख पन्नास हजारांचा निधी उपलब्ध होऊ शकतो. त्याचबरोबर सरकारला जो शिल्लक निधी खर्च करण्याची इच्छा नव्हती तोही तसाच शिल्लक राहू शकतो असे मत त्यांचे होते. "It might be as well invested in Government securities, either the whole of it, or a considerable portion of it. By this appropriation a permanent fund of Rs. 20,000 will be secured by way of interest from year to year without affecting the principal."[२८] एकूणच हा एक उपयुक्त उपाय न्यायमूर्ती रानडे यांनी सांगितलेला होता. वास्तविक शिक्षण खात्याचे आर्थिक नियोजन करीत असतांना आजच्या काळातही हा उपाय उपयुक्त ठरू शकतो.

त्यांनी हा निधी उभारण्यासाठी माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची थोडया प्रमाणात फी वाढवावी असाही उपाय सुचविला होता. त्यांच्या मते "There can be no injustice in a moderate increase of these fees, especially as the interests of poor students will be provided for by increasing the perentage of free scholars from 5 to 15 per cent, This increase of fees, if judiciously managed, will secure half a lac of rupees."[२९] म्हणजेच उच्च शिक्षणातील शाळांची फी अल्पदरात वाढवली तर जवळपास पन्नास हजार रूपयांची अतिरिक्त तरतूद होऊ शकेल असे त्यांचे म्हणणे होते. फीवाढी बरोबरच नगरपालिका निधीतून ग्रामीण भागातील शिक्षणासाठी पन्नास हजार रूपये दिले जावेत असाही

एक पर्याय त्यांनी सुचविला होता. कारण नगरपालिकांना उत्पन्नाचे पर्याय अधिक उपलब्ध असतात.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते युरोपियन तपासणी अधिकारी व प्राध्यापकांऐवजी भारतीय तपासनीस व प्राध्यापक नेमले गेले तरीही बराचसचा निधी वाचविता येऊ शकला असता. "By the substitution of native for European agency both in the Professorial and the Inspection staff to a grater extent than has been contemplated hitherto, we may well hope to effect a saving of Rs. 25000 at least per year without affecting the quality of the work done at present."[३०] त्यांच्या मते शिक्षण खात्यातील तपासणी अधिकारी व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील बहुतांशी प्राध्यापक हे युरोपियन होते व त्यांचा पगार हा भारतीयांपेक्षा अधिक होता. म्हणून कमी पगारावर स्थानिक भारतीय अधिकारी व प्राध्यापक नियुक्त केले जावेत असा एक पर्याय त्यांनी सुचविला होता.

न्यायमूर्ती रानडे यांनी वरील प्रमाणे सुचविलेल्या उपायांमधून ३ लाख रूपयांचा निधी उपलब्ध होत होता. वास्तविक १४,००० प्राथमिक शाळांच्या स्थापनेसाठी चार ते पाच लाख रूपयांचा निधी आवश्यक होता. रानडेंनी सुचविलेल्या ३,००,००० रूपयांच्या निधीतून ८००० शाळांची स्थापना होऊ शकते असे त्यांनी सांगितले होते. ते म्हणतात "This fund properly managed ought to suffice for the establishment of at least 8,000 schools in the rural districts on the plan suggested above, which has a larger population that 500 souls."[३१] न्यायमूर्ती रानडेंचा विचार २०० च्या वर लोकसंख्या असणाऱ्या सर्वच खेडयात शाळा सुरू कराव्यात असा होता. त्यांनी सांगितलेल्या उपायांतून ५०० ते १००० एवढया लोकसंख्येच्या ८००० खेडयांसाठी शिक्षणाची सोय होणार होती. अजूनही २०० ते ५०० लोकसंख्या असणारी ६००० खेडी बाकी राहणार होती. तथापि ८००० शाळा जरी सुरू झाल्या तरीही खेडयातील शिक्षणाचा खूप मोठा प्रश्न सुटू शकणार होता असे त्यांच्या विचारांतून दिसून येते. एवढया शाळा सुरू झाल्या की, ब्रिटिश सरकारच्या शिक्षण खात्याला पुढील काही वर्षांच्या काळात उर्वरित खेडयातील शाळांचीही उपाययोजना करता येईल असा विचार त्यांचा होता. रानडेंच्या

दृष्टिकोनातून उर्वरित शाळांची खूप घाई करूनही फारसा उपयोग नव्हता कारण शाळा सुरू झाल्या म्हणजे त्यात लगेच विद्यार्थी शिक्षणासाठी येतील असे होणार नव्हते. हा एकोणिसाव्या शतकातला कालखंड होता जेथे शिक्षणाविषयी प्रचंड अनास्था होती. त्यामुळे शाळा सुरू करतानाही एक निश्चित असे सर्वेक्षण केले जाणे अगत्याचे होते.

एकूणच वरील सर्व विचारांतून न्यायमूर्ती रानडे यांची महाराष्ट्रातील जनता सुशिक्षित झाली पाहिजे या विषयीची कळकळ स्पष्ट लक्षात येते. त्याचबरोबर त्यांचा शिक्षण क्षेत्रातील अभ्यास किती सूक्ष्म होता हेही स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी मांडलेल्या प्राथमिक शिक्षण विषयक विचारातून ते एक द्रष्टे शिक्षणतज्ज्ञ होते असे सहज लक्षात येते.

## ६) न्यायमूर्ती रानडे यांचे माध्यमिक व उच्च शिक्षणविषयक विचार

न्यायमूर्ती रानडे यांनी प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाविषयी आपले विचार स्पष्ट केलेले होते. त्यांच्या मते तळागाळातील लोकांना प्राथमिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून मदत करणे हे जेवढे महत्त्वाचे कर्तव्य सरकारचे होते, तेवढेच महत्त्वाचे कर्तव्य मध्यम वर्गीयांना उच्च शिक्षणासाठी मदत करणे होते. प्राथमिक शिक्षणाने व्यक्तीमध्ये काही पायाभूत कौशल्ये जसे लिहिणे, वाचन करणे विकसित होतात त्याप्रमाणे माध्यमिक व उच्च शिक्षणाने माणसाच्या कल्पनाशक्तीला वाव मिळून त्याच्या ठायी असलेल्या वैचारिक क्षमतेची प्रगल्भता त्याच्या बुद्धिमत्तेनुसार वाढत जाते. यासाठीच उच्च शिक्षणाची आवश्यकता असते. त्याच बरोबर या शिक्षणाने विद्यार्थ्यांचा ठराविक अशा आवडीच्या विद्याशाखेतील रस आणखी वाढत जातो. न्यायमूर्ती रानडे हे ब्रिटिशांनी उच्च शिक्षण विषयक जे धोरण राबविलेले होते त्यावर समाधानी नव्हते. त्यांच्या मते ब्रिटिश सरकारने उच्च शिक्षणापुढे प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच फारसे लक्ष दिलेले नव्हते.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते ब्रिटिश सरकार माध्यमिक व उच्च शिक्षणावर पुरेशा प्रमाणात खर्च करीत नव्हते. मुळात संपूर्ण भारताच्या शिक्षण खात्याच्या बाबतीतच अशी अवस्था होती. त्यामुळे त्याला महाराष्ट्रही अपवाद नव्हता. त्यांच्या मते ब्रिटिश सरकार

भारतीयांकडून कर रूपाने प्रचंड रक्कम गोळा करीत होते. "The British Indian Government raises from the people an yearly revenue of close upon 68½ millions steriling, or 3½ Rs. per head, and spends on their education about ¾ million, or less than 8 pies per head per annum. This miserably small expenditure from the public revenues on national education is not very creditable to a civilized government."[३२] यावरून लक्षात येते की, प्रत्येक भारतीयांकडून दरवर्षी ३.५ रूपये कर रूपाने गोळा केले जायचे व त्यापैकी केवळ ८ पैसे त्यांच्या शिक्षणावर ब्रिटिश सरकारकडून वर्षाकाठी खर्च केले जायचे. सर चार्ल्स वुड या ब्रिटिश अधिकाऱ्याने जी 'भारतीय शिक्षणाची सनद' तयार केली होती ती वास्तविक आदर्श होती परंतु ब्रिटिश सरकार जोपर्यंत अधिकाधिक रक्कम शिक्षणावर खर्च करण्यास तयार होत नाही तोपर्यंत या शिक्षण सनदेस विशेष यश येऊ शकणार नव्हते असे न्यायमूर्ती रानडे यांना वाटत होते. या अनुषंगाने त्यांनी भारतीय शिक्षणाची तुलना खुद्द इंग्लंड देशाशी केली होती. इंग्लंडमध्ये प्रचंड खर्च शिक्षणावर केला जात होता. तथापि हेच इंग्लंडचे सरकार मात्र भारतात पक्षपाती धोरण राबवित होते असे न्यायमूर्ती रानडेंच्या विचारातून दिसून येते. महाराष्ट्रातील शिक्षणाच्या संबंधाने न्यायमूर्ती रानडेंना ब्रिटिशांच्या उच्च शिक्षणा बाबतच्या धोरणात काही उणिवा आढळल्या होत्या.

### उच्च शिक्षणाच्या उणिवा

**हायस्कूल व महाविद्यालयांची संख्या कमी :** न्यायमूर्ती रानडेंच्या दृष्टिकोनातून ज्या प्रमाणे प्राथमिक शाळांची संख्या कमी होती त्याप्रमाणेच माध्यमिक विद्यालये व महाविद्यालयांची संख्या खूप कमी होती. त्यांनी मुंबई प्रांताचा विचार करून सरकारी संस्थांच्या संख्येविषयी माहिती सांगितलेली होती. त्यांच्या मते इ.सन १८७०-७१ मध्ये सरकारी हायस्कूलची संख्या केवळ १० एवढीच होती व इ.सन १८८०-८१ मध्ये ही संख्या फक्त ९ ने वाढून १९ एवढी झालेली होती. त्याचबरोबर सरकारी महाविद्यालयांची संख्या इ.सन १८७०-७१ मध्ये ६ होती. या संख्येत १८८०-८१ मध्ये आजिबातच वाढ झाली नाही. यावरून मुंबई प्रांतातील एकूण लोकसंख्येचा विचार करता व सरकारी माध्यमिक व महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेऊ

इच्छिणाऱ्यांची संख्या लक्षात घेता ही संख्या अगदीच कमी होती असे लक्षात येते. या अनुषंगाने रानडेंनी आपले मत मांडताना लिहिले होते की, “It is to be noted, moreover, that for a population of close of 20 millions, there are only 6 Government Colleges (both Arts and Professonal), and 19 High Schools. These numbers are certainly modest, and the state provision for High Education can not be said to be over-liberal. There is not more than one Government High School in every Zilla, and some Zillas are still without a High School.”[३३] न्यायमूर्ती रानडेंच्या मते जेवढी संख्या हायस्कूल व कॉलेजची होती ती एवढी कमी होती की, या प्रांतातील काही जिल्ह्यांमध्ये केवळ एक हायस्कूल पूर्ण जिल्ह्यासाठी असायचे. याहीपेक्षा आणखी शोकांतिका म्हणजे काही जिल्ह्यांमध्ये एकही हायस्कूल नसायचे. वास्तविक विचार करता किमान एका जिल्ह्यात एक उच्च शाळा असणे आवश्यक होते असे रानडेंना वाटत होते. आजच्या काळाशी तुलना करता ही एक शाळाही कमी पडणारी होती परंतु त्या काळाचा विचार करता प्रत्येक जिल्ह्यात किमान एक सरकारी हायस्कूल असले म्हणजे ते हायस्कूल ‘मॉडेल स्कूल’म्हणून कार्य करेल असा त्यांचा विचार होता. या मॉडेल स्कूलच्या नियंत्रणाखाली इतर राष्ट्रीय व खासगी उच्च विद्यालये शिक्षणाचे कार्य करू शकतील असे त्यांना वाटत होते.

**विद्यार्थ्यांच्या फीची समस्या :** न्यायमूर्ती रानडे यांच्या मते हायस्कूल व महाविद्यालयात जे विद्यार्थी प्रवेश घेत होते त्यांना भरावी लागणारी फी ही खूप मोठया प्रमाणात होती. ब्रिटिशांनी केवळ दहा वर्षाच्या काळात जवळपास दुप्पट फी वाढविली होती. ही जी वाढ होती ती सरकारी शाळा व महाविद्यालयास होती त्यामुळे खासगी ज्या शाळा होत्या त्यांची फी सहाजिकच सरकारी शाळांपेक्षाही अधिक होती. मुळात प्राथमिक शाळांप्रमाणेच हायस्कूल व महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रसार करणे सरकारचेच कर्तव्य आहे असे त्यांना वाटत होते. उच्च शिक्षण देणाऱ्या खासगी संस्था अधिक असल्या तरीही त्यांना सरकारने जास्तीत जास्त अनुदान देणे गरजेचे होते. सरकारने अधिक अनुदान दिले तर निश्चित विद्यार्थ्यांवर पडणारा फीचा बोजा कमी होईल असे न्यायमूर्ती रानडे यांचे मत होते. ब्रिटिश सरकार मात्र हायस्कूल व महाविद्यालये यांचा खर्च चालविण्यासाठी जास्तीत जास्त अनुदान देत नव्हते. त्यामुळे हा खर्च

महाविद्यालय व हायस्कूल यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या फीच्या माध्यमातून वसूल केला जायचा. सहाजिकच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक फी भरावी लागत होती. या एकूण फीचा गरीब विद्यार्थ्यांच्या डोक्यावर किती भार पडत होता याचाही विचार न्यायमूर्ती रानडे यांनी केलेला होता. "The rate of College fees levied in this Presidency ranges from Rs 10 to Rs 5 a month, and of High School fees from Rs. 4 to 1½ a month. These rates are high enough, considering the means of the people who have to pay them, and will not appear low even when compared to the fees paid by the higher classes of such a rich country as England."[३४] म्हणजेच ही फी एवढया मोठया प्रमाणात होती की, इंग्लडमधील श्रीमंतांच्या मुलांना शिक्षणासाठी जी फी भरावी लागत होती त्यांच्याहीपेक्षा जास्त भारतातील मध्यमवर्गीयांच्या विद्यार्थ्यांना भरावी लागत होती. एकूणच उच्च शिक्षणासाठी भराव्या लागणाऱ्या फीचा जास्तीत जास्त बोजा हा गरीब व मध्यम वर्गीय मुलांवर पडत होता. ही एक महत्त्वाची समस्या उच्च शिक्षणाची होती.

**उच्च शिक्षणाच्या हस्तांतरणातील अडचणी :** ब्रिटिशांनी त्याकाळी शिक्षण ही बाब भारतीयांशी निगडीत असल्याने हळूहळू भारतीयांकडे सोपविण्यात येईल असा पावित्रा घेतलेला होता. विशेषतः हायस्कूल व विद्यापीठीय शिक्षणातून ब्रिटिश सरकार मुक्त होऊन अनुदान तत्त्वावर या संस्था खासगी समित्यांकडे चालविण्यास देता येतील असा पर्याय ब्रिटिशांनी निवडलेला होता. अप्रत्यक्षरित्या ही बाब सरकारच्या भारतीय शिक्षणातून अंग काढून घेण्याचाच एक भाग होती. न्यायमूर्ती रानडे यांनी या अडचणींचा सांगोपांग अभ्यास करून यातून काय अडचणी निर्माण होऊ शकतात याचा विचार केलेला होता. अशा पद्धतीने शिक्षणाचे जे हस्तांतरण ब्रिटिश करणार होते त्यामुळे भारतीय शिक्षणावर गदा येईल असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मते भारतामध्ये विशेषतः महाराष्ट्राचा विचार करता शिक्षण सांभाळण्याची कुवत असलेली सुसंघटीत अशी स्थानिक कमिटी उपलब्ध नव्हती. त्यामुळे जरी अशा प्रकारे शाळा व महाविद्यालयांचे हस्तांतरण झाले तरीही अधिक काळ या शाळा टिकतील अशी शाश्वती न्यायमूर्ती रानडे यांना वाटत नव्हती. तत्कालीन कालखंडात असा एक विचार पुढे आलेला होता की, शिक्षणाची जबाबदारी ही नगरपालिका व महानगरपालिका यांच्यावर सोपविण्यात

यावी. परंतु रानडेंच्या दृष्टिकोनातून या नगर पलिका मुळातच अजून बाल्यावस्थेत होत्या. नगरपलिकांची कामे व प्रशासन कसे चालवावे यातच असंख्य अडचणी होत्या. त्यामुळे शिक्षणासारखी संवेदनशील जबाबदारी त्यांच्यावर पूर्णतः सोपविणे चुकीचे होते असे त्यांच्या विचारांवरून स्पष्ट होते. या अनुषंगाने न्यायमूर्ती रानडे यांनी लिहिले होते की, "Municipal corporations in this Presidency, and we believe the same is true of the country generally, are still in their infancy, and they are mostly the nominees of Government; they have not yet learnt to understand and administer efficiently Municipal affairs in other departments, and the elective franchise is yet to be tried as an experiment."[३५] वास्तविक जिल्हा लोकल बोर्ड व शहरांसाठी नगरपालिकांची योजना खऱ्या अर्थाने लॉर्ड रिपन या ब्रिटिश व्हॉईसरॉयच्या काळात आली. या अनुषंगाने त्यास स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक म्हटले जाते. या नगरपलिका, महानगरपलिका व जिल्हा लोकल बोर्ड स्थापन होऊन फारसा काळ झालेला नव्हता. त्यामुळे त्यांना कारभार चालविण्याचा फारसा अनुभव नव्हता. एकूणच या संस्था स्वायत्त झालेल्या नव्हत्या तर त्या केवळ सरकारनेच नियुक्त केलेल्या कमिटया म्हणून काम पहात होत्या. न्यायमूर्ती रानडेंच्या मते जोपर्यंत त्या जनतेच्या प्रतिनिधी म्हणून काम पाहण्यास सुरूवात करीत नाहीत तोपर्यंत त्यांना जनतेच्या शिक्षणाची जबाबदारी कार्यक्षमरित्या पेलविता येणार नाही. त्यामुळे लगेच त्यांच्याकडे शिक्षणासारखी जबाबदारी देणे चुकीचे होईल. रानडेंच्या विचारांची तुलना जोतिबा फुलेंच्या विचारांशी केली तर एक गोष्ट निदर्शनास येते, ती म्हणजे महात्मा फुलेंनी असे विचार मांडले होते की, सरकारने भारतीय शिक्षणातून स्वतः बाहेर पडू नये. म्हणजेच दोघांच्याही विचारांतून एक सारखा विचार स्पष्ट होतो तो म्हणजे शिक्षणावर सरकारचे नियंत्रण असणे अत्यावश्यक होते.

उच्च शिक्षणाच्या हस्तांतरणाबावत ब्रिटिश सरकारसमोर खासगी संस्थांचाही पर्याय होता. शिक्षणाविषयी कळकळ असणाऱ्यांनी खासगी शाळा सुरू करून शिक्षणाचे कार्य चालू ठेवावे व सरकारने अशा शैक्षणिक संस्थांना अनुदान द्यावे अशा प्रकारची अपेक्षा सरकारची होती. आजच्या काळातील अधिकाधिक उच्च शिक्षणाच्या संस्था या खासगी स्वरूपाच्या असून सरकारने दिलेल्या अनुदानावर त्या चालू असल्याचे दिसते. न्यायमूर्ती रानडे यांच्या मते खासगी

संस्थांच्या मार्फत शिक्षण देणे काही परिस्थितीत चांगला पर्याय होऊ शकतो. यासाठी उच्च शिक्षित तरूणांनी पुढाकार घेतला तर या शैक्षणिक संस्था दर्जेदार शिक्षण मुलांना उपलब्ध करून देऊ शकतात. या अनुषंगाने रानडे म्हणतात की, "It may be urged in some quarters that, in this Presidency, there are many graduates of the University, and other educated persons, who would come forward to ensure the maintenance of High Schools, and even of Colleges, were these institutions transferred to their charge, and liberal state grants given to encourage them in their efforts."[३६] यावरून शिक्षणाविषयी आस्था असणारे हुशार सुशिक्षित लोक पुढे येऊन त्यांनी शिक्षणाच्या कामी पुढाकार घ्यावा असे त्यांचे मत होते. अशा हुशार लोकांनी निस्वार्थी हेतूने सुरू केलेल्या शिक्षण संस्थांना सरकारने अनुदान दिले तर निश्चितच शिक्षणाची समस्या सुटू शकेल असा त्यांचा विश्वास होता. मात्र या पर्यायात तत्कालीन कालखंडाचा विचार करता एक मोठी समस्या न्यायमुर्ती रानडे यांना वाटत होती. त्यांच्या मते खासगी संस्था सुरू करणारे प्रामाणिक असतील तर अडचण नव्हती. मात्र ज्यांनी संस्था सुरू केली त्यांचा हेतू जर चरितार्थाचे साधन उपलब्ध होईल असा असेल तर मात्र शिक्षणाचा मुख्य हेतू साधला जाऊ शकत नाही.

त्याकाळी अनेक लोकांनी खासगी शिक्षण संस्था सुरू केलेल्या होत्या, परंतु त्या केवळ फी घेऊन स्वतः श्रीमंत होण्याच्या हेतूनेच सुरू केलेल्या होत्या. शाळांचे संस्थापक या शाळांच्या फी व अनुदानाच्या आधारे प्रचंड श्रीमंत व्हायचे व त्यांची मुख्य ज्ञानदान ही जी भूमिका असायची त्यापासून ते दूर रहायचे. एकूणच खासगी संस्था या पैसे कमावण्याचे महत्त्वाचे साधन बनतील त्यामुळे ब्रिटिश सरकारने पूर्णतः खासगी संस्थांकडे उच्च शिक्षणासारखी बाब सोपवू नये असे त्यांना वाटत होते. अशा संस्थांचा तोटा व्यक्त करताना न्यायमूर्ती रानडेंनी सांगितले होते की, "Private schools, established by individuals for commercial gain, can never as rule compete with public schools established by the State or by Municipal Corporations, for this, if for no other reason, that their managers can never hope in this country, for a long time to come, to guarantee to their teachers the pay, the pension, and the permanency, that the State or Corporatins at present can, and may be expected hereafter to do."[३७] एकूणच त्यांच्या या विचारातून एक

महत्त्वाची बाब स्पष्ट होते ती म्हणजे सरकारी नोकरीत ज्या प्रमाणे शिक्षकांना त्यांच्या पगाराची, भविष्यनिर्वाह निधीची व कायम नोकरीची हमी मिळते ती या खासगी संस्थांमध्ये मिळणार नाही. म्हणजेच त्यांची आर्थिक पिळवणूक केली जाईल. आजचा काळही या गोष्टीला अपवाद नाही. आज कित्येक खासगी शिक्षण देणाऱ्या संस्था या शैक्षणिक दर्जाचा विचार न करता केवळ पैसा कमाविण्याच्या हेतूने सुरू झालेल्या आहेत. काही संस्था चांगल्या असल्या तरीही सगळयाच चांगल्या संस्था आहेत असे म्हणता येणार नाही. अशा शाळांमधील शिक्षकांना पगार योग्य प्रमाणात दिला जात नसल्याने त्याचा परिणाम त्यांच्या अध्यापनावर होतो. म्हणून शिक्षणासारखी बाब खासगी संस्थांकडे सोपविताना सरकारने अगदीच या कार्यापासून परावृत्त होऊ नये असे त्यांना वाटत होते. शिक्षणाची जी ध्येये व उद्दिष्टे असतात ती अशा शाळा व महाविद्यालयांमधून साधली जातात का? हे पाहणे सरकारचे कर्तव्य आहे. जर याबाबत शाश्वती अशा खासगी संस्थांमधून मिळत नसेल तर अशा संस्थांकडे शिक्षण खाते सोपविण्यात सरकार चूक करीत आहे असे रानडे यांचे मत होते. म्हणजेच ज्या संस्था खरोखर निस्वार्थी पद्धतीने शिक्षणाचे कार्य करू शकतील अशाच शाळांना हे कार्य सोपविले जावे अन्यथा ही जबाबदारी सरकारनेच सांभाळावी.

त्या कालखंडाचा विचार करता काही मिशनरी संस्थाही कार्यरत होत्या. त्यांच्याकडेही उच्च शिक्षणाची जबाबदारी सरकारकडून सोपविली जाण्याची शक्यता होती. रानडेंच्या मते अशा मिशनरी संस्थांकडून धार्मिक प्रसार केला जातो त्यामुळे योग्य शिक्षण या संस्थाकडून दिले जाऊ शकणार नाही. यासाठी त्यांच्याकडे उच्च शिक्षणाची जबाबदारी सोपविली जाऊ नये असे रानडेंचे मत होते.

एकूणच वरील सर्व बाबींचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते की, ज्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण ही सरकारची जबाबदारी होती त्याच पद्धतीने उच्च शिक्षण ही सरकारचीच जबाबदारी होती. त्यामुळे सरकारने शिक्षणाचे हस्तांतरण न करता स्वतःच ही जबाबदारी सांभाळावी. अगदीच शक्य नसेल तर निस्वार्थी संस्थांकडे शिक्षण सोपवावे.

**उच्च शिक्षणासाठी निधीची उपलब्धता :** ब्रिटिश सरकार शिक्षणावरील निधी खूप कमी प्रमाणात खर्च करीत होते. उच्च शिक्षणातील विकासाची ही एक महत्त्वाची समस्या होती. ब्रिटिश सरकार अनुदान देताना प्राथमिक शिक्षण व उच्च शिक्षण असा भेदभाव करीत होते. न्यायमूर्ती रानडे यांनी इ.सन १८८०-८१ यावर्षी ब्रिटिश सरकारने जे सरकारी अनुदान शाळा खात्यासाठी दिलेले होते ते पुढील प्रमाणे खर्च केले होते असे सांगितले. यावरून ब्रिटिश सरकार प्राथमिक व उच्च शिक्षण यात कसे भेद करीत होते हे स्पष्ट दिसून येते. "Out of the total Government grant to Education in this Presidency, viz. Rs. 10,89,000, the following sums were devoted in 1880-81 to high, low, professional and technical education:

1. Arts Colleges…………………….Rs. 92,039
2. High And Middle Class School… ,, 130,888
3. Primary Schools………………… ,, 245,852
4. Professional Colleges………….... ,, 67,609
5. Grants in aid to Private Institutions ,, 118,447

So that the Government grant to primary education was greater than the grants to the Arts Colleges and High and Middle Class Schools put together."[३८] या आकडेवारी वरून स्पष्ट लक्षात येते की, प्राथमिक शाळांसाठी सरकारी अनुदान २४५,८५२ एवढे खर्च केले गेले होते. माध्यमिक व महाविद्यालय असे मिळून २,२२,९२७ एवढी रक्कम खर्च केली गेली. याचाच अर्थ असा होतो की, प्राथमिक शिक्षणावर अधिक खर्च ब्रिटिशांनी केलेला होता. या तुलनेत उच्च शिक्षणालाही अधिक खर्च करणे गरजेचे होते असे न्यायमूर्ती रानडे यांना वाटत होते. एकूणच या सर्व मुद्यांवरून लक्षात येते की, न्यायमूर्ती रानडे यांनी तत्कालीन उच्च शिक्षणाच्या परिस्थितीचा सखोल अभ्यास केलेला होता व त्यातील अडचणी मांडलेल्या होत्या.

## उच्च शिक्षणातील अडचणींवरील उपाय

न्यायमूर्ती रानडे यांनी उच्च शिक्षणाचा विकास का होत नाही याबाबत ज्या अडचणी सांगितलेल्या होत्या त्या सर्व अडचणींचा सारांश रूपाने विचार केला तर एक गोष्ट निदर्शनास

येते, ती म्हणजे ब्रिटिश सरकार उच्च शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत होते याचे कारण त्यांना अधिक सरकारी अनुदान उच्च शिक्षणावर खर्च करायचे नव्हते. त्यामुळे इतर पर्यायांचा विचार करणे न्यायमूर्ती रानडेंना गरजेचे वाटत होते. या अनुषंगाने न्यायमूर्ती रानडे यांनी काही उपाययोजना सुचविली होती ज्यानुसार सरकारी अनुदानासाठी अधिक निधी उपलब्ध होऊ शकेल व असे झाले म्हणजे सरकारला उच्च शिक्षणाच्या संस्था चालविणे सोपे जाईल.

सरकार प्राथमिक शिक्षणावर अधिक सरकारी अनुदान खर्च करीत होते या ऐवजी प्राथमिक शिक्षणावर स्थानिक करातून अधिक खर्च केला जावा म्हणजेच सरकारी अनुदान जास्त प्रमाणात उच्च शिक्षणावर खर्च करता येईल. यासाठी न्यायमूर्ती रानडे सन १८८०-८१ या सालचे उदाहरण देतात. "The proceeds of the Local Cess in this Presidency are now (1880-81) Rs 22,38,000, of which only $^{1}/_{3}{}^{rd}$, viz. Rs. 7,46,000, is devoted to education the remaining $^{2}/_{3}{}^{rds}$ are spent on local public works. We suggest that cess proceeds should be equally divided between education and public works, which would render additional funds to the extent of Rs. 3,73,000, available for primary education."[३९] म्हणजेच एकूण स्थानिक कराच्या अर्धी रक्कम शिक्षणावर खर्च केली म्हणजे जवळपास पावणे चार लाख अतिरिक्त रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च करता येईल व त्यामुळे सरकारी अनुदान उच्च शिक्षणाकरिता वापरता येईल असे मत त्यांनी मांडले होते. याशिवाय त्यांच्या मते ज्या मोठाल्या महानगरपालिका असतील व ज्यांचे उत्पन्न अधिक असेल अशा नगरपालिकांनी केवळ प्राथमिक शिक्षणाचा विचार न करता त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या माध्यमिक शाळा, महाविद्यालय व तंत्र शाळा यांच्या खर्चाचाही विचार करावा. त्यामुळे उच्च शिक्षणास चालना मिळेल असे त्यांना वाटत होते.

उच्च शिक्षणासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी न्यायमूर्ती रानडे यांनी आनखी एक महत्त्वाचा उपाय सुचविला होता. शिक्षण संस्थांची तपासणी करणारे जे अधिकारी होते ते सर्व युरोपियन अधिकारी असायचे. त्यांच्या ऐवजी भारतीय तपासनीसांची नियुक्ती कमी पगारावर केली जावी. "There are five European Educational Inspectrs in this Presidency on from Rs. 750 to Rs. 1500 a month, and the total cost of their salaries (exclusive of

travelling allowoances) was in 1880-81 Rs. 53,400."[४०] म्हणजेच शैक्षणिक संस्थांची तपासणी करण्यासाठी जे पाच अधिकारी नेमलेले होते त्यांच्या पगारापोटी बरीच मोठी रक्कम खर्च केली जात होती. याऐवजी जर स्थानिक तपासनीसांची नेमणूक केली गेली तर हे काम निम्म्याच खर्चात तेवढयाच कार्यक्षमतेने राबविले जाणे शक्य आहे असे त्यांचे मत होते. असे केल्याने जवळपास २५,००० रूपये रक्कम वाचविली जाऊ शकते जिचा वापर उच्च शिक्षणाच्या विस्तारिकरणासाठी करता येऊ शकतो. त्याचबरोबर देशाची प्रगती झाल्यानंतर देशातील लोकांचा सुसंस्कृतपणा वाढेल त्यांचाही उपयोग या शिक्षणाच्या कामी करता येईल. काळाच्या ओघात ज्या गावांचा विस्तार होईल त्या गावात नगरपालिका निर्माण केल्या जाव्यात म्हणजे तेथील स्थानिक कराच्या निधीतून शिक्षणाचा खर्च निघू शकेल. अशा प्रकारे न्यायमूर्ती रानडे यांनी उच्च शिक्षणाविषयी सर्व सामावेशक असे विचार मांडलेले होते.

## ७) न्यायमूर्ती रानडे यांचे अभ्यासक्रमविषयक विचार

शिक्षणातून साध्य करावयाची जी उद्दिष्टे असतात ती अभ्यासक्रमांच्या माध्यमातून साधली जातात. विद्यार्थ्यांना विविध विषयातील ज्ञानाची अनुभूती देण्यासाठी त्या अनुषंगाने अभ्यासक्रम बनविला जातो. न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या विविध लेखातून अभ्यासक्रम कसा असावा?, विद्यापीठीय अभ्यासक्रम कसा होता?, त्यातील त्रुटी कोणत्या होत्या?, अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षण या विषयाची आवश्यकता, तंत्र व व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच अभ्यासक्रमाचे माध्यम कोणते असावे? अशा विविध मुद्यांवर प्रकाश टाकलेला होता. त्यांनी मांडलेल्या विचारातून अभ्यासक्रमास किती महत्त्व असू शकते हे सहज लक्षात येते.

न्यायमूर्ती रानडे यांनी अभ्यासक्रम हा विद्यार्थी समाज यांच्या गरजेनुसार असावा असे मत मांडलेले होते. त्यांच्या मते रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इतिहास, भूगोल यासारखे अनेक विषय विद्यार्थी शालेय जीवनात शिकत असतात. हे विषय ज्ञान मिळविण्यासाठी ठीक असतात परंतु विद्यार्थ्यांना भावी आयुष्यात सर्वार्थाने उपयुक्त ठरतातच असे नाही. या प्रत्येक विषयाचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक असले तरीही भावी आयुष्यात एखाद्या विद्यार्थ्याने

ज्या विद्याशाखेत नोकरी पत्करली त्या विद्याशाखेशी संबंधित विषय सोडला तर इतर विषयांचा भावी आयुष्यात फारसा उपयोग होतांना दिसत नाही. न्यायमूर्ती रानडेंच्या मते शाळेत शिकविला जाणारा अभ्यासक्रम हा भावी आयुष्यात मुले विसरतात म्हणजेच तो केवळ परीक्षा देऊन पास होणे व पुढच्या वर्गात जाणे एवढयाच अर्थाने महत्त्वाचा मानला जातो. या अनुषंगाने न्यायमूर्ती रानडे लिहितात की, "As regards the choice of subjects, we believe official authorities make too much point of the crammed book-konwledge of the elements of grammar, geography, and history which are taught in Government schools. These subjects are learnt to be forgotten by the vast majority of boys, while others which are of much more importance in practical life are little attended to."[४१] त्यांच्या या विचारांवरून लक्षात येते की, ज्या विषयांचा उपयोग विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तीगत जीवनात होणार आहे ते विषय शिकविले जात नव्हते. त्यामुळे अभ्यासक्रम हा समाजाची व काळाची नेमकी गरज काय आहे हे ओळखून तयार करणे अगत्याचे आहे असे त्यांना वाटत होते. एकूणच विचार करता अभ्यासक्रम हा समाजातील अपप्रवृत्ती दूर करणारा असावा. त्यात बदलत्या परिस्थितीचा विचार केलेला असावा. न्यायमूर्ती रानडेंच्या दृष्टिकोनातून शिक्षणाचे खरे ध्येय हे मानवाचे जीवन उदात्त करणे हे आहे. समाजास दिल्या जाणाऱ्या लोकशिक्षणातून चांगले नागरिक घडवणे आवश्यक आहे. त्यामुळे अभ्यासक्रमही तसाच असणे आवश्यक आहे. हीच गरज लक्षात घेऊन आधुनिक काळातील शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात 'मूल्य शिक्षण' या विषयाची भर घालण्यात आलेली होती. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांमध्ये किमान कौशल्ये निर्माण करणारा असावा. परंतु उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम हा ज्ञाननिष्ठ व देशभक्ती निर्माण करणारा असावा असे त्यांचे स्पष्ट मत असल्याचे दिसून येते.

न्यायमूर्ती रानडे यांनी विद्यापीठीय अभ्यासक्रमाबाबत बोलताना स्वतःची नाराजी व्यक्त केलेली होती. त्यांच्या दृष्टिकोनातून तत्कालीन विद्यापीठीय अभ्यासक्रम हा केवळ माहिती मिळवून देणारा होता. केवळ विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढवायचे एवढे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून प्रचंड मोठा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना अभ्यासण्यासाठी ठेवला जातो ही बाब योग्य नसल्याचे

त्यांनी सांगितले. अभ्यासक्रम प्रचंड मोठा असल्याने केवळ एका वर्षात ठरवून दिलेला अभ्यासक्रम अभ्यासणे विद्यार्थ्यांच्यादृष्टीने कठीण जात असे. विशेष म्हणजे अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी खूप उच्च होती. रानडेंच्या मते विद्यार्थ्यांना परिपूर्ण ज्ञान देण्याच्या नावाखाली खूप मोठा अभ्यासक्रम अभ्यासण्यास दिला जातो व त्यामुळे सहाजिकच विद्यार्थ्यांना तो अभ्यासक्रम अवजड वाटू लागतो. याचे खूप दूरगामी परिणाम विद्यार्थ्यांच्या जीवनावर होतात असे रानडेंच्या विचारांवरून दिसून येते. एक तर या अवघड अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी आपले शिक्षण खंडीत करतात किंवा त्यांच्यात शिक्षणाविषयी अनास्था निर्माण होते. कित्येक प्रसंगी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे ओझे सहन न झाल्याने ते आत्महत्येसारखा मार्ग स्वीकारतात किंवा तसे केले नाही तरी या ओझ्याने त्यांचे आयुर्मान खालावते. याला आजचा कालखंडही अपवाद ठरत नाही. त्या कालखंडात विद्यापीठीय पदवी घेणाऱ्यांच्या मृत्यूदराचे प्रमाण खूप होते. या विषयी बोलताना मुंबई विद्यापीठाचे नेटिव्ह कुलगुरू डॉ.भंडारकर यांनी भारतीय विद्यार्थ्यांतील दारिद्रय, अंधश्रद्धा, वाईट चालिरिती व आळशीपणा यासारखी कारणे पुढे केली होती. या कारणांमुळे मृत्यूचे प्रमाण पदवीधरांमध्ये अधिक आहे असे सांगण्यात आलेले होते. परंतु न्यायमूर्ती रानडेंनी मात्र याबाबीस तीव्र विरोध दर्शविला होता. त्यांनी मृत्यूचे कारण सांगताना विद्यापीठांचा विस्तीर्ण अभ्यासक्रम असेच सांगितलेले होते. त्यांच्या मते विद्यापीठीय अभ्यासक्रम किती असावा व त्याची काठिण्यपातळी किती असावी याला काही मर्यादा असणे आवश्यक आहे. न्यायमूर्ती रानडेंचे विचार याबाबतीत लोकमान्य टिळकांच्या विचारांशी अगदी मिळते जुळते आहेत. लोकमान्य टिळकांनीही केसरीतून एक अग्रलेख लिहून पदवीधर तरूण अकाली का मरतात याचे कारण सांगताना अवघड अभ्यासक्रम हेच सांगितलेले होते.

न्यायमूर्ती रानडे यांनी विद्यापीठांच्या अभ्यासक्रमातील त्रूटी सांगताना शिक्षकांसाठी हा अभ्यासक्रम कसा होता असाही विचार मांडलेला होता. त्यांच्या मते हा अभ्यास प्राध्यापकांसाठीच खूप अवघड होता. प्राध्यापकांनी स्वतः चांगली तयारी करून विषय समजून घेतला तरीही एका वर्षासाठी जेवढा अभ्यासक्रम निश्चित केला तेवढा ते पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे यातून अनेक अडचणी निर्माण होतात असे त्यांना वाटत होते. या अनुषंगाने

रानडे म्हणतात की, "It appears to be the aim of the authorities here of books-study. These cover such an extent of prescribed reading that the professors find it hard to go through them within the terms assigned, and the students are not able to understand the general bearings of the prescribed studies by enlarging their reading outside their course."[४२] म्हणजेच विद्यापीठाचा अभ्यासक्रम एवढा मोठा होता की, प्राध्यापकांना तो वेळेत पूर्ण करणे शक्य होत नव्हते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनाही अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर अभ्यास करण्यास वेळ मिळत नव्हता. प्राध्यापक अभ्यासक्रम मोठा असल्यामुळे तो वेळत पूर्ण करण्याची घाई करीत होते त्यामुळे तो मुलांना समजत नव्हता. अशा अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी केवळ परीक्षेपुरताच अभ्यास करीत होते त्यामुळे ते केवळ पुस्तककेंद्री व परीक्षाकेंद्री बनत होते.

अशा अतिरिक्त अभ्यासामुळे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यातील संबंधही योग्य राहू शकत नव्हते कारण विद्यार्थ्यांना विषय न समजल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांविषयी आस्था राहत नाही व विद्यार्थी चांगल्या गुणांनी पास न होऊ शकल्याने शिक्षक विद्यार्थ्यांवर नाराज होत होते. एकूणच न्यायमूर्ती रानडेंच्या मते या सर्व अडचणी टाळण्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना होणे आवश्यक होते. ते मोठया व अवघड अभ्यासक्रमास विरोध करीत होते. त्यांच्या मते "तुलनात्मक दृष्टया सोपे आणि साधे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना निवड करण्याच्या व अभ्यासाच्या दृष्टीनेहि फायद्याचे होतात. ज्यामध्ये एकाच विषयात विशेष प्रावीण्य अपेक्षिलें जातें किंवा निरनिराळया विषयांची अव्यवस्थित भेसळ केलेली असते अशा अभ्यासक्रमापेक्षां हे साधेच अभ्यासक्रम सोईस्कर असतात."[४३] म्हणजेच अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी अधिक नसावी असे त्यांचे स्पष्ट मत दिसून येते. जो अभ्यासक्रम आत्मसात करायचा त्यात विद्यार्थ्यांस गोडी लागायला हवी अगदीच महात्मा फुलेंच्याच विचारात सांगावयाचे झाल्यास अभ्यासक्रम सोप्याकडून अवघडाकडे जाणारा असावा. जे विद्यार्थी प्रतिभा संपन्न असतात ते केवळ अभ्यासक्रमावर अवलंबून राहत नाहीत. ते इतर मार्गांनी त्यांच्या ज्ञानाची लालसा भागविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना हुशार विद्यार्थी डोळयासमोर न ठेवता सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विचार

व्हावा ज्यामुळे विद्यार्थी अभ्यासापासून परावृत्त होणार नाहीत असे न्यायमूर्ती रानडेंना वाटत होते. आजच्या काळाचा विचार करताही न्यायमूर्ती रानडेंचे हे विचार खूप महत्त्वाचे ठरतात कारण आजही विद्यापीठीय शिक्षणाचा अभ्यासक्रम खूप विस्तारित आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम पेलवत नाही व त्यामुळे ते आपले शिक्षण अर्धवट सोडून देतात.

**अभ्यासक्रमाचे माध्यम**

अभ्यासक्रमाचे माध्यम कोणते असावे याबाबतीतही बऱ्याचदा शिक्षणात वाद उद्‌भवतात. लॉर्ड मेकॉले या ब्रिटिश शिक्षण तज्ज्ञाने शिक्षणाचे माध्यम 'इंग्रजी' असावे असे सुचविले होते. न्यायमूर्ती रानडेंनी मात्र शिक्षणाचे माध्यम हे देशी भाषा असावे असे विचार मांडले होते. शिक्षणाच्या माध्यमाविषयी न्यायमूर्ती रानडेंचे विचार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांशी जुळणारे दिसून येतात. त्यांनी विद्यापीठीय शिक्षणात मराठी भाषेचा पुरस्कार केलेला होता. त्यांच्या मते परकीयांची भाषा आत्मसात करणे विद्यार्थ्यांना कठीण जाते. त्यामुळे इंग्रजी ऐवजी देशी भाषांचे माध्यम असावे. यावरून रानडेंनी मराठी भाषेचाच पुरस्कार केल्याचे दिसते. अर्थात ते इंग्रजी भाषेचा द्वेष करीत होते असे नव्हते. मुळात कित्येक प्रसंगी इंग्रजी भाषेतील विद्येचे महत्त्व त्यांनी आपल्या भाषणातून व लेखामधून सांगितलेले होते. परंतु सर्वांना इंग्रजी भाषेचे माध्यम पेलवता येणे शक्य होईलच असे नाही. यासाठी त्यांनी ज्यांना इंग्रजीतून ज्ञान मिळविणे शक्य होणार नाही त्यांच्यासाठी या पुस्तकांचे मराठीतून भाषांतरे केली जाऊन मराठीतूनच अभ्यासण्याची परवानगी असावी असे सांगितलेले होते.

न्यायमूर्ती रानडे यांनी विद्यापीठीय अभ्यासक्रमात देशी भाषांना स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केलेले होते. विद्यापीठीय शिक्षणात विविध अभ्यासक्रम स्थानिक भाषेत विशेषतः मराठी भाषेत अभ्यासता यावेत. त्याचबरोबर कलाशाखांतर्गत विद्यार्थ्यांना स्थानिक भाषा विषय निवडण्याची परवानगी असावी असा ठराव त्यांनी विद्यापीठाला सादर केला होता. परंतु अशा विषयांमुळे विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण पडेल या नावाखाली तो ठराव नाकारण्यात आला

होता. या अनुषंगाने न्यायमूर्ती रानडे यांनी पुन्हा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू इ.टी. कॅण्डीसाहेब यांना निवेदन पाठवून स्थानिक भाषेतील शिक्षणाची आवश्यकता सांगितलेली होती. या निवेदनात त्यांनी देशी भाषांची गरज सुरूवातीलाच नमूद केली होती. त्यांच्या दृष्टिकोनातून देशी भाषांच्या विकासासाठी विद्यापीठीय उच्च शिक्षणामध्ये देशी भाषांचा अभ्यास व साहित्य अभ्यासाची सोय असणे आवश्यक होते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्थानिक भाषांची आवड निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. यासाठी त्यांनी आपल्या निवेदनात बी.ए. व एम.ए. या वर्गासाठी जो वैकल्पिक भाषा विषय गट होता त्यात मराठी, गुजराती किंवा हिंदूस्तानी अशा स्थानिक भाषांचा पर्याय खुला करावा असे मत मांडलेले होते. आपल्या निवेदनात त्यांनी लिहिले होते "(1) that candidates, who take up languages as their optional subject at the B.A. Examination, should be allowed the option of taking up either Marathi, Gujaathi, canarese or Hindustani as an alternative to the other second languages from which they are already permitted to make a choice. No change will have to be made in the existing rules except the addition of these vernaculars to the list of other languages specified in rule 31, clause 2, page 46. (2) We also submit that the same choice should be allowed in respect of the optional second language in the languages course for the M.A. Examination by a similar change in rule 57, clause 1, page 64."[४४] म्हणजेच त्यांच्या मते विद्यापीठीय शिक्षणात स्थानिक भाषा विशेषतः मराठी भाषेचा स्वीकार होणे आवश्यक होते. आज जवळपास सर्वच विद्यापीठातून मराठी विषय मुख्य विषय घेऊन बी.ए.व एम.ए.ची पदवी घेता येते. हे न्यायमूर्ती रानडे यांच्या कार्याचेच फलित मानता येईल. त्यांनी केलेल्या पाठपुराव्यांमुळेच हा बदल विद्यापीठांनी केला असे म्हणता येईल.

### शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रमातील समावेश

त्या काळातील विद्यापीठामधील अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती अतिशय अवघड असल्याने या अभ्यासाच्या ओझ्याने पदवीधरांमध्ये मृत्यूचे प्रमाण अधिक होते. हे प्रमाण रोखण्यासाठी न्यायमूर्ती रानडे यांनी शालेय शिक्षणाबरोबरच विद्यापीठीय शिक्षणात शारीरिक

शिक्षण या विषयाचा सक्तीने समावेश करावा असे मत व्यक्त केले होते. आपल्या लेखात रानडेंनी लिहिले होते की, "Physical exercise should be made a part of college discipline and allowance should be made for success in it along with literary qualification."[४५] विद्यार्थ्यांवर येणारा अभ्यासक्रमाचा व परीक्षापद्धतीचा ताण केवळ शारीरिक शिक्षणासारख्या विषयामुळे दूर होऊ शकतो असे त्यांच्या विचारांवरून स्पष्ट होते. त्यामुळे हा विषय विद्यापीठाच्या शिस्तीचाच एक भाग बनावा असे त्यांनी सांगितले होते. शारीरिक शिक्षणासारख्या विषायांतर्गत विविध खेळ, व व्यायामप्रकार यांचा समावेश होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची मानसिकता व शारीरिक सहनशीलता चांगली वाढू शकते. म्हणून त्यांनी या विषयास महत्त्व दिले जावे असे मत व्यक्त केले होते. या विषयाच्या बाबतीत आजच्या परिस्थितीचा विचार करता शालेय वेळापत्रकात आठवडयाला वर्गनिहाय दोन तासिका दिलेल्या आहेत. विद्यापीठीय शिक्षणाचा विचार केला तर केवळ शारीरिक शिक्षण या विषयात पदवी मिळविणाऱ्यांनाच हा विषय अभ्यासण्यासाठी आहे. इतर विषयांच्या विद्यार्थ्यांना हा विषय अभ्यासण्यासाठी नाही. म्हणजेच रानडेंनी या विषयाची जी समस्या मांडलेली होती ती आजही तशीच असल्याची दिसते. यात निश्चितच बदल होणे अपेक्षित आहे.

### शिक्षणात औद्यागिक व व्यवसायिक अभ्यासक्रमांचा समावेश

आपले अभ्यासक्रमविषयक विचार मांडताना न्यायमूर्ती रानडे यांनी अभ्यासक्रम सर्व सामावेशक कसा बनेल याचा विचार केलेला होता. या अनुषंगाने त्यांनी शिक्षणात विशेषतः उच्च शिक्षणात शेती विषयक अभ्यासक्रमांचा समावेश असावा असेही विचार मांडलेले होते. त्यांच्या मते देशाची अर्थ व्यवस्थाही देशातील औद्यागिक विकास, व्यवसायिक विकास व शेती विकासावर अवलंबून असते. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी विविध उद्योगधंद्यांवर व व्यवसायांवर अधारित प्रशिक्षण देणारे अभ्यासक्रम राबविले जाणे आवश्यक होते. न्यायमूर्ती रानडे यांनी 'देशी व्यापार व तो सुधारण्याचे उपाय' याविषयावर व्याख्यान दिलेले होते. या व्याख्यानात त्यांनी औद्योगिकरणाची आवश्यकता सांगितलेली होती. आपल्या भाषणात ते म्हटले होती की, "शेतकीवर अवलंबून राहण्याची संवय आम्हांस जडली

आहे. कांसेवरच्या गोचिडीसारखी आमची स्थिति आहे. धान्य असूनहि दुष्काळांत तें विकत घेण्याची ऐपत शेकडा ८० – ९० लोकांना असत नाहीं. आपला पैसा कारखान्यांत घालून आपण बऱ्याच लोकांस भाकर विकत घेण्याला द्रव्य पोंचविलें पाहिजे. मुंबईस दुष्काळ दिसत नाही, याचें कारण काय? याचा विचार केल्यास कारखान्यांचे महत्त्व समजून येईल."[४६] एकूणच त्यांच्या या विचारांवरून एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे केवळ शेतीवर अधारभूत भारतीय लोक राहिले तर त्यातून भारताचा आर्थिक विकास साधला जाणार नाही. यासाठी त्यांनी तंत्र शिक्षणाची आवश्यकता आहे असे सांगितले होते. त्यांच्या मते इंग्लंडमधील लोक हे उद्योगी होते. ते नेहमी नवीन उद्योगधंदे व व्यवसाय यात व्यस्त असत त्यामुळेच त्यांच्यात अधिक आर्थिक भरभराट झालेली होती. भारतीयांकडे या बाबतीत अज्ञान असल्यामुळे उद्योगधंदे व व्यवसायाच्या क्षेत्रात भारतीयांची फारशी प्रगती झाल्याचे दिसत नव्हते. त्यांच्या मते भारतीय लोक युरोपियन देशातील शास्त्रज्ञांनी जी यंत्रे बनविली त्या यंत्रांचे उपभोग घेत होते, परंतु अशा यंत्रांप्रमाणे आपणही काही नवीन कारखाने उभारून विविध वस्तू बनवू शकतो असे विचार भारतीयांच्या मनात येत नव्हते. याचे मुख्य कारण म्हणजे तांत्रिक शिक्षणाची भारतातील अनास्था हेच म्हणावे लागेल. ब्रिटिश उद्योगधंद्यांची भारतात का भरभराट झाली याचे कारण न्यायमूर्ती रानडे यांनी भारतीय उद्योगधंद्यांच्या ऱ्हासात सांगितलेले होते. ब्रिटिशांनी स्थनिक परिस्थितीशी स्पर्धा करून स्वतःचा स्वार्थ साधलेला होता. ब्रिटिशांचे उद्योगधंदे भारतात प्रचंड भरभराटीस आले त्याचे कारण म्हणजे भारतीय लोक केवळ शारीरिक श्रमावर अवलंबून राहणारे होते. त्यांच्याकडे वैज्ञानिक ज्ञानाचा व कौशल्याचा अभाव होता. त्याचबरोबर काहींना स्वतःची किंमत न कळल्यामुळे आळशीपणा त्यांच्यात भरलेला होता. भारतीयांनी आपल्यातील आळस व अज्ञान घालवून काही व्यवसायिक कौशल्ये हस्तगत केली तर भारताचीही भरभराट झाल्याशिवाय राहणार नाही. यासाठी तंत्र व व्यवसाय शिक्षणाची आवश्यकता रानडेंना वाटत होती असे त्यांच्या विचारांतून दिसून येते.

## ८) न्यायमूर्ती रानडे यांचे परीक्षापद्धती विषयक विचार

शिक्षण पद्धतीमध्ये अध्ययन अध्यापनाबरोबरच परीक्षा पद्धतीला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. अध्ययन व अध्यापन किती प्रभावीपणे घडून आले याचे मूल्यमापन करण्याचे साधन तंत्र हे परीक्षा असतात. या मूल्यमापन पद्धतीत शिक्षणाची व ठराविक विषयाची उद्दिष्टे कितपत साध्य झाली ते तपासले जाते. "Evaluation is a systematic process of determining the extent to which educational objectives are achieved by pupils. It is process that determines the attainment of an objective, effectiveness of learning experiences and the accomplishment of the goal of education in general."[४७] म्हणजेच अध्ययन अध्यापन व अभ्यासक्रम यांच्या एवढेच महत्त्व असलेली बाब म्हणजे मूल्यमापन पद्धती किंवा परीक्षा पद्धती होय. न्यायमूर्ती रानडे यांनी त्याकाळातील परीक्षा पद्धतीचे सखोल परीक्षण केलेले होते व त्यातील त्रुटी दाखविण्याचा प्रयत्न केलेला होता.

न्यायमूर्ती रानडे यांनी १५ एप्रिल १८९४ रोजी 'मुंबई ग्रॅज्युएट असोसिएशन' समोर 'Why Graduates Die young?' या आशयाचे भाषण केलेले होते. या भाषणातून त्याचबरोबर ६ सप्टेंबर १८९५ रोजी मुंबई विद्यापीठाच्या सिनेट सभेत विद्यापीठ कायद्यासंदर्भात मांडलेल्या विचारातून त्यांचे विद्यापीठीय परीक्षांविषयक विचार स्पष्ट होतात. त्यांच्या मते भारतीय शिक्षणपद्धतीत परीक्षांना अवास्तव महत्त्व दिले जात होते. त्याचबरोबर शिक्षक ज्ञानदान करताना केवळ परीक्षा डोळयासमोर ठेवूनच अध्यापन करीत होते. न्यायमूर्ती रानडे यांच्या मते विविध वर्गांसाठी नेमलेला अभ्यासक्रम जेवढा क्लिष्ट होता तेवढयाच परीक्षाही क्लिष्ट होत्या. त्यामुळे या परीक्षा पद्धतीच्या जाचामुळे कित्येक पदवीधरांना अकाली मृत्यू आलेला होता. न्यायमूर्ती रानडेंच्या मते अभ्यास व परीक्षांचा मानसिक त्रास गरीब लोकांना अधिक होत होता. त्यामुळे अधिकाधिक मृत्यू हा गरीब तरूणांचा झालेला होता. त्यांनी गरिबीचे भक्ष्य ठरलेल्या काही पदवीधरांच्या नावांचाही उल्लेख आपल्या लेखात केलेला होता. वास्तविक गरीब लोकांकडे शिक्षणावर खर्च करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसतो. अशाही परिस्थितीत काही लोक खूप कष्टपूर्वक पैसा गोळा करून विद्यापीठीय पदवी मिळविण्याचा प्रयत्न करतात,

परंतु हा अभ्यासक्रम त्यांना अतिशय अवघड वाटतो. विविध परीक्षा व स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी कराव्या लागणाऱ्या अतिरिक्त अभ्यासामुळे मृत्यूंचे प्रमाण पदवीधर तरूणात अधिक होते असे त्यांचे मत होते. या अनुषंगाने रानडे म्हटले होते की, "The chief of these causes is over-study and the strain caused by the stiff system of frequent competitive examinations in subjects which have to be mastered in a foreign language, and which tax the powers of the students with burdens and anxieties beyond their endurance."[४८] म्हणजेच त्यांच्या दृष्टिकोनातून गरिबी व दारिद्रय यापेक्षा महत्त्वाचे मृत्यूचे कारण हे परीक्षा पद्धती हे होते. एकाच वर्षात अनेक परीक्षा घेतल्या जातात व या परीक्षा परकीय भाषांमध्ये असतात त्यामुळे विद्यार्थ्यांना या परीक्षांचा अभ्यासक्रम पेलवत नाही व त्यांची काळजी एवढी वाढते की, सहनशीलतेच्या पुढे जाते.

परीक्षा या मूल्यमापनाचा एक घटक असतात. त्या किती असाव्यात व त्यांची कठीणता किती असावी याविषयी काही मर्यादा असायला हव्यात. विद्यापीठात परीक्षांना अवास्तव महत्त्व देणाऱ्यांच्या मते परीक्षा या अत्यावश्यक असतात कारण त्यामुळे हुशार, मध्यम व कमी हुशार असे गट पडतात व हुशारांना वेगळे निवडता येते. अशा लोकांच्या दृष्टिकोनातून परीक्षा महत्त्वाच्या का असतात याचे वर्णन रानडेंनी केलेले होते. "They talk of separating the chaff from the grain. It must be a very curious process of separating which results in leaving three grains at the bottom of the sieve. And then what becomes of these three grains? The Vice-Chancellor has told us from his place in the Convocation that from 20 to 40 per cent . of them die prematurely, the death being larger among those who pass in the higher examinations and in the Maratha Hinduoo community than in others."[४९] म्हणजेच परीक्षांना महत्त्व देणाऱ्यांसाठी परीक्षा या मळणी यंत्र किंवा सुपासारख्या असतात. मळणी यंत्राद्वारे धान्य फोलकटांपासून वेगळे केले जाते. परीक्षांच्या माध्यमातून हुशार विद्यार्थी म्हणजेच धान्य निर्बुद्ध मुलांपासून म्हणजेच फोलकटांपासून दूर केले जाते. यासाठी परीक्षा त्यांना महत्त्वाच्या वाटतात. रानडेंच्या मते जर याच परीक्षांमधून ज्या हुशारांना निवडले गेले त्यापैकी शेकडा वीस ते तीस जण अकाली मरत असतील तर या परीक्षा पद्धतीचा काय उपयोग असू शकतो? एकूणच समाजातील काही

लोकांना केवळ परीक्षेत नापास झाले म्हणून त्यांना फोलकट समजून शिक्षणाच्या प्रवाहातून बाजूला करणे निश्चितच अयोग्य आहे असे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते. परीक्षा पद्धतीमुळे एक प्रकारे शिक्षणाला अश्व शर्यतीचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. "शिक्षण म्हणजे अश्वशर्यत नव्हे की ज्यामध्ये सर्वोत्कृष्ट अश्व प्रथम यावा."[५०] परीक्षांना अवास्तव महत्त्व दिले गेल्यामुळे विद्यार्थी व शिक्षक दोघेही परीक्षाकेंद्री बनतात व त्यामुळे शिक्षण घेण्याचा व ठराविक असा विषय अभ्यासण्याची जी उद्दिष्टे असतात ती साध्य करण्याकडे दुर्लक्ष होते.

न्यायमूर्ती रानडे यांनी तत्कालीन परीक्षापद्धतींचा अभ्यास करून त्यातील दोष शोधलेले होते. भारतीय विद्यापीठातील परीक्षा या खूप क्लिष्ट होत्या. त्यामुळे पदवी परीक्षांमध्ये नापास होणाऱ्यांचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात होते. त्यांच्या मते भारतीय विद्यार्थ्यांचे नापास होण्याचे प्रमाण लंडन मधील विद्यार्थ्यांपेक्षाही अधिक होते. त्यांनी लंडन विद्यापीठातील व मुंबई विद्यापीठातील नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण सांगितले होते.

"Percentage of failures

| Examination. | London University. 1838-1888. | Bombay University. 1891-94 |
|---|---|---|
| Matriculation…. | 43 | 72 |
| Privious……….. | … | 67 |
| Intermediate….. | 28 | 35 |
| B.A…………… | 42 | 57 |
| L.M…………… | 24 | 59 |
| LL.B………….. | 35 | 63"[५१] |

या आकडेवारीवरून स्पष्ट लक्षात येते की, वरील प्रत्येक परीक्षेमध्ये नापास होणाऱ्या मुंबई विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण लंडन विद्यापीठातील विद्यार्थ्यांपेक्षा खूप अधिक होते. याचे कारण भारतीय विद्यार्थी हे लंडन मधील विद्यार्थ्यांपेक्षा कमी हुशार होते असे नाही तर भारतीय विद्यार्थ्यांची परिस्थिती व क्लिष्ट परीक्षापद्धती हे होते.

विद्यापीठीय शिक्षणामध्ये जेवढे विषय परीक्षांसाठी होते तेवढ्यापैकी केवळ एका विषयात जरी विद्यार्थी नापास झाला तरी त्यास नापास घोषित करण्यात येई. हाही त्यांना परीक्षापद्धतीचा खूप मोठा दोष वाटत होता. विद्यार्थी एक विषयात नापास झाला यापेक्षा तो उर्वरित पाच विषयात पास झाला हे पाहणे रानडेंना महत्त्वाचे वाटत होते. विद्यार्थी केवळ एक विषयात नापास झाला या कारणास्तव त्याला पुढच्या वर्गात प्रवेश देणे टाळले जात होते. त्याचबरोबर पुढील वर्षी त्याला सर्व विषयात परीक्षा द्यावी लागत होती. हा विद्यार्थ्यांवरील एक अन्यायच होता असे त्यांच्या विचारातून दिसते. या बाबतीत न्यायमूर्ती रानडेंचा असा प्रश्न होता की, "There is no earthly reason why if a man has passed in five out of six subjects and failed in the remaining one, he should be required to face the chance year after year of again passing or failing in all subjects instead of being permitted to appear in the one or more subjects in which he may have failed."[५२] म्हणजेच एखादा विद्यार्थी एक विषयात नापास झाला तरीही त्यास पुढील वर्षी सर्व विषयात परीक्षा द्यावी लागत असे. रानडेंच्या मते या पद्धतीची सर्वात खेदजनक बाब अशी होती की, कित्येक विद्यार्थी आगोदर ज्या विषयात पास झालेले असत त्याच विषयात पुन्हा परीक्षा देताना नापास व्हायचे. या संबंधाने न्यायमूर्ती रानडे यांनी काही अहवाल गोळा केलेले होते. त्या प्रत्येक अहवालात बरेच असे विद्यार्थी होते की जे पूर्वी काही विषयात नापास झालेले असल्यामुळे पुन्हा परीक्षा द्यायचे त्यांचे पूर्वी सुटलेले विषय पुन्हा नापास व्हायचे. एकूणच केवळ पुढच्या वर्गात प्रवेश मिळवायचा या उद्देशाने हे विद्यार्थी या परीक्षांच्या दुष्ट चक्रात अडकले जायचे व शेवटी नाइलाजास्तव शिक्षण सोडून द्यायचे. हे सर्व दोष त्यांना भारतीय विद्यापीठीय शिक्षणातील वाटत होते. त्यावर त्यांनी काही उपायही सुचविले होते. आजच्या काळाचा विचार करता त्यांनी सुचविलेल्या उपायांपैकी काही उपाय आजच्या काळातील विद्यापीठांनी स्वीकारलेले दिसतात.

त्यांच्या मते विद्यार्थी ज्या विषयात नापास होतील त्याच विषयाची परीक्षा नंतर व्हावी. जे विषय अगोदर सुटलेले आहेत त्या विषयातून त्याला सूट मिळावी. आजच्या काळातील

विद्यापीठ नियमानुसार सुटलेल्या विषयात पुन्हा परीक्षा देण्याची गरज पडत नाही. अगदीच कमी विषयात नापास होणाऱ्या मुलांचे वर्ष वाया जाऊ नये असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांना पुढील वर्षात प्रवेश मिळावा व पुढील वर्षाचा अभ्यास चालू असतानाच त्यांच्या मागील वर्षीच्या नापास विषयाची परीक्षा घेण्यात यावी. आज सर्वच विद्यापीठात ए.टी.के.टी. हा नियम सुरू करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण मंडळाने इयत्ता १० वीत किमान दोन विषयात नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांनाही हा नियम सुरू केलेला आहे. दोन विषयात नापास झालेले विद्यार्थी पुढील वर्गात प्रवेश घेऊ शकतात.

ऑक्सफर्ड विद्यापीठांप्रमाणे प्रारंभीच्या परीक्षा या कॉलेज पातळीवरच घेण्यात याव्यात असाही उपाय रानडेंनी सूचविला होता. "These College examinations will be conducted by men in sympathy with the students, by men who know their students all the year round as human beings, and not as mere machines."[५३] रानडेंच्या मते महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविणारे प्राध्यापक आपल्या विद्यार्थ्यांना चांगले ओळखतात. त्यांनाच विद्यार्थ्यांच्या परिस्थितीची जाणीव असू शकते. त्यामुळे विद्यापीठे जी यांत्रिक पद्धतीने परीक्षा घेतात त्याऐवजी कॉलेज पातळीवर वर्षादरम्यानच्या सत्र परीक्षा व्हाव्यात. केवळ शेवटची परीक्षा विद्यापीठांनी घ्यावी असे रानडेंना वाटत होते. विद्यापीठीय परीक्षांचे प्रस्थ कमी केल्यामुळे शिक्षक परीक्षांपेक्षा अभ्यासक्रमातील उपयोगितेला अधिक महत्त्व देतील. हा एक महत्त्वाचा फायदा या उपायांचा रानडेंनी सांगितलेला होता.

न्यायमूर्ती रानडे यांनी मांडलेले परीक्षा पद्धतीविषयक विचार हे आजच्या काळातही खूप महत्त्वाचे असल्याचे दिसून येते. आजच्या काळातही विद्यार्थ्यांवर विविध परीक्षांचे अवास्तव ओझे टाकले जाते. आजच्या काळात अगदीच एखाद्या शाळेत किंवा महाविद्यालयात प्रवेश घेण्यापासूनच परीक्षा सुरू होतात. या परीक्षांच्या ओझ्याने विद्यार्थ्यांतील उपक्रमशीलता नाहीशी होऊन ते केवळ परीक्षांवरच लक्ष केंद्रीत करतात. महाराष्ट्र शासनाने याच विचारातून इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या परीक्षा पद्धतीत अमुलाग्र बदल केल्याचे

दिसून येते. विद्यार्थ्यांना परीक्षा या ओझे वाटता कामा नये. तसेच शिक्षण आनंददायी वाटावे या दृष्टिकोनातून हा बदल केल्याचे दिसून येते.

## ९) न्यायमूर्ती रानडे यांचा शिक्षकविषयक दृष्टिकोन

शिक्षणप्रक्रियेमध्ये विद्यार्थी व अभ्यासक्रम यांना जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व शिक्षकाला असते. मुळात अभ्यासक्रमात दिलेल्या ज्ञानाची अनुभूती शिक्षकांशिवाय विद्यार्थ्यांना मिळणे कदापि शक्य नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांची भूमिका जेवढी महत्त्वाची असते तेवढीच किंबहुना त्याच्याही पेक्षा अधिक महत्त्वाची भूमिका शिक्षकाची असते. कारण विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता जरी अध्ययनासाठी उपयुक्त असली तरी एखादा शिक्षक ज्या क्लुप्त्या किंवा साधन तंत्राचा उपायोग करून अध्यापन करतो त्याच्या अधारेच अधिकाधिक ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले जाऊ शकते. म्हणून शिक्षकाची भूमिका ही अधिक महत्त्वाची आहे असे न्यायमूर्ती रानडे यांना वाटत होते.

न्यायमूर्ती रानडे यांना जुन्याकाळातील गुरूकुल पद्धती खूप योग्य वाटायची. कारण या पद्धतीत विद्यार्थी गुरूगृही राहून शिक्षण संपेपर्यंत त्यांच्याकडून ज्ञानार्जन करायचे. या पद्धतीमुळे गुरू व विद्यार्थी यांच्यात एक घनिष्ठ नाते निर्माण व्हायचे. आश्रमात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा आपल्या गुरूंप्रती आदरभाव त्याचबरोबर या गुरूंना विद्यार्थ्यांना शिकविण्याची खरी तळमळ होती. त्यामुळे रानडेंना प्रचलित काळासारखे गुरू आजही असायला हवेत असे वाटत होते. “The teachings and the methods and the subjects taught in these days must be made to suit our new exigencies and environments, but the spirit animating the teachings must be the same as that which led the first settlers to cross the Vindhya Range, and establish their colonies in the South.”[५४] यावरून रानडेंचे विचार स्पष्ट होतात. त्यांच्या मते अगदीच प्राचीन काळची गुरूकुल पद्धती व त्याकाळचा अभ्यासक्रम हुबेहुब आजच्या काळासाठी संयुक्तिक ठरणार नाही. अभ्यासक्रम हा आधुनिक काळाच्या गरजांनुसार असला तरीही शिक्षक मात्र प्राचीन काळच्या गुरूंप्रमाणे असावेत. प्राचीन काळातील गुरूंना ज्याप्रमाणे आपल्या विद्यार्थ्यांविषयी प्रचंड आस्था होती. त्या पद्धतीचे

शिक्षक आजही असावेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाचे खरे सामर्थ्य कळू शकेल व विद्यार्थी शिक्षकांशी एकनिष्ठ राहून अधिकाधिक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या मते ज्ञानदानासाठी शिक्षकांनी जुन्या परंपरांचा अधार घ्यावा म्हणजे विद्यार्थ्यांत शिक्षणाविषयी आस्था निर्माण होईल.

आजच्या काळातील शिक्षण पद्धतीचा विचार करता आज औपचारिक शिक्षण पद्धती आहे. त्यामुळे हुबेहुब गुरूकुल पद्धतीसारखे शिक्षण विद्यार्थ्यांत सुरू करता येणे शक्य नाही. आज विद्यार्थी शिक्षकांच्या सानिध्यात केवळ काही तासांपुरतेच असतात त्यामुळे आजच्या काळात गुरू शिष्य परंपरा खंडीत होत असताना दिसत आहे. शिक्षक केवळ आपल्या आर्थिक फायद्याचाच विचार करून नोकरी करताना दिसतात तर विद्यार्थ्यांना ज्ञान मिळविणे व अभ्यास करणे ही प्रक्रिया खूप किचकट वाटते. त्यामुळे सहाजिकच त्यांना शिक्षकांप्रती आदरभाव वाटत नाही. न्यायमूर्ती रानडेंच्या मते अगदी जुन्या काळाप्रमाणेच गुरूकुल पद्धती सुरू करता येऊ शकत नसली तरीही काही पर्याय त्यासाठी करता येऊ शकतात. यावर उपाय म्हणून न्यायमूर्ती रानडे यांनी निवासी शाळांचा पर्याय मांडला होता. त्यांच्या मते विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात व शाळांमध्ये वसतिगृहांची सोय असावी. तसे केल्यामुळे विद्यार्थी कायम स्वरूपी शिक्षकांच्या सानिध्यात राहतील व त्यामुळे त्यांचे लक्ष केवळ शिक्षणाकडे राहू शकेल. महाविद्यालयात सर्वांचे वास्तव्य असल्याने विविध समस्यांवर व प्रश्नांवर सामुहिक चर्चा करून पर्याय काढता येणे शक्य असते. यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांनी वसतिगृहात राहणे आवश्यक आहे असे त्यांच्या विचारांवरून दिसून येते.

रानडेंच्या मते जो कोणी शिक्षकी पेशा स्वीकारतो तो जबाबदार नागरिक असला पाहिजे. त्याला केवळ अध्यापन करणे एवढेच काम महत्त्वाचे वाटू नये. न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या 'वसिष्ठ आणि विश्वमीत्रा' या लेखात आधुनिक शिक्षकास काय भूमिका बजवावी लागणार आहे या विषयी चर्चा केली होती. त्यांच्या मते शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या ठायी असलेल्या सुप्त शक्तींची जाणीव करून द्यावी. त्याच बरोबर सभोवतालच्या जगात असणाऱ्या चांगल्या गोष्टी कोणत्या याचीही जाणीव त्यांना करून द्यावी म्हणजे

त्यांच्यातील चांगुलपणाची अभिव्यक्ती होऊ शकेल. न्यायमूर्ती रानडेंनी शिक्षकांच्या कर्तव्याविषयी लिहिले होते की, "Our teachers must enable their pupils to realize the dignity of man as man, and to apply the necessary correctives to tendencies towards exclusiveness which have grown in us with the growth of ages. They must see that our thoughts, our speech, our actions are inspired by a deep love of humanity, and that our conduct and our worship are freed where necessary from the bodage of custom and made to conform as far as possible to the surer standard of our conscience."[५५] प्रत्येक विद्यार्थ्यांत वाढत्या वयानुसार काही दुर्गुण येत जातात. विशेषतः स्वतःविषयी मिथ्या स्वाभिमान त्याच्या ठायी निर्माण होत जातो. तो दूर करण्याचे प्रयत्न शिक्षकालाच करणे गरजेचे आहे. या बाबीकडे शिक्षकाने दुर्लक्ष करता कामा नये. प्रत्येक विद्यार्थ्याची वाणी, विचार व कृती ही मानवतावादी विचारातून निर्माण झालेली असावी. त्यामुळे शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना मानवतावादी दृष्टिकोन शिकविणे आवश्यक आहे असे त्यांच्या विचारातून दिसते. समाज घडविण्याची प्रमुख जबाबदारी ही शिक्षकाची असते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शिक्षकाने आपल्या कर्तव्याशी प्रतारणा करू नये. शिक्षकाने आपल्याकडील ज्ञान व बुद्धिमत्तेच्या जोरावर विद्यार्थ्यांमध्ये आपल्याविषयी आदर निर्माण करावा. कारण शिक्षकांच्या ठायी असलेल्या गुणांची छाप विद्यार्थ्यांवर पडली तर ते विद्यार्थीही गुणवान होतात. त्यामुळे त्यांचा आपल्या शिक्षकावरील विश्वास वाढत जातो.

एकूणच अशा प्रकारची भूमिका शिक्षकाची अध्यापन करताना असावी. वास्तविक आधुनिक काळातील शिक्षकांच्या भूमिकेविषयी विचार केला तर आज बहुतेक शिक्षक केवळ आपल्या विषयांच्या अध्यापनास महत्त्व देताना दिसतात. शिक्षक केवळ विषयाला महत्त्व देत असल्यामुळे मुल्यात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांमध्ये बदल घडताना दिसत नाही. यामुळे खऱ्या ज्या शिक्षणाकडून अपेक्षा आहेत त्या पूर्ण होताना दिसत नाहीत. आजच्या काळात शिक्षकी पेशास धंदेवाईक स्वरूप आले आहे असेही म्हणता येऊ शकते. मुळात अध्यापन ही प्रक्रिया केवळ पगार मिळतो म्हणून करावयाचे काम नाही. अध्यापन या कामाचे मुल्यच पगारात होऊ

शकत नाही. या अनुषंगाने शिक्षकांमध्ये सकारात्मक बदल व्हावा असेही रानडेंच्या विचारातून दिसून येते.

महात्मा जोतिबा फुलेंप्रमाणेच न्यायमूर्ती रानडे यांनी शिक्षक प्रशिक्षित असावे असा विचार मांडलेला होता. प्रभावी अध्यापनासाठी प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता असते. परंतु तत्कालीन समाजात प्रशिक्षित शिक्षकांची खूप कमतरता होती. त्यांच्या मते एकूण शिक्षकांपैकी जवळपास शेकडा ६५ ते ७० एवढे शिक्षक हे अप्रशिक्षित होते. या अनुषंगाने त्यांनी पुणे व सोलापूर येथील शिक्षकांची संख्या आपल्या लेखात सांगितलेली होती. त्यात त्यांनी लिहिले होते की, "In the Poona and Sholapoor Districts, for which we have obtained detailed figures, we find that out of a total of 634 masters, only 161 are trained."[५६] त्यांनी सांगितलेल्या या आकडेवारीवरून एकोणिसाव्या शतकातील अप्रशिक्षित शिक्षकांची संख्या अधिक असल्याचे दिसून येते. त्यांनी सांगितलेल्या आकडेवारीनुसार या जिल्ह्यांतील एकूण ६३४ शिक्षकांपैकी केवळ १६१ एवढेच शिक्षक प्रशिक्षित होते. म्हणजेच शेकडा प्रमाणाचा विचार केला तर केवळ शेकडा २५ एवढे शिक्षक प्रशिक्षित तर शेकडा ७५ एवढे शिक्षक अप्रशिक्षित होते. निश्चितच प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण अतिशय कमी होते. त्यामुळे शिक्षक प्रशिक्षण देणाऱ्या विद्यालयांची स्थापना केली जावी असे त्यांना वाटत होते.

## १०) शिक्षणात ग्रंथांची आवश्यकता

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते शिक्षण प्रक्रियेत ग्रंथांना विशेष महत्त्व असते. औपचारिक शिक्षणात ठरवून दिलेला अभ्यासक्रम व त्याअनुषंगाने संदर्भ ग्रंथ हे शिक्षणाचे प्रमुख साधन असतात. त्याचबरोबर अनौपचारिक शिक्षणात विविध विषयांवर अधारित अवांतर ग्रंथांच्या माध्यमातून ज्ञान व माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. तत्कालीन कालखंडात लोकभाषेमध्ये उपलब्ध असणाऱ्या ग्रंथांची संख्या खूप कमी होती. परकीय भाषांचे ज्ञान अधिक लोकांना नसल्याने इतिहास, विज्ञान, चरित्रे यासारखी पुस्तके वाचण्याची सोय अनेक लोकांना नव्हती. या दृष्टीकोनातून देशी भाषेमध्ये अधिकाधिक साहित्य निर्मिती व्हावी म्हणून

न्यायमूर्ती रानडे यांनी नाशिक येथे बदली झालेली असतांना 'ग्रंथोत्तेजक मंडळी' ही संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतलेला होता. या संस्थेचा मुख्य उद्देश न्यायमूर्ती रानडे यांनी पुढील प्रमाणे सांगितलेला होता. "पुस्तककर्त्यांनी पुस्तकें लिहिण्याची मेहेनत घेतल्यावर त्या पुस्तकांची योग्यता चांगली आहे अशाविषयीं लोकांच्या घरोघर जाऊन अभिप्राय मिळविण्याची खटपट करावी लागते व मग ते प्रसिद्ध करण्याकरितां वर्तमानपत्रांकडे जावयाचे. या ग्रंथकराच्या मार्गातल्या अडचणी दूर व्हाव्या म्हणून मंडळी निघाली. हा उद्देश सर्वसंमत आहे."[५७] रानडेंच्या काळात देशी भाषेत साहित्य निर्मितीकरिता विशेष प्रोत्साहन दिले जात नव्हते. ग्रंथ लिखाणाचे काम खूप थोडे लोक करीत असत कारण हे काम खूप क्लिष्ट असायचे. एखाद्या लेखकाने एखादे पुस्तक लिहिले तर ते छापण्यापूर्वी त्या पुस्तकाचा दर्जा ठरविण्यासाठी त्या लेखकास अनेक लोकांकडून अभिप्राय मिळवावे लागत असत व नंतरच ते छापले जाई. या कष्टप्रद बावीमुळे अनेकजण पुस्तक लिखाणाचे काम टाळीत असत. न्यायामूर्ती रानडेंच्या मते जर अशा पुस्तकांचे परीक्षण करणारी एखादी समिती असेल तर लेखकांना सहजपणे आपल्या ग्रंथाविषयी मार्गदर्शन मिळू शकेल. याच हेतूने त्यांनी 'ग्रंथोत्तेजक मंडळी' या संस्थेची स्थापना केलेली होती. या संस्थेमध्ये न्यायमूर्ती रानडेंना रावजीशास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूनकर, कृष्णशास्त्री तळेकर व गोपाळराव हरी देशमुख यासारख्या मंडळींची मदत होत असे.

'ग्रंथोत्तेजक मंडळी' स्थापन करण्यापाठीमागे न्यायमूर्ती रानडेंचा साहित्य लिखाणास प्रोत्साहन देणे हा प्रमुख उद्देश होता असे लक्षात येते. अर्थात समाजातून त्यांना या कामी खूप असे सहकार्य मिळाले नव्हते. त्यांनी ५०० वर्गणीदार झाले की लगेच प्रत्यक्ष कार्याला सुरूवात करायची असे ठरवले होते. त्यांच्या नियोजनानुसार ८०० वर्गणीदार झालेले होते परंतु प्रत्यक्षात देणगी मात्र खूप कमी प्रमाणात गोळा झालेली होती. यावरून त्याकाळातील लोकांची साहित्याप्रती असलेली अनास्था दिसून येते. अर्थात न्यायमूर्ती रानडे आपल्या कार्यातील सातत्याचे प्रयत्न मात्र सोडले नव्हते. त्यांनी आपल्या अहवालात मांडलेल्या विचारांवरून ते आपल्या कार्याविषयी किती दृढनिश्चयी होते हे स्पष्ट दिसून येते. अपल्या अहवालात त्यांनी

लिहिले होते की, "वर्गणी वसूल करण्याचे कामीं बहुत पत्रें धाडलीं. तगादेहि पुष्कळ केले. त्या संबंधानें एकंदर सुमारे ३० रूपये बुडीत खर्च आला. ज्याकडे पत्रें धाडलीं व तगादे झाले त्या गृहस्थांचीं नावें येथें लिहिणें अवश्य नाहीं. पण ते सर्व विद्वान् आणि सभ्य यांत मोडत आहेत. तेव्हां त्यांजकडून या कामीं अशी अनास्था झाली हें देशाचें दुर्भाग्य होय. तथापि एवढयाकरितां अजीबात उद्योग सोडून देऊन निराश होणें हेंहि वाजवी नाहीं, असें व्यवस्थापकांचें मत आहे."[५८] यावरून 'ग्रंथोत्तेजक मंडळीचे' कार्य चांगल्या पद्धतीने चालावे यासाठी त्यांनी किती चिकाटीचे प्रयत्न केलेले होते हे दिसून येते. त्यांनी ग्रंथोत्तेजक मंडळी बरोबरच साहित्य संमेलने भरवूनही साहित्य निर्मितीला चालना देण्याचा प्रयत्न केलेला होता. म्हणजेच त्यांनी केवळ शालेय शिक्षणाचाच विचार केलेला नव्हता तर शिक्षणात ग्रंथांचे महत्त्व ओळखून ग्रंथ निर्मितीला चालना देण्याचाही प्रयत्न केलेला होता. या ग्रंथ निर्मितीच्या माध्यमातून प्रौढांनाही शिक्षणाची द्वारे अखंड खुली करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला होता.

एकूणच या सर्व मुद्यांचा विचार करता न्यायमुर्ती रानडेंच्या विचारांना एक शैक्षणिक बैठक होती असे स्पष्ट दिसून येते. त्यांचे शिक्षण विचार हे केवळ पुस्तकी ज्ञानाच्या अधारावर निर्माण झालेले नव्हते तर तत्कालीन समाजाची परिस्थिती व या समाजातील शिक्षण पद्धतीचा वस्तुनिष्ठ व समिक्षात्मक पद्धतीने केलेला अभ्यास यातून निर्माण झालेले होते. त्यामुळे या विचारांना तात्त्विक अधिष्ठान प्राप्त होते. त्यांनी मांडलेल्या शिक्षण विचारपैकी अनेक विचार हे महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांशी मिळतेजुळते वाटतात. त्यांनी मांडलेल्या विचारांमध्ये तत्कालीन समाज्याच्या अडचणींचा अभ्यास त्याचबरोबर भविष्याचा वेध घेण्याची एक दूरदृष्टी होती. हे विचार एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीतून त्या समाजाची गरज म्हणून जरी रानडेंनी मांडलेले असले तरीही ते आजच्या प्रगत कालखंडातही तेवढेच उपयुक्त वाटतात. विद्यापीठीय शिक्षणविषयक त्यांचे विचार आजच्या काळातही खूप उपयुक्त असल्याचे दिसून येते. विशेषतः आजच्या काळात विद्यापीठीय शिक्षणात जे बदल झालेले आहेत त्यांच्यामध्ये रानडेंच्या विचारांचा प्रभाव निश्चित जाणवतो.

न्यायमूर्ती रानडे यांनी परीक्षा पद्धतींचे ओझे विद्यार्थ्यांच्या शिरावरून कमी व्हावे असे विचार मांडलेले होते. आजचे जर महाराष्ट्र शासनाचे सर्व शिक्षा अभियानाचे धोरण पाहिले तर तेही अशाच प्रकारचे आहे. आज इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे ओझे कमी करून आनंददायी पद्धतीने शिक्षण कसे घेता येईल याचा विचार केला जात आहे. ही न्यायमूर्ती रानडेंच्या विचारांचीच फलश्रुती म्हणता येईल.

## ५.४ संदर्भ


१) रानडे दा.पां.: 'न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे', चत्रशाळा प्रकाशन, पुणे-२, तृतीयावृत्ती १९५०, पृ.क्र.७.

२) कित्ता, पृ.क्र. २०.

३) फाटक नरहर रघुनाथ : 'न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे', नीलकंठ प्रकाशन, पुणे, आवृत्ती १९२४, पृ.क्र. ३४.

४) कित्ता, पृ.क्र. ४०,४१.

५) टोपे त्र्यं.कृ.: 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व', रोहन प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२ पृ.क्र. ७७.

६) Ranade Ramabai: 'Miscellaneous writings of the late Hon'ble Mr. Justice M.G. Ranade', Sahitya Akademi, Delhi, First Published 1915, Reprinted 1992, Page No 288.

७) कर्वे द.गो.: 'स्वतंत्र भारताचे द्रष्टे : न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे', अनुवादक कुलकर्णी गो.म., आर्यभूषण मुद्रणालय, शिवाजीनगर पुणे, पृ.क्र २१६.

८) फाटक नरहर रघुनाथ : 'न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे', नीलकंठ प्रकाशन, पुणे, आवृत्ती १९२४, पृ.क्र. २४६.

९) कित्ता, पृ.क्र. १९४.

१०) कित्ता, पृ.क्र. १९६.

११) रमाबाई रानडे : 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी', वरदा प्रकाशन, तिसरी आवृत्ती: जून २०१२, पृ.क्र.८५.

१२) फाटक नरहर रघुनाथ : 'न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे', नीलकंठ प्रकाशन, पुणे, पृ.क्र.२४७.

१३) टोपे त्र्यं.कृ.: 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व', रोहन प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२ पृ.क्र.१६३,१६४.

१४) रमाबाई रानडे : ‘आमच्या आयुष्यातील काही आठवणी’, वरदा प्रकाशन, तिसरी आवृत्ती: जून २०१२, पृ.क्र.५८.

१५) Ranade Ramabai: ‘Miscellaneous writings of the late Hon’ble Mr. Justice M.G. Ranade’, Sahitya Akademi, Delhi, First Published 1915, Reprinted 1992, Page No 249,250.

१६) कित्ता, पृ.क्र. २५०.

१७) कित्ता, पृ.क्र. २५२.

१८) Grover Verinder (Editor) : ‘Mahadev Govind Ranade : A Biography of His Vision and Ideas’, Address at first Industrial Conference, Deep and Deep Puplications, New Deldhi, Page No. 393.

१९) Ranade Ramabai: ‘Miscellaneous writings of the late Hon’ble Mr. Justice M.G. Ranade’, Sahitya Akademi, Delhi, First Published 1915, Reprinted 1992, Page No 259.

२०) कित्ता, पृ.क्र. २६२,२६३.

२१) कित्ता, पृ.क्र. २६७.

२२) कित्ता, पृ.क्र. २६७.

२३) कित्ता, पृ.क्र. २६८.

२४) कित्ता, पृ.क्र. २६८.

२५) कित्ता, पृ.क्र. २६८.

२६) कित्ता, पृ.क्र. २७०.

२७) कित्ता, पृ.क्र. २७१.

२८) कित्ता, पृ.क्र. २७१,२७२.

२९) कित्ता, पृ.क्र. २७२.

३०) कित्ता, पृ.क्र. २७३.

३१) कित्ता, पृ.क्र. २७३.

३२) कित्ता, पृ.क्र. २७६.

३३) कित्ता, पृ.क्र. २८०,२८१.

३४) कित्ता, पृ.क्र. २७९.

३५) कित्ता, पृ.क्र. २८५

३६) कित्ता, पृ.क्र. २८५.

३७) कित्ता, पृ.क्र. २८६.

३८) कित्ता, पृ.क्र. २८९.

३९) कित्ता, पृ.क्र. २८९,२९०.

४०) कित्ता, पृ.क्र. २९२.

४१) कित्ता, पृ.क्र. २६६.

४२) कित्ता, पृ.क्र. ३०८.

४३) कर्वे द.गो.: 'स्वतंत्र भारताचे द्रष्टे ः न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे', अनुवादक कुलकर्णी गो.म., आर्यभूषण मुद्रणालय, शिवाजीनगर पुणे, पृ.क्र २३१.

४४) टोपे त्र्यं.कृ.: 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्व', रोहन प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२, परिशिष्ट ३, पृ.क्र. ३१७.

४५) Ranade Ramabai: 'Miscellaneous writings of the late Hon'ble Mr. Justice M.G. Ranade', Sahitya Akademi, Delhi, First Published 1915, Reprinted 1992, Page No 314.

४६) फाटक नरहर रघुनाथ : 'न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे', नीलकंठ प्रकाशन, पुणे, आवृत्ती १९२४, पृ.क्र.३०८.

४७) मासिक: 'शिक्षण संक्रमण', महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुण, फेब्रुवारी २००९, पृ.क्र. २१

४८) Ranade Ramabai: 'Miscellaneous writings of the late Hon'ble Mr. Justice M.G. Ranade', Sahitya Akademi, Delhi, First Published 1915, Reprinted 1992, Page No 307.

४९) कित्ता, पृ.क्र. ३२७.

५०) मासिक : 'शिक्षण संक्रमण', महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, फेब्रुवारी २००८, पृ.क्र.१८

५१) Ranade Ramabai: 'Miscellaneous writings of the late Hon'ble Mr. Justice M.G. Ranade', Sahitya Akademi, Delhi, First Published 1915, Reprinted 1992, Page No ३२६.

५२) कित्ता, पृ.क्र. ३०८.

५३) कित्ता, पृ.क्र. ३२८.

५४) कित्ता, पृ.क्र. २४५,२४६.

५५) कित्ता, पृ.क्र. २४६.

५६) कित्ता, पृ.क्र. २६९.

५७) फाटक नरहर रघुनाथ : 'न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे', नीलकंठ प्रकाशन, पुणे, आवृत्ती १९२४, पृ.क्र.१८९.

५८) कित्ता, पृ.क्र. २२३.

**प्रकरण सहावे**

# गोपाळ गणेश आगरकर व

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शैक्षणिक विचार

## ६.१ गोपाळ गणेश आगरकर यांचे शैक्षाणिक विचार

### ६.१.१ आगरकरांचा अल्पपरिचय

### ६.१.२ आगरकरांचे शैक्षाणिक कार्य

### ६.१.३ आगरकरांचे शैक्षणिक विचार

१) तत्कालीन समाजातील अज्ञानाविषयी चीड

२) समाजाची शिक्षणाअभावी झालेली अवनती

३) आगरकरांच्या मते शिक्षणाची उद्दिष्टे

४) पाश्चात्य शिक्षणविषयक आगरकरांचा दृष्टिकोन

५) आगरकरांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

६) इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणावर टीका

## ६.२ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शैक्षणिक विचार

### ६.२.१ लोकमान्य टिळकांचा अल्पपरिचय

### ६.२.२ लोकमान्य टिळकांचे शैक्षणिक कार्य

### ६.२.३ लोकमान्य टिळकांचे शैक्षणिक विचार

१) लोकमान्य टिळकांचा सरकारी शाळाविषयक दृष्टिकोन

२) लोकमान्य टिळकांची राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना

३) लोकमान्य टिळकांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

४) लोकमान्य टिळकांचा अभ्यासक्रमविषयक दृष्टिकोन

५) लोकमान्य टिळकांचा विद्यापीठीय शिक्षणविषयक दृष्टिकोन

६) कृषी व धंदे शिक्षणविषयक टिळकांचा दृष्टिकोन

७) लोकमान्य टिळकांचे पाश्चात्य शिक्षण पद्धतीविषयक विचार

८) लॉर्ड कर्झनच्या शिक्षणविषयक धोरणावर टीका

९) एकोणिसाव्या शतकातील शिक्षकविषयक टिळकांचा दृष्टिकोन

## ६.३ संदर्भ

**प्रकरण सहावे**

# गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शैक्षणिक विचार

## ६.१ गोपाळ गणेश आगरकर यांचे शैक्षणिक विचार

### ६.१.१ आगरकरांचा अल्पपरिचय

गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्यातील टेंभू या गावी झाला. आगरकरांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या घरातील आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची व गरिबीची होती त्यामुळे त्यांना स्वतःचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी अनंत अडचणींचा सामना करावा लागला. या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी एम.ए.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आगरकर भारतीय इतिहासात महाराष्ट्रातील टिळकांच्या समकालीन व त्यांच्या बरोबर काही काळ एकत्रित कार्य केलेले एक कर्ते समाजसुधारक म्हणून नावारूपाला आले हीच त्यांच्या जीवन संघर्षाची एक उल्लेखनीय बाब म्हणावी लागेल. या संघर्ष गाडयातून जात असतानाच त्यांना तत्कालीन समाज परिस्थितीचे खरे ज्ञान झाले व त्याविरूद्ध झगडण्याची वृत्ती त्यांच्यात निर्माण होत गेली.

पदवी शिक्षण चालू असतानाच त्यांची लोकमान्य टिळकांबरोबर मैत्री झाली. दि. १ ऑक्टोबर १८७९ रोजी आगरकर, टिळक व चिपळूणकर या त्रयींनी मिळून पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूलची' स्थापना केली.[१] याच विद्यालयात आगरकरांनी अध्यापक म्हणून नोकरी सुरू करून आपल्या शैक्षणिक कार्यास सुरूवात केली. पुढे ४ जानेवारी १८८१ मध्ये याच त्रयींनी मिळून केसरी साप्ताहिकाची सुरूवात केली व आगरकर हे साप्ताहिकाचे पहिले संपादक झाले. या तिनही विचारवंतानी केसरीतून विविध विषयांवर लेख प्रकाशित करण्यास सुरूवात केली

होती. 'न्यू इंग्लिश स्कूलच्या' स्थापनेनंतर आगरकर व टिळक यांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली व त्यानंतर विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून पुण्यात फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. या कॉलजचे आगरकर स्वतः प्राचार्य होते व तेथे ते इतिहास व तर्कशास्त्र हे विषय शिकवित असत. आगरकरांनी सुधारक हे स्वतंत्र वृत्तपत्रही सुरू केले होते. अल्पावधीतच सुधारक या वृत्तपत्राने केसरी इतपत प्रगती गाठली होती. वर्तमानपत्राच्या वर्गणीदारांची संख्याही खूप वाढलेली होती. सुधारकांच्या वर्गणीदारांचा आकडा २९५३ एवढा होता व एकूण प्रती तीन हजारांपेक्षा थोडया अधिक खपत.[२] यावरून सुधारक हे वृत्तपत्र किती लोकप्रिय होते हे लक्षात येते. याबरोबरच आगरकरांची भूमिका अनेकांना पटत होती ही बाबही समोर येते. आगरकरांनी आपल्या या वृत्तपत्रातून राष्ट्रीय वृत्ती व सत्त्व जागृत करणारे शिक्षण दिले जात होते व तरूणांनीही त्यातून हा बोध घ्यावा अशी अपेक्षा त्यांची होती. विविध सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक समस्यांवर लेखन करून सामाजिक सुधारणा करण्याचे कार्य आगरकरांनी कसोशीने केले. आपले पूर्ण आयुष्य समाज उद्धारासाठी घालविण्याचे ठरविलेल्या आगरकरांना आयुष्य मात्र अल्पच मिळाले. दम्याच्या त्रासाने आगरकरांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेली. अर्थात या आजारपणातही आगरकरांनी आपले कार्य अविरतपणे चालू ठेवले. शेवटी १७ जून १८९५ रोजी त्यांची प्रकृती अधिक खालावली व त्याच दिवशी रात्री त्यांचे निधन झाले.

### ६.१.२ आगरकरांचे शैक्षणिक कार्य

भारतातील अनेक समाजसुधारकांच्या उदाहरणातून असे लक्षात येते की, सुधारकांनी समाजसुधारणेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे शिक्षण मानलेला होता. सहाजिकच शैक्षणिक सुधारणा झाल्या पाहिजेत असे आग्रहाने म्हणणारे सुधारक महाराष्ट्रातही होते. या सर्व सुधारकांचे एक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यांच्यात स्वतःच्या शिक्षणाविषयी जागरूकता होती व त्यामुळेच त्यांना समाजाची अधोगती होण्याचे खरे कारण समजू शकले होते. याला आगरकरही अपवाद नव्हते. समाजात अनेक अशी मुले असतात की, त्यांना शिक्षणाच्या सर्व

सोयी सुविधा उपलब्ध होतात परंतु तरीही त्यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते व काळाच्या ओघात ती भरकटत जातात. आगरकरांची परिस्थिती मात्र पूर्ण विरोधाची होती. घरची शिक्षण घेण्याची परिस्थिती नव्हती परंतु आगरकरांना आपले शिक्षण पूर्ण व्हावे ही अतिशय तीव्र आंतरिक इच्छा हाती. त्यांनी एम.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले परंतु येथ पर्यंत पोहोचतांना त्यांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागलेला होता. समाजातील कित्येक असे गरीब घटक होते की त्यांना शिक्षण आपल्या गरिबीमुळे दुरापास्त होते याची जाणीव त्यांना होती. याच जाणीवेतून त्यांनी शिक्षक होऊन समाजाची सेवा करण्याचे ठरविले होते. एवढेच नाही तर त्यांनी आपला मनोरथ आपल्या आईला पत्र लिहून कळविला होता. आपल्या पत्रात आगरकरांनी लिहिले होते की, “आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठया पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ, आई, तूं करीत असशील. पण मी आतांच तुला सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हांव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पैशावरच संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार.”[३] यावरून त्यांची निस्वार्थी वृत्ती समोर येते. केवळ स्वतःचा विचार न करता इतरांसाठी झटणारा एक ध्येयवादी तरूण आगरकरांच्या रूपाने कसा विचार करत होता याबाबी यातून समोर येतात. आपण शिक्षण घेत असताना ज्या पद्धतीने त्यांची वाताहात झाली ते समाजातील काहींचे दुःख तरी कमी करावे व शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचावी या दृष्टिकोनातून त्यांनी शिक्षकी पेशा स्वीकारला होता.

आगरकरांनी लोकमान्य टिळक व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या बरोबर राहून ‘न्यू इंग्लिश स्कूलची’ स्थापना केली. तेथे त्यांनी स्वतः टिळकांबरोबर शिक्षक म्हणून नोकरी केली. एक हाडामासाचे जिज्ञासू शिक्षक म्हणून लवकरच त्यांची ख्याती झाली व त्यातून ‘न्यू इंग्लिश स्कूलची’ प्रसिद्धीही समाजामध्ये वाढली. मुळात शिक्षक होण्यापाठीमागे त्यांचा आर्थिक स्वार्थही नव्हता. ही बाब त्यांनी स्वतः एका भाषणातून स्पष्ट केली होती. “माझी शिक्षक होण्याची इच्छा आहे. पण, ती हल्ली चालू असलेल्या रमण्यात शिरून दक्षिणा उपटण्याकरिता होण्याची नाही. लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दिसू लागतील

अशा प्रकारच्या शिक्षकाचे काम करावयाचे आहे."[४] तत्कालीन समाजात बहुतांशी लोक शिक्षक पेशा स्वीकारीत असत. प्रामुख्याने स्वतःचा आर्थिक फायदा साधण्यासाठीच शिक्षक होणारेही त्याकाळी अनेक होते. त्याचबरोबर ज्यांना पैसा मिळविण्याचे इतर काही मार्ग उपलब्ध नसतील असे लोकही शिक्षकी पेशाकडे वळायचे. सहाजिकच हे लोक केवळ आपल्या आर्थिक फायद्याचाच विचार करणारे होते. आगरकर मात्र यास निश्चितच अपवाद होते. एकूणच तत्कालीन समाजात एक आदर्श ठरावे असे व्यक्तित्त्व आगरकरांचे दिसते. केवळ शिक्षक म्हणून काम करताना पोटार्थीपणा उपयोगाचा नाही तर लोकशिक्षणही महत्त्वाचे आहे ही भूमिका त्यांनी घेतली. शिक्षक म्हणून नोकरी करत असतानाच आपणाकडे भरपूर वेळ शिल्लक राहतो व तो वेळ सत्कारणी लागावा म्हणून आगरकर, टिळक आदींनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली व या संस्थेअंतर्गत एक कॉलेज व एक वृत्तपत्र चालू करण्याचा मानस त्यांनी केला. इ.सन १८८५ मध्ये त्यांनी 'फर्ग्युसन कॉलेज'ची स्थापना केली. याच दरम्यान आगरकरांचे एम.ए. पूर्ण होऊन त्यांना सिनिअर फिलोशिप मिळाली. त्यामुळे त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी पत्करली. ते तेथे इतिहास व तर्कशास्त्र या दोन विषयांचे अध्यापन करीत. इ.सन १८९२ मध्ये ते फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य झाले होते.[५] अशा प्रकारे त्यांनी आपले शैक्षणिक कार्य चालू ठेवले होते.

### ६.१.३ आगरकरांचे शैक्षणिक विचार

आगरकरांनी शिक्षकी पेशा स्वीकारून औपचारिक शिक्षणाची जबाबदारी सांभाळली. चार भिंतीच्या आत राहून दिलेले शिक्षण समाज परिवर्तन निश्चित घडवू शकणार होते तरीही समाजात जोपर्यंत शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण होत नाही तोपर्यंत या औपचारिक शिक्षणास अपेक्षित यश मिळणे कदापि शक्य नव्हते हे आगरकरांनी ओळखलेले होते. खऱ्या सुधारणा होण्यासाठी सामाजाचे पर्यायाने लोकांचे शिक्षण होणे आवश्यक होते हे आगरकरांना अभिप्रेत होते. लोकशिक्षण प्रभावीपणे रूजविण्यासाठी वृत्तपत्रासारख्या प्रभावी साधनाचा वापर आपण करू शकतो हा विचार आगरकरांनी केला. त्यांनी वृत्तपत्रातून सामाजिक, शैक्षणिक व

राजकीय विषयांवर निबंध, लेख, अग्रलेख, स्फूट इ. लिहून त्यांनी समाजात लोकशिक्षणाची आवश्यकता का आहे? हे पटवून दिले होते.

आगरकर यांनी शिक्षकी पेशा स्वीकारलेला असला तरीही त्यांना शिक्षणाची ती मर्यादा मान्य नव्हती त्यामुळे त्यांनी वृत्तपत्र संपादकाचे काम करून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. केसरी व सुधारक मिळून आगरकरांनी १४ वर्षे वर्तमानपत्राचे संपादकत्त्व केले. या कालखंडात त्यांनी जे अनेक लेख व निबंध लिहिले त्यातून त्यांचे शैक्षणिक अधिष्ठान स्पष्ट होते. 'आमचे काय होणार?, धर्मकल्पना आली कुठून, विवाह निराकरण अथवा घटस्फोट, इष्ट असेल ते बोलणार साध्य असेल ते करणार, सुधारक काढण्याचा हेतू, महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र, न करत्याचा वार शनिवार, शिक्षण देण्याची आवश्यकता, लोकशिक्षणावर गदा' अशा अनेक लेखांतून आगरकरांचे समाजसुधारणाविषयक व शैक्षणिक विचार किती पुरोगामी होते हे लक्षात येते. सुधारक हे वृत्तपत्र सुरू करण्यापूर्वीच आगरकरांनी एक प्रसिद्धी पत्रक काढले होते. त्यातूनच त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन दिसून येतो. त्यांच्या मते आशिया खंडातील चीन जपान सारखे देश शिक्षणाच्या जोरावर आपली प्रचंड प्रगती करीत होते तर भारतासारखा देश मात्र रूढी परंपरांना चिकटून त्याच जुनाट पद्धतीचे जीवन जगत होता. भारतीय समाजास आधुनिक विचार शिवतही नव्हता. या बाबी थांबून लोकशिक्षणाने भारावलेला समाज जो पर्यंत निर्माण होत नाही तो पर्यंत जगात भारताचे स्थान उंचावले जाऊ शकत नाही.

सुधारक काढण्याच्या पत्रकातही त्यांनी आपल्या समाज सुधारणेचा हेतू स्पष्ट केला होता. "... सध्या ज्या लोकांचा अंमल आपणावर आहे, त्यांच्या आमच्या सुधारणेत बहुतेक बाबतीत जमीन अस्मानचे अंतर असल्यामुळे त्यांच्यातील अनुकरण करण्यासारख्या गोष्टी आम्ही लवकर उचलल्या नाहीत व जे जुने व घरचे ते सारे चांगले असा हेका धरून बसलो तर उत्तर अमेरिकेतील इंडियन लोकांप्रमाणे आमची दशा होईल... असा प्रसंग आपल्यावर न यावा व भारतीय आर्यत्व अगदी नष्ट न व्हावे हे इष्ट असेल तर जपान-चीनाप्रमाणे आम्ही आपले डोळे नीट (उघडे ठेवून) व जीवनार्थ कलहात आमचा निभाव कसा लागेल हे शोधून काढून,

तदनुसार वर्तन करण्यास प्रवृत्त झाले पाहिजे; आणि हा स्थूल विचार पुढे ठेवून तदनुरोधाने साऱ्या समंजस लोकांचे लिहिणे व बोलणे चालले पाहिजे. पण अलीकडे याहून बराच उलट प्रकार कित्येक शिकलेल्या लोकांच्या भाषणांत व लेखांत दिसू लागला आहे. हा प्रकार दिवसेंदिवस अधिकाधिक फैलावत जाऊ न देण्यास, व आपले पाऊल पुढे पडण्यास्तव राजकीय, सामाजिक, नैतिक व शास्त्रीय विषयांत आम्हास कोणत्या प्रकारचे वळण लावून घेतले पाहिजे हे लोकांच्या नजरेस वारंवार आणण्यास, प्रस्तुत स्थितीत वर्तमानपत्रासारखे सोईचे दुसरे साधन नाही, असे वाटल्यावरून सुधारक नावाचे नवीन साप्ताहिक वर्तमानपत्र आम्ही सोमवार ता. १५ ऑक्टोबर पासून काढणार आहोत."[६] थोडक्यात ब्रिटिश व भारतीय लोकांमध्ये एवढी तफावत असण्याचे मुख्य कारण म्हणजे भारतीयांकडे शिक्षणाचा अभाव हेच होते. ब्रिटिशांनी शिक्षणाद्वारे साध्य केलेल्या गोष्टींचे अनुकरण केले तर आपल्या रूढीपरंपरांवर व आचारविचारांवर खूप मोठा घाला येईल असे मानणारा भारतीय समाज होता. चीन जपान सारख्या देशांनी मात्र हा बदल स्वीकारलेला होता. आगरकरांच्या दृष्टिकोनातून भारतासारख्या खंडप्राय देशाने आपल्या प्रगतीसाठी शिक्षणाच्या बाबतीत पुढाकार घेणे अत्यंत आवश्यक होते.

## १) तत्कालीन समाजातील अज्ञानाविषयी चीड

आगरकरांनी लिहिलेल्या लेखातून त्यांना तत्कालीन समाजाच्या अज्ञानाविषयी विलक्षण चीड असल्याचे दिसून येते. आगरकर व टिळक यांच्या विषयी आगरकर नेमस्तवादी होते व टिळक जहालवादी होते असे बोलले जाते. तथापि आगरकरांचे लेख वाचले तर आगरकरांचेही विचार तितकेच स्पष्ट व सामाजाच्या वर्मावर बोट ठेवणारेच होते. त्यांनी लिहीलेल्या 'आमचे दोष अम्हांस कधी दिसू लागतील' या लेखातून त्यांची समाजात जे अज्ञान आहे याविषयीची खंत लक्षात येते. तत्कालीन समाजात अशा प्रकारचा वर्ग होता की, ज्यास त्यांचे दोष दाखविले किंवा इतरांच्या प्रगतीची स्तुती केली की ते भूतकाळातील आपल्या चांगल्या परिस्थितीचे गोडवे गातांना दिसत होते. एवढेच नाही तर जो त्यांच्या वर्मावर बोट

ठेवल त्या विरूद्ध चिडतदेखील होते. याविषयी आपल्या लेखात आगरकर लिहितात की, “अलीकडे देशाभिमान्यांची जी एक जात निघाली आहे; तिच्यापुढें इंग्रजांची किंवा दुसऱ्या कोणत्याहि अर्वाचीन, युरोपिअन लोकांची उद्योगाबद्दल, ज्ञानाबद्दल, किंवा राज्यव्यवस्थेबद्दल प्रशंसा केली कीं, तिचें पित्त खवळून जातें! या जातवाल्यांना दुसऱ्याचा उत्कर्ष किंवा त्याची स्तुति साहण्याचें बिलकूल सामर्थ्य नाही!”[७] यातून आगरकर समाजातील लोकांच्या स्थितीप्रियतेच्या दोषावर सडकून टीका करताना दिसतात. मुळातच तत्कालीन समाजाचा तो मोठा दोष होता किंबहुना आजच्या समाजातही हा दोष पहावयास मिळतोच. जेंव्हा कोणी समाजाच्या प्रचलित दोषांविषयी बोलू लागतो तेंव्हा समाज गतवैभवाचे गोडवे गाण्यास सुरूवात करतो. मुळातच प्रत्येकाच्या स्वभावात असलेली ही संरक्षण यंत्रणाच असते आणि ती केवळ आपण अज्ञानी असूनही ज्ञानी आहोत असे भासविण्यासाठीच असते. प्रत्येक समाजाला आपले ज्ञान हे बदलत्या काळानुसार स्वीकारणे गरजेचे असते. तथापि आगरकरांच्या मते भारतीय समाज मात्र तसा बदल स्वीकारण्यास तयार नव्हता. त्यांच्या मते सर्व साक्षर देशांमध्ये कमीतकमी माहिती असणारे लोक हे भारतीयच होते याचे कारण यांनी कधीही स्वतःच्या इतिहासाचा विचार केला नव्हता किंवा इतर देशाचा इतिहास अभ्यासला नव्हता. एकंदरीत अशा या परिस्थितीतून भारतीय समाजास केवळ शिक्षणच बाहेर काढू शकत होते. आगरकरांच्या या विचारावरून तत्कालीन समाजाची स्पष्ट कल्पना येते, ती म्हणजे लोक स्वतःच्या अज्ञानाला कवटाळून बसणारे होते. एकप्रकारे समाज हा संवेदनाहीनच झालेला होता. आगरकरांना मात्र लोकांचे अशा प्रकारचे जगणे मान्य नव्हते.

आगरकरांनी आपल्या विचारातून केवळ अज्ञानी लोकांवरच टीका केली असे नाही, तर स्वतःला सुशिक्षित समजणाऱ्या परंतु अर्धवट शिक्षण घेतलेल्या लोकांवरही आगरकरांनी टीका केली होती किंबहुना जे शिक्षणाअभावी अज्ञानी होते त्यांच्यापेक्षा समाजाचे खरे गुन्हेगार हे अर्धवट सुशिक्षित लोक होते असेच त्यांना वाटत होते. त्यांच्या मते अर्धवट शिकणाऱ्यांमुळे समाजात स्वार्थीपणा, ढोंगीपणा इ. दोष निर्माण झालेले होते. अर्धवट किंवा मध्यम शिक्षण मिळालेले म्हणजे ज्यांना केवळ काही इयत्ताच शिक्षण घेता आले असे नसून ज्यांनी अगदी

बी.ए.पर्यंत शिक्षण घेतले परंतु केवळ एका इयत्तेतून दुसऱ्या इयत्तेत जाण्याखेरीज कोणतीच चांगली गोष्ट त्यांनी केली नाही. हे अर्धवट शिक्षण झालेले लोक शिक्षित आहेत परंतु सुशिक्षित मात्र निश्चितच म्हणता येणारे नव्हते. आगरकरांच्या मते असे लोक केवळ इतर लोकांना कमी लेखण्यात, त्यांच्याशी लबाडी करून त्यांना फसविण्यात, त्यांचा अपमान करण्यात, आपण खूप ज्ञानी आहोत असे भासविण्यात व आपला स्वार्थ कसा साधला जाईल याचाच विचार करण्यात अग्रेसर असतात. एवढेच नाहीतर आपल्यापेक्षा विद्येनें, अधिकाराने, संपत्तीने, सहिष्णुत्त्वाने व इतर पुष्कळ नैसर्गिक गुणांनी श्रेष्ठ असणाऱ्यांची विटंबना हे लोक करतात. वडील माणसांचा मान ते राखत नाहीत. त्यांच्या मते समाजासाठी आदर्श ठरतील असे सुशिक्षित लोक बोटावर मोजण्या इतपत होते. त्यातही अनेकांना काळाने पडद्याआड घातले होते. आणि असे असताना समाज मात्र आहे त्या परिस्थितीत धन्यता मानीत होता याची खंतही आगरकरांना वाटत होती. शिक्षणासारख्या बाबीकडे समाजाने विशाल दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक होते. मात्र बहुतांश शिक्षित लोकांचा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन संकुचित होता. काहीतरी नोकरी मिळेल व आपले जीवन सुखी होईल असा संकुचित दृष्टीकोन ठेवला जायचा. अर्थात या विचारात गैर नाही. परंतु केवळ स्वतःचाच विचार करणे ही बाब आगरकरांना खटकत होती. स्वतः शिक्षण घेऊन जी व्यक्ती केवळ स्वतःच्याच फायद्याचा विचार करत असेल ती ज्ञान मिळवूनही अज्ञानीच समजायला हरकत नाही.

तत्कालीन परिस्थितीचा विचार करता स्वतःचा आर्थिक फायदा साधण्यासाठी अगदी मध्यम प्रतीचे शिक्षण घेतलेले लोक ब्रिटिशांकडे एखादी नोकरी मिळेल याहेतूने स्वतःचा स्वाभिमान दूर ठेवत कसा लाळघोटेपणा करत होते याचीही जाणीव आगरकरांना होती.याविषयी आगरकर लिहितात की, "रस्त्यावर एखादे ओले हाड पडलेले पाहिले म्हणजे ग्रामसिंहाची झुंडच्या झुंड त्यावर जाऊन पडते. त्याप्रमाणे एखादी जागा रिकामी झाल्याची वार्ता ऐकली की सर्टिफिकेट्स आणि अर्जांच्या सुरळया घेऊन लागले साहेबांच्या बंगल्यावर धावायला. अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करून बदलीची जागा पटकाविण्यासाठी चुगल्या

सांगण्यास, ग्लास झोकण्यास, पोरे उचलण्यास, बुट पुसण्यास आणि यापेक्षाही निंदाकर्मे करण्यास हांजीखोरपणाची धडपड चालते."[८] वास्तविक ज्याच्याकडे ज्ञान आहे त्याला हे सर्व करण्याची आवश्यकता पडत नाही. आगरकरांचे समाजातील निरीक्षण किती बारकाईचे होते हे यातून स्पष्ट दिसून येते. आगरकरांच्या मते समाजाला शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांच्यात स्वाभिमान जागृत होणार नाही कारण व्यक्तीत स्वाभिमान निर्माण करण्याचे सामर्थ्य हे केवळ शिक्षणातच असते. एकूणच आगरकरांना तत्कालीन समाजातील अज्ञानाविषयी किती विलक्षण चीड होती हे यावरून लक्षात येते.

## २) समाजाची शिक्षणाअभावी झालेली अवनती

आगरकरांना शिक्षणाअभावी महाराष्ट्रीयन व पर्यायाने भारतीय समाज कसा मागासलेला होता याची जाणीव होती. शिक्षणाच्या अभावामुळे संपूर्ण समाज अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेला होता. सगळीकडे अंधश्रद्धा, अकर्मण्यता, अकर्तेपणा इत्यादींचा प्रभाव होता. 'मूळ पाया चांगला पाहिजे' या लेखात आगरकरांनी तत्कालीन समाजाचे चित्रण केलेले आहे. यात शिक्षणाच्या अभावाने समाजात कशा अनिष्ट प्रथांचे प्राबल्य वाढलेले होते याविषयी आगरकरांनी लिहिले होते. स्त्रियांच्या समस्यांसंबंधी विचार केला तर एकोणिसाव्या शतकात भारतातच अशा समस्या का होत्या याचे मुळ शिक्षणाच्या अभावातच सापडते. विधवा पुनर्विवाहाचा हक्क तकालीन समाजात स्त्रीला पुरूषवर्गाने नाकारलेला होता. याविषयी सांगताना आगरकर लिहितात की, "पुरूषाची बायको मेल्यास त्यास जशी पुनर्विवाह करण्यास मोकळीक आहे. त्याप्रमाणें विधवांसहि दुसरा नवरा करण्याची परवानगी पाहिजे. बायकांच्या केसांचा जर मेलेल्या नवऱ्याच्या गळयाला फांस बसतो, तर पुरूषांच्या शेंडीचाहि मेलेल्या स्त्रीस कां फांस बसूं नयें? व एकास जर कोणी संन्याशी करीत नाही तर दुसरीला मात्र न्हाव्यापुढे कां बसवावी? पुरूषाला बायको आवडत नाही, येवढयाच शुष्क कारणावरून वस्तुतः काडी मोडून देण्याचा त्यास जर अधिकार आहे व तसें करून तो जर धर्मबाह्य होत नाहीं, तर एखाद्या स्त्रीला नवरा आवडत नसल्यास, तिनेंहि त्याला काडी मोडून दिली तर तिच्या नावांनें मात्र खडे

का फोडावेत?"[९] या विवेचनातून आगरकर तत्कालीन समाज स्त्रियांवर कसा अन्याय करीत होता याचे स्पष्ट शब्दात चित्रण करतात. त्यांच्या मते या समाजात जर लोकशिक्षणाची पाळेमुळे रूजली गेली असती तर समाजातील स्त्रीची अवस्था अशी झालीच नसती. स्त्री आणि पुरूष हे जन्मतः समान असतात परंतु पुरूष प्रधान संस्कृतीने आपल्या स्वार्थासाठी ही समानता मोडीत काढून स्त्रियांना नेहमीच हीन आणि अपमानास्पद वागणूक दिली आहे. आजच्या ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कालखंडात, जिथे ज्ञानाचा प्रचंड विस्फोट झालेला असतानाही स्त्रीची अवहेलना आजही फारशी बदलू शकली नाही, तिथे एकोणिसाव्या शतकाचा विचार करता, जिथे शिक्षण अजिबातच नव्हते, अशा काळात स्त्रीची अवस्था किती हालाखीची असेल याची सहज कल्पना येऊ शकते.

एकोणिसाव्या शतकातील समाज हा रूढी परंपरांच्या जोखडामध्ये पूर्णपणे अडकलेला होता व अशा परिस्थितीतून बाहेर पडण्याचा यत्किंचितही मार्ग सापडत नव्हता. प्रत्येकाने आपल्या भोवतालीच एक स्वतःची मर्यादा आखलेली होती व त्यापलीकडे जाऊन आपण काही समाज किंवा राष्ट्राचे देणे लागतो व त्या ऋणातून मुक्त होण्यासाठी काहीतरी करणे इष्ट आहे हे स्वीकारण्यास समाज तयार नव्हता. आगरकरांच्या दृष्टिकोनातून ही समाजाची शीलावस्था होती. त्यांच्या मते रूढींच्या चाकोऱ्यातून समाज केवळ काळाने पुढे चालला होता बाकी त्यात कुठलेही स्थित्यंतर नव्हते. शिक्षण नसेल तर अशा समाजाची अवनती कशी होते या विषयी आपले विचार मांडताना आगरकर 'तरूण सुशिक्षितांस विज्ञापना' या लेखात लिहितात की, "ज्या देशातील लोकांस राजकीय, सामाजिक व धार्मिक असमता, अज्ञान आणि अन्यांय यापासून पराकाष्ठेचा त्रास होत आहे, किंवा परवशता प्राप्त झाली आहे; ज्या देशांतील सामान्य लोकांस गूढ अज्ञानानें व्यापिलें आहे; ज्या देशांतील लोकांस विपत्तीपासून होणाऱ्या यातना सोसाव्या लागत आहेत, पण त्यांच्या परिहारार्थ काय करावें हें समजत नाही सारांश ज्या देशांत राजकीय समता नाही, विद्या नाही, वित्त नाही, शारीरिक व मानसिक सामर्थ्य म्हणण्यासारखें नाही, अशा देशांतील युनिव्हर्सिटयांत आणि कॉलेजांत इतर ठिकाणांपेक्षां

थोडीशी अधिक चळवळ नसेल तर त्या देशाची अखेर गति काय होईल, हे सांगता येणें फार कठीण आहे."[१०] म्हणजेच देशातील जनतेला आपले राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अधिकार व कर्तव्य काय असतात हे समजावून सांगणे हे शिक्षणाचे कार्य असते व यासाठी शिक्षणसंस्था, शिक्षण क्रेंद्रे व विद्यापीठांनी लोकशिक्षण हाती घेऊन शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे होते. ब्रिटिशांचे साम्राज्य हा एक दैवी संकेत मानला जात होता एवढा अज्ञानी समाज त्याकाळी होता. वास्तविक विचार करता, विद्येच्या अभावाने देश व समाज किती देशोधडीला जाऊ शकतो याचा अंदाज बांधणेही अतिशय कठीण आहे. आज प्रत्येक माणूस सुखासाठी धडपडतोय परंतु हे सूख कशातून चिरकाल मिळू शकते याविषयी मात्र समाज अनभिज्ञच आहे. बऱ्याचदा जेथे प्रचंड संपत्ती व श्रीमंती आहे तेथेच शिक्षण अपुरे पडताना दिसत होते व याचे परिणाम अतिशय विघातक झालेले होते. यातूनच समाजामध्ये व्यसनाधीनता वाढीस लागलेली दिसत होती. आगरकरांनी याविषयी समाजाचे सखोल निरीक्षण करून आपले मत मांडलेले होते की श्रीमंत लोक शिक्षणाला कमी महत्त्व देतात व त्यामुळे त्यांच्यात अविद्या निर्माण होऊन ते व्यसनांना बळी पडतात व यातूनच समाज अधोगतीचे एक दृष्ट चक्र चालू होते.

एकंदरीत आगरकरांच्या मते तत्कालीन समाजाला असमानता, विधवांचा प्रश्न, बालविवाह, बहुपत्नीकत्त्व, आप्पलपोटेपणा, जातिप्रथा, स्त्री-पुरूष विषमता अशा अनेक व्याधींनी ग्रासले होते व या व्याधींचे मूळ शिक्षणाच्या अभावातच होते. या व्याधींनी महाराष्ट्रीयन व भारतीय समाजावर प्रचंड विघातक परिणाम केलेले होते. त्यांच्या मते भारतीय संस्कृतीला एक प्राचीन अशी परंपरा होती. समाजाचा घटक म्हणून माणसाने प्राप्त केलेले ज्ञान, कला, नीतिमत्ता, कायदे, जीवनमुल्ये, आपला अध्यात्मिक वारसा, एकमेकांशी वागण्याची पद्धत यांची सर्वसामावेशकता मिळून संस्कृती बनते. सुरूवातीपासून भारतीय संस्कृतीत असलेले वरील गुण मात्र एकोणिसाव्या शतकात लोप पावले होते व त्याऐवजी अनिष्ट परंपरा, ढोंगीपणा, अज्ञान, अंधश्रद्धा इत्यादी अवगुण या संस्कृतीत निर्माण झालेले होते. हे अवगुण

समाजातून नाहीसे करण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे आगरकरांचे स्पष्ट मत होते हे त्यांच्या एकंदर विचारांतून स्पष्ट होते.

## ३) आगरकरांच्या मते शिक्षणाची उद्दिष्टे

आगरकरांनी स्वतंत्रपणे त्यांच्या एखाद्या ग्रंथात शिक्षणाची उद्दिष्टे नमूद केलेली नाहीत. त्यांनी जे विविध लेख लिहिले त्यातून त्यांची शिक्षणाविषयी स्वतंत्र अशी भूमिका होती असे लक्षात येते. शिक्षणाअभावी समाजाची झालेली अवनती व शिक्षणाची नितांत आवश्यकता हे स्पष्ट करताना त्यांना अभिप्रेत असलेली काही शिक्षणाची उद्दिष्टे लक्षात येतात. एखादी समस्या का व कशी निर्माण झाली? हे समजले की त्यावर उपाययोजना करणे सोईस्कर जाते. याच पार्श्वभूमीतून आगरकरांनी मांडलेली शिक्षणाची काही निश्चित अशी उद्दिष्टे होती व ती त्यांनी आपल्या विविध लेखातून स्पष्ट केलेली दिसतात.

**I) समाज विकासासाठी शिक्षण ः** आगरकरांच्या मते समाजातील अनिष्ट चालिरिती, रूढीपरंपरा असमानता दूर करून निकोप समाज निर्मितीसाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. सामाजातील असमानतेचा विचार केला तर प्रत्येक वर्ग हा स्वतःच्या अस्तित्त्वासाठी व भल्यासाठी संघर्ष करीत असतो. त्यामुळे 'बळी तो कानपिळी' या तत्त्वानुसार सामर्थ्यवान गट पुढे जातो व कमकुवत गट लयास जाताना दिसतो. यातून एक विषमतेची दरी निर्माण होत जाते व देशाची प्रगती खुंटते. हे सर्व टाळण्यासाठीच शिक्षणाची आवश्यकता आहे. आगरकरांनी समाजाचे सांप्रतकाळी असलेले तीन वर्ग सांगितलेले आहेत ते म्हणजे विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे हे होत. त्यांच्या मते हे समाजातील तीन वर्ग कायमचे नसतात. काही काळ लोटल्यानंतर या परिस्थितीत बदल होत जाऊन प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग, काम ही समप्रमाणात करावी लागतात व तेंव्हापासून पुढे सर्वांचे सुखानुभव समप्रमाणात होऊ लागतात. यालाच समाजक्रांती म्हणता येते. तथापि हा बदल होण्यासाठी जो कालावधी जावा लागतो तो समाजाच्या जागरूक होण्याच्या स्थितीवर अवलंबून असतो. जोपर्यंत आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव समाजास होत नाही, तोपर्यंत उपभोग

घेणाऱ्या वर्गाकडून कामकरी वर्गाचे शोषण तसेच चालू राहते. समाजाची आपल्या हक्क आणि कर्तव्याप्रतीची जाणीव निर्माण करण्याचे कार्य शिक्षणाला करावे लागते. अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी आगरकरांनी समाजातील सुशिक्षित लोक आहेत त्यांना आव्हान केले होते. याविषयी आगरकर लिहितात की, "सुशिक्षित देशबांधवहो, जर तुम्हांस इतर देशांकडून व पुढील संततीकडून बरें म्हणून घ्यावयाचें असेल व तुमची आज जी स्थिति आहे, तीहून तुमच्या मुलांची व नातवंडांची स्थिति अधिक वाईट होऊं नये अशी तुम्हांस वास्तविक इच्छा असेल, तर ज्या दुर्मतांनीं, दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगांप्रमाणें या देशांच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षे फडशा चालविला आहे, त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत उचित होय."[११] एकंदरीत समाजातील सर्व घटकांचे हक्क अबाधित राखले जाऊन सर्वांना समान संधीची उपलब्धता होत नाही तोपर्यंत समाजाचा विकास कदापि होणार नाही असे आगरकरांना वाटत होते व हे सर्व शिक्षणातूनच शक्य होणार होते. त्यांच्या मते सुशिक्षितांनीच हा समाजबदल करण्यास पुढाकार घेणे आवश्यक होते व त्यामुळेच समाजास उन्नत अवस्था प्राप्त होईल असा त्यांना विश्वास होता.

समाज हा नियमित गतीमान व परिवर्तशील असतो. समाजात परिवर्तन घडविण्याच्या दृष्टिनेही शिक्षणाची आवश्यकता असते. आतापर्यंतचा इतिहास पाहिला तर प्रत्येक ठराविक अशा कालखंडात समाजात स्थित्यंतर झाल्याचे दिसून येते. अगदी प्राचीन काळातील समाज, त्यानंतर हळूहळू राजेशाही कशी अस्तित्त्वात आली, सुरूवातीची राज्य लयास जाऊन नवीन राज्य उदयास आली, अनेक देशात विविध प्रकारच्या क्रांत्या घडून आल्या. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात असे क्रांतिकारक बदल होत आलेले आहेत. अर्थात हे स्थित्यंतर विधायकच असेल असे नाही तर ते विघातकही असू शकते. प्रत्येक होणारा बदल हा दूरदृष्टी ठेवून पाहण्याची गरज असते असे आगरकरांना वाटत होते. ही दूरदृष्टी केवळ शिक्षणानेच माणसाला प्राप्त होऊ शकते. याविषयी आपले विचार आगरकरांनी 'आमचे काय होणार?' या लेखात स्पष्ट केलेले होते. त्यांनी आकाश

गंगेचे रूपक योजलेले आहे. संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास अवकाशात आकाशगंगेचे केवळ डोळयांनी निरीक्षण करण्याचा प्रयत्न केला तर धुके पसरल्यासारखे दिसते परंतु त्या ऐवजी दुर्बिणीचा वापर केला तर मात्र असंख्य तारकावृंद दिसू लागतात पण त्याही पलीकडे दुसरे एक धुके दिसते त्यावर आणखी मोठी दुर्बिण लावली की आणखी तारकावृंद व त्या पलीकडे आणखी धुके दिसते व हा क्रम असाच चालू राहतो. अशा प्रकारे सृष्टीही अनंत आहे व विश्वातील कोणत्याही गोष्टीला मर्यादा नाही. अर्थात या गोष्टी त्यालाच कळू शकतात ज्याने दुर्बिण या तंत्राचा वापर केला. ज्याने दुर्बिण वापरलीच नाही त्याला तर अगदी अकाशगंगाही दिसणार नाही त्यापलीकडचा तर प्रश्नच उद्‌भवत नाही. येथे दुर्बिन हे रूपक सुशिक्षित लोकांसाठी वापरलेले आहे. त्यांच्या मते व्यक्तीचे शिक्षण हीच त्याची दुर्बिण असते. “ज्याने शास्त्राभ्यास केला आहे, ज्यानें इतिहास वाचला आहे, ज्यानें जगाचा पुष्कळ अनुभव घेतला आहे, व ज्यानें विचारांत दीर्घ काल घालविला आहे, अशा तत्त्ववेत्त्यास मनुष्यप्रवृत्तीची दिशा जितकी नीट समजणार आहे, तितकी अशिक्षितास समजण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें अंधारांत सगळया रंगांचा लोप होतो, त्याप्रमाणें फार दूरच्या भविष्यकालाविषयीं विद्वान् आणि अविद्वान् यांचें सारखेच अज्ञान असतें. तथापि ज्या प्रमाणें दुर्बिणवाल्यास त्या यंत्राच्या सहाय्यामुळें दूरस्थ तारकसमूहाविषयीं दुसरें कांहीं समजलें नाही, तरी त्याच्या अनंतत्वाविषयीं खात्री होते, त्याप्रमाणें विद्यारूप दुर्बिण ज्या विद्वानास प्राप्त झाली आहे, त्याच्या ज्ञानचक्षूंस फार दूरची मनुष्यावस्था नीट रीतीनें न्याहाळतां आली नाहीं, तरी तिच्या उन्नतीला सीमा नाहीं, येवढें पक्कें दिसून येतें. अशिक्षिताची तशी खात्री होत नाहीं.”[१२] अशाप्रकारे आगरकरांनी विद्वान व अज्ञानी यांच्यातील फरक स्पष्ट करून सांगितलेला आहे. अज्ञानी समाज हा अंधारात चाचपडल्यासारखा चालतो. त्याच्या बाबतीत काळ त्याला जिकडे घेऊन जाईल तिकडे त्याला जावेच लागते. त्यात त्याची अधोगती होणार असली तरीही तो आपला मार्ग बदलू शकत नाही कारण त्याच्या दृष्टिकोनातून समाज हा गतिहीन व स्थितप्रज्ञ झालेला असतो. याउलट शिक्षित समाजास मात्र ज्ञान व विद्येची दुर्बिण असल्यामुळे भविष्याचा वेध घेऊन चालता येते. एवढेच नाही तर विश्व हे अनंत असून त्यात अनंत असे ज्ञानाचे भांडार

भरून ठेवलेले आहे. यातील कितीही ज्ञान प्राप्ती केली तरी ते संपत नाही, त्याचबरोबर हेच ज्ञान समाजाच्या विकासासाठी उपयुक्त ठरते. ज्ञानी लोकांना समाजाच्या परिवर्तनगतीची कल्पना आलेली असते. त्याचबरोबर ही गती आपणास रोखता येणार नाही हेही त्याला समजलेले असते. त्याच्या दृष्टीने केवळ हे परिवर्तन मानवी समाजाला अनुकूल कसे करता येईल एवढाच विचार महत्त्वाचा असतो व आपल्या ज्ञानाच्या आधारे हा समाज हा बदल मानवजातीसाठी अनुकूलही करू शकतो. समाजाचा असा दृष्टिकोन निर्माण करण्यासाठीच समाजाला शिक्षणाची आवश्यकता असते व त्यातूनच समाजाचा विकास होऊ शकतो असे आगरकरांना वाटत होते.

आदर्श कुटुंब व्यवस्था निर्माण करण्यासाठीही शिक्षणाची आवश्यकता आहे. तत्कालीन समाजात कुटुंबाची स्थितीही अतिशय शोचनीय होती. त्याकाळी मुलींच्या लग्नाचे वय ठरलेले नव्हते. लग्न, विवाह या शब्दाचा अर्थ कळण्याच्या आतच तिला बोहल्यावर चढविले जायचे आणि अशा व्यक्ती बरोबर तिचा विवाह लावला जायचा की, जो वयाने खूप वृद्ध आहे. परिणामतः अशा मुलींना लवकरच वार्धक्य यायचे आणि पुन्हा विधवा पुनर्विवाह बंदी, केशवपन यासारख्या अनिष्ट प्रथांमधून त्या मुलीचा अत्यंत छळ व्हायचा. अर्थात ही समाजाला लागलेली कीड होती. जोपर्यंत समाज सुशिक्षित होणार नाही तोपर्यंत यात बदल होणार नव्हता. आगरकर भारतीय कुटुंब पद्धतीची तुलना युरोपियन देशांशी करतात. बऱ्याचदा आपण भारतीय कुटुंबपद्धती युरोपियनांहून चांगली आहे असेच ऐकतो, परंतु आगरकरांच्या दृष्टिकोनातून अनेक गोष्टी युरोपियनांच्या कुटुंबपद्धतीतही चांगल्या होत्या. जसजसा विद्याप्रसार होत जाईल तसतशी कुटुंबपद्धती विषयक ही चांगली तत्त्वे आम्हास समजतील व आमच्या कुटुंबातील अडचणी दूर होतील असा विश्वास आगरकरांना होता. ब्रिटिश सरकारने इ.सन १८२९ मध्ये सतीची चाल रोखण्याचा प्रयत्न केला परंतु त्यावेळी त्यांनी बालविवाह रोखण्यासाठी मात्र कायदा केला नाही. आगरकरांच्या मते बालविवाह प्रथा ब्रिटिशांना अधिक अमानुष वाटली नसावी. त्यांच्या मते केवळ कायदे करून किंवा सक्ती करून हे कायदे मोडण्यापेक्षा त्यांचे दोष समाजाला कळावेत म्हणजे आपोआपच या प्रथा कमी

होतील व हेच काम शिक्षणातून साध्य करावे लागणार आहे. शिक्षणाचा प्रसार झाल्याने समाजातील कुटुंबसंस्थेशी निगडित सर्व अनिष्ट चालिरिती मोडता येणे सहज शक्य होते. शिक्षणाअभावीच समाजात कुटुंबाला वाळीत टाकणे तसेच धर्म बाटला जाणे यासारख्याही चालिरिती होत्या. जसजसे समाजात शिक्षण व आधुनिकतेवर अधारित असलेल्या विज्ञान व शास्त्रांचा प्रसार होत जाईल तसतशा धर्मासंबधी वेडेपणाच्या समजूतीही लयास जातील असा विश्वास आगरकरांना होता.

समाजाचे रहाटगाडगे फिरत असतानाच अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा व रूढीपरंपरांबरोबरच समाजात गुन्हेगारी प्रवृत्ती, अपराध यांचेही अस्तित्त्व होतेच. गुन्हेगारीचे कारणही आपणास अज्ञान व अशिक्षितपणातच पहावयास मिळते. आगरकर स्वतः टिळकांसोबत तुरूंगात असताना त्यांचा अनेक इतर कैद्यांशी संबंध आला. प्रत्येक कैदी कोणत्या ना कोणत्या गुन्ह्याखाली शिक्षा भोगत होता. तुरूंगात शिक्षा भोगून आलेल्या प्रत्येक व्यक्तीकडे समाज वेगळयाच नजरेतून पहातो. त्यांना नंतर चांगली वागणूक मिळत नाही. तुरूंग म्हणजे दुष्ट लोकांचे वसतिस्थान असा त्यांचा गैरसमज असतो. परंतु आगरकरांनी तुरूंगात असताना या प्रत्येक कैद्याचे सूक्ष्म निरीक्षण केले व तेथील त्यांचे सर्व अनुभव 'डोंगरीच्या तुरूंगातील एकशे एक दिवस' या पुस्तकातून त्यांनी नमूद केलेले आहेत. त्यांच्या निरीक्षणानुसार प्रत्येक गुन्हेगार व्यक्तीही मुळतः निरपराध असते परंतु केवळ शिक्षणाच्या अभावी त्यांच्या कडून अपराध होतात म्हणून गुन्हेगारी प्रवृत्ती रोखणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे असे त्यांना वाटत होते. या पुस्तकात आगरकर लिहितात की, "लोक अपराध करितात याचे कारण त्यांना शिक्षण मिळत नाही हे होय... मनुष्यतेला कलंक आणणारे अपराध ज्या देशात घडून येत असतात, त्या देशातील सुधारणा कितीही प्रमाणात झाली तरी तीत काही हाशील नाही. सबब सर्व सदस्य, देशाभिमानी, सुशिक्षित आणि श्रीमंत लोकांनी अपराधी मनुष्यतेचा कंटाळा न करता ती सद्गुणी करण्यासाठी रात्रंदिवस झटले पाहिजे."[१३] यावरून आगरकरांचे विचार किती पुढारलेले होते हे दिसून येते.

अनादी काळापासून शिक्षणही राजाची किंवा सरकारची जबाबदारी आहे असे समाज मानतो, परंतु खरा उन्नत समाज घडवायचा असेल तर शिक्षणाची जबाबदारी समाजाने स्वतःच्या खांद्यावर घेतली पाहिजे असेही आगरकरांना वाटते. सरकार हे केवळ माध्यम असू शकते परंतु प्रत्यक्षात ज्यांच्यासाठी शिक्षण आहे तो मात्र बहुसंख्य समाजच आहे. याकामी तरूण सुशिक्षितांनीच पुढे येणे आगत्याचे आहे. या दृष्टिकोनातून आगरकरांनी 'तरूण सुशिक्षितांस विज्ञापना' या लेखात तरूणांना लोकशिक्षण कामी आपले योगदान देण्याचे अवाहन केलेले होते. त्यात ते तरूणांना उद्देशून लिहितात की, "आम्हांस अशी अशा आहे कीं, कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं हें काम आपल्या हातीं घेतल्यास त्यांस तावडतोब यश येणार आहे. ज्यांच्या अंगी विचारशक्ति आणि उत्साह यांचा संगम झालेला असतो, त्यांना कोणतीहि सुधारणा करण्यास अवघड जात नाहीं. सबब येथील डेक्कन कॉलेजांतील, फर्ग्यूसन कॉलेजांतील, व सायन्स कॉलेजातील, व त्याप्रमाणेंच मुंबई येथील एल्फीस्टन, फ्रीचर्च वगैरे सर्व कॉलेजांतील सुशिक्षित, सुजाण, सुविचारी व प्रौढ विद्यार्थ्यांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं या स्वहितकर व राष्ट्रहितकर कार्यात पुढारीपण घ्याव्यें."[१४] त्यांनी हे अवाहन महाराष्ट्रातील त्यावेळच्या महत्त्वाच्या महाविद्यालयातील तरूणांना डोळयासमोर ठेवून केलेले होते व त्यांना असा निश्चित विश्वास वाटत होता की, तरूणांनी लोकशिक्षण ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली तर समाजाचा विकास होण्यास विलंब लागणार नाही. आजच्या शिक्षणातून ही बाब अभिप्रेत आहे असे आपणाला दिसून येते.

समाजाच्या चांगल्या विकासासाठी व्यक्ती स्वातंत्र्य असणे आगरकरांना आवश्यक वाटत होते. त्यांच्या मते ज्या देशात व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला जातो त्या देशातील सर्व समाजाचा उद्धार होतो. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या उपजत शक्तींना वाव देण्यासाठी व्यक्ती स्वातंत्र्याची आवश्यकता असते. आगरकरांच्या मते ज्या व्यक्तीला स्वतःच्या बुद्धीने विचार करण्याचे स्वातंत्र्य मिळालेले आहे ती व्यक्ती स्वार्थीपणे न वागता इतरांचा अधिक विचार करते. अशी व्यक्ती स्वतःच्या श्रमाने जे काही मिळालेले आहे त्याचा स्वतःच उपभोग घ्यावा अशा विचारसरणीची राहत नाही. उलट ती त्यात इतरांना सहभागी करण्यात धन्यता

मानते. याच व्यक्तिस्वातंज्यामुळे व्यक्तीला स्वतःच्या इच्छा, आकांक्षा, कल्पनाशक्तीनुसार विचार करण्यास वाव मिळत जातो व त्याच्यातील आंतरिक चांगुलपणाची अभिव्यक्ती समाजासाठी होत जाते. आजच्या काळातील आधुनिक शिक्षण पद्धतीत होत असलेले बदल हे याचेच कारण आहे. आज शालेय शिक्षणात विविध नवोपक्रम आणले जातात. आनंददायी शिक्षण ही संकल्पना व्यक्ती स्वातंज्याचाच एक भाग आहे. पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत शिक्षकाने कडक वातवरणात शिकवावे व विद्यार्थ्यांनी केवळ ऐकावे असे वातावरण वर्गात असायचे मात्र आधुनिक शिक्षण तज्ज्ञांना ही पद्धती मान्य नाही. विद्यार्थ्यांनी वर्गात आपला सक्रिय सहभाग नोंदवावा यासाठी विद्यार्थ्यांना विविध विषयात आपले विचार मांडण्याची किंवा प्रायोगिक पद्धतीने ज्ञान मिळविण्याची संधी निर्माण करून दिली जाते. हा एक व्यक्ती स्वातंज्याचाच भाग आहे. या दृष्टिकोनातून आगरकरांनी एकोणिसाव्या शतकातच विचार केलेला होता.

**II) मानसिक सुखासाठी शिक्षणः** मानसिक किंवा आत्मिक सुख प्राप्त करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. आजच्या परिस्थितीत शिक्षणाचा केवळ मर्यादित दृष्टिकोन लक्षात घेतला जातो. केवळ चांगल्या पगाराची नोकरी मिळेल व जीवन सुखी व समाधानात जाईल यासाठी शिक्षणाची आवश्यकता भासते. थोडक्यात शिक्षणाचा अर्थ केवळ शारीरिक सुखापुरताच जोडला जातो व त्यामुळे भोगवादी वृत्ती वाढते. अर्थात शारीरिक सुखासाठी शिक्षणाचा वापर होणे स्वभाविक आहे, परंतु त्याही पुढे जाऊन मानसिक सुख मिळवणे आवश्यक आहे. कारण वर नमूद केलेले सुख हे तात्पुरते असते दिर्घकालीन ते असू शकत नाही. त्यामुळे आगरकर अशा सुखाला विरोध करतात. किंबहुना याविषयी आपले विचार स्पष्ट करतांना ते लिहितात की, "सुखोपभोगासाठीं सर्व प्राणिमात्र धडपडत असतो, व ज्यास जो प्राप्त होईल त्यांने त्यांपासून आनंद करून घ्यावा, हें योग्य आहे, पण ज्या सुखोपभोगामुळे निरंतर तो घेतां येण्याची शक्यता नाहींशी होते; बुद्धीस मांद्य येते; गात्रें निःशक्त होतात; उत्साह नाहिसा होतो; आणि कुटुंबास व राष्ट्रास कोणत्याहि प्रकारचा फायदा न होतां, उलट नुकसान किंवा त्रास सोसावा लागतो, अशा सुखोपभोगांत निमग्न असण्यांत काय फायदा आहे बरें?"[१५] म्हणजेच समाजाचा एक क्रम ठरलेला असतो. तो म्हणजे शिक्षण घ्यायचे ते संपत्ती कमावण्यासाठी व

संपत्ती कशासाठी याचा विचार केला तर आरामदायी व सुखासीन जीवन जगता यावे यासाठी. व्यसनाधीन लोकांना व्यसन करून आनंद मिळतो त्यामुळे ते तो मार्ग अनुसरतात परंतु हा आनंद किती दिवस टिकणारा असतो याचा विचार होणे ही आवश्यक असते. शेवटी त्याची परिणती दुःखातच होणार असते कारण जेंव्हा व्यसनाचे दुष्परिणाम त्या व्यक्तीस जाणवू लागतात तेंव्हा त्यास त्यातील दुःख समजते. अशा लोकांची बुद्धी कुंठीत होऊन ते इतरांसाठी त्रासदायक ठरू लागतात. आगरकरांच्या मते मुळात माणूस शारीरिक सुखासच मुख्य सुख मानू लागलेला आहे त्यामुळे तो खऱ्या मानसिक सुखासाठी दुरापास्त झालेला आहे. सर्वार्थाने सुखी व संपन्न जीवन जगण्यासाठी मानसिक समाधानाची आवश्यकता असते. आगरकर अशा मानसिक सुखाची गरज काय हेही स्पष्ट करतात. ते म्हणतात की, "... श्रेष्ठतर असा सुखांचा आणखी एक वर्ग राहिला आहे; तो कोणता म्हणाल, तर मानसिक सुखांचा, या सुखांपुढें वरील सुखें अगदी तुच्छ आहेत. इतकें खरें आहे की, या सुखाची गोडी मनुष्यास सहसा लागत नाहीं. पण जर त्याच्या सुदैवानें त्याला ती एकदां लागली, तर त्याच्यासारखा त्रिभुवनांत सुखी प्राणी मिळावयाचाच नाहीं!"[१६] म्हणजेच समाजाच्या उच्चतम सुखाची परिसीमा ही मानसिक सुख असते. संपूर्ण समाज या पातळीपर्यंत उन्नत होऊ शकला तर तो एक निकोप समाज असेल ज्यात गरीब-श्रीमंत, श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच भेद नसेल. समाजात आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक अशा कोणत्याच बाबतीत संघर्ष नसेल व यासाठीच मानसिक सुखाची अवस्था प्राप्त करणे हे एक शिक्षणाचे उद्दिष्ट आहे असे आगरकरांना वाटत होते.

**III) बुद्धिमत्ता व ज्ञानप्राप्तीसाठी शिक्षण:** बुद्धिप्रामाण्यवाद हे आगरकरांच्या शैक्षणिक विचारांचे मुख्य उद्दिष्ट आहे. समाज ज्ञानी, बुद्धिमान झाला की, आपोआपच समाजातील वाईट चालिरिती अंधश्रद्धा नाहीशा होतात. या दृष्टिकोनातून आगरकरांनी बुद्धिप्रामाण्यवादाचा पुरस्कार केला होता. मुळातच समाजातील प्रत्येक अंधश्रद्धेचे कारण अज्ञानात असते. तत्कालीन समाजाचा बौद्धिक विकास झालेला नसल्यामुळे तो समाज रसातळाला गेलेला होता असे आगरकरांना वाटत होते. आगरकरांनी आपल्या विविध लेखात बुद्धिमत्तेचे महत्त्व विषद केलेले आहे. ज्ञान किंवा बुद्धी अभावी आपल्या देशाची काय

अवस्था झालेली आहे याचेही विवेचन त्यांनी केलेले होते. त्यांच्या मते साक्षरता असलेल्या देशात सर्वात कमीत कमी माहिती असलेले लोक हे भारतीय होत याचे कारण त्यांच्या शिक्षणाच्या अभावात आहे असे त्यांना वाटते. ज्ञान व शिक्षणाअभावी भारतीय लोकांना परकीय नाही तर स्वतःच्या देशाचा इतिहास व संस्कृतीही माहीत नाही व हीच भारतीयांची सर्वात केविलवाणी अवास्था त्यांना वाटत होती. आपण ज्या देशात राहतो किमान त्या देशाचा इतिहास तरी आपणास माहीत असावा परंतु तत्कालीन समाजात तेवढीही बुद्धिमत्ता नव्हती. या समाजाने दुसऱ्यांचे इतिहास अवलोकन करून त्यापासून आपली सुधारणा करण्याची पर्वाही कधी केली नव्हती. समाजात बुद्धिप्रामाण्यवादाला व ज्ञानार्जनाला महत्त्व दिले जात असते तर समाजाचे स्वरूप हे तत्कालीन समाजापेक्षा वेगळे असते असे त्यांना वाटत होते.

समाजासाठी ज्ञानाची आवश्यकता काय याविषयीही आगरकर चर्चा करतात. त्यांच्या मते मनुष्यामध्ये ज्ञानाचा जसजसा प्रसार होत जाईल तसतशी त्याची रानटी स्थिती जाऊन त्यास उन्नतावस्था प्राप्त होते. बुद्धिमत्ता व ज्ञानाची महती आगरकरांनी आपल्या लेखांतून स्पष्ट केलेली होती. याविषयी ते लिहितात की, "पृथ्वीवर ज्ञानाशिवाय अशी दुसरी कोणतीहि वस्तु नाही, कीं जिचा कंटाळा न येंतां, किंवा जिच्यापासून शरीरास किंवा मनास कोणताहि व्याधि न जडतां, जिच्या योगानें वृत्ति आमरण आनंदमय राहूं शकेल. जें पुरूष ज्ञानसंपादनांत निमग्न झालेले असतात, त्यांसच या अमोलिक सुखाचा निरंतर लाभ होतो. अलेक्झांडर, सीझर, नोपोलियन, तैमुरलंग, झांगिझखान इत्यादि जगत्प्रसिद्ध शूरांना ज्या सुखाचा अनुभव कधीं झाला नाहीं; तुर्कस्थान, इराण, चीन हिंदुस्थान इत्यादि विस्तृत देशांच्या बादशहांस अमर्याद सत्तेपासून किंवा अगणित द्रव्यापासून जें सुख कधींहि प्राप्त झालें नाहीं; रमणीय उद्यानें, विशाल मंदिरें यांत जें सांपडावयाचें नाहीं; जें सुवासांत, सुग्रासांत किंवा अत्यंत रूपवती स्त्रियांच्या सहवासांत नाहीं; जें दानानें दुणावतें; वार्द्धक्यानें ज्याची वृद्धि होते; अतिसेवनानें ज्याचा वीट न येतां अधिक क्षुत्क्षोभास जें कारण होतें, तें सुख विद्वानास मात्र प्राप्त होतें"[१७] थोडक्यात ज्ञान ही एक अशी गोष्ट आहे की, ज्याची तुलना कोणत्याच प्रकारच्या संपत्तीशी,

राजऐश्वर्याशी किंवा भौतिक सुखाशी होऊ शकत नाही. ज्ञानाचे महत्त्व न समजल्यामुळे आज प्रत्येक व्यक्ती केवळ सत्ता, संपत्ती व भौतिक सुख या चक्रव्युहात अडकलेला आहे. या सर्व बाबी माणसाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरणाऱ्या आहेत. कोणत्याही गोष्टीची आसक्ती ही एक प्रकारचे व्यसन असते. म्हणजे सत्ता, संपत्ती व भौतिक सुख यांचा अतिहव्यास एक व्यसन आहे. यामुळे माणसाचा ऱ्हास हा अटळ असतो. तथापि केवळ ज्ञानाचे व्यसन हे अशा प्रकारचे व्यसन असते की, ज्यामुळे माणसास कोणतीही हानी होत नाही. खऱ्या सुखाच्या प्राप्तीसाठी ज्ञानार्जन हे अत्यावश्यक असते असे त्यांना वाटत होते.

आगरकरांच्या मते ज्ञानामध्ये एक असाधारण सामर्थ्य असते ते म्हणजे त्याच्या संपादणुकीने मनुष्यास एक प्रकारचें अमरत्त्व प्राप्त होते. या अनुषंगाने आगरकरांनी लिहिले होते की, "याशिवाय ज्ञानाचें आणखी एक असाधारण सामर्थ्य आहे; तें हें कीं, त्याच्या योगानें मनुष्यास एक प्रकारचें अमरत्त्व प्राप्त होतें. व्यासवाल्मीकि, मनुयाज्ञवल्क्य, बुद्धशंकाराचार्य, ख्रिस्तसाक्रेटीस हे ज्ञानवान् सत्पुरूष होऊन गेल्यास अनेक वर्षे लोटलीं; पण त्यांच्या नांवांचा विसर जगास अजून पडला नाहीं. व पुढेहि पडेल असें वाटत नाहीं. कीर्तिरूपानें हे निरंतर राहणार. जुने ग्रीक लोक गेले; पण होमर, डिमॉस्थेनीस आणि आरिस्टॉटल हे अद्यापि आहेत. जुने रोमन लोक गेले; पण व्हर्जिल, सिसरो आणि जस्टीनिअन हे अद्यापि आहेत."[१८] आगरकरांच्या दृष्टिकोनातून या सर्व व्यक्तींनी आपल्या ज्ञानाच्या जोरावरच समाजात मोठेपणा प्राप्त केलेला होता. आज एवढी वर्षे लोटून गेलेली असली तरीही त्यांचे नाव अढळ आहे. म्हणजेच ज्ञान किंवा बुद्धी ही एक अशी शक्ती आहे की, जी व्यक्तीला प्रतिष्ठेबरोबरच अमरत्त्व मिळवून देते. वास्तविक माणसाला शारीरिकदृष्टया अमरत्त्व मिळविणे जरी अशक्य असले तरीही आपल्या ज्ञान व बुद्धिच्या जोरावर मात्र प्रत्येकाला अमरत्त्व प्राप्त करता येऊ शकते असे आगरकरांना वाटते. म्हणून अशा प्रकारच्या निर्भेळ व नित्सिम अशा ज्ञानाची उपासना करणारा समाज निर्माण होणे गरजेचे होते. असा समाज उभा करणे हे उद्दिष्ट शिक्षणाचे आहे असे आगरकरांना वाटत होते.

## ४) पाश्चात्य शिक्षणपद्धतीविषयी आगरकरांचा दृष्टिकोन

प्रामुख्याने एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात दोन प्रकारचे शैक्षणिक विचारप्रवाह होते. त्यातील एक म्हणजेच जे प्रचलीत भारतीय परंपरेनुसार दिले जाणारे शिक्षणविचार व दुसरे म्हणजे पाश्चात्य शिक्षणपद्धतीचा प्रभाव असलेले शिक्षणविचार. प्राचीन काळापासून ते ब्रिटिशांपर्यंत भारतावर अनेक परकीयांनी आक्रमणे केलेली आहेत. तथापि ब्रिटिशांच्या पूर्वी ज्यांनी हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या किंवा येथे आपली राज्ये स्थापन केली त्यांच्या शिक्षण विचारांचा फारसा प्रभाव भारतीय समाजावर पडलेला दिसत नाही. परंतु ब्रिटिशांच्या साम्राज्यामुळे भारतीय समाजावर पडलेला प्रभाव हा सहज दिसण्याजोगा होता. आगरकरांच्या मते इंग्रजांनी जे भारतावर राज्य स्थापन केले ते इतर राजवटीपेक्षा वेगळया स्वरूपाचे होते. या आगोदरच्या राजवटीमध्ये केवळ सत्ता व सामर्थ्य होते त्यामुळे त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून कुठलाही प्रभाव पडल्याचे दिसून आले नाही. तथापि ब्रिटिश सत्तेमध्ये मात्र सत्ता व सामर्थ्याबरोबरच बुद्धिमत्तेचीही जोड होती. त्यामुळे त्यांच्या बुद्धी व ज्ञानाचा प्रभाव भारतीयांवर पडल्याचे दिसून येते. सुरूवातीच्या काळात जरी हा प्रभाव कमी प्रमाणात जाणवला असला तरी एकोणिसाव्या शतकात मात्र हा विशेष बदल झाल्याचे दिसून आले होते.

आगरकरांनी ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर जरी टीका केलेली असली तरी त्यांच्या पाश्चात्य पद्धतीच्या ज्ञानाने मात्र ते भारावलेले दिसतात व अशा प्रकारचे ज्ञान भारतीय तरूणांनीही आत्मसात करावे अशी त्यांची भूमिका होती. आगरकरांनी देशाच्या भल्यासाठी पाश्चात्य शिक्षणाची आवश्यकता आहे असे मत व्यक्त केलेले होते यापाठीमागे त्यांची विशिष्ट अशी वैचारिक मनोभूमिका होती. आगरकर भारताला आर्यव्रत मानतात. या आर्यव्रताची अवस्था विविध आक्रमणांनी, येथील बुरसटलेल्या कल्पनांनी व अंधश्रद्धांनी अतिशय बिकट झाली. तत्कालीन या आर्यव्रताचे वर्णन करण्यासाठी आगरकर झाडाचे रूपक योजतात. त्यांच्या मते राष्ट्र उन्नतीचा एक विशिष्ट असा नियम असतो. नवी वृक्षे अंकुरतात तेंव्हा मुळचे जुने झाड नाहिसे झाले तरी त्यातील गुण त्या नव्या अंकुरात अधिक तेजस्वी रूपात बाहेर

पडतात. त्याप्रमाणे राष्ट्राचेही असावे. एका पिढीचे दुसऱ्या पिढीत संक्रमण होत असताना असा इष्ट बदल होणे आवश्यक असते. आगरकरांच्या मते इतर राष्ट्रांमध्ये तसा बदल झाला परंतु दुर्दैवाने भारतात मात्र तसा बदल घडून आला नाही. आगरकर या आर्यव्रताचे म्हणजेच भारतीय वृक्षाचे वर्णन करताना लिहितात की, "ग्रीक, रोमन, सिथियन, तार्तर, मोगल, अफगाण वगैरे लोकांच्या ज्या वावटळी त्यावर आल्या; त्यांमुळे त्याला बराच त्रास झाला. कधीं त्याच्या कांही फांद्या मोडून पडल्या; कधीं तें मुळापासून उपटून पडत आहे कीं काय असें वाटले; पण कर्मधर्म संयोगानें युरोपांतील ग्रीक व रोमन शाखांवर आणि इकडील इराणी शाखेवर जो प्रसंग गुदरला, तो या भारतीय आर्यशाखेवर गुदरला नाही! यामुळें हें जरठ झाड कसें तरी अजून उभें आहे! पण त्यांत कांही त्राण उरलेलें नाहीं! तें आंतून अगदीं शुष्क होत आलें आहे, व त्याचें खोड व फांद्या डळमळूं लागल्या आहेत. याला आतां असेंच उभें ठेवण्यास व यापासून नवीन शाखांचा उद्‌भव होऊन त्यास फिरून नवीनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणतां म्हणाल तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचें भरपूर पाणी द्यावयाचें! असे केलें तरच त्याचें पूर्वस्वरूप पूर्ण नष्ट न होतां, त्यापासून नूतन शाखावृत वृक्ष अस्तित्वांत येईल; पण तसें न केलें तर त्यावर प्रस्तुतकालीं चोहोंकडून जे तीव्र आघात होत आहेत, त्यांखाली तें अगदी जेर होऊन अखेरीस जमिनीवर उलथून पडेल."[१९] या रूपकातून आगरकरांनी विविध आक्रमणांनी व आपल्या अनिष्ट परंपरांनी आर्यव्रताची बिकट अवस्था कशी झाली याचे वर्णन तर केलेच परंतु या वृक्षाला सावरण्यासाठी पाश्चात्य ज्ञानाशिवाय पर्याय नाही असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या दृष्टिकोनातून समाजातील शीलावस्था नाहिशी करावयाची असेल तर त्यावर केवळ एकोणिसाव्या शतकात युरोपात जो विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात ज्ञानाचा विस्फोट झाला आहे त्याशिवाय पर्याय नाही. अजून जरी या शिक्षणपद्धतीचा कमी लोकांवर प्रभाव असला तरी अधिकाधिक प्रसार झाला की, देशाची परिस्थिती सुधारल्यावाचून राहणार नाही असा आगरकरांना विश्वास होता.

आगरकरांच्या मते प्रचलित शिक्षण पद्धतीत काही मर्यादा व दोष होते. तत्कालीन समाज हा परंपरेनुसार चालत आलेल्या वेद व पुराणग्रंथांच्या शिक्षणालाच शिक्षण मानत होता. तत्कालीन समाजाच्या मते जुने वेद, गणित, अलंकार, व्याकरण, न्याय व्यवस्था हेच खरे शिक्षण होते. अशाप्रकारच्या भ्रमामुळे समाजाला अंधत्त्व आल्यासारखे झालेले आहे असे आगरकरांना वाटत होते. ठराविक मर्यादेबाहेर जाऊन विचार करण्याची कुवत समाजात नव्हती. जुने शास्त्र आणि पुराण ग्रंथ यांचाच दाखला प्रत्येक बाबतीत दिला जायचा. याप्रकारे विसंबून राहण्याच्या कृतीमुळे समाजात कुठल्याही प्रकारे नवीन शास्त्रात किंवा कलेत विशेष प्रगती होताना दिसत नव्हती. जेथे आवश्यकता असेल तेथे जुन्या प्राचीन शास्त्र व पुराण ग्रंथांचा आधार निश्चित घ्यावा परंतु आधुनिक ज्ञानावर अधारित जी शास्त्रे आहेत त्याचाही स्वीकार करणे तितकेच आवश्यक असल्याचे मत आगरकरांचे होते. तत्कालीन परिस्थितीत राजकीय स्वातंत्र्य इंग्रजांकडून प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य जरी भारतीयांकडे नव्हते तरी देखील समाज सुधारणेसाठी तरी पाश्चात्य पद्धतीवर अधारित ब्रिटिश शिक्षणपद्धतीचे अनुकरण करणे गरजेचे होते.

पाश्चात्य शिक्षण पद्धतीही सुधारणावादी विचारांवर आधारभूत होती. या पद्धतीत इंग्रजी शिक्षणाचाही आगरकरांनी जाणीवपूर्वक पुरस्कार केल्याचे दिसून येते. समाजधुरा सांभाळणारे काही लोक इंग्रजी भाषेला विरोध करतात त्याचे कारण इंग्रजी भाषेमुळे आपल्या मराठी भाषेचे अस्तित्त्व धोक्यात येते की काय? असा प्रश्न त्यांना पडतो. अर्थात हा इंग्रजी विरूद्ध मराठी भाषेचा वाद एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात तर होताच पण आज एकविसाव्या शतकाचे एक दशक उलटून गेलेले असतानाही हाच वाद आपणास पहावयास मिळतो. आगरकरांच्या दृष्टिकोनातून विचार केला तर इंग्रजी भाषेमुळे मराठी भाषेचा कुठल्याही बाबतीत तोटा होणार नव्हता, उलट महाराष्ट्रीयन लोक इंग्रजीचे तत्त्वज्ञान अभ्यासताना मराठीचे माध्यम वापरतील म्हणजेच मराठी शिवाय इंग्रजी असा ते विचार करू शकत नाही. 'वाक्यमीमांसा' या आपल्या ग्रंथात आगरकर इंग्रजी भाषेचे महत्त्व सांगताना लिहितात की, "या देशात इंगजी भाषेचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत गेला तर त्यापासून देशी

भाषा मागे पडण्याचा संभव नाही, इतकेच नाही तर त्यास उलट उत्तेजन येणार आहे, असा आमचा ग्रह झाला आहे."[२०] याशिवाय इंग्रजी शिक्षणामुळे व्यक्तीच्या विचार स्वातंत्र्याच्या मर्यादा वाढत जातात व त्यांच्यात एक विशाल दृष्टिकोन निर्माण होतो कारण इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. त्यांच्या मते ज्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले असे बहुतेक सुशिक्षित लोक सामाजिक प्रश्नांविषयी विचार करू लागले आहेत, व उत्तरोत्तर त्यांच्या विचारांचा परिणाम त्यांच्या आचरणावर होत असून समाजासाठी ही बाब विधायक ठरताना दिसत आहे.

अर्थात आगरकरांनी पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा अंगीकार केलेला असला तरीही त्यात काही निश्चित अशी बंधनेही आहेत. हे अनुकरण म्हणजे अंधानुकरण मात्र नाही. त्यातील चांगली तत्त्वे आमच्या समाजाला उपयुक्त पडतील तेवढयांचाच स्वीकार येथे अपेक्षित आहे. याविषयी आपली भूमिका आगरकरांनी 'सुधारक काढण्याचा हेतू' या संपादकीय लेखात स्पष्ट केलेली आहे. "मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्त्व न सांडता, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीने अंगीकार करीत गेलो तरच आमचा निभाव लागणार आहे. या कल्पना आमच्या राज्यकर्त्यांकडून येत आहेत, म्हणून त्या आम्ही स्वीकाराव्या असे आमचे म्हणणे नाही. त्यांचे अभिनंदन करून त्यांचा आपण अंगीकार केला पाहिजे असे जे आम्ही म्हणतो, ते अशासाठी की शिक्षणात व त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेच्या अत्यवश्य तत्त्वांचा समावेश झाला आहे. म्हणून ज्या लोकांस लयास जावयाचे नसेल त्यांनी त्यांचे अवलंबन केलेच पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाही. समाजाचे कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जवढी बंधने अपरिहार्य आहेत, तेवढी कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरूषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल तितका घ्यावयाचा, हे अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचे मुख्य तत्त्व आहे, व हे ज्यांच्या अंतःकरणात बिंबले असेल, त्यांना आमच्या समाजव्यवस्थेत अनेक दोषस्थले दिसणार आहेत, हे उघड आहे. ही दोषस्थले वारंवार लोकांच्या नजरेस आणावी, ती दूर करण्यास उपाय सुचवावे, आणि युरोपीय सुधारणेत अनुकरण करण्यासारखे काय आहे, ते

पुनःपुनः दाखवावे, यास्तव हे सुधारक पत्र काढले आहे." [२१] या संदर्भातील मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्त्व न सोडता हा वाक्यांश महत्त्वाचा आहे. भारताची जी एक आर्यव्रत अशी ओळख आहे तिच्या मर्यादेत राहूनच आगरकरांना हे पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचे अनुकरण मान्य होते आणि हे अनुकरण तत्कालीन भारतातील राज्यकर्ते ब्रिटिशांकडूनच शिकावे असेही आगरकरांचे मत होते. आगरकरांच्या या विचारांमुळे त्यांच्यावर ब्रिटिश धार्जिणे म्हणून टीकाही झालेली होती. तथापि आगरकर हे त्यांच्या लिखाणातून असेही दाखवून देतात की, जरी ब्रिटिशांकडून राजकीय स्वातंत्र्य मिळविणे शक्य नसले तरीही किमान त्यांच्या ज्ञानाचा वापर करून आपला समाजतरी उन्नत करता येईल. महाराष्ट्रातील अनेक लोक पाश्चात्य ज्ञानाचे महत्त्व ओळखून होते. परंतु आपला हिंदू धर्म, धर्माभिमानी कल्पना बाटतात की काय या हेतूने त्यांचा विरोध होता. अशा लोकांसाठी आगरकरांची स्पष्ट शब्दात भूमिका होती ती म्हणजे आपल्या धर्मात व सामाजिक आचारविचारांमध्ये जेवढे काही चांगले व इष्ट आहे ते कोणत्याही पद्धतीच्या शिक्षणाने चिरकाल राहणार आहे. जे काही दोषपूर्ण आहे ते मात्र पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीच्या ज्ञानामुळे संपुष्टात आल्याशिवाय राहणार नाही. म्हणजेच आगरकरांनी आपल्यातील दोष नाहिसे करण्यासाठी पाश्चात्य ज्ञानाचा पुरस्कार केला होता.

थोडक्यात पाश्चात्य ज्ञानाच्या आधारे भारतीयांना आधुनिक ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान यांची दरवाजे खुली करण्याचा आग्रह आगरकरांचा होता. पाश्चात्य शिक्षणपद्धतीमुळे युरोपात जे तंत्रज्ञान विकसित झाले ते आत्मसात केले तरच आपला देशही या जागतिक स्पर्धेत तग धरू शकेल अन्यथा आपल्या देशाला एक प्रकारचे पंगुत्त्व आल्याशिवाय राहणार नाही. भारतात ब्रिटिशांनी ज्या दळणवळण क्षेत्रात सुधारणा केल्या त्यामध्ये रेल्वे, टपाल, रस्ते, तारायंत्रे या सुधारणा पाश्चात्य शिक्षण पद्धतीचेच द्योतक होत्या भले त्या ब्रिटिशांनी स्वार्थी हेतूने केलेल्या असतील परंतु त्याचा फायदा भारतीयांना झाला नाही असे म्हणता येणार नाही.

## ५) आगरकरांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

एकोणिसाव्या शतकात सर्वसामान्यांच्या शिक्षणाचीच प्रचंड वाताहात झालेली होती. आगरकरांनी ज्याप्रमाणे सर्वसामान्य समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाची आवश्यकता आहे असे सांगितले होते त्याप्रमाणेच त्यांनी स्त्री शिक्षणाचा विचार केलेला होता. सर्वंकष व सर्वसामावेशक शिक्षणाची आवश्यकता तत्कालीन समाजास होती हेच त्यावरून लक्षात येते. शिक्षणही बाब कोणत्या एका ठराविक वर्गाचीच किंवा पुरूषांचीच मक्तेदारी नाही त्यामुळे आगरकरांनी आपल्या विविध लेखांमधून आपले विचार प्रकट केलेले दिसून येतात.

### I) स्त्री शिक्षणाची आवश्यकता

तत्कालीन समाजात स्त्रियांची अवस्था ही अधिकच बिकट झालेली होती. स्त्रीसंबंधी अनेक वाईट चालिरिती समाजात रूढ झालेल्या होत्या. बालविवाह पद्धती, सतीप्रथा, केशवपन, पडदा पद्धती, यासारख्या अनेक चालिरिती होत्या. एक उपभोगाची वस्तू जशी असते त्याहून वेगळे अस्तित्त्व स्त्रियांचे नव्हते. विधवा स्त्रीचे समाजात काय स्थान होते हे सांगताना आगरकर लिहितात, “नवऱ्याच्या मरणाची बातमी ऐकल्याबरोबर जी स्त्री मूर्च्छित होऊन प्राणोत्क्रमण करते, ती पहिल्या नंबरची साध्वी; व जिला प्राण घालविण्यासाठीं अफूसारख्या एखाद्या विषारी द्रव्याची, किंवा विहिरीसारख्या एखाद्या उदकसंचयाची, प्रार्थना करावी लागते, ती नंबर दुय्यमची साध्वी. याहून ज्यांचे वर्तन निराळें होतें त्यांना काय म्हणावें, हें या महापंडितांनीं स्पष्ट म्हटलेलें नाहीं. तथापि त्यांच्या लिहिण्याच्या झोंकावरून अशा स्त्रियांस काय म्हणावें असा प्रश्न जर कोणी त्यांस करता तर अशा स्त्रियांस ‘अधमाधमा’, ‘कुलंगारा’, ‘राक्षसकुलद्भवा’, ‘पाषाणहृदया’, अशा प्रकारचीं नांवें दिलीं पाहिजेत, असें त्यांनीं विनदिक्कत सांगितले असतें! पती मेला कीं ‘संसार असार’ व ‘जगण्याचें कारण राहिलें नाही’, असें स्त्रियांस वाटून त्यांना सहज मृत्यु यावा, किंवा निदान त्यांनी आत्महत्या तरी करून घ्यावी, याहून स्त्रियांस अत्यंत शुद्ध पातिव्रत्यांचे किंवा सद्गुणाचें दुसरें निदर्शक नाहीं.”[२२] अशा प्रकारची परिस्थिती स्त्रियांची होती. स्त्रीचा कुटुंबातील दर्जा हा अतिशय कनिष्ठ प्रतीचा

होता. या सर्व अनिष्ट चालिरितींमध्ये आगरकरांच्या दृष्टिकोनातून सर्वात वाईट रूढी म्हणजे बालविवाह ही होती. कारण बालविवाह प्रथेतून इतर समस्या उद्‌भवत होत्या. तत्कालीन समाजामध्ये स्त्री ही एक प्रजाजनन यंत्रच समजली जायची. केवळ चूल आणि मूल एवढेच तिचे अस्तित्त्व होते. आगरकरांच्या दृष्टिकोनातून समाजाचा हा बेशरमपणा होता व जो पर्यंत स्त्री शिक्षणासाठी काही योग्य अशी पावले उचलली जात नव्हती तो पर्यंत स्त्रियांची या विषमतेतून सुटका होण्याची यत्किंचितही शक्यता नव्हती. थोडक्यात अंधश्रद्धेवर आधारित अशा धर्मकल्पनांचा, रूढींचा घराण्याच्या प्रतिष्ठेचा आधार घेऊन सर्व बंधने स्त्रियांनीच पाळली पाहिजेत असा दंडक निर्माण झाला होता व यातूनच स्त्रीची सर्वसामान्य समाजातून, समानतेच्या तत्त्वातून शिक्षण व ज्ञानाच्या क्षेत्रातून हकालपट्टी करण्यात आली होती.

महात्मा फुलेंनी जेवढया तीव्रतेने स्त्री शिक्षणाचा प्रयत्न केला होता अगदी तेवढयाच तीव्रतेने आगरकरांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. तत्कालीन समाजात पतीनिधनानंतर सती जाणाऱ्या स्त्रीला 'साध्वी' असे म्हटले जायचे, परंतु आगरकरांच्या मते अशा स्त्रीला साध्वी न म्हणता स्वार्थी म्हणायला हवे. याबाबत आगरकर लिहितात की, "हा माझा नवरा मेला; आतां माझें काय होईल; हे दुष्ट सासूसासरे मला ताबडतोब सोंवळी करून आजपर्यंत मजकडून झालेले जे त्यांचे अपराध त्यांबद्दल माझा आमरण छळ करतील; व ज्या मी आजपर्यंत या माझ्या पतीच्या जिवावर जगाची मुरवत ठेविली नाहीं त्या मला येवढयातेवढयासाठीं ज्याच्यात्याच्यापुढें तोंड वेंगाडावें लागून, कोणीं कांहीं म्हटलें तरी मान खालीं घालून बटकीप्रमाणें वागावें लागेल; सोन्यासारख्या पोरांचे हाल डोळयांनीं पहावे लागतील, किंवा त्यांची ताडातोड करून घ्यावी लागेल. तेंव्हा अशा स्थितींत जगण्यापेक्षां मरणें हेंच बरें, असा विचार करून जिनें जीव देण्याचा धडा केला तिला 'साध्वी' म्हणण्यापेक्षां स्वार्थी म्हणणें विशेष शोभणार आहे."[२३] म्हणजेच केवळ समाजातील अनिष्ट चालिरितींपासून आपली सुटका करून घेण्यासाठी स्त्री मरण पत्करते हा एक प्रकारे स्वार्थीपणाच होता. यातून एक समाजाचा पायंडाच पडत गेला व प्रत्येक विधवा स्त्रीने सती गेलेच पाहिजे अशी अपेक्षा स्त्रीकडून केली जाऊ लागली. वास्तविक स्त्रीने सती न जाता या प्रचलित अनिष्ट प्रथांच्या

विरोधात संघर्ष करणे आगरकरांना अपेक्षित होते. शिक्षणाने स्त्रीला आपल्या हक्कांची जाणीव होऊ शकेल असे त्यांना वाटते. थोडक्यात स्त्रीला स्वतःच समजावे की, ही पुरूषप्रधान संस्कृती आपल्यावर अन्याय करीत आहे. कुटुंब आणि समाज प्रगतीपथावर नेण्यासाठी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणे जरूरीचे आहे असे जरी आगरकरांनी सांगितले असले तरीही हे शिक्षण केवळ स्त्री साक्षर करणे किंवा स्त्रियांनाही पुरूषांप्रमाणे लिहिता वाचता यावे एवढा मर्यादित दृष्टिकोन त्यांच्या शैक्षणिक विचारांचा निश्चितच नव्हता. स्त्री शिक्षण विषयक विविध पैलू त्यांच्या लेखनातून स्पष्ट होतात. केवळ स्त्रीला शिक्षण द्यायचे नाही तर कोणते शिक्षण दिले जावे म्हणजे स्त्रियांचा उत्कर्ष होईल याचाही विचार आगरकरांनी एकोणिसाव्या शतकातच केलेला दिसून येतो.

## II) स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार

एकोणिसाव्या शतकात हळूहळू शिक्षणाचा प्रसार विविध समाजसुधारकांच्या व ब्रिटिश सरकारच्या माध्यमातून निश्चितच होत होता. विशेषतः पुरूष शिक्षणाच्या बाबतीत तर बऱ्याच प्रमाणात हा विकास जाणवत होता परंतु स्त्री शिक्षणाच्या बाबतीत समाज अनभिज्ञच होता हे मात्र निश्चित. समाजामध्ये एक प्रकारची नकळतच प्रवृत्ती जडलेली असते, ती म्हणजे जे आपल्याला मिळालंय ते इतरांना मिळू नये. उदाहरण घ्यायचे झाले तर राज्यव्यवस्थांचे उदाहरण आपण घेऊ शकतो. ज्यांनी इतरांवर राज्ये प्रस्थापित केली त्यांना त्यांच्यात ते राज्य सांभाळण्याची कुवत नसली तरी ते आपल्या कडून जाऊ नये असेच वाटत असते. ब्रिटिशही भारतीयांकडे राज्यकारभार चालविण्याची काडीमात्रही क्षमता नाही असेच समजत होते. विद्येच्या बाबतीतही तसेच आहे. विद्या संपादून जे लोक शहाणे झाले ते ही विद्या इतरांना सहज मिळू न देण्याच्या प्रयत्नात असतात कारण इतर शहाणे झाले तर आपल्याला विरोध होईल असे त्यांना वाटत असते. हाच विचार तत्कालीन समाजातील पुरूषांचा स्त्रियांविषयी होता त्यामुळे स्त्री शिक्षणाचा उघडपणे पुरस्कार केल्याचे जाणवत नाही. आगरकरांनी मात्र स्त्रियांना प्राथमिक शिक्षण सक्तीने मिळालेच पाहिजे असाच आग्रह धरला किंबहुना प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता ही पुरूषांपेक्षाही स्त्रियांना अधिक आहे असे त्यांनी सांगितले होते. हे

स्पष्ट करतांना ते सांगतात की, "अपत्यसंगोपनाची खरी जबाबदारी आईवर असते. आईच्या प्रकृतीचे, स्वभावाचे व आचरणाचे परिणाम मुलीच्या प्रकृतीवर थेट गर्भाधानापासून होऊं लागतात... मुलें स्वावलंबी होततोंपर्यंत त्याबद्दल जी अहोरात्र खस्त खावी लागते ती आईला किंवा कारणपरत्वें तत्स्थानापन्न जी स्त्री झाली असेल तिलाच खावी लागते. पापणीला पापणी लागूं न देतां उभ्या रात्री जागत काढणें, मोटाच्या मोटा धुणीं धुणें, कोणत्याहि प्रकारच्या देहधर्मास कधींहि कंटाळून न जाणें – तात्पर्य आपल्या प्राणापेक्षां, ज्याला आपण पोर म्हणतों त्यास जपणें हें अवघड काम स्त्रीच करते व तीच करूं शकणार आहे."[२४] एवढी मोठी जबाबदारी स्त्री स्वतः जबाबदारीने पेलवते. आगकरांच्या मते ज्या स्त्रीवर आपण भावी पिढीच्या संगोपनाची जबाबदारी टाकतो त्याच स्त्रीला अक्षरशत्रू ठेवून चालणार नाही. तसे केल्याने आपण स्वतः आपल्या विकासास खीळ निर्माण करत असतो. यासाठी तत्कालीन स्त्रीला किमान प्राथमिक शिक्षण मिळालेच पाहिजे असे आग्रही मत त्यांचे होते हे त्यांच्या विचारांतून दिसून येते. प्राथमिक शिक्षणाचे कोणते फायदे होतात हे समाजाला पटवून देणे कठीण होते कारण भौतिकशास्त्र किंवा इतर विज्ञान विषयात अनेक गोष्टी प्रयोगाअंती सिद्ध होतात परंतु स्त्रियांना प्राथमिक शिक्षण दिल्याने कोणता फायदा होईल हे समाजाला पटवून देण्यासाठी कोणता एखादा प्रयोग नव्हता. हे समजण्यासाठी केवळ समाजाला काही वर्षे वाट पहावी लागणार होती. परंतु तत्कालीन समाज मात्र त्यावर विश्वास ठेवणारा नव्हता त्यामुळे स्त्री शिक्षणाविषयी कोणी सुधारणात्मक बोलत असेल तर लोक त्यालाच नावे ठेवत असत.

पाश्चात्य देशात ज्या प्रमाणे स्त्री शिक्षणाच्या बाबतीत क्रांती झाली त्या प्रकारचे अनुकरण आपल्या येथे घडून येणे आवश्यक आहे असेही त्यांना वाटत होते. प्राचीन भारतातील गार्गी, वाचक्नवी किंवा वडवा, प्रतियेमी यासारख्या विद्वान स्त्रियांचा दाखला समाज देत असला तरी या सारख्या स्त्रिया उच्च विद्याविभूषित होत्या म्हणजे सर्वच स्त्रिया शिक्षित होत्या असे नव्हते. त्यामुळे बहुजन समाजातील स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करणे गरजेचे आहे व त्यासाठी समाज व सुधारकांनी पुढाकार घ्यावा असे त्यांना वाटत होते. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या इतर देशांचीही उदाहरणे आगरकर देतात. अमेरिका

व युरोपखंडात स्त्री शिक्षणाच्या प्रश्नावरून वाद होत नव्हते त्यामुळे त्या देशांप्रमाणे आपल्या देशातही तशी सक्ती होणे अगत्याचे होते. याशिवाय भारतात मुलास कुलदीपक समजून चांगल्या प्रतीचे शिक्षण देण्याचा जसा आग्रह धरला जातो तसाच आग्रह मुलींच्या शिक्षणासाठी धरावा अशी आग्रही भूमिका त्यांची होती. आगरकरांनी जगाच्या तुलनेत भारतीय स्त्री शिक्षणाचा विचार करून किती मोठी विषमतेची दरी होती हे स्पष्ट केलेले होते. हा विरोधाभास दूर करण्यासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनीही पुढाकार घेऊन मुलांच्या शिक्षणासाठी जसे प्रयत्न होतात तसेच मुलींच्या शिक्षणासाठी करावेत असे मत त्यांनी नोंदविलेले होते. या अनुषंगाने त्यांनी बडोद्याचे शासक सयाजीराव गायकवाड महाराज यांनाही उद्देशून अवाहन केले होते. "एका बाजूस ज्ञानाचा मुळीच गंध नाहीं व दुसऱ्या बाजूस पुरूषांप्रमाणे मोठमोठया विद्यालयांत पढून हव्या त्या पदव्या संपादण्याची व पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणे करण्याची सदर परवानगी, अशी जी विलक्षण स्थिति सांप्रत काली पृथ्वीच्या पाठीवर दिसत आहे तीवरून अनुमान करतां, पुरूषांप्रमाणें स्त्रियांना ज्ञानमंदिराचीं द्वारें आम्हांस आज नाहीं उद्या, खुलीं करून द्यावीं लागणार हें ध्यानांत आणून श्री सयाजीराव महाराज गायकवाड मुलांच्या शिक्षणाप्रमाणेंच मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबद्दलहि सक्तीचा कायदा करतील तर उच्च कुलांतल्या मराठयांनी आपल्या स्त्रियांस आजपर्यंत गोषांत कोंडून घातल्यामुळें जी अपकीर्ति संपादली आहे तिचें परिमार्जन होऊन प्रख्यात लोकशास्त्यांच्या नाममालिकेंत त्यांचे नाव चिरस्थाई होऊन बसेल."[२५] एकंदरीत उच्च शिक्षण हे इच्छेनुसार असले तरी किमान प्राथमिक शिक्षण स्त्रियांनाही सक्तीचे असावे अशी त्यांची भूमिका लक्षात येते. या कामी समाजानेही पुढाकार घ्यावा असे आगरकरांना वाटत होते.

**III) चरितार्थ शिक्षणाची आवश्यकता**

चरितार्थ चालविण्याइतपत व्यक्तीला स्वावलंबी बनविणे हे एक शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. व्यापार उदिम, नोकरी या सर्व बाबी चरितार्थ चालविण्यासाठी आवश्यक असतात व त्या आपण ज्या पद्धतीचे शिक्षण घेतो त्यावर अवलंबून असतात. तत्कालीन परिस्थितीचा

विचार करता नोकरी व व्यापार उदिम या गोष्टी स्त्रियांसाठी पूर्णपणे नाकारण्यात आलेल्या होत्या त्यामुळे स्त्रियांचे जीवन हे कायम स्वरूपी परावलंबीच असायचे. कुटुंबाला आर्थिक आधार म्हणून किंवा पतीचा आधार नसताना स्त्रीला चांगल्या प्रकारचे जीवन जगता यावे यासाठी तिला चरितार्थ संपादणुकीचे शिक्षण मिळणे किती आवश्यक आहे याविषयी विचार आगरकरांनी मांडलेले होते. पतीनिधनानंतर स्त्रीची अवस्था अतिशय विकट व्हायची. त्यामुळे केवळ परावलंबित्त्व येईल म्हणून सती जाणाऱ्या स्त्रियांची संख्या त्याकाळी अधिक होती. अशा स्त्रियांना चरितार्थ शिक्षणाची आवश्यकता का होती हे सांगताना आगरकर लिहितात की, "सुखवस्तु घराण्यांतल्या स्त्रियांस विद्यानंदांत काळ घालविण्यास शिकविण्याचा परिपाठ पडेल व गरीब लोकांच्या मुलींस थोडेंबहुत लिहिणेंवाचणें शिकवून, त्याबरोबरच एखाद्या धंद्याचे ज्ञान करून देण्यांत येऊं लागेल, तर नवऱ्याच्या मृत्युवार्तेबरोबर आपोआप मरणारी किंवा मारून घेणारी स्त्री दिसेनाशी होईल. इतकेंच नाहीं, तर ज्यांच्यावर दुर्दैवानें तो दुःखाचा डोंगर कोसळेल, त्या हळू हळू त्याचा भार विसरूं लागून आपलें, आपल्या मुलाबाळांचे व इतरांचें अस्तित्त्व होईल तितकें सुखावह करण्यास झटूं लागतील!"[२६] सतीबंदी घडून येण्यासाठी एक उत्तम उपाय आगरकर यातून सुचविताना दिसतात. त्यांच्या मते स्त्री सती जाण्यास तयार होते कारण पतीनिधनानंतर ती कोणताही उद्योग व्यवसाय चालवून स्वावलंबी जीवन जगू शकत नाही. यासाठी तिला चारितार्थ संपादणुकीचे शिक्षण दिले जाणे अगत्याचे आहे असे आगरकरांना वाटत होते. त्यामुळे स्त्री पतीनिधनानंतरही आपल्या मुलाबाळांचे व स्वतःचे संगोपन चांगल्याप्रकारे करू शकेल. अशा प्रकारे दोन फायदे आगरकरांनी स्त्रियांच्या चरितार्थ शिक्षणाचे सांगितले होते. एक म्हणजे यामुळे सती सारख्या अनिष्ट प्रथेला आळा बसेल व दुसरा म्हणजे स्त्रियांमधील परावलंबीत्त्व कमी होऊन स्वावलंबी जीवन स्त्रिया जगू शकतील.

### IV) स्त्रियांच्या उच्च शिक्षणाची आवश्यकता

आगरकरांच्या स्त्री शिक्षणविषयक विचारांचा आणखी एक पैलू म्हणजे स्त्रियांना उच्च शिक्षणाची आवश्यकता हा होय. त्यांच्या मते स्त्रियांना उच्च शिक्षण दिल्याशिवाय कुटुंब व

समाज यांची घडी व्यवस्थित बसणार नाही म्हणजेच सरांश रूपाने विचार केला तर त्यांना स्त्रियांनी उच्च शिक्षण घ्यावे असेच वाटत होते. स्त्रियांनी अगदी मॅट्रिक्युलेशन, बी.ए., एल.एम, एल.एल.बी. या सारख्या उच्च पदव्या संपादित कराव्यात असेही त्यांना वाटत होते. परंतु तत्कालीन समाजाचे मागसलेपण लक्षात घेऊन हे उच्च प्रतीचे शिक्षण स्त्रियांना घेता येणे शक्य आहे काय? व समाजाकडून खरच तशी अनुमती स्त्रीला दिली जाईल काय? याचा विचार करणेही तितकेच महत्त्वाचे होते.

जेंव्हा युरोपियन राष्ट्रात सर्व स्त्रीपुरूषांना व मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीने मिळालेच पाहिजे असा विचार पसरतो त्यावेळी आमच्या येथे केवळ काहीना काही तरी, अर्थात स्त्रियांनी वगळता, शिकले पाहिजे या विचारांची खात्री पटते. अशा समाजात स्त्रियांच्या शिक्षणासाठी समाज धजावेल काय? असाही प्रश्न होता. भविष्यात हे निश्चितच होईल असा विश्वास आगरकरांना आहे. परंतु तत्कालीन परिस्थिती मात्र निश्चितच विकट होती असेही ते सांगतात. "ज्याप्रमांणे प्रत्येक मुलास व मुलीस आईबापांनीं किंवा बापानें प्राथमिक शिक्षण दिलें पाहिजे, असे अलीकडे लोकमत सर्वत्र झालें आहे, त्याप्रमाणेंच स्त्रियांनीं, पुरूषांनी पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करावा; पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी; पाहिजे त्या परीक्षा द्याव्या आणि पदव्या मिळवाव्या; आणि पाहिजे तेव्हां लग्ने करून हवा तसा संसार करावा अशी मोकळीक कालांतरानें सर्वांस मिळणार आहे."[२७] याविषयी आगरकरांना खात्री वाटत होती. भविष्यातील स्त्री शिक्षणाविषयी ते आशावादी होते. त्यांच्या या विचारातून समाज सुधारणेविषयी एक सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो. परंतु त्यांनी मांडलेल्या या विचारास तत्कालीन समाजाचा विचार करता सहज यश येऊ शकत नाही हेही आगरकर जाणत होते, कारण ज्या समाजात बालविवाहासारखी समस्या आहे त्या समाजात पदवीपर्यंतचे शिक्षण होणे अगदी दुरापास्तच होते. ते म्हणतात "अल्पवयांत प्राप्त झालेली गृहस्थता किंवा पितृता विद्यार्थिपणास केवळ विघातक होत नाहीं, असा पुष्कळांना अनुभव आहे. पण जर तेराव्या किंवा चौदाव्या वर्षापासून मुलीच्या पाठीमागें गर्भारपण, बाळंतपण व अपत्यसंगोपन हीं लचांडें

लागलीं असतील तर तिनें हायस्कुलांत किंवा कॉलेजांत जावें कसें? आणि मॅट्रिक्युलेशनची, बी.ए.ची, एल्.एम् ॲन्ड एस्ची, एल्.सी.ईची अथवा एल्.एल्.बीची परीक्षा द्यावी कशी?"[२८] म्हणजेच जो खरा विद्यार्जनाचा काळ असतो त्या काळातच स्त्रियांवर कौटुंबिक जबाबदारी पडायची. अशा परिस्थितीत तिला कुटुंबाची जबाबदारी सांभाळून मोठमोठया पदव्या संपादने कठीण होत असायचे. मुळात स्त्री शिक्षणास समाजाचा विरोध होता आणि एखाद्या कुटुंबाने अशी परवानगी दिलीच तर कौटुंबिक कामे त्या स्त्रीला माफ नसायची अशा परिस्थितीत स्वभाविकपणे स्त्रीचे शिक्षणाकडे दुर्लक्ष व्हायचे.

स्त्रियांचे उच्च शिक्षण व्हावे असे वाटत असेल तर आगरकरांच्या दृष्टिने त्यावर एकच उपाय होता तो म्हणजे एकतर शिक्षण संपेपर्यंत स्त्रिया अविवाहित असाव्यात किंवा त्यांचा विवाह झालाच तर नवऱ्यांनी व सासूसासऱ्यांनी तिला शिक्षण संपेपर्यंत अविवाहितेसारखे राहू दिले पाहिजे. यातील दोन्हीही पर्याय समाज सहजासहजी स्वीकारण्यास तयार होणार नव्हता. परंतु समाजाच्या सुधारणेसाठी तसे घडणे मात्र त्यांना अभिप्रेत होते. ज्या कुटुंबातील स्त्रिया या उच्च शिक्षित असतील त्या कुटुंबांचा बौद्धिक, वैचारिक व आर्थिक स्तर उंचावल्याशिवाय राहत नाही. एवढेच नाही तर त्या कुटुंबात जन्मणाऱ्या मुलांवर चांगले संस्कार अशा स्त्रिया करू शकतात. यासाठी आगरकरांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणाचाही पुरस्कार केलेला होता.

**V) आगरकरांची सहयोगी शिक्षणाची कल्पना**

स्त्री शिक्षणाविषयी एवढा प्रचंड खल झालेला असताना व सुधारणावादी वारे समाजात वाहण्यास सुरूवात झालेली असल्या कारणाने कदाचित सरकारच्या सक्तीने म्हणा किंवा समाजाच्या लाजेखातर स्त्रियांना शाळेत पाठवावे लागणार येथपर्यंत समाजातील काही पुरूषांची मनोभूमिका तयार झाली होती. स्त्रिया वरचढ होतील ही भीती मात्र सहजासहजी पुरूषांच्या मनातून जाणे शक्य नव्हते. स्त्रियांना शिक्षण दिल्यामुळे त्या विघडतील, दुराचारी होतील व त्यामुळे समाज विघडेल अशी भीतीही त्यांना वाटत होती. यासाठी स्त्रियांचे शिक्षण वेगळयाप्रकारचे असावे व ते वेगळया वर्गात दिले जावे असे पर्याय समाजाने सुचविण्यास

सुरूवात केली होती. म्हणजेच मुले व मुली यांच्या सहयोगी शिक्षण पद्धतीला विरोध होण्यास सुरूवात झाली होती. याचे नेमके कारण काय यावर जरी समाज बोलण्यास तयार नसला तरी आगरकरांनी मात्र अगदी परखड शब्दात याचे कारण सांगितलेले होते. त्यांनी लिहिले होते की, "स्त्रीपुरूषांस एकत्र शिक्षण दिल्यामुळें कित्येक पुरूषांस घरीं बसून मुलें खेळविण्याचें; लुगडीं धुण्याचें; भांडी घासण्याचें; स्वयंपाक करण्याचें व दळणकांडण करण्याचें काम करावें लागतें तर त्याला आम्ही काय करणार? असलीं कामे स्त्रियांनीच करावीं हा काही ईश्वरी नियम नाहीं! तसेंच मुलें जीं होतात तीं स्त्रियांना होतात, म्हणून त्यांनींच तीं कामें केलीं पाहिजेत असेंहि कोणास सिद्ध करून देतां येणार नाही!"[२९] यावरून असे लक्षात येते की, आगरकरांनी स्त्री पुरूषांना एकत्रित शिक्षण द्यावे व तेही एकाच प्रकारचे असावे असे सुचविले होते.

स्त्रियांना आपल्यावर समाजाकडून होत असलेल्या अन्याय अत्याचाराची जाणीव व्हावी यासाठी सहयोगी शिक्षण त्यांना मिळणे गरजेचे आहे. स्त्रियांमध्ये शिक्षणाने आपल्या हक्काची जाणीव निर्माण झाली की, आपोआप त्या पुरूष वर्गाबरोबर आपल्या हक्कांसाठी संघर्ष करतील व त्यामुळे पुरूषांना आपला जुलूम सोडून द्यावा लागेल असे मत आगरकरांचे होते. त्यामुळे स्त्रियांस सहयोगी शिक्षण दिल्यामुळे फायदाच होणार होता. या शिक्षणातून स्त्री-पुरूष समानता हे तत्त्व जोपासले जाणार होते. समाजाने या प्रकारातही पळवाट काढण्यास सुरूवात केली होती. मुलींना कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे याविषयीही प्रश्न निर्माण झालेला होता. याविषयी मत मांडताना मात्र पुरूष वर्गाने आपल्या पुरूष प्रधान संस्कृतीचे अस्तित्त्व धोक्यात येऊ नये म्हणून केवळ साक्षर बनविणारे व गृहोपयोगी ठरेल असे शिक्षण स्त्रीला दिले जावे असेच सुचविले होते. याविषयी पुरूषवर्गाची भूमिका काय होती हे आगरकरांनी आपल्या 'स्त्रीपुरूषांना एकच शिक्षण द्यावें, व तेही एकत्र द्यावें' या लेखात आपले विचार मांडले होते. ते लिहितात की, "लिहिणें, वाचणें व हिशोब करणें या तीन गोष्टी साऱ्या मुलांप्रमाणें साऱ्या मुलींस शिकविण्यास कांहीं हरकत नाहीं, असें सामान्य मत आहे. पण येथून पुढें मतभेदास आरंभ होतो; व वरिष्ठ शिक्षणाच्या संबंधाने त्याचा कळस होतो. प्राथमिक शिक्षण आटोपलें

म्हणजें मुलींना घरीं ठेवून घेऊन प्रपंचव्यवस्था शिकवावी असें कित्येकांचें मत आहे. तसें न करावयाचें असेल आणि त्यांना शाळेंत पाठवाव्या असा आग्रहच असेल तर निदान ज्या शाळेंत शिवणकाम, गायन, पाकसिद्धी, गृहव्यवस्था, रेशमाचीं, लोंकरीचीं किंवा अशाच प्रकारच्या कसल्यातरी धाग्याचीं वस्त्रें विणण्याचें काम; वेत, गवत वगैरे तंत्वात्मक द्रव्यांनीं होणारीं करंडया वगैरे नक्षीचीं व साधीं कामें; लहान मुलांचे संगोपन व रोगचिकित्सा; स्त्रियांचे रोग व त्यांवर औषधोपचार इत्यादि विषय ज्या शाळांत शिकवितात अशांतच त्यांस पाठवाव्या; भूगोल, इतिहास, गणित, पदार्थविज्ञान, ज्योतिष वगैरे मेंदूचा खराबा करणारे विषय त्यांच्यापुढें कधींहि आणूं नयेत. त्यांत त्यांचा व जगाचा मुळींच फायदा नाहीं."[३०] म्हणजेच स्त्रियांना शिक्षण द्यायचेच म्हटले तर तेही गृहस्थी चालविण्यास उपयुक्त ठरेल एवढया पुरतेच द्यावे असे मानणारा समाज होता. याही पुढे जाऊन स्त्रिया पुरूषांपेक्षा कमी बुद्धिमान असतात असा शेरा पुरूष प्रधान समाज मारून तिला सहयोगी शिक्षण नाकारायचा. हा मुद्दा खोडून काढण्यासाठी आगरकर एकच उपाय सुचवितात तो म्हणजे मुलांनी व मुलींनी आपल्या आवडीनुसार व इच्छेनुसार वाटेल त्या शाळेत व पाहिजे तेवढी विद्या संपादित करावी. यामुळे स्त्री व पुरूष असा भेद नाहीसा होईल असा विश्वास आगरकरांना वाटतो. सुरूवातीस असे घडणे थोडेसे कठीण जाईल. परंतु हळुहळू हा इष्ट बदल समाज स्वीकारेल. यासाठीच आगरकर सहयोगी शिक्षणाच्या कल्पनेचा पुरस्कार करताना दिसून येते.

### ६) इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणावर टीका

आगरकरांनी पाश्चात्य शिक्षणपद्धतीचा तसेच ब्रिटिशांच्या शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केलेला होता. ब्रिटिशांनी राबविलेल्या पद्धतीमुळे आपल्या समाजाचा विकास होईल असेही आगरकरांना वाटत होते. ज्या कारणाने भारतात व महाराष्ट्रात ब्रिटिशांनी शिक्षण सुरू केले त्यामागचा स्वार्थीपणा काय होता याची जाणीवही आगरकरांना होती. त्यांच्या या स्वार्थीपणाच्या धोरणावर मात्र आगरकरांनी टीका केलेली होती. ब्रिटिशांच्या साम्राज्याचे विस्तारीकरण झाल्यामुळे या एवढया मोठया साम्राज्याच्या राज्यकारभाराचे केंद्रिकरण त्यांच्या

हाती एकवटले परंतु ब्रिटिशांना विविध कामासाठी स्थानिक लोकांची गरजही मोठया प्रमाणात भासू लागली होती. विशेषतः विविध कार्यालयांमध्ये काम करण्यासाठी कारकून, सुरक्षा व्यवस्थेसाठी स्थानिक शिपाई निर्माण करावेत हा स्वार्थी दृष्टिकोन ब्रिटिशांचा होता. अर्थात असे असले तरीही भारतीयांना या शिक्षणाचा फायदा होतच होता हा वेगळा भाग होता.

आगरकरांच्या मते ब्रिटिश राज्यकर्त्यांमध्ये दोन प्रकारचे अधिकारी होते. अधिकाऱ्यांचा एक गट म्हणजे हिंदू लोकांस स्थानिक स्वराज्याचे हक्क द्यावेत; हिंदुस्थानात यांत्रिक शिक्षणाचा व कारखान्यांचा प्रसार करावा; हिंदू लोकांसाठी उच्च प्रतीचे शिक्षण सुरू करून त्यांच्यात विद्याभिवृद्धी करावी; प्रशासन चालविण्यामध्ये बहुतांश स्थानिक भारतीयांचा सहभाग घ्यावा असे मानणारा होता.[३१] या गटाला आगरकरांच्या भाषेत व्हिग्ज म्हणजेच उदारमतवादी म्हणता येईल परंतु अशा अधिकाऱ्यांची संख्या मात्र कमी होती. दुसऱ्या गटाचा विचार करता लक्षात येते की, हा गट कठोर राजकारणी, भारतीयांकडे प्रशासन चालविण्याची काडीमात्रही क्षमता नाही असे मानणारा, फोडा झोडा या नीतिचा अवलंब करणारा होता. या गटास भारतीय लोक केवळ कारकून होण्याइतपतच शिकावेत असे वाटत होते. त्याचबरोबर सनदी नोकर भरतींच्या परीक्षा भारतात न घेता इंग्लंडमध्येच घेण्यात याव्यात असे या गटाचे मत होते कारण भारतीय लोक अधिक शिकले तर ते स्वराज्याची मागणी करतील अशी भीती त्यांना वाटत होती. अशा अधिकाऱ्यांचा भरणा प्रशासनात अधिक असल्यामुळे उच्च प्रतीचे शिक्षण भारतीयांना देण्याच्या तयारीत ते नव्हते. ब्रिटिशांच्या भारताविषयीच्या शैक्षणिक धोरणात बऱ्याच अंशी चढउतार दिसतात. त्या अनुषंगाने सिव्हिल सर्व्हिसच्या ज्या परीक्षा घेतल्या जायच्या त्यासाठी ब्रिटिशांनी अनेकवेळा कठोर भूमिका घेतल्याचे दिसते. विशेषतः या परीक्षा इंग्लडला घेतल्या जायच्या त्यासाठी वयोमर्यादाही अतिशय कमी होती. भारतीयांसाठी ही वयोमर्यादा केवळ एकोणिस वर्षांची होती. यावरून असे लक्षात येते की, ब्रिटिशांचे सिव्हिल सर्व्हिस परीक्षांविषयीचे धोरण जाचक होते. यात त्यांचा हेतू हा होता की भारतीयांना ब्रिटिश प्रशासनात उच्च पदस्थ जागा मिळू नयेत.

ब्रिटिशांनी भारतात शिक्षणास प्रोत्साहन तर दिले, परंतु नंतर मात्र आपल्या धोरणात बदल केला. लोक शिक्षण ही सरकारची जबाबदारी असते असे आगरकर मानतात. भारतात ब्रिटिश सत्ता आहे म्हणजेच ब्रिटिशांनीच भारतीय शिक्षणासाठी खर्च करणे आवश्यक होते. तथापि शिक्षणावरील खर्चात मात्र ब्रिटिश अधिकाधिक कपात करत होते. यापुढे जाऊन ब्रिटिशांनी भारतीय शाळेवर होत असलेल्या खर्चापैकी दोन तृतीयांश खर्च भारतीयांनी द्यावा अशा प्रकारचा फतवा काढलेला होता. ब्रिटिशांच्या या धोरणामुळे निश्चितच भारतीय लोकशिक्षणास खिळ पडणार होती. असा फतवा काढण्याचा विचार सरकारने का केला याविषयीचे कारण पाहिले तर ब्रिटिशांना आपली सत्ता टिकविण्यासाठी लष्करावर अधिक पैसा खर्च करण्याची गरज होती असे आगरकर आपल्या लेखात सांगतात. यातील अडीच कोटी रूपयांची तरतूद ब्रिटिशांनी शिक्षण खात्याचा पैसा वापरून केली व यासाठी प्रत्येक इलाख्यावर त्यांनी खंडणी बसवली होती. मुंबई प्रांताच्या खंडणी विषयी आगरकर लिहितात की, “हिंदुस्थान सरकारनें मुंबई सरकारास असें पत्र लिहिलें आहे कीं, चालू वर्षांत ‘तुम्हांकडून मुख्य सरकारास एकोणीस लाख रूपये मिळाले पाहिजेत. हे उभे करण्यासाठी तुम्ही पाहिजे ती काटकसर करा, नवीन कर बसवा, शाळांची फी वाढवा; सारांश, तुम्हांस वाटेल तें करा; पण तुमच्या कडून एकोणिस लाखांची कुमक झालीच पाहिचे!”[३२] अशा प्रकारे ब्रिटिश लोकशिक्षणाच्या कामासाठी असलेला निधी आपल्या लष्करी सत्तेसाठी वापरीत होते. ब्रिटिशांनी वेळोवेळी जे अहितकारक बदल केले त्यामध्ये बी.ए.ची परीक्षा दरवर्षी घेणे असेल, अभ्यासक्रमात अनावश्यक काही विषयांचा समावेश किंवा काही विषय अभ्यासक्रमातून वगळणे असेल याविषयीही आपले विचार आगरकरांनी स्पष्ट शब्दात मांडले एवढेच नाही तर उच्च शिक्षणामध्ये इंग्रजी भाषा महत्त्वाची असली तरीही मातृभाषेतील विषयही असावेत व शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषेतच असावे अशा विचारांचाही त्यांनी पुरस्कार केलेला होता.

एवढा विशाल दृष्टिकोन ठेवून शिक्षणाविषयी विचार करणारे महात्मा फुले व न्यायमूर्ती रानडेंनंतरचे जे सुधारक होते त्यामध्ये गोपाळ गणेश आगरकरांचे नाव अगक्रमाने घ्यावे लागते.

### ६.२ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे टिळकांचे शैक्षणिक विचार

#### ६.२.१ लोकमान्य टिळकांचा अल्प परिचय

लोकमान्य टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी चित्तपावन कोकणस्थ ब्राह्मण कुटुंबात रत्नागिरी शहरात झाला. त्यांचे आईवडील हे मुळचे दापोली तालुक्यातील चिखलगांव येथील रहिवासी होते. लोकमान्यांचे मूळ नाव केशव असे ठेवण्यात आले होते परंतु त्यांच्या आई लोकमान्यांना 'बाळ' या नावाने बोलवत असत व टिळकांनाही हे नाव योग्य वाटले. लोकमान्य टिळक हे बालपणापासूनच स्पष्टोक्तेपणा असलेले व्यक्तिमत्त्व होते. लोकमान्य टिळकांचे वडील व्यवसायाने शिक्षक असल्यामुळे शिक्षणाची गोडी त्यांना बालपणापासूनच होती त्यामुळे सहाजिकच प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण त्यांनी संपादित केले. त्यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून पुण्याच्या सिटी स्कूलमध्ये व पुणे हायस्कूलमध्ये झाले. इ.सन १८७२ मध्ये टिळकांनी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण केली आणि इ.सन १८७३ मध्ये पुण्याच्या डेक्कन कॉलेजात प्रवेश केला.[३३] कॉलेजच्या कालखंडात त्यांनी विविध विषयांचा अभ्यास केला व इ.सन १८७६ साली ते बी.ए.प्रथम श्रेणीत पास झाले. पुढे गणित विषय घेऊन ते एम.ए.ला बसले व नंतर त्यांनी एल.एल.बी.ची परीक्षा देऊन कायद्याचे सखोल ज्ञान प्राप्त केले. कॉलेजच्या जीवनात त्यांनी अनेक मित्र जोडले त्या मित्रांपैकी एक व नंतर काही काळचे त्यांचे सहयोगी ठरले ते म्हणजेच गो.ग.आगरकर होत. त्यांनी दोघांनी एकत्रित अभ्यास केलेला होता तसेच विविध वैचारिक ग्रंथांचे अवलोकन त्यांनी केलेले होते. व त्यातूनच दोघांचेही व्यक्तिमत्त्व घडत होते.

लोकमान्य टिळक हे राजकीय सुधारणांना अधिक महत्त्व देत होते. या दोघांविषयी वर्णन करताना भा.द.खेर यांनी लिहिले होते की, "टिळक भारतीय संस्कृतीचे अभिमानी होते, तर आगरकरांचा पिंड अतिरिक्त वाचनाने पाश्चात्य पद्धतीचा बनलेला होता. परकीय राज्याची देशातून हकालपट्टी झाली पाहिजे या एका गोष्टीबद्दल त्यांच्यात मतैक्य होते ही गोष्ट खरी; पण त्याबद्दलचे त्यांचे दृष्टिकोन मात्र विभिन्न होते. जनतेमध्ये प्रथम राजकीय

जागृती केली पाहिजे हे टिळकांचे मत, तर प्रथम सामाजिक सुधारणांवर भर दिला पाहिजे असे आगरकरांचे मत. देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाले म्हणजे चुटकीसरशी सामाजिक सुधारणा घडवून आणता येतील असे टिळकांना वाटे, तर सामाजिक जागृती झाली म्हणजे आपोआप राजकीय जागृती होऊन देश स्वतंत्र होण्यास विलंब लागणार नाही असे आगरकरांना वाटे."[३४] यावरून दोघात कमालीची मतभिन्नता होती हे दिसून येते. टिळक नेहमीच आपल्या विचारांविषयी आग्रही असत. आपल्या मित्रांसोबत चर्चा करताना ते ब्रिटिश अंमलामुळे भारताची कशी आतोनात हानी होत आहे याविषयीही नेहमी आपले विचार मांडत असत. ब्रिटिश सत्तेचे जोखड कसे होते हे टिळकांना चांगलेच समजले होते व त्याविषयी जनतेत जागृती होणे आवश्यक होते. यासाठीच त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात शैक्षणिक कार्य हाती घेऊन केली होती.

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतर एक जहाल राजकारणाचा प्रणेता म्हणून टिळकांची ओळख झाली. जे मागून मिळत नाही ते हिसकावून घेतले पाहिजे यासाठी ते नेहमीच संघर्ष करीत होते. त्यांचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धिवर आजिबात विश्वास नव्हता. त्यामुळे त्यांनी आपल्या जहाल विचारांनी नेहमीच केसरीतून अग्रलेख लिहून टीका केली. 'आमच्यावर जुलूम कसा होतो, हिंदुस्थानच्या प्रजेची अस्वस्थता, उजाडले पण सूर्य कोठे आहे? राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे' असे अनेक अग्रलेख टिळकांनी लिहिले. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसुत्रीच्या आधारे त्यांनी संपूर्ण हिंदुस्थानभर राष्ट्रवादी चळवळ जोमाने सुरू केली. टिळक अखेरपर्यंत कामाच्या व्यापातच गढून राहिले. जुलै १९२० मध्ये त्यांना हिवतापाचा त्रास सुरू झाला व शेवटी या आजारपणातच दि १ ऑगस्ट १९२० रोजी त्यांचा मृत्यू झाला.

### ६.२.२ लोकमान्य टिळकांचे शैक्षणिक कार्य

आज लोकमान्य टिळकांविषयी जी जनमानसात ओळख आहे ती प्रामुख्याने एक जहालवादी क्रांतिकारी, ब्रिटिशांकडे स्वराज्याची मागणी निक्षून करणारा अशीच आहे. त्यांच्या

या जहालवादी विचारसरणीने त्यांचे शैक्षणिक कार्य झाकाळल्यासारखे झालेले आहे. मुळात समाज लोकमान्य टिळकांना समाजसुधारक मानण्यापेक्षा राजकीय क्रांतिकारक अधिक मानतो. त्यांच्या आक्रमक विचारातून जरी लोकमान्य टिळक क्रांतिकारक वाटत असले तरीही त्यांच्या मनात समाजसुधाणेची आस होती व समाजसुधारणेचा खरा मार्ग शिक्षणातूनच सुरू होतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी स्वतःच एका मुलाखतीत शिक्षण कार्याचा अग्रक्रम सांगितला होता. ते म्हणाले होते, "वस्तुतः माझ्या मनामध्यें ज्ञानदान हेंच माझ्या आयुष्याचें ध्येय ठरवावें असा उद्देश होता व त्याप्रमाणें मी शिक्षणाच्या कार्यांत आयुष्याच्या सुरूवातीस पडलों. जुन्या – नव्या ध्येयाचें शिक्षण जनतेस द्यावें हा माझा हेतु होता. लोकांना खऱ्या हिंदी शिक्षणाची तीव्र आवश्यकता आहे, असें १८८० सालीं माझ्या मनाला पटलें होतें. राजकीय पुढारी व्हावें असा माझा उद्देश त्या वेळी मुळींच नव्हता."[३५] यावरून लक्षात येते की जनतेला आधुनिक पद्धतीचे शिक्षण देऊन ज्ञानी करावे असे टिळकांना मनोमन वाटत होते. लोकमान्य टिळक व आगरकर हे एकमेकांचे मित्र होते तेंव्हा समाजिक परिस्थितीची चर्चा ते करायचे. मिशनरी शाळांच्या धर्तीवर एखादी खासगी शाळा सुरू करावी असे टिळक व आगरकर यांना वाटत होते. याच विचारातून दि. १ जानेवारी १८८० रोजी 'न्यू इंग्लिश स्कूलची' स्थापना करण्यात आली. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत स्थापन करण्यात आलेल्या या शाळेत लोकमान्य टिळक स्वतः शिक्षक म्हणून कार्य करीत होते.

'न्यू इंग्लिश स्कूल'च्या स्थापनेनंतर सुरूवातीच्या दोन तीन वर्षांच्या काळात शाळेचा एवढा चांगला जम बसला की, इतर सरकारी शाळांमधून पालक याच शाळेत विद्यार्थ्यांना पाठवू लागले. याच दरम्यान संस्थेचे एक कॉलेज असावे असे टिळकांना वाटत होते. त्यामुळे कॉलेज सुरू करण्यापूर्वी शाळेला आधिक स्थैर्य देण्यासाठी एक सोसायटीची स्थापना करण्यात यावी असा विचार संचालकांच्या मनात आला होता व याच अनुषंगाने 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना दि.१४ ऑक्टोबर १८८४ रोजी करण्यात आली. याच संस्थेच्या माध्यमातून दि. २ जानेवारी १८८५ रोजी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना करण्यात आली. शाळा व कॉलेज या दोन्हीही संस्था शिक्षण खात्याकडून ग्रँट मिळविण्यासाठी नोंदल्या गेल्या होत्या.

इमारती अभावी कॉलेजची सुरूवात गद्रे वाडयात करण्यात आली. संस्थेच्या संचालक मंडळींणीच कॉलेजमध्ये अध्यापन करण्याचे काम चालू ठेवले.

लोकमान्य टिळकांनी जरी लोकशिक्षणाच्या तळमळीतून शिक्षण कार्यास सुरूवात केलेली असली तरी त्यांना हे कार्य अधिक काळ पर्यंत चालू ठेवता येऊ शकले नाही. संचालक मंडळींमध्ये निर्माण झालेल्या मतभेदामुळे इ.सन १८९० मध्ये लोकमान्य टिळकांना 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'चा राजीनामा द्यावा लागला. ही घटनाच मुळात लोकमान्य टिळकांच्या जीवनाला कलाटणी देणारी होती. ज्या उमेदीने टिळक व मंडळींनी शैक्षणिक कार्य हाती घेतले होते ते टिळकांना अर्ध्यातच सोडावे लागले याची खंतही टिळकांना खूप वाटली होती. राजीनाम्यात त्यांनी आपले दुःखही व्यक्त केले होते. राजीनाम्याचा शेवट करताना टिळकांनी लिहिले होते, "हा निश्चय करतांना मला माझ्या भावनांशी महान् संघर्ष करावा लागला, हें मी आपल्याला खात्रीनें सांगतों. खरोखर मी आतां माझ्या जीवनाचें ध्येयच सोडीत आहे. मात्र संस्थेतून दूर जाण्यानें मी संस्थेची उत्तम प्रकारें सेवा करीत आहे, हाच एक विचार माझ्या दु:खाचें समाधान करणारा आहे. मी जेव्हां आपल्या सांगाती राहून काम करीत होतों तेव्हां संस्थेचें हित साधण्यासाठीं कधींहि कुचराई केली नाहीं; आणि यापुढें आपल्या सांगाती राहून तिचें जीवन मी धोक्यांत आणणार नाहीं. आतापर्यंत आपल्याबरोबर राहून मीं संस्थेची अशी जशी सेवा केली, तशीच यापुढें आपल्या पासून विभक्त होऊन करीत राहीन."[३६] सदरच्या विवेचनातून टिळकांची खंत सहज लक्षात येते. त्यांच्या दृष्टिकोनातून संस्थेत राहून वाद वाढवून संस्थेचे नुकसान करण्यापेक्षा संस्थेतून बाहेर पडून संस्थेचे हित पाहणे अधिक योग्य ठरेल व त्यामुळेच त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला होता.

## ६.२.३ लोकमान्य टिळकांचे शैक्षणिक विचार

दि.१५ डिसेंबर १८९० रोजी लोकमान्य टिळकांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'चा राजीनामा दिला आणि त्यांचे प्रत्यक्ष शैक्षणिक कार्य थांबले. अध्यापनाची अतिशय आवड असतानाही टिळकांना हे कार्य थांबवावे लागले. वास्तविक टिळकांचा त्याकाळात सोसायटीतले

एक उत्कृष्ट शिक्षक म्हणून एक वेगळाच दबदबा निर्माण झालेला होता व त्यामुळे सोसायटीचा राजीनामा दिल्यानंतर नवीन 'न्यू इंग्लिश स्कूल' किंवा 'फर्ग्युसन कॉलेज' सारखी संस्था त्यांनी सुरू करावयाचे ठरविले असते तर या संस्थांच्या तोडीस तोड अशा संस्था पुन्हा सुरू करू शकले असते. तेवढी कुवत निश्चित टिळकांमध्ये होती परंतु सोसायटीत ते आता राहिले नसले तरीही सोसायटीचा दिवसेंदिवस उत्कर्षच होत रहावा असे टिळकांना वाटत होते. किंबहुना सोसायटी हे त्यांचे जीवन ध्येयच होते.

वास्तविक पाहता टिळकांचे खरे राजकीय कार्य व जहाल मतवादी राजकारणाचा प्रारंभ सोसायटीच्या राजीनाम्यानंतरच सुरू झाला होता. २८ डिसेंबर १८८५ रोजी ॲलन ॲक्टीव्हन ह्युम या ब्रिटिश निवृत्त अधिकाऱ्याच्या मध्यस्थीने राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झालेली होती व स्थापनेनंतर चार पाच वर्षाच्या काळात ही राष्ट्रीय काँग्रेस चांगलीच मूळ धरू लागली होती. सोसायटीचा राजीनामा देण्यापूर्वी सहा महिन्याच्या रजा काळात टिळकांचा काँग्रेसशी जवळून संबंध आला व त्यामुळे राजीनाम्यानंतर टिळक राष्ट्रीय काँग्रेसकडे अधिक आकर्षिले गेले किंबहुना काँग्रेस मध्ये राहून आपल्या राजकीय कार्याच्या नव्या पर्वाची सुरूवातच टिळकांनी केली होती. इ.सन १८९६ व १८९७ या दोन वर्षाच्या काळात हिंदुस्थानवर भीषण दुष्काळ पडलेला होता व महाराष्ट्रात प्लेगच्या साथीने थैमान घातले होते. या दरम्यान टिळकांनी केसरीतून सरकारवर प्रचंड टीका केली होती. जनतेचे अधिकार कोणते ते प्रचार पत्रकातून प्रसिद्ध केले होते. केसरीतून त्यांनी 'फॅमिन रिलीफ कोडा'चे स्मरण ब्रिटिश सरकारला करून दिले व खऱ्या अर्थाने टिळक शेतकऱ्यांचे तारणहार बनले होते. जहाल राजकारणाचा उद्रेक करून इ.सन १९०७ च्या सुरत कॉग्रेस अधिवेशनात जहालांसमवेत वेगळे निघणारे लोकमान्य टिळकच होते. त्यांचा विश्वास होता की मागून काहीच मिळत नाही ते हिसकावूनच घेतले पाहिजे. त्यांच्या मते स्वराज्य मिळाले पाहिजे. स्वराज्य मिळाले की, समाजसुधारणा करणे सहज शक्य आहे.

लोकमान्य टिळकांच्या शैक्षणिक कार्याचा विचार करता केवळ त्यांचे डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील योगदान एवढयापुरताच विचार केला गेलेला दिसतो. राजीनाम्यानंतरही त्यांनी

जे विविध लेख लिहिले तसेच काही ठिकाणी भाषणे केली यावरून त्यांचे शैक्षणिक विचारही स्पष्ट होतात. त्यांनी मांडलेल्या शैक्षणिक विचारांच्या लेखांचे अवलोकन केल्यास त्यांच्या विचारांना निश्चितच एक शैक्षणिक बैठक होती हे स्पष्ट होते. त्यांच्या या विचारावरून ते केवळ राजकीय सुधारकच न राहाता ते एक शैक्षणिक समाज सुधारक ठरतात.

## १) लोकमान्य टिळकांचा सरकारी शाळाविषयक दृष्टिकोन

एकोणिसाव्या शतकातील सरकारी शाळा म्हणजेच ब्रिटिश सरकार मार्फत भारतीयांच्या शिक्षणासाठी चालविल्या जाणाऱ्या शाळा होत. प्रामुख्याने इ.सन १८१३ च्या चार्टर ॲक्टनुसार भारतीय शिक्षणासाठी जो निधी मंजूर करण्यात आला त्यानंतर मेकॉलेच्या मिनिट प्रमाणे जे शिक्षण सुरू झाले त्यालाच सरकारी शिक्षण किंवा सरकारी शाळा असे म्हटले गेले. लोकमान्य टिळकांना ब्रिटिशांच्या मार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळेत अनेक अडचणी दिसल्या आणि त्यामुळेच लो.टिळकांनी अशा शाळांवर वेळोवेळी आपल्या भाषणातून व लिखाणातून टीका केलेली होती. तत्कालीन समाजात इंग्रजी शाळांमुळे आपणास खूप फायदा झाला असे बोलण्याचा प्रघातच पडलेला होता असे टिळकांना वाटते. याचे कारणही तसेच होते. ब्रिटिशांनी खेडोपाडी शाळा स्थापन केल्या होत्या. शाळांसाठी चांगल्या रंगवलेल्या इमारती असायच्या तसेच तेथे मुलांना शिकविण्यासाठी असिस्टंट शिक्षकांची नेमणूक केलेली असायची तर शाळेसाठी पगारी हेडमास्तराचीही नियुक्ती करण्यात आलेली असायची या सर्व नियोजनबद्ध गोष्टींमुळे भारतीय लोकांना शैक्षणिक प्रगती झाल्याचे संकेत मिळत. अर्थात भारतीय समाज अडाणी असल्यामुळे तो या शाळा पाहूनच शैक्षणिक प्रगतीचे गोडवे गात होता. लोकमान्य टिळकांच्या मते या शाळा जरी ब्रिटिशांनी सुरू केलेल्या असल्या तरी या शाळांतून भारतीयास उपयुक्त शिक्षण मिळत होते असे मात्र म्हणता येत नव्हते. हे शिक्षण दोष पूर्ण होते.

लोकमान्य टिळकांच्या मते ब्रिटिशांनी शिक्षण ही आपली जबाबदारी समजून भारतीयांसाठी शिक्षण सुरू केले ही गोष्ट उल्लेखनीय होती, परंतु ज्या पद्धतीने शिक्षण

यंत्रणेकडे लक्ष दिले जाणे अपेक्षित होते तेवढे मात्र लक्ष दिले नाही. त्यांच्या दृष्टिकोनातून ब्रिटिशांनी सुरू केलेल्या या शाळा केवळ कारकूनांची गरज भागवावी यासाठीच होत्या. याविषयी आपले मत मांडताना टिळक लिहितात की, "सरकारास कारकून, इंजिनीयर, डॉक्टर पाहिजे आहेत व हे तयार कसे करावयाचे एवढयाचाच ते विचार करतात. शाळांतील शिक्षण त्यांस अनुसरूनच आहे. असलें कारकुनीचें शिक्षण देण्याकरितां सरकारनें पहिल्यानें या शाळा काढल्या. या आज सत्तर वर्षे चालल्या आहेत. त्यांचे स्वरूप कांहीं विशेष तऱ्हेनें पालटलेलें नाहीं."[३७] मुळात एवढया मर्यादित दृष्टिकोनातून ब्रिटिश या शाळा चालवित असल्यामुळे या शाळेतून शिक्षण घेणाऱ्या भारतीयांचा दृष्टिकोनही संकुचित बनलेला होता. शाळेत का यायचे याचे कारण केवळ ब्रिटिश प्रशासनात एखादी नोकरी मिळेल असाच विचार भारतीयांचा निर्माण झालेला होता. एकूणच तत्कालीन समाज ज्ञानार्थी न होता पोटार्थी झालेला होता. सरकारी शाळांच्या काही परीक्षा झाल्या म्हणजे चरितार्थाचा प्रश्न सुटतो अशी त्यासमाजाची धारणा बनलेली असल्यामुळे जेवढे लोक शिक्षण घ्यायचे ते केवळ नोकरीच्या आशेने घ्यायचे. अर्थात एकविसावे शतकही यास अपवाद नाही. अशा प्रकारे नोकरीच्या आशेने शिकणाऱ्यांची संख्या त्यावेळी एवढी वाढली की, सर्वांना नोकऱ्या मिळणे दुरापास्त होऊ लागले. शिक्षण घेऊनही पोटाचा प्रश्न उभा राहत असेल तर तो दोष ब्रिटिश शिक्षणाचा आहे असे लोकमान्य टिळकांना वाटत होते.

लॉर्ड मेकॉलेने ज्या उदात्त हेतूने भारतात शिक्षण सुरू केले तो उदात्त हेतू नंतरच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी कधीच ठेवला नाही. मुळात ब्रिटिशांनी भारतीयांसाठी शिक्षण सुरू केले तेंव्हा केवळ चांगले नोकर व गुलाम येथून मिळतील हा दृष्टिकोन जरी त्यांनी ठेवलेला असला तरीही शिक्षण देताना चांगला हेतूही ब्रिटिशांनी ठेवलेला होता. हिंदुस्थानातील शिक्षणासंबंधाने ज्या वेळी चर्चा झाली होती, त्यावेळी मेकॉलेने असे स्पष्ट केले होते की लोक शिक्षणाने स्वतः शहाणे होतील व स्वातंत्र्याची इच्छा करू लागतील. जेंव्हा हा बदल त्यांच्यात होईल तेंव्हा शिक्षणाचा योग्य प्रभाव त्यांच्यावर पडला असा अर्थ घेता येईल.[३८] परंतु शिक्षण सुरू करतेवेळी अशी राष्ट्रवादी भावना लोकांमध्ये एवढी उत्कट नव्हती. त्यामुळे सुरूवातीस

ब्रिटिशांनी भारतीय शिक्षणासाठी सर्वतोपरी साहाय्य केलेले दिसून येते, परंतु नंतर जसजसा राष्ट्रवाद जनतेत निर्माण होण्यास सुरूवात झाली तसतसा ब्रिटिशांनी शिक्षण प्रक्रियेत बदल करण्यास सुरूवात केली व त्याची मर्यादा केवळ कारकून मिळतील एवढीच करण्याचा प्रयत्न केला होता.

शिक्षण ही सामान्य समाजाच्या महत्त्वाच्या गरजांपैकी एक गरज होती परंतु तत्कालीन समाजात सरकारने शिक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले होते. ब्रिटिश लोक भारतातील प्रचंड संपत्ती इंग्लडला नेत होते. याविषयी दादाभाई नौरोजी यांनी 'द पॉव्हर्टी ॲण्ड अनब्रिटिश रूल इन इंडिया' या ग्रंथात आर्थिक शोषण सिद्धांत मांडला होता. त्यात त्यांनी ब्रिटिश कसे आर्थिक शोषण करतात याचे सविस्तर विवेचन केले होते. लोकमान्य टिळक बऱ्याच ठिकाणी दादाभाई नौरोजींचा संदर्भ देऊन ब्रिटिश भारतीय संपत्तीची कशी लूट करायचे याविषयी बोलत असत. त्यांच्या मते हिंदुस्थानात एकेकाळी सोन्याचा धूर निघत असे. परंतु आता गोवऱ्यांचाही निघतो की नाही याची शंका होती. एकेकाळी भारतात आलेले इंग्रज गरीब होते व भारतीय श्रीमंत होते अल्पावधीत ब्रिटिशांनी ही परिस्थिती विरूद्ध केली होती. ब्रिटिश लोक भारतातून एवढी संपत्ती मायदेशी नेत होते तर त्यांची एक नैतिक जबाबदारी म्हणून भारतीय शिक्षणावर पैसा का खर्च करत नव्हते असा प्रश्न टिळकांना पडत होता. 'चालू शिक्षण पद्धती व स्वावलंबन' या विषयावर दिलेल्या व्याख्यानात लोकमान्य टिळक म्हणतात की, "आमच्या सरकारचें सालाचें १२५ कोटींचें उत्पन्न आहे. त्या रूपयांची गोष्ट एकदम बोलता आली तरीहि ही रक्कम एवढी मोठी आहे कीं, ती मोजावयास लागल्यास सगळी रक्कम मोजावयास कित्येक दिवस लागतील. यांपैकीं ३० कोट रूपये लष्करावर खर्च केले जातात. म्हणजे सुमारें एकचतुर्थांश रक्कम लष्करावर खर्च केली जाते. १० रूपये उत्पन्न असलेला इसम आपल्या घराच्या रखवालीकरितां ३ रूपयांचा रामोशी ठेवील काय? पण सरकार खर्च करीत आहे. आम्ही म्हणतों त्या प्रकारच्या शिक्षणास सरकारनें मदत द्यावी अशी विनंति आहे. पण ती सरकार ऐकणार नाहीं अशी आम्हांस खात्री आहे. काय आहे व काय पाहिजे हें सरकारला कळत नाहीं; कळते, पण गोऱ्यांचे नुकसान होतें म्हणून सरकार तें करीत नाहीं."[३९] म्हणजेच

ब्रिटिश भारतीयांना योग्य पद्धतीचे शिक्षण देण्याचे मुद्दाम नाकारत होते असा आरोप टिळकांचा होता. ब्रिटिशांना चांगले शिक्षण देता येत नसेल तर त्यांनी स्वराज्य भारतीयांच्या हवाली करावे असेही विचार टिळकांनी मांडलेले होते. त्यांच्या मते भारतीयांच्या शिक्षणाचा प्रश्न भारतीय चांगल्याप्रकारे सोडवू शकतील. लोकमान्य टिळकांनी १३ एप्रिल १९१७ रोजी बेळगांव जिल्ह्यातील चिकोडी या गावी भरलेल्या पहिल्या मराठा शिक्षण परिषदेत 'माझे शिक्षणाचे ध्येय' या विषयावर भाषण केले होते. या भाषणात टिळकांनी ब्रिटिशांच्या धोरणावर सडकून टीका केलेली होती. आपल्या भाषणात सरकारवर टीका करताना टिळकांनी म्हटले होते की, "स्वराज्य मागितलें तर सरकार म्हणतें, 'तुमच्यांत अजून पूरें शिक्षण नाही!' जसे काय इंग्लडला स्वराज्याचे हक्क मिळाले तेव्हां तेथील सारे लोक सुशिक्षितच झाले होते! बरें, शिक्षण द्या म्हटलें तर 'पैसे नाहींत' ही तक्रार येते! अशा एक ना हजार अडचणी व अडवणुकी आहेत. याला एकच उत्तम उपाय म्हणजे सत्ता हातांत आली पाहिजे. शिक्षणाची सक्ती पाहिजे असेल तर सरकारवर सक्ती करण्याची ताकद आली पाहिजे."[४०] थोडक्यात ब्रिटिश सरकार आर्थिक कारण पुढे करून शिक्षण देण्याचे टाळत होते. लोकमान्य टिळकांच्या मते जर ब्रिटिश लोक भारतीयांच्या शिक्षणावर खर्च करू शकत नसतील तर त्यांनी शिक्षण कर्जांची सोय करावी. जर ते युद्धाच्या नावाखाली युद्ध कर्जे कढीत आहेत तर शिक्षणासाठी देखील असा उपाय वापरता येणे शक्य होते परंतु ब्रिटिश सरकार मात्र तसे करत नव्हते.

ब्रिटिश राजवटीत दिले जाणारे शिक्षण हे केवळ लोकांना साक्षर बनविणारे शिक्षण होते. कारण त्याकाळी सरकारी शाळेत केवळ लिहिता वाचता येणे यावरच भर दिला जात होता. त्यातून देशातील सुविद्य नागरिक घडतील अशी मात्र कदापि अशा नव्हती. लोकमान्य टिळकांच्या दृष्टिकोनातून ज्या शिक्षणातून आपले हक्क काय आहेत याची जाणीव प्राप्त होईल तेच खरे शिक्षण म्हणता येईल. केवळ लिहिता वाचता येणे म्हणजे खरे शिक्षण नव्हे. सरकारी शाळेत शिक्षण घेणाऱ्यांच्या बाबतीत काय अवस्था बनते, या शिक्षणाचा विद्यार्थ्यांवर काय प्रभाव पडायचा याचाही टिळकांनी विचार केलेला होता. ब्रिटिशांचे शिक्षण हे विद्यार्थ्यांना एकांगी व एककल्ली बनवित होते. मुळात शिक्षण यासाठी असावे की, त्यातून चरितार्थाचा

प्रश्न मिटेल व सुशिक्षिताचे कुटुंब सुखी समाधानी जीवन जगू शकेल परंतु ब्रिटिशांच्या या शिक्षण पद्धतीमुळे उलट परिणाम जाणवत होते असे टिळकांचे मत होते. अशा प्रकारचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी केवळ इतर नोकरी मिळेल याच विचारात राहत व आपला पिढीजात जो व्यवसाय आहे त्याकडे पाठ फिरवित होते. यातूनच बेकारीची समस्या त्यांना भेडसावीत होती. व्यापारी, मारवाडी, लिंगायत हा समाज नाखूशीनेच आपली मुले शाळेत पाठवित असत कारण त्यांच्या व्यवसायाला अनुकूल शिक्षण तेथे मिळत नव्हते. या समाजातील मुले सरकारी शाळेत शिकल्यामुळे त्यांच्या उपजत असलेल्या व्यवसायिक गुणांचा लोप होऊन त्यांनाही कारकूनाचीच नोकरी करावी असे वाटायचे. अशा प्रकारे ब्रिटिशांच्या शिक्षणामुळे वडीलोपार्जित व्यवसाय करण्याचे सोडून लोक ब्रिटिशांची चाकरी करणे पसंत करायचे. याला इतर समाजही अपवाद नव्हता. लोकमान्य टिळकांना ब्रिटिश शिक्षणव्यवस्थेतील हा एक मोठा दोष वाटत होता. वास्तविक ब्रिटिशांची शिक्षणपद्धतीही लोकमान्य टिळकांच्या विचारानुसार शिक्षण देण्यास असमर्थ होती कारण टिळकांच्या मनात शिक्षणाविषयी एक विशिष्ट भूमिका तयार झालेली होती व ब्रिटिश सरकार मात्र त्या पद्धतीचे शिक्षण देण्यास टाळत होते.

त्यांना अभिप्रेत असलेल्या शिक्षण विचारांविषयी त्यांनी सांगितले होते की, "देशांतील शिक्षण वास्तविक म्हटलें म्हणजे देशांतील लोकांची उन्नति होण्यासाठींच आहे. जेणेंकरून देशांतील लोकांचे उद्योगधंद्याचें ज्ञान वाढून त्यांच्या निर्वाहाची सोय होईल, त्यांची नीति व देशाभिमान वाढेल, स्वतंत्र रीतीनें आणि इभ्रतीने दिवस काढता येतील, आणि राजकीय व सामाजिक बाबतींत हितकारक कल्पनांचा प्रसार होऊन, लोकांस आपली स्थिति सुधारण्यास किंवा जास्त सुखकारक करण्यास सांपडेल, अशा प्रकारचें शिक्षण देशातील लोकांस मिळणे जरूर आहे. याखेरीज शिक्षणाचा दुसरा मोठा उपयोग म्हटला म्हणजे स्वधर्म, स्वदेश यांबद्दल त्याच शिक्षणानें एक प्रकारची आस्था व कळकळ लोकांच्या मनांत उत्पन्न झाली पाहिजे."[४१] थोडक्यात शिक्षण ही एक सर्वव्यापी संकल्पना आहे असे त्यांना वाटत होते. लिहिता वाचता येणे हा त्यातील एक बदल झाला परंतु त्यासोबत देशातील सर्व स्त्रीपुरूष व मुले अधिकाधिक ज्ञानसंपन्न होऊन राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्यागिकदृष्टया राष्ट्राची एकजुटीने उन्नती

करण्यास प्रवृत्त जेंव्हा होतील तेव्हांच खरे शिक्षण मिळाले असे म्हणता येईल. शिक्षण मिळविलेल्या व्यक्तीने स्वतःचा, समाजाचा व देशाचा विचार करणे टिळकांना अपेक्षित होते. समाजात अशा शिक्षित व्यक्तीला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. एकंदरीत सर्वकश विकास होईल अशा प्रकारचे शिक्षण ब्रिटिशांनी सुरू करावे अशी अपेक्षा लोकमान्य टिळकांची होती. परंतु कोणत्याही परिस्थितीत ब्रिटिश लोक तशा प्रकारचे शिक्षण देणार नव्हते कारण ब्रिटिशांना या गोष्टीची जाणीव होती की, जर अशा प्रकारचे शिक्षण दिले तर भारतीय लोक स्वराज्याची मागणी करतील व तेच ब्रिटिशांना नको होते.

लोकमान्य टिळकांनी केवळ ब्रिटिश शिक्षणपद्धतीतीलच दोष सांगितले होते असे नाही तर ब्रिटिश शाळेत व महाविद्यालयात जे परकीय विलायतेतून आलेले प्राध्यापक होते त्यांच्यावरही ते टीका करत होते. त्यांच्या मते सुरूवातीच्या काळात सरकारी शाळेत शिकविण्यासाठी विलायतेतून आलेले काही प्रोफेसर चांगले होते परंतु नंतरच्या काळात आलेले प्रोफेसर मात्र चांगले नव्हते कारण ते भारतीय विद्यार्थ्यांना निःपक्ष शिक्षण देऊ शकत नव्हते. त्यांच्यातील विद्वत्ता चांगली असली तरीही केवळ आपली सत्ता भारतात टिकावी याकारणास्तव ते भारतीयांना देशभक्ती शिकवू शकत नव्हते. अशा प्रकारे विविध दोष लोकमान्य टिळकांना ब्रिटिश शाळेत दिसत होते. हे दोष नाहीसे करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना मांडलेली होती असे दिसून येते.

## २) लोकमान्य टिळकांची राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना

लोकमान्य टिळकांच्या एकूण शिक्षण विचारांमधील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी मांडलेले राष्ट्रीय शिक्षण विषयक विचार होत. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळ हाती घेतली होती. या चळवळीचा कार्यक्रम आखताना त्यांनी चतुःसुत्रीचा कार्यक्रम जाहीर केला होता ही चतुःसुत्री म्हणजेच स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण होय. स्वराज्य प्राप्तीसाठी त्यांनी राष्ट्रीय शिक्षण ही संकल्पना मांडली होती. त्यांच्या मते केवळ राष्ट्रीय शाळातूनच राष्ट्राविषयी निस्सिम देशभक्ती निर्माण करणारे शिक्षण

दिले जाऊ शकते. लोकमान्य टिळकांच्या अनेक चरित्रात चतुःसुत्री म्हणून राष्ट्रीय शिक्षण या मुद्याचा उल्लेख आलेला आहे परंतु त्यातून त्यांना काय अभिप्रेत होते हे मात्र आलेले नाही. लोकमान्य टिळकांनी अनेक भाषणातून राष्ट्रीय शिक्षण विषयक आपले विचार स्पष्ट केलेले होते. '४ सप्टेंबर १९०७ रोजी पुणे येथील गायकवाड वाडयातील गणपतीपुढे अध्यक्षीय भाषण, २७ फेब्रुवारी १९०८ रोजी सोलापूर येथे श्रीसिद्धेश्वराच्या देवळासमोरील पटांगणात दिलेले भाषण, ३ मार्च १९०८ रोजी बार्शी येथे भाषण, २१ मार्च १९०८ रोजी राष्ट्रीय शिक्षणासंबंधीचा सहावा ठराव या विषयावर भाषण, ३० मार्च १९०८ रोजी कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाषण, २८ एप्रिल १९०८ रोजी मुंबई इलख्याच्या पंधराव्या प्रांतिक सभेच्या बैठकीच्या दुसऱ्या दिवशी दिलेले भाषण' या सर्व भाषणातून लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय शिक्षण विषयक विचार स्पष्ट होतात. याशिवाय 'दि.२७ नोव्हेंबर १९०६, ४ डिसेंबर १९०६ व २९ जानेवारी १९०७ या दिवशी त्यांनी अग्रलेखातही यासंबधीचे आपले विचार स्पष्ट केले होते.

### राष्ट्रीय शिक्षणाचा अर्थ

लोकमान्य टिळकांना त्याकाळी सरकारी शाळा ज्या प्रकारच्या होत्या त्याच्या अगदी विरूद्ध स्वरूपाच्या शाळा 'राष्ट्रीय शिक्षण' या संकल्पनेत अभिप्रेत होत्या. त्यांच्या दृष्टिकोनातून त्यावळी भारतीयांना जे शिक्षण सरकारी शाळांमधून मिळत होते ते गुरांना गोठयात शिकविल्या प्रमाणे होते. ब्रिटिश सरकार एक प्रकारे भारतीयांना जनावरेच मानीत होते कारण लोक आपल्या मुलांना जे शिक्षण देतात व गोठयांतील गुरांना जे शिक्षण देतात यात जो फरक आहे तो स्वतंत्र देशातील शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणात व भारतीयांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणात होता असे टिळकांना वाटत होते. याचाच अर्थ सरकारी शाळातून त्यावेळी दिले जाणारे शिक्षण कोणत्याच अर्थाने राष्ट्रीय नव्हते. लोकमान्य टिळक २७ नोव्हेंबर १९०६ रोजी लिहिलेल्या अग्रलेखात राष्ट्रीय शिक्षणाच्या संदर्भात म्हणाले होते की, "प्रत्येक स्वतंत्र देशांतील सरकार आपल्या प्रजेस जें शिक्षण देतें किंवा देऊं इच्छितें तें राष्ट्रीयच

असतें. देशांतील तरूण पिढी देशाचें राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल अशा प्रकारें त्यांस शिक्षण देणें हें देशांतील विद्याखात्याचें कर्तव्य आहे; आणि त्यासच राष्ट्रीय शिक्षण असें म्हणतात."[४२] म्हणजेच लोकमान्य टिळकांना राष्ट्रीय शिक्षण या संकल्पनेतून निश्चित असा अर्थ अभिप्रेत होता. राजकीय दृष्टया स्वतंत्र असलेला देश आपल्या प्रजेला चांगल्या प्रतीचेच शिक्षण देण्याचा प्रयत्न करतो. या शिक्षणात राष्ट्रीय ऐक्य अबाधित राहिल याचा विशेषत्त्वाने विचार केला जातो.

टिळकांना शिक्षणातून राजकीय, सामाजिक व औद्योगिक अशा गोष्टींची आवश्यकता वाटत होती. म्हणजेच ज्या शिक्षणातून देशातील राजकीय ऐक्य साधले जाईल, समाजातील दोष नाहीसे होऊन सामाजिक एकोपा वाढीस लागेल व समाजाच्या आर्थिक विकासासाठी औद्यागिक विकासावर अधारित शिक्षणावर भर दिला जाईल अशा प्रकारच्या शिक्षणाला राष्ट्रीय शिक्षण म्हणता येईल. त्याकाळी ज्यांना कुणाला ही संकल्पना समजली नाही ते टिळकांना विरोध करीत होते. विशेषतः सरकारी शाळा चालविणारे हमखास टीका करीत असत. टीका करतांना टीकाकार म्हणायचे "गणितांत दोन आणि तीन पांच होतात, राष्ट्रीय शाळेंत काय दोन आणि तीन सहा म्हणून सांगणार आहां? भूगोल शिकवावयाचा तर नकाशा समोर ठेवूनच शिकवणार की नाही? तसें आम्हीही शिकवितों. लंडन शहर तर कांहीं नकाशांत इकडून तिकडे जात नाहीं ना?' अशी थट्टा करतात. धर्माची गोष्ट निघाली कीं विचारतात, 'हिंदु धर्म शिकवतां, का मुसलमानी धर्म शिकवतां?..."[४३] एकूणच अशा प्रकारे टिळकांच्या संकल्पनेतील राष्ट्रीय शाळांवर टीका केली जायची. वास्तविक हे सर्व राष्ट्रीय शाळेत सरकारी शाळेप्रमाणेच राहणार होते परंतु राष्ट्रीय शाळेत केवळ साक्षर होणे किंवा लिहिता वाचता येणे यापुरतीच मर्यादा टिळकांना अपेक्षित नव्हती. अशा प्रकारच्या शाळेत माणूस बनविणारे शिक्षण असेल. या शिक्षणात आपल्याला नोकरी मिळेल का? याची चिंता नसेल कारण त्या दृष्टिने ते दिलेलेच नसेल. लोकमान्यांच्या मते अशा शिक्षणाने आपण कोण आहोत?, आपली स्थिती काय आहे?, इतरांशी आपण कसे वागावे?, आपल्या भावी पिढीवर आपण कोणते संस्कार

करावेत?, देशाची प्रगती कशी आहे व ती आणखी कशी वाढवता येईल?, स्वतःच्या देशाविषयी राष्ट्रीय वृत्ती कशी वाढवता येईल? या बाबींचा समावेश राष्ट्रीय शिक्षणात असेल. केवळ स्वतःची सही आली म्हणजे शिकलेला अशी जी त्याकाळची समजूत होती ती या संकल्पनेत आजिबातच अभिप्रेत नव्हती.

सरकारी शाळेप्रमाणे राष्ट्रीय शाळेतून शिक्षण घेतलेल्यांना नोकरी मिळणेही कठीण आहे असा एक आक्षेप घेतला जात असे कारण सरकारी शाळांतून परीक्षा घेतल्या जात. तेथील विद्यार्थी घोकंपट्टी करून पास झालेली असत त्यामुळे प्रत्यक्ष जीवनाच्या परीक्षेत मात्र ते नापास ठरत होते. त्यांनी प्राप्त केलेले ज्ञान हे केवळ तात्पुरतेच होते. राष्ट्रीय शाळेतून मिळणारे शिक्षण मात्र इतके संकुचित नसणार होते असे टिळकांना वाटत असे. अशा शाळांमध्ये राजकीय हक्क काय? सामाजिक हक्क काय?, हे कळू शकतील. स्वदेशाभिमान बाळगणे व आपल्या मातृभूमीसाठी प्रसंगी बलिदानाला तयार असणे हेही यातूनच कळेल. आपला हक्क काय हे सांगताना दुसऱ्याचा हक्क काय याचाही संस्कार याच प्रकारच्या शिक्षणातून घडेल. अशाच शिक्षणातून समजेल अन्याय करणे जितके वाईट तेवढेच तो सहन करणेही वाईट व यातूनच दूर करता येतील जातिभेद, स्पृश्य अस्पृश्यतेच्या शृंखला.

एकंदरीत निकोप समाजाची पायाभरणी करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण ही संकल्पना उपयुक्त आहे असे लोकमान्य टिळकांचे मत होते. राष्ट्रीय शिक्षणातून काय दिले जावे याचा विचार मांडताना ते लिहितात की, "देशाच्या राजकीय, सामाजिक वगैरे परिस्थितीचें व ती स्थिति सुधारण्यासाठीं ठरलेल्या सिद्धांतप्राय उपायांचें ज्ञान मुलांना लहानपणापासूनच करून देणें अत्यंत आवश्यक झालें आहे. राजकीय सिद्धान्ताचें व सामाजिक प्रमेयांचे विद्यार्थ्यांस लहानपणापासून बाळकडू देणें हेंच राष्ट्रीय शिक्षणाचें बीज होय. प्रजेचे हक्क काय असतात व त्यांपैकीं आपणांला किती आहेत हें जसें मुलांना समजलें पाहिजे, तद्वतच जातिभेद, जातिद्वेष व जातिमत्सर यांच्या योगानें आमचा देश कसा विभागला जात आहे, कसा भाजून निघत आहे, कसा करपून जात आहे, याचेंहि ज्ञान राष्ट्रीय शाळेंतील मुलांना मिळालें पाहिजे. जातिभेद

मोडण्याची आवश्यकता किती आहे हें आमच्या विद्यार्थ्यांस समजलें पाहिजे."[४४] लोकमान्य टिळकांच्या या संकल्पनेवर मेहता, न्या. रानडेंसारखे सुधारक सरकारी शाळेतच शिकले असा आक्षेप घेणारे लोकही होते. परंतु त्यावर मात्र टिळकांनी स्पष्टीकरण देऊन सांगितले होते की, मेहता व न्या.रानडेंसारखे सुधारक जरी सरकारी शाळांमधूनच शिकलेले असले तरी अशा शाळांतून एकच मेहता, एकच रानडे पुढे आले तेही त्यांचा समाजसुधारणेचा पिंड होता म्हणून परंतु राष्ट्रीय शाळेमुळे मात्र त्यांच्या सारखे लोक सतत व अधिक संख्येने निर्माण होत राहतील व याचसाठी राष्ट्रीय शाळा पाहिजेत असे त्यांना वाटत होते. या राष्ट्रीय शाळेतून शिकलेल्या विद्यार्थ्यांना स्वराज्यासाठी संघर्ष करा हे सांगण्याची गरज पडणार नाही त्यांना स्वतःच स्वराज्य किती व का महत्त्वाचे आहे ते समजेल म्हणजेच स्वराज्याचे शिक्षणही यातून दिले जाईल. लोकमान्य टिळकांचे हे विचार त्यांच्या स्वतःच्या स्वभाव वैशिष्टयांमधून स्फुरलेले दिसतात. स्वराज्य मिळविणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे प्रथम कर्तव्य आहे असे मानणारे लोकमान्य टिळक राष्ट्रीय शिक्षणास स्वराज्य मिळविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या अनेक प्रयत्नांपैकी एक प्रयत्न मानीत होते.

## राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता

लोकमान्य टिळकांच्या दृष्टिकोनातून अशा शिक्षणाची काही निश्चित कारणांसाठी आवश्यकता होती. कारण जोपर्यंत अशा शाळा नाहीत तोपर्यंत गुलामगिरीत खितपत पडलेले व ब्रिटिशांची चाकरी करण्यातच आपलं भलं आहे असे मानणारे साक्षर लोक पुढे येत राहतील. अशा शाळांची आवश्यकता काय हे स्पष्ट करतांना लोकमान्य टिळक लिहितात की, "राष्ट्रीय शिक्षणाच्या राष्ट्रीय शाळांची आवश्यकता अशाकरितां आहे कीं, त्या ठिकाणीं सर्व प्रांतातील लोकांना आपल्या धर्माचें, नीतिचें, उद्योगधंद्यांचे, देशस्थितीचें, आपल्या हक्कांचे ज्ञान मिळावें. हें ज्ञान मिळणें अवश्य आहे, सरकारास असलें ज्ञान देण्याची बुद्धि नाहीं व तें त्यांना देतांहि येत नाहीं. याचकरितां राष्ट्रीय शिक्षण पाहिजे आहे."[४५] त्यांच्या मते अशा प्रकारचे शिक्षण हे योग्य वेळीच मिळणे आवश्यक आहे. हे सर्व शिक्षण मिळाले नाही तर आमची भावी

पिढी अंधळी होईल असेही टिळकांना वाटत होते. विशेषतः धर्मशिक्षण, उदिम व धंद्याचे शिक्षण व राजकीय शिक्षण यासाठी प्रकर्षाने राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता होती. थोडक्यात लोकमान्य टिळकांच्या मते सरकारी शाळेत केवळ पुस्तकी ज्ञानावर भर दिला जात होता परंतु या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात किती उपयोग आहे याचा मात्र विचार केला जात नव्हता. हे थांबविण्यासाठी राष्ट्रीय शाळांची आवश्यकता टिळकांना वाटत होती.

## राष्ट्रीय शिक्षणाचा अभ्यासक्रम

**धर्म शिक्षण:** राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळेत काय शिकवले जाईल? याविषयीही टिळकांनी आपल्या एका भाषणात चर्चा केली होती. या शाळेचा एक साचेबद्ध अभ्यासक्रम असेल. ही शाळा केवळ कोणत्यातरी एखाद्या धर्मासाठी किंवा जातीसाठी नसेल तर एक माणूस म्हणून अभ्यासक्रम तयार केला जाईल. सुरूवातीला उल्लेखलेल्या सर्व गोष्टी या शाळेतून शिकविल्या जातीलच या शिवाय प्रत्येकाचा धर्म त्यात शिकविला जाईल. या शिक्षणाच्या माध्यमातून धर्म व पंथ यातील द्वैतभाव काढून देशाकरिता काम करता यावे असे शिक्षण दिले जाईल. "नुसतें व्यवहारिक शिक्षण मनुष्यास मनुष्यपणा आणण्यास पुरें होत नाहीं. धर्मांत जी मोठीं तत्त्वें असतात त्यांचें अध्ययन पापापासून मन परावृत्त होण्यासाठीं फार जरूर आहे. धर्म आपणांस ईश्वराचे स्वरूप शिकवितो. मनुष्य करणी करील तर परमेश्वर होऊं शकतों असें आपल्या धर्मांत सांगितलें आहे."[४६] थोडक्यात टिळकांच्या मते धर्म भेद व पंथ भेद जे होतात ते धर्माचे शिक्षण न मिळाल्यामुळे होतात. अनेक लोक धर्मामुळे तंटे होतात असे मानणारे असतात परंतु तंटे करणारे जे असतात त्यांच्या पार्श्वभूमीचा विचार केला तर ते ज्या धर्माचे स्वतःस मानतात त्यांना स्वतःच्याच धर्माची तत्त्वे समजलेली नसतात. कोणत्याच धर्माच्या तत्त्वात इतर धर्मीयांबरोबर संघर्ष करा असे सांगितलेले नसते. टिळकांच्या मते हिंदू धर्म हा सहिष्णुता असणारा धर्म आहे. त्यामुळे या शाळेतून हिंदू धर्म तर शिकविला जाईलच परंतु इतर धर्मीयासही त्यांच्या धर्मांचे शिक्षण मिळेल. अशा रीतीने धर्मशिक्षण देण्याचा विचार टिळकांचा

होता यामुळे निरनिराळया धर्मातील व पंथातील विरोध व तंटा नाहीसा होईल याबद्दल त्यांना विश्वास वाटत होता.

**उदिम धंद्याचे शिक्षण :** लोकमान्य टिळकांना राष्ट्रीय शाळेतून उदिम धंद्याचे शिक्षण अभिप्रेत होते कारण त्यांच्या मते अशा शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना पोटाची चिंता उरणार नाही. एवढेच नाही तर कुणालाही सरकारकडे नोकरीची अपेक्षा ठेवावी लागणार नाही. स्वतःच एखादा उद्योगधंदा शिकलेले असेल तर नोकरीची गरजच भासणार नाही. व्यापार उदिमाच्या अज्ञानामुळे आपली अधोगती कशी होते हे टिळकांनी स्पष्ट केले होते. विविध उद्योगधंदे हे नैसर्गिक परिस्थितीतीवर अवलंबून असतात. भारतात अनेक उद्योगधंदे चालविण्यासाठी अनुकूल अशी नैसर्गिक साधन संपत्ती आहे असे असतानाही भारतीय लोक उद्योगधंद्यांच्या बाबतीत मागे का पडतात? याचे कारण आम्हास उद्योगधंदे चालविण्यासाठी जे तंत्रज्ञान हवे असते त्याचे ज्ञान मिळत नाही असे लोकमान्य टिळकांना वाटते. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता भारतीय शेतीची प्रचंड अनास्था झालेली होती याचे कारणच हे होते की, ब्रिटिशांनी केवळ जमीन महसूलाचा विचार केलेला होता शेती सुधारण्यासाठी मात्र कोणतेही प्रयत्न केले गेलेले नव्हते. एवढेच नाही तर भारतीयांना आधुनिक पद्धतीने कशी शेती करता येईल व उत्पन्न कसे अधिक वाढविता येईल याविषयीही कुठले मार्गदर्शन केले जात नव्हते. हा केवळ शेती या व्यवसायाबाबतीत झालेला विचार होता परंतु शेती शिवाय अनेक उद्योगधंदे होते की जे पुरेशा शिक्षण व ज्ञानाअभावी मोडकळीस आलेले होते. इतर अनेक देशांनी मात्र आधुनिक तंत्रज्ञानाचा विविध उद्योगधंद्यांमध्ये वापर करून स्वतःची प्रचंड प्रगती केलेली होती. याबाबतीत विचार करता जपान व जर्मनी यासारख्या देशांनी उद्योगधंद्यांच्या माध्यमातून प्रचंड प्रगती केली असे त्यांचे मत होते.

लोकमान्य टिळक जर्मनी देशाचे उदाहरण देऊन तेथे व्यापार व उद्योग धंद्यांची काळजी कशी घेतली जाते याविषयी माहिती सांगतात. "तेथे व्यापारीखात्याकडूनच कोणच्या धंद्याची कशी स्थिति आहे ह्याची चौकशी करण्यांत येते व बुडणाऱ्या धंद्यांस उत्तेजन देऊन त्यांचे पुनरूजीवन करण्यांत येतें. इंग्रज सरकार आपल्या देशांत असेंच करीत आहे; पण इकडे

सरकार तसें करीत नाहीं."[४७] यातून स्पष्ट होते की, ब्रिटिश भारतीय उद्योगधंद्यांच्या विकासाकडे पुरेस लक्ष देत नव्हते. एवढेच नाही तर एखाद्या बुडणाऱ्या उद्योगाचे पुनरूज्जीवन केले जात नव्हते. या परिस्थितीत राष्ट्रीय शिक्षणाशिवाय बदल होणार नाही असा लोकमान्यांचा विश्वास होता. या सर्व बाबी कशा रोखता येतील व भारत उद्योग धंद्यांच्या बाबतीत स्वयंपूर्ण कसा करता येईल याविषयी अभ्यासक्रम राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळेत असेल असे टिळकांना वाटत होते.

**राजकीय शिक्षण:** सरकारी शाळेतून जे शिक्षण मिळत नाही ते राष्ट्रीय शाळेतून मिळावे अशी अपेक्षा लोकमान्य टिळकांची होती. सरकारी शाळेतून राजकीय शिक्षण दिले जात नव्हते. भारतीयांना राजकीय शिक्षण दिले तर भारतीयात जागृती होऊन ते स्वातंत्र्य मागण्यास सुरूवात करतील अशी भीती ब्रिटिशांना होती. म्हणून सरकार जाणीवपूर्वक राजकीय बाबतीत भारतीयांना अज्ञानी ठेवत होते. भारताचा खरा विकास करावयाचा असेल तर भारतीयांना राजकीय शिक्षण दिले गेले पाहिजे. ब्रिटिश लोक भारतीयांचे प्रचंड आर्थिक शोषण करीत होते व हे भारतीय निमुटपणे सहन करीत होते. अनेक भारतीयांवर उपासमारीचीही वेळ आली होती. त्याचे कारण ब्रिटिशांचे आर्थिक शोषण होते. भारतीयांना आपले देशाप्रती असलेल हक्क आणि कर्तव्य समजण्यासाठी राजकीय शिक्षण मिळणे टिळकांना आवश्यक वाटत होते.

**राष्ट्रीय शिक्षणाचे माध्यम**

राष्ट्रीय शिक्षण देण्याचे माध्यम टिळकांनी स्थानिक भाषा हेच सांगितलेले होते. हे शिक्षण मराठी भाषेतूनच दिले जावे असा टिळकांचा आग्रह होता. सरकारी शाळांमधून इंग्रजीचे माध्यम स्वीकारले असताना राष्ट्रीय शाळेत मात्र मराठी माध्यम असावे असे टिळकांना वाटत होते याचा अर्थ त्यांना इंग्रजीचा द्वेष वाटत होता असे नाही तर त्यांचे मत असे होते की, राष्ट्रीय शिक्षण हे स्थानिक भाषेतूनच प्रभावीपणे दिले जाऊ शकते. त्यांच्यामते "इंग्रजी शिक्षणाने मन जितकें संस्कृत होतें त्याप्रमाणें मनुष्याचा स्वभाव करारी किंवा निश्चयी बनण्यास मदत होत नाहीं. आमच्या सर्व शाळा व कॉलेजें हीं बहुतेक अंशी सरकारी नोकरांची हमालखाने झाले आहेत... अशा स्थितींत सुशिक्षित वर्गातून निश्चयाचे आणि पूर्ण स्वार्थत्याग

करणारे बरेचसे पुढारी बाहेर पडतील कीं नाहीं याचा संशय आहे."[४८] याचाच अर्थ इंग्रजी माध्यमांवर टिळकांचा मराठी माध्यमांएवढा विश्वास नव्हता. तसे टिळकांना वाटणेही स्वभाविक होते कारण जी भाषा आपण परकीय भाषा म्हणून शिकतो तिच्या बाबतीत कितीही सखोल ज्ञान संपादित केले तरी स्वतःचा आत्मविश्वास मात्र त्यामुळे वाढेलच असे नाही. आजच्या एकविसाव्या शतकातील परिस्थितीचा विचार केला तर इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिकणारे हुशार विद्यार्थी सोडले तर सामान्य विद्यार्थ्यांची संभाषण कौशल्ये चांगल्या प्रकारे विकसित होत नाहीत. असे विद्यार्थी स्थानिक व इंग्रजी अशा दोन्ही भाषेच्या बाबतीत समाजामध्ये कमी पडतात. टिळकांच्या मते इंग्रजी भाषेतून शिक्षण घेणे व तशी सक्ती करणे हा एक प्रकारचा जुलूमच होता कारण ब्रिटिश लोक इतकी वर्षे हिंदुस्थानात राहून मराठी शिकू शकले नाहीत तर भारतीय ग्रॅज्युएटांकडून आपण तशी अपेक्षा कशी करू शकतो? परकीय भाषेचे माध्यम वापरले तर सात आठ वर्षाचे ज्ञान संपादित करण्यासाठी वीस – पंचवीस वर्षे खर्चावी लागतात. याशिवाय इंग्रजी भाषेतून शिक्षण घेणाऱ्यांमधून समाज सुधारक अधिक निर्माण होत नाहीत म्हणून टिळकांनी शिक्षणाचे माध्यम हे मराठीच असावे असे सांगितले होते. आपल्या मातृभाषेतूनच शिक्षण दिले जावे असा आग्रही त्यांचा होता.

### राष्ट्रीय शिक्षणातील अडचणी

लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असलेल्या या राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांमध्ये काही अडचणी येणार होत्या याची जाणीवही त्यांना होती. यामध्ये सर्वात मोठी आर्थिक अडचण येणार होती. ब्रिटिश सरकारने त्यांच्या मार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांचे अनुदान कपात केलेले होते त्यामुळे सरकार अशा राष्ट्रीय शाळांना अनुदान देणार नाही अशी त्यांना खात्री होती. अर्थात आर्थिक अडचण आहे म्हणून राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा सुरू होणे थांबणे त्यांना योग्य वाटत नव्हते. त्यांनी भारतीय तरूणांना शाळा सुरू करण्यासाठी लागणारा निधी कसा गोळा करता येईल याविषयीही उपाय सांगितला होता. आपल्या भाषणात ते म्हणतात की, "शाळा बांधावयास जवळ जवळ दहा – बारा लाख रूपये खर्च यईल. वास्तविक सरकारनें हें

काम करावें, पण तें करीत नाहीं. मी म्हणतों, तुम्ही तरी कंबर बांधून हें करणार कीं नाहीं? या जिल्ह्यांत जवळ जवळ दहा – बारा लाख लोक आहेत. त्यांना मानशीं रूपया जास्त नाही. आम्ही सरकारास मानशीं चार रूपये देतों. आमची संख्या तीस कोटि असून सरकारचें उत्पन्न १२० कोटी आहे. दर मणुष्य दरसाल ४ रूपये देतो आणि आम्ही एकादां एक रूपया मागितला तर तो त्यास विशेष आहे असें नाहीं. मात्र सगळयांच्या मनांत ही गोष्ट आली पाहिजे. सगळयांच्या फायद्याकरितां ही गोष्ट आहे. त्यांनी मनात आणल्यास ती दुर्घट नाही. ज्यास ज्या तऱ्हेनें मदत करता येईल त्यानें ती तशी करावी."[४९] लोकमान्य टिळकांना राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य सरकारनेच हाती घ्यायला पाहिजे असे वाटत होते. परंतु सरकार करत नाही म्हणून भारतीयांनीही या कामासाठी धजू नये ही बाब टिळकांना पटत नव्हती. या कामी भारतीय तरूणांनीच पुढे यावे असे त्यांचे मत होते. ज्या प्रमाणे एखादे मंदिर बांधण्यासाठी आपण वर्गणी गोळा करतो त्याप्रमाणे राष्ट्रीय शिक्षण हे एक मंदिरच आहे असे समजून वर्गणी गोळा करता येईल असा टिळकांचा विश्वास होता. आर्थिक अडचणीशिंवाय काही टीका करणारे व सरकार धार्जीनेही लोक होते. परंतु अशा लोकांच्या विरोधाला डगमगून चालणार नव्हते. अशा विरोधकांकडूनही टिळकांच्या काही अपेक्षा होत्या त्या म्हणजे जर हे या सत्कार्यात काही मदत करू शकले तर त्यांचे स्वागत केले जाईल परंतु ज्यांना मदत करता येत नसेल त्यांनी किमान राष्ट्रीय शिक्षण कार्याच्या मार्गात अडथळे तरी आणू नयेत. असे लोक किमान स्वस्थ जरी बसले तरी त्यांनी खूप मदत केली असे लोकमान्य टिळकांना वाटत होते.

राष्ट्रीय शिक्षण या संकल्पनेविषयी टिळक खूप ठाम होते. ब्रिटिश सरकारही या गोष्टीस विरोध करील याची जाणीव त्यांना होती. म्हणून ते आपल्या व्याख्यानात राष्ट्रीय शिक्षण चळवळ जोपासणाऱ्यांना अखंड कार्य करीत रहा असा सल्लाही देतात. जे लोक अडथळा आला म्हणजे थांबतात किंवा आपले ध्येय सोडतात ते देशासाठी काहीच करू शकत नाहीत. त्यांच्या मते राष्ट्रीय शाळेचे एक मंदिर उभारून त्यात सरस्वती देवीची स्थापना करायची होती. जे उच्च प्रतीचे लोक असतात ते प्रयत्नवादी असतात. ते येणाऱ्या अडचणींचा सामना करण्यास सदैव तयार असतात. त्यांच्या या मार्गामध्ये अनेक विघ्ने येतील

परंतु विघ्ने आली म्हणून राष्ट्रीय शाळेची स्थापना करण्याचे काम सोडून देऊन चालणार नाही असे त्यांना वाटत होते.[५०] लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा सुरू करण्यासाठी राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून चालना दिली होती. एवढेच नाही तर राष्ट्रीय शाळा सुरू करणे हे राष्ट्रीय सभेचाच एक भाग आहे असेही मत त्यांनी मांडलेले होते.

**राष्ट्रीय शिक्षण ही खासगी शाळांची जबाबदारी**

एकोणिसाव्या शतकात सरकारी शाळा, मिशनरी शाळा व स्थानिक भारतीयांच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या खासगी शाळा अस्तित्त्वात होत्या. सरकारी शाळेतून व मिशनरी शाळेतून राष्ट्रीय शिक्षण कदापि दिले जाणे शक्य नव्हते. त्याकाळी खासगी शाळा या स्थानिक भारतीयांकडून चालवल्या जात असत व अशा शाळांचा दर्जा पाहून सरकार अशा शाळांना अनुदान देत होते. लॉर्ड रिपनच्या काळात अशा शाळांवर सरकारने फारसा अंकुश ठेवू नये असे विचार पुढे केले गेले होते. कारण शिक्षण ही स्थानिक जनतेची बाब आहे व त्यात आपण हस्तक्षेप करू नये असे रिपन यांचे मत होते परंतु ब्रिटिश सरकार अशा शाळांना अनुदान देते त्यामुळे सरकारचा अंकुश असलाच पाहिजे असे धोरण लॉर्ड कर्झनच्या काळात घेतले गेले. त्यामुळे या शाळांच्या अभ्यासक्रमांवरही बरचसे बंधन घालण्यात आले.

लोकमान्य टिळकांच्या दृष्टिकोनातून जरी सरकार अनुदान देत होते तरीही या शाळा चालविणारे मात्र भारतीय होते त्यामुळे या शाळांतून कोणता अभ्यासक्रम शिकविला जावा यावर मात्र सरकारचे बंधन नसावे. या विषयी टिळक आपले स्पष्ट विचार मांडताना दिसतात. ते म्हणतात की, "खासगी शाळांस सरकारची मदत मिळते ही गोष्ट खरी आहे; पण या शाळा लोकांच्या पैशानें किंवा स्वार्थत्यागी पुरूषांच्या उद्योगानें निघालेल्या व चाललेल्या आहेत हें तत्त्व विसरतां कामा नये. सरकारनें शिळपट शिक्षणपद्धति स्वीकारली तर खासगी शाळानींहि ती पद्धत स्वीकारावी, एवढयाकरितां कांहीं खासगी शाळा निघालेल्या नाहींत आणि एवढयाकरितां त्या काढणारांनीं स्वार्थत्यागहि केलेला नाहीं. सरकार जर आपली पद्धति सुधारीत नसेल तर, खासगी शाळांनी सरकारपासून आपली फारकत करून घेतली पाहिजे."[५१] म्हणजेच खासगी

शाळांचे स्वातंज्य सरकार हिरावून घेत असेल तर अशा शाळा सरकारपासून तोडून स्वतंत्र पद्धतीने चालविल्या जाव्यात अशी त्यांची इच्छा होती. अशा फारकत केलेल्या शाळातून राष्ट्रीय शिक्षण देणे अधिक संयुक्तिक व भारतीयांच्या दृष्टिकोनातून फायदेशीर ठरणारे आहे म्हणून या कामी खासगी शाळांनी पुढे येणे अतिशय महत्त्वाचे आहे असे त्यांना वाटत होते.

सरकार पासून बाहेर पडून स्वतंत्र अभ्यास सुरू करण्यामध्येही एक अडचण या शाळांसमोर होती ती म्हणजे जर एखादी खासगी संस्था सरकारी अभ्यासक्रम सोडून स्वतःचा अभ्यासक्रम वापरण्यास सुरूवात करीत असेल तसेच सरकारी नियम न पाळता स्वतःसाठी स्वतंत्र नियमावली लागू करीत असेल तर त्या शाळेला सरकार कडून मदत मिळणार नाही हे उघड होते. याशिवाय अशा शाळांतील मुलांना पुढे युनिव्हर्सिटी परीक्षेसही बसू दिले जाणार नाही अशीही अडचण होती. परंतु यावर टिळक एक स्वतंत्र उपाय सुचवितात. या सर्व खासगी शाळा मिळून जर एक स्वतंत्र अभ्यासक्रम सुरू केला तरी ही समस्या सुटण्यासारखी आहे किंबहुना तशा प्रकारे कार्यकरणाऱ्या संस्था बंगाल प्रांतात कार्यरत होत्या याचाही संदर्भ लोकमान्य टिळक देतात.

बंगालप्रांतामध्ये 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन' किंवा 'राष्ट्रीय शिक्षण – परिषद' या नावाची एक संस्था सुरू झालेली होती व या संस्थेमार्फत एक स्वतंत्र कॉलेज स्थापन करण्यात आलेले होते. त्याचबरोबर कलकत्ता, ढाका, रंगपूर, मेमनसिंग, कोमिला, दिनाजपूर, किशोरगंज व चांदपूर या आठ ठिकाणी हायस्कूले निघालेली होती. या राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे सर्व नियम व व्यवस्थापन सरकारी युनिव्हर्सिटीप्रमाणेच तयार करण्यात आलेले होते. प्रशासकीय काम करण्यासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, कौन्सिल, सेक्रेटरी वगैरे अधिकारी नेमलेले होते. अध्यक्ष म्हणून सुरूवातीला गुरूदास बॅनर्जी व नंतर डॉ. रासबिहारी घोष हे काम पाहत होते. त्यांनी स्वतंत्र अभ्यासक्रम चालविण्यासाठी आर्थिक तरतूदही उभारलेली होती. अरविंद घोष हे प्रिन्सिपल होते व त्यांच्या हाताखाली कलकत्ता युनिव्हर्सिटीतून ग्रॅज्युएट झालेले तरूण प्राध्यापक म्हणून काम करत होते. या संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या कॉलेज व शाळांचा

अभ्यासक्रम आणि परीक्षा स्वतंत्र होत्या. या संस्थेत राष्ट्रीय कॉलेज व हायस्कूल मिळून एकंदर सुमारे दोन हजार विद्यार्थी या नवीन आणि स्वतंत्र शिक्षणक्रमाप्रमाणे अभ्यास करीत होते.[५२] म्हणजेच बंगाल प्रांताच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अशा प्रकारच्या संस्था सुरू करता येणे शक्य होते असे टिळकांना वाटत होते. अशा प्रकारचे राष्ट्रीय शिक्षण खासगी संस्थांनी सुरू करावे अशी त्यांची इच्छा होती.

## ३) लोकमान्य टिळकांचे स्त्री शिक्षण विषयक विचार

लोकमान्य टिळकांनी आपल्या अनेक अग्रलेखातून स्त्री शिक्षणविषयक आपले विचार स्पष्ट केलेले दिसून येतात. विशेषतः सरकारने जे फिमेल हायस्कूल सुरू केलेले होते तेथील शिक्षणक्रम व पद्धतीविषयी लोकमान्य टिळकांनी टीका करणारे विचार स्पष्ट केलेले होते. एकोणिसाव्या शतकातील समाजाची जी अधोगती झालेली होती त्याला एक कारण स्त्री शिक्षणाचा अभाव हे देखील होते. त्यामुळे सुधारक मंडळींनी आपआपल्या पद्धतीने स्त्री शिक्षणाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. सर्वच सुधारकांना स्त्रियांना शिक्षण दिले जावे असे वाटत होते. याविषयी त्यांच्यात एकमत होते परंतु स्त्रियांना कोणत्या पद्धतीचे शिक्षण द्यावे याबाबतीत मात्र त्यांच्यात एकमत नव्हते. या अनुषंगाने लोकमान्य टिळक म्हणाले होते "मनुष्यजातीचें अर्धांग अशिक्षित राहिल्यास त्या दोघांचा मिलाफ कधींहि व्हावयाचा नाहीं, ही गोष्ट सर्वांस कबूल आहे; पण तेवढयामुळें दुसऱ्या अंगास आज पहिल्याला द्यावयाचें तेंच शिक्षण देऊं म्हटल्यास कोणी ऐकणार नाहीं. स्त्री व पुरूष ह्यांची कर्तव्यें या जगांत भिन्न भिन्न आहेत, व यामुळें कधींहि एकाचें शिक्षण दुसऱ्याशीं जुळणार नाहीं. पण हा परिणामाचा भेद झाला. पण तत्पूर्वीहि देशकालानुरोधानें या दोन्ही शिक्षणांत भेद अवश्य केला पाहिजे."[५३] या विवेचनावरून स्पष्ट लक्षात येते की, टिळकांनाही स्त्री शिक्षण योग्यच वाटत होते. केवळ त्याची पद्धती कशी असावी याचा विचार होणे अगत्याचे होते.

'फिमेल हायस्कूलातील शिक्षणक्रम' या शीर्षकाचे टिळकांनी चार अग्रलेख प्रकाशित केले होते. या अग्रलेखांतून लोकमान्य टिळकांचे स्त्री शिक्षणविषयक विचार स्पष्ट होतात.

भारतात स्त्री शिक्षणाचा उदार दृष्टिकोनातून जो पुरस्कार केला गेला तो इंग्रजांना डोळयासमोर ठेवूनच केला गेला. इंग्लड मधील स्त्रिया व्यवसायिक शिक्षण घेतात ते तेथील परिस्थितीचा विचार करता योग्य होते परंतु भारतीय परिस्थिती इंग्लड पेक्षा वेगळी अशीच आहे. त्यामुळे त्याच पद्धतीवर शिक्षणक्रम भारतात कसा चालेल? असा प्रश्न टिळक विचारतात. याच बरोबर अशा शाळातील शिक्षणक्रम सर्व सामान्य स्त्रीसाठी उपयुक्त ठरणार नाही असेही त्यांनी सांगितले होते. "सासरीं किंवा माहेरीं रोजचें थोडेंबहुत घरचें काम करून मधल्या वेळांत दोन – तीन तास स्त्री-धर्मास व हिंदू धर्मास उचित असें स्त्रियांस शिक्षण देण्याचें जर कोणीं मनांत आणिलें, तर ती गोष्ट साध्य आहे. पण जेथें सर्व धर्मांच्या मुली एकत्र करून त्यांस पुरूषांप्रमाणे ११ ते ५ वाजेपर्यंत इंग्रजी बाई आंग्लभौम शिक्षण देणार, ती शाळा एक अति श्रीमंतांच्या किंवा अनाथ झाल्यामुळें कांही तरी धंदा करण्याची ज्यांस जरूर आली आहे, अशा स्त्रियांच्या मात्र उपयोगी पडणार. मध्यम स्थितीच्या गृहस्थास त्या शाळेपासून कांहींएक उपयोग होणार नाहीं; इतकेंच नव्हे तर, उलट उपद्रव मात्र होईल."[५४] म्हणजेच टिळकांच्या मते स्त्रियांना गृहस्थी चालविण्यासाठी जे उपयुक्त पडणारे शिक्षण आहे ते दिले जाणे आवश्यक होते. तत्कालीन सरकारने पुरूषांसाठी जो शिक्षणक्रम होता तोच फीमेल हायस्कूलसाठीही ठेवलेला होता. टिळकांच्या मते स्त्रियांची कर्तव्ये ही पुरूषांपेक्षा भिन्न असतात त्यामुळे स्त्रियांना पुरूषांप्रमाणे त्यांच्याच वर्गात पूर्णवेळ शिक्षण देण्याची आवश्यकता नाही. लोकमान्य टिळकांचे स्त्री शिक्षण विचार आगरकरांच्या स्त्री शिक्षणविषयक विचारांपेक्षा सर्वार्थान विरूद्ध दिसून येतात.

भारतात व पर्यायाने महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाच्या आड येणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे बालविवाह पद्धत ही होती. हायस्कूल शिक्षण हे प्राथमिक शिक्षणाच्या पुढचा टप्पा आहे. त्यामुळे हायस्कूलात येण्यापूर्वीच बऱ्याचशा मुलींची लग्ने होत असत. त्यामुळे विवाहित स्त्रियांची शाळेत जाण्याची संख्या अत्यल्प असायची. त्यामुळे या उदार शिक्षणाचा फारसा उपयोग होऊ शकत नव्हता असे टिळकांचे मत होते. त्याकाळी बालविवाह पद्धत सहजासहजी पूर्णपणे बंद होणे शक्य नव्हते. पर्यायाने खूप थोडयाच स्त्रियांना हायस्कूल शिक्षण सुरू ठेवता

येऊ शकायचे. त्यामुळे सर्वसामान्य समाजातील बहुतांश स्त्रियांच्या बाबतीत विचार करता घर गृहस्थी चालवित असतानाच स्वधर्मानुकूल उदार शिक्षण स्त्रियांना देण्याची गरज होती असे टिळकांना वाटत होते. अशा प्रकारचे प्राथमिक शिक्षण वगळता ज्यांना पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण देता येणे शक्य आहे त्यांनी तसाही प्रयत्न करावा असे त्यांनी सांगितले होते. त्यांच्या मते फिमेल हायस्कूल जे सरकार मार्फत चालविले जात होते त्यातून मात्र अशा प्रकारचे शिक्षण देता येणे कठीण होते. लोकमान्य टिळक स्त्री व पुरूष यांना संसाररूपी रथाची दोन चाके मानीत होते. त्यामुळे पुरूषांना जर शिक्षण असणे जरूरीचे आहे तर स्त्रियांच्यासाठीही शिक्षण तेवढेच जरूरीचे आहे कारण रथाचे एक चाक थांबले तर मात्र उपयोग होणार नाही. थोडक्यात संतुलित समाज व्यवस्था निर्माण होण्यासाठी स्त्रियांसाठीही शिक्षण आवश्यक आहे. म्हणूनच त्यांच्यामते "मुलींच्या शाळांतून जें प्रायमरी शिक्षण मिळतें त्यापेक्षां आमच्या स्त्रिया सुशिक्षित होण्यास जास्त शिक्षणाची आवश्यकता असून तें त्यास ज्या ठिकाणीं त्यांच्या इतर कृत्यांत आड न येतां मिळेल असें एक इन्स्टिटयूशन आम्हांस अवश्य पाहिजें, या गोष्टीचा आम्हीं वारंवार स्पष्ट उल्लेख केला आहे. परंतु तो मनांत न आणितां किंवा त्याकडे दुर्लक्ष करून फीमेल हायस्कूलची दिशा अत्यंत चुकीची आहे असें म्हणण्यांत आमचा गुप्त हेतु स्त्रीशिक्षणाविरूद्ध आहे असें सांगणारे साहसी सुधारक आपल्या मेंदूचा कमजोरपणा व आपल्या अंतःकरणाची दूषितता मात्र जगास व्यक्त करीत आहेत."[५५] थोडक्यात फिमेल हायस्कूल व्यतिरिक्त जिथे चांगले व योग्य शिक्षण दिले जाईल अशी एखादी संस्था स्थापावी असा विचार त्यांचा होता.

वास्तविक फिमेल हायस्कूलला त्यांचा विरोध नव्हता तर तेथील पद्धतीला त्यांचा विरोध होता. एकोणिसाव्या शतकातील समाजात स्त्रियांना गृहस्थाश्रमातील कर्तव्ये पूर्ण करणे व त्यातच आपले जीवन व्यतीत करणे अगत्याचे असायचे. काही अपवादात्मक स्त्रियाच केवळ गृहस्थाश्रमाची कर्तव्ये सोडून इतर कार्यांचा विचार करायच्या त्यामुळे टिळकांच्या मते स्त्रियांना जे शिक्षण दिले जावे ते प्रामुख्याने त्यांना गृहस्थाश्रमात कुटुंबाला पुढे नेण्यासाठी जे उपयुक्त ठरेल असेच दिले जावे. टिळकांना याचीही जाणीव होती की, त्यांचे विचार इतरांना पटणारे

नव्हते. त्यांच्यावर टिळक स्त्री शिक्षण विरोधी आहेत अशी टीका केली जायची. ते आपल्या विचारांवर ठाम होते कारण त्यांच्या मते स्त्रीही पुरूषांपेक्षा नेहमीच भिन्न आहे त्यामुळे दोन्ही गटांना एकाच प्रकारचे शिक्षण देणे योग्य नाही.

तत्कालीन समाजात स्त्री ही पुरूषांसारखी नोकरी करू शकत नव्हती त्यामुळे स्त्रीला शिक्षणाची आजिबात आवश्यकता नाही असा एकूणच समाज मानीत होता. मात्र स्त्री जरी नोकरी करीत नसली तरी तिला कुटुंबाला आर्थिक मदत मिळेल अशा प्रकारचे शिक्षण देता येऊ शकणार होता. त्यासाठी स्त्रियांना घरगुती काही व्यवसायांचे शिक्षण देता येईल असेही मत त्यांचे होते. अशा प्रकारच्या शिक्षणामुळे स्त्रियांची स्थिती सुधारेल याविषयीही टिळक विश्वास व्यक्त करतात. त्यांच्या मते अशा प्रकारच्या शिक्षणाने काही शतकांच्या अवधीत स्त्रिया स्वतंत्र होतील व पुरूषांप्रमाणेच रोजगारधंदे करू लागतील. यातूनच संसार रथाची दोन्हीही चाके स्वयंपूर्ण होऊन राष्ट्रउन्नती होईल असे त्यांना वाटत होते. आजच्या परिस्थितीशी तुलना करता केवळ एक शतकभराच्या काळातच स्त्रीशिक्षणाने त्यांच्या प्रगतीचा आलेख उंचावल्याचे दिसून येते.

एकूणच टिळकांच्या स्त्री शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करता लक्षात येते की, इतर समाज सुधारकांप्रमाणेच त्यांनीही स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, म. जोतिबा फुले, आगरकर या समाज सुधारकांपेक्षा वेगळी भूमिका त्यांनी स्त्री शिक्षणाच्या बाबतीत मांडलेली होती. टिळकांना सहयोगी शिक्षणाची कल्पना मान्य नव्हती. स्त्रियांना प्राथमिक दर्जाचे, सुशिक्षित करणारे शिक्षण दिले जावे असे त्यांना अभिप्रेत होते. त्याच बरोबर स्त्रियांनी कौटुंबिक जबाबदारी सर्वार्थाने सांभाळावी अशा प्रकारचे शिक्षण त्यांना मिळावे असे विचार त्यांनी मांडलेले होते. आजच्या काळाचा विचार करता मात्र एवढीच मर्यादा स्त्री शिक्षणाची राहिलेली दिसत नाही.

## ४) लोकमान्य टिळकांचा अभ्यासक्रमविषयक दृष्टिकोन

लोकमान्य टिळकांनी न्यायमूर्ती रानडेंप्रमाणेच तत्कालीन शिक्षण पद्धतीतील अभ्यासक्रमाविषयी आपले विचार स्पष्ट केलेले होते. त्यांनी २१ एप्रिल १८९६ रोजी 'आमच्या बुद्धीस खरोखर उतरती कळा लागली काय? अशा आशयाचा अग्रलेख लिहिला होता. त्या अग्रलेखात त्यांनी सरकारी शाळा व कॉलेजमध्ये शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमावर टीका केली होती व त्यातून त्यांचा सरकारी शाळेत राबविला जाणारा अभ्यासक्रम कसा होता? व तो प्रत्यक्षात कसा असायला हवा होता? याविषयीचे विचार स्पष्ट होतात. एकोणिसाव्या शतकात भारतीय विद्यार्थ्यांवर ते निर्बुद्ध आहेत अशा प्रकारची टीका केली जात होती. लोकमान्य टिळकांनी मात्र या गोष्टीचे खरे कारण सांगितले होते. त्यांच्या मते तत्कालीन काळातील सरकारी शाळांमधून शिकविला जाणारा अभ्यासक्रम हा अतिशय क्लिष्ट व विद्यार्थ्यांना डोईजड असा होता. तत्कालीन काळात विद्यार्थी विद्वान निघत नाहीत किंवा एकनाथ महाराज, वामन, तुकाराम महाराज, मोरोपंत यासारखे कवी निर्माण होत नाही अशी समाजातून टीका केली जात होती.[५६] लोकमान्य टिळकांच्या मते हे सर्व कवी श्रेष्ठ होते परंतु त्यांचा काळ, त्यांना आलेले प्रसंग, त्यांची राहणी हे सर्व भिन्न होते. या परिस्थितीचा विचार न करता आपले विद्यार्थी नादान आहेत असे समजणे टिळकांना चुकीचे वाटत होते. म्हणजेच त्यांच्या मते विद्यार्थी हे निर्बुद्ध नव्हते तर सरकारी शाळांमधून शिकविला जाणारा अभ्यासक्रम अतिशय डोईजड होता.

भारतीयांची आर्थिक परिस्थिती व त्या अनुषंगाने त्यांना उपलब्ध होणाऱ्या शिक्षणाच्या सोयी तसेच त्यांची शारीरिक क्षमता या सर्व गोष्टींचा विचार करून ते खरच सरकारी शाळेत ठरविलेला अभ्यासक्रम पेलविण्यास समर्थ आहेत का? याचा विचार होणे अगत्याचे होते. प्रत्येक काळातील परिस्थिती ही वेगवेगळी असते व त्या परिस्थितीचा विचार करूनच अभ्यासक्रम ठरविणे उचित ठरते. एकोणिसाव्या शतकातील शिक्षण घेणाऱ्या भारतीय व महाराष्ट्रीयन विद्यार्थ्यांची एकूणच स्थिती काय होती याचेही वर्णन टिळकांनी केलेले होते. ते

म्हणतात की, "आमच्या विद्यार्थ्यांस खावयास नाहीं, आमचे विद्यार्थी नेहमीं जें अन्न खातात ते निःसत्त्व असतें हें जगजाहीर आहे; तेंहि कित्येक प्रसंगी वेळेवर मिळण्याची मारामार पडतें. साधारण असा नियम आहे कीं, तरूणांचे हाडपेर बावीस वर्षांपासून पस्तीस वर्षांपर्यंत भरत असतें. त्या वेळेसच त्याजवर शरीराची वाढ खुंटण्यासारखी दुसऱ्या प्रकारची जबाबदारी येऊन पडते. खाण्यास अन्न चांगलें नसतें, त्यातच संसाराची सुरूवात होते; आणि त्याच सुमारास विकट अभ्यास करण्याचा त्यांस प्रसंग येऊन व परीक्षांची काळजी लागून त्यांचें रक्त आंतल्या आंत जळून जातें."[५७] एकंदरीत परिस्थितीचा विचार करता ज्या कुटुंबातील मुलांना पोटभर अन्न मिळत नाही ते उपाशी पोटी राहून अभ्यासक्रम कसा पेलवू शकतील असा प्रश्न लोकमान्य टिळकांचा होता. त्यांच्या मते ब्रिटिशांच्या सरकारी शाळेत जो अभ्यासक्रम शिकविला जातो तो हुशार विद्यार्थ्यांसाठीच अवघड होता त्यामुळे बहुसंख्य सामान्य विद्यार्थ्यांसाठी निश्चितच खूप कठीण होता. तत्कालीन शिक्षण व्यवस्थेत बी.ए.च्या पदवी परीक्षेसाठी जो अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला होता त्याची एकूण पृष्ठ संख्या पाच हजारांच्यावर होती. एवढामोठा अभ्यासक्रम हे विद्यार्थी सहनच करू शकणार नव्हते.

अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची इच्छा होती परंतु केवळ डोईजड अभ्यासक्रमामुळे ते शिक्षण थांबवून इतर कामधंद्याचा विचार करीत असत. सरकारी शाळेतील अभ्यासक्रम ब्रिटिश लोक ठरवित होते त्यामुळे भारतीयांची सद्यस्थिती काय होती याचा विचार त्यात होत नव्हता. भारतीय शाळेत शिकणाऱ्या मुलांचा त्यात अजिबात विचार होत नव्हता. एवढेच नाही तर भारतीय विद्यार्थी या विरोधी कुठलाही प्रतिकार न करता हे ब्रिटिशांनी सुरू केलेले आहे म्हणजेच ते मान्यच करावे लागणार असा विचार करून शिक्षण घ्यायचे असेल तर परीक्षा द्याव्याच लागतील व अभ्यासक्रम पेलवतच नसेल तर शिक्षण थांबविलेले बरे असे मानीत होता. लोकमान्य टिळक अशा प्रकारचा अभ्यासक्रम म्हणजे पिठाच्या पाण्याचे तयार केलेले दुध होते असे मानत होते. त्यांच्या मते अश्वत्थामाची दूध म्हणून जशी पिठाच्या पाण्यावर समजूत काढली गेली होती तशी ब्रिटिश लोक अशा प्रकारचा डोईजड अभ्यासक्रम तयार करून

भारतीयांसाठी शिक्षण सुरू केले अशी समजूत काढत होते.[५८] हा सर्व प्रकार भारतीय लोक कुठलाही प्रतिकार न करता निमुटपणे सहन करीत होते याची खंत त्यांना वाटत होती.

तत्कालीन समाजात तज्ज्ञ व्यक्ती अधिक शिक्षण घेतलेल्यांच्या अकाली मृत्यूबाबत कारण सांगताना आहार व विहार योग्य नसणे असेच बहुधा सांगायचे. लोकमान्य टिळकांना मात्र एवढेच एक कारण मान्य नव्हते. ग्रॅज्युएट लोकांत मृत्यूचे अधिक प्रमाण आहे. त्याचे कारण शिक्षणाचे ओझे आणि त्याविषयी दहशत हेच होते, असे त्यांना कटाक्षाने वाटत असे. लोकमान्य टिळकांनी त्याविषयावर १७ एप्रिल १८९४ रोजी 'आमचे आधुनिक विद्वान् अकाली का मरतांत?' असा अग्रलेख केसरीतून प्रसिद्ध केला होता. त्यात त्यांनी लिहिले होते की, "परीक्षेस दहा विषय असले; व त्यांपैकी विद्यार्थ्यास पांच चांगले, चार मध्यम आणि एक सुमारासच येत असला, तर त्या एका विषयाकरितां त्यास वारकरी बनविणें अगदी अप्रशस्त आहे. बी.ए.ची परीक्षा ही कांही विद्वत्तेची सीमा नव्हे. साधारणरीत्या सुशिक्षित मनुष्यास जें ज्ञान असणें अवश्य आहे तिककें ज्यास मिळालें आहे त्यास बी.ए. होतां यावें. कोणत्याहि एका विशिष्ट विषयाचा व्यासंग करून त्यात लौकिक मिळविणें हें पुढील काम आहे. त्याचा सामान्य परीक्षेशी कांही संबंध असूं नयें."[५९] एकूणच विचार करता असे लक्षात येते की, लोकमान्य टिळक एखाद्या विद्यार्थ्यास एखादा विषय चांगला येत नाही म्हणून त्यास नापास करू नये. त्यांच्या मते त्याकाळच्या परीक्षा पद्धतीमध्ये केवळ एका विषयात नापास झालेल्या विद्यार्थ्यांना वर्षानुवर्षे पुनःपुन्हा परीक्षांना बसण्यास भाग पाडले जायचे व शेवटी ही पदवी मिळविणे आपल्याला शक्य नाही असे त्या विद्यार्थ्याच्या लक्षात आले की तो आपले शिक्षण अर्ध्यातच सोडून द्यायचा. त्याने केवळ शिक्षण सोडले तरी ठीक परंतु काही विद्यार्थी अशा परीक्षांचा अक्षरशः धसका घ्यायचे त्याचा विपरीत परिणाम त्याच्या आरोग्यावर व्हायचा.

आजच्या काळाचा विचार केला तरी या परिस्थितीत खूप बदल झाला असे म्हणता येणार नाही. तथापि समाज सुधारकांच्या विचारांमुळे काही इष्ट बदल विद्यापीठांनी केल्याचे निदर्शनास येते. आजच्या काळातील विद्यापीठीय शिक्षणात विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचा

विषय मुख्य विषय म्हणून निवडण्याची मुभा आहे. आवडीचा विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असल्याने प्रत्येक जण आपल्या बुद्धीचा विचार करून मुख्य विषय निवडतो व त्यामुळे त्याच्याकडून पदवीचा अभ्यासक्रम चांगल्या प्रकारे पूर्ण केला जातो. एकोणिसाव्या शतकात आवडीचे व आवडीचे नसणारे असे सगळेच विषय एकत्रित अभ्यासावे लागत होते व त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या त्याकाळी कमीच होती.

एकूणच विचार करता टिळकांच्या अभ्यासक्रमविषयक विचारांवरून स्पष्ट होते की, अभ्यासक्रम हा खूप अवघड नसावा. त्या अभ्यासक्रमातून शिक्षणाची मुख्य उद्दिष्टे साध्य व्हावीत. त्यातून स्पर्धा निर्माण होणे अपेक्षित नव्हते. अभ्यासक्रमाच्या बाबतीत लोकमान्य टिळक व न्यायमूर्ती रानडे यांच्या विचारांमध्ये साम्य असल्याचे दिसून येते. ज्या प्रमाणे न्या.रानडे यांनी सोपा, सुलभ अभ्यासक्रम असावा व परीक्षा पद्धतीही अधिक कठोर नसावी असे विचार सुचविले होते त्याप्रमाणेच लोकमान्य टिळकांनी विचार मांडल्याचे दिसतात.

## ५) लोकमान्य टिळकांचा विद्यापीठीय शिक्षणविषयक दृष्टिकोन

लोकमान्य टिळकांनी विद्यापीठीय शिक्षणाविषयी 'विद्यापीठ म्हणजे काय?, खरे विद्यापीठ कोणते?, विद्यापीठीय शिक्षणाची आवश्यकता काय?, ब्रिटिशांमुळे भारतीय विद्यापीठांची झालेली हानी, विद्यापीठीय शिक्षणाचा अभ्यासक्रम कसा असावा?' या सारख्या विषयावर विविध अग्रलेखातून आपले विचार स्पष्ट केले होते. लोकमान्य टिळकांच्या मते शालेय शिक्षण व विद्यापीठीय शिक्षण यात खूप फरक आहे. शालेय शिक्षणात केवळ अध्ययन व अध्यापन या दोनच बाबींचा समावेश होतो. विद्यापीठीय शिक्षणात मात्र अध्ययन अध्यापन एवढीच मर्यादा नसून तेथे विविध शास्त्रात नवे शोध लावले जातात. संशोधनास चालना दिली जाते. म्हणूनच विद्यापीठीय शिक्षण व शालेय शिक्षण भिन्न आहे. लोकमान्य टिळकांनी विद्यापीठीय शिक्षण कशाला म्हणावे? याविषयी स्वतःचे मत स्पष्ट केलेले होते. त्यांच्या मते विद्यापीठीय शिक्षण म्हणजे "शास्त्रांचा अभ्यास सतत व मनन करणारे पुष्कळ विद्वान् ज्या ठिकाणीं रहातात व त्यांची कीर्ति ऐकून दूरदूरचे शेंकडों विद्यार्थी ज्ञानार्जनाकरितां जेव्हां

त्यांजपाशी येतात तेव्हां एखाद्या स्थळास विद्यापीठ, विद्यामंदिर, अथवा विद्याश्रम ही संज्ञा प्राप्त होते."[६०] म्हणजेच येथे केवळ परीक्षा व पदव्या एवढयांचाच विचार नसेल तर शास्त्रांचे संशोधन करण्यासाठी आवश्यक ती साधन सामुग्रीही विद्यापीठात उपलब्ध केली जाईल. हे संशोधन पुढे अविरतपणे चालू ठेवणारा उच्च विद्याविभूषित वर्गही या विद्यापीठातून पुरेसे वेतन देऊन ठेवला जाईल. अशा प्रकारची एकंदरीत व्यवस्था असणारी विद्यासंस्था म्हणजे विद्यापीठ संबोधता येईल.

थोडक्यात टिळकांच्या दृष्टिकोनातून जुनी जी विद्या केंद्रे होती त्यांचीच जागा आज विद्यापीठांनी घेतली आहे. त्यांच्या मते एकोणिसाव्या शतकातील विद्यापीठांमध्ये अनेक त्रुटी होत्या. त्यातील पहिला मुद्दा विचारात घ्यवयाचा झाला तर विद्यापीठीय शिक्षणातील सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे पुरेसे शिक्षित व लायक प्रोफेसरची कमतरता विद्यापीठांमध्ये होती. त्यांच्या मते विद्यापीठाचा दर्जा चांगला राखला जाण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राध्यापक हे खूप चांगले असायला हवेत. याशिवाय मूळ विद्यापीठांमध्ये विद्याव्यासंग असणारे व विविध विषयांवर संशोधन करणारे काही लोक अधिक पगार देऊन ठेवले पाहिजेत. लोकमान्य टिळक इतर देशांचीही उदाहरणे देतात. त्यांच्या मते ऑक्सफर्ड, केंब्रिज, आणि जर्मनी येथील विद्यापीठांतून नेहमीच अशा प्रकारचे संशोधन करणारे उच्च शिक्षित प्राध्यापक ठेवले जातात व त्यामुळेच अशा विद्यापीठांचा नावलौकीक वाढलेला आहे. मात्र ब्रिटिशांनी भारतीयांकरिता जी महाविद्यालये व विद्यापीठे स्थापन केलेली होती तेथे अशा प्रकारच्या प्राध्यापकांची कुठलीही सोय केलेली नव्हती. जे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी नेमण्यात आलेले प्राध्यापक होते तेही उच्च विद्याविभूषित नव्हते. जे युरोपियन प्राध्यापक म्हणून भारतात आलेले होते त्यातील बऱ्याचशा प्राध्यापकांमध्ये अभ्यासशून्यता दिसत होती याशिवाय ते केवळ पैसा मिळविण्यासाठी वशिल्यानेच भारतीय विद्यापीठात येत होते आणि अशा कर्तव्य शुन्य प्राध्यापकांमुळे त्यांचा विद्यार्थीवर्गही केवळ घोकंपट्टी करून पदवी मिळविण्यापलीकडे दुसरे काहीच करत नव्हता. त्यामुळे त्याकाळी भारतीय विद्यापीठांचा म्हणावा तितका विकास झालेला नव्हता.

दुसरा मुद्दा विचारात घेतला तर टिळकांच्या मते भारतीय विद्यापीठातील अभ्यासक्रम अतिशय डोईजड तर होताच याशिवाय भारतीय विद्यापीठे केवळ परीक्षा केंद्रेच बनलेली होती. 'खरे विद्यापीठ कोणते?' या अग्रलेखात त्यांनी याबाबतच्या विचारांची चर्चा केली होती. त्यांच्या मते ब्रिटिश सरकारकडून चालविली जाणारी विद्यापीठे केवळ परीक्षा घेऊन बी.ए. व एम.ए. यासारख्या पदव्यांचे शिक्के मारण्यापलीकडे काहीच करत नव्हते. विद्यापीठाच्या चान्सलर पासून ते सिंडीकेट पर्यंत परीक्षा व पदवी एवढेच काम चाललेले असायचे. टिळकांच्या मते ही विद्यापीठे परीक्षा घेण्याकरिता राजिस्टर झालेल्या कंपनीच होत्या व गव्हर्नर या कंपनीचे डायरेक्टर होते.[६१] या सर्व बाबी विद्यापीठीय शिक्षणातील अडसर होत्या. टिळकांच्या मते मात्र भारतीयांकडे पुरेशी विद्वत्ता होती. केवळ विद्यापीठांनी पाश्चात्य धर्तीवर बदल करून घेणे त्यांच्या मते अगत्याचे होते.

अभ्यासक्रम अवघड होता ही बाब तर निश्चित होतीच याशिवाय हुशार विद्यार्थ्यांना पुढे शिक्षणाच्या सोयी चालू राहतील अशी कुठलीच उपाय योजना सरकारने केलेली नव्हती. हिंदुस्थानातील संपूर्ण शिक्षणासाठी केवळ दहा स्कॉलरशिपांचा विचार सरकारने केलेला होता व महाराष्ट्राचा विचार करता केवळ दोन स्कॉलरशिप मुंबई इलाख्याच्या वाटयाला आल्या होत्या. त्यामुळे विद्यापीठीय शिक्षणाची अनास्था अधिकच होत गेली होती.

**भारतीय विद्यापीठातील अपेक्षित बदल:** लोकमान्य टिळक भारतीय विद्यापीठांची अनास्था का व कशी झाली? हे सांगून भारतीय विद्यापीठात काय प्रमुख बदल व्हावा या विषयीही आपली मते मांडताना दिसतात. ते जर्मनी, जपान सारख्या प्रगतशील देशांचा संदर्भ देऊन आपल्याच देशात विद्वानांची कमतरता का झाली याविषयी सांगतात. "हिंदुस्थानातील लोक पाश्चात्य विद्येंत, शास्त्रांत किंवा कलांत निपुण होऊन त्यांनी सुधारलेल्या राष्ट्रांतील विद्वानांबरोबर, धंदेवाल्यांबरोबर किंवा व्यापाऱ्यांबरोबर, आपल्या बुद्धिवैभवानें, करामतीनें, कौशल्यानें किंवा हिमतीनें टक्कर देण्यास तयार व्हावें, अशी आमच्या सरकारची इच्छा नाहीं, किंवा इच्छा असल्यास कृति तरी नाहीं, असें मोठया दुःखाने आम्हांस म्हणावें लागतें. एरवी जपान सारख्या

राष्ट्रानें तीस वर्षांत ज्या सुधारणा केल्या त्या तिसाच्या दुप्पट साठ वर्षात हिंदुस्थानात कां होऊं नयेत याचें दुसरें कांही एक कारण आम्हांस दिसत नाहीं."[६२] त्यांच्या मते विद्यापीठीय शिक्षणात इंग्रजी भाषेप्रमाणेच देशी भाषांचाही विकास होणे आवश्यक होते. तसेच विद्यापीठीय शिक्षणामध्ये व्यावसायिक शिक्षणावरही भर दिला जाणे आवश्यक होते कारण ग्रॅज्युएट होणाऱ्यांची संख्या जितक्या झपाटयाने वाढली तेवढया प्रमाणात नोकऱ्यांची संख्या वाढली नव्हती. त्यामुळे पदव्या घेऊन बाहेर पडलेल्यांना बेकारीची झळ सोसावी लागली. म्हणून काहीतरी व्यवसाय शिक्षणाची व्यवस्था केली जावी असाही विचार त्यांनी मांडला होता. याशिवाय धंदे शिक्षणाबरोबरच त्यांनी कृषिशिक्षणाचाही पुरस्कार केला होता. या बाबींचा विचार जर विद्यापीठीय शिक्षणात झाला तर निश्चितच विद्यापीठीय शिक्षणाचा हेतू साध्य होईल असे टिळकांना वाटत होते.

## ६) कृषिशिक्षण व धंदेशिक्षण विषयक टिळकांचा दृष्टिकोन

लोकमान्य टिळकांनी ७ जून १९०४ रोजी 'कृषि शिक्षण व धंदेशिक्षण' याविषयावर एक अग्रलेख प्रकाशित केला होता. त्यांच्या मते भारतातील शेकडा ८० एवढी लोकसंख्या शेतीवर आधारभूत आहे. त्यामुळे कृषिशिक्षण दिल्याने बेकारीची समस्या दूर होईलच परंतु अन्नधान्य उत्पादनात भारत स्वावलंबी बनू शकेल. त्यांच्या मते कृषिशिक्षण व धंदे शिक्षण हे दोन्ही एकमेकांना पुरक असतात. कृषिशिक्षणातून त्यांना उपलब्ध असलेल्या जमिनीतून चांगले व पुष्कळ धान्य कसे पिकवता येईल हे तर धंदे शिक्षणातून शेतीतील मालांवर आधारभूत विविध उद्योगधंदे कसे वाढवता येतील हे शिक्षण अभिप्रेत होते.

शिक्षणामुळे कमी शेतीत अधिक उत्पादन काढण्याचे तंत्र विकसित होऊ शकेल व धंदे शिक्षणामुळे केवळ शेती हाच उत्पादनाचा मार्ग न मानता इतर पर्याय खुले होतील व आर्थिक विकास साधेल. सरकारने जाणीवपूर्वक या दोन्ही प्रकारच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केलेले होते. त्यामुळे त्यांनी सरकारवर टीकाही केलेली होती. सरकारवर टीका करताना ते म्हणाले होते "कृषिशिक्षण व धंदेशिक्षण जें आज आम्ही मागत आहों तें देशांतील साधारणतः

मध्यमप्रतीहूनहि खालच्या लोकांच्या हिताकरितां मागत आहों; व ही मागणी अशा स्वरूपाची असल्यामुळें एक वेळ राजकीय हक्काची मागणी नाकारणें सरकारास शोभेल, परंतु कृषिशिक्षण व धंदेशिक्षण यांजबद्दलची मागणी नाकारणें त्यांस कधींहि शोभणार नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां या दोन्ही शिक्षणांसंबंधीं सरकारची आजपर्यंत काय योजना आहे हें पाहिलें असतां राष्ट्रीय चळवळीस सुरूवात करतांना राजकीय हक्कांचे घोडे पुढें ढकलण्यांत प्रजापक्षाची एकपट चूक झाली असा जर कोणीं दोषारोप केला तर उलट बाजूनें असें म्हणतां येईल कीं, हिंदुस्थानांतील शिक्षणक्रमास सुरूवात होऊन आज पन्नास वर्षें झालीं असतां कृषिशिक्षण व धंदेशिक्षण यांचा अद्यापि मागमूसहि नसावा, अशी स्थिति ठेवण्यांत सरकारची दसपट चूक झालेली आहे."[६३] यावरून असे दिसून येते की, सर्वसामान्य लोकांच्या प्रगतीसाठी कृषि व व्यावसायिक शिक्षणाची गरज लोकमान्य टिळकांना वाटत होती. लोकमान्य टिळक स्वराज्याच्या बाबतीत आग्रही का होते याचे कारणही यातून लक्षात येते. ब्रिटिशांनी आपले राज्य चालवित असताना आपली नैतिक जबाबदारी समजून अशा प्रकारच्या शिक्षणाची व्यवस्था लावणे आवश्यक होते परंतु ब्रिटिशांनी तशी कुठलीच उपाययोजना केली नव्हती.

लोकमान्य टिळकांनी कृषि व धंदेशिक्षणात इतर देशांनी कशी प्रगती केली हेही स्पष्ट केले होते. अमेरिकेत कृषि संशोधनासास कसे महत्त्व दिले जाते हे सांगताना टिळकांनी सांगितले होते की, "ज्या शेतकी कॉलेजांस सरकारकडून जमिनीची देणगी मिळाली आहे त्यांचे वार्षिक उत्पन्न सुमारें दोन कोटि रूपयांवर गेलें आहे. शेतकीसंबंधीं प्रयोग करून पहाण्याचीं स्टेशनें (प्रयोगशाळा) अमेरिकेंत चौपन्न असून, त्यावर सरकारी खर्च सर्व संस्थानांकडून मिळून सालिना तीस लक्ष होत असतो. ज्यांत शेतकीचें शिक्षण दिलें जातें अशा निरनिराळया दर्जाच्या संस्था चौसष्ट आहेत. वर सांगितलेल्या प्रयोगशाळांत शिक्षकवर्गाची संख्या ६८५असून त्यांपैकी ३०८ शिक्षक स्वतः शेतकींचें शास्त्रीय शिक्षण पावलेले असे आहेत. अमेरिकेंतील शेतकीच्या बोर्डाकडून दरसाल साठ लक्ष पुस्तकें छापून वांटलीं जातात. याशिवाय सरकारी पुस्तकें प्रसिद्ध होतात तीं वेगळींच."[६४] लोकमान्य टिळकांनी जरी यातून अमेरिकेची कृषिक्षेत्रातील प्रगती सांगितलेली असली तरीही त्यांना भारतात कृषि विकासासाठी काय करणे अगत्याचे आहे हेच

त्यातून सांगणे महत्त्वाचे वाटत होते. अमेरिका या देशाप्रमाणेच आपल्या भारतातही कृषिविद्यापीठे स्थापन करून त्या मार्फत कृषिक्षेत्रात विविध प्रयोग व संशोधन केले जावे अशी अपेक्षा टिळकांची होती. अशा प्रकारे संशोधन झाले तर शेतीचे व्यवस्थापन कसे करावे?, कमी जमिनीत अधिक उत्पन्न कसे काढावे?, सिंचन सोयी कशा कराव्यात?, मृदेच्या प्रकारानुसार कोणते पीक कोणत्या जमिनीत घ्यावे?, आधुनिक पद्धतीने शेती कशी करावी? या विषयी मार्गदर्शन भारतीयांना मिळू शकेल. यामुळे भारतीय शेतीची भरभराट होईल व लोक चरितार्थ चालविण्यासाठी जे शहराकडे धावतात ते खेडयातच थांबतील. टिळकांच्या मते कृषिशिक्षण ही बाब खासगी शिक्षणाच्या माध्यमातून साध्य करणे कठीण आहे. त्यासाठी ब्रिटिश सरकारनेच प्रयत्न करणे आवश्यक होते. शेती क्षेत्रात व उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात नवनवीन संशोधन व्हावे यासाठी शास्त्रज्ञांना प्रेरणा देणे आवश्यक आहे असे टिळकांना वाटत होते.

## ७) लोकमान्य टिळकांचे पाश्चात्य शिक्षण पद्धतीविषयक विचार

लोकमान्य टिळकांच्या मते भारतातील जुन्या शास्त्रानुसार दिले जाणारे शिक्षण उपयुक्त असले तरी देशाच्या राजकीय परिस्थितीचा विचार करता ते शिक्षण पुरेसे नव्हते. देशातील लोकांना खऱ्या देशाभिमानाची जाणीव होणे आवश्यक होते. पाश्चात्य शिक्षण पद्धतीमुळे संपूर्ण जगभर काय घडामोडी होत आहेत याची जाणीव होते. जगात एकोणिसाव्या शतकाच्या दरम्यान अनेक असे देश होते की, त्यांनी परकीय सत्तेच्या जोखडातून आपली सुटका करून घेण्यासाठी लढे सुरू केले होते. ही सर्व माहिती पाश्चात्य शिक्षणाने भारतीयांना कळू शकणार होती म्हणूनच टिळक या पद्धतीचे समर्थन करीत होते. त्यांच्या दृष्टिकोनातून तत्कालीन भारतीय शास्त्रे व ज्ञानाला काही मर्यादा होत्या. या मर्यादा कोणत्या होत्या याचे विवेचन त्यांनी केलेले होते. “बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास हिंदुस्थानांतील न्याय-व्याकरणादि प्राचीन शास्त्रें किती जरी उपयोगी असलीं तरी देशाभिमान, राज्यव्यवस्था, राजनीति, देशाची नैतिक आणि सांपत्तिक अभिवृद्धि, राष्ट्रा-राष्ट्रांचा परस्परसंबंध वगैरे देशाचा उत्कर्ष ज्या विषयांचें ज्ञान

लागतें त्या विषयांचें शिक्षण या आमच्या जुन्या शाब्दिक शास्त्रांपासून मिळत नाहीं, आणि मिळणेंहि शक्य नाहीं."[६५] लोकमान्य टिळकांच्या दृष्टिकोनातून भारताला राजकीय अधिकार व स्वातंत्र्य मिळणे अगत्याचे होते. यासाठी आगोदर भारतीयांकडे स्वातंत्र्य मिळविणे व ते टिकविणे याविषयी पुरेसे ज्ञान असणे आवश्यक होते. हे ज्ञान केवळ पाश्चात्य शिक्षणातूनच मिळू शकेल असा त्यांचा विश्वास होता असे त्यांच्या एकंदरीत विचारांवरून दिसून येते.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांनी पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार सुरू केला होता कारण त्यावेळी त्यांचे धोरण उदारमतवादी होते. ब्रिटिशांच्या मते भारतीयांना अज्ञानात ठेवून त्यांच्यावर राज्य करणे योग्य नव्हते. शिक्षणाने प्रभावित होऊन भारतीयांनी स्वातंत्र्य मिळविले तरी एक अज्ञानी देशाला आपल्या बरोबर आणल्याचे श्रेय आपल्याला मिळेल असे ब्रिटिश मानीत होते. नतंर मात्र ब्रिटिशांच्या या उदारमतवादी धोरणात बदल होऊन ते केवळ साम्राज्यवादी बनले व आपली सत्ता कायम टिकविण्यासाठी भारतीय लोक अज्ञानातच रहावेत असे त्यांना वाटू लागले होते. शिक्षण ही बाब केवळ स्थानिकांची आहे त्यामुळे शिक्षणाचा विचार केवळ स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपालिकांनीच करावा असा पवित्रा ब्रिटिशांनी घेतला. एवढेच नाही तर ब्रिटिश सरकारने सुरू केलेले 'डेक्कन कॉलेज' ही डेक्कन एज्युकेशन सोसायटीस जोडण्यास इंग्रज सरकार स्वतःहोऊन तयार झाले व तसा कराराही त्यांनी केला होता. यातून असे दिसून येते की, पाश्चात्य शिक्षणामुळे आपल्या साम्राज्याला धोका निर्माण होईल ही बाब ब्रिटिश सरकारच्या लक्षात आली व त्यामुळे त्यांनी अशा शिक्षणातून काढता पाय घेतला. लोकमान्य टिळकांच्या मते मात्र भारताला प्रगती करण्यासाठी पाश्चात्य शिक्षण पद्धतीचीच आवश्यकता आहे. जपान जर्मनीसारख्या देशांची एवढी प्रगतीही केवळ पाश्चात्य शिक्षण पद्धतीमुळेच झालेली होती. पाश्चात्य शिक्षण पद्धतीत शिकविले जाणारे विज्ञान, इतिहास, भूगोल, तंत्रज्ञान यासारखे विषय भारतीय शाळांमध्ये शिकविले जावेत असे टिळकांना वाटत होते.

## ८) लॉर्ड कर्झनच्या शिक्षणविषयक धोरणावर टीका

भारतीय शिक्षणामध्ये इ.सन १८५४ साली वुडच्या खलित्यानुसार विविधतेतून एकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर इ.सन १८८२ साली आलेल्या हंटर आयोगाने शिक्षणाच्या संदर्भात केलेल्या शिफारशींनुसार माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा प्रसार झाला. इ.सन १८९९ मध्ये लॉर्ड कर्झन हा व्हॉईसरॉय बनला व त्याच्या कारकीर्दित पुन्हा शिक्षणविषयक ठराव पास झाले. त्यात इ.सन १९०४ चा विद्यापीठ कायदा महत्त्वाचा होता. हंटर कमिशनवर अधारितच हा कायदा लॉर्ड कर्झनने मंजूर केला परंतु त्यात प्रत्यक्षात खूप दोष होते. मुळात लॉर्ड कर्झन हा अतिशय साम्राज्यवादी, फोडा-झोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब करणारा व भारतीयांकडे प्रशासन चालविण्याची काडीमात्रही क्षमता नाही असे मानणारा व्हॉईसरॉय होता. त्यामुळे त्याने भारतीयांना विश्वासात न घेताच शैक्षणिक धोरण जाहीर केले होते. म्हणजेच त्याने शिक्षणाची जबाबदारी भारतीयांवरच सोपविली होती.

इ.सन १८९८ ला इंग्लंडच्या विद्यापीठांची पुनर्रचना करण्यात आली त्याच धर्तीवर त्याने भारतातील विद्यापीठांची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला. अर्थात या आयोगाने ज्या शिफारशी सुचविल्या त्यात व प्रत्यक्ष कार्यवाहीत अनेक त्रृटी आढळल्या त्यावर लोकमान्य टिळकांनी टीका केली होती. कर्झनने अधिक खर्च शिक्षणावर करण्याचे ठरविले परंतु हा खर्च नगरपालिका व जिल्हा लोकल बोर्ड यांच्यावर सोपविला होता. पर्यायाने तो खर्च भारतीयांच्याच शिरावर होता. भारतीय शिक्षणातील अनास्था दूर करण्यासाठी कोणतीच उपाययोजना करण्यात आलेली नव्हती. शिफारशी करूनही आयोगास भारतीय शिक्षणाची उन्नती करण्यात अपयश आले.

लोकमान्य टिळकांच्या मते विद्यापीठीय शिक्षण हे प्राथमिक व माध्यमिक विद्यालयांमध्ये किती विद्यार्थी शिक्षण घेतात यावर अवलंबून असते. विद्यापीठांच्या माध्यमातून जी महाविद्यालये चालविली जातात त्यातील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी अगोदर प्राथमिक शिक्षणाची सक्ती करणे गरजेचे असते. तत्कालीन प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची

संख्या किती कमी होती याचे वर्णन टिळकांनी केलेले होते. त्यांच्यामते "शाळेंत जाण्यास योग्य अशा शंभर मुलांपैकी आठ-नऊ मुलें पंजाबात व बावीस तेवीस मुलें काय तीं मुंबई व बंगाल इलाख्यांत शाळेंत जातात; आणि मुलींसंबंधानें पाहिलें तर हजारांत सात मुलीहि शाळेंत जात नाहींत."[६६] प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या एवढी कमी होती त्यामुळे व विद्यार्थी गळतीमुळे महाविद्यालयांपर्यंत ही संख्या खूप कमी होत होती. महाविद्यालयात विद्यार्थी वाढावेत यासाठी आगोदर सक्तीचे प्राथमिक शिक्षण करणे आवश्यक होते परंतु लॉर्ड कर्झनच्या कायद्यात अशी सक्ती केलेली नव्हती. याशिवाय इतर देशातील विद्यार्थ्यांना विविध शास्त्रात संशोधने करण्यासाठी तशा प्रकारचा अभ्यासक्रम तयार केला जातो. तेथे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व हुशारीला वाव दिला जातो. या कायद्याने भारतीय विद्यापीठात अशा प्रकारच्या संशोधनांना वाव दिला जाईल याविषयी उपाययोजना नव्हती. एकंदरीत विद्यापीठे म्हणजे केवळ परीक्षा घेऊन पदव्यांचे वाटप करणारे छापखानेच बनले होते असे टिळकांना वाटत होते. कर्झनच्या ठरावात ज्या गोष्टींचा उल्लेख आला नाही त्यांचा संदर्भ देऊन लोकमान्य टिळकांनी त्यातील निष्क्रियताही स्पष्ट केली होती. या अनुषंगाने ते म्हणतात की, "औद्योगिक शिक्षणसंबंधानें दहा स्कॉलरशिपा, शेतकींचें एक नवें कॉलेज, विद्यार्थ्यांकरितां ठिकठिकाणीं सरकारी शाळांस जोडलेलीं भोजन-वसतिगृहें, मध्यम प्रतीच्या शाळांतील शिक्षक तयार करण्याकरितां ट्रेनिंग कॉलेजें, चार इलाख्यांतील डायरेक्टरांस मदत म्हणून एकेकास असिस्टंट डायरेक्टर, आणि खासगी शाळांच्या नाडया आपल्या हातांत ठेवून त्या बंद पाडण्याचा उद्योग, हींच काय तीं या ठरावांतील मुख्य तत्त्वें आहेत."[६७] विद्यापीठीय शिक्षणासाठी संपूर्ण भारतात केवळ दहा स्कॉलरशिप ठेवण्यात आलेल्या होत्या त्यांची संख्या वाढविणे टिळकांना आवश्यक वाटत होते. कृषि महाविद्यालय, ट्रेनिंग कॉलेज, अध्यापक यांची संख्या वाढवून खासगी शाळा व महाविद्यालयांवरील अतिरिक्त बंधने ब्रिटिशांनी कमी करावीत ही अपेक्षा टिळकांची होती.

## ९) एकोणिसाव्या शतकातील शिक्षकविषयक टिळकांचा दृष्टिकोन

लोकमान्य टिळकांनी ज्याप्रमाणे सरकारी शाळांवर टीका केली होती त्याप्रमाणेच या सरकारी शाळेतील शिक्षकांवरही टीका केली होती. 'हे आमचे गुरूच नव्हेत' या नावाचे दोन अग्रलेख लोकमान्य टिळकांनी लिहिले होते. या लोखांमधून त्यांनी सरकारी शाळेमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांवर टीका केली. त्याच्या मते जे शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांचे राजकीय अधिकार शिकवू शकत नाहीत तो शिक्षक म्हणण्यास पात्रच नाही. भारतातील पूर्वीपासूनच चालत आलेली गुरूकुल पद्धती ही फार चांगली होती. त्यात शिक्षक किंवा गुरू निस्वार्थीपणे कुठलाही पूर्वग्रह न ठेवता जे योग्य आहे तेच शिकवायचे पण नंतर मात्र स्वार्थ वाढला होता. केवळ पोटभरण्यापुरताच शिक्षकी पेशा स्वीकारणारांची संख्या कमी नव्हती. या बाबतीत टिळकांनी लिहिले होते "स्वार्थासाठीं किंवा पोटासाठीं ज्ञानाच्या पुंजीचा विक्रय करण्यास जेव्हां एखादा मनुष्य तयार होतों तेव्हां त्याच्या ज्ञानास शुद्ध व पवित्र ज्ञानाची किंमत देणे म्हणजे हिमालयांतून गोमुखाच्या द्वारें बाहेर पडणाऱ्या गंगोदकाची गटारांतील पाण्याशीं तुलना करणें होय!"[६८] त्यांच्या मते ज्ञानदान करणे हे पवित्र कार्य होते. त्याची तुलना किती पगार मिळतो किंवा आर्थिक स्वार्थ किती साधला जातो याच्याशी केली जाऊ शकत नाही. जे केवळ आर्थिक स्वार्थ भागविण्यासाठीच शिक्षक होतात ते शिक्षक म्हणण्यास लायकच नाहीत असे त्यांच्या विचारांतून दिसून येते.

खऱ्या शिक्षकाचे कर्तव्य कोणते हेही ते आपल्या अग्रलेखात लिहितात. त्यांच्या मते तरूण पिढीस राष्ट्रहिताच्या गोष्टी समजावून सांगून तरूणांकडून तशाप्रकारे आचरण करण्याची त्यांच्या मनाची प्रवृत्ती नर्माण करणे हेच शिक्षकाचे मुळ कर्तव्य असते. जो शिक्षक निपक्षपाती ज्ञानदान करण्यास कचरत असेल व केवळ लाभाचाच विचार करत असेल तर तो खरा शिक्षक म्हणण्यास पात्रच नाही. हिंदू धर्म शास्त्रात गुरूला ब्रह्म, विष्णु आणि महेश या देवतांचे स्थान दिलेले आहे. तथापि जो गुरू किंवा आधुनिक काळात शिक्षक केवळ स्वतःच्या स्वार्थापुरताच विचार करतो त्यास हा मान देणे कदापि योग्य ठरणार नाही.[६९] तत्कालीन कालखंडात

राष्ट्रप्रेम, देशाभिमान या गोष्टी शिकवायचे इंग्रज शिक्षक टाळीत असत. एवढेच नाही तर स्वतः होऊन एखाद्या विद्यार्थ्यांने देशप्रेमाचे गोडवे गाईले तर त्यास दंड करून शिक्षा केली जात असे. अशा शिक्षकांना टिळकांनी ठणकावले होते.

टिळकांच्या मते ब्रिटिशांना भारतीयांमध्ये राष्ट्रवाद निर्माण होऊ नये असे मनोमन वाटत होते. त्यामुळे सरकारी शाळांमधील जे शिक्षक होते ते टिळकांच्या मते शिक्षक होण्यास पात्र नव्हते. अशा शिक्षकांना टिळक गुरू मानण्यास तयार नव्हते. "शिष्याचें राष्ट्रहित जो पहात नाहीं तो त्याचा गुरू नव्हे असें आम्ही साफ विधान करतों; आणि अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे सरकारी कॉलेजांतील किंबहुना खासगी कॉलेजांतीलहि प्रोफेसर आणि प्रिन्सिपाल नवीन पिढीस राष्ट्रीय वळण लावण्याच्या कामीं गुरू होणें शक्य नाहीं; हल्लींच्या स्थितींत उपयोगी नाहींत. अर्थात याच्यावर या बाबतींत अवलंबून असणें चुकीचें व नुकसानीचें होईल असें आम्हीं सर्वांस कळवितों. अशा पोटभरू गुरूंचा व शिष्यांचा काय संबंध असावा, या गुरूस किती मान द्यावा आणि त्यांची आज्ञा किती मानावी, अथवा त्यांनी आपला अंमल शिष्यांवर किती चालवावा किंवा शिष्यांनीं त्यांचा अंमल किती चालवूं द्यावा हे यास लागूनच दुसरें प्रश्न आहेत."[७०] टिळकांच्या या विचारातून त्यांना राष्ट्रहित जोपासणारे शिक्षक असावेत असे वाटत होते हे स्पष्ट दिसून येते. शिक्षकांवर पिढी घडविण्याची जबाबदारी असते. आपल्या विद्यार्थ्यांना योग्य संस्कार देण्यास, त्यांच्यात राष्ट्राविषयी, समाजाविषयी विचार करण्यास लावणारे शिक्षण देण्यास तसेच त्यांना त्यांच्या पायावर उभे करून स्वतःची निर्णय क्षमता वापरण्याला शिकविण्यास जे शिक्षक यशस्वी ठरू शकत नाहीत त्यांना शिक्षक म्हणनेच संयुक्तिक नाही असे त्यांच्या विचारातून दिसते. थोडक्यात आदर्श शिक्षक कसा असावा? याविषयी टिळकांच्या मनात एक निश्चित भूमिका होती व त्यात थोडाही बदल होत असेल तर ते शिक्षक म्हणण्यास पात्र नाहीत असे त्यांचे मत होते.

या सर्व मुद्यातून लोकमान्य टिळकांचे शैक्षणिक विचार स्पष्ट होतात. लोकमान्य टिळक स्वराज्य मिळविण्यासाठी जेवढे आग्रही होते तेवढेच आग्रही ते आपल्या शिक्षण

विचारांच्या बाबतीतही होते हे दिसून येते. किंबहुना शिक्षणास ते स्वराज्य प्राप्तीचे साधन मानीत होते. त्यांनी 'स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच.' असे जे निक्षून सांगितलेले होते त्याचा मुख्य आधार 'शिक्षण' होते. स्वराज्य प्राप्तीच्या दृष्टिकोनातूनच त्यांनी आपली 'राष्ट्रीय शिक्षणा'ची संकल्पना मांडलेली दिसते.

एकंदरीत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षणासारख्या महत्त्वाच्या मुद्यावर आपले लक्ष केंद्रित करून गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी समाजाला सज्ञान करण्याचा अगदी प्रामाणिक प्रयत्न केला होता. दोघांच्याही विचारात काही बाबतीत साम्य तर काही बाबतीत स्वतःची अशी स्वतंत्र भूमिका असल्याचे दिसून येते. ब्रिटिश शिक्षण पद्धतीविषयक दृष्टिकोन, पाश्चात्य शिक्षण पद्धतीची आवश्यकता, शिक्षणाची उद्दिष्टे, स्त्रीशिक्षणविषयक विचार, अभ्यासक्रम अशा विविध बाबींवर दोन्ही समाज सुधारकांनी आपले शिक्षणविचार आपल्या लेखनातून व भाषणातून मांडलेले दिसतात. आधुनिक काळात शिक्षणात जे टप्प्या टप्प्याने बदल होत गेले यामध्ये या शिक्षणविचारांतील तत्त्वे महत्त्वाची ठरलेली दिसतात.

## ६.३ संदर्भ


१) लेले रा.के.: 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २००४, पृ.क्र.२७६.

२) कित्ता, पृ.क्र.३१२.

३) प्रधान गणेश प्रभाकर (संपा): 'आगरकर - लेख संग्रह', साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, प्रस्तावना पृ. क्र. ४.

४) देशपांडे अच्युत नारायण : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास: भाग पहिला १८७४ ते १९२०', व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ. क्र.६०३, ६०४.

५) प्रा.ठोंबरे तानाजी: 'आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार', लोकवाङःमय गृह प्रकाशन, प्र.आ.२००५, पृ. क्र. ५.

६) लेले रा.के.:'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २००४, पृ. क्र. ३०९, ३१०.

७) प्रधान गणेश प्रभाकर (संपा): 'आगरकर - लेख संग्रह', आमचे दोष आम्हांस कधीं दिसूं लागतील? ', साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, पृ. क्र. ११२.

८) प्रा.ठोंबरे तानाजी: 'आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार', लोकवाङःमय गृह प्रकाशन, प्र.आ.२००५, पृ. क्र. १९.

९) प्रधान गणेश प्रभाकर (संपा) : 'आगरकर - लेख संग्रह', मूळ पाया चांगला पाहिजे.', साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, पृ. क्र. १२१.

१०) कित्ता, तरूण सुशिक्षितांस विज्ञापना, पृ. क्र. १४५.

११) कित्ता, तरूण सुशिक्षितांस विज्ञापना, पृ. क्र. १४६, १४७.

१२) कित्ता, आमचें काय होणार?, पृ. क्र. ३.

१३) देशपांडे अच्युत नारायण : 'मराठी वाङःमयाचा इतिहास: भाग पहिला १८७४ ते १९२०', व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ. क्र.१०९.

१४) प्रधान गणेश प्रभाकर (संपा): 'आगरकर - लेख संग्रह', तरूण सुशिक्षितांस विज्ञापना, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, पृ. क्र.१५३.

१५) कित्ता, तरूण सुशिक्षितांस विज्ञापना, पृ. क्र. १४५.

१६) कित्ता, ज्ञान, पृ. क्र. ३७४.

१७) कित्ता, ज्ञान, पृ. क्र. ३७४.

१८) कित्ता, ज्ञान, पृ.क्र. ३७६.

१९) कित्ता, सुधारक काढण्याचा हेतु, पृ. क्र. १३१.

२०) देशपांडे अच्युत नारायण : 'मराठी वाङःमयाचा इतिहास: भाग पहिला १८७४ ते १९२०', व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ. क्र.११२.

२१) लेले रा.के.:'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २००४, पृ. क्र. ३१९, ३२०.

२२) प्रधान गणेश प्रभाकर (संपा): 'आगरकर - लेख संग्रह', स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, पृ. क्र.१७२.

२३) कित्ता, स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता, पृ. क्र. १७२, १७३

२४) कित्ता, मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता, पृ. क्र. १७६.

२५) कित्ता, मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता, पृ. क्र. १७९.

२६) कित्ता, स्त्रियांस चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता, पृ. क्र.१७४, १७५

२७) कित्ता, स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण द्यावें किंवा नाही, पृ. क्र. १८१.

२८) कित्ता, स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण द्यावें किंवा नाही, पृ. क्र. १८२.

२९) कित्ता, स्त्रीपुरूषांना एकच शिक्षण द्यावें व तेही एकत्र द्यावें!, पृ. क्र. १८४.

३०) कित्ता, स्त्रीपुरूषांना एकच शिक्षण द्यावें व तेही एकत्र द्यावें!, पृ. क्र. १८५.

३१) कित्ता, हिंदुस्थानचे राज्य कोणासाठी अथवा सिव्हिल सर्व्हिससाठीं समकालीन परीक्षा पृ.क्र. ३४७.

३२) कित्ता, लोकशिक्षणावर गदा, पृ. क्र. ३५३.

३३) खेर भा.द.:'लोकमान्यटिळकदर्शन',अस्मिता प्रकाशन, पुणे,ति.आ.२००० पृ.क्र.२३

३४) कित्ता पृ.क्र.२५.

३५) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ६, जीवन ध्येय', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, शिक्षण व राजकारण, पृ. क्र. १३८.

३६) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ६, जीवन ध्येय', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, डे.ए.सोसायटीचा राजीनामा, पृ. क्र. ७२.

३७) कित्ता, राष्ट्रीय शिक्षण, पृ. क्र. ८९६.

३८) कित्ता, सरकारी शिक्षण व शारीरिक शिक्षण, पृ.क्र. ८९०

३९) कित्ता, चालू शिक्षण पद्धती व स्वावलंबन, पृ. क्र. ८८७.

४०) कित्ता, माझें शिक्षणाचें ध्येय, पृ. क्र. ९२१.

४१) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ३, राजकीय लेखसंग्रह', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, हिंदुस्थानातील शिक्षणाची दिशा, पृ. क्र.१८७, १८८.

४२) कित्ता, राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी, पृ. क्र.२५०.

४३) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ६, जीवन ध्येय', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय?, पृ.क्र.८८२, ८८३.

४४) कित्ता, सरकारी शिक्षण व शारीरिक शिक्षण, पृ. क्र. ८९२.

४५) कित्ता, राष्ट्रीय शिक्षण, पृ. क्र. ८९८.

४६) कित्ता, राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा, पृ. क्र. ९०५.

४७) कित्ता, पृ.क्र. ९०७.

४८) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ३, राजकीय लेखसंग्रह', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, सुशिक्षितांची कर्तव्ये, पृ. क्र.१९७.

४९) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ६, जीवन ध्येय', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, राष्ट्रीय शिक्षण, पृ. क्र. ९०१.

५०) कित्ता, पृ. क्र. ९००, ९०१.

५१) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ३, राजकीय लेखसंग्रह', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी, पृ. क्र.२६३.

५२) कित्ता, पृ.क्र.२६४.

५३) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ५, समाज व संस्कृति', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, फीमेल हायस्कुलातील शिक्षणक्रम १, पृ. क्र.२१२.

५४) कित्ता, फीमेल हायस्कुलातील शिक्षणक्रम २, पृ. क्र. २१५, २१६.

५५) कित्ता, फीमेल हायस्कुलातील शिक्षणक्रम ४, पृ. क्र. २२२.

५६) कित्ता, आमच्या बुद्धीस खरोखर उतरती कळा लागली काय?, पृ.क्र. १४५.

५७) कित्ता, आमच्या बुद्धीस खरोखर उतरती कळा लागली काय?, पृ. क्र.१४६.

५८) कित्ता, शाळांसाठी पुस्तकमाला, पृ.क्र. ६०७.

५९) कित्ता, आमचे आधुनिक विद्वान् अकालीं कां मरतात?, पृ. क्र. १३३, १३४.

६०) टिळक ज.श्री (प्रकाशक): 'समग्र लोकमान्य टिळक, खंड ३, राजकीय लेखसंग्रह', केसरी प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७६, खरे विद्यापीठ कोणत?, पृ. क्र.१३६.

६१) कित्ता, खरें विद्यापीठ कोणतें?, पृ.क्र. १३८, १३९.

६२) कित्ता, युनिव्हर्सिटया उर्फ सरकारी हमालखाने, पृ. क्र. १४१.

६३) कित्ता, कृषिशिक्षण व धंदे शिक्षण, पृ. क्र. २२२, २२३.

६४) कित्ता, कृषिशिक्षण व धंदे शिक्षण, पृ. क्र. २२३.

६५) कित्ता, राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी २, पृ. क्र. २५५.

६६) कित्ता, हिंदुस्थान सरकारचा शिक्षणावरील नवा ठराव, पृ. क्र. २१८.

६७) कित्ता, पृ. क्र. २२०.

६८) कित्ता, हे आमचे गुरूच नव्हेत! १, पृ. क्र. २३२.

६९) कित्ता, हे आमचे गुरूच नव्हेत! - १, पृ.क्र. २३२, २३३

७०) कित्ता, हे आमचे गुरूच नव्हेत! १, पृ. क्र. २३६.

# प्रकरण सातवे

# महर्षी धोंडो केशव कर्वे व

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार

## ७.१ महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे शैक्षणिक विचार

### ७.१.१ महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा अल्पपरिचय

### ७.१.२ महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक कार्य

### ७.१.३ महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक विचार

१) महर्षी कर्वे यांच्या मते स्त्री शिक्षणाची आवश्यकता

२) महिलांच्या उच्च व विद्यापीठीय शिक्षणविषयक कर्वेंचे विचार

३) महिलांच्या विद्यापीठीय शिक्षणाची उद्दिष्टे

४) महिलांच्या स्वतंत्र पद्धतीच्या शिक्षणाविषयी महर्षी कर्वेंचे विचार

५) महर्षी कर्वे यांचे अभ्यासक्रमविषयक विचार

६) महर्षी कर्वेंचे ब्रिटिश सरकारच्या शैक्षणिक धोरणाविषयी विचार

७) स्त्री शिक्षण सुधारणेसाठी महर्षी कर्वे यांनी सुचविलेले उपाय

८) महर्षी कर्वे यांचे ग्रामशिक्षण विषयक विचार

९) शिक्षणाच्या आर्थिक तरतुदींविषयी महर्षी कर्वे यांचे विचार

**७.२ राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार**

**७.२.१ राजर्षी शाहू महाराजांचा अल्पपरिचय**

**७.२.२ राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य**

**७.२.३ राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार**

१) शाहू महाराजांच्या मते शिक्षणाची आवश्यकता

२) शाहू महाराजांचे प्राथमिक शिक्षणविषयक विचार

३) शाहू महाराजांचे माध्यमिक व उच्च शिक्षणविषयक विचार

४) शाहू महाराजांचे अस्पृश्य शिक्षणविषयक विचार

५) शैक्षणिक विकासात वसतिगृहांची आवश्यकता

६) शाहू महाराजांचे व्यवसाय शिक्षणविषयक विचार

७) शाहू महाराजांचे शैक्षणिक प्रशासनविषयक विचार

८) शाहू महाराजांचे शिक्षकविषयक विचार

९) शाहू महाराजांचे स्त्री शिक्षणविषयक विचार

१०) शाहू महाराजांच्या मते शिक्षणासाठी आर्थिक उपाययोजना

११) शाहू महाराजांच्या तरूण सुशिक्षितांकडून अपेक्षा

**७.३ संदर्भ**

# प्रकरण सातवे

# महर्षी धोंडो केशव कर्वे व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार

महर्षी धोंडो केशव कर्वे व राजर्षी शाहू महाराज या दोन्ही समाजसुधारकांचा जन्म एकोणिसाव्या शतकातील असला तरीही त्यांचे बहुतांश शैक्षणिक कार्य हे विसाव्या शतकात झालेले होते. मुळात एकोणिसाव्या शतकातील विविध समाजसुधारकांच्या सुधारणावादी विचारांचा प्रभाव या दोन्हीही समाजसुधारकांवर पडलेला होता व त्या अनुषंगानेच त्यांची शैक्षणिक बाबतीत वैचारिक भूमिका घडत गेल्याचे दिसून येते. एकोणिसाव्या शतकात सुरू झालेल्या वैचारिक क्रांतीची फलश्रुती ही लगेच किंवा तत्काळ जाणवू शकली नव्हती, तथापि विसाव्या शतकाच्या सुरूवातीस मात्र या वैचारिक क्रांतीची फलश्रुती स्पष्टपणे जाणवू लागलेली होती. केवळ शैक्षणिक बाबतीत विचार केला तर एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांनी जे शैक्षणिक विचार मांडलेले होते त्या विचारांची प्रत्यक्षात कार्यवाही काहीशा विस्तृत स्वरूपात होण्यास सुरूवात झालेली होती. महर्षी कर्वे व राजर्षी शाहू महाराज या दोन्ही समाजसुधारकांचा विचार करता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे या दोन्हीही समाजसुधारकांवर जो पूर्वीच्या समाजसुधारकांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव होता त्यानुसार त्यांनी विसाव्या शतकात अगदी सुरूवातीलाच शिक्षणात क्रांती घडवून आणली. त्यांच्या या शैक्षणिक क्रांतीतूनच महाराष्ट्रातील अनेकांनी प्रेरणा घेऊन शिक्षणासारख्या अत्यावश्यक बाबीचा प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील आजची शिक्षण व्यवस्थाही त्यांच्याच शैक्षणिक क्रांतीचे द्योतक मानावी लागेल.

## ७.१ महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे शैक्षणिक विचार

### ७.१.१ महर्षी कर्वे यांचा अल्पपरिचय

महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा जन्म दि. १८ एप्रिल १८५८ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मुरूड जवळ असलेल्या शेरवली या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे मुरूड गावीच पार पडले. शेणवीच्या पंतोजींच्या शाळेपासून त्यांनी आपल्या प्राथमिक शिक्षणास सुरूवात केली व नंतर सरकारी शाळेत प्रवेश घेतला. इ.सन १८८१ साली महर्षी कर्वे मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाले व इ.सन १८८४ मध्ये त्यांनी बी.ए.ची पदवी संपादित केली होती. बी.ए.ची पदवी मिळविल्यानंतर त्यांनी मुंबई एलफिस्टन हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी पत्करली होती. इ.सन १८९१ मध्ये ते पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले होते.

महर्षी कर्वेंचा शिक्षणक्रम चालू असतानाच इ.सन १८७३ मध्ये त्यांचा राधाबाईशी विवाह झालेला होता. पण इ.सन १८९१ मध्ये राधाबाईचा मृत्यू झाला. महर्षी कर्वेंचे विचार हे लहानपणापासूनच सुधारणावादी होते. गोखले, आगरकर, रानडे यासारख्या समाजसुधारकांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झालेला होता. त्यांनी तत्कालीन स्त्रियांच्या समस्या, विधवांचे प्रश्न यांचा जवळून अभ्यास केलेला होता. त्यामुळे पुनर्विवाह करण्याची त्यांच्यावर वेळ आली तेंव्हा त्यांनी एका विधवेशीच पुनर्विवाह करून समाजासमोर सुधारणावादी विचारांचे एक उदाहरण स्वतःच्या कृतीतून उभे केलेले होते. त्यांच्या या कृतीमुळे आपल्या कुटुंबीयांचा अपमान होईल असेही त्यांना वाटत होते परंतु तरीही ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले होते. सुधारणावादी विचारसरणी विषयी त्यांची निश्चित अशी भूमिका होती. या बबतीत ते म्हणत होते की, “ओवळयाने जेवायला बसणे, इराण्याच्या दुकानात चहा प्यायला जाणे, या किंवा अशा दुसऱ्या गोष्टींमुळे जर वडिलांचे मन दुखत असेल तर त्या गोष्टी करू नयेत पण बायकोला शाळेत पाठविणे, पुनर्विवाह करणे, लहानपणी लग्न न करणे किंवा मोठेपणी लहान मुलीशी लग्न न करणे, यामुळे जर ते दुखत असतील तर त्याला नाइलाज समजून आपणाला जो मार्ग योग्य दिसेल तो स्वीकारावा.”[१] यावरून दिसून येते की, कर्वे हे विधवेशीच पुनर्विवाह करण्यावर ठाम होते. पंडिता रमाबाईंनी चालविलेल्या शारदासदनमधील

विधवा विद्यार्थिनी गोदूबाई जोशी यांच्याशी दि. ११ मार्च १८९३ रोजी महर्षी कर्वेंचा पुनर्विवाह झाला.

महर्षी कर्वेनी केलेल्या पुनर्विवाहामुळे समाजातून प्रखर विरोध झाला परंतु या विरोधाने खचून न जाता त्यांना अधिक प्रेरणा मिळाली होती. त्यांना विधवांच्या समस्या सोडविण्यासाठी व विधवा पुनर्विवाहास चालना देण्यासाठी कार्य कणारी एखादी संस्था असावी असे वाटत होते. याच जाणीवेतून त्यांनी काही मंडळींच्या मदतीने 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी'ची स्थापना केली.[२] विधवांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना शिक्षण मिळावे असे कर्वेना वाटत होते. याच उद्देशाने त्यांनी दि. १४ जून १८९६ रोजी 'अनाथ बालिकाश्रमा'ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातूनच त्यांनी पुणे येथे विधवा, परित्यक्ता महिला, कुमारिका यांच्या शिक्षण कार्यात प्रचंड क्रांती घडवून आणली होती.

महर्षी कर्वे आपल्या पत्नीसोबत प्रचंड मोठे कार्य करू शकले याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना शतकोत्तर लाभलेले आयुष्य हे सांगता येईल. त्यामुळेच प्रचंड मोठे कार्य ते विसाव्या शतकात उभे करू शकले होते. त्यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले होते. पुणे विद्यापीठ व महिला विद्यापीठ यांनी त्यांना डि.लिट पदव्यांनी सन्मानित केले होते. इ.सन १९५५ मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मविभूषण ही पदवी देऊन गौरविले. त्यांच्या शंभराव्या वाढदिवशी त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. यावरून त्यांचे कार्य किती श्रेष्ठ होते हे स्पष्ट दिसून येते. दि.९ नोव्हेंबर १९६२ रोजी वयाच्या १०५ व्या वर्षी महर्षी अण्णांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतरही त्यांनी स्थापन केलेल्या स्त्री शिक्षण संस्थेची शतकोत्तर वाटचाल यशस्वीरित्या चालू आहे.

### ७.१.२ महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक कार्य

महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक कार्य खूप अद्वितीय होते. त्यांनी मुंबई येथील एलफिस्टन हायस्कूल मध्ये शिक्षकी पेशा स्वीकारून आपल्या शैक्षणिक कार्याची सुरूवात केली होती.

आपली आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे त्यांनी आपले शिक्षण चालू असतानाच शिक्षकाची नोकरी पत्करलेली होती. 'मुंबईमध्ये असताना कर्वे दोन भूमिका करीत होते. ते विद्यार्थीही होते आणि शिक्षकही होते. एल्फिस्टन हायस्कूलमध्ये त्यांनी वर्षभर शिक्षकाची नोकरी केली. त्यानंतर कॅथेड्रल गर्ल्स हायस्कूल आणि अलेक्झांड्रा गर्ल्स हायस्कूल या दोन्हीही ठिकाणी अर्धवेळ अध्यापनाचे काम केले.'[३] याशिवाय ते खासगी शिकवण्यांचे वर्गही चालवित होते. दि. १५ नोव्हेंबर १८९१ पासून त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक पदाची धुरा सांभाळली होती.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये ज्ञानदानाचे कार्य करीत असतानाच विधवांच्या शिक्षणास प्रोत्साहन देणारी एखादी संस्था सुरू करावी असे विचार त्यांच्या मनात आले व त्यांनी दि.१४ जून १८९६ रोजी 'अनाथ बालिकाश्रम' या संस्थेची स्थापना केली. या दरम्यानच्या काळात महर्षी कर्वेनी कॉलेजची नोकरी सांभाळून अनेक ठिकाणी दौरे केले व संस्थेच्या उन्नतीसाठी निधी गोळा केला होता. हिंगणे येथे आश्रमाची एक पर्णकुटी बांधून चार विधवांच्या माध्यमातून प्रत्यक्ष आश्रमातील विधवा शिक्षणाच्या कार्यास सुरूवात करण्यात आली होती. नंतरच्या काळात मात्र आश्रमातील विधवांची संख्या वाढत गेली. विधावांबरोबरच कुमारिकांनाही आश्रमात प्रवेश देण्यास सुरूवात झाली. एकूणच विचार करता कर्वेंचे शैक्षणिक कार्य हे केवळ शिक्षक किंवा प्राध्यापक एवढयापुरतेच मर्यादित नव्हते तर ज्या काळात स्त्री शिक्षणाचा प्रश्न प्रचंड गंभीर बनलेला होता त्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाची चळवळ महर्षी कर्वेनी सुरू केलेली होती.

अनाथ बालिकाश्रमाची उल्लेखनीय कामगिरी म्हणजे या आश्रमाच्या माध्यमातून महिला विद्यालय, अध्यापिका शाळा, पुणे येथे कन्या शाळा, महिला विद्यापीठ अशा विविध शाखा सुरू करण्यात आल्या होत्या. या शाखांमधून विधवा व कुमारिका मुलींना शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. विधवा व मुलींच्या राहण्याच्या सोयीसाठी आश्रमाच्या माध्यमातून वसतिगृहांची सोयही करण्यात आलेली होती. महर्षी कर्वेनी सुरू केलेल्या या स्त्री शिक्षण चळवळीचे सर्वात मोठे यश हे स्त्रियांसाठी महिला विद्यापीठाची स्थापना हे होते.

स्त्रियांसाठी स्वतंत्ररित्या स्थापन झालेले हे भारतातील पहिले विद्यापीठ होय. मुंबई येथील गृहस्थ शेठ विठ्ठलदास ठाकरसी यांनी या विद्यापीठास भरीव आर्थिक मदत दिल्याने या विद्यापीठाचे नाव 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी भारतवर्षीय महिला विद्यापीठ' असे ठेवण्यात आलेले होते. आजही हे विद्यापीठ स्त्रियांच्या शिक्षणासाठी इतर प्रमुख विद्यापीठांप्रमाणेच महत्त्वाची भूमिका बजावित आहे.

महर्षी कर्वेनी स्थापन केलेल्या अनाथ बालिकाश्रमाचे सन १९४६ मध्ये 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था' असे नामकरण करण्यात आले. या शिक्षण संस्थेची आज शतकोत्तर यशस्वी वाटचाल सुरू आहे. आजच्या आधुनिक काळाला अनुरूप ज्या विद्याशाखा आहेत त्या विद्याशाखांमधील अभ्यासक्रम विद्यापीठामार्फत चालविले जात आहेत. २० व्या शतकाची सुरूवात आणि २१ व्या शतकाची सुरूवात या शतकभराच्या कालखंडामध्ये शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र असा बदल झाल्याचे दिसून येते. संस्थेने हा बदलही यशस्वीपणे स्वीकारलेला दिसतो. या अनुषंगाने 'गाथा शतकाची' या पुस्तकाच्या संकलक श्रीमती सुलभा तेरणीकर लिहितात की, "सामाजिक परिवर्तनाचे चक्र नित्य फिरत असते. जीवनमूल्यंही बदलतात, संदर्भ बदलतात. संस्थेच्या कालक्रमणेलाही अपवाद नव्हता. कालानुरूप बदल संस्थेने स्वीकारले. आधुनिक युगाच्या वेगवान गतीशी पावलं जुळवली. संस्थेच्या मूलतत्त्वांच्या बैठकीला धक्का न लावता आपली उन्नती करण्याचा निर्धार केला. नव्या पिढीच्या चालकांनी, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी तसेच शिक्षक, पालक, विद्यार्थिनी, आश्रयदाते यांनी संस्था प्रगतिपथावर नेण्याचा मार्ग स्वीकारला आणि कार्यक्षेत्राच्या कक्षा रूंदावल्या."[४] या विचारातून संस्थेच्या प्रगतीची कल्पना येते. आजच्या परिस्थितीचा विचार करता या संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक कन्या विद्यालय, महिला महाविद्यालये, अध्यापिका विद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगणक अभ्यासक्रमाच्या विद्याशाखा, अभियांत्रिकी महाविद्यालये, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, आश्रमशाळा व इतर व्यवसायिक अभ्यासक्रमांचे कोर्सेस अशा विविध ज्ञान शाखा कार्यरत आहेत.

### ७.१.३ महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक विचार

महर्षी कर्वेनी स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात अगदी विसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच प्रचंड क्रांती घडवून आणलेली होती. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री शिक्षणाविषयी एक ठाम भूमिका होती. या विचारांच्या जोरावरच ते एवढे मोठे भरीव शैक्षणिक कार्य करू शकलेले होते. त्यांच्या मनावर एकोणिसाव्या शतकात ज्या सुधारकांनी शैक्षणिक बाबतीत प्रबोधन केलेले होते त्यांच्या विचारांचाही प्रभाव होता. महर्षी कर्वेनी संपूर्ण समाजाच्या शिक्षणाचा विचार करण्यापेक्षा समाजातील जो दुर्लक्षित घटक आहे विशेषतः या गटाने विद्या संपादन करूच नये असा समाजाने दंडकच घातलेला होता अशा स्त्री वर्गाच्या शिक्षणासाठी कार्य केलेले असल्यामुळे त्यांचे शिक्षणविचार हे विशेषत्त्वाने स्त्री समाजाला दृष्टिक्षेपात धरूनच आकाराला आल्याचे दिसून येते. त्यांनी लिहिलेल्या आत्मवृत्तातून त्यांच्या स्त्रीशिक्षण विषयक विचारांची ओळख होते.

### १) महर्षी कर्वे यांच्या मते स्त्रीशिक्षणाची आवश्यकता

महर्षी कर्वेनी स्वतःची ठाम अशी स्त्री शिक्षणासंबंधीची भूमिका मांडलेली होती. काही निश्चित कारणांसाठी स्त्रियांना शिक्षणाची आवश्यकता आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ एकोणिसाव्या शतकातच मिशनऱ्यांच्या तसेच महात्मा फुलेंसारख्या समाजसुधारकांच्या माध्यमातून रोवली गेलेली होती. मात्र एकोणिसाव्या शतकाच्या अस्तापर्यंत स्त्रियांच्या स्थितीत विशेष परिवर्तन झालेले नव्हते. बालविवाह, बहुपत्निकत्त्व, सोवळे करण्याच्या चाली अशा प्रथा अगदी विसाव्या शतकाच्या उंबरठयावरही तशाच मूळ धरून होत्या. बालविवाह पद्धतीमुळे विधवांचा प्रश्न ही खूप गंभीर समस्या होती. कित्येक स्त्रियांना विवाह काय असतो? हे समजायच्या आत वैधव्य येत असे व पुनर्विवाहाची परवानगी नसल्यामुळे पूर्ण आयुष्य विधवा म्हणून व्यतीत करावे लागत होते. बहुपत्निकत्त्वाच्या चालीमुळे अनेक परित्यक्ता महिलांचीही समस्या होती. स्त्रियांच्या या एकूणच परिस्थितीचे परीक्षण महर्षी

कर्वे यांनी केलेले होते. विधवांच्या समस्यांविषयीचे लेख वाचल्यामुळे त्यांना स्त्रियांच्या गंभीर समस्यांची जाणीव झालेली होती.

महर्षी कर्वे यांना या समस्यांमधून स्त्रियांची सुटका व्हावी असे मनोमन वाटत होते. त्यांच्या मते या सर्व समस्यांमधून स्त्रियांची सुटका तोपर्यंत होणे शक्य नाही जोपर्यंत त्यांना स्वतःस स्वावलंबी बनविणारे व त्यांना त्यांचे हक्क व कर्तव्य याची जाणीव करून देणारे शिक्षण मिळत नाही. त्यांनी स्वतः 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी'च्या माध्यमातून विधवा पुनर्विवाहाची चळवळ जोपासली होती परंतु या मार्गात प्रचंड अडचणी होत्या. एक म्हणजे जुना परंपरानिष्ठ समाज यात आडकाठी आणत होता व दुसरे म्हणजे ज्या स्त्रियांसाठी ही चळवळ जोपासायची त्यांनाच याची जाणीव होणे दुर्लभ होते. या अनुषंगाने महर्षी कर्वेनी आपल्या हस्तलिखितात लिहिले होते की, "आपण कितीही धडपड केली तरी ह्या कार्यात पुढे पाऊल टाकण्यास जे मनोधैर्य लागते व अडचणी आणि लोकपवाद सहन करण्यास जी मनाची तयारी लागते ती होणे फार कठीण आहे. सुशिक्षित पुरूषांच्या अंगीही हे धैर्य आढळून येत नाही मग अशिक्षित विधवांच्या अंगी ते कसे उत्पन्न व्हावे? तेंव्हा आपला उत्साह व आपली शक्ती ह्या कार्याकडे लावण्यापेक्षा ती जर विधवा शिक्षणाच्या कार्याकडे लावली तर अधिक उपयोग होण्याचा संभव आहे."[५] म्हणून विधवांच्या समस्या सोडविण्यासाठी या स्त्रियांना शिक्षणाची आवश्यकता अधिक आहे असे त्यांना वाटत होते. ज्या वर्गाचा उद्धार करायचा त्या वर्गाची मानसिक तयारी होणे आवश्यक असते व ही मानसिक तयारी केवळ शिक्षणानेच होऊ शकते असे कर्वेच्या विचारांवरून स्पष्ट होते.

महर्षी कर्वे यांना स्त्री शिक्षणाच्या एकूणच अवस्थेबद्दल प्रचंड खेद वाटत होता. त्यांनी स्त्री शिक्षणासंबधी एक लेख लिहिलेला होता. या लेखामध्ये त्यांनी स्त्री शिक्षणासंबधाने डॉ.गोपाळकृष्ण गोखले यांनी जे निरीक्षण केलेले होते त्याचा संदर्भ देऊन स्त्री शिक्षणाची वाईट अवस्था स्पष्ट केलेली होती. त्यांनी असे लिहिले होते की, "स्त्रीशिक्षणासंबंधानें बहुजनसमाजाच्या मताची प्रगति, यांमध्यें पुष्कळच साम्य आहे. आरंभी क्रियायुक्त विरोध, पुढें निष्क्रिय पण तिरस्कारपूर्ण विरोध, त्यापुढें पक्की उदासीनता, व शेवटीं औदासीन्याच्या बाजूला

झुकणारी निष्क्रिय सहानुभूति, अशीं क्रमाक्रमानें लोकमताची स्थित्यंतरें होत गेलीं आहेत. ही प्रगति इतक्या मंद गतीनें होत आहे कीं, हें मांद्य अगदीं निराशाजनक नसलें, तरी जवळजवळ तसेंच आहे. स्त्री-शिक्षणाच्या भावी स्थितीचा विचार केला असतांहि आशाजनक असें क्षितिजावर कांहींच दिसत नाहीं. हिंदी, अर्थात् हिंदु, मुसलमान वगैरे हिंदवासियांनी बनलेल्या स्त्रीसमाजाची निरक्षरता पाहिली म्हणजे मनुष्य कितीहि आशावादी असला तरी तो उदास होऊन जाण्याचा संभव आहे. निद्रित अगर बेशुद्ध अशा स्थितींत असलेल्या हिंदी समाजाच्या डोळयांत अंजन कसें पडावें, हा अति बिकट प्रश्न आहे. त्यांतल्यात्यांत पुरूषसमाजाविषयीं काळजी घेणारे अनेक नांवांनी संबोधिल्या जाणाऱ्या, विचार करूं लागलेल्या, अनेक पक्षांत कांहीं लोक तरी आढळतात; परंतु स्त्रीसमाजाविषयीं कळकळ बाळगणारे फार थोडे आणि त्यांतहि स्वार्थत्यागयुक्त कृति पाहावयाची असल्यास सूक्ष्मदर्शक यंत्राचेंच साहाय्य घेतलें पाहिजे."[६] या विचारांवरून एकूणच स्त्री शिक्षणाचा संपूर्ण अहवाल डोळयासमोर येतो. सुधारक मंडळी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करतात व त्यांच्या या कार्यास समाजाकडून विरोध होतच रहातो. नंतर हळूहळू हा विरोध कमी झाला तरीही बहुसंख्य समाज मात्र या सुधारकांच्या कार्यात स्वतः सहजासहजी सहभागी होत नाहीत. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार सहजासहजी होत नाही. त्यांच्या मते समाज निद्रिस्त अवस्थेत असल्याने त्याला जागे करणे विलक्षण कठीण झालेले होते.

महर्षी कर्वेंच्या मते तत्कालीन बहुसंख्य लोकांना स्त्रियांनी शिक्षण घेऊच नये असे वाटत होते. खूप थोडे लोक स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे होते. त्यातही स्त्रियांना केवळ प्राथमिक शिक्षणाचीच आवश्यकता आहे असे मानणारेही अनेक होते. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा विकास कसा होईल हा खूप मोठा प्रश्न होता. महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणाची नेमकी वस्तुस्थिती काय होती व अशीच अवस्था राहिल्यास स्त्री शिक्षणाची दिशा काय असेल याचाही विचार केलेला होता. आपल्या आत्मवृत्तात त्यांनी असे नमूद केले होते की, "स्त्रीशिक्षणाला सुरूवात होऊन अर्धे शतक लोटलें, तरी हिंदुसमाजाची काय स्थिति आहे पाहा! त्यानें साक्षर स्त्रियांचें प्रमाण शेंकडा दोनतीनच्यावर जाऊं दिलें नाही! मुसलमानी समाजाविषयीं तर

बोलावयासच नको! मागच्या पन्नास वर्षांच्या प्रगतीवरूनच जर पुढील अजमास करावयाचा असेल, तर हिंदी स्त्रीसमाज साक्षर बनविण्याला शतकें तर पुरीं पडणार नाहींतच, पण तेथपर्यंत तो जिवंत राहिल्यास कित्येक सहस्त्रें तरी पुरीं पडतील कीं नाहीं, याचीहि वानवाच आहे."[७] महर्षी कर्वेंच्यामते स्त्री शिक्षणाचे प्रयत्न सुरू होऊन एवढी वर्षे लोटलेली होती तरी स्त्रियांच्या साक्षरतेचे शेकडा प्रमाण मात्र आजिबातच वाढलेले नव्हते. याच वेगाने हे कार्य चालू राहिले तर हजारो वर्षे लोटली तरी स्त्री शिक्षणाच्या बाबतीत कुठलीही सुधारणा होण्याची चिन्हे दिसणार नाहीत. महर्षी कर्वेंनी हिंदू समाजाची तुलना पारशी स्त्रियांच्या शिक्षणाशी केली होती. त्यांच्या मते हिंदु आणि पारशी समाजाच्या स्त्रियांची अवस्था सुरूवातीला सारखीच होती. परंतु नंतर मात्र पारशी समाजाने स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून पारशी समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण शंभर टक्क्याच्या जवळपास नेले. हिंदू स्त्रियांच्या अवस्थेत मात्र कुठलीही सुधारणा झाली नव्हती. म्हणजेच त्याकाळी स्त्री शिक्षणाची समस्या अतिशय गंभीर होती हे निदर्शनास येते.

आजच्या काळात शासकीय पातळीवर स्त्री शिक्षणासाठी विविध योजना राबविल्या जातात तरीही आज महाराष्ट्रातील स्त्री साक्षरतेचे प्रमाणे शेकडा ७५ एवढेच आहे आज सर्व शिक्षा अभियान, मधल्या सुटीतील खिचडी, वंचितांना शिष्यवृत्ती, मुलगी शिकली मोठी झाली अशा अनेक मोहिमांमधून शाळेची पटसंख्या वाढवण्याचा सरकारतर्फे प्रयत्न केला जात आहे. त्याचबरोबर मोफत शिक्षण, मोफत गणवेश, मोफत पाठयपुस्तके दिली जात आहेत. त्यामुळे काही ठिकाणी पटावर दिसणारी संख्या वाढलेली दिसते. तथापि पटपडताळणी झाल्यामुळे खरे चित्रही स्पष्ट झालेले आहे. वास्तविक विद्येची गोडी लावण्यासाठी, शिक्षणाची आस निर्माण करण्यासाठी काय केले पाहिजे, याचाही विचार तितकाच महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी व्यावहारिक उपाययोजना या कुठल्याही योजनेत नाही व असली तरी ती प्रत्यक्षात येताना मात्र 'मुलींना शिकवून काय कराचे?' याच यक्ष प्रश्नात अडकल्याचे दिसते.[८] म्हणजेच स्त्री शिक्षणाची आजची अवस्था जर

अशी आहे तर विसाव्या शतकाच्या अगदीच सुरूवातीला किती विकट असेल हे सहज समजून येते.

महर्षी कर्वेंनी स्त्रियांना शिक्षण देण्यापाठीमागे जी भूमिका मांडलेली होती या भूमिकेतून त्यांना अभिप्रेत असलेली काही महत्त्वाची उद्दिष्टे निदर्शनास येतात. त्यांनी महात्मा फुलेंप्रमाणेच कुटुंब विकासासाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता असते असे विचार मांडलेले होते. म्हणजेच कौटुंबिक विकास साधने हे स्त्री शिक्षणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणावे लागेल. कर्वेंच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतांना डॉ.न.म.जोशी यांनी लिहिले आहे की, "शिक्षण हे परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन असते. एक पुरूष शिकला तर व्यक्ती शिकते; पण एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते या तत्त्वास अनुसरून कर्वे यांनी स्त्री शिक्षणाच्या कार्याकडे आपले लक्ष केंद्रित केले."[९] म्हणजेच कौटुंबिक विकास साधने हे महर्षी कर्वे यांच्या स्त्री शिक्षण विचारांचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते असे लक्षात येते. वास्तविक विचार करता महर्षी कर्वेंचे हे विचार अतिशय संयुक्तिक होते कारण प्रत्येक कुटुंबाची संस्काराच्या दृष्टिकोनातून जबाबदारीही स्त्रीवर असते. त्यामुळे जी स्त्री सुशिक्षित आहे ती आपल्या मुलांवर चांगले संस्कार करू शकते. यामुळे संपूर्ण कुटुंबाला त्या सुशिक्षित स्त्रीचा उपयोग झाल्यशिवाय राहत नाही.

महर्षी कर्वेंच्या दृष्टिकोनातून स्त्रियांना स्वतःच्या उद्धारासाठीही शिक्षणाची आवश्यकता होती. तत्कालीन ज्या अनिष्ट सामाजिक चालिरिती होत्या त्या स्त्री शिक्षणानेच थांबवता येऊ शकतात असा त्यांचा ठाम विश्वास होता. स्त्रियांमध्ये शैक्षणिक जागृती झाली तर त्यांना त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव होऊ शकेल व स्त्री संबंधाने ज्या अनिष्ट चालिरिती समाजात रूढ झालेल्या होत्या त्यांच्या विरोधात उभे राहण्याचे सामर्थ्य प्राप्त होऊ शकेल. त्याकाळी कित्येक विधवा स्त्रिया केवळ समाजाच्या भीतीपोटी पुनर्विवाह करण्याचे टाळत होत्या परंतु याच स्त्रियांना शिक्षण मिळाले तर त्या पुनर्विवाहासही पुढे येतील असा विश्वास कर्वेंना वाटत होता. या बाबतीत त्यांनी आपल्या हस्तलिखितात लिहिले होते, "विधवा सुशिक्षित होऊन आपल्या पायावर उभ्या राहू लागल्या तर त्यापैंकी काहींच्या अंगी

जरूर ते धैर्य उत्पन्न होऊन त्या पुनर्विवाहाच्या कार्यात पाऊल टाकण्यास तयार होतील व अशा रीतीने पुनर्विवाहाच्या कार्याला अप्रत्यक्षरितीने मदत केल्यासारखे होईल."[१०] म्हणजेच कर्वेंच्या या विचारांतून स्त्री शिक्षणाचे दोन फायदे निदर्शनास येतात. एक म्हणजे शिक्षण मिळाल्यामुळे स्त्रिया स्वावलंबी बनून त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहतील व दुसरा फायदा म्हणजे ज्या विधवा, परित्यक्ता स्त्रिया आहेत त्या स्वावलंबी झाल्यामुळे आपोआपच त्यांची समाजाच्या जाचक रूढी व अनिष्ट चालिरितींच्या जोखडातून मुक्तता हाईल. याही पुढे जाऊन काही विधवा स्त्रियांमध्ये पुनर्विवाह करण्याचेही धारिष्टय निर्माण होईल असे मत त्यांनी मांडले होते. महर्षी कर्वेनी विधवा स्त्रियांच्या शिक्षणासाठी ज्या 'अनाथ बालिकाश्रमाची' स्थापना केलेली होती तेथे ही अशाच दृष्टिकोनातून शिक्षण या महिलांना दिले जात होते. "आश्रमातल्या मुली पहाटे पाचलाच उठत आणि वसतिगृहाच्या चौकात प्रार्थनेला जमत. नंतर गटागटानं बादल्या, खराटे घेऊन साफसफाई होई. झाडांना पाणी घालणं, स्वयंपाकघरात भाजी चिरणं इ. सुरू होई. आपापल्या अंघोळी तर मुली अशा झपाटयानं उरकत की कुणाला पत्तादेखील लागत नसे. रेंगाळणे नाही की वेळ काढणे नाही. सारं शिस्तीनं बसवलेले होतं. पाणी भरणं, कपडे धुणे ही अशाच चटपटीत पद्धतीने उरकलं जाई."[११] म्हणजेच आश्रमातील विद्यार्थिनींची दिनचर्याही त्यांना स्वावलंबनाचे धडे सहजासहजी मिळतील अशा प्रकारे ठेवण्यात आलेली होती.

वास्तविक शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी होणे हे सामान्य ध्येय शिक्षणाचे असतेच किंबहुना यासाठीच बहुधा शिक्षण घेतले जाते. महर्षी कर्वे यांनी याहीपुढे जाऊन स्त्री शिक्षणाची काही उद्दिष्टे सांगितलेली होती. प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीला त्याने घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग कोणत्याना कोणत्या मार्गाने होतोच. तथापि केवळ स्वतःसाठीच उपयोग होईल म्हणून शिक्षण घेणे हे शिक्षणाचे मर्यादित उद्दिष्ट आहे असे कर्वेना वाटत होते. आपल्या शिक्षणाचा उपयोग स्वतःबरोबरच इतर समाजालाही होणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. कर्वेनी आपल्या बालिकाश्रम स्थापनेच्या हेतू बाबत एक निवेदन प्रसिद्ध केलेले होते. त्या निवेदनातून त्यांचे हे विचार स्पष्ट होतात. त्यांनी लिहिले होते की, "आश्रमातील

विद्यार्थिनींनी विद्या संपादन करून नीतीने आपला चरितार्थ चालवावा एवढाच आश्रमाचा हेतू नाही. तर त्यांनी तसे करून शिवाय आपल्या देशभगिनींच्या उपयोगी पडावे. त्यांच्या उन्नतीला साहाय्य करावे हा आश्रमाचा हेतू आहे. याशिवाय विद्या संपादन करून द्रव्याची अपेक्षा न करता संपादित विद्येचा उपयोग केवळ परोपकारार्थ काम करणाऱ्या व या आश्रमासारख्या संस्था आपल्या सामर्थ्यावर चालविणाऱ्या काही स्त्रिया आश्रमातून तयार होतील अशी आश्रमाला फार उमेद आहे."[१२] अनेक लोक शिक्षणाचा संबंध केवळ नोकरी व पैसा एवढयाशीच जोडतात. महर्षी कर्वेंच्या मते काही प्रमाणात ही बाब आवश्यक असली तरीही केवळ नोकरी, पैसा एवढेच शिक्षणाचे अंतिम ध्येय नाही. शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा चरितार्थ चालविण्याबरोबरच इतर समाजाला आपल्या शिक्षणापासून कसा उपयोग होईल याचाही विचार होणे आवश्यक आहे. त्यांच्या मते या आश्रमात शिकणाऱ्या स्त्रिया विद्या संपादून चरितार्थ चालविण्या एवढया स्वावलंबी होतीलच, त्याचबरोबर त्यांनी इतर अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या स्त्रियांच्या शिक्षणासाठी पुढाकार घ्यावा. विद्या संपादून मिळणाऱ्या आर्थिक फायद्यातून परोपकार साधावा त्याचबरोबर आश्रमासारखेच संघटीत कार्य स्त्री शिक्षणाच्या चळवळीसाठी उभे करावे. महर्षी कर्वेंनी स्वतःच्या उदाहरणातून या बाबतीत समाजासाठी आदर्श निर्माण केलेला होता. त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी सुरू केल्या पासूनच ते आपल्या मिळकतीतील एक रूपयाला एक पैसा या प्रमाणे समाजसेवेसाठी काही रक्कम बाजूला ठेवीत होते. याद्वारे ते शिक्षणाचे मुख्य ध्येय साध्य करीत होते.

एकूणच विचार करता असे लक्षात येते की, महर्षी कर्वे यांनी तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करून स्त्री शिक्षणविषयक आपले विचार मांडलेले होते. त्याकाळी स्त्री-पुरूषांमध्ये जी प्रचंड विषमतेची दरी होती ती नाहीशी होऊन पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही मानाने समाजात जगता यावे, त्यांच्या जीवनातील अज्ञानाचा अंधःकार नष्ट व्हावा, अन्याय, अत्याचार व अनिष्ट चालिरितींच्या विरोधात उभे राहून आपले हक्क मिळविण्याचे धारिष्टय स्त्रियांमध्ये यावे व हे करीत असताना इतरांच्या उद्धारासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा मिळावी अशा विविध हेतूंनी महर्षी कर्वेंनी स्त्री शिक्षणाची आवश्यकता व्यक्त केलेली दिसते.

## २) महिलांच्या माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणविषयक कर्वेंचे विचार

महर्षी कर्वेंनी काही निश्चित कारणांसाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता असते असे विचार स्पष्ट केलेले होते. तथापि स्त्री शिक्षणाची मर्यादा ही केवळ प्राथमिक शिक्षण असू शकत नाही. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्या कालखंडात पुरूष शिक्षणाचीच मारामार असताना स्त्री शिक्षणासारखा विचार त्यातही स्त्रियांना उच्च शिक्षण मिळावे असा विचार लोकांच्या मनात येणे दुरापास्त होते. महर्षी कर्वेंनी मात्र स्त्रियांसाठी उच्च शिक्षण मिळालेच पाहिजे असे आग्रही विचार मांडलेले होते. एवढेच नाही तर असे उच्च शिक्षण देण्यासाठी महिलांचे स्वतंत्र विद्यापीठ असावे असेही विचार कर्वेंनी मांडलेले होते. महर्षी कर्वेंच्या दृष्टिकोनातून प्रत्येक स्त्रीला घरातील कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडता येतील या अनुषंगाने शिक्षण मिळणे आवश्यक असते. त्यांनी महिला विद्यालयाची स्थापना याच हेतूने केलेली होती. ज्या स्त्रियांना उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्यांना उच्च शिक्षण घेता यावे असेही विचार त्यांनी मांडलेले होते. या अनुषंगाने त्यांनी महिला विद्यालयातच पुढील शिक्षण घेता येण्याची सोय करावी असे विचार मांडलेले होते.

महर्षी कर्वेंनी दि.४ मार्च १९०७ रोजी लकडी पुलाजवळच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या जुन्या वाडयात महिला विद्यालयाची सुरूवात केलेली होती. या विद्यालयात प्राथमिक शिक्षणाबरोबरच पुढे शिकू इच्छिणाऱ्या मुलींची मॅट्रिक्युलेशन व ट्रेनिंग कॉलेजचे शिक्षण उपलब्ध करून देण्याची सोय केली होती. मुळात हे विद्यालय सुरू करण्यापाठीमागे महर्षी कर्वेंची निश्चित अशी भूमिका होती. या संबधीचे आपले विचार त्यांनी आपल्या आत्मवृत्तात स्पष्ट केलेले होते. त्यांनी या विद्यालयातील शिक्षणाचे काही उद्देश सांगितलेले होते. ते म्हणजे

"अ) गृहिणीपदाची कर्तव्यें व जबाबदाऱ्या ज्यांच्या योगानें मनावर पूर्णपणें ठसतील, व

ज्याच्या योगानें समाजविषयक कर्तव्यांविषयी चांगली ओळख होऊं शकेल असें शिक्षण देऊन आपल्या समाजांत कांही सुशिक्षित स्त्रिया तयार करण्याचा यत्न करणे.

ब) मुलांप्रमाणेच मुलींच्याहि ब्रह्मचर्यव्रताची मुदत आठ वर्षांच्या वयानंतर पुढें बारा वर्षांची व्हावी, व त्यांच्या विवाहकालाची मर्यादा वीस वर्षांवर यावी, हें अंतिम साध्य शक्य होण्यासाठी यत्न करणें."[१३]

कर्वेंना स्त्री शिक्षणातून एक आदर्श गृहिणी निर्माण करावयाची होती म्हणून त्यानुसारच त्यांना शिक्षण दिले जावे असे त्यांचे मत होते. याशिवाय त्या कालखंडात जी बालविवाह पद्धती रूढ होती तिला आटोक्यात आणण्यासाठी या दुय्यम शिक्षणाची जरूरी आहे असे कर्वेंचे मत होते. प्राथमिक शिक्षणापुढील शिक्षण मिळण्यास सुरूवात झाली तर आपोआपच मुलींच्या विवाहाचे वय वाढू शकेल असा विश्वास महर्षी कर्वे यांना होता. वास्तविक आजच्या काळाचा विचार केला तर हीच बाब प्रकर्षाने जाणवते की, ज्या स्त्रिया जास्त शिक्षण घेतात त्यांचा विवाह उशिरा होतो व ज्या मुली कमी शिकतात त्यांचा विवाह लवकर लावून दिला जातो. अर्थात ही समस्या आज एवढी गंभीर नाही परंतु पूर्वीच्या काळी मात्र ती गंभीर होती.

महर्षी कर्वे यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा विचार करून ब्रह्मचर्य फंडाची कल्पना मांडली होती. ही कल्पना म्हणजे "वीस वर्षांचें वय होईपर्यंत मुलीचें लग्न करणार नाहीं, व मुलीचें शिक्षण आमच्या देखरेखीखालीं चालवीन, असें गरीब मुलीच्या पालकानें कबूल करावयाचें, व आम्ही सोळासतरा वर्षांचे वय होईपर्यंत मुलीचें शिक्षण चालवून पुढें ती होतकरू दिसली, व आणखी शिकण्याची तिला हौस असली, तर तिला अधिक शिकूं द्यावयाचें, नाहीं तर तिला लग्नाची परवानगी द्यावयाची."[१४] बालविवाह प्रथा रोखण्याच्या उद्देशाने त्यांनी या फंडाची योजना आखलेली होती. त्यांच्या या योजनेचे दोन फायदे दिसून येतात. एक म्हणजे मुलीचे शिक्षण हे अधिकाधिक होऊ शकेल त्यामुळे तिचे पालक तिचा विवाह करण्याची घाई करणार नाहीत तसेच तिला आणखी शिक्षण घेण्याची इच्छा असेल तर ती आणखी शिक्षण घेऊ

शकेल. महर्षी कर्वेनी तत्कालीन समाजाचे निरीक्षण करून मुलींच्या पालकांची परिस्थिती जाणलेली होती. अनेकदा काही कारणास्तव बरेच वय होईपर्यंत मुलींचे विवाह जमत नसत. अशा प्रसंगी मुलीच्या पित्याला प्रचंड मानसिक त्रास या गोष्टीचा होत असे. जर उच्च शिक्षण त्या मुलीला मिळत असेल तर ती स्त्री वसतिगृहात राहील व त्यामुळे जरी विवाह लवकर होऊ शकला नाही तरी किमान तिचे उच्च शिक्षण तरी चालू राहील. पुढे याच शिक्षणाने ती स्वतःच्या पायावर उभी राहू शकेल.

## महिलांना विद्यापीठीय शिक्षणाची आवश्यकता

महर्षी कर्वे जपानमधील महिला विद्यापीठाविषयीची पुस्तिका वाचून प्रभावित झालेले होते. त्या पुस्तिकेत दिलेल्या माहितीवरून विशाल दृष्टिकोनातून महिलांना उच्च शिक्षणासाठी स्वतंत्र विद्यापीठाची आवश्यकता आहे असे त्यांचे मत बनलेले होते. महर्षी कर्वे यांच्यामते जपान सारख्या छोटया देशाने शिक्षणाच्या जोरावर आपली प्रचंड प्रगती करून घेतलेली होती. या बाबतीत महर्षी कर्वे आपल्या आत्मवृत्तात लिहितात की, "६५ अगर ७० वर्षांपूर्वीचें जपान आणि तितक्याच वर्षांपूर्वीचे हिंदुस्थान हे दोन देश सामाजिक स्थितींत व शिक्षणाच्या बाबतींत समान होते. त्या सुमाराला जपानी लोकांना व्यापारासाठीं व धर्मप्रसारासाठीं तिकडे गेलेल्या पाश्चात्य लोकांचा सहवास विशेष प्रमाणावर घडूं लागला. चाणाक्ष व दूरदर्शी जपानी लोकांच्या तेव्हांच नजरेस आलें, कीं जर आपण ह्या लोकांच्या विद्या, कला, शास्त्रें, उद्योगधंदे व वाङ्मय हीं हस्तगत केलीं नाहींत, तर पाव शतकाच्या आंत जपान अधोगतीला लागणार. जपाननें ताबडतोब कितीतरी विद्यार्थी दरवर्षी युरोपांत व अमेरिकेंत पाठविण्यास सुरूवात केली. ह्यांनी परत येऊन परदेशांत मिळविलेल्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशांतील लोकांस द्यावा असा क्रम सुरू झाला. जपानांत युनिव्हर्सिटया निघाल्या व पुरूषांचे शिक्षण झपाटयानें पुढे जाऊं लागलें."[१५] महर्षी कर्वेंच्या या विचारांवरून स्पष्ट लक्षात येते की, जपानने पाश्चात्य ज्ञान लवकर आत्मसात करून स्वतःत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला व शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणली होती. एवढेच नाही तर जपानमध्ये सुरू झालेल्या स्थित्यंतराचा प्रभाव सुरूवातीला पुरूषांवरच जाणवत होता म्हणून स्त्रियांच्या उद्धारासाठी जपानी लोकांनी स्वतंत्र

महिला विद्यापीठाची स्थापना केली होती. महर्षी कर्वेना भारताची परिस्थिती जपान सारखीच वाटत होती. त्यामुळे भारतातही महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ असावे व या विद्यापीठाच्या माध्यमातून स्त्रियांना उच्च शिक्षण दिले जावे असे विचार त्यांनी मांडलेले होते.

महर्षी कर्वे यांनी जपानी महिला विद्यापीठाच्या पुस्तिकेचा अभ्यास करून त्यातील काही महत्त्वाच्या तत्त्वांवर सखोल विचार केलेला होता. अनेक महत्त्वाची तत्त्वे त्यांना त्या पुस्तिकेत अभ्यासण्यास मिळाली होती. यात 'वर्तमान कालिन स्त्री वर्गाच्या शारीरिक व मानसिक स्थितीला अनुरूप होईल असा अभ्यासक्रम तयार करणे' या तत्त्वास महत्त्व देण्यात आलेले होते. जपान देशातील शिक्षणतज्ज्ञांना स्त्रीमुक्ती सारख्या चळवळी सुरू करून त्यांना समाजात त्या दूर्बल आहेत हे दाखविणे मान्य नव्हते. याउलट स्त्री एक समाजातील घटक आहे असे समजून तिला शिक्षण देऊन स्वयंपूर्ण करणे हे तत्त्व जपानी विद्यापीठास मान्य होते. याच पुस्तिकेत स्त्रियांच्या शिक्षणाविषयी प्रमुख तीन उद्दिष्टे सांगितलेली होती. ही तीन उद्दिष्टे पुढील प्रमाणे होती, "The principles, which shall govern us in educating women, are : first, to educate them as human beings, personalities; secondly, to educate them as women in order to fit them to become good wives and wise mothers; and thirdly to educate them as members of the nation so that they may always remember that their lives at home are related in an important manner, however hidden, to the prosperity or decay of the nation."[१६] म्हणजेच जपानी विद्यापीठास प्रमुख्याने स्त्रियांना मानवजातीचे घटक म्हणून शिक्षण देणे, सुपत्नी व सुमाता होण्याच्या दृष्टीने त्यांना शिक्षण देणे त्याचबरोबर राष्ट्राचा एक घटक म्हणून त्यांना शिक्षण देणे अशी उद्दिष्टे अभिप्रेत होती. असे केल्यामुळे कुटुंब, समाज व देश या सर्वांप्रती आपले काही कर्तव्य असते याची जाणीव स्त्रियांना होईल अशी या विद्यापीठाची भूमिका होती. या तीन तत्त्वांचा विशेष प्रभाव महर्षी कर्वेंच्या शिक्षण विचारांवर पडल्याचे दिसून येते. महर्षी कर्वेना जपानी विद्यापीठाचे हे तत्त्वज्ञान पटलेले होते म्हणून त्यांनी भारतामध्ये सर्वप्रथम अशा प्रकारचे पहिले महिला विद्यापीठ स्थापन करण्याच्या कामी पुढाकार घेतलेला होता.

### ३) महिलांच्या विद्यापीठीय शिक्षणाची उद्दिष्टे

महर्षी कर्वेनी जपानी महिला विद्यापीठाच्या पुस्तिकेचा सांगोपांग अभ्यास केलेला होता व त्या अभ्यासातून त्यांनी महिलांना स्वतंत्र विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षण का द्यायचे? याविषयी चिंतन केलेले होते. आपल्या अभ्यासातून त्यांनी काही महिला विद्यापीठीय शिक्षणाची उद्दिष्टे सांगितलेली होती.

**जबाबदार स्त्री निर्माण करणे:** महर्षी कर्वेनी स्वतंत्र विद्यापीठाची व उच्च शिक्षणाची स्त्रियांसाठी आवश्यकता का आहे हे सांगताना पहिले उद्दिष्ट जबाबदार स्त्री निर्माण करणे हे सांगितलेले होते. या अनुषंगाने त्यांनी सांगितलेले होते की, "आपण जबाबदार मानवी व्यक्ति आहों ही भावना व आपल्या सामर्थ्याविषयीं आत्मविश्वास ज्याच्या योगानें उत्पन्न होईल असें पुरूषसामान्य शिक्षण स्त्रियांना देणें."[१७] कर्वेच्या मते पुरूषांमध्ये ज्या प्रमाणे शिक्षणाने समाजाच्या प्रती एक प्रकारची जबाबदारी निर्माण होते तशाच प्रकारे स्त्रियांना स्वतंत्र शिक्षण दिले जावे ज्यामुळे त्यांच्यातही जबाबदारी निर्माण होईल. ज्या व्यक्तीला स्वतःची जबाबदारी कळते त्या व्यक्तीला त्याच्या हक्क व कर्तव्यांची जाणीव असते. यामुळे अशा प्रकारचे शिक्षण दिले गेल्याने स्त्रियांना त्यांच्या हक्क व कर्तव्यांची जाणीव होईल असे त्यांना वाटत होते.

**कुटुंबसंस्था सुदृढ करणे:** स्त्री ही कुटुंब संस्थेतील महत्त्वाचा घटक असते. कुटुंबाचे सर्व अस्तित्त्व हे स्त्रीच्या कार्यतत्परतेवर अवलंबून असते. त्यामुळे महिलांच्या विद्यापीठातून स्त्रीला अशा प्रकारचे शिक्षण मिळावे ज्यामुळे त्यांची कुटुंबीयांविषयीची जबाबदारी कळू शकेल व भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरलेली कुटुंबसंस्था अबाधित राहू शकेल. या अनुषंगाने ते लिहितात की, "आपल्या देहाचे घटक ज्याप्रमाणें भिन्न भिन्न पेशी, त्याप्रमाणें समाज किंवा राष्ट्ररूप देहाचे घटक जीं कुटुंबे तीं जोमदार व मनोहर बनविणें मुख्यतः कुटुंबाच्या सुत्रधार ज्या स्त्रिया त्यांजवर अवलंबून आहे. कुटुंब ही संस्था डळमळीत होईल अशी प्रवृत्ति स्त्रीवर्गात उत्पन्न होऊं देणें राष्ट्राला विघातक आहे, तेव्हां कुटुंबें, इंग्रजीत Home ह्या शब्दांत किंवा 'गृहिणी गृहमुच्यते' या वाक्यांत जो गर्भित अर्थ सांठविला आहे

तशीं बनविण्याचें सामर्थ्य ज्या शिक्षणाच्या योगानें स्त्रियांमध्यें उत्पन्न होईल, असें शिक्षण त्यांना देणें."[१८] म्हणजेच महर्षी कर्वे कुटुंब संस्थेला देशाचा एक महत्त्वाचा घटक मानीत होते. ज्याप्रमाणे शरीरासाठी पेशी महत्त्वाच्या असतात त्याप्रमाणेच देशासाठी या कुटुंबसंस्था उपयुक्त असतात. जर कुटुंबसंस्था ढासळली तर राष्ट्राला विघातक असे वातावरण निर्माण होईल त्यामुळे कुटुंबसंस्था टिकविण्याची क्षमता ज्या शिक्षणाने निर्माण होईल असे शिक्षण मिळणे आवश्यक आहे असे महर्षी कर्वेंना वाटत होते.

कर्वेंच्या कालखंडाचा विचार करता शेकडा ९० एवढया स्त्रिया नोकरी मिळविण्यासाठी किंवा आर्थिक फायदा मिळविण्यासाठी शिक्षण घेत नव्हत्या. जेवढा विरोध त्याकाळी स्त्रियांच्या शिक्षणाला होता त्यापेक्षा अधिक विरोध स्त्रियांनी नोकरी करण्याला होता. त्यामुळे महर्षी कर्वेंना असे वाटत होते की, जरी हे शिक्षण स्त्रियांना नोकरी मिळविण्यासाठी नसले तरी किमान कुटुंबात कसे वागावे, व प्रापंचिक जबाबदाऱ्या याचे ज्ञान या शिक्षणातून मिळावे. म्हणजेच कुटुंबसंस्था मजबूत करणे हे निश्चितच उच्च्य शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. कर्वेंचे विचार आजही तेवढेच संयुक्तिक वाटतात. तत्कालीन स्त्री शिक्षण व आजचे स्त्री शिक्षण यामध्ये एक फरक निश्चित जाणवतो तो म्हणजे आज नोकऱ्यांच्या उद्देशाने स्त्रिया शिक्षण घेताना दिसतात. परंतु नोकरी करत असल्यामुळे स्त्रीचे कुटुंबातील स्थान कमी महत्त्वाचे आहे असे नाही. त्यामुळे आजच्या एकविसाव्या शतकातही स्त्रीला कुटुंबसंस्था टिकविण्याचे शिक्षण मिळणे आवश्यक आहे असे दिसून येते.

**राष्ट्राचा घटक आहोत अशी भावना निर्माण करणे:** महर्षी कर्वेंच्या मते स्त्रियांमध्ये कुटुंब व समाज यांच्याविषयी जबाबदारीची भावना निर्माण करणे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच स्त्री एक राष्ट्राचीही घटक आहे अशी भावना निर्माण होणे महत्त्वाचे होते. हे उद्दिष्ट स्पष्ट करताना त्यांनी लिहिले होते की, "आपण राष्ट्राचा घटक आहों ही भावना ज्या शिक्षणानें उत्पन्न होईल असें शिक्षण स्त्रियांना दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें मुलांमुलींच्या कोंवळया अन्तःकरणांत, राष्ट्रीय भावनांचें बीज पेरणें, राष्ट्रांतील साधुसंतांविषयीं पूज्यबुद्धि व पराक्रमी पुरूष (युद्धांत पराक्रम दाखविणारेच केवळ नव्हत) आणि तेजस्विनी स्त्रिया यांच्याबद्दल आदर उत्पन्न करणें हें अत्यंत

नाजूक व पवित्र कर्तव्य राष्ट्रांतील आयांचें आहे. हें कर्तव्य उत्कृष्ट रीतीनें बजावण्याचें सामर्थ्य ज्या शिक्षणानें अंगी येईल असें शिक्षण त्यांना देणें."[१९] म्हणजेच महर्षी कर्वेंना स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या उच्च शिक्षणातून राष्ट्रीय वृत्ती निर्माण करणे अभिप्रेत होते. आपण ज्या देशात राहतो त्या देशाविषयी देशाभिमान निर्माण करणे तसेच देशाचा जो सांस्कृतिक, ऐतिहासिक, साहित्यिक, संत परंपराविषयक, व विविध भूषणावह बाबींविषयक जो वारसा आहे त्याबद्दल अभिमान निर्माण करणे या शिक्षणाचे उद्दिष्ट आहे असे त्यांना वाटत होते.

**देशाच्या प्रगतीसाठी स्वतंत्रवृत्तीने काम करणाऱ्या स्त्रियांचा वर्ग तयार करणे:** महर्षी कर्वे यांच्या मते समाजामध्ये थोडया संख्येने का होईना असा एक स्त्रियांचा वर्ग असतो की, जो प्रचलित पद्धतीच्या विवाहबंधनात आडकण्यापेक्षा स्वतंत्रवृत्तीने देशाच्या विकासासाठी किंवा समाजाच्या भल्यासाठी काहीतरी काम करण्याची उमेद बाळगणारा असतो. अशा स्त्रियांना आपल्या बुद्धिमत्तेनुसार देश किंवा समाज हिताचे योग्य ते कार्य करण्याकरिता उपयुक्त असे शिक्षण मिळणे आवश्यक असते. असे शिक्षण उच्च किंवा विद्यापीठीय शिक्षणातून मिळावे असे महर्षी कर्वेंना अभिप्रेत होते. या अनुषंगाने ते म्हणतात की, "कांही कारणांनी आपण संसारांत पडूं नये, असें ज्या स्त्रियांना वाटत असेल त्यांनीं आपआपलीं ध्येयें ठरवून तीं ध्येयें साध्य होण्याला ज्या शिक्षणाची जरूर असेल, तें शिक्षण त्यांनीं अवश्य घ्यावें व आपली कर्तव्याची दिशा ठरवावी. अशा स्त्रियांचा लहानसा वर्गहि राष्ट्राच्या स्थैर्याला व प्रगतीला आवश्यक आहे. स्त्रियांनीं अमुक करावें किंवा तमुक करूं नये अशा रीतीचे कायद्यानें किंवा समाजानें घातलेले निर्बंध साफ काढून टाकिले पाहिजेत. ह्या संबंधांत पुरूषांचे व स्त्रियांचे हक्क समान असावेत. कोणत्याहि स्त्रीला अमुक विद्या आपण शिकावी किंवा अमुक उद्योग आपण करावा असें वाटेल तर कायद्याचीं अगर समाजाचीं बंधने तिच्या मार्गात आडवीं येऊं नयेत. तथापि समाजस्थैर्यासाठीं किंवा त्यांच्या शारीरिक व मानसिक घटनेचा विचार करितां सामान्यतः स्त्रियांनीं कोणतें शिक्षण घ्यावें व कोणते उद्योग करावे ह्याविषयींचा विचार होणें अत्यंत जरूरीचें आहे. सर्व प्रकारच्या विचारांना वाव मिळाला पाहिजे व त्या विचारांचें कृतींत प्रतिबिंब उठविणारीं त्या विचारांना वाहिलेलीं माणसें पाहिजेत. अशा विचारांच्या व कृतींच्या

झगडयांतूनच उत्क्रान्तीची वाट गेलेली आहे."[२०] कर्वेंच्या मते ज्या स्त्रियांना स्वार्थत्यागी बनून देश सेवा करण्याची इच्छा असते त्यांना योग्य विचारांचे पाठबळ मिळणे आवश्यक असते. हे पाठबळ मिळवून देणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असते. अनेकदा काही व्यक्तींना समाजहितासाठी काही तरी करावे असे मनोमन वाटत असते परंतु काय करणे संयुक्तिक ठरेल असा संभ्रम असतो. उच्च शिक्षणाने अशा योग्य विचारांचे पर्याय आपल्यासमोर खुले होतात व आपल्यातील बुद्धिमत्ता व उपलब्ध परिस्थितीनुरूप योग्य ते कार्य आपल्याला हाती घेता येणे शक्य होते.

एकूणच विचार करता महर्षी कर्वेंनी सर्वसामावेशक अशा दृष्टिकोनातून स्त्रियांच्या उच्च शिक्षणाचा विचार केलेला होता. त्यांना शिक्षणातून केवळ एक इयत्ता पास होऊन पुढच्या वर्गात जाणे एवढा मर्यादित अर्थ अभिप्रेत नव्हता. वर उल्लेखिलेली सर्व उद्दिष्टे साधली जावीत याच दृष्टिकोनातून त्यांनी पहिले महिला विद्यापीठ स्थापन केलेले होते.

## ४) महिलांच्या स्वतंत्र पद्धतीच्या शिक्षणाविषयी महर्षी कर्वेंचे विचार

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी स्वतंत्र पद्धतीने शिक्षण सुरू करणे आवश्यक आहे असे सुचविले होते. त्याकाळी स्त्रियांना सहशिक्षण असावे की स्वतंत्रपणे त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी याविषयी अनेक तत्त्ववेत्त्यांनी मते मांडलेली होती. महर्षी कर्वे यांनी विविध पाश्चात्य तत्त्ववेत्ते, मानववंश शास्त्रज्ञ यांच्या विचारांचा अभ्यास करून आपले स्वतःचे ठाम मत बनविलेले होते की, स्त्रियांना पुरूषांप्रमाणेच पुरूषांच्याच विद्यापीठात शिक्षण न देता स्वतंत्र पद्धतीने शिक्षण दिले जावे. त्यांच्यामते स्त्री ही पुरूषांपेक्षा मानसिक व शारीरिकदृष्टया भिन्न आहे त्यामुळे दोघांच्याही शिक्षणासाठी एकाच प्रकारच्या अभ्यासक्रमाची योजना करणे चुकीचे आहे. याबाबतीत महर्षी कर्वेंचे शैक्षणिक विचार लोकमान्य टिळकांच्या विचारांशी मिळतेजुळते दिसतात. लोकमान्य टिळकांनीही स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता, परंतु जे शिक्षण पुरूषांना दिले जाते तेच स्त्रियांना देण्याबाबतीत मात्र त्यांचाही विरोध होता. पुरूषांची व स्त्रियांची कर्तव्ये व कार्ये यात तफावत असते. त्यामुळे दोघांनाही सारखेच शिक्षण देऊन

चालणार नाही असे त्यांनी ठाम मत मांडलेले होते. "Tilak is of the opinion that there should be separate education for women that would make them better mothers, and better housewives. There is a lurking fear behind this position that the life-style of society would change by English education and by the imitation of western culture. He therefore rejects the concept of serving women and firmly believes that education plays a secondary role in women's life."[२१] महर्षी कर्वेनीही सुमाता व सुपत्नी निर्माण करणारे शिक्षण अशीच इच्छा स्त्री शिक्षणाच्या बाबतीत मांडलेली होती. म्हणजेच लोकमान्य टिळकांची जी स्त्री शिक्षणाविषयीची कल्पना होती तीच कल्पना महर्षी कर्वेचीही होती असे दिसून येते. आपल्या महिला विद्यालयाच्या माध्यमातून कर्वेनी ही कल्पना प्रत्यक्षातही आणलेली होती, तथापि एका बाबतीत भेद लोकमान्य टिळक व महर्षी कर्वे यांच्या विचारांच्या बाबतीत आढळतो तो म्हणजे, "Tilak's ideas about women's education were being brought into reality by Karve, but there was a basic difference in the view of these two thinkers. Karve believed that in terms of intellectual qualities, there is no difference between man and woman. They are equal yet their fields differ so should their curriculum. Another thing was that he wanted women to do jobs and become economically independent, the idea Tilak would never tolerate"[२२] यावरून स्पष्ट दिसून येते की, महर्षी कर्वे यांचे विचार लोकमान्य टिळकांच्या विचारांपेक्षा काही बाबतीत भिन्न होते. महर्षी कर्वेनी जरी टिळकांसारखाच स्त्रियांच्या स्वतंत्र शिक्षणाचा पुरस्कार केलेला असला तरीही कर्वे पुरूष व स्त्रिया यांच्या हुशारीच्या बाबतीत कुठलाही फरक नाही असे मानणारे होते. याशिवाय स्त्रियांनी चरितार्थ चालविण्यासाठी नोकरी केली तरी चालेल अशा विचारांचे ते होते.

महर्षी कर्वे यांच्या मते मुले व मुली यांची शारीरिक व मानसिक वाढ ही भिन्न असते. त्यामुळे त्यांच्या शिक्षणक्रमात बदल असणे अत्यावश्यक आहे. जी शिक्षणपद्धती व परीक्षापद्धती मुलांना डोळयासमोर ठेवून तयार केलेली असते ती शिक्षणपद्धती मुलींसाठी वापरणे एक प्रकारची निष्ठुरताच आहे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ असणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या या विचारांवर अनेकांनी टीकाही केलेली होती त्याचबरोबर काहींनी त्यांच्या विचारांचे समर्थन केलेले होते.

अनेकांच्यामते जर मुंबईसारख्या विद्यापीठातून स्त्री व पुरूष अशा दोघांच्याही शिक्षणाची व्यवस्था आहे तर स्वतंत्र महिला विद्यापीठाची आवश्यकताच नव्हती. 'दि इंडियन सोशल रिफॉर्मर' या वर्तमानपत्रात पुढील प्रकारची टीका देण्यात आलेली होती. "We are opposed, and have been so long, to the idea of a separate University for Women. The sole object of a University is the promotion and advancement of learning. There is no sex in knowledge."[२३] म्हणजेच टीकाकारांच्या मते ज्ञान ही बाब स्त्री पुरूष भेद मानीत नाही. ज्ञानापुढे सर्व समान असतात. त्यामुळे स्त्रियांसाठी वेगळया शिक्षणक्रमाची आवश्यकता नाही. अर्थात टीका झालेली असली तरीही या विद्यापीठाने शतकोत्तर वाटचाल केलेली आहे. आजच्या काळात एस.एन.डी.टी. विद्यापीठ हे केवळ महिलांकरीता शिक्षण देणारे मुंबईतील एक महत्त्वाचे विद्याकेंद्र आहे.

महर्षी कर्वे यांनी स्वतंत्र उच्च शिक्षणाची व्यवस्था स्त्रियांसाठी केलेली असली तरी त्यांच्या मते ज्यांना हा शिक्षणक्रम आवडणार नाही त्यांनी प्रचलित सहशिक्षणाच्या पद्धतीनुसार शिक्षण घेतले तरी चालेल असे त्यांनी सुचविले होते. सरकारी विद्यापीठांचे आकर्षण काही स्त्रियांना असणे स्वभाविक होते. त्यामुळे अशा स्त्रिया पुरूषी विद्यापीठातही जाऊ शकतील, परंतु केवळ बुद्धिमान स्त्रियांनी पुरूषांसाठीच्या विद्यापीठात शिकले पाहिजे असेही नाही. स्त्रियांच्या विद्यापीठातही उच्च प्रतीचे व उपयुक्त ज्ञान त्यांना संपादित करता येऊ शकेल असा त्यांचा विश्वास होता.

## ५) महर्षी कर्वे यांचे अभ्यासक्रमविषयक विचार

महर्षी कर्वेनी स्वतंत्र महिलांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला होता. त्या अनुषंगानेच महिलांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम असावा असेही त्यांनी सूचित केलेले होते. त्यांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणाची जी उद्दिष्टे सांगितलेली होती 'स्वतःच्या पायावर उभे करणे, सुपत्नी व सुमाता होण्याची पात्रता निर्माण करणे, स्त्री मानवजातीचा घटक आहे असे समजून शिक्षण देणे, जबाबदार स्त्री निर्माण करणे, कुटुंबसंस्था सदृढ करणे, राष्ट्रीय घटक आहे याची जाणीव, व सेवाभावी वृत्ती निर्माण करणे' या उद्दिष्टांची पूर्तता होईल असा अभ्यासक्रम स्त्रियांच्या

शिक्षणात असावा असे त्यांचे मत होते. महर्षी कर्वे यांनी लेडी आयर्विन यांनी जे महिलांच्या अभ्यासक्रमाविषयी मत मांडलेले होते त्याचा पुरस्कार केलेला होता. लेडी आयर्विन यांनी आपल्या भाषणात सांगितलेले होते की, "What we should aim to give them is a practical knowledge of domestic subjects and laws of health which will enable them to fulfil one side of their duties as wives and mothers, reinforced by a study of those subjects which will help most to widen their interests and outlook."[२४] म्हणजेच स्त्रियांना दिले जाणारे ज्ञान हे गृहविषयक व आरोग्य विषयक असावे म्हणजे पत्नी व माता या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्या स्त्रिया पार पाडू शकतील. याबरोबरच या विषयांना जोडून स्त्रियांचा दृष्टिकोन व्यापक बनविणारे इतर काही विषय अभ्यासक्रमात ठेवले पाहिजेत असे विचार यातून दिसून येतात. एकूणच विचार करता असे लक्षात येते की, स्त्री शिक्षणाचा अभ्यासक्रम हा परीक्षांच्या माध्यमातून स्पर्धा निर्माण करणारा न ठेवता तो कौटुंबिक जबाबदाऱ्यांविषयी जाणीव निर्माण करणारा असावा असे कर्वे यांना वाटत होते. गृहसंबधी येणाऱ्या सर्वच माहितीचा या अभ्यासक्रमामध्ये समावेश असावा. या विचारास अनुसरूनच कर्वेनी स्थापन केलेल्या महिला विद्यालयात अभ्यासक्रम ठेवण्यात आलेला होता. "मराठीचे चांगले ज्ञान, इंग्रजी व संस्कृतची तोंडओळख, व्यवहारापुरते गणित, जमाखर्च, बाल-संगोपन, आरोग्य-शास्त्र, आहार-शास्त्र, आजाऱ्याची शुश्रूषा, गृहव्यवस्था, पाकशास्त्र एवढयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला."[२५] अशा प्रकारचा अभ्यासक्रम महिला विद्यालयाचा ठेवण्यात आलेला होता.

ज्या पद्धतीने महिला विद्यालयाचा अभ्यासक्रम त्यांनी उद्दिष्टांना अनुसरून ठेवलेला होता त्याचप्रमाणे महिला विद्यापीठाचाही अभ्यासक्रम तशाच पद्धतीचा ठेवलेला होता. केवळ उच्च वर्गानुसार अभ्यासक्रमाची व्यापकता वाढविलेली होती. या विद्यापीठाची विविध वैशिष्टये सांगताना कर्वेनी अभ्यासक्रमाविषयीही माहिती दिलेली होती. या अनुषंगाने ते म्हणतात की, "महिला विद्यापीठ ह्या नांवावरूनच स्त्रियांच्या दृष्टीनें विचार करून योग्य दिसेल तो अभ्यासक्रम यांत ठेवण्याचा हेतु स्पष्ट दिसतो. म्हणूनच प्रपंचशास्त्र आणि आरोग्यशास्त्र हा

विषय सर्व परीक्षांतून आवश्यक ठेविला आहे. ह्या विषयाच्या अंगत्वानेंच वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, शरीररचनाशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र व विशेषतः मुलांच्या मनोव्यापारांची मीमांसा ह्या विषयांचीं मूळ तत्त्वें शिकविली जातात. समाजशास्त्र हा विषय आवश्यक ठेविला आहे व गायनवादन आणि चित्रकला ह्या विषयांचाहि समावेश झाला आहे."[२६] त्यांनी सांगितलेले हे सर्व विषय गृहस्थी चालविण्यामध्ये उपयुक्त ठरतील असेच असल्याचे दिसते. कुटुंबातील सर्व सदस्यांच्या आरोग्यास अनुसरून विविध आजारांची माहिती होण्यासंबंधी आरोग्यशास्त्र, परस्परांतील सामंजस्य व वागण्याच्या रितीभाती कळाव्यात यासाठी मानसशास्त्र, मुलांच्या चांगल्या संगोपनासाठी बालमानसशास्त्राचा अभ्यास याशिवाय फुरसतीच्या काळातील मनोरंजनात्मक शिक्षण त्यामध्ये गायनवादन व चित्रकला अशा प्रकारे एकूणच सर्व समावेशक अभ्यासक्रम त्यांनी सुरू केलेला होता.

**अभ्यासक्रमाचे माध्यम**

त्याकाळी प्राथमिक शिक्षण देशीय भाषेत किंवा इंग्रजी माध्यमातून शिकण्याची सुविधा होती. परंतु उच्च शिक्षणाचे माध्यम मात्र केवळ इंग्रजीच असायचे. ब्रिटिशांनी भारतात सुरू केलेल्या शिक्षण पद्धतीचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणून इंग्रजी भाषेला विशेष महत्त्व प्राप्त झालेले होते. इंग्रजी ही भाषा जागतिक भाषा असल्यामुळे तिला ज्ञान भाषा म्हणून मान्यता मिळालेली होती. त्याच बरोबर बहुसंख्य पुस्तके ही इंग्रजी भाषेतूनच उपलब्ध होत होती. ब्रिटिशांनी भारतीयांवरही या इंग्रजी भाषेचे प्राबल्य शिक्षणाच्या माध्यमातून लादलेले होते. महर्षी कर्वे यांना उच्च शिक्षणाच्या अभ्यासातील हे इंग्रजीचे प्राबल्य योग्य वाटत नव्हते. मुळात त्याकाळी अनेक लोक इंग्रजीच्या भीतीमुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत होते. हे टाळण्यासाठी उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी ऐवजी मातृभाषा असावे असे विचार महर्षी कर्वेनी मांडलेले होते. इंग्रजी भाषा हे माध्यम असणे हा महर्षी कर्वेना तत्कालीन शिक्षण पद्धतीचा मोठा दोष वाटत होता. या अनुषंगाने ते म्हणतात की, "आपल्या शिक्षणपद्धतींतील मोठा दोष, जो जगात दुसऱ्या कोठेंहि सापडणार नाहीं तो, म्हटला म्हणजे इंग्रजी भाषेला दिलेलें फाजील महत्त्व व मातृभाषेची हेळसांड हा होय. सत्तर वर्षांपूर्वी जेव्हां युनिव्हर्सिटयांना सुरुवात

झाली तेव्हां असें होणें साहजिक होतें. त्यावेळीं देशी भाषांची प्रगति तितकी झालेली नव्हती. तथापि त्यावेळीं देशी भाषांना जे उत्तेजन देण्यात येत होतें तें पुढें कमी झालें."[२७] त्यांच्या मते इंग्रजी भाषेला अवास्तव महत्त्व दिले गेलेले असल्यामुळे मातृभाषेकडे दुर्लक्ष होत होते. याचा तोटा असा होता की, इंग्रजी भाषेतून अभ्यासक्रम अतिशय अवघड व क्लिष्ट वाटत होता व त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या कमी होत असे.

महर्षी कर्वेंच्या मते ब्रिटिशांच्या अंमलापूर्वी वकील व डॉक्टर यासारख्या परीक्षाही मराठी भाषेत होत असत तरीही चांगल्या दर्जाचे वकील व डॉक्टर या परीक्षा पास होऊन तयार होत होते. ब्रिटिशांनी मात्र इंग्रजी भाषेला महत्त्व देऊन देशी व मातृभाषांचे महत्त्व कमी केलेले होते. कर्वेंच्या मते ब्रिटिशांनी इंग्लंडमध्ये जसा इंग्रजी माध्यमाचा स्वीकार केला तसाच भारतातही इंग्रजी माध्यमाचाच स्वीकार केलेला होता. परंतु यात महत्त्वाची गोष्ट अशी की, इंग्रजी ही ब्रिटिशांची मातृभाषा असल्यामुळे त्यांना हे माध्यम योग्य होते, परंतु भारतीयांची जर मातृभाषा इंग्रजी नसेल तर त्यांना इंग्रजी हे माध्यम कसे उपयुक्त ठरणार? महर्षी कर्वेंच्या मते त्याकाळी शिकलेल्या व न शिकलेल्या अशा सर्वांनीच इंग्रजी भाषेचे महत्त्व अवास्तव वाढविलेले होते. समाजाची अशी धारणाच झालेली होती की, जे इंग्रजी भाषेत आहे ते सर्व चांगले व जे इंग्रजी भाषेत नाही ते सर्व टाकाऊ आहे. हे विचार महर्षी कर्वे यांना पटत नव्हते.

भाषावार प्रांत रचनेनुसार महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन अर्धे शतक लोटलेले असताना अजूनही अनेक महाराष्ट्रीयन लोक इंग्रजी मानसिकतेतून बाहेर आलेले नाहीत. अजूनही इंग्रजी माध्यमातून शिकलेल्यांनाच अधिक मान समाजात मिळताना दिसतो. वास्तविक विचार केला तर मातृभाषा हेच मुलाच्या बद्धिमत्तेस पूर्ण वाव देणारे शिक्षणाचे माध्यम आहे, असे जगभरातले शिक्षण शास्त्रज्ञ कितीतरी ओरडून सांगत आले असले तरी आज स्पर्धेच्या जगात आपले पाल्य मातृभाषेत शिकल्यास पुरेसे श्रीमंत होणार नाही या शंकेने पछाडलेल्या पालकांना व सरकारला ही गोष्ट चांगली लक्षात आलेली दिसत नाही. आजच्या शिक्षणातील वस्तूस्थिती पाहिली तर स्थानिक भाषेत शिक्षण देणाऱ्या शाळा बंद पडताहेत आणि इंग्रजी व महागडया शाळा वाढताहेत.[२८] आजच्या शहरी महाराष्ट्राची निश्चितच हीच परिस्थिती आहे.

महर्षी कर्वेनी मात्र मातृभाषेचे महत्त्व ओळखून सर्व विषयांचा अभ्यासक्रम मराठी भाषेतून ठेवलेला होता व इंग्रजी हा विषय अत्यावश्यक विषय म्हणून ठेवलेला होता. त्यांनी मांडलेल्या या मातृभाषेतून शिक्षणाच्या कल्पनेची रविंद्रनाथ टागोर व महात्मा गांधी यांनीही स्तुती केलेली होती. रविंद्रनाथ टागोरांनी आपल्या पत्रात कर्वेना लिहिले होते, "I am greatly interested in your proposal for a Women's University where education should be given through the vernaculars."[२९] मातृभाषेतून शिक्षण दिले गेले तरच ते खऱ्या अर्थाने राष्ट्रीय शिक्षण होऊ शकेल.

महर्षी कर्वे यांच्या मते देशी भाषेतून शिक्षण पद्धतीचे निश्चित असे काही फायदे होते. मातृभाषेवर आपले प्रभूत्त्व असते. त्यामुळे त्या भाषेतून आपल्याला आपले विचार प्रभावीपणे व्यक्त करणे सहज सोपे जाते. जी परकीय भाषा असते त्या भाषेची प्रमुख कौशल्ये शिकून नंतर पुढील अभ्यासक्रमाचा विचार करावा लागतो. त्यामुळे काही ठराविक कार्याची जबाबदारी आपण मातृभाषेतील माध्यमाच्या शिक्षणाने प्रभावीपणे पार पाडू शकतो. या बाबतीत आपल्या आत्मवृत्तात ते लिहितात की, "वर्तमानपत्रांतून अगर मासिकांतून लेख लिहिणें, सभांतून भाषणें करणें, आपल्या जबाबदारीवर कांही कामें अंगावर घेऊन तीं चालविणें वगैरे गोष्टींत महिलाविद्यापीठाच्या पदवीधर स्त्रिया इतर विद्यापीठाच्या पदवीधर स्त्रियांहून रतिमात्र कमी पडणार नाहींत; किंबहुना ह्या कामीं मातृभाषेचा विशेष अभ्यास झाल्यानें व सर्व विषय मातृभाषेंतून शिकल्यानें महिलाविद्यापीठाच्या पदवीधरांनाच या कामीं अधिक पात्रता येऊं शकेल. इंग्रजींतून सर्व विषय शिकून व पुरूषांप्रमाणेंच सर्व शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या हिंदु पदवीधर स्त्रियांनीं इंग्रजी भाषणें केलीं आहेत अगर लेख लिहिले आहेत असें फारसें आढळत नाहीं."[३०] त्यांच्या या विचारातून असे दिसून येते की, मातृभाषेतून शिक्षणानेच भाषण, संभाषण, वर्तमानपत्रातील लेख लिहिणे यासारखी कौशल्य प्राप्त होऊ शकतात. इंग्रजी माध्यमामुळे केवळ काही हुशार मुलांनाच या गोष्टी करता येणे शक्य होते. याशिवाय मराठी माध्यमाचे काही इतरही फायदे होते ते म्हणजे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सोपा वाटतो, शिक्षणात गोडी वाढते व देशी भाषेत अभ्यासक्रम असल्यामुळे देशाभिमान निर्माण

होतो. याचबरोबर मातृभाषेतील वाङ्‌मय अभ्यासल्यामुळे आपल्या संस्कृतीची चांगली ओळख निर्माण होते.

आजच्या काळाचा विचार करता शहरी भागात जरी अनेक मुले इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत असले तरीही मराठी माध्यमात शिकणारांची गर्दी जास्त असल्याचे दिसते. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील मुले मराठी हेच माध्यम पसंत करतात कारण त्यांना इंग्रजी हे माध्यम पेलवणे कठीण वाटते.

## इंग्रजी भाषा विषयक विचार

महर्षी कर्वेंनी मातृभाषेतून उच्च शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता असे जरी असले तरीही त्यांना इंग्रजी भाषेचा तीरस्कार होता असे नव्हते. इंग्रजी भाषेचे महत्त्व त्यांना माहीत होते. याच अनुषंगाने त्यांनी या विषयास विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात सक्तीचा विषय म्हणून स्थान दिलेले होते. त्यांच्या मते इंग्रजी ही भाषा जागतिक भाषा असल्यामुळे निश्चितच तिचा ज्ञान भाषा म्हणून उपयोग आहे. विविध ज्ञान शाखांवर अधारित पुस्तके इंग्रजी भाषेंमधून उपलब्ध होतात त्यामुळे इंग्रजीचे महत्त्व सांगतांना कर्वे यांनी लिहिले होते की, "उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना ज्ञानाचे दरवाजे मोकळे झाले पाहिजेत. आज तरी इंग्रजी किंवा दुसऱ्या कोणत्यातरी युरोपिअन भाषेवांचून हें होऊं शकत नाहीं. इंग्रजी भाषा ही आज अर्ध्या जगाचीं भाषा झाली आहे. कोणत्याहि विषयाचें विशेष ज्ञान करून घ्यावयाचें असलें अगर कोणत्याहि गोष्टीची विशेष माहिती पाहिजे असेल तर ती आज इंग्रजीच्या ज्ञानावांचून होणें शक्य नाहीं. फार काय आपल्या देशांतील पुढाऱ्यांची भाषणें प्रत्यक्ष ऐकणें अगर त्यांच्याशी संभाषण करणें तेंहि इंग्रजीवांचून आज होऊं शकत नाहीं."[३१] याच हेतूने महर्षी कर्वे यांनी इंग्रजी विषयाचा समावेश अत्यावश्यक भाषा विषय म्हणून केलेला होता. म्हणजेच विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिकण्याची मुभा असली तरीही इंग्रजी भाषेचा अभ्यास अवश्य केला पाहिजे असे विचार त्यांनी मांडलेले दिसून येतात.

**बहिस्थ पद्धतीने अभ्यासक्रम अभ्यासण्याची सुविधा**

महर्षी कर्वेना कोणत्याही कारणास्तव स्त्रियांच्या शिक्षणात खंड पडू नये असे वाटत होते. तत्कालीन कालखंडात अनेक कारणांसाठी मुलींना शाळेत पाठविणे किंवा वसतिगृहात ठेवणे टाळले जायचे व त्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडायचा. अशा स्त्रियांसाठी बहिःस्थ पद्धतीने परीक्षांना बसण्याची सवलत असावी असे विचार त्यांनी मांडलेले होते. ज्या स्त्रियांना नियमित विद्यालयात येता येणार नाही अशा स्त्रियांनी घरीच अभ्यास करून केवळ परीक्षेला बसावे म्हणजे त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. एवढेच नाही तर विद्यापीठांनी विद्यार्थिनी ज्या ठिकाणची रहिवासी आहे तेथेच परीक्षा केंद्राची व्यवस्था करावी असेही त्यांनी सुचविले होते. परीक्षा केंद्र दूर असेल तर अनेक कारणांनी परीक्षा केंद्रापर्यंत पोहचता येत नाही किंवा उशीर होतो व त्यामुळे परीक्षा बुडून शैक्षणिक नुकसान होते. स्वतः कर्वेना सहावीच्या परीक्षेच्यावेळी परीक्षेचे केंद्र दूर असल्याकारणाने वेळेत न पोहोचता आल्यामुळे परीक्षा देता आली नव्हती.

## ६) महर्षी कर्वेचे ब्रिटिश सरकारच्या शैक्षणिक धोरणाविषयी विचार

महर्षी कर्वे हे पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार करणारे होते. त्यांच्या मते पाश्चात्य शिक्षणाशिवाय देशाची उन्नती साधने कठीण होते. परंतु ब्रिटिशांनी ज्या पद्धतीने शिक्षणाची अंमलबजावणी भारतात केलेली होती याविषयी मात्र कर्वेना खंत वाटत होती. या अनुषंगाने ते ब्रिटिश सरकारवर टीका करीत होते. त्यांच्या मते प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीने चांगल्या व सुनियोजित शिक्षणाची व्यवस्था करणे हे सरकारचे कर्तव्य असते परंतु ब्रिटिशांनी मात्र शिक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबीतून स्वतःचे अंग काढून घेण्याचा पद्धतशीर प्रयत्न केलेला होता. सुरूवातीला जरी ब्रिटिशांनी भारतीय शिक्षणाकडे लक्ष दिले असले तरीही नंतर मात्र त्यांनी दुर्लक्षच केले होते.

त्या कालखंडात ब्रिटिश सरकार माध्यमिक व उच्च शिक्षणावर अधिक खर्च करण्यास तयार नव्हते. ही बाब महर्षी कर्वेना योग्य वाटत नव्हती. सरकारतर्फे चालणाऱ्या माध्यमिक

शिक्षणाच्या खूप थोडया शाळा चालू होत्या. पुरूष शिक्षणाच्या बाबतीतच असे सरकारचे धोरण होते त्यामुळे स्त्रियांच्या शिक्षणाची अवस्था तर याहूनही बिकट होती असे कर्वेंना वाटत होते. ब्रिटिशांच्या अशा कर्तव्यहीन धोरणाविषयी कर्वेंनी लिहिले होते की, "आज स्त्रियांच्याहि माध्यमिक शिक्षणाकडे अधिक पैसा खर्च करण्याची सरकारची प्रवृत्ति नाहीं. सराकारनें इंग्रजी चार इयत्ता शिकविणारी पांच मिडलस्कुलें महाराष्ट्रांत व कर्नाटकांत मिळून ठाणें, नगर, नाशिक, विजापूर व धारवाड ह्या ठिकाणीं काढलीं आहेत. ह्यांतल्या कित्येकांनीं आम्हांला वर्षाचे आणखी सहाशें रूपये द्या म्हणजे आम्ही पांचवी इयत्ता काढतों अशा प्रकारची मागणी अनेक वेळां सरकारकडे केली पण ती मंजूर झाली नाहीं. ह्या शाळा आगोदरच निघाल्या होत्या. म्हणून त्या बंद करण्यांत आल्या नाहींत. हा प्रश्न जर वाढत्या खर्चाच्या नव्या मनूंत उत्पन्न झाला असता, तर अशा शाळा निघाल्याच नसत्या."[३२] याचाच अर्थ असा होतो की, महाराष्ट्र व कर्नाटक मिळून स्त्रियांच्या शिक्षणासाठी ब्रिटिशांनी केवळ पाच शाळा सुरू केलेल्या होत्या व त्याही केवळ चौथी पर्यंतच होत्या. पाचवीचे वर्ग सुरू करण्यासाठी लागणारे अनुदान मंजूर करण्याचाही मोठेपणा ब्रिटिश सरकारने दाखविला नव्हता. यावरून दिसून येते की, ब्रिटिश सरकारला त्यावेळी केवळ शिक्षणाच्या बाबतीत वेळकाढूपणा करायचा होता. कर्वेंच्या दृष्टीने मात्र स्त्रियांसाठी शिक्षण ही अत्यावश्यक बाब होती त्यामुळे उलट सरकारने या शाळांना अनुदान द्यावे व त्या महिला विद्यापीठांना जोडाव्यात असा उपाय सुचविलेला होता. त्यांच्या मते भारतातील महिला विद्यापीठांसारख्या खाजगी संस्थांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या कामी ब्रिटिश सरकारने सरकारी मान्यता देऊन त्यांना अनुदान सुरू करावे म्हणजे शिक्षणाची समस्या सुटू शकेल. त्यांच्या मते सरकारी अधिकाऱ्यांनी व सरकारने स्त्रियांच्यासाठी जे योग्य व उपयुक्त शिक्षण आहे त्या शिक्षणाकडे लक्ष देणे आवश्यक होते. जर तसे झाले नाही तर स्त्री शिक्षणाची प्रगती अशीच संथ गतीने चालू राहील.

## ७) स्त्री शिक्षण सुधारणेसाठी महर्षी कर्वे यांनी सुचविलेले उपाय

त्याकाळी स्वतंत्ररित्या स्त्री शिक्षणासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न होत नव्हते. केवळ काही समाजसुधारकांच्या माध्यमातूनच स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न होत होते. १८४८ मध्ये महात्मा

फुलेंनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली होती. तेव्हांपासून अर्धेशतक उलटले तरीही स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत विशेष प्रगती झालेली नव्हती. या परिस्थितीत सुधारणा होण्याच्या दृष्टीकोनातून महर्षी कर्वेनी काही उपाय सुचविलेले होते. एकोणिसाव्या शतकात वर्तमान पत्रांनी प्रबोधनाच्या कार्यात विशेष कामगिरी केलेली होती. महाराष्ट्रात केसरी, सुधारक, इंदूप्रकाश, सुबोध पत्रिका यासारखी वृत्तपत्रे विशेष प्रसिद्धीस आलेली होती. शैक्षणिक, सामाजिक व राजकीय सुधारणांमध्ये या वृत्तपत्रांचे विशेष महत्त्व असते. महर्षी कर्वेच्या मते केसरीसारख्या वृत्तपत्रांनी स्त्री शिक्षणाच्या कामी पुढाकार घेणे आवश्यक होते. "मुलांच्या शिक्षणासंबंधानें सरकारनें बरेंच मोठें काम केलें आहे. त्याचा फायदा मुलींच्या शिक्षणासाठीं करून घेणें हें कार्य शहाण्या व वजनदार लोकांनीं मनावर घेतल्यास बरेंच साधण्यासारखें आहे. पण या कामीं लोकमत तयार झालें पाहिजे. 'केसरी' सारख्या वर्तमानपत्रांनीं हें लोकमत बनविण्याचें काम हातीं घेतलें पाहिजे."[३३] कर्वेच्या दृष्टिकोनातून कोणत्याही चळवळीला चालना मिळविण्यासाठी ती चळवळ व चळवळीची तत्त्वे लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक असते. अशी तत्त्वे लोकांपर्यंत पोहचली की, आपोआपच लोकमत तयार होऊन चळवळीला अनुकूल वातावरण निर्माण होते. एका व्यक्तीला संपूर्ण समाजापर्यंत पोहचणे थोडेसे कठीण असते परंतु वर्तमानपत्रे मात्र अगदी कमी वेळेत कोणत्याही चांगल्या कामाला प्रसिद्धी मिळवून देऊ शकतात. त्यामुळे वर्तमानपत्रांनी याकामी पुढाकार घ्यावा असे महर्षी कर्वेना वाटत होते.

महर्षी कर्वेनी दुसरा महत्त्वाचा उपाय सुचविला होता तो म्हणजे मिशनरी लोकांसारखे प्रयत्न करणे. मिशनरी लोक जे धर्म प्रसाराच्या हेतूने भारतात आलेले होते ते प्रत्येक प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत धर्म प्रचारासाठी सेवाभावीवृत्ती जोपासत होते. महर्षी कर्वेच्या मते धर्म प्रचाराच्या हेतूने का होईना त्यांनी स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केलेले होते. भारतीय लोक स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करायचे सोडून केवळ मिशनऱ्यांना धर्मप्रचार करतात म्हणून दोष देत होते. असे करण्याऐवजी भारतीयांनीच चिकाटीने हे काम हाती घेणे गरजेचे होते असे त्यांना वाटत होते. कर्वेच्या मते "धर्मप्रसाराच्या हेतूनें त्यांच्यांत जें बळ उत्पन्न होत आहे, त्याहून अधिक

बळ स्वधर्मरक्षणाच्या हेतूनें आम्हांत उत्पन्न झालें पाहिजे. त्यांच्या शेजारीं आपली शाळा उत्पन्न होऊन सर्व मुली आपल्या शाळेंत येतात, व त्यांच्या शाळेंत जावयाला एकहि मुलगी शिल्लक राहात नाहीं असें होईल, तर तें स्वाभिमानवृत्तीला शोभेल."[३४] म्हणजेच त्यांच्या कार्याला विरोध करीत बसण्यापेक्षा त्यांच्या सारखीच चिकाटी ठेवून भारतीयांनी जर राष्ट्रीय शाळा सुरू केल्या तर स्त्री शिक्षणाचा प्रश्न उद्‌भवूच शकणार नाही असे कर्वेंच्या विचारांतून दिसून येते.

महर्षी कर्वेंनी पुढील पर्याय हा सुशिक्षित निस्वार्थी स्त्रियांचा सुचविलेला होता. त्यांच्या मते स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करून ज्या शाळा सुरू केल्या जातात त्या शाळा श्रीमंत लोकांच्या दानधर्मातून चालतात त्यामुळे अशा कामासाठी स्वयंसेवकांची नितांत आवश्यकता असते. अशा सुधारकांच्या प्रयत्नातून ज्या स्त्रियांना शिक्षण मिळालेले असते त्यातील काहींनी स्वतःच्या पायावर उभ्या राहून इतर असहाय्य स्त्रियांना शिक्षण मिळवून देण्यासाठी प्रयत्न करून आपले उत्तरदायित्त्व दाखविले पाहिजे. कर्वेंच्या मते युरोपातील अनेक स्त्रिया अशा प्रकारे समाजसेवेच्या कामी पुढे येतात. त्यामुळे भारतातील स्त्रियांनीही अशा प्रकारे काम करणे आवश्यक होते. महर्षी कर्वेंनी आपल्या परदेश दौऱ्यात अनेक देशांचे सखोल परीक्षण करून तेथील परिस्थितीचा अभ्यास केलेला होता. तेथील स्त्रिया समाजसेवेच्या कामी कसा पुढाकार घेतात हेही त्यांनी अनुभवलेले होते. परकीय स्त्रियांबाबत त्यांनी असे लिहिले होते की, "स्त्रियांनीं सार्वजनिक कामांत पडणें ही गोष्ट युरोपांत आणि अमेरिकेंत अगदीं स्वाभाविक होऊन गेली आहे. अमेरिकेंत फुरसतीचा वेळ असणाऱ्या सुखी स्त्रिया पुष्कळ आहेत. त्यांपैकी बऱ्याच आपला वेळ सार्वजनिक कामांत घालवितात. यांशिवाय कांहीं ध्येयानें प्रेरित झालेल्या स्त्रिया लग्न न करितां आपल्या कार्याच्या मागें लागतात. 'इंटर नॅशनल असोसिएशन् फॉर पीस अॅंड फ्रीडम्' यांसाठी काम करणारी आंतरराष्ट्रीय संस्था ही बहुतेक स्त्रियांनींच चालविली आहे, व तिच्या शाखा चहूंकडे आहेत."[३५] एकूणच त्यांना युरोपातील स्त्रिया ज्या प्रमाणे स्वतःच्या उद्धारासाठी स्वतः पुढाकार घेतात त्याप्रमाणे भारतीय स्त्रियांनीही पुढाकार घ्यावा असे वाटत होते.

याशिवाय स्त्री शिक्षण कार्याचा प्रचार आणि प्रसार होण्याच्या हेतूने कर्वेनी आणखी महत्त्वाचा उपाय सुचविला होता तो म्हणजे स्त्री शिक्षण हे एक पवित्र देशकार्य व धर्मकार्य मानून ते तडीस नेण्याचा प्रयत्न करणे. याबाबतीत कर्वे आपल्या आत्मवृत्तात लिहितात की, "हिंदी स्त्रियांमध्यें शिक्षणाचा प्रसार करणें हें अत्यंत पवित्र देशकार्य - धर्मकार्य - आहे, अशी श्रद्धा अंतःकरणांत बाणली पाहिजे. या कार्यासाठीं केलेले विचार, उच्चार हीच परमेश्वराची प्रार्थना – हेंच जन्माचें सार्थक – अशीं वृत्ति निदान कित्येकांची तरी बनली पाहिजे, पंधरा कोटि स्त्रियांच्या शिक्षणाच्या महत्कार्याला मी थोडा तरी हातभार लावीन, असा आत्मविश्वास उत्पन्न झाला पहिजे. निदान पंधरा निरक्षर स्त्रियांना साक्षर करून या महत्कार्याचा एक कोटयंश तरी मी आपल्या श्रमानें साध्य करीन व हें घडून आल्यावर, एक लहानसें व्रत तरी माझ्या हातून तडीला गेलें म्हणून मला धन्यता वाटेल, असे विचार रात्रंदिवस मनांत घोळले पाहिजेत."[३६] कोणत्याही देशप्रेमाने भारावलेल्या व्यक्तीस देशकार्य करण्यापासून किंवा धार्मिक वृत्तीच्या व्यक्तीस धर्मकार्य करण्यापासून रोखता येत नाही. जर स्त्री शिक्षण हेच देशकार्य आणि धर्मकार्य वाटले तर स्त्री शिक्षणाचेही काम रोखता येणे शक्य नाही असा विश्वास महर्षी कर्वेंचा दिसतो.

एकूणच विचार करता असे लक्षात येते की, महर्षी कर्वेनी काही निश्चित असे उपाय स्त्री शिक्षणाच्या उद्धारासाठी सुचविलेले होते. त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते की, स्त्री शिक्षणासाठी काही संघटनात्मक कार्य होणे अत्यावश्यक आहे. अनेक जण जेंव्हा निस्वार्थी हेतूने कोणत्याही आर्थिक फायद्याची किंवा फळाची अपेक्षा न धरता पुढे येऊन संघटनात्मक प्रयत्न करतील तेंव्हाच हे कार्य होणे शक्य आहे. या कार्यालाच कर्वे निष्काम कर्म असे म्हणतात. महर्षी कर्वेनी स्थापन केलेल्या अनाथ बालिकाश्रमाची जी शतकोत्तर वाटचाल झालेली दिसते ती केवळ याच संघटनात्मक विचारांवर झालेली दिसते. महर्षी कर्वेनी स्त्री शिक्षणाची ही संस्था उभी करताना अनेक आजन्म सेवकांची तसेच इतर सेवकांची संघटना बांधलेली होती. या आजन्म सेवकांना महर्षी अण्णा नेहमीच कर्तव्याशी बांधून ठेवण्याचा प्रयत्न करायचे. त्यांनी आपल्या संस्थेच्या आजन्म सेवकांना एकदा पत्र लिहिलेले होते. या

पत्रात त्यांनी लिहिले होते की, "बावन्नकशी सोने तेवढे अग्नीत टिकते व हीण जळून जाते. संकटाच्या आचेंत आपली संस्था भस्म होऊन जाऊ नये यासाठी आपण सर्वांनी शिकस्त केली पाहिजे. प्रत्येकाच्या शरीरात जसे सर्व ठिकाणी रक्ताचे अभिसरण चालले आहे, त्याप्रमाणे संस्थेच्या सर्व अवयवातून संस्थेचा जीवनप्रवाह अबाधित चालला पाहिजे. हा प्रवाह सर्वांच्या विचारांचा एकजीव होईल तरच तो निर्मल व आरोग्यकारी राहील, नाहीतर रक्त गोठून ज्याप्रमाणे शरीराचे कांही भाग झडू लागतात त्याप्रमाणे संस्थेच्या शरीराची स्थिती होईल, हे विचार कधीकधी तर तुमच्या मनांत खेळतील अशी मला आशा आहे."[३७] त्यांच्या या संदेशातून संस्थेच्या भल्यासाठी संघटनात्मक कार्य किती महत्त्वाचे असते हे स्पष्ट होते. शरीराचे कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी जसे सर्व अवयवात रक्त संचारणे आवश्यक असते तसेच संस्था हे एक शरीर आहे. या आजन्म सेवकांच्या माध्यमातून या संस्थारूपी शरीराचे कार्य सुरळीत चालले पाहिजे असे त्यांचे मत होते.

## ८) महर्षी कर्वेंचे ग्रामशिक्षणविषयक विचार

महर्षी कर्वे यांनी अनाथ बालिकाश्रम, महिला विद्यालय, महिला विद्यापीठ या संस्थांच्या माध्यमातून स्त्री शिक्षणासाठी खूप प्रयत्न केलेले होते. अनेक ठिकाणी त्यांनी स्त्रियांसाठी शाळाही सुरू केलेल्या होत्या. तथापि हे त्यांचे कार्य शहरात चाललेले होते. त्यांच्या दृष्टिकोनातून शहरी भागात शिक्षणाच्या सुधारणा व सोयी सुविधा अधिकाधिक होतात परंतु खेडयातील सर्वच लोकांना शिक्षणाची संधी मिळेलच असे नाही. त्याकाळी कित्येक अशी खेडी होती की, ज्या खेडयात जिल्हा लोकल बोर्डाची किंवा शाळा खात्यामार्फत चालविली जाणारी प्राथमिक शाळाही नव्हती. त्यामुळे अनेक खेडयातील लोकांना व तेथील मुलांना शिक्षण मिळणे दुरापास्त झालेले होते. वास्तविक कर्वेंच्या मते भारतातील बहुसंख्य लोक हे खेडयात राहत होते. या लोकांना शिक्षणाची नितांत आवश्यकता होती. या बाबतीत त्यांनी आपले ग्रामशिक्षण विषयक कार्य सुरू केलेले होते. त्यांच्या या कार्याविषयी डॉ. नीला पांढरे यांनी लिहिले आहे की, "ज्या खेडेगावात जिल्हा लोकल बोर्डाच्या शाळा नसतील, तिथे मुलांना लेखन, वाचन, व गणित शिकवणाऱ्या शाळा सुरू करण्यात येणार होत्या. तेथील प्रौढांना

लेखन-वाचन येत असेल तर त्याचा विसर पडू नये, म्हणून शाळांतून वाचनालय सुरू करण्यात येणार होते. अण्णासाहेबांनी एका शाळेचे व्यवस्थापन करायचे ठरवून त्या खर्चासाठी आपल्या ७० रूपयांच्या पेन्शन मधून दरमहा १५ रू. बाजूला काढण्याचे ठरवले."[३८] त्यांच्या या कार्यातून महर्षी कर्वेंची खेडयातील जनतेच्या शिक्षणाची तळमळ दिसून येते त्याचबरोबर ग्रामशिक्षण मोहीम कशी चालविता येऊ शकते याविषयी त्यांची भूमिकाही स्पष्ट होते. सरकारी शाळा नसलेल्या खेडयांतील मुले व प्रौढ यांच्या शिक्षणाची एक योजनाच त्यांनी मांडल्याचे दिसते. त्यामध्ये तेथील मुलांना किमान साक्षरता प्राप्त होईल एवढे शिक्षण मिळणे त्यांना अभिप्रत होते. त्याचबरोबर जे शिकलेले आहेत त्यांनाही वाचनालयांच्या माध्यमातून आणखी ज्ञानी बनवण्यात येऊ शकेल अशी त्यांची एकूणच योजना होती. विशेष म्हणजे महिला विद्यापीठाची सर्व जबाबदारी पार पाडून वयाच्या ऐंशीच्या दरम्यान इ.सन १९३६ मध्ये महर्षी कर्वेंनी आपल्या ग्राम शिक्षण योजनेच्या कामी पुढाकार घेतलेला होता. कै.न.चि.केळकर, बापूसाहेब जठार, काकासाहेब सहस्त्रबुद्धे अशा काही साथीदारांच्या मदतीने त्यांनी 'महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ' नावाची स्वतंत्र संस्था सुरू केली होती. या संस्थेच्या माध्यमातून ग्राम शिक्षणास चालना देण्यासाठी त्यांनी निधी संकलन केले व हे कार्यही तेवढयाच कळकळीने तडीस नेण्याचा प्रयत्न केला होता. खेडयातील शिक्षणाच्या कामी आणखी अशा प्रकारच्या संघटनांनी पुढाकार घ्यावा असे त्यांचे मत होते. शिक्षण देणे ही जरी सरकारची जबाबदारी असली तरी केवळ सरकारवर अवलंबून राहून खेडयातील जनतेचा शिक्षणाचा प्रश्न सुटणार नाही हे त्यांनी ओळखलेले होते. त्या अनुषंगाने ग्रामशिक्षणासारख्या मोहीमा राबविण्यात याव्यात असे त्यांना वाटत होते.

## ९) शिक्षणाच्या आर्थिक तरतुदींविषयी महर्षी कर्वे यांचे विचार

बहुसंख्य समाजाच्या शिक्षणाची उपाययोजना करण्याच्या कार्यामध्ये आर्थिक अडचण ही खूप मोठी समस्या असते. जेवढया सुधारकांनी शिक्षण कार्य हाती घेतलेले होते तेवढया सर्वांनाच आर्थिक समस्येचा सामना करावा लागलेला होता. वास्तविक विचार करता अनेक

विचारवंताच्या डोक्यात उत्कृष्ट शिक्षणविचार असू शकतात, तथापि हे शिक्षणविचार समाजाच्या भल्यासाठी प्रत्यक्षात आणणे खूप कठीण होऊन बसते. यासाठी शिक्षणविचारांबरोबरच आर्थिक विचारही तेवढेच महत्त्वाचे असतात. न्यायमूर्ती रानडे यांनीही शिक्षणासाठी आर्थिक उपाय योजना केली जावी याविषयी विचार मांडलेले होते परंतु ती उपाययोजना सरकारी पातळीवर होती. महर्षी कर्वेंच्या बाबतीत त्यांच्या कार्यातून आर्थिक तरतूद कशी करता येऊ शकेल या विषयी त्यांचे विचार दिसून येतात.

महर्षी कर्वेनी आर्थिक अडचण दूर करण्यासाठी विविध फंडाच्या माध्यमातून समाजातील उदार लोकांकडून निधी संकलन केलेले होते. या फंडामध्ये ब्रह्मचर्य फंड, भाऊबीज, मुष्टीफंड अशा विविध योजना त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी निधी संकलनाच्यासाठी सुरू केलेल्या होत्या. संस्थेला विविध दानशूर व्यक्तींच्या ज्या देणग्या मिळत होत्या त्या देणग्यांमधून कर्वेनी संस्थेत 'ब्रह्मचर्य फंड' उभा केलेला होता. हा फंड वेगळा करण्यामागे कर्वेंचे बालविवाह पद्धत रोखणे हे उद्दिष्ट होते. "कुमारिकांच्या लग्नाची वयोमर्यादा वाढवावी म्हणून गरीब व होतकरू कुमरिकांसाठी ब्रह्मचर्य फंडाची कल्पना त्यांनी काढली. वीस वर्षे वयाची होईपर्यंत मुलीचे लग्न करणार नाही, मुलीचे शिक्षण संस्थेच्या देखरेखीखाली चालू ठेवेन, असे गरीब मुलींच्या पालकांनी कबूल करायचे व मुलगी होतकरू दिसली तर पुढे तिला शिकू द्यायचे अन्यथा लग्नाला परवानगी द्यायची, या अटी मान्य करणाऱ्या गरीब अविवाहित मुलींच्या पालकांना ब्रह्मचर्य फंडातून मदत देण्याचे ठरले."[३९] म्हणजेच जे पालक आपली मुलगी लग्नाच्या वयाची होईपर्यंत आश्रमात ठेवतील त्यामुलींचा खर्च या फंडातून केला जाणार होता.

आजन्म सेवक म्हणून संस्थेत दाखल झालेले प्रा.गोपाळ महादेव चिपळूणकर यांनी भाऊबीज निधी गोळा करण्याची योजना मांडलेली होती. भाऊबीजेला भावाकडून बहिणीला हक्काची ओवाळणी मिळत असते. या भावनिक व प्रेमळ भावनेचा उपयोग करून संस्थेच्या उन्नतीसाठी भाऊबीज निधी गोळा करण्याचे ठरले. स्वतः महर्षी कर्वे, त्यांच्या पत्नी आनंदीबाई कर्वे, आश्रमातील आजन्म सेवक सेविका, त्याचबरोबर विद्यार्थिनी हा निधी दरवर्षी जमा करायच्या. इ.सन १९१९ पासून सुरू झालेली ही परंपरा महर्षी कर्वे स्त्री शिक्षण

संस्थेमध्ये आज देखील चालू आहे. इ.सन १९९८ साली या योजनेला ८० वर्षे पूर्ण झालेली होती. यावर्षी भाऊबीज निधी संबंधी एक स्मरणिका प्रकाशित करण्यात आलेली होती. या स्मरणिकेत संस्थेचे तत्कालीन प्रभारी सचिव श्री रविंद्र देशपांडे यांनी सांगितलेले होते की, "संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक कार्य अव्याहत चालूच आहे. दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटुंबातून तसेच खेडयापाडयातील अनेक विद्यार्थिनींना शिक्षणाला वंचित व्हावे लागत आहे. त्यातील हुशार, होतकरू मुलींना प्रवेश देऊन, त्यांना संस्था नादारी देऊन मदतीचा हात देते आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याची संधी देते. यासाठी होणारा पुष्कळसा खर्च भाऊबीज निधीतून केला जातो."[४०] म्हणजेच हा जो निधी जमा केला जातो तो गोरगरिबांच्या मुलींच्या शिक्षणासाठी हातभार लागावा या उद्देशानेच जमा केला जातो. कर्वेनी दुष्काळाच्या काळात 'मुष्टीफंडाची'ही याजना राबविली होती. विशेषतः आश्रमाच्या आर्थिक अडचणीच्या काळात उदार लोकांकडून किमान एक मूठ धान्य गोळा करायचे असे या निधीचे स्वरूप होते. एकूणच या सर्व योजनांमधून शिक्षणात आर्थिक तरतूद कशी करता येऊ शकते याविषयीचे कर्वेचे विचार स्पष्ट होतांना दिसतात. शिक्षणासारख्या बाबीवर सर्वस्वी सरकारवरच अवलंबून राहिले तर सर्वांसाठी शिक्षणाच्या सोयी होणेच शक्य नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शिक्षण होण्यासाठी व त्यातील आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी निधी संकलनाच्या योजना उपयुक्त ठरतात.

वरील सर्व मुद्यांचा विचार करता असे लक्षात येते की, महर्षी कर्वेची स्त्री शिक्षणविषयक निश्चित अशी भूमिका होती. एकोणिसाव्या शतकातील विविध सुधारकांच्या माध्यमातून झालेल्या प्रबोधन कार्याचा त्यांच्या मनावर प्रभाव होता व त्याच प्रभावातून त्यांनी स्त्री शिक्षणासाठी भरीव असे कार्य केल्याचे दिसून येते. त्यांच्या कार्याचा उल्लेख करतांना ज्येष्ठ अभ्यासक व लेखक य.दी फडके यांनी लिहिले होते की, "DONDO KESHAV KARVE is remembered in India for his single minded devotion to the cause of women's education. For nearly three quarters of a century, he strove hard to promote the cause of female education and at the end of his life, he had the satisfaction of having achieved his objectives for which he dedicated his life with such relentless

zeal and sincerity. A tiny little widows' home known as Anath Balikashram established by the end of the nineteenth century developed into a full-fledged university for Indian women. It was sheer hard work, preseverence, an unflinching faith in his mission and his ability to persuade people to help his cause that enabled Karve to pursue his goal undaunted by the difficulties which he had to face throughout the long period of struggle."[४१] आपल्या कार्यापासून अजिबात विचलित न होता जवळपास पाऊण शतक त्यांनी स्त्रियांच्या शिक्षण कार्यासाठी आपले आयुष्य वाहून घेतलेले होते.

## ७.२ राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार

### ७.२.१ राजर्षी शाहू महाराजांचा अल्पपरिचय

छत्रपती शाहू महाराजांचा जन्म दि.२६ जुलै १८७४ रोजी घाटगे घराण्यात झालेला होता. त्यांचे मूळ नाव यशवंतराव जयसिंगराव घाटगे असे होते. त्यावेळच्या कोल्हापूरच्या गादीचे वारसदार करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांचा इ.सन १८८३ मध्ये अहमदनगर येथील किल्ल्यात मृत्यू झाल्यामुळे कोल्हापूरची गादी चालविण्यासाठी त्यांच्या महाराणी आनंदीबाईसाहेब यांनी जयसिंगराव घाटगे यांचा मुलगा यशवंतराव यांना दि. १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले व त्यांचे नामकरण शाहू छत्रपती असे केले. अशा प्रकारे यशवंतराव घाटगे हे राजर्षी शाहू महाराज या नावाने कोल्हापूर संस्थानचे छत्रपती झाले.[४२] याच दरम्यानच्या काळात महाराजांचे शिक्षणही चालू होते. श्री कृष्णाजी भिकाजी गोखले, श्री हरीपंत गोखले या शिक्षकांच्या व ब्रिटिश अधिकारी मि. फिरझिराल्ड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शाहूंचे शिक्षण चालू होते. इ.सन १८८५ मध्ये राजकोट येथील राजकुमार कॉलेजमध्ये त्यांचा प्रवेश घेण्यात आला. याठिकाणी शिक्षण घेत असताना शाहूंनी केवळ पुस्तकी ज्ञानालाच महत्त्व दिले नाही तर शिकार, मल्लविद्या, घोडदौड यासारख्या बाबींकडेही विशेष लक्ष त्यांनी दिले होते. इ.सन १८८९ मध्ये शाहू महाराज पुढील शिक्षणासाठी धारवाड येथे गेले होते. याच

दरम्यानच्या काळात १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या कन्या लक्ष्मीबाईसाहेब यांच्याशी महाराजांचा विवाह झालेला होता.

एक कार्यकुशल राज्यकर्ता म्हणून शाहू महाराजांचा खऱ्याअर्थाने उदय हा त्यांनी राजकीय पदाची अधिकारसुत्रे हाती घेतल्यानंतर झाला होता. दि.२ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या प्रत्यक्ष राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली व तेंव्हापासूनच कोल्हापूरच्या संस्थानची एक मंगलकारी सुधारणात्मक राजवट सुरू झाली. आपली राजवट कल्याणकारी कशी ठरू शकेल या दृष्टिकोनातून त्यांनी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यात त्यांनी लिहिले होते की, "आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हितसंबंधाची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा, अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा उद्देश सफल होण्याच्या कामी आमचे जहागीरदार, आप्तजन, सरदार, मानकरी, इनामदार, कामदार, सर्व दर्जाचे शेटसावकार व इतर प्रजानन यांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हांस आवश्यकता आहे. आज आमच्या अमदानीस सुरूवात होणाऱ्या दिवशी आमचा राज्यकारभार दीर्घकाळापर्यंत टिकून तो सुखद व्हावा म्हणून आम्ही त्या परात्पर जगचालकाच्या अनुग्रहासाठी प्रार्थना करतो."[४३] यावरून स्पष्ट लक्षात येते की, एका उत्तम राज्यकर्त्याचे गुण शाहू महाराजांमध्ये ओतप्रोत भरलेले होते. आपल्या चांगल्या राजवटीसाठी प्रजेचे सहकार्य निश्चितच आवश्यक आहे हे त्यांनी ओळखलेले होते व याच अनुषंगाने त्यांनी हे भावनिक आवाहन प्रजेला उद्देशून केल्याचे दिसते.

महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचा वारसा शाहूंनी आपल्या कारकीर्दीत पुढे चालविला होता. त्यांनी शिक्षण कार्यात प्रचंड क्रांती केली होती. अस्पृश्य जातीतील लोकांचा उद्धार घडवून आणण्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले होते. एकोणिसाव्या शतकातील इतर समाजसुधारक व शाहू महाराज यांच्यात तुलना करावयाची झाल्यास एक गोष्ट विशेषत्त्वाने महत्त्वाची होती ती म्हणजे शाहू महाराज स्वतः राजयकर्तेही होते व समाजसुधारकही होते. राज्यकर्ते असल्यामुळे त्यांना आपले समाजसुधारणेचे कार्य करणे इतर समाजसुधारकांपेक्षा सुलभ होते. अर्थात असे असले तरीही त्यांना सनातन समाजाकडून विरोध होणे स्वभाविक

होते परंतु शाहूंनी या विरोधासही अतिशय धैर्याने तोंड दिले होते. एकूणच विचार करता शाहूंची राजवट ही एक आदर्श राजवट होती. अशा या आदर्श राज्यकर्त्याचा दि.६ मे १९२२ रोजी मुंबई येथे मृत्यू झाला.

### ७.२.२ राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

छत्रपती शाहू महाराजांची कारकीर्द विशेष महत्त्वाची ठरली ती त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे. शाहू महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखलेले होते. जनतेच्या विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही याची जाणीव शाहू महाराजांना होती. त्यामुळे त्यांनी इतर सुधारणात्मक कार्याबरोबरच शिक्षण चळवळीस अतिशय महत्त्व दिल्याचे दिसून येते. त्यांच्या मते गोरगरिबांच्या व बहुजन समाजातील मुलांनी शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते. यासाठीच त्यांनी वसतिगृहांच्या स्थापनेस विशेष प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते. त्यांच्या प्रेरणेतूनच मराठा, जैन, लिंगायत, मुसलमान, अस्पृश्य अशा अनेक जातीतील लोकांच्या शिक्षणासाठी वसतिगृहांची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे कोल्हापूर संस्थानात शैक्षणिक जागृती घडून आलेली होती. त्यांनी जनतेतील साक्षरतेचे प्रमाण वाढावे यासाठी 'सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची' अंमलबजावणी केलेली होती. 'या योजनांतर्गत ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आली. अशा छोटया गावात शाळेसाठी इमारत कशी उपलब्ध होणार? तेंव्हा गावातील चावडी, देवळे, धर्मशाळा आदी इमारतीत शाळा सुरू केल्या. जिथे अशा इमारती मिळाल्या नाहीत व जिथे एखादे मंदिर असणे आवश्यक वाटले तिथे देवस्थाननिधीमधून तुळजा भवानीचे मंदिर बांधावे व त्या मंदिराच्या एका सोप्यात शाळा व दुसऱ्या सोप्यात गाव चावडी ठेवावी असा आदेश दिला गेला.'[४४] म्हणजेच शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी अनेक अडचणींवर मात करण्याचा प्रयत्न केलेला होता. शाहूंनी प्राथमिक शिक्षणाशिवाय माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या विकासाकडेही विशेष लक्ष पुरविले होते. टेक्निकल स्कूल, आश्रमशाळा, विद्यापीठ हायस्कूल, पाटील शाळा, तलाठी शाळा, वतनी शिक्षक शाळा, छत्रपती संस्कृत विद्यालय, शिवाजी मराठा हायस्कूल, श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक

विद्यालय, अशा विविध शैक्षणिक संस्थांची स्थापना छत्रपती शाहू महाराजांच्या प्रयत्नांनी झालेली होती.

शाहू महाराजांनी मुलांच्या शिक्षणाबरोबरच स्त्रियांच्या शिक्षणाकडे व अस्पृश्यांच्या शिक्षणाकडेही विशेष लक्ष पुरविले होते. आपले शैक्षणिक कार्य राबवित असताना त्यांनी न्यायमूर्ती रानडे, गोपाळकृष्ण गोखले यासारख्या समाज सुधारकांचेही मार्गदर्शन घेतल्याचे दिसून येते. अगदी शतक बदलाच्या उंबरठयावर त्यांनी हाती घेतलेली शैक्षणिक चळवळ ही एका दीपस्तंभासारखी होती. याच चळवळीपासून अनेक शिक्षण तज्ज्ञांनी प्रेरणा घेतलेली दिसून येते.

### ७.२.३ राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार

राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रात खूप मोठे कार्य होते. ज्या व्यक्तीकडे स्वतःच्या शिक्षण विचारांविषयी निश्चित व ठाम अशी भूमिका असते तीच व्यक्ती एवढया मोठया प्रमाणात शैक्षणिक कार्य उभे करू शकते. त्यामुळे शाहूंच्या शैक्षणिक कार्याला व विचारांना एक तात्त्विक अधिष्ठान होते हेच यावरून दिसून येते. शाहूंचे बहुतांश शैक्षणिक विचार महात्मा फुल्यांच्या शैक्षणिक विचारांशी साम्य असलेले होते, यावरून त्यांना महात्मा फुलेंच्या शैक्षणिक कार्य व विचारांपासून प्रेरणा मिळालेली होती असे दिसून येते. शाहू राज्यकर्ता असल्यामुळे अनेक समारंभांना त्यांनी हजेरी लावलेली होती, त्याठिकाणी केलेल्या भाषणांमधून, तसेच राज्यकर्ता म्हणून त्यांनी काढलेल्या जाहीरनाम्यांमधून त्यांचे शैक्षणिक विचार स्पष्ट होतात.

### १) शाहू महाराजांच्या मते शिक्षणाची आवश्यकता

छत्रपती शाहूंनी राज्यकारभाराची सुत्रे स्वीकारली तेंव्हा त्यांनी तत्कालीन समाजाचा सांगोपांग अभ्यास केलेला होता. त्यामुळे शिक्षणाअभावी समाजाची अवस्था किती बिकट झालेली होती याची जाणीव शाहू महाराजांना होती. शिक्षण ही बाब उच्चभ्रूंनी केवळ आपल्या

हाती केंद्रित ठेवल्यामुळे बहुजन समाज अज्ञानाच्या अंधःकारात खितपत पडलेला होता. अस्पृश्य समाजाची अवस्था तर याहूनही बिकट होती. समाज अंधश्रद्धा, अनिष्ट चालिरीतीमंध्ये गुरफटलेला होता. शिक्षणाअभावी समाजाची अवस्था किती बिकट झालेली होती याचे वर्णन शाहूंनी आपल्या एका भाषणात केलेले होते. ते आपल्या भाषणात म्हणतात की, "हजार वर्षांपूर्वीच्या व आताच्या भारतवर्षात जमीनअस्मानचे अंतर पडले आहे. आज पराक्रम, विद्वत्ता, धर्मशीलता, उदारतादी सद्‌गुण लुप्त झाले आहेत. हजारो कुसंस्कार, चालिरिती यांनी भारतवर्ष ग्रासून गेलेले पाहून काही आश्‍चर्यही वाटत नाहीसे झाले आहे. बालविवाह, बहुविवाह, मद्यपान, स्त्रियांना शिक्षणास मज्जाव, वर्णाश्रमधर्माची अव्यवस्था वगैरे अनेक सामाजिक घातकी रूढींनी समाज निर्जीव करून टाकला आहे."[४५] एकूणच शाहू महाराजांना शिक्षणाअभावी निर्माण झालेल्या समाजातील समस्यांची जाणीव होती. त्यांच्या मते प्राचीन काळ हा भारताच्या वैभवाचा काळ होता परंतु काळाच्या ओघात समाजाची अधोगती होत गेली.

शाहूंच्या पूर्वीच्या समाजसुधारकांच्या शैक्षणिक कार्य व विचारांमुळे काही प्रमाणात साक्षरतेचे प्रमाण वाढण्यास सुरूवात झालेली होती, तथापि ही प्रगती अतिशय अल्प प्रमाणात होती. त्याकाळातील शैक्षणिक परिस्थितीचा विचार केला तर शाहूंच्या कोल्हापूर संस्थानामध्ये ब्राह्मण व इतर बहुजन समाजाचे शिक्षणाच्या बाबतीत अगदी व्यस्त प्रमाण दिसून येत होते. हीच अवस्था उर्वरित महाराष्ट्राचीही होती याची जाणीव शाहूंना होती. ब्राह्मण समाज हा संख्येने कमी होता तरीही त्यांच्यात शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण प्रचंड होते व उर्वरित बहुजन समाज हा संख्येने अधिक होता तरीही त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण मात्र अत्यल्प होते. एकूणच समाजाची अवस्थाही दोन गटात स्पष्टपणे झालेली होती ती म्हणजे उच्चभ्रूंचा वर्ग ज्याच्याकडे शिक्षणाची मक्तेदारी होती. प्रशासनातील सर्व नोकऱ्याही त्यांनाच प्राप्त होत होत्या. या उलट दुसरा गट म्हणजे बुद्धिहीन, कष्टकरी, गरीब गटाचा होता ज्याची पद्धतशीरपणे उच्चभ्रूंकडून पिळवणूक चालू होती. एकूणच समाजाचे चित्र हे भेदभावावर आधारभूत होते याची जाणीव छत्रपती शाहूंना होती. शिक्षणाचा प्रसार अगदी कमी, केवळ ब्राह्मणांनाच विद्या संपादनाचा

अधिकार, धार्मिक ज्ञानापुरताच शिक्षणाचा वापर, जुनाट पद्धतीचे शिक्षण तंत्र, नवोपक्रमाचा अभाव अशा अनेक बाबी शिक्षणाविषयी तत्कालीन समाजाच्या दिसून येत होत्या. या सर्व परिस्थितीचा अभ्यास शाहूंनी केलेला होता. या अभ्यासातूनच शाहूंची शिक्षणाबाबतची भूमिका बनलेली होती. शाहूंच्या मते काही निश्चित कारणांसाठी समाजाला शिक्षणाची आवश्यकता होती. तीच त्यांनी मांडलेली शिक्षणाची उद्दिष्टे होती.

**ज्ञानप्राप्ती व बौद्धिक विकासासाठी शिक्षण :** राजर्षी शाहूंच्या मते ज्ञानप्राप्ती करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. मुळात शिक्षण आणि ज्ञान किंवा बौद्धिक विकास व शिक्षण यांचा घनिष्ठ संबंध असतो. तत्कालीन बहुसंख्य समाज हा अज्ञानी होता. त्यांच्या मते हा समाज एवढा अडाणी व अज्ञानी होता की, त्यांना त्यांचे हक्क आणि अधिकार काय आहेत याचीही जाणीव नव्हती. या अनुषंगाने शाहूंनी मराठा बोर्डिंग नाशिक येथे उद्घाटन समयी जे भाषण केलेले होते त्या भाषणात आपले विचार मांडलेले होते. आपल्या भाषणात ते म्हटले होते की, "In this country of ours where the reign of castes has a powerful sway on the minds of the people and where 70 to 80 p c are ill-prepared to understand and exercise their rights and duties I venture to say that political power will fall into the hands of a single caste. How power in the hands of self-interested persons only serves to what their natural desire to oppress others is aply borne out by history"[४६] म्हणजेच शाहूंच्या मते या देशात शेकडा ७० ते ८० लोकांना स्वतःच्या हक्क व कर्तव्याची जाणीव नव्हती याचे कारण त्यांच्यातील अज्ञान होते. समाजातील हे अज्ञान केवळ शिक्षणानेच नाहीसे होऊ शकते असा विश्वास त्यांना होता. शिक्षणामुळे व्यक्तीस ज्ञानप्राप्ती होऊन त्याची योग्यता वाढते. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी असलेली योग्यता व त्याच्यातील सुप्त शक्तींचा विकास हा त्याला शिक्षणाद्वारे मिळालेल्या ज्ञानावर अवलंबून असतो. वास्तविक बुद्धिमत्ता व ज्ञान ही ठराविक जातीपंथांची मक्तेदारी असू शकत नाही. शाहूंच्या मते उच्चभ्रू समाजाने ज्यांना अस्पृश्य व हलक्या जातीचे म्हणून हिणवले, त्यांना जर शिक्षणाचे बाळकडू मिळाले असते तर निश्चितच ते त्यांच्या हक्क व अधिकारांविषयी जागरूक झाले असते. म्हणून सर्वांसाठीच शिक्षणाची आवश्यकता असते असे त्यांच्या विचारातून दिसून येते. त्यांच्या मते मानसिक सुधारणा करणे

हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते म्हणून जनतेने लोकशिक्षणाच्या कामी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

**सामाजिक विकासासाठी शिक्षण :** शाहू महाराजांच्या दृष्टिकोनातून शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीचा ज्याप्रमाणे विकास होतो त्या प्रमाणेच त्या समाजाचाही शिक्षणाने विकास होत असतो. प्रत्येक व्यक्ती हा समाजाचा घटक असतो. समाज या संकल्पनेत ठराविक एक व्यक्तीस महत्त्व दिले जात नाही, परंतु ठराविक अशा अनेक व्यक्ती एकत्र आल्यानेच समाज बनलेला असतो. त्यामुळे समाजातील व्यक्ती जसजशा शिक्षण घेत जातील तसतसा तो समाज उन्नत झाल्याशिवाय राहत नाही. या विचारांवर शाहू महाराजांचा विश्वास होता. शिक्षणामुळे समाजातील प्रत्येकाची वैचारिक पातळी वाढत जाते व त्यांच्या विचारांमध्ये एवढी प्रगल्भता येते की, समाजातील जेवढया अनिष्ट चालिरिती, जातिभेद, वर्णभेद आहेत ते आपोआपच दूर होतात. याचसाठी शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणे आवश्यक आहे असे शाहूंना वाटत होते. या अनुषंगाने शाहू महाराजांनी एका मानपत्राला उत्तरादाखल केलल्या भाषणात म्हटले होते की, "शिक्षणाचे महत्त्व समजून घेऊन विस्तृत प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार झाल्याखेरीज अशा प्रकारचे भेदभाव नष्ट होणार नाहीत आणि हाच हेतू साध्य करण्यासाठी माझा सतत प्रयत्न आहे. निरनिराळया जातीच्या शैक्षणिक प्रगतीत जोपर्यंत अशा प्रकारचे महदंतर आहे, तोपर्यंत पुष्कळ दिवसाचे भेदभाव नष्ट करण्याचे सर्व औपचारिक प्रयत्न निष्फळच होणार. म्हणून या दिशेने मी ज्या उपायाचे अवलंबन केले आहे त्याकडे अशा दृष्टीने आपण पहाल, अशी माझी खात्री आहे."[४७] त्यांच्या या विचारांवरून असे स्पष्ट दिसून येते की, शाहू महाराज शिक्षणाकडे एका सकारात्मक दृष्टिकोनातून पहात होते. त्यांच्या दृष्टिकोनातून शिक्षणाशिवाय समाजातील सर्व अडचणी दूर करण्याचे सर्व प्रयत्न हे निष्फळ ठरणारे होते. म्हणून त्यांनी शिक्षणावर अधिकाधिक लक्ष केंद्रित करून कोल्हापूर संस्थानमध्ये शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा कटाक्षाने प्रयत्न केलेला होता.

**राष्ट्रीय उन्नती व स्वराज्यप्राप्तीसाठी शिक्षण:** व्यक्तिगत विकास व सामाजिक विकासाबरोबरच राष्ट्रीय उन्नती साधणे हेही एक शिक्षणाचे उद्दिष्ट असते असे छत्रपती शाहूंना वाटत होते.

शिक्षणाने ज्याप्रमाणे एक उन्नत समाज निर्माण होतो त्या प्रमाणेच देशाच्या प्रगतीसाठीही शिक्षणाचीच आवश्यकता असते.

तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा अभ्यास शाहू महाराजांचा होता. त्यामुळे देशाच्या उन्नतीमध्ये अडसर ठरणारे घटक कोणते याचाही विचार त्यांनी केलेला होता. शाहूंच्या मते समाजातील जी विषमतेची दरी होती, तीच खऱ्या अर्थाने भारत देशाच्या उन्नतीला मारक होती. त्यामुळे आपल्याला राष्ट्रीय उन्नती साध्य करण्यासाठी योग्य पद्धतीच्या शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केलेले होते. खामगाव येथे भरलेल्या अकराव्या मराठा शिक्षण परिषदेच्यावेळी केलेल्या अध्यक्षीय भाषणात शाहूंनी राष्ट्रीय उन्नतीसाठी शिक्षणाची आवश्यकता कशी आहे याबाबत आपले परखड विचार मांडलेले होते. आपल्या भाषणात ते म्हटले होते की, "शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची, हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाल, म्हटला म्हणजे, इतिहासातील एक अंधारी रात्र आहे."[४८] त्यांच्या या विचारांवरून स्पष्ट लक्षात येते की, उन्नत देशाच्या प्रगतीचे रहस्य हे त्यांच्या शिक्षणातच दिसून येते.

युरोपियन देशांचा विचार केला तर ज्ञानाच्या क्षेत्रात या देशांमध्ये प्रचंड विस्फोट झालेला होता व त्यामुळेच या देशांमध्ये प्रचंड प्रगती झालेली होती. अगदी आशिया खंडातील जपानसारख्या छोटया देशाचा विचार केला तरीही लक्षात येईल की, या देशानेही केवळ शिक्षणाच्या जोरावरच महासत्ता म्हणून आपला ठसा उमटविला होता. शाहू महाराजांच्या मते केवळ शैक्षणिक जागृतिनेच समाजात मुत्सद्दी व विद्वान लोक निपजतात व त्यांच्या ज्ञानाच्या नेतृत्वाखाली त्या देशाची प्रगती साधली जाते. भारताच्या इतिहासात मात्र त्यांना कोठे शिक्षणासाठी विशेष प्रयत्न झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे भारत एवढा मागासलेला देश राहिला असे त्यांना वाटत होते. मुळात भारतात प्राचीन काळच्या काही राजांनी जरी शिक्षणासाठी प्रयत्न केलेले असले तरी मध्ययुगीन काळापासून मात्र हे प्रयत्न पूर्णपणे बंद

झाल्याचे दिसतात. बदलत्या काळानुसार जो बदल शिक्षणात होणे आवश्यक असते तोही न झाल्याने भारताची प्रगती पूर्णपणे खुंटली असे शाहूंच्या विचारांवरून दिसून येते. देशातील जनतेला जर योग्य प्रकारचे शिक्षण मिळाले तर आपोआपच समाजात जागृती होऊन देश कल्याणार्थ झटण्याचे सामर्थ्य जनतेत आपोआपच निर्माण होत जाईल असा राजर्षी शाहूंचा विश्वास होता.

राजर्षी शाहूंच्या मते स्वराज्य प्राप्तीसाठीही शिक्षणाची आवश्यकता होती. स्वराज्य मिळविण्याची व ते पेलविण्याची सक्षमता केवळ शिक्षणामुळेच नागरिकांना प्राप्त होते. ही सक्षमता नागरिकांमध्ये जोवर येत नाही तोपर्यंत स्वराज्य मिळविण्यासाठी प्रयत्न करणेही व्यर्थ आहे. असे त्यांना वाटत होते. याच कारणास्तव शाहू महाराजांवर त्या कालखंडात टीका केली जायची. शाहू महाराज स्वराज्य देण्यास तयार नाहीत अशा प्रकारची टीका त्यांच्यावर होत होती. परंतु शाहूंनी आपल्या विचारांवर ठाम राहून या टीकेला उत्तर दिले होते. या बाबतीत त्यांनी स्पष्टपणे सांगितलेले होते की, "But if I may be allowed to express an opinion at this stage, I would only say that I for one, would hesitate to make any counstituional changes in my state in the direction of the Reforms until the general level of education among the masses has risen and is at least partially equalised with that of the higher classes."[४९] त्यांच्या या विचारांवरून स्पष्ट लक्षात येते की, जोपर्यंत सर्वसामान्य बहुजन समाजाला शिक्षण मिळून अंशतः का होईना उच्चभ्रूंच्या समकक्ष हा समाज विकसित होत नाही तो पर्यंत स्वराज्याचा विचार करणे संयुक्तिक ठरणार नाही. त्याच बरोबर स्वराज्य देण्याबाबत कोणत्याही स्वरूपाचा घटनात्मक बदल कोल्हापूर संस्थानच्या बाबतीत शाहू महाराज करण्यास तयार नव्हते. त्यांच्या या विचारांतून त्यांची प्रजेच्या प्रती असलेली त्यांची पालकत्त्वाची जबाबदारी दिसून येते.

समाजातील बहुसंख्य लोक अडाणी असताना स्वराज्य प्राप्तीचा विचार केला तर समाजातील अगदी अल्पसंख्य अशा हुशार, बुद्धिमान वर्गाच्या हाती पूर्ण देशाची सत्ता जाईल व या वर्गाकडून सत्तेचा वापर आपल्या स्वार्थासाठी केला जाईल. जो बहुजन समाज अज्ञान व

गुलामगिरीत खितपत पडलेला होता त्यांच्या स्थितीत कुठलाही बदल होणार नसेल तर असे स्वराज्य मिळवूनही उपयोग काय? असा प्रश्न शाहू महाराजांचा होता. ते कोणत्याही बाबतीत स्वराज्य प्राप्तीच्या विरूद्ध नव्हते. ही बाब त्यांनी वेळोवेळी आपल्या भाषणातून स्पष्ट केलेली होती. आपल्या भाषणात ते म्हटले होते की, "माझ्या रयतेमध्ये प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जारीने खटपट चालली आहे. यावरून शक्य तितके लवकर रयतेस स्वराज्य देणेचे माझे धोरण आहे हे आपले ध्यानी येईलच. माझी सर्व प्रजा मराठी तिसरी ईयत्ता तरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांति घेतली असती."[५०] एकूणच शाहू महाराज शिक्षणास स्वराज्य प्राप्तीचा मार्ग मानीत होते. रयतेस किमान प्राथमिक शिक्षण प्राप्त झाले किंवा त्यांना लिहिता वाचता येऊ लागले की, त्यांना त्यांचे हक्क व अधिकार कळतील व तेंव्हा ते स्वराज्य मिळविण्यास पात्र ठरतील. शिक्षणाने जनतेमध्ये आपण कोणत्या जातीचे किंवा धर्माचे आहोत यापेक्षा आपण भारतीय आहोत असा विचार निर्माण होईल व तेंव्हाच आपण स्वराज्य मिळविण्यास पात्र झालो असे समजावे.

त्याकाळी स्वराज्य आगोदर की सामाजिक सुधारणा असा एक वाद चाललेला होता. या बाबतीत लोकमान्य टिळक व आगरकर यांच्यातील वाद सर्वश्रूत आहे. लोकमान्य टिळकांच्या मते स्वराज्य मिळाले की, सामाजिक सुधारणा अगदी सहज करता येतील तर आगरकरांनी स्वराज्याच्या आगोदर सामाजिक सुधारणांना प्राधान्यक्रम दिलेला होता. या दोन्ही समाज सुधारकांच्या तुलनेत शाहूमहाराजांच्या विचारांचा अभ्यास केला तर शाहूंनी याही पुढे जाऊन या बाबतीत आपले विचार मांडलेले दिसतात. त्यांच्या मते राजकीय व समाजिक यामध्ये अगोदर काय यात वाद घालणे संयुक्तिक नाही. या दोन्ही बाबी रथाच्या चाकांसारख्या आहेत. त्यामुळे त्यादोन्हीही एकत्रितच चालतात. केवळ लोकशिक्षणाने दोन्ही बाबतीत विचारांची प्रगल्भता निर्माण होते व त्यातून स्वराज्य प्राप्ती होऊन त्या देशाची उन्नती साधते. एकूणच शाहू महाराजांच्या विचारांतून व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्रीय विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता होती हे स्पष्टपणे दिसून येते.

## २) शाहू महाराजांचे प्राथमिक शिक्षणविषयक विचार

छत्रपती शाहू महाराजांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रमाणेच प्राथमिक शिक्षणाचा अग्रक्रमाने विचार केलेला होता. शिक्षणाविषयी जेंव्हा सुधारणात्मक पावले टाकण्याचा विचार केला जातो तेंव्हा प्राथमिक शिक्षणाचाच प्रथम विचार केला जातो. शाहूंचे प्राथमिक शिक्षणविषयक विचार हे पूर्णपणे महात्मा फुलेंच्या शिक्षणविचारांशी मिळतेजुळते आहेत असे स्पष्ट दिसून येते. किंबहुना शाहूंच्या शिक्षणविचारांचा प्रेरणास्त्रोत महात्मा फुले होते असेही दिसून येते. प्राथमिक शिक्षण हे अगदी पायाभूत कौशल्यांवर म्हणजेच लिहिता वाचता येणे, काही गणितीय प्रक्रिया करणे, इतिहास, भूगोल व विज्ञान यासारख्या विषयांचे प्राथमिक स्तरावरील ज्ञान प्राप्त करणे यावर आधारभूत असते. एकूणच साक्षरता वाढविणे हे प्राथमिक शिक्षणाचे एक उद्दिष्ट असते असे मानता येईल तथापि एवढयाच मर्यादित दृष्टिकोनातून प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता असते असे शाहूंना वाटत नव्हते. छत्रपती शाहूंच्या मते उच्चभ्रू समाजातील लोक कनिष्ठ वर्गावर जो अन्याय करतात तो अन्याय थांबविण्यासाठी प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता होती. त्या कालखंडात गोरगरिबांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार, जमीनदार गरीब रयतेची, शेतकऱ्यांची व कुणबी कामगारांची प्रचंड पिळवणूक करीत होते. या रयतेला किमान शिक्षण प्राप्त झाले असते तर निश्चितच त्यांच्यावर होणारा अन्याय त्यांना कळू शकला असता व त्या विरोधात त्यांनी आवाज उठविला असता.

शाहू महाराजांच्या दृष्टिकोनातून अगदी थोडेच लोक उच्च शिक्षित असण्यापेक्षा बहुसंख्य लोक किमान प्राथमिक शिक्षित असणे अधिक उपयुक्त आहे. या अनुषंगाने शाहू महाराज म्हटले होते की, “रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे असे माझे मत आहे. रयतेतील मोठा भाग अडाणी राहिला व थोडेसे लोक विद्याचार प्रसन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते या थोडया लोकांच्या हाती पडणार व एक स्वदेशी ब्युराक्रसी तयार होणार.”[५१] म्हणजेच सर्व प्रजेस किमान प्राथमिक शिक्षण मिळेपर्यंत त्यांना स्वतःचे हक्क आणि अधिकार कळणार नाहीत. देशातील लोक उच्चशिक्षित असतील तर निश्चितच ती बाब देशासाठी भूषणावह

असते परंतु शाहूंच्या मते अगदी थोडेच उच्चशिक्षित व बाकी सारे अडाणी असतील तर ते देशाच्या दृष्टिने हितावह निश्चितच नाही. अशा परिस्थितीत देशांतर्गत स्वकीयांचीच एक सत्ता निर्माण होण्याची शक्यता असते व त्याचा त्रास लोकांना झाल्याशिवाय राहणार नाही. यामुळे सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मते शिक्षणामुळे प्रजेला स्वतःचा राज्य कारभार स्वतः चालविता येईल व अशा प्रकारच्या शिक्षणातूनच खरी लोकशाही निर्माण करता येईल. म्हणजेच लोकशाहीच्या समृद्धीसाठी प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता असते असे शाहूंच्या विचारांवरून दिसून येते.

**सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण :** छत्रपती शाहू महाराजांनी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. महात्मा जोतीराव फुले यांनी हंटर कमिशनला जे निवेदन सादर केलेले होते त्यातही त्यांनी सक्तीच्या मोफत शिक्षणाचाच पुरस्कार केलेला होता. त्यांच्या विचारांप्रमाणेच राजर्षी शाहू महाराजांनीही सार्वत्रिक व सक्तीच्या मोफत शिक्षणाचा पुरस्कार केला होता. यावरून राजर्षी शाहू महाराजही मेकॉलेप्रणित शिक्षणाच्या झिरपण्याच्या सिद्धांताला विरोध करणारे होते असे स्पष्ट होते. त्यांच्या बाबतीत विशेष बाब म्हणजे ते स्वतः कोल्हापूर संस्थानचे राज्यकर्ते असल्याने त्यांना आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाची योजना राबविता आलेली होती.

त्याकाळातील शिक्षणाचा विचार केला तर तळागाळातील लोकांनाच खऱ्या अर्थाने शिक्षणाची अधिक आवश्यकता होती. कुणबी, शेतकरी, दलित, अस्पृश्य अशा बहुजन समाजात शिक्षणाविषयी प्रचंड अनास्था होती. त्यामुळे शिक्षणासारख्या सोयी सुविधा असल्यातरीही या समाजात शिक्षणाची अनास्था असल्याने बहुजन समाज आपल्या मुलांना शाळेत पाठवित नव्हता. उलट शाळेत मुले पाठविण्यापेक्षा कुठेतरी कामाधंद्याला जुंपलेले चांगले असे मानले जायचे. त्यामुळे जोपर्यंत या वर्गाला सक्तीने प्राथमिक शिक्षण मिळत नाही तोपर्यंत समाजात शैक्षणिक विकास होणार नाही असे शाहूंना वाटत होते. मुळात शाहूंच्या मते उच्च शिक्षण घेतल्याने केवळ थोडया लोकांचा फायदा होतो परंतु तोच खर्च प्राथमिक शिक्षणावर केला तर अधिक लोकांना त्याचा फायदा होतो. आपल्या एका भाषणात शाहू

महाराज म्हटले होते की, "At present the money collected from all classes goes to support institutions for the benefit only of the intellectual classes. But I am for encouraging first such institutions as will be useful to all, and with this object I have recently introduced the measure of free and compulsory education. That is essential for progress in every branch, industrial, commercial, etc. Instead of applying their energy to institutions for secondary and higher education, educational bodies should, I think, work hard for the spread of free primary education."[५२] त्यांच्या या विचारांवरून स्पष्ट लक्षात येते की, समाजात विविध स्वरूपाचे जे कर भरावे लागतात ते सर्वांनाच असतात परंतु या करातून जे शिक्षण दिले जाते त्याचा उपयोग मात्र केवळ उच्च वर्गातील लोकच घेतात. या शिवाय शिक्षण खात्याकडून जे शिक्षणास प्रोत्साहन दिले जाते तेही याच वर्गाला दिले जात होते. शाहूंच्या मते मुळात हा असा वर्ग असतो की, या वर्गाच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज पडत नाही कारण या वर्गात शैक्षणिक जागृती अगोदरपासूनच असते. जर शिक्षण खात्यांनी अतिरिक्त कष्ट सक्तीच्या शिक्षणावर घेतले तर देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढल्याशिवाय राहणार नाही हे निश्चित होते. शाहू महाराजांनी समाजाचे निरीक्षण करून उच्चभ्रू आणि कनिष्ठ वर्ग यामधील विषमतेचे कारण शिक्षणातच आहे हे शोधले होते. त्यांच्या मते बहुजन समाजात ज्ञानार्जनाचा पर्याय न मिळू शकल्याने ही विषमतेची दरी दिवसेंदिवस आणखी वाढत गेली होती. त्यामुळे केवळ सक्तीच्या मोफत शिक्षणानेच या परिस्थितीत बदल होऊ शकतो असे त्यांना वाटत होते.

शाहूंनी सुचविलेल्या या सक्तीच्या शिक्षण संकल्पनेत मोफत हा एक महत्त्वाचा शब्द होता. हे शिक्षण बहुजनांचे शिक्षण असल्यामुळे ते मोफत असणे आवश्यक आहे अन्यथा सर्वसामान्य वर्गाला ते परवडणारे असू शकणार नाही. त्याचबरोबर ते मोफत नसेल तर बहुजन वर्ग स्वतःचे इतर काम बुडवून आपल्या मुलांना शाळेत पाठविणार नाही. शाहूंच्या मते शासनकर्त्याला मोफत शिक्षण चालविण्याचा आर्थिक भार परवडणारा नसतो. शाहूंनी सुचविलेल्या या योजनेबाबतही असाच सूर निघत होता. त्याकाळी असा एक विचार पुढे आलेला होता की, शिक्षण सक्तीचे करता येऊ शकेल परंतु ते मोफत करणे कठीण आहे. या

अनुषंगाने शाहू महाराजांनी काही उपाय सुचविले होते. त्यांनी स्वतःच्या संस्थानासाठी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा पास केलेला होता. या कायद्याच्या अंतर्गत निधीच्या उपलब्धतेसाठी शाहू महाराजांनी दि.२८ फेब्रुवारी १९१८ रोजी एक जाहीरनामा काढला होता. तो जाहीरनामा पुढील प्रमाणे होता. "सध्या लढाई वगैरे अनेक कारणाने महागाई जास्त वाढल्याने सरकारी खर्चही वाढला आहे व त्यामुळे शिक्षणासारख्या महत्त्वाच्या कामाकडे जरूर तितका पैसा देण्यास सवड होत नाही. लोक सुशिक्षित होणे तर फार आवश्यक असून ते काम जितके लौकर होईल तितके पाहिजेच आहे, याकरिता दर एक घरावर एक रूपयाप्रमाणे जादा फाळा प्राथमिक शिक्षणाकरिता म्हणून घेण्यात यावा व सदरची रक्कम अलाहिदा वसूल करून निराळी हुजूर खजिन्यात जमा व्हावी."[५३] म्हणजेच प्रत्येक घरावर एक रूपया ही रक्कम अधिक ठरणारी नव्हती तसेच त्यामुळे सर्वांच्या शिक्षणाचा प्रश्न मिटणार होता. या उपायानुसार कोणत्याही सरकारला सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण करता येणे शक्य आहे असे शाहूंना वाटत होते. या शिवाय राज्यातील जे इनामदार व सरंजामदार या सारख्या प्रतिष्ठित व श्रीमंत लोकांनी अतिरिक्त रक्कम शिक्षण कर म्हणून भरणे योग्य ठरेल. शाहूंनी अशा शाळांकरिता स्वतंत्र इमारतींची सोय केली जावी असेही सुचित केले होते, तथापि जेथे इमारती उपलब्ध होऊ शकणार नाही तेथे चावडी व मंदिरांचा वापर केला जावा असा पर्यायही त्यांनी सुचविलेला होता. केवळ इमारत किंवा जागा नाही म्हणून शिक्षणाच्या कामी खंड पडता कामा नये असे त्यांचे मत होते.

शाहू महाराजांच्या मते सक्तीच्या मोफत शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यक्षम यंत्रणा असणेही आवश्यक असते. या अनुषंगाने त्यांनी कोल्हापूर इलाख्यातील सक्तीच्या शिक्षणासाठी काही स्वतंत्र पदे भरलेली होती व तसे आदेशही काढलेले होते. या खात्याच्या अंमलबजावणीसाठी एक संचालक, एक शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकाऱ्याच्या मदतीसाठी दोन साहाय्यक अधिकारी व गावपातळीवर गावकामगार, मुलकी अंमलदार इत्यादी अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविली होती. या अनुषंगाने शाहू महाराजांनी दि.२८ फेब्रुवारी १९१८ रोजी एक जाहीरनामा काढलेला होता त्यात त्यांनी लिहिलेले होते की, "आपल्या सर्व

प्रजेला लिहिता वाचता आल्याखेरीज त्यांना आपली स्थिती सुधारता येणार नाही, अशी हुजूर सरकार यांना खात्री पटल्यावरून त्यांनी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास करून तो तारीख २९ माहे सप्टेंबर सन १९१७ चे ग्याझिटात प्रसिद्ध केला आहे व हे काम करण्याकरिता एक स्वतंत्र खाते करून रावसा. रघुनाथ नारायण आपटे यांना डायरेक्टर, व प्रोफेसर रामचंद्र बाबाचार्य पंडितराव यांना एज्युकेशनल इन्स्पेक्टर व राजश्री अनंत भाऊचार्य पंडितराव आणि रा.श्रीधर रघुनाथ वाकणकर यांना असि.इन्स्पेक्टर नेमिले आहेत. एज्युकेशनल इन्स्पेक्टर व असि.ए.इन्स्पेक्टर हे जेथे जेथे जातील तेथे तेथे त्यांना गाव कामगार व मुलकी व इतर अमलदार यांनी हरएक प्रकारची मदत केली पाहिजे. जर कोणाकडून त्यांना वक्तशीर मदत झाली नाही, असा त्यांचेकडून रिपोर्ट आला, तर त्याबद्दल सक्त विचार केला जाईल."[५४] यावरून स्पष्ट लक्षात येते की, शाहूंच्या दृष्टिकोनातून केवळ कायदा केल्याने ही समस्या मिटेल असे नाही तर तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र खाते व प्रशासकीय यंत्रणेचीही आवश्यकता आहे. त्यांनी त्यांच्या संस्थानमध्ये केवळ कायदाच केला नाही तर सुसज्ज अशी प्रशासकीय यंत्रणाही उभी केलेली होती.

शाहूंच्या मते केवळ सक्तीच्या मोफत शिक्षणाच्या कायद्यातील तरतूदी कठोर असणे आवश्यक होते. त्यानुसार त्यांनी या कायद्यात विद्यार्थी, त्याचे वय, त्याचे आई वडील किंवा पालक, कोणत्या शाळांचा समावेश यात असेल, शिक्षणाच्या सक्तीच्या अटी कशा असतील, त्या शिथील कोणासाठी असतील, प्रशासकीय यंत्रणांनी तयार करावयाचे रजिस्टर, कायदा पाळला गेला नाही तर होणाऱ्या शिक्षा, शिक्षेची अंमलबजावणी कोणी करावी या सर्वाबाबत नियम आणि पोटनियम तयार केलेले होते. या कायद्यानुसार सात ते चौदा वयोगटातील विद्यार्थ्यांना सर्वच शाळांमध्ये शिक्षण सक्तीचे करण्यात आलेले होते. सर्व प्रथम शिक्षणास योग्य वयाच्या मुलांचे रजिस्टर केले जावे असे सुचविण्यात आलेले होते. "ज्या ठिकाणी हा कायदा प्रथम लागू करण्याचे ठरेल त्यांतील शिक्षणास योग्य वयाच्या मुलांची यादी मामलेदाराने, पाटील कुलकर्णी यांच्या मदतीने व जरूर तर शाळाखात्यातील नोकरांच्या किंवा त्या ठिकाणच्या सभ्य गृहस्थांच्या मदतीने तयार करावी; ती हा कायदा लागू झाल्यापासून एक महिन्याचे आत

तयार करावी व नंतर प्रत्येक वर्षी जुलई महिन्यात तयार करावी, त्या यादीची एक प्रत मामलेदाराने यादी तयार झाल्यापासून दुसऱ्या महिन्याचे अखेरचे आत त्या ठिकाणांतील शाळांच्या हेडमास्तरास द्यावी व दुसरी एक प्रत चावडीवर किंवा अन्य प्रमुख स्थळी प्रसिद्धीची तारीख घालून चिकटवावी."[५५] म्हणजेच या कायद्यातून कोणी सुटू नये या कारणास्तव या वयोगटातील मुलांची यादी केली जावी असे सुचविण्यात आलेले होते. याशिवाय या कायद्यातून काही ठराविक परिस्थितीतच सूट दिली जाईल. कायद्यात नमूद केलेल्या सूट देण्यायोग्य बाबींशिवाय मात्र इतर कोणत्याही विद्यार्थ्याच्या बाबतीत सूट दिली जाणार नाही असेही या कायद्यात सुचविले होते.

छत्रपती शाहूंनी या कायद्या अंतर्गत जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठविणार नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल असेही सुचविले होते. "नियम क्रमांक ११ मध्ये सांगितल्याप्रमाणे मुलांचे नावांची यादी आलेवर त्यांच्या पालकांस मामलेदारांने समन्स काढावे, आणि त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे व ते संयुक्तिक न दिसल्यास प्रत्येक मुलाबद्दल एक रूपयापर्यंत दंड करावा. हा दंड प्रत्येक महिन्यास मुले शाळेत जाईपर्यंत करावा."[५६] म्हणजेच जे पालक आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पहात नाहीत ते किमान दंडात्मक कार्यवाही होईल या भीतीने तरी आपल्या मुलांना शाळेत पाठवतील असे शाहूंच्या विचारांवरून स्पष्ट होते. मुळात शाहूंच्या दृष्टिकोनातून कोणत्याही परिस्थितीत प्रजेचे शिक्षण महत्त्वाचे होते व याच अनुषंगाने असे कडक नियम शाहूंनी या कायद्यात टाकलेले होते.

एकूणच विचार करता शाहूंनी मांडलेली मोफत सक्तीच्या शिक्षणाची संकल्पना आदर्श स्वरूपाची होती. एकोणिसाव्या शतकात झालेल्या शिक्षण क्षेत्रातील वैचारिक जागृतीचे पडसाद २०व्या शतकात पडल्याचे दिसून येते. यापूर्वी महात्मा फुलेंनी एकोणिसाव्या शतकात सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा कायदा असावा याबाबत विचार मांडलेला होता. विसाव्या शतकात मात्र शाहूंच्या माध्यमातून या विचारांना मूर्त स्वरूप मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय घटनेने ४५ व्या कलमानुसार सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. इ.सन १९६० मध्ये

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण खात्यानेही सक्तीच्या मोफत शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे. यावरून पूर्वीच्या सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव निश्चितच विसाव्या शतकातील शैक्षणिक धोरणावर असल्याचे दिसून येते. शाहूंच्या व आजच्या सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यात मात्र एक बदल निश्चित जाणवतो तो म्हणजे शाहूंनी या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कठोर तरतूदी स्वीकारलेल्या होत्या परंतु आजच्या शिक्षणव्यवस्थेत मात्र ही योजना कागदोपत्रीच अधिक दिसून येते त्यामुळे अपेक्षित यश सक्तीच्या शिक्षणास आलेले दिसत नाही.

## ३) शाहू महाराजांचे माध्यमिक व उच्च शिक्षण विषयक विचार

राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा करून शिक्षण क्षेत्रात एक मोठी क्रांती घडवून आणली होती. या कायद्यावरून त्यांनी प्राथमिक शिक्षणाला अधिक महत्त्व दिले होते हे स्पष्ट दिसून येते. अर्थात त्यांनी माध्यमिक व उच्च शिक्षणास विरोध केला असे मात्र नाही. शिक्षण व्यवस्थेची रचनाच अशी असते की, प्राथमिक पासून वरच्या वर्गाकडे जातांना हळूहळू शिक्षण घेणाऱ्यांची संख्या कमी कमी होत जाताना दिसते. म्हणजेच उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी असते यामुळे शाहूंनी प्राथमिक शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले होते. तथापि त्यांच्या मते देशाच्या विकासामध्ये माध्यमिक व उच्च शिक्षणालाही तेवढेच महत्त्वाचे स्थान आहे. या अनुषंगाने त्यांनी स्वतः आपल्या एका भाषणात याबाबतीत खुलासा केलेला होता. ते म्हणाले होते की, "प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे. तरी दुय्यम व उच्च शिक्षणाकडे माझं लक्ष कमी नाही. माझे संस्थान सातारा बेळगांव या जिल्ह्यांपेक्षा लहान असताही आमचेकडे सात हायस्कुले चालू आहेत व दोन लवकरच सुरू होतील. शिवाय युनिव्हर्सिटीचे पुरे शिक्षण देणारे एक कॉलेजही आहे."[५७] यावरून लक्षात येते की, त्यांनी प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक व उच्च शिक्षणालाही महत्त्व दिले होते.

त्या कालखंडात बहुजन समाजातील लोक नोकऱ्यांपासून वंचित होते कारण त्यांच्यात कमालीची निरक्षरता व उच्च शिक्षणाचा अभाव होता. त्यामुळे प्रत्येक नोकरीत उच्चभ्रूंचीच मक्तेदारी होती. नोकऱ्यांची संधी सर्वसामान्य बहुजन समाजाला मिळावी या हेतूने शाहूंनी या समाजालाही माध्यमिक व उच्च शिक्षण मिळावे असे विचार मांडले होते. या बाबतीत त्यांनी मुंबई इलाख्याचे ब्रिटिश शिक्षण संचालक मि.ई.जाईल्स यांच्याशी चर्चा केलेली होती. जाईल्स यांना पाठविलेल्या एका पत्रात शाहू महाराजांनी लिहिले होते की, "शिक्षणाच्या बाबतीत मराठयांना पुढे आणण्याच्या कामी काही खास प्रयत्न करण्याची अत्यंत आवश्यकता आहे, ही गोष्ट मला सर्वस्वी मान्य आहे. त्यांचे आचारविचार उच्च शिक्षणाला बिलकुल अनुकूल नाहीत. त्याकारणे ब्राह्मणांशी त्यांची तुलना केली असता मराठे मागे पडतात. मी जेंव्हा कोल्हापूर कॉलेज पाहिले तेंव्हा मराठे उच्च शिक्षण चिकाटीने संपादन करीत नाहीत, असे माझ्या अनुभवास आले. उच्च शिक्षणाच्या अशा हेळसांडीमुळे माझ्याकडे शिक्षण खात्यात नोकरीसाठी मराठयांचे अर्ज क्वचितच येतात. हा मराठयांकडून होत असलेल्या उच्च शिक्षणाच्या हेळसांडीचा नैसर्गिक परिणाम होय. इतर खात्यांतही हीच स्थिती आहे."[५८] त्यांच्या या विचारांवरून स्पष्ट लक्षात येते की, उच्च शिक्षणामध्ये केवळ उच्चभ्रू जमातींचांच सहभाग होता. मराठा व इतर बहुजन समाज शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत होता याबाबतीतही त्यांना खेद वाटत होता.

या बहुजन समाजाच्या उच्च शिक्षणात एवढी हेळसांड झाली त्याचे कारणही त्यांनी जाणले होते. त्यांच्या मते त्या समाजाकडे कष्टाने अभ्यास करून आपला अभ्यासक्रम पूर्ण करण्याची चिकाटी नव्हती. या समाजाला शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध विषयांचा अभ्यास करून परीक्षांची तयारी करीत बसण्यापेक्षा आपला पिढीजात व्यवसाय चालविण्यात अधिक धन्यता वाटत होती, तथापि पिढीजात व्यवसायही शिक्षण घेतल्याने अधिक चांगला करता येऊ शकतो याची समज मात्र या समाजाकडे नव्हती. एकूणच माध्यमिक व उच्चशिक्षणाविषयी शाहूंच्या मनात विशेष कळकळ होती हे दिसून येते. शाहूंनी प्राथमिक शिक्षणात सक्तीचा कायदा केलेला होता तथापि माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी असे कायदे

करणे कठीण होते हे शाहू महाराज जाणत होते. तरीही त्यांनी त्यांच्यापरीने शिक्षणाचा प्रसार व्हावा या दृष्टिकोनातून जनतेला प्रोत्साहित केल्याचे दिसून येते.

## ४) शाहू महाराजांचे अस्पृश्य शिक्षण विषयक विचार

शाहू महाराजांनी महात्मा जोतीराव फुले यांच्याप्रमाणेच अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या जातीतील लोकांच्या शिक्षणाविषयी आपले विचार मांडलेले होते. त्या कालखंडात अस्पृश्य जातीतील लोकांची अवस्था अतिशय हालाखीची होती. या जातींना समाजाकडून कोणत्याही प्रकारचे अधिकार दिले जात नव्हते. त्यांना शिक्षणाचा अधिकारही नाकारण्यात आलेला होता. उच्चभूंची अतिशय हीन दर्जाची कामे या जातींतील लोकांना करावी लागत होती. शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी महार वतने खालसा करण्यास सरूवात केलेली होती. या अनुषंगाने काही महार जातीतील लोकांनी शाहू महाराजांकडे 'महार वतन खालसा करावे या अनुषंगाने एक विनंती अर्ज केलेला होता. या अर्जात त्यांनी त्यांच्या वाईट अवस्थेचे वर्णन केलेले होते. "आमची वतनी नोकरी म्हणजे गावची वेठबिगार करणे, लाकडे फोडणे, जनावरांची प्रेते वाहणे आणि गावची गलिच्छ कामे करणे, ही कामे वतन कारणाने म्हणून आमचेवर लादली आहेत, तो पर्यंत आम्ही तसेच क्षुद्र राहणार."[५९] यावरून लक्षात येते की, या समाजास किती हलकी सलकी कामे करावी लागत होती. कित्येक अस्पृश्यांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीवही नव्हती. याचे प्रमुख कारण म्हणजे या समाजास शिक्षण मिळत नव्हते.

शिक्षणाच्या अभावाने या समाजाचे द्विमार्गी शोषण चालू होते. त्यातील पहिले शोषण म्हणजे त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन उच्चभ्रू त्यांच्या श्रमाचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी करीत होता. त्यांच्या शोषणाचा दुसरा मार्ग म्हणजे अज्ञान प्रचंड असल्यामुळे विविध अनिष्ट चालिरितींचा बळी हा समाज ठरत होता. त्यामुळे या समाजाला खऱ्या अर्थाने शिक्षणाची आवश्यकता होती. छत्रपती शाहू महाराज हे स्वतः अस्पृश्यता न मानणारे होते. अस्पृश्यतेचे खरे कारण त्यांना जातिभेदात दिसत होते. जोपर्यंत समाजाला चांगले शिक्षण मिळत नाही

तोपर्यंत जातिभेदाच्या पाशातून समाजाची सुटका होणार नाही हे शाहूंनी ओळखलेले होते. म्हणून त्यांनी अस्पृश्य शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केलेला दिसतो.

महात्मा जोतीराव फुले यांनी पुण्यात अगदी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर अस्पृश्य शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केलेला होता. त्यांच्या शैक्षणिक विचार व कार्यामुळे काही प्रमाणात का होईना अस्पृश्यांच्या शिक्षणात बदल झालेला होता. अर्थात लोकसंख्येचा विचार करता हा बदल खूप सकारात्मक होता असे नाही. या अनुषंगाने शाहूंनी पुढे त्यांच्या विचारांच्या माध्यमातून अस्पृश्यांचे शिक्षण आणखी विस्तारित कसे होईल या अनुषंगाने प्रयत्न केलेले होते. शाहू महाराजांच्या दृष्टिकोनातून शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील अस्पृश्यता नष्ट करणे शक्य होते तथापि हा समाज सुशिक्षित होण्यामध्ये दोन अडथळे प्रामुख्याने त्यांना वाटत होते ते म्हणजे शिक्षण व नोकऱ्या ही उच्चवर्णियांची मक्तेदारी होती व अस्पृश्य समाजात शिक्षणाविषयी अजिबात जागृती नव्हती. या समाजाने शिक्षणासाठी पुढे यावे यासाठी सरकारी नोकऱ्या या समाजासाठी आरक्षित असाव्यात असे त्यांना वाटत होते. नोकऱ्यांची हमी त्यांना मिळाली तर निश्चितच ते लोक शिक्षणाकडे वळतील असा विश्वास शाहूंना होता. शाहूंनी आपल्या संस्थानामध्ये महार, मांग यासारख्या अस्पृश्य जातींना वकिलीच्या सनदा दिलेल्या होत्या.

छत्रपती शाहू महाराजांनी केवळ अस्पृश्य शिक्षणासंबंधी आपले विचार मांडले असे नाही तर त्या अनुषंगाने त्यांनी स्वतः प्रयत्नही केलेले होते. त्यांनी अनेक हुकूम व जाहीरनामे केवळ अस्पृश्यता निवारणासाठी काढलेले होते. शिक्षण खात्याच्या जाहीरनाम्याबावत विचार करता शाहू महाराजांनी खूप अभ्यासपूर्वक एक ठराव केलेला दिसतो. त्याकाळी शाळांमध्ये विशेषतः जेथे उच्चभ्रूंच्या शाळा आहेत तेथे अस्पृश्यांना अतिशय हीन वागणूक मिळायची म्हणून शाहू महाराजांनी अशा प्रकारे भेदभाव होऊ नये या अनुषंगाने कठोर जाहीरनामा काढलेला होता. त्यात असे म्हटलेले होते की, "हुजुरांच्या असे पाहण्यात आले की, अस्पृश्यांना व स्पृश्यांना शाळा खात्यात निरनिराळया तऱ्हेने वागविले जाते व अस्पृश्यांना शाळा खात्यांच्या इमारतीच्या कंपाउंडच्या आत येऊ दिले जात नाही. सरकारी इमारती खाजगी

उपयोगासाठी दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नसून अस्पृशांची प्रत्येक तऱ्हेने काळजी घेतली पाहिजे. शिक्षणसंस्था गरीब लोकाकरिता असून गरिबातील गरीब जे अस्पृश्य त्यांना समतेच्या पायावर वागविणे योग्य आहे. ते कर देतात तर मग त्यांना वाईट रीतीने का वागवावे? हुजुरांची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे की शाळा खात्यातील ज्या खाजगी किंवा सरकारी संस्थांना ग्रॅंट किंवा इमारती किंवा प्लेग्राऊंड वगैरे रूपाने मदत मिळते त्यांनी स्पृश्यवर्गापेक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे. कारण स्पृश्यलोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात, परंतु अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही. जर अस्पृश्यांना समतेने वागविले नाही, तर मग तो प्रिन्सिपॉल अगर खालच्या दर्जाचा शिक्षक असो, त्याला जाब द्यावा लागेल आणि खाजगी संस्थांना जी मदत मिळते ती काढून घेण्यात येईल."[६०] शाहूंच्या या जाहीरनाम्यावरून स्पष्ट दिसून येते की, अस्पृश्यांना कशी हीन वागणूक शाळांमध्ये मिळायची. त्यांच्या मते अस्पृश्य व गरिबांच्यासाठी खऱ्या अर्थाने या शाळा व संस्था असायला हव्यात. त्यांच्या या विचारांवरून एक महत्त्वाची बाब समोर येते ती म्हणजे शाळा खात्याने जागरूक राहून अशा प्रकारे गरीब व अस्पृश्यांच्या शिक्षण अधिकारावर गदा येते का ते पाहणे आवश्यक आहे. शाहूंचे हे विचार आजच्या काळातही संयुक्तिक आहेत कारण अनेक मोठाल्या व नावाजलेल्या शांळामध्ये गरीब व अस्पृश्य मुलांना प्रवेश नाकारले जातात. या बाबतीत शाळा खात्याने कार्यवाही करणे अगत्याचे आहे.

त्या कालखंडात अस्पृश्यता उद्धारासाठी अस्पृश्यांच्या शाळा असाव्यात अशा प्रकारचे विचार मांडण्यात येत होते. त्या अनुषंगाने अनेक अस्पृश्य शाळाही स्थापन करण्यात आलेल्या होत्या. छत्रपती शाहू महाराजांनी या अस्पृश्य शाळांचा अभ्यास करून असा एक निष्कर्ष काढला होता की, अस्पृश्यांकरिता स्वतंत्र शाळा असल्याने केवळ त्यांना शिक्षण मिळेल परंतु स्पृश्य व अस्पृश्य भेद मात्र मिटू शकणार नाही. यासाठी अस्पृश्यांकरिता स्वतंत्र शाळा असू नयेत असेही विचार त्यांनी मांडलेले होते. उलट हा भेद खऱ्या अर्थाने मिटविण्यासाठी स्पृश्य व अस्पृश्य अशा दोन्हीही शाळा एकच असाव्यात दोन्ही गटातील मुलांना कुठल्याही प्रकारची

शिवाशीव न पाळता एकाच शाळेत व एकाच वर्गात शिक्षण घेण्याची मुभा असावी असे विचार शाहूंनी मांडलेले होते. असे केल्यानेच हा भेद मिटू शकतो असा विश्वास शाहूंचा होता. याबाबतीत त्यांनी दि.८ ऑक्टोबर १९१९ रोजी स्पृश्य अस्पृश्यता शाळा एकत्रीकरणाचा ठराव पास केलेला होता. त्यात त्यांनी म्हटले होते की, "करवीर इलाख्यात (जहागिरी सोडून) अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा आहेत, त्या सर्व येत्या दसऱ्यापासून बंद करण्यात आल्या आहेत. व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घेत जावे. सरकारी शाळांतून शिवाशीव पाळण्याची नसल्याने सर्व जातींच्या व धर्मांच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे."[६१] त्यांच्या या जाहीरनाम्यावरून त्यांच्या विचारांची प्रगल्भता किती होती हे स्पष्ट दिसून येते. शाहूमहाराजांसारख्या नेत्यांनी जर अशा प्रकारचे विचार मांडलेले नसते तर कदाचित आजही उच्चभ्रूंसाठी वेगळया शाळा व अस्पृश्यांसाठी वेगळया शाळा असेच चित्र पहावयास मिळाले असते. त्यांनी त्यावेळी घेतलेला हा निर्णय आजच्या शिक्षण पद्धतीत उपयुक्त ठरताना दिसून येतो. शाहू महाराजांना अस्पृश्यांसाठी अस्पृश्य हा शब्द वापरणे संयुक्तिक वाटत नव्हते. त्यांच्या मते जोपर्यंत हा शब्द आहे तोपर्यंत हा कलंक समाजातून नष्ट होणार नाही. त्या अनुषंगाने त्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना अस्पृश्य न म्हणता 'सूर्यवंशी' म्हणावे असा एक ठराव मंजूर केलेला होता.

एकूणच विचार करता शाहूमहाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न तडीस नेण्यासाठी अभ्यासपूर्वक नियोजन केलेले होते. त्यांच्या अस्पृश्यविषयक शिक्षण विचारांचा आजच्या शिक्षण पद्धतीतही उपयोग होताना आपल्याला दिसून येतो. आजच्या काळात अस्पृश्यांमध्ये चांगल्या प्रकारची शैक्षणिक जागृती झालेली दिसते हे शाहू महाराजांच्या अस्पृश्य शिक्षणविषयक विचारांचे यश म्हणावे लागेल.

## ५) शैक्षणिक विकासात वसतिगृहांची आवश्यकता

शाहू महाराजांच्या दृष्टिकोनातून शिक्षण विकासात वसतिगृहांचे अनन्य साधारण असे महत्त्व असते. किंबहुना वसतिगृहे शिक्षण विकासात एक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात

असे त्यांचे मत होते. शाहूंच्या पूर्वीच्या समाज सुधारकांनीही वसतिगृहात राहून शिक्षणाची व्यवस्था असावी असा उपाय सुचविलेला होता. एकोणिसाव्या शतकातील एक महत्त्वाचे सुधारक न्यायमूर्ती रानडे यांनी उच्च शिक्षण घेत असताना वसतिगृहात विद्यार्थी इतर घरगुती समस्यांपासून दूर राहतात व त्यामुळे त्यांचे लक्ष केवळ अभ्यासावर केंद्रित होते तसेच ते नियमित आपल्या शिक्षकांच्या सानिध्यात राहू शकतात असे विचार मांडलेले होते. शाहू महाराजांनी एकोणिसाव्या शतकातील सुधारकांच्या विचारांना मूर्त स्वरूप देऊन कोल्हापूर संस्थानमध्ये वसतिगृहांचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या कार्यामुळे शिक्षण विकासास हातभार लागलेला होता.

शाहू महाराजांची वसतिगृहांची उपाययोजना करण्यापाठीमागे एक निश्चित अशी भूमिका होती. शाहू महाराज पूर्वीच्या काळी शिक्षण घेणे किती कठीण होते हे जाणणारे होते. शिक्षणासाठी वसतिगृहांची आवश्यकता का होती हे सांगताना त्यांनी सातारचे महाराज श्री प्रतापसिंहांचे उदाहरण दिलेले होते. ते पेशव्यांच्या ताब्यात असताना त्यांना शिक्षण टाळले जात होते तेंव्हा शिक्षणासाठी त्यांना खूप अडचणींचा सामना करावा लागला होता. या बाबीचा उल्लेख शाहू महाराजांनी दि. २७ जुलै १९२० रोजीच्या हुबळी येथील भाषणात केलेला होता. त्यात ते म्हणतात की, "श्रीप्रतापसिंह महाराज छत्रपति हे पेशव्यांचे ताब्यात असता लहानपणी लिहिणे वाचणे शिकण्याचीही त्यांना बंदी होती तेंव्हा त्यांच्या पूज्य व धोरणी आईने त्यास रात्री बारा वाजता उठवून ब्राह्मणेंतर पंतोजींकडून लिहिणे वाचणे शिकविण्याचे काम केले."[६२] एकूणच यावरून असे होते की, महाराजांच्या शिक्षणाची मोठी परवड होती. स्वतः त्यांना रात्रीच्या वेळी शिक्षण संपादित करावे लागले होते. जर त्यांची अशी परवड असेल तर सर्वसामान्य समाजाच्या शिक्षणाची काय अवस्था असेल याचा अंदाज आपल्याला येऊ शकतो. शाहूंच्या मते ब्रिटिश साम्राज्यामुळे मात्र या परिस्थितीत बदल झालेला होता. त्यांनी सर्वांसाठी शिक्षण खुले केलेले होते. केवळ समाजाची जबाबदारी होती की, त्यांनी कोणत्या ना कोणत्या मार्गाने शिक्षण संपादित करणे महत्त्वाचे होते.

तत्कालीन समाजास दारिद्रय, दुष्काळ साथींचे आजार या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. अशा परिस्थितीत गोरगरिब व मागासलेल्या जातीतील लोक आपल्या मुलांना शाळेत पाठवित नव्हते. वास्तविक या पालकांना आपल्या मुलांना शाळेत पाठविणे आर्थिकदृष्टया शक्य नव्हते. त्याच बरोबर बाहेरगावी मुले पाठवून त्यांच्या राहण्याचा, जेवणाचा व शिक्षणाचा खर्च पेलवणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे अशी मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी सरकारने वसतिगृहांची सोय करावी असे विचार शाहूंनी मांडलेले होते. अशा वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवण्याची व अभ्यासाची सोय होऊ शकेल असा सकारात्मक विचार शाहू महाराजांचा यापाठीमागे होता. शाहू महाराजांनी याच भूमिकेतून कोल्हापूर संस्थानमध्ये अशा प्रकारच्या वसतिगृहांना प्रोत्साहन दिलेले होते. इ.सन १८९६ मध्ये छत्रपती शाहूंनी स्वतः शासकीय पातळीवर अशा प्रकारचे एक वसतिगृह स्थापन केलेले होते.

शाहू महाराजांनी वसतिगृहांचे काही महत्त्वाचे फायदे सांगितले होते. त्यांच्या मते प्रत्येक जातीने स्वतःचे स्वतंत्र वसतिगृह स्थापन करावे. त्यामुळे सर्वच जातींचा विकास होऊ शकेल असा त्यांना विश्वास होता. भारतात जातीमत्सर एवढा आहे की, प्रत्येक जात केवळ स्वतःपुरताच मर्यादित विचार करते. हा एक भारतीय समाजव्यवस्थेचा दोष त्यांना वाटत होता. आपले शैक्षणिक धोरण मांडताना एका भाषणात त्यांनी असे स्पष्ट केले होते की, "The evil of India is that each caste looks after its own people and they are indifferent to others. I therefore, encouraged the different castes such as Marathas, Lingayats, Jains, Tailors, Goldsmiths, Mahomedans and the Depressed Classes or 'Untouchables', as they are called, to have their own hostels. There the boys are looked after by superintendents of their own castes. They can study there free from the unhealthy influence of their homes."[६३] प्रत्येक जात दुसऱ्या जातीच्या विकासासाठी पुढे येणार नसेल तर या प्रत्येक जातींनी स्वतःचे स्वतंत्र वसतिगृह स्थापन करावे म्हणजे त्या जातींच्या शिक्षणाचा प्रश्न मिटेल. त्या अनुषंगाने शाहू महाराजांनी त्या त्या जातीतील प्रमुख व्यक्तींना वसतिगृहे स्थापन करण्यासाठी प्रोत्साहनही दिलेले होते. अशा वसतिगृहांमध्ये त्या त्या जातीतील मुलांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण करावा अशी त्यांची इच्छा होती.

शाहू महाराजांनी वसतिगृहांकडे एक जातीभेद निर्मूलनाचे माध्यम म्हणूनही पाहिले होते. विविध जातींनी जी वसतिगृहे स्थापन केलेली होती त्यांनी एकमेकांना मदत करून शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न करावा असेही त्यांना वाटत होते. एवढेच नाही तर एकाच वसतिगृहात विविध जातींची मुलेही राहू शकतात. त्यामुळे त्यांच्यातील आदरभाव वाढून जातीबंधने लुप्त होतील असाही त्यांचा विचार होता. शाहूंच्या कार्याने प्रेरित होऊन कोल्हापूर संस्थानाबाहेर वसतिगृहे स्थापण्याचे कार्य सुरू झालेले होते.

नाशिक येथे उधाजी मराठा बोर्डिंगची स्थापना करण्यात आलेली होती. या बोर्डिंगच्या कोनशिला बसविण्याच्या कार्यक्रमास शाहू महाराज उपस्थित होते. तेथे केलेल्या भाषणात त्यांनी शिक्षण विकासासाठी व जातीभेद निर्मूलनासाठी वसतिगृहांचे महत्त्व काय आहे याविषयी आपले विचार मांडले होते. हे मराठा वसतिगृह असले तरीही तेथे इतर जातीतील मुलांनाही प्रवेश मिळणार होता या बाबीचे कौतुक शाहू महाराजांनी केलेले होते. आपल्या भाषणात शाहू महाराज म्हटले होते की, “The policy of this Boarding, I am glad to say is worthy of imitation. Though it has sprung from the munificient donations of the Marathas at the time of the Maratha Educational conference it really speaks volumes for the patriotism and liberal mindedness of the organizers to find the Boarding kept open to students of all the castes. One can never succeed in adquately praising the efforts of those who come forward with full moral courage and with the true spirit of satyagraha to practice the elementary principles preached by the Sataya Shodhak Samaj that all people as the children of God are kith, and kin. That this principles should spread as widely as possible is a consummation devotly to be wished; for none can doubt that it is a spread that will be greatly instrumental in bringing about unity by toning down angularities of the caste.”[६४] म्हणजेच शाहूंच्या मते सत्यशोधक समाजाच्या शिकवणीनुसार जर सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे असतील तर सर्वांना एकत्र राहण्यास काहीच हरकत नाही. मराठा बोर्डिंगच्या संयोजकांनी इतर जातींतील मुलांना प्रवेश देण्याचे ठरविल्यामुळे निश्चितच जातीभेद कमी होण्यास हातभार लागेल. त्यांच्यात एककमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती वाढत जाईल.

एकूणच विचार करता असे स्पष्ट दिसून येते की, ज्याठिकाणी सर्व जातींसाठी एक वसतिगृह शक्य नसेल तेथे वेगवेगळी वसतिगृहे असावीत व जेथे एकच वसतिगृह शक्य असेल तेथे त्याच वसतिगृहात सर्व जातीतील मुलांना प्रवेश मिळावा असे त्यांना वाटत होते. या दोन्हीही प्रकारच्या वसतिगृहांचा शैक्षणिक विकासात निश्चित असा उपयोग होतो असा त्यांना विश्वास होता. त्यांच्या मते वसतिगृहांच्या स्थापनेमुळे संघटनात्मक कार्य वाढीला लागते म्हणून त्यांनी अनेक ठिकाणच्या भाषणात वसतिगृहासंबंधीचे आपले विचार मांडलेले दिसून येतात. याच दृष्टिकोनातून कोल्हापूर संस्थानमध्ये त्यांनी अनेक वसतिगृहांच्या स्थापनेला प्रोत्साहन दिलेले होते व या गोष्टीचा त्यांना अभिमान वाटत होता. त्यांच्या मते ब्रिटिश पार्लमेंटला जसे सर्व लोक 'मदर ऑफ पार्लमेंटस' असे म्हणतात तशाच पद्धतीने कोल्हापूरमधे अनेक वसतिगृहे असल्याकारणाने कोल्हापूरला 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' म्हणत होते. त्यांच्या या विचारांतून विद्येच्या प्रसारासाठी वसतिगृहांची किती नितांत आवश्यकता असते हे स्पष्ट दिसून येते.

आजच्या काळातील शिक्षण व्यवस्थेचा विचार करता, आजही वसतिगृहांना अनन्य साधारण असे महत्त्व आहे. आजच्या काळात विविध उच्च शिक्षण देणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यातील अनेक माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालये, विद्यापीठीय महाविद्यालये, तांत्रिक महाविद्यालये तसेच कृषी व वैद्यक महाविद्यालयांमध्ये वसतिगृहांच्या सोयी आहेत. आजच्या काळात 'रेसिडेन्शिअल स्कूल' ही एक संकल्पना मूळ धरू लागलेली आहे. पूर्वीच्या काळी केवळ गरीब लोकांकरिताच असलेली वसतिगृहे आजच्या काळात श्रीमंतांनाही महत्त्वाची वाटू लागलेली दिसतात. आज अनेक मोठाल्या 'रेसिडेन्शिअल स्कूल' मध्ये श्रीमंत लोक आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठविताना दिसत आहेत.

## ६) शाहू महाराजांचे व्यवसाय शिक्षणविषयक विचार

छत्रपती शाहू महाराजांनी केवळ प्राथमिक शिक्षणावरच भर दिला होता असे नाही तर त्यांनी व्यवसाय शिक्षणाचाही उल्लेख आपल्या शिक्षण विचारांमध्ये केलेला होता. आपल्या

विविध ठिकाणी केलेल्या भाषणांमध्ये त्यांनी शेती व्यवसायात, विविध व्यापार व उद्योग धंद्यात, विविध प्रकारच्या कारागिरीच्या व्यवसायात व वैद्यक क्षेत्रात सुनियोजित शिक्षणाची कशी नितांत आवश्यकता आहे या विषयी आपले विचार मांडलेले होते. शाहू महाराजांपूर्वीही एकोणिसाव्या शतकातील अनेक समाज सुधारकांनी व्यवसाय शिक्षणविषयक आपले विचार मांडले होते.

शाहू महाराजांनी शेती व्यवसायास आपल्या विचारांमध्ये विशेष महत्त्व दिलेले होते. मुळात भारतातील ८०% लोक हे शेतीवर अवलंबून आहेत त्यामुळे शेती व्यवसायाच्या सुधारणेसाठी शाहूंना शेती शिक्षणाची नितांत आवश्यकता वाटत होती. त्या कालखंडात आणि काही प्रमाणात आजच्याही काळात असा एक समज आहे की, अडाणी लोकांनी करावयाचा व्यवसाय म्हणजे शेती आहे. आजही ग्रामीण भागातील कित्येक पालक आपल्या मुलांना शिक्षणाबाबतीत हीच भीती घालताना दिसतात की, जर ते शिकले नाही तर त्यांना शेती करावी लागेल. म्हणजेच अप्रत्यक्षरित्या ते शिकलेल्यांनी शेती करायची नसते असा एक दंडक आपल्या मुलांसमोर निर्माण करतांना दिसतात. शाहूंच्या मते प्रत्येक शेतकऱ्याने शिक्षण घेणे आवश्यक आहे कारण हा व्यवसायही सुशिक्षितांनीच करणे आवश्यक आहे. या बाबतीत शाहूंनी खामगाव येथील दि २७ डिसेंबर १९१७ रोजी झालेल्या ११ व्या मराठा शिक्षण परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात सांगितलेले होते की, "आम्ही कसे खावे, श्वास कसा घ्यावा, हेही आम्हास शिकले पाहिजे हे सांगणे जरासे चमत्कारिक दिसते. तथापि ही गोष्ट खरी आहे. हल्लीच्या काळी शेतकी इतकी पद्धतशीर झालेली आहे की, ज्याला यात यश मिळवावयाचे आहे, त्याला त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व समजली पाहिजेत."[६५] म्हणजेच शाहूंच्या मते अनेकांना शेती करणे हा सहज करता येण्याजोगा व्यवसाय वाटतो. जो शेतकरी कुटुंबात जन्माला त्याला शेतीचे कौशल्य प्राप्त होते. विविध अवजारांची माहिती त्याला कळते त्यामुळे त्यास शिक्षणाची आवश्यकता नाही असा समज होतो. परंतु आधुनिक काळात शेती करण्याबाबतचे नवनवीन तंत्रज्ञान विकसित झालेले आहे. हे ज्ञान आत्मसात करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे शाहूंना वाटत होते.

शाहू महाराजांच्या मते भारतातील सर्वात मागासलेला वर्ग हा शेतकरी आहे. शिक्षणाच्या अभावानेच या वर्गाला समाजात कोणतीही प्रतिष्ठा मिळत नाही. शाहूंच्या मते युरोपियन देशातील शेतकऱ्यात व भारतीय शेतकऱ्यात जमीन आसमानचा फरक आहे. तेथील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती करताना दिसतात. तशाच पद्धतीचे ज्ञान भारतीय शेतकऱ्यांनी आत्मसात करावे असे शाहूंच्या विचारांवरून दिसते. शेती करण्यासाठी जी विविध अवजारे वापरावी लागतात त्यांचेही ज्ञान शेतकऱ्यांना आवश्यक असते असे त्यांना वाटत होते. शेतकऱ्यांनी शिक्षण घेऊन शेती व्यवसाय भरभराटीस आणावा असे शाहूंच्या विचारांवरून दिसून येते.

शेती व्यवसायाशिवाय जनतेने विविध प्रकारच्या व्यापार व धंद्याचे शिक्षण घ्यावे असेही त्यांचे मत होते. शेती व्यवसायावर अधिक लोकसंख्या अधारभूत असल्याने जनतेचा व परिणामी देशाचा आर्थिक विकास खुंटतो. शेतीमध्ये पुरेसे उत्पन्न निघत नसल्याने व शेतीवर अधिकाधिक लोकसंख्या अवलंबून असल्याने अनेक लोक शहराकडे मिळेल ते काम करण्यासाठी जातात त्यामुळे शहरातील मिळणाऱ्या कामातही बेकारी निर्माण होते व शेतीची कामेही व्यवस्थितपणे केली जात नाहीत. अशा परिस्थितीत केवळ शेतकरी बनून राहणे संयुक्तिक ठरणारे नाही. शेतीत जेवढी लोकसंख्या पुरेशी आहे तेवढयाचाच विचार होऊन उर्वरित मात्र इतर व्यापार व उद्योगधंद्याकडे वळणे आवश्यक असते असे शाहूंना वाटत होते. मराठा शिक्षण परिषदेतील आपल्या भाषणात शाहूंनी सांगितले होते की, "शिक्षणाचा प्रश्न आणि त्याची निरनिराळी स्वरूपे याजकडे प्रथमतः आमचे लक्ष गेले पाहिजे. आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन रहावे ही स्थिति आम्हाला समाधानकारक नाही. म्हणून व्यापार धंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यात आम्हास शिरण्याची जरूरी आहे. हल्ली आम्ही व्यापार व उदीम यात पडतच नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नति व्यापार व तत्संबंधीची चळवळ यावर अवलंबून आहे. खरोखर व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्रांचा धर्मच झाला आहे. येथे धर्म म्हणजे बुद्धियुक्त स्वहित साधने असे मी समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील."[६६] एकूणच शाहूंच्या या विचारांवरून

स्पष्ट होते की कोणतीही चळवळ शिक्षणाशिवाय पूर्ण होत नाही. त्यांच्या मते असा कोणताही व्यवसाय नाही की, ज्यास शिक्षणाची आवश्यकता नसते. शेतीवरील वाढता बोजा केवळ विविध प्रकारच्या व्यापाराने व व्यवसायाने दूर करता येऊ शकेल व अशा धंद्यासाठी योग्य प्रकारचे प्रशिक्षण शिक्षणाच्या माध्यमातून जनतेला मिळावे अशी अपेक्षा शाहू महाराजांनी व्यक्त केल्याचे दिसते.

शाहू महाराजांनी कारागीर व हस्त कलेच्या वस्तू बनविणारे कलाकार यांच्या शिक्षणाविषयीदेखील आपले विचार स्पष्ट केलेले होते. भारतामध्ये अनेक कारागीर आहेत जे दैनंदिन वापरातील अनेक वस्तू बनवित असतात परंतु त्यांच्या कलेची त्यांना स्वतःस जाणीव नसते. त्यामुळे अशा लोकांचे व्यवसाय उर्जितावस्थेला येत नाहीत. मुळात आपल्या ठायी असलेल्या कलेचे संगोपन करून इतरांनाही कला शिकवावी एवढा मोठेपणा या लोकात दिसत नाही. हा एक त्यांचा दोष आहे असे शाहूंना वाटत होता. या बाबतीत शाहू महाराज म्हणतात की, "कलाकौशल्याच्या शाळेसंबंधाने फारसे सांगावयास नको. आपले कौशल्य आपल्या मुलांशिवाय दुसऱ्यास शिकवावयाचे नाही, अशी जी घातुक प्रवृत्ती होती तिच्यामुळे आमच्या कलांचा फार ऱ्हास झाला आहे."[६७] शाहूंच्या या विचारांवरून एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे कला कौशल्यावर अधारित शाळा स्थापन होणे गरजेचे आहे त्यामुळे कारागिरांचे व्यवसाय भरभराटीला येतील असा विश्वास शाहू महाराजांना असल्याचे दिसून येते. या कलांचा प्रचार व प्रसार व्हावा या अनुषंगाने विविध कलाकुसरीच्या वस्तूंची प्रदर्शने भरविली जावीत असेही विचार छत्रपती शाहू महाराजांनी मांडलेले होते. त्यांच्या मते पाश्चात्य देशात त्यांनी ज्या वस्तू निर्माण केल्या त्यांचे प्रदर्शने भरवितात. तशीच प्रदर्शने भारततही भरविली जावीत. यामुळे लोकांना भारतीय कलेच्या वस्तूंची माहिती मिळेल व त्यांच्यात स्वदेशीचीही गोडी वाढेल. भारतीय मालांचा खप वाढल्यामुळे या कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. या सर्व उपाययोजनांची अंमलबजावणी विशिष्ट पद्धतीनेच व सुनियोजित व्हावी असे शाहूंना वाटत होते. शाहूंनी स्वतः आपल्या संस्थानात कारागिरांच्या व्यवसायांना प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले होते.

शेतकरी, व्यापार व उद्योगधंदे तसेच कारागिरांच्या शिक्षणाशिवाय वैद्यक व्यवसायांसंबधी नर्सिंग कॉलेजेस्‌ची स्थापना व्हावी असेही शाहूंना वाटत होते. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या जमिनींच्या नोंदी अद्ययावत ठेवण्याचे काम जे तलाठी करतील असे तलाठी प्रशिक्षित असावेत असेही विचार त्यांनी मांडलेले होते. त्यांच्या मते ज्या व्यक्तीला तलाठी पदावर नियुक्त केले जाते त्या व्यक्तीस किमान त्याच्या कामाचे स्वरूप तरी माहीत असावे. यासाठी त्यांनी तलाठी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी कोल्हापूर येथे एक 'तलाठी क्लास' चालविला होता व त्याची परीक्षा घेऊन तलाठी पदावर नियुक्ती करण्यासंबंधी नियोजन शाहूंनी केलेले होते. तलाठी शाळांशिवाय पाटील शाळाही असाव्यात असे शाहूंना वाटत होते. गावचा कारभार चालविणारे पाटील किंवा ग्रामपंचायतींच्या माध्यमातून निवडून येणारे ग्रामप्रमुख हे जर साक्षर असतील तरच ते चांगला कारभार करून ग्राम विकास त्यांच्या हातून होऊ शकेल असा ठाम विश्वास शाहू महाराजांचा होता. याच अनुषंगाने त्यांनी पाटील शाळा आपल्या संस्थानात सुरू केलेल्या होत्या. या शाळांच्या माध्यमातून गाव प्रमुखांना गावचा कारभार चालवित असताना ज्या बाबींचे ज्ञान आवश्यक असते ते देणे त्यांना अभिप्रेत होते.

शाहूंचे हे पाटील शाळांविषयक विचार आज एकविसाव्या शतकातही महत्त्वाचे ठरतात. आज महाराष्ट्रातील ग्रामीण खेडयांमध्ये अजूनही अनेक खेडी अशी आहेत की, तेथे निरक्षर सरपंच निवडून येतात त्यांना ग्रामपंचायतींच्या कारभाराची, सरपंचांच्या कामाची, शासनातर्फे गावासाठी ज्या योजना असतात त्यांची माहिती नसते व केवळ त्यांच्या या अज्ञानामुळे अशा गावांचा विकास खुंटतो. हे सर्व टाळण्यासाठी पाटीलशाळा असाव्यात अशी दूरदृष्टी शाहूंच्या विचारांमध्ये होती.

एकूणच या सर्व मुद्यांचा विचार करता असे स्पष्ट लक्षात येते की, शाहूंनी केवळ मुलांच्या शिक्षणापुरताच मर्यादित विचार केलेला नव्हता. सामान्यपणे शिक्षण या शब्दाचा संबंध आपण केवळ एखाद्याचे शालेय शिक्षण एवढया मर्यादितच घेतो परंतु ही संकल्पना खूप व्यापक आहे हे शाहूंच्या विचारांवरून दिसते. त्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान देणाऱ्या शिक्षणाचाच विचार केला नाही तर, जे प्रायोगिक ज्ञान आहे ज्यावर व्यक्ती आपला स्वतंत्र व्यवसाय सुरू करू

शकते अशा व्यापक दृष्टिकोनातून आपले शिक्षण विचार मांडलेले होते. मुळात शाहूंच्या मते एवढया व्यापक दृष्टिकोनातून भारतीय लोक शिक्षणाकडे पाहत नाहीत त्याचे कारण भारतीयांची मानसिकता व वैचारिक पातळी ही संकुचित आहे. याबाबत त्यांनी भारतीयांची युरोपियनांशी तुलना केलेली होती. ते म्हणतात की, "युरोपात शेतकरी लोक प्रतिष्ठित समजले जातात. तेथील शेतकरी राज्यातील उच्च दर्जाच्या नोकरीवर आहेत. तसेच तिकडे शिल्पकलेमधील लोकांचीही प्रतिष्ठा मोठी आहे. जो आज चांभार अथवा भंगी आहे तो थोडयाच दिवसांत नामदार होतो. त्यांना चांभार अथवा नीच असे म्हणण्याचे साहस कोणाचेही अंगी नाही. याचे कारण असे आहे की, शिल्पकला सर्वस्वी त्यांच्याच हातात असते. येथील लोक निर्धन व अज्ञानी असल्यामुळे येथील शिल्पकलेची सुधारणा कशी होईल? सुशिक्षित बी.ए., एम.ए.झालेले लोक हे काम अशासाठी हाती घेत नाहीत की आम्हाला शूद्र म्हणतील, आम्हाला नीच समजतील. अशाने देशात ऐश्वर्य कसे वाढेल? व ऐश्वर्याशिवाय देशाची उन्नती कशी होणार?"[६८] म्हणजेच भारतीय लोक जर स्वतःला कमी लेखत असतील तर त्यांची उन्नती होणार नाही. यासाठी त्यांनी विविध व्यवसायांच्या शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे असे शाहूंना वाटत होते.

## ७) शाहू महाराजांचे शैक्षणिक प्रशासन विषयक विचार

शिक्षण ही बाब प्रजेसाठी एक अत्यावश्यक बाब असते त्यामुळे शाहूंच्या मते शिक्षणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र शिक्षण खाते असावे असे शाहू महाराजांना वाटत होते. त्यांच्या मते शिक्षण खात्यासाठी स्वतंत्र प्रमुख व्यक्ती असणे आवश्यक असते कारण त्या प्रमुखाच्या नियंत्रणाखाली शाळा खात्याचा कारभार व्यवस्थितपणे चालू शकतो. या अनुषंगाने शाहू महाराजांनी आपल्या संस्थानासाठी स्वतंत्र शिक्षण खात्याची निर्मिती करून अगोदरचे जे उपशिक्षणाधिकारी पद होते ते रद्द ठरवून शिक्षणाधिकारी पदाची निर्मिती केलेली होती. 'शाहू छत्रपतींनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यावर सर्वात प्रथम राज्यातील शिक्षण व्यवस्थेत एक अत्यंत महत्त्वाचा बदल केला तो असा की, संस्थानातील उपशिक्षण अधिकारी हे पद नष्ट करून त्याऐवजी प्रमुख सर्वोच्च असे शिक्षणाधिकारी हे पद

निर्माण करून त्या पदावर व्ही.के. कीर्तिकर यांची नेमणूक करण्यात आली.'[६९] यावरून स्पष्ट लक्षात येते की, शाहू महाराजांनी शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षणाधिकारी पदाची निर्मिती केलेली होती व त्यांनी शिक्षणाधिकारीपदी विविध जाणकार व तज्ज्ञ व्यक्तींचीच नियुक्ती केलेली होती. एकूणच संपूर्ण शिक्षणखात्याचा कारभार शिक्षणाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली चालविला जाईल. या शिवाय शिक्षणाधिकाऱ्यांना प्रशासनात मदतीसाठी तीन उपशिक्षणाधिकाऱ्यांची नियुक्ती त्यांनी केलेली होती.

शाहू महाराजांनी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा पास केलेला होता तेंव्हाही काही प्रशासकीय सुधारणा या कायद्यांतर्गत येणाऱ्या शाळांच्या बाबतीत केलेल्या दिसून येतात. या कायद्यांतर्गत येणाऱ्या शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शाहूंनी एक संचालक, एक शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकाऱ्याच्या मदतीसाठी दोन सहाय्यक निरीक्षक अशी प्रशासकीय यंत्रणा शासकीय पातळीवर सुचविलेली होती. शाहूंनी सुचविलेली ही प्रशासकीय यंत्रणा थोडया फार फरकाने आजच्या काळातही लागू करण्यात आलेली आहे. कोल्हापूर संस्थान हे छोटे संस्थान होते त्यामुळे वरील प्रकारचे प्रशासन तेथे सुरू करण्यात आलेले होते. आजच्या काळात संपूर्ण महाराष्ट्र व लोकसंख्या वाढीचा विचार करता हेच प्रशासन विस्तारित करण्यात आल्याचे दिसते. शिक्षण व्यवस्थेचे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षण असे विभाग करून प्रत्येक विभागासाठी संचालक, उपसंचालक, सहाय्यक संचालक, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी अशा प्रकारची प्रशासकीय यंत्रणा निर्माण केल्याचे दिसते. शाळापातळीवर मुख्याध्यापक हा प्रमुख अधिकारी असतो.

शाहू महाराजांनी शाळांच्या प्रशासनाचाही विचार आपल्या शिक्षण विचारांमध्ये केलेला होता. शाळेचे स्थानिक प्रशासन चांगले असेल तरच शाळा चांगली चालू शकेल. शाळेवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी यामध्ये शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी हे कायमस्वरूपी लक्ष ठेवू शकत नाहीत. केवळ वर्षातून एक दोन वेळेस शाळा तपासणी ते करू शकतात. तथापि तपासणीच्या दिवशी शाळा चांगली चालली याचा अर्थ ती वर्षभर चांगली चालू आहे असा होत

नाही. त्यामुळे शाहूंनी पूर्वीपासून चालत आलेल्या शाळा पंच पद्धतीचे थोडेसे स्वरूप बदलावे असे विचार मांडले होते. त्यांनी कोल्हापूर संस्थानासाठी तसा बदलही घडून आणला होता. 'शाळा पंचपद्धती' ही गावपातळीवर गावातील शाळांच्या देखभालीसाठी निवडली जाणारी एक समिती होती. या समितीला काही प्रमुख अधिकारी देण्याचे काम शाहूंनी केले होते. या समितीचे निश्चित असे स्वरूप शाहूंनी ठरविले होते. या समितीचे स्वरूप कसे होते याविषयी कृ.गो. सूर्यवंशी यांनी लिहिले होते की, "प्रत्येक शाळेसाठी एक पंचसमिती, त्या समितीत तीन ते नऊ सभासद. शाळा पंचांची नेमणूक शिक्षणाधिकारी यांनी करावयाची. तालुका व महालाच्या ठिकाणी शाळा समितीचे अध्यक्ष मामलेदार वा महालकरी हे असायचे. गावकामगार पाटील हे पंचसमितीचे पदसिद्ध सभासद असावयाचे. शाळा पंचासमितीने शाळेवर देखरेख ठेवावयाची, शाळेत काही कमीजास्ती किंवा काही गैर घडले असेल, अथवा गैरकारभार चालला असेल तर तिने शिक्षणाधिकारी यांच्याकडे तसा अहवाल पाठवावयाचा, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गावातील मागासलेल्या वर्गांच्या लोकांना मुले शाळेत पाठविण्याबाबत उद्युक्त करावयाचे, फी-माफीच्या अर्जावर आर्थिक हलाखीचा दाखला देऊन शिफारस करावयाची इत्यादी कार्ये पंच समितीने पार पाडावयाची."[७०] अशा प्रकारे शाहूंनी पंचपद्धतीचे स्वरूप आणखी व्यापक बनविले होते व या समितीच्या माध्यमातून शाळा व्यवस्थापन व शिक्षणखाते यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला होता.

आजच्या काळातही शालेय व्यवस्थापन समिती व पालक शिक्षक संघ या सारख्या समित्या शाळेवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केल्या जातात. यादेखील शाळापंच पद्धतीचीच रूपे मानता येतील. तथापि आजच्या काळातील या समित्या प्रभावीपणे काम करताना दिसून येत नाही. एकूणच शाहूंनी जे जे महत्त्वाचे बदल आपल्या शिक्षण खात्याच्या प्रशासनात केलेले होते त्यातून त्यांची शिक्षण प्रशासन विषयक दूरदृष्टी लक्षात येते. त्यांच्या या प्रशासन विषयक विचारांचा प्रभाव आजच्या शिक्षण व्यवस्थेवरही दिसून येतो.

## ८) शाहू महाराजांचे शिक्षकविषयक विचार

शिक्षण व्यवस्थेमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक हा शिक्षक असतो. शिक्षण प्रभावीपणे खऱ्या अर्थाने प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी ही शिक्षकाची असते. आपल्या ज्ञानाच्या आधारे शिक्षक जे विद्यार्थ्यांना शिकवित असतो त्यातून तो समाज घडवित असतो. The teacher is a social engineer who has to make a manifest contribution to social progress and human happiness. [७१] म्हणजेच शिक्षकाची भूमिका ही केवळ वर्गात येणाऱ्या विद्यार्थ्यापुरतीच मर्यादित नाही तर त्यास समाजाचा अभियंता म्हणून त्याच्या प्रगतीचा व मानवी कल्याणाचा विचार करावा लागतो. या अनुषंगाने शाहूंच्या मते शिक्षक हे ज्ञानसंपन्न व प्रशिक्षित असणे आवश्यक वाटत होते. त्याकाळी शिक्षणाची अनास्था असल्यामुळे उच्च शिक्षित शिक्षक मिळत नव्हते त्यामुळे केवळ ज्याला लिहिता वाचता येते, पाढे, आकडेमोड अंकगणित याचे ज्ञान आहे असा व्यक्ती शिक्षक होण्यास पात्र झाला असे मानले जायचे. शाहूंना मात्र शिक्षकाच्या ज्ञानाची ही परिसीमा मान्य नव्हती. त्यांच्या मते शिक्षक हा ब्रिटिशांनी सांगितलेली किमान ज्ञानकक्षा पास झालेला असावा. त्याचबरोबर त्याचे शिक्षकी पेशाचे प्रशिक्षण झालेले असावे.

त्याकाळी सातव्या इयत्तेपर्यंतच्या शिक्षणानंतर एक शालान्त परीक्षा व्हायची त्या परीक्षेला व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा म्हटले जायचे. ही परीक्षा पास झालेले विविध नोकरींच्या पदांसाठी पात्र मानले जायचे. तथापि शिक्षक म्हणून नियुक्त झालेले अनेकजण ही परीक्षाही पास झालेले नसायचे. शाहूंना ही बाब योग्य वाटत नव्हती. त्यामुळे त्यांनी ही परीक्षा पास नसलेल्यांनी ही परीक्षा पास करणे बंधनकारक राहील व जे ही परीक्षा पास आहेत अशांसाठी सहामहिन्याचे प्रशिक्षण देण्याचा जाहीरनामा करवीर संस्थानपुरता लागू केलेला होता. दि १४ ऑगस्ट १९११ रोजी काढलेल्या या जाहीरनाम्यात म्हटलेले होते की, "कोल्हापूर इलाख्यातील शाळा खात्यातील जे शिक्षक ट्रेनिंगचे सर्टिफिकीट मिळविलेले नाहीत व मराठी स्कूल फायनल (मुलकी) परीक्षा किंवा युनिव्हर्सिटीची एखादी परीक्षा पास झालेले नाहीत त्यांनी त्यांचे वय ४० वर्षांपेक्षा कमी असेल तर, ही नोटिफिकेशन प्रसिद्ध झाल्यापासून दोन वर्षांचे आत, मराठी

मुलकी परीक्षेत पास झाले पाहिजे. तसे करण्यास जे चुकतील ते कोणतीही बढती मिळविण्यास पात्र होणार नाहीत. शिक्षकांना असे करिता यावे म्हणून, जे शिक्षक परीक्षेस बसण्याचे पत्करितील त्यांस तीन महिन्यांची स्पेशल रजा देण्यात येईल."[७२] म्हणजेच शाहूंनी ही परीक्षा शिक्षक पदासाठी किमान शैक्षणिक पात्रता मानलेली होती. जे शिक्षक ही परीक्षा पास नसतानाही या पदावर रूजू होते त्यांना दोन वर्षांच्या मुदतीत ही परीक्षा पास होण्याची सक्ती केलेली होती. यावरून असे दिसून येते की, पूर्वीच्या काळी ज्याला लिहिता वाचता येते व इतर काही काम धंदा करता येत नाही अशांनी शिक्षक व्हायचे हा समज शाहूंच्या मते पूर्णपणे चुकीचा होता. शिक्षक होण्यासाठी योग्य त्या पात्रतेचे शिक्षण शिक्षकाचे झालेले असणे नितांत आवश्यक आहे असे मत शाहूंनी मांडलेले होते.

अनेकदा असेही घडू शकते की, एखाद्याने किमान शैक्षणिक पात्रता प्राप्त केलेली असते, तसेच त्याच्याकडे पुरेसे ज्ञानही असते, परंतु ते विद्यार्थ्यांपर्यंत मांडता येतेच असे नाही. मुळात मुलांना शिकविणे हे आपल्या ज्ञानाबरोबरच आपल्यातील कौशल्य व हातोटीवरही अवलंबून असते. या अनुषंगाने शाहूंनी शिक्षक प्रशिक्षणाचा विचार केलेला होता. प्रशिक्षणासंबंधी या ठरावात सांगण्यात आलेले होते की, "या खात्यात मुलकी परीक्षा पास झालेले जे शिक्षक आहेत, त्यांना थोडे बहुत ट्रेनिंग मिळावे या उद्देशाने मेपासून नोव्हेंबरपर्यंत ६ महिने मुदतीचा एक वर्ग काढण्यात येईल. या वर्गात शिक्षण देऊन पुढील विषयात परीक्षा घेण्यात येईल :- (१) अंकगणित. (२) मराठी भाषा. (३) बाळबोध व मोडी लेखन. (४) अध्यापनाची पद्धती व तत्त्वे. (५) शाळेची व्यवस्था व रिपोर्ट लिहिणे. (६) शिकविण्याचे प्रत्यक्ष काम करणे. येणेप्रमाणे विषयांत परीक्षा घेऊन पास होणाऱ्यास दाखले देण्यात येतील; व पहिल्या वर्षाचे ट्रेनिंग मिळविलेल्या शिक्षकांचे सर्व हक्क त्यांस प्राप्त होतील."[७३] म्हणजेच शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये ६ महिन्याच्या प्रशिक्षण वर्गाची उपाययोजना केलेली होती. जे शिक्षक हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करतील त्यांनाच सेवेतील लाभ मिळू शकतील अशा प्रकारचा हा जाहीरनामा होता. शाहूंच्या या विचारांवरून ते शिक्षक प्रशिक्षणाबाबत किती आग्रही होते हे दिसून येते. शिक्षक प्रशिक्षणाबाबतचे विचार पूर्वीच्या सुधारकांनीही

मांडलेले होते त्यांच्या विचारांचा प्रभाव प्रचलित शिक्षण पद्धतीवर दिसून येतो. आज विविध गटातील शिक्षक होण्यासाठी किमान पात्रतेच्या पदव्या निश्चित केलेल्या आहेत. त्याच बरोबर बदलत्या काळानुसार व अभ्यासक्रमानुसार शिक्षकांना प्रशिक्षणेही दिली जातात.

शाहू महाराजांच्या दृष्टिकोनातून शिक्षकांमध्ये प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा यासारखे गुण असणे आवश्यक आहे. शाहूंनी प्राचार्यांमध्ये कोणते गुण असावेत याबाबतीत मुंबई राज्यपालांचे कार्यवाहक क्लॉड एच.हिल्ल यांना लिहिलेल्या पत्रात सांगितलेले होते. आपल्या पत्रात शाहूंनी लिहिले होते की, "आपले काम भले की आपण भले असा तो मनुष्य असावा. राजकारणाच्या भानगडीत त्याने पडू नये. तो राजनिष्ठ असावा व त्याला वरिष्ठांबद्दल आदर असावा. शिवाय इंग्रजी हा त्याचा आवडीचा विषय असावा."[७४] अशा प्रकारे प्रचार्यांने केवळ आपली शाळा व शाळेतील विद्यार्थी एवढयांपुरताच विचार करणे आवश्यक आहे असे शाहूंच्या विचारांवरून दिसून येते. विशेषतः शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींनी राजकारणापासून दूर राहणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. हे सर्व गुण प्राचार्यांबरोबरच शिक्षकांमध्येही असणे आवश्यक आहेत. आजच्या काळाचा विचार करता शाहूंचे विचार अधिक महत्त्वाचे वाटतात कारण आजचे अनेक शिक्षक हे राजकारणात अधिक सक्रिय असल्याचे दिसतात.

## ९) शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक विचार

शाहू महाराज जेवढे गरीब व मागासवर्गीयांच्या शिक्षण समस्येविषयी संवेदनशील होते तेवढेच ते स्त्रियांच्या शिक्षणाविषयीही संवेदनशील होते. त्याकाळी स्त्रियांविषयी खूप अनिष्ट प्रथांचे प्रस्थ वाढलेले होते. समाजातील स्त्रियांचे स्थानही खूप खालावलेले होते. या अनुषंगाने एकोणिसाव्या शतकातील सर्वच समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केलेला होता. छत्रपती शाहू महाराजांनीही स्त्रियांच्या उद्धारासाठी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केलेला होता.

शाहू महाराजांची स्त्री शिक्षणाबाबत निश्चित अशी भूमिका होती. स्त्रियांची वैचारिक प्रगल्भता वाढविण्यासाठी स्त्रीला शिक्षण मिळावे असा त्यांचा विचार होता. शाहूंनी त्यांच्या

सूनबाई इंदूमती देवींना लिहिलेल्या पत्रातून त्यांचे हे विचार स्पष्ट होतात. आपल्या पत्रात शाहूंनी लिहिले होते की, "शिक्षणामुळे तुझी बुद्धी जसजशी विकसित होईल, तसतसे तुझे विचार अधिकाधिक उदात्त होत जातील. म्हणून अभ्यासाची हेळसांड करू नकोस. तुला सुशिक्षित विदुषी करावे अशी माझी फार इच्छा आहे..."[७५] हा सल्ला जरी त्यांनी आपल्या सूनबाईना दिलेला असला तरीही त्यातून त्यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार स्पष्ट होतात. स्त्रियांना शिक्षणाची का आवश्यकता आहे? हेही त्यातून स्पष्ट होते. स्त्रियांनी शिक्षण घेतले तर त्यांची बुद्धिमत्ता वाढत जातेच त्याच बरोबर त्यांचे विचारही अधिक प्रगल्भ होत जातात. त्यामुळे स्त्रियांनी शिक्षण घेणे आवश्यक आहे. स्त्रीशिक्षणामुळे निश्चितच त्यांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊन त्यांनाही समाजात मानाने जगण्याचा अधिकार आहे हे कळून येईल. या अनुषंगाने स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार होणे शाहूंना अगत्याचे वाटत होते. स्त्रीशिक्षणाच्या विस्तारीकरणासाठी काही निश्चित अशा उपाययोजना केल्या जाणे अभिप्रेत होते. त्यांनी जेवढे स्त्री शिक्षणासाठी कार्य केलेले होते त्यातून स्त्रियांच्या शिक्षणाच्या विस्तारीकरणासाठी कोणते उपाय राबविता येऊ शकतात याची माहिती मिळू शकते. त्यांच्या मते मुलींसाठी काही स्वतंत्र शाळा स्थापन्यात याव्यात. त्याच बरोबर सहशिक्षणाच्या शाळांनाही प्रोत्साहन दिले जावे. स्वतंत्र मुलींच्या शाळा नसतील तेथे मुलांच्या शाळांमध्ये मुलींना प्रवेश दिले जावेत अशी त्यांची भूमिका होती. कोल्हापूर संस्थानमध्ये स्त्रियांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र स्त्री अधिक्षिका म्हणून मिस लिटल मॅडम काम पहात होत्या. त्यांच्यानंतर रखमाबाई केळवकर यांनी हे पद सांभाळले होते. यावरून लक्षात येते की, शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या हेतूने स्वतंत्र स्त्री अधिक्षिकांची नेमणूक केलेली होती.

शाहू महाराजांच्या मते मुलींसाठी केवळ शाळा स्थापन करून भागणारे नव्हते तर मुलींना शाळेत आणण्यासाठी पर्यायी उपाययोजना करणे क्रमप्राप्त होते. या अनुषंगाने शाहू महाराजांनी मुलींच्या मोफत शिक्षणाचा उपाय सुचविलेला होता. शाहूंच्या मते प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत असावेच तथापि मुलींच्या बाबतीत केवळ प्राथमिकच नाही तर उच्च शिक्षणही मोफत असावे. त्यांनी राजाराम कॉलेजमधील मुलींना मोफत उच्च शिक्षण सुरू केलेले

होते. शाहूंच्या मते स्त्री शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी ज्या स्त्रियांना शिक्षण घ्यायचे त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्थाही होणे अगत्याचे आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या मागास व अस्पृश्य समाजातील स्त्रियांना ही सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे असे शाहूंना वाटत होते. याशिवाय स्त्री शिक्षणास प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांना काही स्कॉलरशिपांची तरतूद करणे गरजेचे वाटत होते. ज्या मुलींच्या शाळांमधील निकाल चांगले लागतात अशा शाळांमधील शिक्षकांना काही इनाम देण्यात यावेत असेही विचार त्यांनी मांडलेले होते.

## १०) शाहू महाराजांच्या मते शिक्षणासाठी आर्थिक उपाययोजना

सर्वसामान्य लोकांच्या दृष्टिकोनातून शिक्षण ही बाब खर्चीक मानली जाते. त्याकाळातील ही मानसिकता आजच्या काळातही पाहावयास मिळते. आजच्या काळाचा विचार करता काही शाळांची फी ही सर्वसामान्य व गरिबांच्या आवाक्यात नाही. हे जरी खरे असले तरीही खर्च वाढल्यामुळे शिक्षणच घेता येत नाही असे मात्र नाही. मुळात एकोणिसाव्या शतकापासूनच समाजात निर्माण झालेली दोषजनक प्रवृत्ती होती की, अनावश्यक बाबी अंधश्रद्धा, चालिरिती यासाठी भरमसाठ पैसा खर्च केला जायचा, परंतु शिक्षणाच्या कामी मात्र आपली गरिबी दाखविली जायची. ही बाब काही अंशी आजच्या काळातही पहावयास मिळते. या अनुषंगाने शाहूंनी असे विचार मांडले होते की, ज्या अनावश्यक बाबींवर आपण खर्च करतो त्यावरील खर्च कमी करून शिक्षणासारख्या बाबींवर खर्च करावा. त्यांच्या मते तत्कालिन लोक शिक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष करीत व विवाह प्रसंगी प्रचंड खर्च करीत होते. यावर उपाय म्हणून शाहूंनी नोंदणी पद्धतीच्या विवाहाचा उपाय सुचविला होता. नोंदणी पद्धतीने केलेल्या विवाहास खर्च अजिबात येत नाही व हाच पैसा आपल्या शिक्षणाच्या कामी वापरता येऊ शकेल असे त्यांचे मत होते. या बाबतीत शाहूंनी अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेच्या भाषणात आपले विचार मांडलेले होते. त्यात ते म्हणतात की, "There are many who complain that expensive marriage ceremonies drain off the purse of the people to channels away from such as are socially of the greatest importance namely Education But these very same people will not consent to have marriages sanctified by the most

economical method of registration."[७६] म्हणजेच लोक अशी तक्रार करीत होते की, खर्चीक पद्धतीच्या लग्नांमुळे लोकांचे खिसे रिकामे होत व त्यामुळे ते शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत होते. परंतु असे असतानाही हे लोक नोंदणी विवाहाचा विचार करीत नव्हते याची खंत शाहू महाराजांना वाटत होती. शाहू महाराजांना दोन फायदे रजिस्टर पद्धतीच्या विवाहाचे वाटत होते. एक म्हणजे पैसे वाचवून ते शिक्षणावर खर्च करता येऊ शकतात, त्याचबरोबर नोंदणी विवाहास कायद्याचा आधार मिळतो. आजच्या काळचा विचार करता हे लक्षात येईल की, लग्नविधीवर अनावश्यक अतिरिक्त खर्च हे एक विदारक सत्य आहे. श्रीमंत लोक खर्च करतातच परंतु खोटया प्रतिष्ठेसाठी अगदी गरिबही कर्जे काढून भरमसाठ पैसा विवाह प्रसंगी खर्च करताना दिसतात. या गोष्टीला आळा घालून शिक्षणासारख्या विधायक कामाकडे हा खर्च जावा असे शाहूंना वाटत होते. शाहूंचे हे विचार आजच्या काळातही तितकेच महत्त्वाचे वाटतात. या अनुषंगाने शिक्षणाची आर्थिक अडचण सोडवणे शक्य होईल असे शाहूंना वाटत होते.

शाहूंच्या विचारातून आणखी एक महत्त्वाचा शिक्षण विचार त्यांच्या बौद्धिक प्रगल्भतेतून दिसून येतो. त्यांच्या मते अनेक प्रसंगी श्रीमंत किंवा प्रतिष्ठित लोकांच्या कार्यक्रमामध्ये सर्वसामान्य लोक जबरदस्तीने वर्गणी करून काही भेट वस्तू, सत्कार अशा स्वरूपात कार्यक्रम आयोजित करतात. अशावेळी प्रतिष्ठितांनी याची काळची घ्यावी की, सर्वसामान्यांवर त्याचा आर्थिक भार अतिरिक्त पडणार नाही. त्याचबरोबर जमा झालेली रक्कम मानपानावर खर्च करण्यापेक्षा गोरगरिबांच्या शिक्षणासाठी खर्च केली जावी असेही त्यांनी सुचविले होते. या बाबतीत त्यांनी स्वतःच्या कृतीतून तसा आदर्श समाजापुढे उभा केलेला होता.

इ.सन १९१२ मध्ये शाहू महाराजांचे पुत्र युवराज राजाराम व युवराज शिवाजी हे इंग्लंडला शिक्षणासाठी गेलेले होते. त्यांचे इ.सन १९१५ मध्ये पुन्हा कोल्हापूरमध्ये आगमन झालेले होते त्यामुळे जनतेस आनंद झालेला होता. हा आनंद वेगवेगळया समाजातील लोकांनी मोठमोठे कार्यक्रम आयोजित करून साजरा करण्याचे ठरविले होते. त्यासाठी त्यांनी वर्गणी

स्वरूपात पैसा गोळा केलेला होता. परंतु शाहूंनी मात्र हा पैसा चांगल्या कार्यासाठी खर्च केला जावा असे सुचविले होते. त्यांनी दि. २६ ऑगस्ट १९१५ रोजी एक जाहीरनामा पास केलेला होता. त्यात त्यांनी लिहिले होते की, "जमा झालेला सर्व पैसा मेजवान्या, रोशणाई, आतषबाजी वगैरे सारख्या क्षणिक आनंद देणाऱ्या गोष्टीत उडवून टाकण्यापेक्षा प्रसंगास व आनंद व्यक्त करणाऱ्या समाजाच्या इभ्रतीस योग्य तितकाच अशा कामी खर्च करून बाकी राहिलेला फंड श्रीयुवराजांच्या शुभागमनाचे निरंतर स्मारक व्हावे या उद्देशाने विद्यावृद्धी व विद्येस उत्तेजन देण्याच्या कामी खर्च करण्याची काही काही समाजाची कल्पना हुजुरास पसंत वाटते. हुजरे मंडळी व शिलेदार पथक यांनी आपल्या जमा केलेल्या फंडाचा मोठा भाग शिलकेहून त्याच्या व्याजाने आपल्या मंडळींतील होतकरू मुलांस उत्तेजनाकरिता स्कॉलरशिपा व बक्षिसे देण्याची योजना काढिली आहे ती फार उत्तम आहे, या योगानें श्रीमद्युवराज विद्या संपन्न होऊन परत आले, या महत्त्वाच्या प्रसंगाचे पुढील पिढीच्या विद्याविषयक उत्तेजनाने योग्य स्मारक होईल व त्या त्या खात्याच्या मंडळीच्या तरूण पिढीत विद्यार्जनाविषयी आस्था वाढेल असा हुजुरांस भरंवसा वाटत आहे."[७७] एकूणच त्यांच्या या विचारातून असे दिसून येते की, सत्कार समारंभासारख्या व भेटींच्या कार्यक्रमांवर पैसा खर्च करून क्षणिक आनंद मिळविण्यापेक्षा शिक्षणासारख्या चिरकाल टिकणाऱ्या गोष्टीवर हा पैसा खर्च व्हावा. असे कार्य झाले तर यातून आणखी इतर लोकांना प्रेरणा मिळेल व शिक्षण विकास साधेल. आजच्या काळातही अशा विचारांची नितांत आवश्यकता आहे. विशेषतः लोकशाही राज्यातील लोकप्रतिनिधी शाहूंचे विचार आत्मसात करू शकले तर विधायक कामे आणखी होऊ शकतील.

## ११) शाहू महाराजांच्या तरूण सुशिक्षितांकडून अपेक्षा

शिक्षण प्रसार करणे ही बाब कोणीतरी एकटयाचीच जबाबदारी असते असे नाही. शाहू महाराज राज्यकर्ते होते या नात्याने ते शिक्षणाचा विकास करणे आपले कर्तव्य मानीत होते. तथापि लोकशिक्षण ही संकल्पनाच अशी आहे की, ती खास लोकांसाठी असते व त्यात लोकांचाच सक्रिय सहभाग आवश्यक असतो. लोकशाही सरकारची व्याख्या जशी लोकांनी, लोकांचे लोकांसाठी चालविलेले राज्य अशी केली जाते तशीच लोकशिक्षणाची व्याख्या ही

‘लोकांनी लोकांच्यासाठी चालविलेली शिक्षण चळवळ’ अशी करता येईल. यात लोकांमधूनच नेतृत्त्व करणारे अनुभवी लोक पुढे येणे आवश्यक असते. या अनुषंगाने शाहूंना असे वाटत होते की, जे सुशिक्षित तरूण आहेत त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग केवळ स्वतःच्या स्वार्थासाठीच न करता जनतेला शिक्षणाच्या कामी कशी मदत करता येईल असा विचार त्यांनी करावा. या बाबतीत शाहूंचे विचार न्यायमूर्ती रानडे व आगरकर या समाजसुधारकांच्या विचारांशी मिळतेजुळते होते.

शाहू महाराजांना सुशिक्षित तरूणांविषयी एक खंत वाटत होती की, शिक्षण घेतलेले लोक गोरगरिबांचे दुःख कमी करण्यासाठी पुढे येत नाहीत. या बाबतीत शाहू म्हणाले होते की, “कमनशिबाची गोष्ट ही की, आमचे सुशिक्षित पुढारी वर्गापैकी फारच थोडया लोकाचे प्रयत्न या बाबतीत मनोभावे करून होत आहेत. तथापि हळूहळू आपले सर्व समाज या दुर्भागी लोकांच्या कल्याणासाठी जास्त झटत जातील अशी मला उमेद आहे.”[७८] म्हणजेच त्याकाळी जेवढया सुशिक्षितांनी समाज उद्धाराच्या कामी पुढे यायला हवे होते तेवढे येत नव्हते आणि त्यामुळे शाहू महाराजांना ही खंत वाटत होती. असे असले तरीही जसजसे सुधारणाचे वारे वहात जाईल तसतसा हा सुशिक्षित वर्ग पुढे येईल अशी त्यांना अशा होती. ज्या प्रमाणे न्या. रानडे, ना. गोखलेंसारखे विद्वान लोक समाजाला शिक्षणाने शहाणे करण्यासाठी पुढे आले होते तसे आणखी लोक येतील असा विश्वासही त्यांना वाटत होता. एकूणच त्यांच्या या विचारांतून असे लक्षात येते की, जी व्यक्ती शिकलेली आहे तिचे कर्तव्य केवळ नोकरी करून पैसा कमावणे एवढेच असू नये तर समाजकार्यातही स्वतःस झोकून देणे आवश्यक आहे.

वरील सर्व मुद्यांतून राजर्षी शाहू महाराजांचे सर्वकष असे लोकशिक्षणावर अधारित विचार स्पष्ट होताना दिसतात. हे विचार एकोणिसाव्या शतकातील सुधारक महात्मा फुले, न्या.रानडे, आगरकर, डॉ.भांडारकर या सारख्या समाज सुधारकांच्या चळवळींच्या अभ्यासातून स्फुरलेले दिसतात. शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट एक उच्च विद्याविभूषित निकोप,

समतोल असणारा, सर्वसामावेशक उच्चतम विचारसरणी असणारा समाज निर्माण करणे यास अनुसरून त्यांनी आपले विचार मांडलेले होते. त्यात त्यांनी केवळ शालेय अभ्यास करून पुस्तकी ज्ञानावर अधारित परीक्षा द्यायच्या व पास व्हायचे एवढा मर्यादित विचार केलेला नव्हता. 'जीवन हेच शिक्षण व शिक्षण हेच जीवन' या शिक्षणाच्या व्याख्येप्रमाणे त्यांनी शिक्षणाचा पुरस्कार केला. ज्यामध्ये केवळ अभ्यासक्रमातील पुस्तकांनाच स्थान नव्हते तर विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील विविध पुस्तकांचा सविस्तर अभ्यास करून त्यायोगे आपले जीवन ज्ञान संपन्न करावे असाही अर्थ अभिप्रेत होता. आजच्या शिक्षण व्यवस्थेचा विचार करता शाहूंच्या विचारांचे अनेक पैलू आजच्या शिक्षण पद्धतीतही पहावयास मिळतात.

## ७.३ संदर्भ


१) आठलेकर मंगला : 'महर्षी ते गौरी', राजहंस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती २०००, पृ.क्र. १६.

२) त्रिभुवन शैलेश : 'भारतरत्न डॉ.धोंडो केशव कर्वे', पायल पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००६, पृ.क्र. २६.

३) डॉ.जोशी न.म.: 'महाराष्ट्राचे शिल्पकार : महर्षी धोंडो केशव कर्वे', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृत्ती २००७, पृ.क्र. ७.

४) तेरणीकर सुलभा (संकलक) : 'गाथा शतकाची', महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वे नगर, पुणे, पहिली आवृत्ती २००८ पृ.क्र. १२८.

५) कर्वे धोंडो केशव : 'मौलिक विचार धारा: हस्तलिखित भाग २' महर्षी कर्वे स्मारक, पुणे, पृ.क्र.४, ५.

६) कर्वे धोंडो केशव : 'धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र', हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्था, हिंगणें बुद्रुक, पुणे ४, तृतीयावृत्ती १९५८, पृ.क्र. २६०.

७) कित्ता, पृ.क्र. २६०.

८) दैनिक दिव्यमराठी : 'स्त्रीसाक्षरतेच्या पाटीवर अजूनही मुळाक्षरेच...', संपादकीय लेख, अहमदनगर आवृत्ती, दि. २५-०५-२०१३ पृ.क्र. ६.

९) डॉ.जोशी न.म.: 'महाराष्ट्राचे शिल्पकार : महर्षी धोंडो केशव कर्वे', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृत्ती २००७, पृ.क्र. १८.

१०) कर्वे धोंडो केशव : 'मौलिक विचार धारा हस्तलिखित भाग २' महर्षी कर्वे स्मारक, पुणे, पृ.क्र. ५.

११) तेरणीकर सुलभा (संकलक) : 'गाथा शतकाची', महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वे नगर, पुणे, पहिली आवृत्ती २००८ पृ.क्र. ६८.

१२) डॉ.जोशी न.म.: 'महाराष्ट्राचे शिल्पकार महर्षी धोंडो केशव कर्वे', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृत्ती २००७, पृ.क्र. १८.

१३) कर्वे धोंडो केशव : 'धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र', हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्था, हिंगणें बुद्रुक, पुणे ४, तृतीयावृत्ती १९५८, पृ.क्र.२३८.

१४) कित्ता, पृ.क्र. २३६.

१५) कित्ता, पृ.क्र. ३४८,३४९.

१६) कित्ता, पृ.क्र. ३५१.

१७) कित्ता, पृ.क्र. ३५८, ३५९.

१८) कित्ता, पृ.क्र. ३५९.

१९) कित्ता, पृ.क्र. ३५९.

२०) कित्ता, पृ.क्र. ३५९.

२१) google search/ www.ncte-india.org/pub/tilak/4.11htm.

२२) कित्ता .

२३) कर्वे धोंडो केशव : 'धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र', हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्था, हिंगणें बुद्रुक, पुणे ४, तृतीयावृत्ती १९५८, पृ.क्र.४०३.

२४) कित्ता, पृ.क्र. ४२४.

२५) तेरणीकर सुलभा (संकलक) : 'गाथा शतकाची', महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वे नगर, पुणे, पहिली आवृत्ती २००८ पृ.क्र. २७.

२६) कर्वे धोंडो केशव : 'धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र', हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्था, हिंगणें बुद्रुक, पुणे ४, तृतीयावृत्ती १९५८, पृ.क्र.४२५.

२७) कित्ता, पृ.क्र. ४२५,४२६.

२८) दैनिक दिव्य मराठी: 'भाषिक प्रांतरचनेतून काय साधले?', महाराष्ट्र दिन विशेष पुरवणी, 'काल आज उद्याचा महाराष्ट्र' औरंगाबाद आवृत्ती दि. ०१-०५-२०१२ पृ.क्र. १.

२९) कर्वे धोंडो केशव : 'धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र', हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्था, हिंगणें बुद्रुक, पुणे ४, तृतीयावृत्ती १९५८, पृ.क्र.३६७.

३०) कित्ता, पृ.क्र. ३६६.

३१) कित्ता, पृ.क्र. ३७१.

३२) कित्ता, पृ.क्र. ३९७.

३३) कित्ता, पृ.क्र. २६१.

३४) कित्ता, पृ.क्र. २६१.

३५) पटवर्धन नारायण महादेव : 'धोंडो केशव कर्वे चरित्र', हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, हिंगणें बुद्रुक, पुणे ४, प्रथमावृत्ती १९५८, पृ.क्र. ५००.

३६) कर्वे धोंडो केशव : 'धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र', हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्था, हिंगणें बुद्रुक, पुणे ४, तृतीयावृत्ती १९५८, पृ.क्र.२६२.

३७) तेरणीकर सुलभा (संकलक) : 'गाथा शतकाची', महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वे नगर, पुणे, पहिली आवृत्ती २००८ पृ.क्र. ११८.

३८) डॉ. पांढरे नीला : 'महर्षी धोंडो केशव कर्वे', उन्मेष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००७, पृ.क्र. ६७.

३९) तेरणीकर सुलभा (संकलक) : 'गाथा शतकाची', महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वे नगर, पुणे, पहिली आवृत्ती २००८ पृ.क्र. २५.

४०) देशपांडे रविंद्र लक्ष्मण (प्रकाशक) : 'भाऊबीज निधी स्मरणिका वर्ष ८०', महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, १९९८, पृ.क्र. १७.

४१) Phadke Y.D.: 'Social Reformers of Maharashtra,' Maharashtra information centre, Nov.1995. page no. 42.

४२) नाईक तु.बा.: 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण २००७. पृ.क्र ८.

४३) कीर धनंजय : 'राजर्षी शाहू छत्रपती,' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती १९९२, पृ.क्र. ४५.

४४) डॉ. पवार जयसिंगराव: 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, खंड १: राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जानेवारी २००१, पृ.क्र.१२०.

४५) जाधव भगवानराव बापूसाहेब (संपादक) : 'राजर्षी श्रीशाहूमहाराजांची भाषणे', लोकवाड्:मय गृह प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती मे २००९, पृ.क्र. ४४.

४६) येडेकर श्याम (संपादक) : 'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे', मंगल प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९७१, इंग्रजी विभाग, पृ.क्र. ५३, ५४.

४७) जाधव भगवानराव बापूसाहेब (संपादक) : 'राजर्षी श्रीशाहूमहाराजांची भाषणे', लोकवाड्:मय गृह प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती मे २००९, पृ.क्र. ११७.

४८) येडेकर श्याम (संपादक) : 'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे', मंगल प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९७१, मराठी विभाग, पृ.क्र. ४.

४९) कित्ता, इंग्रजी विभाग, पृ.क्र. ५३.

५०) कित्ता, मराठी विभाग, पृ.क्र. ७३.

५१) कित्ता, पृ.क्र. ७३.

५२) जाधव भगवानराव बापूसाहेब (संपादक) : 'राजर्षी श्रीशाहूमहाराजांची भाषणे', लोकवाड्:मय गृह प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती मे २००९, पृ.क्र. १४९.

५३) डॉ. पवार जयसिंगराव: 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, खंड ३: राजर्षी शाहू छत्रपती: संकीर्ण साहित्य, विभाग ३ :– शाहू महाराजांचे हुकूमनामे व जाहीरनामे', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जानेवारी २००१, पृ.क्र. ९८५.

५४) कित्ता, पृ.क्र. ९८७.

५५) कित्ता, पृ.क्र. १०१३.

५६) कित्ता, पृ.क्र. १०१४.

५७) येडेकर श्याम (संपादक) : 'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे', मंगल प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९७१, मराठी विभाग, पृ.क्र. ७२.

५८) सूर्यवंशी कृ.गो., 'राजर्षी शाहू: राजा व माणूस', ठोकळ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृ.क्र. १३३.

५९) डॉ. पवार जयसिंगराव: 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, खंड ३: राजर्षी शाहू छत्रपती: संकीर्ण साहित्य, विभाग २ :– शाहूकालीन कागदपत्रे', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जानेवारी २००१, पृ.क्र. ९२४.

६०) कित्ता, विभाग ३ :– शाहू महाराजांचे हुकूमनामे व जाहीरनामे', पृ.क्र. ९९९

६१) कित्ता, पृ.क्र. १००३.

६२) येडेकर श्याम (संपादक) : 'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे', मंगल प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९७१, मराठी विभाग, पृ.क्र. ११३.

६३) जाधव भगवानराव बापूसाहेब (संपादक) : 'राजर्षी श्रीशाहूमहाराजांची भाषणे', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती मे २००९, पृ.क्र. १४९.

६४) येडेकर श्याम (संपादक) : 'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे', मंगल प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९७१, इंग्रजी विभाग, पृ.क्र. ३७.

६५) कित्ता, मराठी विभाग, पृ.क्र. ९.

६६) कित्ता, पृ.क्र. ८,९.

६७) जाधव भगवानराव बापूसाहेब (संपादक) : 'राजर्षी श्रीशाहूमहाराजांची भाषणे', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती मे २००९, पृ.क्र. १०२.

६८) कित्ता, पृ.क्र. ४३.

६९) डॉ.जाधव रमेश : 'लोकराजा शाहू छत्रपती', सुरेश एजन्सी, पुणे २, प्रथम आवृत्ती ३० ऑगस्ट १९९७, पृ.क्र. १६२.

७०) सूर्यवंशी कृ.गो., 'राजर्षी शाहू: राज व माणूस', ठोकळ प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृ.क्र. १७२.

७१) 'शिक्षण संक्रमण - मासिक', महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, अंक फेब्रुवारी २००५, पृ.क्र. २०.

७२) डॉ. पवार जयसिंगराव: 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, खंड ३: राजर्षी शाहू छत्रपती: संकीर्ण साहित्य, विभाग ३ :– शाहू महाराजांचे हुकूमनामे व जाहीरनामे', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जानेवारी २००१, पृ.क्र. ९६५.

७३) कित्ता, पृ.क्र. ९६५.

७४) कीर धनंजय : 'राजर्षी शाहू छत्रपती,' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती १९९२, पृ.क्र. १०९.

७५) डॉ. पवार जयसिंगराव: 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, खंड २: राजर्षी शाहू छत्रपती: लेखसंग्रह', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जानेवारी २००१, पृ.क्र. ६२०.

७६) येडेकर श्याम (संपादक) : 'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे', मंगल प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९७१, इंग्रजी विभाग, पृ.क्र. ७३.

७७) डॉ. पवार जयसिंगराव: 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, खंड ३: राजर्षी शाहू छत्रपती: संकीर्ण साहित्य, विभाग ३ :– शाहू महाराजांचे हुकूमनामे व जाहीरनामे', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जानेवारी २००१, पृ.क्र. ९७७

७८) येडेकर श्याम (संपादक) : 'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे', मंगल प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९७१, मराठी विभाग, पृ.क्र. ५९,६०

**प्रकरण आठवे**

# सारांश व निष्कर्ष

८.१ समाजसुधारकांच्या शैक्षणिक विचारांविषयी निष्कर्ष

८.२ विसाव्या शतकात महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीवर समाजसुधारकांचा पडलेला प्रभाव

८.३ एकविसाव्या शतकातील शिक्षणाकडून अपेक्षा

# प्रकरण आठवे

# सारांश व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास' या शोध प्रवंधात अभ्यासण्यात आलेल्या समाजसुधारकांच्या शैक्षणिक विचारांतून काही निष्कर्ष माझ्या एकंदर आकलनाने काढलेले आहेत.

## ८.१ समाजसुधारकांच्या शैक्षणिक विचारांविषयी निष्कर्ष

१) प्रत्येक व्यक्तीवर तो ज्या समाजात राहतो त्या समाजाचा प्रभाव पडत असतो. प्रस्तुत प्रबंधात आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, महर्षी धोंडो केशव कर्वे व राजर्षी शाहू महाराज या समाज सुधारकांचे शैक्षणिक विचार अभ्यासण्यात आलेले आहेत. त्यांच्या विचारांवर तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा प्रभाव होता असे स्पष्टपणे दिसून येते. एकोणिसाव्या शतकात बहुसंख्य लोक हे जुनाट विचारसरणीचे व परंपराप्रिय होते. काही मात्र या काळातील प्रबोधन चळवळीने भारावलेले व पुरोगामी विचारांचे होते. त्यांना समाज सुधारावा असे वाटत होते. त्यासाठी त्यांनी आपआपल्यापरीने प्रयत्न चालविलेले होते. त्यांच्या या पुरोगामी विचारांमुळेच समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट चालिरिती, ढोंगीपणा, धर्मांधता या समस्यांविषयी त्यांच्या मनात एक प्रकारची चीड निर्माण झालेली होती. हे सर्व समाजातील दुर्गुण सहजासहजी समाजातून नाहीसे होणार नव्हते. समाजाच्या अधोगतीचे कारण समाजाचे अज्ञान होते हे प्रस्तुत संशोधनात अभ्यासलेल्या शिक्षण विचारातून दिसून येते. त्यासाठी 'शिक्षण' हा सर्वात महत्त्वाचा उपाय सर्वांनीच सांगितलेला होता. या समाजाला चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळाले की, आपोआपच समाजातील या वाईट प्रथा नाहीशा झाल्याशिवाय राहणार नाहीत असा त्यांचा ठाम विश्वास होता. आज शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने पूर्वीचे अनेक प्रश्न कमी झाले आहेत. हेच या सर्व समाजसुधारकांच्या शैक्षणिक विचारांचे यश

म्हणावे लागेल. थोडक्यात असे म्हणता येईल की, तत्कालीन सामाजिक परिस्थिती, प्रबोधन चळवळ, व सुधारकांची सामाजिक जाणीव यातून त्यांचे शैक्षणिक विचार स्फुरलेले होते व शिक्षण ही एक विलक्षण शक्ती आहे असे समजून सुधारकांनी आपले शैक्षणिक विचार समाजात रूजविण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यांच्या विचारांतून एक प्रकारची शैक्षणिक चळवळ एकोणिसाव्या शतकात उभी राहिलेली होती आणि या चळवळीमध्ये तत्कालीन वृत्तपत्रे व साहित्य यांनीही महत्त्वाची भूमिका बजावलेली होती.

२) समाजसुधारकांच्या वैचारिक भूमिकेवर समाजाची दिशा अवलंबून असते. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, लोकमान्य टिळक, महर्षी कर्वे व राजर्षी शाहू या सर्व समाज सुधारकांनी समाजाचे कल्याण साधले जावे या अनुषंगाने शिक्षणाची काही उद्दिष्टे सांगितलेली होती. प्रामुख्याने व्यक्तीचा सर्वांगीन विकास साधने, कौटुंबिक विकास साधने, सामाजिक विकास घडवणे, देशाचा विकास घडवणे, मानसिक सुखाची प्राप्ती करणे, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणे, बुद्धिमत्ता व ज्ञानप्राप्ती करणे, देशभक्ती निर्माण करणे, विविध पातळीवरील विषमता दूर करणे, ही सर्व उद्दिष्टे समाज सुधारकांनी आपल्या शिक्षण विचारातून मांडलेली होती. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी शिक्षणाची आवश्यकता त्यांना वाटत होती.

३) बुद्धी व ज्ञानार्जनाबरोबरच व्यक्तीला स्वावलंबी बनवून स्वतःच्या पायावर उभे करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट समाजसुधारकांना अभिप्रेत होते. स्वावलंबी होण्यासाठी केवळ नोकरीच्याच मागे लागले पाहिजे हे सर्वार्थाने चुकीचे आहे हे समाजसुधारकांच्या विचारांवरून लक्षात येते. मुळात शिक्षणाचा संबंध नोकरीशी जोडण्याचे काम ब्रिटिशांनी केलेले होते. आजच्या समाजातही हा एक मोठा दोष दिसून येतो की, अनेकजण केवळ नोकरी मिळेल याच दृष्टिकोनातून शिक्षण घेताना दिसतात व सर्वांना नोकऱ्या मिळणे शक्य होत नाही त्यामुळे शिक्षणाविषयी एक प्रकारची उदासीनता निर्माण होते. समाज सुधारकांच्या विचारांनुसार अशा प्रकारचे शिक्षण असावे की, ज्या शिक्षणाने चरितार्थाचा प्रश्न पडणार नाही. केवळ नोकऱ्या मिळतील या आशेने शिक्षण न घेता इतर पर्यायांचा

विचार करावा. आपले पिढीजात जे व्यवसाय आहेत त्यातही आणखी प्रायोगिक शिक्षण घेऊन अधिक गुणवत्ता मिळविता येते. बाळशास्त्री जांभेकरांनी वैद्यकीय व्यवसाय व तंत्रज्ञानावर अधारित असलेले व्यवसाय अशाप्रकारचे शिक्षण घ्यावे असे सुचविलेले होते तर लोकहितवादींनी शेती व्यवसाय चांगला करण्यावरोबरच विविध वस्तू तयार करण्याची कला शिकावी असे सुचविलेले होते. याशिवाय महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, व राजर्षी शाहू महाराज यांनी शेती विषयक शिक्षणास विशेष महत्त्व दिलेले होते. त्यांच्या मते भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे शेतकऱ्यांचा उद्धार होण्यासाठी त्यांना आधुनिक अवजारे, शेतीच्या आधुनिक पद्धती व इतर व्यवसायांचे शिक्षण मिळावे असा विचार त्यांनी केलेला होता. अशा दूरदृष्टीचे सुधारकांचे विचार होते.

४) एकोणिसाव्या शतकात पाश्चात्य ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात प्रचंड विकास घडून आलेला होता. त्यामुळे या सर्वच समाज सुधारकांनी या पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचे महत्त्व ओळखून याच शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केलेला होता. विविध शास्त्रे त्यामध्ये जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, इतिहास, भूगोल, मानववंशशास्त्र याशिवाय विविध माहिती देणाऱ्या ज्ञानशाखा या विषयांवर अधारित ही पाश्चात्य शिक्षण पद्धती होती. त्यामुळे भारताचे आधुनिकीकरण घडविण्यासाठी समाजसुधारकांनी पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसतो. अशा शिक्षणामुळेच खऱ्या अर्थाने भारतात आधुनिक ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाचा पाया घातला जाईल असा त्यांचा विश्वास होता. एकूणच समाजसुधारकांनी पाश्चात्य पद्धतीचा पुरस्कार करून आधुनिक व पुरोगामी शिक्षणाचा पाया भारतात घातला.

५) समाज सुधारकांनी ज्या समाजात आपल्या शैक्षणिक विचारांची रूजवणूक करण्याचा प्रयत्न केला त्या समाजात शिक्षणाविषयी प्रचंड अनास्था होती. त्यामुळे सुधारकांचे शैक्षणिक व सुधारणावादी विचार समाजात रूजण्यासाठी बराच कालावधी जावा लागला. जसजसा शिक्षणाचा प्रसार समाजात वाढत गेला तसतसा समाजात शिक्षणाविषयी जागृत होण्यास सुरूवात झाली. आज शिक्षण व्यवस्थेत जे आमुलाग्र परिवर्तन झालेले आहे. सामान्यातील

सामान्य पालक आज आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी जागृत झालेला आहे हे केवळ समाज सुधारकांच्या प्रयत्नांचे फळ मानावे लागेल.

६) समाज सुधारकांनी आपल्या शैक्षणिक विचारांमधून पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा पुरस्कार केलेला असला तरीही त्यांना भारतातील ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणात मात्र अनेक दोष लक्षात आलेले होते त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांच्या धोरणातील काही चुकीच्या बाबींवर टीका केलेली होती. प्रत्येक समाज सुधारकांमध्ये चांगले काय व वाईट काय हे ओळखण्याची एक शक्ती असते. ब्रिटिशांनी जे नोकरदार निर्माण करण्यापुरता मर्यादित दृष्टिकोन शिक्षणाचा ठेवलेला होता त्यास या सुधारकांनी विरोध केलेला होता. त्याच बरोबर इ.सन १८३५ नंतर लॉर्ड मेकॉलेने जो 'शिक्षणाचा पाझर सिद्धांत' मांडलेला होता त्यासही विशेषत्त्वाने महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, राजर्षी शाहू महाराज यासारख्या समाज सुधारकांनी विरोध केलेला होता. शिक्षण घेणे हा सर्वांचा अधिकार आहे, केवळ मुठभर उच्चभ्रूंचा अधिकार नाही असे स्पष्ट मत या सुधारकांचे होते. यासंदर्भातील अनेक दोषही सुधारकांनी दाखवून दिले. ब्रिटिशांचे शिक्षण केवळ शहरी भागापुरतेच मर्यादित झालेले होते; खेडयातील शिक्षणासाठी लोकसंख्येच्या तुलनेत आवश्यक एवढया शाळा उपलब्ध नव्हत्या; सरकार शिक्षणावर कमी खर्च करीत होते व युद्धावर अधिक खर्च करीत होते. त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणावर टीका केलेली होती. एक बाबतीत मात्र समाज सुधारकात एक वाक्यता होती ती म्हणजे ब्रिटिशांच्या आगमनामुळे पाश्चात्य ज्ञानाची ओळख होऊ शकली होती त्याचा उपयोग भारतीयांनी करून घेणे गरजेचे त्यांना वाटत होते.

७) शिक्षण प्रक्रियेमध्ये जे अध्ययन व अध्यापन चालते त्यातील दुवा साधणारा घटक हा अभ्यासक्रम असतो. यातून ज्ञान, कौशल्य व उपयोजन इत्यादी गोष्टी साध्य होणे आवश्यक असते. याशिवाय अभ्यासक्रम हा सर्व सामावेशक असावा, विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणारा असावा, अतिशय अवघड किंवा अति सोपा नसावा विशेषतः त्याची रचना सोप्याकडून अवघडाकडे अशा पद्धतीने केलेली असावी, प्रायोगिक ज्ञानावर

त्यात भर असावा, त्यातील संकल्पना सोप्या पद्धतीने उलगडून सांगितलेल्या असाव्यात या सर्व बाबींची काळजी अभ्यासक्रमांचे नियोजन करताना घेतलेली असावी.

शिक्षणातील अभ्यासक्रमाविषयी सर्वच समाजसुधारकांनी आपले विचार मांडलेले दिसतात. समाजसुधारकांनी तत्कालीन समाजाच्या गरजा कोणत्या होत्या याचा विचार करून अभ्यासक्रम कसा असावा याविषयी आपले विचार मांडलेले होते. महात्मा फुलेंनी प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टिकोनातून मोडी, बाळबोध, गणित, इतिहास, भूगोल, व्याकरण व आरोग्य त्याच बरोबर दोन किंवा तीन भाषा असा अभ्यासक्रम सुचविला होता. तर माध्यमिक शाळांच्या अभ्यासक्रमात शेती विषयक माहितीचा समावेश करावा असेही सांगितलेले होते. न्या. रानडे व लोकमान्य टिळकांनी अभ्यासक्रम अतिशय अवघड व अवास्तव मोठा नसावा असे मत मांडलेले होते. त्याच बरोबर या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षण व इतर कला व विद्या यांचाही समावेश असावा असेही विचार त्यांनी मांडलेले होते. या अभ्यासक्रमात त्यांनी प्रायोगिकतेवर भर दिलेला होता. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, आज ज्या अभ्यासक्रमाच्या संशोधनाविषयी व उद्दिष्टांविषयी चर्चा केली जाते त्याविषयी समाज सुधारकांनी एकोणिसाव्या शतकातच आपल्या शिक्षण विचारांच्या माध्यमातून चर्चा केलेली होती.

आजच्या काळात अभ्यासक्रमाविषयी सखोल विचार केला जात असला तरीही काही अडचणी विशेषत्त्वाने जाणवतात. आज अभ्यासक्रमात एक वाक्यता दिसून येत नाही. केंद्रिय परीक्षामंडळाचा अभ्यासक्रम व महाराष्ट्र परीक्षा मंडळाचा अभ्यासक्रम काहीसा वेगळा असल्यामुळे खरे सक्षमीकरण या अभ्यासक्रमाने होणार नाही असे खेदाने नमूद करावे लागते.

८) अभ्यासक्रमाचे माध्यम ब्रिटिशांनी इंग्रजी ठेवलेले होते. लॉर्ड मेकॉले यांना इंग्रजी भाषेचा अति अभिमान होता. तथापि समाज सुधारकांनी मात्र अभ्यासक्रमाचे माध्यम हे स्थानिक भाषा किंवा मातृभाषा असावे याविषयी आपले मत स्पष्टपणे मांडलेले होते. विद्यार्थ्यांचा भाषिक विकास हा मातृभाषेतील शिक्षणानेच होऊ शकतो. इंग्रजी भाषेचे महत्त्व सर्वच

समाजसुधारकांना जाणवले होते. त्याकाळी विविध विषयांवर माहिती असणारी पुस्तके ही बहुतांशी इंग्रजी भाषेतूनच उपलब्ध होत असत. त्यामुळे इंग्रजी ही निश्चितच ज्ञान भाषा होती हे समाज सुधारकांच्या विचारांवरून दिसून येते. या शोध प्रबंधात अभ्यासण्यात आलेल्या सर्व सुधारकांनी स्वतः इंग्रजी भाषेचे ज्ञान संपादित केलेले होते म्हणजेच ते इंग्रजीचा द्वेष करणारे नव्हते. त्यांच्या मते भाषा ही केवळ माध्यम आहे त्यामुळे इंग्रजी पुस्तकात समाविष्ट असलेले ज्ञान मातृभाषेतूनही अभ्यासता येऊ शकते असे त्यांचे मत होते. इंग्रजी ही भाषा सर्वसामान्यांना कठीण वाटत होती. कदाचित यामुळे अनेकजण शिक्षणाकडे दुर्लक्ष करतील. मुले शाळा अर्धवट सोडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून मातृभाषेतून शिक्षण असावे असे विचार सुधारकांनी मांडलेले होते. मुळात शिक्षणातून दिले जाणारे ज्ञान मातृभाषेतून असो अथवा इंग्रजी भाषेतून असो ज्ञान हे तेच असते. लोकमान्य टिळकांनी आपल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांचे माध्यमही स्थानिक भाषाच असावे असे सुचविलेले होते.

आजच्या काळाचा विचार करता अनेक पालक आपल्या मुलांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतच शिक्षण घ्यावे असा आग्रह धरतात. चार पाच इयत्तांचे शिक्षण झाले की, त्यांना इंग्रजी माध्यम कठीण वाटतेच शिवाय मराठी माध्यम पेलवण्याची कुवतही त्यांच्यात राहत नाही. सुधारकांनी मराठी माध्यमाचा पुरस्कार केला या त्यांच्या विचारांतून एक बोध घेण्यासारखा आहे तो म्हणजे इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण झालेले मराठी माध्यमातून उत्तीर्ण झालेल्यांपेक्षा अधिक ज्ञानी असतात असे समजण्याचे कारण नाही. कोणत्याही माध्यमातून घेतलेले ज्ञान हे तेवढेच महत्त्वाचे असते. आज कित्येक चांगल्या दर्जाचे डॉक्टर, इंजिनिअर, वकील यांचे शालेय शिक्षण मराठी माध्यमांच्या शाळांतून झालेले दिसते तरीही ते आपल्या व्यवसायात यशस्वी झाल्याचे पाहायला मिळते. हे सर्व सांगत असतानाच इंग्रजी भाषा ही जागतिक भाषा असल्याने या भाषेचे ज्ञान सर्वांनी घ्यावे असेही मत समाज सुधारकांनी मांडलेले दिसून येते.

आज जागतिकीकरणाच्या या युगात इंग्रजी भाषा महत्त्वाची आहे. त्यामुळे प्रादेशिक भाषेबरोबरच इंग्रजीचे ज्ञानही महत्त्वाचे आहे. एकीकडे जागतिकीकरणाच्या युगात आपण जगतो आहोत असे आपण म्हणतो व दुसरीकडे इंग्रजी भाषेकडे दुर्लक्ष करतो हे चुकीचे आहे. एकूणच शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असले तरी इंग्रजी भाषेचे ज्ञान आपल्याला असणे आवश्यक आहे.

९) समाज सुधारकांनी आपल्या शिक्षण विचारांमध्ये परीक्षा पद्धतीचाही विचार केलेला होता. परीक्षा ही अध्ययन-अध्यापन पक्रियेचे मूल्यमापन करण्याचे तंत्र आहे. समाज सुधारकांनी या परीक्षांना कितपत महत्त्व दिले जावे याबाबतही आपले विचार मांडलेले होते. त्यांच्या मते या परीक्षा खूप नसाव्यात त्याच बरोबर त्या अतिक्लिष्ट नसाव्यात. न्यायमूर्ती रानडे यांनी परीक्षापद्धती बाबत सखोल मत मांडलेले होते. त्यांच्या मते परीक्षांचा उद्देश हा अभ्यासक्रम किती समजला हे तपासणे आहे, विद्यार्थी नापास करणे नाही. काही विद्यार्थी सहापैकी पाच विषयात पास होतात व केवळ एकच विषयात नापास होतात तरीही त्यांचा एकूण निकाल नापासच दिला जातो. मुळात ज्या विषयात तो नापास होतो त्याविषयाचे ज्ञान त्याच्याकडे नसेल किंवा त्याला त्याविषयाची गोडी नसेल असे कोणतेही कारण असू शकते. न्यायमूर्ती रानडेंच्या मते विद्यार्थी एक विषयात नापास झाला ही त्याची नकारार्थी बाजू तो पाच विषयात पास झाला या सकारात्मक बाजूपेक्षाही अधिक अधोरेखित केली जाते. त्यांच्या मते विद्यार्थ्यांच्या परीक्षांच्या माध्यमातून सकारात्मक बाजू कोणत्या याचा विचार होणे अधिक गरजेचे होते. परीक्षांना दिल्या जाणाऱ्या अतिमहत्त्वामुळे विद्यार्थी ज्ञानकेंद्री व अभ्यासकेंद्री न राहाता ते केवळ परीक्षाकेंद्री बनतात. जे अभ्यासायचे व शिकायचे ते केवळ परीक्षेपुरतेच आहे. परीक्षा संपली की, सगळे विसरून जायचे असा एकंदरीत विद्यार्थ्यांचा समज बनतो. वास्तविक या विचारात निश्चित तथ्य आहे कारण एखाद्या बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची अभ्यास करण्याची पद्धत पाहिली तर आमका प्रश्न बोर्डाला बऱ्याचदा आलेला आहे म्हणून तो पाठ करायचा अशी वृत्ती आढळून येते. एकूण वर्षभर केवळ तीन तासाची परीक्षा द्यायची म्हणून अटापिटा

चालतो. याच अनुषंगाने समाजसुधारकांनी परीक्षेपेक्षा ज्ञानाला अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते.

१०) समाजसुधारकांनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाचा विचार आपल्या शिक्षणविचारांमध्ये केलेला होता. विशेषतः महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, व राजर्षी शाहू महाराज या तीन सुधारकांनी प्राथमिक शिक्षणावर विशेष भर दिलेला होता. लॉर्ड मेकॉलेच्या झिरपण्याच्या सिद्धांताला विरोध करून सक्तीच्या व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार त्यांनी केलेला होता. सर्व जातीतील लोकांना सक्तीचे व मोफत शिक्षण सरकारकडून दिले जावे असे विचार या सुधारकांनी मांडलेले होते. अडाणी समाजाला स्वतःच्या शिक्षणाची जाणीव नसते. यासाठी सरकारकडून जोपर्यंत शिक्षणाची सक्ती होत नाही तोपर्यंत शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहचणे कदापि शक्य होणार नाही. या दृष्टिकोनातून समाजसुधारकांनी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणातून व्यक्तीला सुसंस्कृत जीवन जगता येईल एवढा विकास किमान व्हावा व त्याला लिहिता वाचता येण्याबरोबरच काही गणितीय आकडेमोड करता यावी एवढी अपेक्षा समाजसुधारकांची दिसून येते. सुधारकांनी सुचविलेल्या उपायांनुसार आज महाराष्ट्रापुरता विचार केला तर सरकारने सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी केलेली आहे. तथापि सुधारकांनी प्राथमिक शिक्षणाचे जे उद्दिष्ट सांगितलेले होते ते खरोखरच किती प्रमाणात साध्य होत आहे या बाबतीत शंका उपस्थित होते. कारण प्राथमिक शिक्षणातून लिहिता वाचता येणे अपेक्षित आहे तरीही शाळेत जाणाऱ्या अनेक मुलांना लिहिता वाचताही येत नाही ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.

माध्यमिक व उच्च शिक्षणासही सुधारकांनी महत्त्व दिल्याचे दिसते. व्यक्ती जेवढा उच्च विद्याविभूषित होत जातो तेवढा त्याचा सर्वांगीन विकास होत जातो. यासाठी उच्च शिक्षणही महत्त्वाचे आहे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे सर्वच समाजसुधारकांनी उच्च शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. लोकमान्य टिळकांनी भारतीय विद्यापीठे ही ऑक्सफर्ड, केंब्रिज व जर्मन विद्यापीठांप्रमाणे विद्याव्यासंग जोपासणारी असावीत, तज्ज्ञ प्राध्यापक

असावेत, संशोधनावर भर दिला जावा, विद्यापीठे केवळ पदव्या वाटणारी दुकाने असू नयेत, विविध अभ्यासक्रमांचा पुरस्कार केला जावा अशा अनेक सुधारणा विद्यापीठांच्या बाबतीत सुचविल्या होत्या. न्यायमूर्ती रानडे यांनीही विद्यापीठीय शिक्षणाचा अभ्यासक्रम दर्जेदार असावा व विशेषतः वसतिगृहात राहून गुरूंच्या सानिध्यात हे शिक्षण व्हावे असे विचार मांडलेले होते. याशिवाय ज्या विद्यार्थ्यांना आपल्या कामामुळे नियमित शिक्षण घेता येत नाही अशा विद्यार्थ्यांना घरी अभ्यास करून परीक्षा देण्याची सवलत असावी असेही मत त्यांनी मांडलेले होते. आज दूरशिक्षण विभाग संकल्पना किंवा मुक्त विद्यापीठ संकल्पना मोठया प्रमाणात समाजात रूजल्या आहेत त्याविषयीचे विचार न्यायमूर्ती रानडे यांनी एकोणिसाव्या शतकात मांडलेले दिसतात. विद्यापीठीय शिक्षणातील हे बदल सुधारकांच्या विचाराचे फलित म्हणावे लागेल.

११) समाजसुधारकांनी आपले शिक्षण विचार मांडताना पुरूषांच्या शिक्षणाबरोबरच स्त्री शिक्षणाचाही विचार केलेला होता. पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षणाचा हक्क आहे असे सर्वच समाजसुधारकांनी मत मांडल्याचे दिसते. त्यामुळे समाजात स्त्री शिक्षणाची एक चळवळ उभी रहिली. सर्व समाजसुधारकांनी स्त्रियांच्या शिक्षणाविषयी आपली भूमिका स्पष्ट केलेली होती. अगदी स्त्रियांना शिक्षण का द्यायचे? इथपासून कोणत्या पद्धतीचे शिक्षण दिले जावे? एवढया विस्तारित प्रमाणात विचार सुधारकांनी स्त्री शिक्षणाविषयी मांडलेले होते. प्रामुख्याने स्त्रियांसंबंधी ज्या अनिष्ट प्रथा होत्या त्या दूर करण्यासाठी, स्त्रीचे कुटुंबातील स्थान उंचावण्यासाठी, स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी, स्त्रियांचे जीवन सुसंस्कृत व उन्नत घडविण्यासाठी, कुटुंबावर चांगले संस्कार व्हावेत यासाठी, प्रापंचिक जबाबदाऱ्या स्त्रियांना समजाव्यात यासाठी, स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य निर्माण व्हावे यासाठी अशा विविध कारणांसाठी स्त्रियांना निश्चितपणे शिक्षण मिळावे असे सुधारकांना वाटत होते.

बाळशास्त्री जांभेकर व आगरकर यांनी स्त्रियांच्या शिक्षणाबाबतीत युरोपातील स्त्रियांना जसे खुले शिक्षण दिले जाते तशाच प्रकारचे व सहयोगी पद्धतीचे शिक्षण

भारतीय स्त्रियांना असावे असे मत मांडले होते. लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी मुलींच्या स्वतंत्र शाळा असाव्यात असे मत मांडलेले होते. लोकमान्य टिळक व महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार वरील सर्वांवरून भिन्न असल्याचे दिसते. या दोन्ही सुधारकांनी स्त्रियांचे कर्तव्य आणि जबाबदारी याचा विचार करून स्त्रियांना पुरूषांपेक्षा वेगळा अभ्यासक्रम असावा असे सुचविलेले होते. त्यांच्या मते स्त्रियांची समाजातील भूमिका व कर्तव्य वेगळे असल्याने तसेच त्यांना नोकरी करण्याची आवश्यकता नसल्याने पुरूषी शिक्षणाचा उपयोग होणार नाही. विशेषतः आदर्श गृहिणी, सुसंस्कारित पत्नी व आदर्श माता घडतील असे शिक्षण स्त्रियांना हवे असे त्यांनी मत मांडलेले होते. आजच्या काळाचा विचार करता मात्र हे विचार समर्थनीय ठरताना दिसत नाहीत. आज अनेक स्त्रिया पुरूषी पद्धतीचे शिक्षण घेऊन उच्च पदस्थ नोकऱ्यांची पदे भूषविताना दिसतात. त्याच बरोबर विवाहाच्या वेळी मुलगी नोकरीला आहे का? याचा विचारही आज केला जातो. म्हणजेच पुरूषी शिक्षण घेतलेली स्त्री आदर्श माता किंवा पत्नी होऊ शकत नाही असे म्हणनेही संयुक्तिक ठरणारे नाही.

सुधारकांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून स्त्री शिक्षणाचा स्वतः प्रसार करण्याचा प्रयत्न केला. यातून स्त्री शिक्षण कार्यास चालना मिळाली असली तरीही समाजात स्त्री शिक्षणाविषयीची जेवढी जागरूकता निर्माण होणे अपेक्षित होते तेवढया प्रमाणात झालेली दिसत नाही. समाज सुधारकांनी जी उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला ती उद्दिष्टे आजही साध्य होताना दिसत नाही. शिक्षणाने स्त्री पुरूष समानता निर्माण होणे आवश्यक होते परंतु आजही स्त्री पुरूष समानता खऱ्या अर्थाने निर्माण झालेली नाही. कुटुंबातील स्त्रियांचे स्थान सुधारलेले दिसत नाही. नोकरी करणारी स्त्री देखील आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण नाही. स्त्री पुरूष समानतेचा पुरस्कार केला जाणाऱ्या समाजात आजही स्त्रियांवर पुरूष प्रधान संस्कृतीतून अत्याचार होताना दिसत आहे. या परिस्थितीत बदल होणे आवश्यक आहे.

१२) समाजसुधारकांनी शिक्षक कसा असावा याविषयीही चर्चा आपल्या शिक्षण विचारांमध्ये केलेली होती. मुळात बाळशास्त्री जांभेकर, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, लोकमान्य टिळक व महर्षी कर्वे या समाजसुधारकांनी स्वतः शिक्षकाची भूमिका बजावलेली असल्यामुळे शिक्षकांच्या कार्याविषयी त्यांची ठाम अशी भूमिका होती. तत्कालीन शिक्षकांची काम करण्याची पद्धत, विद्यार्थ्यांना शिकविण्याची कळकळ, त्यांच्याकडील ज्ञान, त्यांचे आर्थिक विचार यातून समाजसुधारकांनी शिक्षक कसा असावा याविषयी भूमिका मांडली. त्याकाळी शिक्षक होण्यास लोक इच्छुक नव्हते. केवळ पोट भरण्याचे साधन म्हणून तत्कालीन लोक स्वतःकडे ज्ञान नसतानाही शिक्षक व्हायचे. ज्याला इतर काही काम करता येत नाही त्याने शिक्षक व्हावे असा एक समज त्याकाळी होता. या विचारात आज बदल झाला असेही म्हणता येत नाही. आजही अशाच विचारचे भरपूर मुले आहेत. बारावी पास झालो म्हणून डी.एड.करून शिक्षक व्हावे किंवा बी.ए.झाले म्हणून बी.एड. करून शिक्षक व्हावे असा विचार करणारांची संख्या आजही कमी नाही. सुधारकांच्या मते मात्र केवळ नोकरी म्हणून हा पेशा स्वीकारणे योग्य नाही.

आजच्या काळाचा विचार करता समाज सुधारकांनी जे निस्वार्थी विचार शिक्षकी पेशाच्या बाबतीत मांडलेले होते ते विचार आजच्या शिक्षकांमध्ये दिसत नाही याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नोकरी म्हणून शिक्षणाकडे पाहण्याची वृत्ती आजही दिसून येते. काही शिक्षक निश्चित चांगलेही आहेत. अशा शिक्षकांचा अपवाद सोडला तर सुधारकांना अभिप्रेत असलेले शिक्षक आज निर्माण झालेले नाहीत असेच चित्र आज दिसून येते त्यामुळे शिक्षणाची नेमकी दिशा काय असेल याबाबत साशंकता वाटते.

१३) एकोणिसाव्या शतकातील शिक्षण व्यवस्थेचे सखोल परीक्षण समाजसुधारकांनी केलेले होते. या निरीक्षणातून शिक्षणाची अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी योग्य यंत्रणा असणे आवश्यक आहे असे सुधारकांचे मत होते. विशेषतः बाळशास्त्री जांभेकर, महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती रानडे व राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणामध्ये एक सुनियोजित प्रशासकीय यंत्रणा असावी याविषयी स्पष्ट विचार मांडलेले दिसतात. महात्मा

फुलेंनी शिक्षणाचा कारभार स्वतंत्र शाळा खात्याच्या माध्यमातून चालविला जावा असे सुचविले होते. शहरी व ग्रामीण असे दोन भाग करून शहरी शिक्षण नगरपालिकांकडे व ग्रामीण शिक्षण जिल्हा लोकल बोर्ड व स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात यावे व सरकारने अनुदान देऊन त्यावर नियंत्रण ठेवावे. नियंत्रणासाठी शिक्षणखाते स्थापन करावे असे सुचविले होते. तशाच प्रकारचे विचार शाहू महाराजांचे होते. शाहू महाराजांनी शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी संचालक, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी या अधिकाऱ्यांचा विचार केलेला होता. त्याचबरोबर गाव पातळीवर शाळा पंच पद्धती असावी असे सुचविलेले होते. म्हणजेच शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ही प्रशासकीय व्यवस्था महत्त्वाची असते असे सुधारकांच्या विचारांवरून दिसून येते. शैक्षणिक प्रशासनाबरोबरच महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, शाहू महाराज व महर्षी कर्वे यांनी शिक्षणाच्या आर्थिक उपाययोजनेविषयीही आपली मते मांडली होती. शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी सरकारने अनुदान स्वरूपात निधी द्यावा त्याच बरोबर खासगी संस्थांनी देणगी गोळा करून शिक्षणाच्या कामी पुढाकार घ्यावा असे विचार त्यांनी मांडलेले होते.

१४) ग्रंथ आणि शिक्षण प्रक्रिया यांचा अनन्य साधारण असा संबंध असतो. प्रामुख्याने अध्ययन व अध्यापन पक्रिया अभ्यासक्रमांच्या पाठयपुस्तकांवर अधारित चालू असते व या पाठय पुस्तकांतील ज्ञानाला विस्तारित व सखोल स्वरूप आणण्याचे काम संदर्भ साहित्य किंवा इतर ग्रंथाचे असते. समाजात वाचन संस्कृती जोपासली तर समाजातील लोकांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावत जातात व व्यक्ती एकाच घटकाच्या विविध पैलूंविषयी विचार करू शकतो. यासाठी ग्रंथालयांची आवश्यकता असते. या अनुषंगाने लोकहितवादी व न्यायमूर्ती रानडे यांनी ग्रंथालय चळवळीचे विशेष समर्थन केल्याचे दिसते.

आज प्रसार माध्यमांचा एकंदर समाजव्यवस्थेवर एवढा प्रभाव पडलेला आहे की, त्यामुळे वाचन संस्कृतीच नष्ट होत आहे. वास्तविक या माध्यमांचा उपयोग करून उत्कृष्ट ज्ञान मिळविणे शक्य आहे. 'इ' बुक, ऑडिओ बुक या संकल्पनांचा वापर करणे आवश्यक ठरते. ग्रंथ हे मानवी मन घडविणारे प्रभावी साधन आहे त्यामुळे विविध

विषयांवरील ग्रंथांचे वाचन होणे आवश्यक आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे. हे चित्र सक्षम समाजनिर्मितीच्या दृष्टिकोनातून हानीकारक आहे. याचा आपल्याला निश्चित विचार करावा लागणार आहे.

१५) समाजसुधारकांनी मांडलेल्या या शैक्षणिक विचारातून शिक्षणाचा पाया महाराष्ट्रात घातला गेला. त्यामुळे सुधारकांच्या या विचारांचा एकूणच महाराष्ट्राच्या समाजजीवनावर प्रभाव पडला. संथ व सावकाश का होईना शिक्षणाचे महत्त्व समाजास पटू लागले. सुधारकांनी केलेल्या सार्वत्रिक शिक्षणाच्या पुरकारातून अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या बहुजन समाजासही शिक्षण मिळू शकते याची जाणीव झाली. अशा प्रकारच्या शैक्षणिक विचारातून एकोणिसाव्या शतकातच महाराष्ट्रात एक प्रभावी शैक्षणिक चळवळ उभी राहिली. शिक्षण ही कोणत्याही ठराविक वर्गाची मक्तेदारी नाही असा एक क्रांतिकारी विचार समाजात पसरविण्यात हे सर्व समाजसुधारक यशस्वी झाले. त्यातूनच शिक्षणाची एक क्रांतिकारी वाटचाल सुरू झाली. आज शेतकरी, दलित, कामकरी, कारागीर या बहुजन समाजाची जी शैक्षणिक प्रगती झालेली आहे ती केवळ सुधारकी विचारांमुळे आणि त्यांच्या प्रयत्नांमुळेच झालेली आहे. विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या उभारणीत व विकासात या समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचे योगदान मोठेच आहे असे ठामपणे म्हणावे लागेल.

## ८.२ विसाव्या शतकात महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीवर समाजसुधारकांचा पडलेला प्रभाव

एकोणिसाव्या शतकातील विविध समाजसुधारकांनी मांडलेल्या शैक्षणिक विचारांचे संभवनीय उपयुक्तता मूल्य तपासून पहाणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट प्रस्तुत शोध प्रबंधाचे आहे. समाजसुधारकांनी मांडलेले शैक्षणिक विचार हे केवळ एकोणिसाव्या शतकापुरतेच मर्यादित नव्हते. विसाव्या शतकातही त्यांच्या विचारांचा प्रभाव विशेषत्त्वाने जाणवतो.

१) एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांच्या विचारांमुळे विसाव्या शतकात शिक्षण विषयक एक चळवळ उभी राहिलेली दिसते. महर्षी कर्वे व राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म एकोणिसाव्या शतकातील होता परंतु त्यांचे शैक्षणिक कार्य विसाव्या शतकामध्ये झाले. या दोन्ही समाजसुधारकांच्या विचारांवर पूर्वीच्या समाज सुधारकांचा प्रभाव पडलेला होता. महर्षी कर्वेनी स्त्री शिक्षणाच्या कामी विशेष पुढाकार घेऊन विधवांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी आश्रम स्थापन केला. याच संस्थेच्या माध्यमातून महिला विद्यालय व विद्यापीठ स्थापन केले. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांवर महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे यासारख्या समाज सुधारकांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. महात्मा फुलेंना जी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची कल्पना अभिप्रेत होती ती आपल्या संस्थानात प्रत्यक्षात राबविण्याचे काम राजर्षी शाहूंनी केले होते.

सुधारकांनी मांडलेल्या शैक्षणिक विचारातून प्रेरणा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख या सारखे अनेक समाजसुधारक विसाव्या शतकात पुढे आले. कर्मवीर भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून महाराष्ट्रभर खासगी शाळांचे जाळे निर्माण केले. महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीने महाराष्ट्रात बहुजन समाजाच्या शिक्षणाची चळवळ उभारली होती त्यातूनच बहुजन समाजाच्या शैक्षणिक संस्था आज कार्य करताना दिसत आहेत. डॉ. बाबासाहेब अंबेडकरांनी स्थापन केलेली पिपल्स एज्युकेशन सोसायटी ही संस्था बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एक अग्रणी भूमिका बजावताना दिसत आहे. समाज सुधारकांनी शिक्षण विकासात सरकार व त्याच बरोबर खासगी संस्था या दोहोंनी पुढाकार घेणे आवश्यक आहे असे सुचविले होते. त्या अनुषंगाने विचार करता अनेक खासगी संस्था शिक्षण देण्याच्या हेतूने शिक्षण क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांनी स्थापन केल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा निहाय काम करणाऱ्या खासगी संस्थाही स्थापन झाल्या आहेत. त्याचबरोबर अनेक छोटया मोठया संस्था शिक्षण कार्य करीत आहेत. महाराष्ट्राच्या शिक्षण विकासात या संस्थांची कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरल्याचे दिसते. एकूणच असे म्हणता येईल की,

समाजसुधारकांच्या शैक्षणिक विकासामुळे विसाव्या शतकात शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्रात एक मोठी चळवळ उभी राहिली.

२) एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांच्या शैक्षणिक विचारांमुळे अनेक महत्त्वपूर्ण बदल विसाव्या शतकात घडून आलेले दिसतात. स्वातंत्र्योत्तर काळात हे बदल विशेष महत्त्वाचे ठरले गेले. स्वातंत्र्योत्तर काळात घटनेतील ४५ व्या कलमानुसार सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची घोषणा करण्यात आलेली आहे. शिक्षण विकासासाठी देश पातळीवर विविध आयोग नेमण्यात आले त्यानुसार महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीला चालना मिळाली. यामध्ये कलकत्ता विद्यापीठ आयोग, राधाकृष्णन आयोग, माध्यमिक शिक्षण आयोग (मुदलीयार आयोग), भारतीय शिक्षण आयोग (कोठारी आयोग) व १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या आयोगांचा समावेश होता. आजची शिक्षण पद्धती ही १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर अधारभूत आहे. या धोरणानुसार आज महाराष्ट्रात १ ली ते ८वी प्राथमिक, ९वी ते १० वी माध्यमिक इ. ११ वी व १२ वी उच्च माध्यमिक, व त्यापुढील तीन वर्ष पदवी शिक्षण अशा प्रकारचा आकृतिबंध शिक्षणात स्वीकारण्यात आला आहे.

समाज सुधारकांनी शिक्षणाची अंमलबजावणी कार्यक्षम व्हावी यासाठी प्रशासकीय यंत्रणा असावी असे सुचविलेले होते. आज महाराष्ट्रातील शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र शिक्षण मंत्रालय असून शालेय शिक्षण खाते, उच्च व तंत्र शिक्षण खाते, भाषा साहित्य व कला खाते, शिष्यवृत्ती खाते, नियोजन व सहाय्यक शिक्षण खाते अशी विविध खाते कार्यरत आहेत. शिक्षण खात्याचा राज्यशिक्षण मंत्री, उपशिक्षण मंत्री, राज्य शिक्षण सचिव, राज्य शिक्षण संचालक, विभागीय पातळीवर उपसंचालक, त्यांना मदतनीस म्हणून सहाय्यक संचालक, जिल्हापातळीवर जिल्हा शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी, तालुका पातळीवर गटशिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी असा प्रशासकीय अराखडा आहे. शालांत बोर्ड परीक्षा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यरत आहे.

३) समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाविषयी जे विचार मांडलेले होते त्यामुळे स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीस स्त्री साक्षरतेचे प्रमाण केवळ शेकडा दोन एवढे होते हे स्वतः महर्षी कर्वेनी सांगितलेले होते. विसाव्या शतकाच्या अखेरीस निश्चितच ही आकडेवारी वाढलेली दिसते. हे समाजसुधारकांच्याच शैक्षणिक विचारांचे यश म्हणावे लागेल. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ६७.०३% एवढे होते. तत्कालीन काळात स्त्रियांनी नोकऱ्या करणे अभिप्रेत नव्हते त्यामुळे स्त्रियांना शिक्षणाची काय आवश्यकता आहे? असा प्रश्न समाजाचा होता. सुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे खुले झाले व आजच्या काळातील स्त्रिया शिक्षण घेऊन विविध पदांवर नोकऱ्या तसेच व्यवसाय करताना दिसतात.

४) समाजसुधारकांनी जे माध्यम विषयक विचार मांडलेले होते त्याचाही प्रभाव विसाव्या शतकातील शैक्षणिक धोरणावर पडल्याचे दिसते. त्याकाळी ब्रिटिशांनी इंग्रजी माध्यमाचाच स्वीकार केलेला होता. सुधारकांनी मात्र शिक्षण मातृभाषेतूनच असावे व इंग्रजी भाषेला महत्त्व दिले जावे असे सुचविले होते. आजच्या काळात इंग्रजी व मराठी अशा दोन्ही माध्यमातून शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. अगदी प्राथमिक ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंत ही सुविधा उपलब्ध आहे. इंग्रजीचे महत्त्व ओळखून मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इंग्रजी हा विषय सक्तीचा केलेला आहे. महात्मा फुलेंनी सांगितल्याप्रमाणे त्रिभाषा सुत्र शिक्षणात स्वीकारलेले असून मातृभाषा, राष्ट्रभाषा व इंग्रजी या भाषांचा समावेश अभ्यासक्रमात केलेला आहे. सुधारकांनी सुचविलेल्या अभ्यासक्रमाच्या महत्त्वानुसार अभ्यासक्रम बदलत्या काळानुसार बदलविला जातो. अभ्यासक्रम ठरविण्यासाठी स्वतंत्र विषयनिहाय अभ्यासमंडळांची स्थापना केली जाते व त्यानुसार उद्दिष्टांचा विचार करून अभ्यासक्रम तयार केला जातो. अभ्यासक्रम ठरविण्यासाठी पाठयपुस्तक निर्मिती मंडळ, बालचित्रवाणी, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद या सारख्या संस्था कार्यरत आहेत.

५) समाज सुधारकांनी विद्यापीठीय शिक्षणासही विशेष महत्त्व दिलेले होते त्यानुसार महाराष्ट्रातील उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत असताना दिसत आहे. आज महाराष्ट्रात सर्व विद्यापीठे मिळून जवळपास ४५ विद्यापीठे आहेत. विद्यापीठीय नियमात आज सुधारणा झाल्याचे दिसते. केवळ एक दोन विषयात विद्यार्थी नापास झालेला असेल तर त्याचे वर्ष वाया जाऊ नये म्हणून ए.टी.के.टी.चा नियम आहे. त्याच बरोबर बहिःस्थ विद्यार्थी म्हणून परीक्षा देण्याची परवानगी आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अशाच बहिःस्थ पद्धतीने परीक्षा देणारांसाठी स्थापन झालेले विद्यापीठ आहे. लोकमान्य टिळकांनी विद्यापीठांनी ज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन करीत रहावे असे सुचविले होते त्यानुसार प्रत्येक विद्यापीठ आपला दर्जा टिकविण्यासाठी विविध उपक्रम राबवित असतांना दिसते. उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी 'राष्ट्रीय मूल्यमापन संस्था (नॅक) स्थापन करून महाविद्यालयीन शिक्षणाची गुणवत्ता व दर्जाची तपासणी केली जाते. यातून गुणवत्ता सुधारण्याला अधिक महत्त्व दिले जात आहे.

६) आज महाराष्ट्रात शालेय विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या दिल्या जात आहेत. अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती, राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती, सावित्री बाई फुले शिष्यवृत्ती, भारत सरकार शिष्यवृत्ती, राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती, आर्थिक दृष्टया मागास मुलांची फी माफी, इ.१ ली ते १२ वी मुलींसाठी मोफत शिक्षण अशा प्रकारच्या सवलती आज शिक्षणात दिल्या जातात. हे समाजसुधारकांच्या शिक्षण विचारांचे यश म्हणावे लागेल.

७) शिक्षण प्रभावीपणे साध्य व्हावे या दृष्टिकोनातून शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते. बदलत्या अभ्यासक्रमानुसार सेवांतर्गत प्रशिक्षणाचीही उपाययोजना केली जाते. शिक्षणाच्या आकृतिबंधानुसार किमान शैक्षणिक पात्रता निश्चित केलेली आहे. त्याच बरोबर शिक्षकांनी उच्चतम अर्हता धारण करावी यासाठीही प्रयत्न केले जात आहेत.

८) शालेय शिक्षणावर नियंत्रण ठेवण्यासाठी शाहू महाराजांनी जशी 'शाळा पंचपद्धती' सुचविलेली होती त्या पद्धतीनुसार शाळा व समाज यात समन्वय रहावा यासाठी स्थानिक

पातळीवर पालक शिक्षक संघ त्याच बरोबर शालेय व्यवस्थापन समिती यासारख्या समित्या स्थापन केल्या जातात.

एकूणच विचार करता महाराष्ट्राचा विसाव्या शतकात चांगला शैक्षणिक विकास घडून आला. विसाव्या शतकाच्या अखेरीस भारत व महाराष्ट्र यांचे साक्षरतेचे प्रमाण पाहिले तर पुढील प्रमाणे आकडेवारी दिसून येते. भारताच्या सन २००१ च्या जनगननेच्या इंटरनेटवर जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताचे साक्षरतेच एकूण प्रमाण ६४.८४ होते. त्यात पुरूष साक्षरतेचे प्रमाण ७५.२६ तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५३.६७ एवढे होते. महाराष्ट्राचे एकूण साक्षरतेचे प्रमाण सन २००१ साली ७६.८८ एवढे होते. त्यात पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८५.९७ व स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६७.०३ एवढे होते. या आकडेवारीवरून महाराष्ट्रात शैक्षणिक विकास झाला असल्याचे दिसते.

## ८.३ एकविसाव्या शतकातील शिक्षणाकडून अपेक्षा

आज एकविसाव्या शतकाचे एक दशक लोटलेले असताना व शिक्षणासारख्या बाबीवर आज प्रचंड खल झालेला असताना; एवढे शैक्षणिक आयोग, समित्या, शैक्षणिक धोरणे या सर्वांची कार्यवाही झालेली असतानाही काही आव्हाने व अपेक्षा आजच्या काळातही दिसून येतात. त्यांची पूर्तता करण्यासाठी आजही याच समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार आपल्याला संयुक्तिक वाटताना दिसतात.

१) एकविसाव्या शतकातील शिक्षणाच्या अपेक्षांबाबत सर्वप्रथम प्राथमिक शिक्षणाचा विचार करता येईल. भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर घटनेच्या ४५ व्या कलमात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा समावेश करण्यात आला व या कलमानुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण देणे शासणाची जबाबदारी राहील असे स्पष्ट केले गेले. अर्थात या कलमानुसार शिक्षण सुरू झालेले असले तरीही या वयोगटातील सर्वांनाच सक्तीने शाळेत आणण्याविषयीची अंमलबजावणी यशस्वी झालेली दिसत नाही. इ.सन २००९ साली ६ ते १३ या वयोगटातील शालाबाह्य मुलांचे सर्वेक्षण केंद्र सरकार

मार्फत करण्यात आले. या सर्वेक्षणानुसार भारतात ८१.५१ लाख मुले या वयोगटात शालाबाह्य निघाली व महाराष्ट्रात २,०७,३४५ एवढी मुले शालाबाह्य निघाली. या शालाबाह्य मुलांमध्ये शेकडा ५९ एवढया मुलांनी शाळेत प्रवेशच घेतलेला नव्हता तर शे. ४१ एवढया मुलांनी मधेच शाळा सोडून दिलेली होती. एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीस शैक्षणिक जागृती चांगली घडलेली असताना व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा असतानाही एवढी मुले शालाबाह्य होती. त्यामुळे समाजातील शालाबाह्यमुले आज शिक्षण प्रवाहात आणणे ही एक महत्त्वाची अपेक्षा एकविसाव्या शतकातील शिक्षणाकडून आहे.

दि.१ एप्रिल २०१० पासून 'बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिनियम २००९' आमलात आणलेला आहे. या कायद्यानुसारही ६ ते १४ याच वयोगटातील सर्व मुले शाळेत आणणे सरकारचे धोरण आहे. या कायद्याची कार्यक्षम अंमलबजावणी करणेही एक महत्त्वाचे आव्हान शिक्षणातील आहे. वास्तविक कोणत्याही बाबतीत सक्ती करताना काही शाश्वत अटी शासनाने घालणे आवश्यक असते. शासनाच्या काही सवलती मिळविताना सवलतीच्या स्वरूपानुसार किमान शिक्षणाची अर्हता निश्चित केली तर आपोआपच पालक जागृत होऊन आपल्या मुलांना शाळेत पाठवतील. एकूणच शिक्षणाची सक्ती यशस्वी होण्यासाठी शासन, शाळा व पालक या सर्वच स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

२) समाज सुधारकांच्या शैक्षणिक विचारांमुळे स्त्री शिक्षणात निश्चित सुधारणा झाली परंतु अपेक्षित यश अजुनही आलेले दिसत नाही. सन २०११ च्या जनगननेनुसार महाराष्ट्रातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण शेकडा ७५ एवढे आहे म्हणजेच अजुनही स्त्री शिक्षणाची आणखी प्रभावी अंमलबजावणी होणे अभिप्रेत आहे. शहरी भागातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे त्यातुलनेत ग्रामीण भागातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे. स्त्रियांच्या शिक्षणाविषयी आजच्या काळात आणखी एक मोठी समस्या म्हणजे उच्च शिक्षणात स्त्रियांचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे समाज सुधारकांनी जे स्त्री शिक्षण विषयक विचार मांडले होते त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

३) लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, टिळक, शाहू महाराज या समाजसुधारकांनी शेती शिक्षणाचे प्रयोजन अभ्यासक्रमात करावे असे सुचविलेले होते. तथापि या शिक्षणाच्या बाबतीत खूप समस्या आज दिसतात. वास्तविक शेती किंवा कृषिशिक्षण हे विद्यापीठीय पातळीवर आज दर्जेदार आहे त्यात शंका नाही. मात्र या शिक्षणामध्ये सर्वसामान्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणे दुरापास्त झालेले आहे. ग्रामीण भागातील मुलांकडे तेवढा पुरेसा पैसा नाही त्याच बरोबर शहरी मुलांच्या स्पर्धेत ते टिकत नाहीत व त्यामुळे कृषी महाविद्यालयात त्यांना सहजासहजी प्रवेश मिळत नाही. त्यामुळे या शिक्षणाची शोकांतिका अशी आहे की ज्यांना हे शिक्षण मिळावे त्यांना मिळताना दिसत नाही. समाजसुधारकांनी माध्यमिक शिक्षणातच शेती शिक्षणाचा समावेश करावा अशी अपेक्षा व्यक्त केलेली होती परंतु तसा अभ्यासक्रम विशेषत्त्वाने उपलब्ध नाही.

४) पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रायोगिक ज्ञानावर भर दिला जाणे आवश्यक आहे. अनेक मुले केवळ पुस्तकी ज्ञानावर अधारित परीक्षा पास होताना दिसतात. शिक्षण संपल्यानंतर चरितार्थासाठी कोणता व्यवसाय करावा असा प्रश्न त्यांना पडतो. वास्तविक असे चित्र समाजात अनेकदा दिसते की, एखाद्याने मिळविलेली पदवी ठरावीक विषयात असते व तो करीत असलेला व्यवसाय हा दुसराच कुठलातरी असतो. शिक्षण व आपले काम यांचा सहसंबंध जोडला जाणेही आवश्यक आहे. आज विद्यार्थ्यांची वृत्ती केवळ परीक्षेपुरतेच पाठांतर करणे एवढया पुरतीच मर्यादित बनलेली दिसते. केवळ परीक्षेपुरतेच ज्ञान संपादणे अपेक्षित नाही तर हे ज्ञान विद्यार्थ्यांना चिरकारल मिळणे आवश्यक आहे.

५) विद्यापीठीय व उच्च्य शिक्षणाचा दर्जा चांगला राखला जाणेही आवश्यक आहे. विद्यापीठात विविध विषयांच्या ज्ञानशाखांचा विस्तार व्हावा. त्याचबरोबर विविध विषयात संशोधन व्हावे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा वास्तविक जीवनात उपयोग व्हावा. परंतु आज मात्र या शिक्षणास मर्यादा निर्माण झाल्याचे दिसतात.

६) शिक्षकांच्या बाबतीतही हे आव्हान एकविसाव्या शतकातील शिक्षणासमोर आहे. सुधारकांनी सांगितल्या प्रमाणे शिक्षकांनी ज्ञानवंत असावे त्याच बरोबर प्रशिक्षित असावे. आज ज्ञानाच्या कक्षा एकविसाव्या शतकात प्रचंड विस्तारलेल्या आहेत. एकविसाव्या शतकात जुनी जी 'खडू फळा' ही अध्यापन पद्धती होती ती आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात कालबाह्य वाटू लागलेली आहे. अशा युगात शिक्षकांनी स्वतःस बदलत्या काळाच्या ज्ञानाबरोबर सज्ज ठेवणे ही गरज बनलेली आहे. आज शिक्षण क्षेत्रात बेकारी ही मोठी समस्या आहे. डी.एड. पदवीका मिळविलेल्या शिक्षकांची संख्या आज प्रचंड मोठी आहे त्यामुळे सर्वांना नोकऱ्या मिळताना दिसत नाहीत. अशा आवस्थेत शिक्षक जेथे नोकरी मिळेल तेथे विनाअनुदानीत संस्थांमध्ये काम करताना दिसतात. अशा शिक्षकांकडून आधुनिक ज्ञानाची अपेक्षा ठेवणे कठीण बनलेले आहे. वास्तविक मिळणाऱ्या पगाराचा व शिक्षकाच्या कामाचा संबंध जोडला जाऊ नये ही बाब जरी महत्त्वाची असली तरी तो संबंध जोडल्या शिवाय हे काम होणेही शक्य नाही.

७) समाज सुधारकांनी शिक्षणाच्या माध्यमातून विषमता दूर व्हावी असे विचार मांडलेले होते. आजच्या काळात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार पुष्कळ झालेला दिसतो. मात्र समाज सुधारकांना अभिप्रेत असलेली विषमता नष्ट करणे हे उद्दिष्ट अजूनही साध्य झालेले दिसत नाही. आज अजूनही श्रीमंत मुलांच्या शाळा, गरीब मुलांच्या शाळा, शहरी शाळा, ग्रामीण शाळा, हुशार मुलांच्या शाळा, कमी हुशार मुलांच्या शाळा अशा बाबतीत प्रचंड विषमता दिसून येते. श्रीमंत पालक खासगी संस्थांच्या ज्या मोठाल्या इंग्रजी किंवा मराठी माध्यमांच्या शाळा आहेत त्यात भरमसाठ फी भरून मुलांना पाठविताना दिसतात तर गरीब मुले जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळात शिक्षण घेताना दिसतात. शहरी भागात तर गरिबांची शाळा म्हणजे जिल्हा परीषदेची शाळा असे एक समिकरण बनलेले आहे. ग्रामीण भागातील मुले उच्च शिक्षणासाठी शहरात आली तर त्या वातावरणाशी जुळवून घेणे त्यांना सहजासहजी शक्य होत नाही. हा भेद दूर होणे आवश्यक आहे तरच शिक्षणाचे सार्वत्रिकरण खऱ्या अर्थाने झाले असे म्हणता येईल.

८) आज आर.टी.ई कायद्यानुसार मूल्यमापन पद्धतीमध्ये बदल होऊन शिक्षण आनंददायी वाटेल असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तविक समाज सुधारकांनाही अशाच प्रकारचे शिक्षण अपेक्षित होते. या मूल्यमापनात १ ली ते ८ वी पर्यंत विद्यार्थी नापास होत नाही. या पद्धतीनुसार शिक्षणाचे बालकावरील ओझेही कमी केले गेले आहे. परंतु या नवीन मूल्यमापन पद्धतीची अंमलबजावणी वस्तुनिष्ठ होणे आवश्यक आहे. आठव्या इयत्तेपर्यंत नापास होण्याची भिती राहिली नसल्याने विद्यार्थी अभ्यास करीत नाहीत. त्यामुळे गुणवत्ता वाढीला पायबंद बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता टिकविणे हे मोठे आव्हान आहे. या पद्धती बाबत अनेक पालकांचा समज असा आहे की ८ व्या इयत्तेपर्यंत परीक्षा नाही. परंतु या बाबत पालकांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे की, या पद्धतीत रोज विद्यार्थ्यांची परीक्षा होते फक्त काही जुनाट पद्धतींपेक्षा काहीशा वेगळया पद्धतीने. या पद्धतीत शिक्षकाने विद्यार्थ्यांचे दररोज योग्य प्रकारे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

९) शिक्षणाचा मुख्य उद्देश हा ज्ञान मिळविणे आहे. नोकरी मिळविणे हा शिक्षणाच्या अनेक उपयोगापैकी एक झाला. आधुनिक काळात मात्र सर्व लोक शिक्षणाचा संबंध केवळ नोकरीशीच जोडताना दिसतात. मुळात नोकरी मिळविण्यासाठी शिक्षण घ्यायचे ही सवय भारतीयांना इंग्रजांनीच लावलेली आहे. केवळ नोकरी मिळेल या उद्देशाने शिक्षण घेणे हा प्रकार आजच्या काळात कमी होणे आवश्यक आहे.

१०) आज अनेक पालक आपल्या मुलांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातूनच झाले पाहिजे याबाबत आग्रही असल्याचे दिसते. त्यामुळे इंग्रजी शाळांचे प्रस्थ आज वाढलेले आहे. आज पालक आपल्या मुलांच्या बुद्धिमत्तेचा, आवडीनिवडीचा विचार न करता केवळ इंग्रजी माध्यमाची त्याच्यावर सक्ती करताना दिसतात. त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण आज गरजेचे व महत्त्वाचे असतानाही त्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

११) भारतासारख्या देशात शिक्षणावर होणारा खर्च इतर देशांच्या तुलनेने कमी आहे. इतर देश आरोग्य आणि शिक्षणावर भरमसाठ खर्च करतात. त्यामुळे खर्च अधिक न झाल्याने शिक्षणाची अंमलबजावणी एवढी प्रभावी होताना दिसत नाही.

१२) शैक्षणिक उपक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय यंत्रणा या कार्यक्षम पद्धतीने कार्यवाही करताना दिसत नाहीत. आज पालकांचा ओढा सरकारी शाळापेक्षा खासगी संस्थांच्या शाळांकडे अधिक दिसतो यातून हेच सिद्ध होते.

१३) महाराष्ट्रातील अनेक खासगी संस्था या चांगल्या प्रकारचे शिक्षण कार्य करीत असल्या तरीही काही शैक्षणिक संस्था या केवळ स्वार्थी दृष्टिकोनातून व विद्यार्थ्यांकडून देणग्या वसूल करता येतील या हेतुने सुरू केल्या गेलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या फसवणुकीच्या बातम्या अनेक वर्तमान पत्रात सर्वश्रुत आहेत. त्याच बरोबर अनेक संस्था या विनाअनुदानीत तत्त्वावर शाळा किंवा महाविद्यालये चालवितात अशा शाळा व महाविद्यालयांमधून योग्य त्या सोयी दिल्या जात नाही.

१४) नवीन काळाचा विचार करता जगातील इतर देशांशी स्पर्धा करताना आपले शिक्षण तेवढे सक्षम व परिणामकारक असणे आवश्यक आहे. अन्यथा जागतिक स्पर्धेत टिकणे भारतासारख्या देशाला कठीण होईल.

१५) आज एकीकडे महागडे शिक्षण आणि दुसरीकडे 'इ' लर्निंगसारख्या शिक्षणाची आवश्यकता अशा दोन टोकांच्यामध्ये भारतीय समाज सापडला आहे. याचा समन्वय साधण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे अन्यथा ज्याच्याकडे पैसा तो उच्च पदवीधर व सामान्य ज्ञानी असला तरी त्याची शिक्षणात परवड ही बाब दुर्लक्षिण्यायोग्य नाही.

एकूणच विचार करता एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारक आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, महर्षी धोंडो केशव कर्वे व राजर्षी शाहू महाराज यांनी मांडलेल्या शिक्षणविचारांना एक वैचारिक बैठक होती त्यामुळे आजच्या काळातही हे शिक्षण विचार उपयुक्त असताना दिसतात.

# संदर्भ ग्रंथ सूची

# संदर्भ ग्रंथ सूची

## अ) प्राथमिक साधने

### अ १) मराठी


१) कर्वे धोंडो केशव :- **'आत्मवृत्त व चरित्र'**, हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था, पुणे-४, तृतीय आवृत्ती : १९५८.

२) कर्वे धोंडो केशव :- **'मौलिक विचार धारा-हस्तलिखित'**, महर्षी कर्वे स्मारक, पुणे.

३) कीर धनंजय, (डॉ) मालशे स.गं., (डॉ) फडके य.दि.(संपा) :- **'महात्मा फुले समग्र वाङ्‌मय'**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती : नोव्हेंबर २००६.

४) जाधव भगवानराव बापूसाहेब :- **'राजर्षी श्रीशाहूमहाराजांची भाषणे'**, लोकवाङ्‌मय गृह प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती : मे २००९.

५) जांभेकर गणेश गंगाधर (संपा,प्रकाशक) :- **'आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड २'**, लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०.

६) जांभेकर गणेश गंगाधर (संपा,प्रकाशक) :- **'आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह - खंड ३'**, लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०.

७) टिळक ज.श्री (प्रकाशक) :- **'समग्र लोकमान्य टिळक, खंड ३, राजकीय लेखसंग्रह'**, केसरी प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : १९७६.

८) टिळक ज.श्री (प्रकाशक) :- **'समग्र लोकमान्य टिळक, खंड ५, समाज व संस्कृती'**, केसरी प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : १९७६.

९) टिळक ज.श्री (प्रकाशक) :- **'समग्र लोकमान्य टिळक, खंड ६, जीवन ध्येय'**, केसरी प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : १९७६.

१०) पवार (डॉ) जयसिंगराव (संपा, प्रकाशक) :- **'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ- खंड ३, राजर्षी शाहू छत्रपती : संकीर्ण साहित्य'**, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती : २००१ .

११) प्रधान गणेश प्रभाकर (संपादक) :- **'आगरकर - लेख संग्रह'**, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, आवृत्ती : १९६० .

१२) प्रियोळकर अनंत काकबा (संपादक) :- **'लोकहितवादीकृत निबंध संग्रह'**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९६७ .

१३) बापट विष्णुशास्त्री वामन :- **'सार्थ श्रीमनुस्मृति'**, राजेश प्रकाशन, पुणे .

१४) येडेकर श्याम (संपादक) :- **'राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे'**, मंगल प्रकाशन, प्रथम आवृत्ती : १९७१ .

१५) रानडे रमाबाई :- **'आमच्या आयुष्यातील काही आठवणी'**, वरदा प्रकाशन, तिसरी आवृत्ती : जून २०१२.

१६) शेवाळकर राम (संपादक) :- **'विनोबा शिक्षण विचार'**, परंधाम प्रकाशन, पवनार, पहिली आवृत्ती : १९७७ .

## अ २) इंग्रजी

1) Grover Verinder (Editor) :- **'Mahadev Govind Ranade** : A Biography of His Vision And Ideas', Deep & Deep Publications, New Delhi

2) Jambhekar G.G. (Editor, Publisher) :- **'Memoirs & Writings of Acharya Bal Gangadhar Shastri Jambhekar – Volume II'**, Lokshikshan Karyalay, Pune. Edition 1950.

3) Jambhekar G. G. (Editor, Publisher) : - **'Memoirs & Writings of Acharya Bal Gangadhar Shastri Jambhekar – Volume III'**, Lokshikshan Karyalay, Pune. Edition 1950.

4) Ranade Ramabai (Editor) :- **'Miscellaneous writings of the late Hon'ble Mr. Justice M.G. Ranade'**, Sahitya Akademi, Delhi, First Edition 1915, Reprinted 1992.

5) Swami Vivekananda : - **'My India, The India Eternal'**, Published by The Ramkrishna Mission Institute of Culture, Kolkata, third reprint – 1997.

## ब) दुय्यम साधने

### ब १) मराठी

१) अकोलकर गं. वि. (अनुवादक) : - **'गांधी विचार दर्शन, खंड ११ : शिक्षण विचार'**, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे-४, प्रथम आवृत्ती : १९५८.

२) आगलावे (डॉ) प्रदिप :- **'सामाजिक संशोधन पद्धती'**, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, आवृत्ती २००७.

३) आठलेकर मंगला : - **'महर्षी ते गौरी (स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल)'**, राजहंस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती जुलै २०००.

४) आत्रे त्रिंबक नारायण :- **'गावगाडा'**, वरदा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती : १९६१, ३रे पुनर्मुद्रण : जून २००९

५) कर्वे द. गो. कुलकर्णी गो. म. (अनुवादक) : - **'स्वतंत्र भारताचे द्रष्टे : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे'**, आर्यभूषण मुद्रणालय, शिवाजी नगर पुणे.

६) कार इ.एच लेले वि.गो. (अनुवादक) :- **'इतिहास म्हणजे काय?'**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे.

७) कायंदे पाटील (डॉ) गंगाधर :- **'भारतीय शिक्षण इतिहास आणि समस्या'**, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, प्रथम आवृत्ती २००८.

८) कीर धनंजय :- **'महात्मा जोतीराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक'**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती : १९९२.

९) कीर धनंजय :- **'राजर्षी शाहू छत्रपती'**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती : १९९२.

१०) कुलकर्णी अ.रा. :- **'महात्मा जोतीराव फुले: सामाजिक आणि शैक्षणिक कार्य'**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती : २००८, पु.मु. २०११.

११) कुंडले (डॉ) म.बा.:- **'शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र'**, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, दहावी आवृत्ती: २००३.

१२) खांदवे (डॉ) बी.टी :- **'दीनबंधू कृष्णराव भालेकर'**, गाज प्रकाशन, अहमदनगर, प्रथम आवृत्ती : मार्च २०००.

१३) खेर भा.द. :- **'लोकमान्य टिळक दर्शन'**, अस्मिता प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती : सप्टेंबर २०००.

१४) खैरनार (डॉ) दिलीप:- **'प्रगत सामाजिक संशोधन पद्धती'**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती : फेब्रुवारी २००९.

१५) गरूड अणासाहेब व सावंत बी.बी :- **'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास'**, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : १९९५.

१६) जाधव (डॉ) रमेश :- **'लोकराजा शाहू छत्रपती'**, सुरेश एजन्सी, पुणे २, प्रथम आवृत्ती : १९९७.

१७) जोशी (डॉ) न.म. :- **'महाराष्ट्राचे शिल्पकार : महर्षी धोंडो केशव कर्वे'**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृत्ती : २००७.

१८) त्रिभुवन शैलेश :- **'भातरत्न डॉ.धोंडो केशव कर्वे'**, पायल पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती : २००६.

१९) टोपे त्र्य. कृ. :- **'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : व्यक्ती, कार्य आणि कर्तृत्त्व'**, रोहन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : १९९२.

२०) ठोंबरे तानाजी :- **'आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार'**, लोकवाङ्‌मय गृह प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती : एप्रिल २००५.

२१) तेरणीकर सुलभा (संकलक, संशोधक) :- **'गाथा शतकाची'**, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वे नगर, पुणे, प्रथम आवृत्ती : २००८.

२२) देशपांडे अच्युत नारायण :- **'मराठी वाङ्‌मयाचा इतिहास : भाग पहिला १८७४ ते १९२०'**, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२३) देव (डॉ) प्रभाकर :- **'इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन, आणि लेखनपरंपरा'**, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक , पहिली आवृत्ती : ऑगस्ट २००७.

२४) नाईक तु.बा. :- **'छत्रपती राजर्षी शाहू महाराज'**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण ऑक्टोबर २००७.

२५) पटवर्धन नारायण महादेव :- **'धोंडो केशव कर्वे चरित्र'**, हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था, हिंगणे बुद्रुक, पुणे-४, प्रथमावृत्ती १९५८.

२६) पवार (डॉ) जयसिंगराव :- **'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : खंड १ – राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य**, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापुर, प्रथम आवृत्ती २००१.

२७) पवार (डॉ) जयसिंगराव :- **'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : खंड २ – लेख संग्रह'**, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापुर, प्रथम आवृत्ती २००१.

२८) पवार ना.ग. :- **'शिक्षण क्षेत्रातील विचारवंत'**, नित्य नूतन प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती : जून २००७.

२९) पांढरे (डॉ) नीला :- **'महर्षी धोंडो केशव कर्वे,'** उन्मेष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००७.

३०) पांढरे (डॉ) नीला :- **'महाराष्ट्रातील स्त्री सुधारक'**, उन्मेष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००९.

३१) पारसनीस (डॉ) न.रा. **'शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका'**, नूतन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : १९८७.

३२) फडकुले (डॉ) निर्मलकुमार :- **'महाराष्ट्राचे शिल्पकार : लोकहितवादी'**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती: जानेवारी २००४.

३३) फाटक नरहर रघुनाथ:- **'न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे'**, नीलकंठ प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती : जानेवारी १९६६.

३४) भोळे भास्कर लक्ष्मण:- **'महात्मा जोतीराव फुले : वारसा आणि वसा'**, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, तिसरी आवृत्ती : २००७.

३५) मालशे स.गं. :- **'शोधनिबंधाची लेखनपद्धती'**, लोकवाङ्‌मय गृह प्रकाशन, मुंबई, सु.आ.: २०११.

३६) रानडे दा.पां. :- **'न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे'** चित्रशाळा प्रकाशन, पुणे-२, तृतियावृत्ती : १९५०.

३७) लेले रा.के. :- **'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास'** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती : २००४.

३८) वाळींबे रामचंद्र शंकर :- **'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची समाजिक पुनर्घटना : भाग १'** प्रतिभा प्रकाशन व मुद्रणालय, पुणे, प्रथम आवृत्ती : १९६२.

३९) वैद्य सरोजिनी :- **'गोपाळराव हरी (लोकहितवादी)'**, सुपर्ण प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : १९७८

४०) शेलार (डॉ) सुधाकर :- **'एकोणिसावे शतक – सुधारणावाद व मराठी साहित्य'**, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : जुलै २००८

४१) सरदार गं.बा. :- **'महात्मा फुले: व्यक्तीत्त्व आणि विचार'**, गंथाली प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती : १९८२.

४२) सरदेसाइ बी.एन. :- **'इतिहास लेखनशास्त्र'**, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती : २००३.

४३) सूर्यवंशी कृ.गो. :- **'राजर्षी शाहू : राजा व माणूस'**, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : १९८४.

## ब २) इंग्रजी

1) Majumdar R.C (Gen.Editor) Majumdar A.K & Ghose D.K. (Asst.Editor) :- **'The British Paramountacy And Indian Renaissance , Part – II'** ¸ Bhartiya Vidya Bhavan ¸ Bombay. Publisher : S.Ramkrishnan ¸ First Published in1965.

2) Phadke Y.D. : - **‘Social Reformers of Maharashtra’**, Maharashtra Information Centre, Government of Maharashtra, Mumbai, Edition 1985.

## ब ३) वृत्तपत्रे / मासिके / स्मरणिका अहवाल / संकेतस्थळे

### अ) वृत्तपत्रे

१) दैनिक दिव्य मराठी दि. ०१-०५-२०१२ औरंगाबाद आवृत्ती

२) दैनिक दिव्य मराठी दि. २५-०५-२०१३ अहमदनगर आवृत्ती

### ब) मासिके

५९) **शिक्षण संक्रमण** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, फेब्रुवारी २००५.

६०) **शिक्षण संक्रमण** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, फेब्रुवारी २००८

६१) **शिक्षण संक्रमण** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, फेब्रुवारी २००९,

### क) स्मरणिका

१) **भाऊबीज निधी स्मरणिका** महर्षी कर्वे स्त्री – शिक्षण संस्था, डिसेंबर १९९८

### ड) संकेतस्थळे

1) www.Wikipedia.org.in , the free Encyclopedia

2) Google Search/ LOKMANYA BAL GANGADHAR TILAK'S VIEWS ON WOMEN'S EDUCATION